॥ श्रीगणेशाय नमः ॥

नूतनकाव्यकुसुममाला.

आर्या.

ध्यावा अनुभव पुरता, द्यावा मग योग्य तो अभिप्राय ॥
हा उत्तम मार्ग असे, ना तरि अनुताप मागुता होय ॥

वसंततिलका.

या भूतळीं कारिति जे अमुचा अव्हेर ॥
हा ना तदर्थ समजा कविताप्रकार ॥
उत्पन्न होतिल कुणी तरि मत्समान ॥
आहे मही विपुल, त्यापरि कालमान ॥

लेखक व प्रकाशक,

कृष्णाजी सदाशिव गोखले,

मु. तासगांव, जि. सातारा,

यांनीं पुणें येथें शि. म. परांजपे यांच्या
गोवर्धन छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें असे.

शके १८३४.

किंमत १४ आणे.

प्रस्तावना.

विद्यमानकालीं कोणत्याही पुस्तकाचे आरंभीं थोडी बहुत प्रस्तावना देण्याची पद्धत सुरू आहे. त्यास अनुसरून मी ही अल्पांत प्रस्तावना देतों:—

मला कविता करण्याची बहुत इच्छा. परंतु अंगीं विद्वत्ता नसल्यामुळें त्या इच्छेची सफलता कशी होईल, ही शंका मनांत न आणितां केवळ परमेश्वरावर सर्वपरि भार ठेवून कविता करण्यास आरंभ केला. मला प्राकृतभाषाही अवगत नसून संस्कृताचा तर गंधही नाहीं असें ह्मटल्यास विशोभित होणार नाहीं. अशा स्थितींत कांहीं तरी र ट फ अक्षरें जोडून हें 'काव्यकुसुममाला' पुस्तक रचिलें आहें. हें प्राकृत, सरळ, सुलभ, स्पष्टार्थ, असून भाविक, वृद्ध, बाल व स्त्रिया इत्यादिकांस सहज समजण्यासारखें उघड अर्थानें सुलभ रचिलें आहे. यांत रसिकता, माधुर्य, काव्यालंकार, लाघवता हे गुण विशेष साधलेले नाहींत, हा माझ्या अविद्वत्तेचा प्रभाव होय. तथापि यथाशक्ति ईशदत्त मतीनें जेवढे साधवले तेवढे कसे तरी साधले आहेत, हें पुस्तक सलक्ष वाचल्यावांचून लक्षांत यावयासारखें नाहीं.

आर्या.

प्राकृत किंचित्संस्कृतामिश्रित कविता परंतु ही सुरसा ॥
आहे, अनुभव घ्यावा, घेई षट्पद जसा सुमनसुरसा ॥ १ ॥
स्वामूल्य समय वेंचूनि हें पुस्तक सांत एकवार तरी ॥
वाचूनि सलक्ष यांतिल सेवावें हरिकथामृता चतुरीं ॥ २ ॥

या पुस्तकांत लहान मोठीं ६१ प्रकरणें असून त्यांतील कित्येक अगदीं नवीन विरचिलीं आहेत. १ संसारनिषेध, २ जगदीशस्तव,

३ मन:प्रार्थना, ४ व्याधिसंहाररविस्तोत्र, ५ सत्संगती, ६ लडिवाळ प्रार्थना, ७ ज्ञानगंगास्नान, ८ श्रीदत्तस्तव, ९ करुणाष्टक, १० शंभुप्रणाम, ११ मोदरामायण, १२ इंदुकांतिनाटक, १३ हनुमानस्तव, १४ शिवस्तव, १५ प्रार्थनाशतक, इत्यादि.

हें पुस्तक कर्त्यानें आपणाकरितां व भाविक लोकांकरितां भगवत्कृपाप्रसादें करून तें श्रीपरमेश्वरचरणीं सादर समर्पण केलें आहे.

आर्या.

शिरसाष्टांगें नमुनी करुं सादर विश्वपालका चरणीं ॥
प्राकृत मत्कृत कविता अर्पण, जो सिद्ध सृष्टिचे भरणीं ॥

या पुस्तकांत भाषा वगैरे संबंधानें जे अनेक दोष झाले असतील, त्याबद्दल सुज्ञ रसिकांनीं क्षमा करून, छापतांना जे दोष झाले आहेत, ते शुद्धिपत्रकांत शुद्ध केले आहेत, तिकडे मेहेरबानीनें वाचकांनीं लक्ष व मन पोंचवावें, अशी सविनय प्रार्थना आहे.

तासगांव.
भाद्रपद शु १ श. १८३४.

कृष्णाजी सदाशिव गोखले,
पुस्तककर्ता.

अनुक्रमणिका.

अभिप्राय.

नूतनकाव्यकुसुममाला हें पुस्तक रा. रा. कृष्णाजी सदाशिव गोखले, तासगांव, यांनीं लिहिलें आहे. एकंदर सर्व पुस्तकाची पृष्ठ-संख्या ४०० शें च्या वर असून त्यांत एकंदर कवितावद्ध अशीं ६१ प्रकरणें आलेलीं आहेत. या ६१ प्रकरणांच्या यादीकडे सूक्ष्मदृष्टया पाहिलें असतां प्रस्तुत कवींनीं आपल्या विषयाच्या निवडणुकीची मर्यादा किती विस्तृत आणि व्यापक केलेली आहे, हें कोणाच्याही सहज लक्षांत येईल. रामायण, भारत व भागवत, या अलौकिक खाणींतून रत्नें खणून काढण्याचा आपल्या मराठी कवींचा पूर्वीपासूनचाच संप्रदाय आहे. त्याप्रमाणें रा. गोखले यांनींही या दिव्य ग्रंथांतून आपल्या आवडीप्रमाणें बरींच कथारत्नें निवडून घेतलेलीं आहेत. त्याशिवाय त्यांच्या हल्लींच्या या ग्रंथामध्यें जो विशेष दिसतो, तो संतचरित्रांचा होय. गोरखनाथ, भानुदास, दामाजीपंत, संतोबा पवार, संत महाजन, सुरदास, नामदेव, गोमाई, सेना न्हावी, वगैरे भक्तमंडळींचीं अत्यंत भक्तिपूर्ण चरित्रें यांत आलेलीं असून त्यांतील कविता फारच चांगल्या साधल्या आहेत. सदर चरित्रांमधील कविता अगदीं साध्या व सरळ असून त्या वाचीत असतांना अंतःकरण भक्तियुक्त, कंठ सद्गदित आणि नेत्र अश्रुपूर्ण झाल्यावांचून रहात नाहींत. स्त्रिया व लहान मुलें यांना सुद्धां हीं आल्यानें समजण्यासारखीं सुलभ आहेत. याशिवाय रा. गोखले यांच्या काव्यसंग्रहामध्यें वेदांत, नीति, ईशस्तुति, इत्यादि विषयांवरही बरीच कविता मार्मिक व निःस्पृहत्वाची आहे. तसेंच गंगालहरी, महिम्न, सूर्यशतक, इत्यादि कित्येक संस्कृत कवितांचींही भाषांतरें आलेलीं आहेत. बहुधा प्रत्येक नवीन कवीचा जुन्या कवींपैकीं कोणी तरी एखादा आवडता कवी असतो. त्याप्रमाणें रा. गोखले यांचे पूज्य

दैवत पूजार्ह असे जे मोरोपंत ते असल्याचें त्यांच्या काव्यांमधून दिसून येतें. पंतांच्याप्रमाणें प्रसंगविशेषीं आपल्या काव्यांतून कांहीं विशिष्ट मंत्र साधणें वगैरे व पंतांची यमक, अनुप्रास, वगैरे साधण्याची पद्धत, यांच्या अनुकरणाची प्रवृत्ति प्रस्तुत ग्रंथांत स्पष्टपणें दिसून येते. या पुस्तकांत एकंदर कविता ३,८७८ आहेत. इतकी कविता अर्वाचीन कवींपैकीं फारच थोड्यांनीं केलेली आढळून येते. जुन्या महाराष्ट्र कवींमध्यें मोरोपंत, वामन पंडित, रघुनाथ पंडित इत्यादिकांची कविता फारच अप्रतिम आहे. परंतु हे कवि बाजूला ठेवून बाकीच्या जुन्या कवितांशीं हल्लींच्या या नव्या कवितांची तुलना करून पाहिल्यास या कविता बऱ्याच वरच्या दर्ज्याच्या ठरतील, असें मानण्यास कांहीं हरकत नाहीं.

पुणें,
ता. १५।९।१२.

शि. म. परांजपे.

॥ श्रीगणेशाय नमः ॥

-काव्य-कुसुम-माला.

प्रकरण १ लें.

ामद्भागवतनिर्माणहेतु.

मालिनी.

द्नपदातें वंदुनी भक्तिभावें ॥
णसुचरित्रीं चित्त माझें रमावें ॥
ा विनति ऐसी प्रार्थि जोडूनि हस्तां ॥
नति तसें त्या काव्यकारां समस्तां ॥ १ ॥

आर्या.

रतनय श्रीव्यास आश्रमीं असतां ॥
ारद यद्हृदिं ठाव न मिळे कदा असता ॥ २ ॥
जो संकीर्तन करी सदा वदनीं ॥
ासें बैसविला त्या सदासनीं सदनीं ॥ ३ ॥
ज्ञुनि सत्यवतीनंदनें पदीं नमुनी ॥
ा बोले पाराशरास देवमुनी ॥ ४ ॥
व्यासा अससी शरीरिं का कुशल ॥
ा सुकवी सर्वज्ञ तेवि तूं कुशल ॥ ५ ॥

इंद्रवज्रा.

भवतार घेसी ॥ तें कार्य गेलें परिपूर्णतेसी ॥
होउनीयां ॥ वाटे समाधान मनीं वदे या ॥ ६ ॥

जें ब्रह्म योग्याद्भुत जाणण्यातें ॥ तज्ज्ञान आहे तुझिया मनातें ॥
तैसेंहि चारी-पुरुषार्थ-पूर्ण ॥ केलें असे भारत तूं पुराण ॥ ७ ॥

आर्या.

जाणसि तूं ज्ञानें जें ब्रह्म अगोचर अनाद्यनंत तया ॥
तैसें तदध्ययनही केलें परि भासतोसि दुःखितया ॥ ८ ॥
काय तुझ्या तापदसा खेद मना बादरायणा गमला ॥
तो शुद्ध मानसानें धीमंता शीघ्र आजि सांग मला ॥ ९ ॥

इंद्रवज्रा.

श्रीव्यास तेव्हां कर जोडुनीयां ॥ बोले मुनीतें नत होउनीयां ॥
म्यां ग्रंथ केले जगतार्थ नाना ॥ संतोष तेणें परि मन्मना ना ॥१०॥

भुजंगप्रयात.

समाधानवृत्ती मना स्वल्प नाहीं ॥ सुचेना करावें कसें कल्पना ही ॥
व्यथावन्हिनें देह हा पोळताहे ॥ यदर्थीं दिसे आननीं खिन्नता हे ११

आर्या.

कमलोद्भवनंदन तूं कमलापति--शेषशायिचा भक्त ॥
सर्वज्ञ यदर्थ मला सूक्ष्मत्वें हेतु तत्कथी व्यक्त ॥ १२ ॥

भुजंगप्रयात

करूनी कृपा ताप हा दूर सारी ॥ जडे शांतता मानसा ज्या प्रकारीं ॥
करी बोध ऐसा मला तूं प्रसादें ॥ पिता नंदनातें सुमंत्रा जसा दे ॥१३॥

यूथिका.

व्यासवाणि परिसूनि सुरर्षी ॥ त्यावरी निजकृपाघन वर्षी ॥
बोलिला मधुर भाषणिं त्यातें ॥ शांत चित्त करुनी परिसा तें ॥१४॥

आर्या.

हे व्यासा सर्वज्ञा केले जे ग्रंथ तूं महामतिनें ॥
श्रीहरिगुण त्यांमाजी वर्णियलेसी परी न महतीनें ॥ १५ ॥
यद्यपि महाकवीनें राचिला खचिला सुशब्दरत्नांनीं ॥
हरिगुणकीर्तनरहित ग्रंथ तथापी न मान्य यत्नांनीं ॥ १६ ॥

हरिगुणरहिता कविता रसिकसुशब्दान्विता जरी केली ॥
ती व्यर्थ वायस-सरी करिती जेथें न हंस ते केली ॥ १७ ॥
हे बादरायणमुने जैसी कीं कुंकमाविणे नारी ॥
हरियशरहिता कविता परमानंदा न होय नेणारी ॥ १८ ॥
तैसीच ती विलोकन करिती ज्ञानी न तत्श्रवणपठण ॥
होतें निरर्थक जसें करितां कस्तूरिचें खरा उटण ॥ १९ ॥
हे व्यासा सुकविवरा तव मनिं संतुष्टता न उद्भवते ॥
तद्धेतु माधवाची वर्णिलि तूं कीर्ति नांतका भव ते ॥ २० ॥

इंद्रवज्रा.

धर्मादि चारी पुरुषार्थ जैसे ॥ वर्णीयलें श्रीशयशा न तैसें ॥
जेणें समाधान न मानसाला ॥ हे व्यास ऐशी कविता कशाला २१

मालिनी.

हरिगुणहिन काव्यीं अज्ञ संतोषि होती ॥
परि सुजन सुवेत्ते मान त्यासी न देती ॥
जरि हरिगुणलीला गाइली ही त्रिसंगी ॥
हरुनि सकल पापा संसृती-भीति भंगी ॥ २२ ॥

चामर.

नित्य तेवि काम्य कर्म कामहीन बुद्धिनें ॥
केलियासि मोक्षलाभ होय वेद आननें ॥
बोलिला असे, परंतु भक्ति तें जरी नसे ॥
व्यर्थ होय वैद्यकर्म जाणत्याविणें जसें ॥ २३ ॥

आर्या.

अत एव मुनिश्रेष्ठा सकलहि बंधांतुनी सुटायास ॥
करि वर्णन योग्यपणें श्रीशगुणांचें तुला न आयास ॥ २४ ॥
ज्ञानी श्रुतिपथगामी सुयशस्वी सत्यनिष्ठ तूं असती ॥
सत्कर्मधर्मरत परि आजवरी भिन्न दृष्टिनें वससी ॥ २५ ॥
यास्तव तूं वर्णाश्रमधर्मांतें तेवि चारि पुरुषार्थां ॥
वर्णियलें प्रीतीनें लाधासि मानासि मुने न तोपार्था ॥ २६ ॥

मायामय प्रपंचीं गेलें तव चित्त वाडवा भुलुन ॥
म्हणुनी न शांतता त्या जसि नौका जाय वादळीं बुडुन २७
त्वत्कृत नाना ग्रंथें स्वल्पहि हित जाहलें न गा तुजला ॥
इतकेंचि न परि उलटा अन्याचे मनिं अपाय तो सजला २८
ऐसें कैसें ह्मणसिल तरि परिसावें सुचित्त देऊन ॥
अज्ञजनपद्धति असी जावें सज्ञानपृष्ठिमागून ॥ २९ ॥
या न्यायें त्वद्ग्रंथीं ठेवुनि विश्वास अज्ञ जन चुकले ॥
मुकले सत्य सुखातें भक्तीनें द्वार मुक्तिचें उकले ॥ ३० ॥
असतो प्रवृत्तिमार्गीं मनुजांचा सर्व काल कल पूज्य ॥
होय निवृत्तिपथासीं तुलना करितां प्रवृत्तिपथ त्याज्य ॥३१॥

पृथ्वी.

असें असुनिही प्रवृत्तिपथ हाचि सद्धर्म गा ॥
तदाचरण तें करा कथियलें समस्ता जगा ॥
महान अपराध हा तव करें पहा जाहला ॥
न तो परि तुझ्या मना अजवरी बुधा भासला ॥३२॥

मालिनी.

ह्मणसिल जरि माझें सांगणें तें चुकीचें ॥
तरि इतरिं न केलें खंडणा कां तयाचें ॥
तव कथनिं तयांचा पूर्ण विश्वास राहे ॥
ह्मणुनि न पुसती ते सत्यतासत्यता हें ॥ ३३ ॥

वंशस्थ.

प्रवृत्तिपंथा जरि घातलें तुवां ॥ तथापि तें मान्य न सुज्ञ मानवा ॥
निवृत्तिमार्गीं वळवूनि मानसा ॥करूनि घे प्राप्त महासुखा रसा ३४

इंद्रवज्रा.

अज्ञानयोगें गणि देह आत्मा ॥ तो चूकलासी शुचि रीतिवर्त्मा ॥
गेला बुडूनी रजतामसांहीं ॥ त्यातें महाचित्सुखलाभ नाहीं ॥३५॥

वंशस्थ.

प्रवृत्तिपंथाचर अज्ञ लोक ते ॥ तयां न ईशांघ्रिज सौख्य लाधतें ॥
सुभक्तिपंथीं रत जाहल्यावरी ॥ तयां हरीचें पदसौख्य तें वरी ३६

आर्या.

अत एव व्यासमुने आतां हरिचें चरित्र करि गान ॥
चित्तसमाधान तुझें होय तसें या दुजाचि पथ गा न ॥३७॥
व्यापक नित्य निरंजन कर्ता हर्ता परेश तन्महिमा ॥
आहे अगाध इतका त्रैलोक्यीं द्यावया नसे उपमा ॥ ३८ ॥
व्यासा प्रवृत्त्यधिकची जीवा बहुसौख्यदायका भक्ति ॥
भक्तिविना धर्मपथें न मिळे मुक्ती अशीच वेदोक्ति ॥ ३९ ॥

पृथ्वी.

प्रवृत्तिपथ बोलसी विहित धर्म तो सोडुनी ॥
करील हरिभक्ति ती मनुज जो मनापासुनी ॥
न पूर्ण जरि जाहल्या मृतचि होय मध्यंतरीं ॥
तदीय फल त्या मिळे पुढिल अन्य जन्मांतरीं ॥ ४० ॥

स्वागता.

या प्रवृत्तिपथचारि जनातें ॥ प्राप्त काय वद गा फल होतें ॥
त्यागुनीच पथ हा हरिभक्ती ॥ केलिया द्रुत मिळे वर मुक्ती ॥ ४१ ॥

स्रग्धरा.

ऐसें व्यासाप्रती तो कथुनि सुरमुनी आत्मजन्मादिवृत्त ॥
विस्तारें सांगुनीयां करि गमन मुखें रामनामासि गात ॥
त्या सद्बोधामृतातें द्विजवरमुनिनें प्राशुनी भक्तियुक्त ॥
वर्णीली श्रीशलीला श्रवण पठण ती केलिया जीव मुक्त ॥४२॥

तोटक.

भगवद्गुणसंचयशें खचित ॥
ह्मणुनी अभिधानचि भागवत ॥
पठणश्रवणें भवसिंधु तरे ॥
शिवनंदन त्या स्तवि वंदि करें ॥ ४३ ॥

प्रकरण २ रें.

समुद्रमंथन.

इंद्रवज्रा.

गौरीसुताच्या पदपंकजातें ॥ वंदूं नमीती अमरादि ज्यातें ॥
दे मंगला नाशुनि अंतराया ॥ विघ्नार्णवातें तरि जो तराया ॥ १ ॥

यूथिका.

दैत्यदानवखलाहननातें ॥ मंथिल्या जलनिधी चरितातें ॥
गायना अनुसरे मम चित्त ॥ दे तया सुमति भो भगवंत ॥२॥

आर्या.

ऐके परिक्षितिसुता ह्मणती मुनिवर्य ते शुक्राचार्य ॥
सागरमंथन करुनी सुरवृंदें साधिलें कसें कार्य ॥ ३ ॥
सुरहृद्गत जाणुनि हरि बोले गंभीर वाणिनें अमृतां ॥
कथितों सुयुक्ति काढा सहदानव सिंधुमंथनें अमृता ॥ ४ ॥
सांप्रत धरिलें आहे कालें त्या दानवा कुला पदरीं ॥
यास्तव तुह्मी अहां हो पडलां सुरजन महाविलापदरीं ॥ ५ ॥

इंद्रवज्रा.

मैत्री तया संगिं तुह्मी करावी ॥ शंका न चित्तीं तिळही धरावी ॥
जैसा करंड्यांतिल तो भुजंग ॥ आखूसवें पाहुनियां प्रसंग ॥ ६ ॥

स्रग्धरा.

आधीं क्षीराब्धिमाजी अगम तृण लता घालुनी औषधींतें ॥
मंथाया मंथनीतें सकल गिरिवरा योजणें मंदरातें ॥
रज्जू ती वासुकीची करुनि गिरिवरा वेष्टुनी मंथनाला ॥
केल्या क्षीरार्णवातें मग अमृत मिळे भद्र दे तें तुह्मांला ॥ ७ ॥

मालती.

ह्मणतिल दैत्य तुह्मांसि जें मुखें ।। निज अनुमोदन द्या तया सुखें
जरि मथनांत निघे हलाहल ।। तरि धरणें स्वमनीं न भी-मल ।।८।।

इंद्रवज्रा.

तैशाच वस्तू निघतील नाना ।। दावा तुह्मी हो तयिं वासना ना ।।
बोलूनि ऐसें भगवंत गुप्त ।। झाला करी जो नतहेतु तृप्त ।। ९ ।।

आर्या.

शुक ह्मणती राजेंद्रा गेले शिव विधि मग स्वधामातें ।।
अन्यामर बलिसद्मीं जाती साधावया स्वकामातें ।। १० ।।

इंद्रवज्रा.

निःशस्त्र शक्रादि दिवौकसांतें ।। पाहूनि दैत्यात्मजमानसातें ।।
आश्चर्य वाटे मग सैनिकांला ।। बोले निवारी न बली तयाला ११

आर्या.

सिंहासनास्थित बलीरायासंनिध सुरद्र जाऊन ।।
सांगे सागर मथितां होइल पीयूषलाभ कीं ह्मणुन ।। १२ ।।
ती वाणि वासवाची मानवली बलिस तेवि दैत्यवरां ।।
ह्मणती अमृतप्राप्ती होइ अशा मंथना अगत्य करा ।। १३ ।।

मालिनी.

असुर सुर मिळूनी जाति हेमाद्रिठायां ।।
उपडति गिरि कष्टें सिंधुतीरा अणाया ।।
परि जड बहु त्यांतें जाहला पंथिं जेव्हां ।।
मग महिवरि अद्री टाकिती श्रांत तेव्हां ।। १४ ।।
गिरितळिं चिरडूनी पावले मृत्यु कांहीं ।।
असुर सुर तयांतें काढण्या शक्ति नाहीं ।।
मग सकलहि चित्तीं पावती खिन्नता ते ।।
निजजनहितकारी पातला शीघ्र तेथें ।। १५ ।।
उचलुनि गिरि हस्तीं घेतला कंदुकेव ।।
बसुनि गरुडपृष्ठीं श्रेष्ठ देवादिदेव ।।

पवनसमगतीनें पातला सिंधुतीरीं ॥
असुर सुरहि येती मागुती पादचारी ॥ १६ ॥

इंद्रवज्रा.

पाहूनि ती श्रीभगवंतमूर्ती ॥ तत्पादपद्मा मग ते नमीती ॥
देऊनि आश्वासन तैं तयांतें ॥ कारुण्यदृष्ट्या उठवी मृतांतें ॥१७॥

कामदा.

मेदिनीतलीं अद्रि ठेविला ॥ पक्षिनायका नाकिं धाडिला ॥
वैनतेय तो आसल्यावरी ॥ वासुकी न ये जाणि हें हरी ॥१८॥

मालिनी.

असुर सुर मिळूनी नागलोकासि जाती ॥
अमृतरसविभागा देउं त्या बोलताती ॥
करुनि वच तयांचें मान्य नागेश चित्तीं ॥
त्वरित निघुनि आला सागरीं मोदवृत्ती ॥ १९ ॥

आर्या.

रज्जुसमान फणीतें परिवेष्टुनि मंदराचलाभोंतें ॥
ठेवुनि पयोऽब्धिमाजी म्हणती पीयूष शीघ्र लाभो तें ॥२०॥
त्या मंदराचलाची करुनी मंथनि करावया मथन ॥
धरितां सुरें अहि मुखीं म्हणती हा दैत्य रीतिचा पथ न ॥२१॥
आम्ही श्रेष्ठ दनुज हो न धरूं या उरगपुच्छदेशाला ॥
परिसुनि ती दैत्यगिरा पावे श्रीहरि मनांत तोषाला ॥२२॥
केला विचार हरिनें निर्जरहितहेतु जाहला सफल ॥
अपमानितां दनुज हे होइल मग गुप्त हेतु तो विफल ॥२३॥
मग लांगुलप्रदेशीं धरिती फणिच्या करें अमृतपानी ॥
मथिती सिंधु बहुबलें धरुनी मनिं वासना अमृतपानीं ॥२४॥

इंद्रवज्रा.

आरंभितां मंथन शक्तिमेळीं ॥ तो मंदराद्री जाळें जाय खोलीं ॥
पाहूनि कष्टी सुरदानवादी ॥ तो काय तेव्हां करि भक्तवादी ॥२५॥

तोटक.

कमठरूप घेउनि तोयिं रिघे ॥ उचलुनी स्वपृष्ठिवरी गिरि घे ॥
खचित कूर्म हा अवतार दुजा ॥ ऋषिजनासि सूत ह्मणे समजा २६

यूथिका.

या प्रसंगिं धरि रूप हरी तें ॥ लक्ष योजन विशालचि होतें ॥
सांवरी गिरिस पृष्ठिं धरूनी ॥ रक्षि भक्तजन यत्न करूनी ॥२७॥

मंदाक्रांता.

येतां तोयावरति गिरि तो मागुती मंथनातें ॥
आरंभीती असुर सुर ते वेंचुनीयां बळातें ॥
तेव्हां ज्वाला उरगवदनीं वाहताती विषाच्या ॥
तेणें तापें अगणित तनू पोळती दानवांच्या ॥ २८ ॥

इंद्रवज्रा.

झाला सुरांतेंहि महान ताप ॥ होती तयांचे गलित प्रताप ॥
अत्यंत ते श्रांत तदा जहाले ॥ मंथावया तत्कर तो न हाले ॥२९॥

मालिनी.

परि परि बहु कष्टें मंथिती अर्णवातें ॥
गिरिवर बहु हाले वृक्ष तो जेवि वातें ॥
त्वरित मग विभूंनीं योजुनी युक्ति चित्तीं ॥
दशशतभुजरूपी होउनी सांवरीती ॥ ३० ॥

इंद्रवज्रा.

ज्वाला विषाच्या उरगाननींच्या ॥
त्या जाळिताती तनुला तयांच्या ॥
होतात संपूर्ण महान कष्टी ॥
तेव्हां करी माधव मेघवृष्टी ॥ ३१ ॥

मंदाक्रांता.

तेणें त्यांच्या व्यथित तनुतें शांतता येउनीयां ॥
उत्साहानें झटति बहु ते मंथनातें कराया ॥
नाहीं प्राप्ती तिळहि परि त्यां जाहली मंथनानें ॥
तेव्हां ओजें घुसळि हरि तो चंडरूपी करानें ॥ ३२ ॥

मालिनी.

भयद खवळला तो क्षीरसिंधु प्रवाहीं ॥
जलचरसमुहातें जीविता ठाव नाहीं ॥
हलहल विष तेव्हां सिंधुबाहेरि आलें ॥
तळमळित तयानें विश्व अत्यंत झालें ॥ ३३ ॥

कामदा.

धावरे प्रजा ही प्रजापती ॥ वारिता नसे संकटाप्रती ॥
जाणुनी असें आत्म-अंतरा ॥ लीन होति तैं पादिं शंकरा ॥३४॥

इंद्रवज्रा.

देवादिदेवा करुणासमुद्रा ॥ रक्षूनि आम्हांप्रति देइ भद्रा ॥
जाळीतसे हें गरल त्रिलोक॥ शंभो कृपालोचनिं तूं विलोक॥३५॥
तूं एक सर्वा जगता अधार ॥ माया तुझी दुस्तर ती अपार ॥
उत्पत्ति संपालन तेवि नाश ॥ यांचें महाकारण तूं महेश ॥३६॥
ब्रह्मा हरी इंद्र तुझींच रूपें ॥ भानु प्रकाशे तुझिया प्रतापें ॥
भूम्यम्बुतेजःपवनादि तत्वें ॥ हीं सर्व होतात भवन्महत्त्वें ॥३७॥

आर्या.

मुख अग्नि, पाद धात्री, श्रवण दिशा, चक्षु भानु, काल गती ॥
शशि मन, नाभि विहायस,सिंधूदररोमवल्लि,गिरि अस्ती ॥३८॥
जल रेत, वरुण जिव्हा, स्वर्ग शिर, श्वास वायु, नय हृदय ॥
तूं भक्तवत्सल महा तुजसम देवा कुणी नसे सदय ॥ ३९ ॥
आद्यंतरहित तूं तव त्रिगुणातीता अगोचरा मूर्ती ॥
स्तवनीं शक्य न आम्ही दे तव भजनीं सदा मना स्फूर्ती ॥४०॥

इंद्रवज्रा.

ब्रह्मस्वरूपा तव जाणण्यासी ॥ नाहींच शक्ती सुरमानवांसी ॥
स्तौत्या तुझ्या काय अम्ही करावें ॥ देवा दयार्द्रेक्षणिं यां पहावें ४१
या दृश्य लोका अवलोकितोंची॥ सूक्ष्म स्वरूपीं गति ना मनाची ॥
झालों कृतार्थ प्रभुदर्शनानें ॥ संरक्षि देवा करुणामनानें ॥४२॥

मालिनी.

परिसुनि अतिदीना वाणि ती निर्जरांची ॥
कळवळित मनाची वृत्ति झाली हराची ॥
मग गिरितनयेतें बोलिला मन्मथारी ॥
जलनिधिज विषानें गांजले जीव भारी ॥ ४३ ॥

शिखरिणी.

म्हणूनी पद्माक्षि ग्रहण करितों मी हलहला ॥
महंताचा ऐसा क्रम जरि जडे दुःख तनुला ॥
तरी भावें आल्या त्यजिति न कधीं पायिं शरण ॥
तयाचें प्रेमानें करिति निजवत्सेव भरण ॥ ४४ ॥

इंद्रवज्रा.

ऐशा महंता प्रभु तो प्रसन्न ॥ होतो तसा मीहि सुतुष्यमान ॥
प्राशूनि आतां द्रुत या विषाला ॥ रक्षीन आल्या शरणागताला ४५

आर्या.

शुक म्हणती होती कीं विदित सतीच्या मनास शिवशक्ती ॥
अनुमान म्हणुनि न करी दे निज अनुमोदनास शिवशक्ती ॥४६॥
मग येउनि सिंधुतटा जग-कल्याणार्थ घेउनी करिं ती ॥
गरला प्राशी हर तो मोदातें सर्व पाहुनी करिती ॥ ४७ ॥
त्या कालकूटगरलें पशुपतिवरिहि प्रभाव गाजविला ॥
कवि म्हणती हें न खरें तेणें श्रीशंभुकंठ साजविला ॥ ४८ ॥
तें भूषण होय तया लाधे तो नीलकंठ अभिधाना ॥
केलें जरि कांहिं तरी होतें तें भूषणार्थ थोरांना ॥ ४९ ॥
प्राशित असतां गरला पडला किंचित् विभाग भूवरती ॥
सर्पादि विषारि तसे वृश्चिक विषवल्लि सेवना करिती ॥ ५० ॥

इंद्रवज्रा.

सांगे शुकाचार्य परिक्षितीतें ॥ पीयूषलाभा मग लक्षिती ते ॥
उत्साहचित्तें मथिती निधीतें ॥ तों कामधेनू निपजे सुधी ते ॥५१॥

यूथिका.

लाधतें पय दधी हवनाला ॥ देति ती म्हणुनि विप्रजनांला ॥
इंदुतुल्यरुचि वाजि निघे तो ॥ दैत्यराज बलि आपण घेतो ॥५२॥
शुभ्रवर्ण युत चार रदांनीं ॥ आयरावत करी अभिधानीं ॥
घे तया सुरपती पुरुहूत ॥ कौस्तुभाख्य मणि तो हरि घेत ॥५३॥
पारिजातक अभीप्सित देई ॥ धाडिती तरुस त्या दिवि ठायीं ॥
अप्सरां सुरुचिरां ललनांतें ॥ देति नर्तनवरां अमरांतें ॥ ५४ ॥

मालिनी.

शुक म्हणाति नृपाला चंचलातुल्यकांती ॥
धरुनि कमल हस्तीं येइ लावण्यज्योती ॥
सतत निज मनानें विष्णुपादाब्जि रक्ता ॥
बघुनि रुचि तियेची लज्जिता चारु मुक्ता ॥ ५५ ॥

इंद्रवज्रा.

पाहूनि तीतें सुरदानवांला ॥ उत्पन्न तैं मोह महान झाला ॥
व्हावा तिचा लाभचि आपणासी ॥ इच्छा करीती मनिं सर्व ऐसी ॥
व्हावें तिणें वश्यहि आपणांना ॥ देती यदर्थीं तिस वस्तु नाना ॥
घाली रसाधीश गलांत माला ॥ आशागजांनीं अभिषेक केला ॥
घेऊनि लीलाकमलासि हातीं ॥ ती आपणा योग्य वरा पहाती ॥
संपूर्ण वृंदारकवृंद पाही ॥ त्यामाजि चित्तासम कांत नाहीं ॥५८॥

आर्या

मग दुर्वासादिक त्या अवलोकी ती तपोधनां मुनिंतें ॥
जरि भानुतुल्यकांती होते तरि भावती न तन्मनिं ते ॥ ५९ ॥
शौर्यें धैर्यें विक्रमि बलिराजादिक महामहासुर ते ॥
जिंकिति जे सकलसुरां त्यांच्यावरिही तदीय न असु रते ॥६०॥
जो वारिवाहकांती तेवि गदाशंखचक्रपद्म करीं ॥
धारण करि पाहुनि त्या निजमानसरंजनास सद्म करी ॥ ६१ ॥
सस्मित लज्जित वदनें किंचित् अधरासि चाउनी रदनें ॥
पाहुनि वक्रें नयनें हरिकंठीं माळ घालि मुदित मनें ॥ ६२ ॥

वृंदारकवृंद तदा करिती वर्षाव चारु सुमनांचे ॥
नाचे सुरांगनागण दाविति आनंद पौर सुमनाचे ॥ ६३ ॥
निरखी हरिवक्षःस्थल ती पद्मा प्राप्त व्हावया स्थल गा ॥
जाणुनि आशय तीचा दे तें स्थल हरि करी न ती अलगा ॥ ६४ ॥

इंद्रवज्रा.

ही आपणांतेंचि वरील ऐसी ॥ होती स्पृहा दानवमानसांसी ॥
झाली पहातां हरिपाददासी ॥ चित्तांत होती बहु ते उदासी ॥६५॥

आर्या.

मग सागरांतुनि निघे सलिलोद्भवलोचना सुरा देवी ॥
अमरानुमोदनें तैं प्रीतीनें दनुजवृंद ती सेवी ॥ ६६ ॥

शुद्धकामदा.

अमृतकुंभ तो घेउनी करीं ॥ पुरुष एक ये सिंधुबाहिरी ॥
रुचिर विक्रमी श्यामला प्रभा ॥ निज सुकांतिनें लाजवी नभा ६७

आर्या.

धन्वंतरि अभिधानें जाणी तो वैद्यशास्त्र परिपूर्ण ॥
तद्धस्तिंचा सुधाघट नेती दानव हिरावुनी तूर्ण ॥ ६८ ॥

मालिनी.

अमृतकलश जातां दानवांच्या करातें ॥
अतिशय तयिं वाटे दुःख सर्वां सुरांतें ॥
मग शरण हरीच्या पादपद्मासि जाती ॥
श्रम विफल जहाले बोलते त्या प्रजा ती ॥ ६९ ॥

मंदाक्रांता.

आश्वासूनी प्रभु ह्मणति त्यां स्वस्थ चित्तें रहावें ॥
मन्मायेच्या अघटित कृतीतें तुम्ही हो पहावें ॥
दैत्यां चित्तीं द्रुत करुनियां मोह उत्पन्न आजी ॥
अन्योन्यांसीं करिति कलहा ऐसि मी युक्ति योजीं ॥७०॥

इंद्रवज्रा.

होईल तेणें तुमचें सुकार्य ॥ बोलूनि ऐसें करि काय आर्य ॥
स्त्रीरूप तेव्हां धरि विश्वपाल ॥ भक्तार्थ तो काय करी न खेळ ७१

पीयूषपानास्तव भांडताती ॥ अन्योन्यिं ते विग्रह मांडताती ॥
प्राशूं अर्धीं आपण एक बोले॥अन्यासि ते मान्य न बोल झाले ७२

यूथिका.

शक्तिहीन ह्मणती निज चित्तीं ॥ भांडल्या यश न ये बलवंतीं ॥
धर्मशास्त्रपथ ते कथनाला॥ अग्रभागिं सरले दनुजाला ॥७३॥
दैत्य हो ! विफल ना झगडावें ॥ वादकूपिं न कदापि पडावें ॥
देव आणि तुह्मि जे श्रम केले॥ ते समान मग कां वगळीले ॥७४॥
योग्य हें सम विभाग समान ॥ धर्मरीतिपथिं द्या तरि मान ॥
यज्ञयागिंहि मिळे सम वांटा ॥ ही सुधा तसि सुरांप्रति वांटा ॥७५॥

इंद्रवज्रा.

ऐशा विवादा करिती सुरारी॥ स्त्रीरूपि ये त्यांनिकटीं मुरारी ॥
देखूनि ती सुंदरि पंकजाक्षा ॥ उत्पन्न झाला भ्रम दैत्यलक्षा ॥७६॥
मेघापरी श्यामल कांति आंगीं ॥ मुक्तावली शोभत शीर्षभागीं ॥
सर्वांहि ते आवयवीं सुरेखा ॥ मोहा न दे कां मग दैत्य लेखा ७७

यूथिका.

केसरीपरि कटी अति सूक्ष्मा ॥ कोण वर्णन करी गुणलक्ष्मा ॥
पुष्पगुच्छ शिरकुंतलिं साजे ॥ वक्त्रपंकजयशें शशि लाजे ॥७८॥
शुभ्रवर्ण पट तो परिधान ॥ गोड भाषण तसीहि सुधा न ॥
देहिंच्या परिमलीं भ्रमराली ॥ घालिती त्यजुनियां गृह पाळी ७९
षोडशाब्दनवयौवनयुक्ता ॥ मन्मथार्थ नरमोहनिं सक्ता ॥
पादभूषणरवें भुलवी ती ॥ सर्वही अमरदानववृत्ती ॥ ८० ॥

मंदाक्रांता.

यन्मायेनें त्रिजग भुललें त्यासि त्यां भूलवाया ॥
दैत्यां लागे श्रम तिलहि कां आत्मदेहीं कराया ॥
त्या स्त्रीरूपें असुर सगळे मोहिलेची त्वरेनें ॥
जैसा मोहे मृग मधुरशा गायनाच्या रवानें ॥ ८१ ॥

प्रियंवदा.

त्यजुनि आत्मकुलसंघमित्रता ॥ मनिं न भांडति सुयुक्ति आणितां॥
तिजसि ते नयनिं पाहतां तदा॥ जडालि तद्हृदयिं काम-आपदा८२

आर्या.

जाउनि संनिध तीच्या करिती ते स्तौत्य जोडुनी पाणी ॥
म्हणती कोण तुम्ही हो करुनी तच्चारुरूप-वाखाणी ॥ ८३ ॥
गमनागम कुठुनि कुठे कोण कुणाची स्वहेतु कथिं काय ॥
तव लावण्यसुरूपें अमुचे पडती सकाम पथिं काय ॥ ८४ ॥
आह्मी कश्यपनंदन निजबंधुप्रेमभाव विसरून ॥
मांडियला कलह महा अमृतार्थीं न्यायपंथिं घसरून ॥८५॥
तव आगमन घडविलें अस्मद्दैवें खचीत गे वनिते ॥
मनिं तें आणुनि आम्हां द्यावें तूं सारखें विभागुनि तें॥८६॥
शुक म्हणती हे राया ती दानववृंदवाणि परिसून ॥
स्त्रीवेषधारि भगवान् म्हणती किंचित् कपोलिं हांसून ॥८७॥
कश्यपसुत दानव हो असलें हें काम बहु महत्वाचें ॥
नचि मत्सम जारिणितें कथणें हें सांगणें न मद्वाचें ॥ ८८ ॥

यूथिका.

जारिणी पुरुष नित्य नवे ते ॥ प्रीति दाउनि तयां भुलवीते ॥
कर्षितेचि कपटें नरचित्तें ॥ दे परी नचि तयां स्वमनातें ॥८९॥

मालिनी.

मधुर मधुर गोष्टी बोलुनी कार्य साधी ॥
करि हरुनि धनाला शीघ्र ती हीन बुद्धी ॥
करुनि कृश शरीरा क्षीणता वाढवीते ॥
निज परहि कुलाची श्रेष्ठता घालवीते ॥ ९० ॥

इंद्रवज्रा.

विश्वास तो जारिणि योषितांचा ॥ होईल सांगा कधिं कां हिताचा ॥
सर्वा जगीं मोहक वस्तु दोन ॥ स्त्री एक तैसेंचि दुजें सुवर्ण ॥९१॥
त्यांमाजि छद्मान्वित जारिणीची ॥ भेटी कसी होय नरा सुखाची॥
स्त्रीमोह तो साधन दुर्गतीचें ॥ व्हावें न मोहीत वचासि तीचे ॥९२॥
मैत्री न ती सौख्यद कामिनीची ॥ विश्वास-बुद्धी न असे तियेची ॥
होईल ती घातक निश्चयानें ॥ सुज्ञें समीपीं न तिच्या रहाणें ॥९३॥

आर्या.

शुक म्हणती तद्वाणी खाणी केवळ विचार करण्याची ॥
होती परी मदांधां इच्छा तयिं जाहली न शिरण्याची ॥९४॥

इंद्रवज्रा.

विश्वास त्यांचा जडुनी विशेष ॥ ते दाविती तीस महान तोष ॥
आणूनि तो कुंभ तदा सुधेचा॥देती विभागार्थ करीं तियेच्या॥९५॥

मालिनी.

अमृतकलश तेव्हां घेइ सर्वेश हातीं ॥
सकल सुर-मुनी त्या कौतुकानें पहाती ॥
करिल न कळतेंची काय तो चक्रपाणी ॥
शिणालि कृति जयाची वर्णितां वेदवाणी ॥९६॥

मालती.

प्रभु ह्मणती मग दानवांप्रती ॥ जरि उचिता न तुह्मांस मन्मती ॥
जरि कथितांचि बहूत आग्रहें॥ करिन तुह्मांस्तव मी स्वविग्रहें॥९७॥

शिखरिणी.

विभागाच्या कालीं जरि मम करें वाइट बरें ॥
जहालें तत्रापी तिळभरि पहावें न नजरें ॥
तसा ना बोलावा निनद वदनें एकहि कुणी ॥
तदा निर्बुद्धी ते मत म्हणति लागूनि चरणीं ॥९८॥

आर्या.

सागरतीर्थी स्नाना करवियलें त्या सुरासुरां हरिनें ॥
भिन्नत्वें बैसविलें पीयूषप्राशनार्थ मग हरिनें ॥ ९९ ॥

इंद्रवज्रा.

पीयूषकुंभा मग घेउनीयां ॥ मंदा गतीनें पद ठेउनीयां ॥
लज्जान्विता त्या सभुहांत आली॥जैसी वसे भूपगृहांत आली१००

पृथ्वी.

विचार मग तें करी हरि मनीं सुधाप्राशनीं ॥
दिवौकसचि योग्य हे असुर ते न मांसाशनी ॥

असे सुनयरीति ही खलजनीं न व्हावी दया ॥
जसें पय न पाजणें अहिकुला सुधा तेवि यां ॥१०१॥

आर्या.

शुक ह्मणति कदाचित् हे अणतिल खल मनिं विकल्प-भावासी॥
तत्तोषार्थ हरि ह्मणे, देतों अधिं या अधीर देवांसी ॥१०२॥

यूथिका.

देउनी वरपणा असुरांला ॥ लागली अमृत पाजुं सुरांला ॥
बोलती शुक नृपासि तियेचे ॥ बोल ते नुमजती कपटाचे ॥१०३॥

प्रमिताक्षरा.

न असें परंतु वचनीं गुतले ॥ म्हणुनी न एक निनदा वदले ॥
स्ववचीं महान महती धरिती॥बहुमानि पुत्र दितिचे असती॥१०४॥

इंद्रवज्रा.

बोलूंच कांहीं जरि या स्त्रियेतें ॥ होईल कीं दुःखद तें तियेतें ॥
वाटे असें दानवमानसासी॥ स्वीकारिती यास्तव मौनतेसी॥१०५॥
स्त्रीरूपधारी हरि पीयुषातें ॥ अर्पीत हस्तें असतां सुरांतें ॥
सूर्येंदुमध्यें सुररूपवेषें॥ प्राशी सुधा राहु बसूनि तोषें ॥१०६॥
जाणूनि छद्मा शशिभास्करांनीं॥ संज्ञेस केलें प्रभुला करांनीं ॥
जों राहुकंठातलिं तें न गेलें॥ चक्रें हरीनें शिर तोडियेलें ॥१०७॥

आर्या.

शुक ह्मणती हे राया राहूच्या ते सुधा गलाखालीं ॥
दिधली सर्वं न यास्तव पडलें भुवि तत्कबंध ते कालीं ॥१०८॥
होतें पीयूष मुखीं यास्तव झाला न नष्ट जीवांश ॥
ग्रहसमुहीं योजि तया हरि तो ज्याचे समस्त जीवांश ॥ १०९॥
अद्यापि राहु येई या द्वेषें दर्श-पौर्णिमा-दिवशीं ॥
ग्रासाया आकाशीं क्रोधें बहु धावुनी द्युमणिशशिशीं ॥११०॥
तैं पाजितां सुरांना हरिकरिंचा होय अमृतकुंभ रिता ॥
मग मोहिनीस्वरूपा त्यागुनि झाला स्व-रूप तो धरिता॥१११॥

मंदाक्रांता.

सांगे तेव्हां शुकमुनि नृपा यत्न देवासुरांचे ॥
झाले होते सम तरि तयां प्राप्त कां श्रेय त्याचें ॥
झालें नाहीं ह्मणसि तरि तूं आयके हेतु राया ॥
देवारी ते शरण न कधीं येति देवेश-पाया ॥११२॥

इंद्रवज्रा.

इच्छा जरी मानासिं भाउकाची ॥ सेवा करावी जग-नायकाची ॥
तो संकटातें सकला हरूनी ॥ रक्षी स्व-भक्तां सु-दया करूनी ११३

आर्या.

प्राणी नाना कर्मं निजसुतदारा-हितार्थ करितात ॥
ईशप्रीत्यर्थ नचीः इच्छित न फळें यदर्थ मिळतात ॥ ११४ ॥
जैसें द्रुमशाखेवरि करितां सिंचन कबंध तें विफल ॥
होतें तसें न मूलीं, या न्यायें ईश-अर्चनीं सुफल ॥ ११५ ॥

इंद्रवज्रा.

निष्काम चित्तें करितांचि कर्म ॥ प्राप्ती फलाची ह्मणिं हेंचि वर्म ॥
सांगे नृपातें शुकयोगिराय ॥ वंदी तयाचे कवि कृष्ण पाय ११६

प्रकरण ३ रें.

संसारनिषेध.

आर्या.

संसारयातनांहुनि मृत्यूचें दुःख ऊन हें सत्य ॥
पीडी, शतशः संसारयातना नित्य ॥ १ ॥
हा ऐसें जाणूनि जो भरी भरतो ॥
नु रविसुतसदनासि तो भरी भरतो ॥ २ ॥

संसारगिरी चढतां झाला पंगू अशक्य उतराया ॥
उतरा या देववरा करुनि कृपा तूंचि शक्य उतराया ॥ ३ ॥
कितितरि दुस्तर हा हो दुस्तर जैसा महाब्धि तरण्यास ॥
आहे भल्याभल्यांतें ज्ञात्यांतें तेवि वृद्ध-तरण्यांस ॥ ४ ॥
दिननिशि बहु हा त्रासद न दिसे ऐसें जगीं इतर कांहीं ॥
दृष्टांत न या गवसे विज्ञानी-बुद्धिमंत-तर्काही ॥ ५ ॥
संसार नाम त्या हें कोणी दिधलें असेल हें नुमजे ॥
असुनी असार निश्चित कैसें होईल सार उत्तम जें ॥ ६ ॥
यत्नें कितितरि याची झिजवुनि देहास नित्य भर करितां ॥
पूर्ण न होतां राहे जैसा शिकण्यास बुद्धिठाव रिता ॥ ७ ॥
मायामोहीं बुडवी धृतितें मतितें शिखांत ही देहा ॥
जलयंत्रापरि फिरवी बुध हो पीडा सुखांतही दे हा ॥ ८ ॥
संसार संस्रुति तसें प्रपंच नामेंहि त्यां स उपसर्ग ॥
असती, लागे पृष्ठीं ज्याच्या सुख त्या न होय उपसर्ग ॥ ९ ॥
दिधली असे प्रपंचीं धनसुतदारादिका महावरता ॥
नर अज्ञत्वें नुमजुनि होतो तत्सुखदकाम हा वरता ॥ १० ॥
करि बहु नानायत्ना परि राहे तयिं अपूर्णता बहुत ॥
त्या दुःखें दुःखानलिं होतो तो सपरिजनकदंब हुत ॥ ११ ॥
वेंची प्राणहि समयीं संरक्षाया सुतादि संसारीं ॥
सत्संग दूर सारी, होतो भगवद्यशःप्रशंसाऽरी ॥ १२ ॥
कांता कांचन नंदन या संसारांत मुख्य हे असती ॥
परि ते कर्त्यास सदा दुःखीं करण्यास लावती वसती ॥ १३ ॥
म्हणते प्रतिदिनिं जाया अमुक तमुक सत्वरी अहो आणा ॥
आणितां श्रमें न तोषे वाह्रं कितितरि तुझ्या प्रभो आणा ॥१४॥
जाणुनि बहु दुस्तर हा त्यजिला सुविवेकि साधु-संतांनीं ॥
तद्धेतुसि पुरवाया न असे सामर्थ्य साधु संतांनीं ॥ १५ ॥

जरि हें म्हणाल मिथ्या तरि समयीं सार्वभौमता मिळतां ॥
तृप्त न संसारिक तो, देइ अधिक काय त्यास या परता ॥१६॥
वत्सें बाबा बाबा म्हणती मारुनि मिठ्याहि कंठाला ॥
'द्या खाया, द्या खाया' प्रेमें लावूनि हात ओठाला ॥ १७ ॥
उचितानुचितचि देखुनि केलें जरि या प्रपंचिं काजातें ॥
तरि न बरें म्हणति कुणी शिणतां जरि प्राणपंचिका जाते॥१८॥
करणें स्वशरीराधिक निशिदिनिं चिंता मनीं कलत्राची ॥
परि काळजी किमर्थचि म्हणती कीं या गलीत पत्राची ॥ १९ ॥
नवस करुनि नानाविध देवां नवमूनि तेवि संततितें ॥
लाधे, दायादव्रज न करी परि मत्सरें पसंत तितें ॥ २० ॥
सुत म्हणती, श्रम करितां आह्मांस्तव अधिक यांत तें काय ॥
स्वसुखास्तव झटलां हो, साही हे शब्द धिक्क ते काय ॥ २१ ॥
वित्ताचे सर्व धनी कष्टाचे परि कुणी न होतात ॥
दैवें विपत्ति येतां भोगा म्हणती तुह्मी अहो तात ॥ २२ ॥
कथितां परि परि तद्धित तिळभरहि तयासि गोड तें न लगे ॥
वृद्धत्वें करि वटवट बघण्या आम्हांसि तोंड तें नलगे ॥ २३ ॥
निजकष्टार्जित वित्ता वेंचुनि विस्तीर्ण बांधिल्या गेहा ॥
येतां मृत्यू ह्मणती न्या द्रुत बाहेरि भार लागे हा ॥ २४ ॥
केलें बहु धनसंचय निशिदिनि झिजवूनि चंदनेव तन ॥
पुरुषार्थ यांत कैचा म्हणती संपादिलें कुठे वतन ॥ २५ ॥
येतां जरा शरीरा होतो अप्रियकर प्रियकरांसी ॥
वागे जरि नम्रपणें दीनत्वें जोडुनी निज करांसी ॥ २६ ॥
जाया उपमर्दाच्या करि शब्दांची क्षणोक्षणीं वृष्टी ॥
तैसीच मर्मभेदक साहे परि पावते न ती तुष्टी ॥ २७ ॥
दावि सदा मुख कष्टी घालुनि आठी कपाल-ठायाला ॥
असता म्हणे बरा हा जरि पथ संबंध पालटायाला ॥ २८ ॥

संसारिं ताप जितका तितका तपनांगिं ताप तो न वसे ॥
संसार सदा तापद रवि सायान्हि प्रभातिं शीत असे ॥ २९ ॥
जायाभाषणिं कटुता न वसे तैसी फलांत वृंदाच्या ॥
परि तें रम्य वरि दिसे म्लान दिसे ती कलीव कुंदाच्या॥३०॥
समयीं होतील बरे विषकुंतलव्रण महान तीक्ष्णही ॥
वनितावचाशुगाचे परि होति बरे कदा न ते क्षणही ॥३१॥
पाहुनि टाकी पतिला रोषान्वित उष्ण दीर्घ सुसकारा ॥
त्याहूनि शीत लागे देहाला कृष्णसर्प-फुसकारा ॥ ३२ ॥
या दुःखद संसारीं सौख्य नसे सार्वभौम रायाला ॥
जीवित्व हें न बरवें सिद्ध म्हणे मी विभो मरायाला ॥ ३३ ॥
संसारीं सौख्य असे न असें एकहि कुणी म्हणे नर तो ॥
यास्तव विवेकसाह्यें त्यामाजीं मन विभो कधीं न रतो ॥ ३४ ॥
जितुका संसार असे निरय भराया समर्थ हो तितुकी ॥
इतरव्यवहारतती तुलितां अत्यंत ऊन होति तुकी ॥ ३५ ॥
हें उदर भरायास्तव केलें झटुनी दुकानदारीतें ॥
परि तें न भरे त्यापरि केल्या धनसंदुकानदा रीतें ॥ ३६ ॥
संसार आपदा प्रभु कवण्या यत्नेंहि ती कधीं न शमे ॥
परि त्यामाजीं मन हें त्वन्माये होउनी अधीन रमे ॥ ३७ ॥
ऐशा या बहु दुःखद दुर्धर तैशा असह्य संसारीं ॥
कृष्ण म्हणे लोटियलें करुनि कृपा हरि अतां तरी तारीं ॥३८॥

प्रकरण ४ थें.

श्रीजगदीशस्तव.

पृथ्वी.

यदंघ्रिरज आत्मभू सुरपती धरूनी शिरीं ॥
महापुनित होति, जो स्थितिलयादि इच्छें करी ॥

स्वभक्त-अवनीं सदा कसलि कास जेणें स्वयें ॥
नमामि खलदंडना अरिगदाधृता वीनयें ॥ १ ॥
समग्र जग व्यापुनी वससि शेष दाहांगुलें ॥
स्वभक्तजनरक्षणीं मन तुझें सदा गुंतलें ॥
तथापि उपमन्युवत्स पय मागतां धावसी ॥
मदीय बहु वांच्छिता विनतिला न कां पावसी ॥ २ ॥
भयार्त मन गा तुझें करि न देवकीनंदना ॥
न अन्य बहु वांच्छि हा पदरजाचिया वंदना ॥
द्विजा कनकपूर देसि मज द्यावया सांकडें ॥
त्वदीय शरणागतीं तव मनीं नसो वांकडें ॥ ३ ॥
सुतें बहुत हेत हो धरियल्या न माता रुसे ॥
रुसे जन दुजा तुझें सुमृदु चित्त ताता रुसें ॥
असे जननि तोक हें उभयतांत नातें पहा ॥
करूनि करुणा दिनावरिल आवरीं कोप हा ॥ ४ ॥
वदान्यवर बोलती सकल वेदशास्त्रें तुला ॥
तुवां पुरविलें बहु स्वजनमालिकाहेतुला ॥
असूनि नत हा तुझ्या विमलपादपद्मीं हरी ॥
न होय धनदा जसें कठिण द्यावया मोहरी ॥ ५ ॥
गमे पदरजार्पण व्ययचि मानसीं वामना ॥
सुतुष्ट तरि दर्शनें करि विभो मदीया मना ॥
ध्रुवासि निज दर्शनें मुदित फार केलें करीं ॥
तसीच परमा कृपा सतत दीन या लेंकरीं ॥ ६ ॥
किमर्थ ह्मणसी त्वदर्थ करुं मी हि यातायती ॥
दिली जननसंधि ही दवडुं कां अतां आयती ॥
विचार अधिं सुज्ञ ते करुनि कार्य आरंभिती ॥
तदीय गुरु तूं मदर्थिं मग घेशि हे कां भिती ॥ ७ ॥

गमे श्रमद दर्शनार्पण न घे श्रमा श्रीवरा ॥
दयार्द्र नयनीं पहा प्रसु सुता श्रमा वी वरा ॥
कथीं निजजनाप्रती भवधिपैल या कीं करा ॥
शिवो न परमेश दुर्गतिद मैल या किंकरा ॥ ८ ॥

स्वयें तुह्मि च धावलां द्रुपदजा-महासंकटीं ॥
त्रपासदवना तिच्या कशिलि भक्तपाला कटी ॥
सुदुर्मदमहागदभ्रमितदर्प वासोद्भवें ॥
विनाशासि न उक्त या बुडविणें नतातें भवें ॥ ९ ॥

पृथातनयदूतता कुरुकुलावना स्वीकरी ॥
नदीज-पण ऐकुनी सति-उपानहा घे करीं ॥
जयद्रथवधीं धनंजयहयां स्वयें धूतलें ॥
कथूनि न तसें कुकार्य तुज संकटीं घातलें ॥ १० ॥

बहूत दनुजाधिपें पिडियलें लघू लेंकरा ॥
नृसिंहतनु तूं तदा धरुनि रक्षिसी किंकरा ॥
महार हरि होसि तूं भरसि दाम दामाजिचा ॥
उतारु सरितापुरीं रजनिमाजि गोणाइचा ॥ ११ ॥

कबीरपट वीणसी बसुनि मागिं तूं तंतुचे ॥
धुणें धुसि तसें करें दळसि कीं जनाबाइचें ॥
स्वयें उदक कावडी भरसि एकनाथा गृहीं ॥
अनन्य शरणागतीं अजि किमर्थ दूराग्रही ॥ १२ ॥

पदें भृगुजि ताडितां घृत तदंघ्रिसी माखिसी ॥
बसूनि कसयी हटीं सजण-मांसही वीकिसी ॥
किरीटिमनिषा विलोकुनि वनीं सुभद्रारुपा ॥
धरीसि परि या नतीं तव मनीं न ये कां कृपा ॥१३॥

दुज्या त्यजुनि कां ह्मणाल मजची बहासी जरी ॥
वदा सकल शक्तिमान् कवण तो दुजा निर्जरीं ॥

मला गमसि पूज्य तूं श्रुतिस तेवि शास्त्रा गमे ॥
असंख्य जड तारिले चरणधूलिकासंगमें ॥ १४ ॥
अनन्य गतिनें तुला प्रभुवरा बळें बाहतों ॥
न यावरि परी कृपानिधितरंग कां वाहतो ॥
तरंग नचि एक तो कधिंहि सागरीं राहतो ॥
तयांतुनि अदीर्घसा करिल धाडि मत्कार्य तो ॥ १५ ॥
नको लघु तरंग ही लहरि बिंदुही या नको ॥
त्वदीय सुदयाब्धिच्या परि न भक्तितें धी चुको ॥
स्वभक्तवश तूं असें परिसतों बहूताननीं ॥
न लोटिं, करि भक्ति हा कशितरी, व्यथाकाननीं ॥१६॥
विरोधपरभक्तितें करिति त्यांहि तूं पाहसी ॥
दयार्द्र नयनीं तदीय परिपीडना साहसी ॥
दशानन घटश्रुती अहिमही महामत्त ते ॥
तदर्थ अवतारुनी त्वरित नेशि त्यां मुक्तितें ॥ १७ ॥
जलाब्धिमथनीं स्वयें कमठरूपि होऊनियां ॥
गिरी धरिसि पृष्ठितें कृतिस कोण हो ऊन या ॥
धरूनि तनु मोहिनी सुरजनां सुधा पाजिली ॥
नतावनकृती रमापति तुतें बरी साजिली ॥ १८ ॥
सरोजनयना तुझें बहु विचित्र औदार्य तें ॥
अशक्त विधिशेषही सकल वर्णना आर्य ते ॥
हिरण्यनगरी द्विजा बिभिषणा चिरायुत्व हो ॥
मदीय विषयींच तो गुण विभो न निःसत्त्व हो ॥ १९ ॥
महागरलकालियादमन गोपगोरक्षणीं ॥
विराटतनु दाविली प्रसुस मृत्तिकाभक्षणीं ॥
सुदीर्घ अयनक्षपा करिसि तोषिसी गोपिकां ॥
मदीय करुणा नये तुज परंतु अद्यापि कां ॥ २० ॥

सुवैर मदगर्वितासुरजनें तुशीं साधिलें ॥
परी सु-करुणार्णवा स्वपदसौख्य त्यां दीधलें ॥
भृगू-चरण-ताडना बहुत लाभ तूं मानिसी ॥
पदाब्जशरणागतीं धरिसि रोष कां मानसीं ॥ २१ ॥

प्रपंच करितां विभो कितितरी श्रमी होतसें ॥
न दुःख मज दीसतें इतर आश्रमीं हो तसें ॥
तयांत ढकली मला मदघ पूर्वजन्मार्जित ॥
दशेस मग लाधतो सुखद काय जन्मोर्जित ॥ २२ ॥

मदादि रिपुषट्क तें बुडवितें भवाब्धी-तलीं ॥
ज्वरादि गदवृंदही पिडि सदैव तैसा कली ॥
कलत्र जननी पिता सुतविती महाबंधनीं ॥
तुझ्याविण न वारिता इतर देवराया धनी ॥ २३ ॥

अनेक व्यवसाय मी दिननिशी श्रमूनी करीं ॥
जसी कनकहेतुनें अवनि लोभि हो ऊकरी ॥
मिळे न रस शुष्ककाष्ठभरही श्रमें मर्दिल्या ॥
प्रभो सुकरुणाघना मज न कां सुबुद्धी दिल्या ॥ २४ ॥

स्वभक्तभवमोचनव्रत धृतांघ्रि सेव्यारमा ॥
असूनि उदरावनान्नाचि न योग्य द्या उत्तमा ॥
दिल्याविण न अर्पिसी, परि तुतें न द्यायास हा ॥
समर्थ, करि वंदना, सदय लोचनीं या पहा ॥ २५ ॥

न आठविसि कां मजप्रति ह्मणाल आकाल रे ॥
अजीच तव दर्शनीं हृदय होतसे हावरें ॥
क्षुधें पिडित झालिया जननितें शिशू आठवी ॥
असंख्य मदघालि तूं सुरपते हृदीं सांठवी ॥ २६ ॥

असूनि शतवत्सरायु ह्मणसी उतावेळ कां ॥
परी क्षणिक तें असाधुवच जेवि सत्पालका ॥

कळे न यम पाशबंधन करूनि नेई कदा ॥
नताघशिखरीं पवे स्वपद दावि तें एकदा ॥ २७ ॥
भवार्णवि तरी त्वदंघ्रिरज होय हो मावरा ॥
न होय दहनीं तरी नत-अघास होमा वरा ॥
सुकीर्ति न वरी न त्या प्रणतभीतिला जो हरी ॥
तुझें बघुनि कृत्य हें सुरभि कां न लाजो हरी ॥ २८ ॥
सुशांति मम मानसा न तव दर्शनावांचुनी ॥
घडे न तव भक्ति ज्या विफल तो जगीं वांचुनी ॥
सुमुक्तिपथ दाखवी तरि कृपाघना या जना ॥
भवाब्धिजलपार नेइल करूनि सद्योजना ॥ २९ ॥
अनावर निशाचरी निरयहेतु माया खरी ॥
गिळी गिळिल या जना सतत बोलते वैखरी ॥
विलोकुनि तिला ह्मणे पसरुनी न कां आ सरा ॥
प्रभो क्षम वधीं असे कवण बा मला आसरा ॥ ३० ॥
विरोध करिती सदा प्रबळ मोक्षमार्गात सा ॥
अनन्यगतिका मला इतर कोण मार्गी तसा ॥
बळी प्रमथुनी तयां अमृतवर्ष तोकीं करा ॥
सदैव तुझिया पदा नमित जोडुनी कीं करा ॥ ३१ ॥
सुदीन मम वैखरी निघासि ऐकुनी तों दुजा ॥
नतें विनवितां त्वरें गमन त्याकडे विध्वजा ॥
परी अमितरूप तूं असुनि कां न केलें तसें ॥
न बोल मम पातकें तुजासि घात हा होतसे ॥ ३२ ॥
मनोरथ व्रजास्थित प्रणत गोपिंचा जाणुनी ॥
क्रिडंत बहुरूपि तूं पुरविसी स्पृहा होउनी ॥
विरिंचि तव सौंगड्या विपिनिं धेनुवत्सांप्रती ॥
करी हरण सांग तैं धरिसि त्या रुपां ना मिती ॥३३॥

विलोकुनि नितंविनीस्थझषकेलितें नारदें ॥
तुतें विनविलें मला रुचिर कामिनी एक दे ॥
तदा धरिसि निर्जरोत्तम अनंत रूपां हरी ॥
परंतु मम कां न मानसिक-आधितापा हरी ॥ ३४ ॥

पयोदधिस लंघुनी अवधि कां नको यावया ॥
ह्मणाल तरि आयका प्रभु सुचित्त देऊनियां ॥
द्विपावनिं रमेस 'वार-' वदुनी ण-उच्चारणीं ॥
महान खल नक्र मर्दिसि असा त्वरालक्षणी ॥ ३५ ॥

रसातलिं मुमुक्षुतें असुनि जान्हवी मोक्षदा ॥
मला स्तविसि कां करद्वितय जोडुनी तूं सदा ॥
न ती सुगति दे ह्मणे न परि अल्पदेशीं वसे ॥
प्रभो सकल ठायिं तूं इतर ते न कोणी तसे ॥ ३६ ॥

अनेक सरिता तसे बहुत वारिकूपार ते ॥
वृजीनहर भूतलीं असति गा परी दूर ते ॥
शरीरिं बहु पातली प्रभुजि शक्तिची हीनता ॥
न एक पद चालवे कशि तदीय भेटी नता ॥ ३७ ॥

सुभुक्ति करितां मिळे यजन तेवि यागादिका ॥
तयासि धन पाहिजे, परि न संग्रहासी रुका ॥
करूं जपतपा तरी मन वळे न हें तीकडे ॥
प्रभो तुजविणें दुजा हरिल कोण हें सांकडें ॥ ३८ ॥

सुसाधुपदपंकजीं नमुनि लीन व्हावें तरी ॥
करीत प्रतिबंध त्या मम कुबुद्धि दावेकरी ॥
तिला न दिसती जगीं कुणिहि साधु वा संतसे ॥
न बोल तिसि दैवयोग मम तो असाची असे ॥ ३९ ॥

कुमार्गरत मानसा प्रभुवरा त्वरें आकली ॥
महानिरयिं नेतसे निजबलें पहा हा कली ॥

अजाप्रति जसा मुखीं धरुनि दुष्ट ने लांडगा ॥
स्वयें स्वजनमोचनास्तव तयासवें भांड गा ॥ ४० ॥

सुरद्रु सुरभि स्पृहा करिति पूर्ण वांच्छीतची ॥
जरी न कटु वस्तुची शिशु कळूनि मागे रुची ॥
तथापि जननी न दे मधुर अन्य दे तन्मिषें ॥
तयाधिक भवत्कृती गणियली महापूरुषें ॥ ४१ ॥
ममत्वमय जाल हें पसरिलें तुवां धीवरा ॥
न केवल परीक्षणीं स्वजनरक्षणीं धीवरा ॥
न जाणति तुझ्याविना इतर गूढ या हेतुतें ॥
कळूनि परि गुंतती न मुनिसाधुसंतादि ते ॥ ४२ ॥

परंतु मतिमंद ते भुलुनि जालिं या गुंतले ॥
बुडोनि भवसागरीं स्वहितसाधना मूकले ॥
न एकशत हो असे किति कथूं बरे मी तुला ॥
सहाय करि या प्रभो ह्मणुनि जालबद्धा मुला ॥ ४३ ॥

किती दृढचि तें असे नचि तुटे भल्या जाणत्या ॥
कसा मग सुमंदधी स्वलघुशक्तिनें भंगि त्या ॥
जसें अयस तोडण्या अयसशस्त्रची लागतें ॥
त्वदीय कृति भंगण्या तवचि पाहिजे साह्य तें ॥ ४४ ॥
पिता जननि तूंच कीं अमित सुज्ञ गाती असें ॥
कसा न मग तूझिया अवनभार माथां वसे ॥
तयासि अनुकूल तूं जरि न होसि पद्मापते ॥
ह्मणेन तरि कां न हा बहुत दोषि ऐसें तुतें ॥ ४५ ॥
ह्मणें तुज सदोषि गा परि तसा न तूं निर्मला ॥
तुझी रगडिते पदें खचित जाण माया मला ॥
न होय मग कां बरें मम मनांत कासाविसी ॥
त्वरा करुनि धांव तूं उशिर कां बहू लाविसी ॥ ४६ ॥

पुरें रगडिलें न तों तव दिसे बरें धावणें ॥
न होय समयीं तरी मग कशास हो पावणें ॥
न येसि मम रक्षणीं तरिच होय बोभाट तो ॥
स्वभक्तहितकारि तूं म्हणुनि फार बोभाट तो ॥ ४७ ॥

तरे सुखद नाम तें स्मरुनि व्यस्त वाल्मीक तो
अजामिल अघाद्रि जो सुतमिषें तुला बाहतो ॥
तयाहि सुगती दिली, सरल-नाम-उच्चारका ॥
विलंब करिसी, विचारि, भय पावसी चित्ति कां ॥४८॥

न भावपर तें असें म्हणसि वा तरी आयका ॥
कळे मज जसें तसें तुज रुचे कथीं भाविका ॥
प्रसूस विनवी सुता सुपथ कोण दावावया ॥
अधीर मन जाहलें उशिर कांचि पावावया ॥ ४९ ॥

समीर नभ तेज भू सलिल पंचभूतीं महा ॥
वपू सजविलें विलोकुनि असुज्ञ पावे महा ॥
सुमोहक वरी त्वचा रुधिर मूत्र त्याभीतरी ॥
वसास्थि मळ मांस पू, मन न कां अलोभी तरी ॥५०॥

करांघ्रिनयनाननश्रवणनासिकादींद्रियें ॥
दिली मति विचारही, हृदयिं वास केला स्वयें ॥
रसा भरिलि पोपणा बहुरसें परी मानसा ॥
न तृप्ति, कुपथीं रमे सतत काक विष्ठीं जसा ॥ ५१ ॥

प्रिया प्रियतमा तसे सदन-धेनु-भृत्याप्त ते ॥
दिली सुजनसंगती विचरती सदा सत्पथें ॥
तथापि सकलेंद्रियें असति मानसाधीन तीं ॥
तया कुपथगा मना दमुनि हीत साधी नतीं ॥ ५२ ॥

मरुच्चपलतेहुनी अधिक चित्तचापल्यता ॥
प्रमाण न तया श्रमी बुधहि जाहले वर्णितां ॥

अशा करिं दिलें तुवां सकल देह-ऐश्वर्य तें ॥
न जंतु-अपराध हा विसरले भजाया तुतें ॥ ५३ ॥

स्पृहा परगृहांगनीं परधनीं सदा तें करी ॥
अहंकृतिसुरामदें बहुत मत्त जैसा करी ॥
गणी सकल जंतुसी तृण गुरुत्व दावी जनीं ॥
विदर्प करि पाजि भक्तिरस त्या कृपाभाजनीं ॥ ५४ ॥

अनुग्रह न होय पूर्वसुकृताविना जंतुतें ॥
रमे सकल जन्मि पापिं मग कोठुनी गांठिं तें ॥
अधीं प्रसुपयोधरीं पय सुतावना निर्मिलें ॥
दिला प्रथम जन्म तैं पदरिं कां न तें बांधिलें ॥ ५५ ॥

गमे तव मनीं जिवा बहुत दुःख नाहीं न हो ॥
न योग्य भगवत्कृपेसि आसि वासना हीन हो ॥
प्रसाद करिती विलोकिति न साधु पूर्वार्जिता ॥
ममाघगिरि जाहला प्रभुवरा तया वर्जिता- ॥ ५६ ॥

पिडी प्रतिदिनीं व्यथासमुह कालजीता पहा ॥
चितेपरिस आगळा भवज-काळजी-ताप हा ॥
नको तनुहि दाखवी चरण पाहसी अंत कां ॥
दयाकर शिरीं वसो प्रबल हा न भी अंतका ॥ ५७ ॥

नये गत घडी पुन्हा उणिव आयुला होतसे ॥
चढे दिवस-यामिनी कलुष वित्तप-व्याजसें ॥
यदर्थ जग-पालका मज न आस दीर्घायुची ॥
त्वरें स्वपद दाविं वा करवि संगती साधुची ॥ ५८ ॥

अदित्यमुनि वाल्मिकाप्रति जसा वनीं भेटला ॥
तयें सदुपदेशमंत्र सुदयार्णवें बोधिला ॥
पिपाजि-वसुधानृपें पशुमृगादनाही तसें ॥
असंख्य जड तारिले वदुं किती सतांनीं असे ॥ ५९ ॥

पिशाच-फणि-केसरि-प्रगद-साध्वसांपासुनी ॥
बहू झटुनि रक्षिली तनु जनापवादांतुनी ॥
परी यमकरीं हरी विदित हे दिली पाहिजे ॥
त्रपाहिन न तें कसें हृदय काळजी वाहि जें ॥ ६० ॥

मनोदर मदप्रमत्त हय या तनुस्यंदना ॥
पहा निरयिं नेति त्यां मुरडि देवकीनंदना ॥
प्रदीर्घ भवभीतिनाशककृपाप्रतोदें त्वरें ॥
वदे मज जयें पथें कलिमलप्रबाधा हरे ॥ ६१ ॥

नसे विदित मंत्रतंत्र नमनस्तुती-पद्धती ॥
सुबद्ध अतिमंद मोहमदरज्जुनें बुद्धि ती ॥
भवच्चरणचिंतनीं श्रम न ती कदाही करी ॥
परी शरण संप्रती भव दयार्द्र मातेपरी ॥ ६२ ॥

त्वदीयगुणगायनीं करि मति स्पृहा पाहुनी ॥
परंतु गुणविस्तरा विरालि मृत्तिका जीवनीं ॥
न एक वच बोलवे परि हरी तिच्या हेतुला ॥
करी पुरित जन्म दे सदृश मागतों हें तुला ॥ ६३ ॥

अयोग्य गुणवर्णना परि तुह्मी कृपा साउली ॥
करा, फिरत सूत्रकें फिरविल्या जसी बाहुली ॥
श्रुतीहि महिपाननें वदविली क्षणाभीतरीं ॥
धरा न मनिं इंदिरापति विचक्षणा भी तरी ॥ ६४ ॥

अनुक्त कृतितें करी जरि कळूनि आरंभ ती ॥
असे सुपथदायका परि कृपेविणें पूर्त ती ॥
न होय जसि चातकाण्डजतृषाचि अन्योदकीं ॥
करी न उपहास्यता जगतिं इच्छि मद्वाउकीं ॥ ६५ ॥

सकोप मन ना करा तव कृतोपकारास मी ॥
स्मरें न ह्मणुनी परी मनिं करा विचारा तुह्मी ॥

वदा जगतिं ते किती स्मरति लोक, तद्रक्षणा ॥
सदैव करितां परी मम न कां दुजा ना गणा ॥ ६६ ॥
श्रुती सतत बोलते सुखद नाम तें एकदा ॥
अजाणुनिहि घेतल्या अघगिरी न राहे कदा ॥
जगीं सकल वस्तु त्या असति कीं तवांशाश्रिता ॥
तवाख्य फल तन्मिषें न उपलब्ध उच्चारितां ॥ ६७ ॥
सभाव शरणागता कधिं शरण्य नोपेक्षिलें ॥
परी मम विनंतितें आजि न कां कृपें प्रेक्षिलें ॥
नसे मजसि ठाउकी म्हणुनि दावि भावाक्रिया ॥
चुकेल मग निश्चयें भ्रमण संसृती-चाक्रिं या ॥ ६८ ॥
नृकाय फिरल्यावरी उदरिं लक्ष चौऱ्यांशि रे ॥
मिळे, मग तयांत जो न तव भक्तिपंथीं शिरे ॥
वृथा स्तन अजागळीं अमृत जेवि मुग्धाकरीं ॥
अलभ्य उपलब्ध हा मनुज काय बा ना करी ॥ ६९ ॥
सुसाधुजनसंगती उचित या न पाप्या जरी ॥
प्रभो तुलसिदाससी करि पिशाचभेटी तरी ॥
सदा लय करावया मजसि दावि चौर्यक्रिया ॥
अलभ्य तव भेट होय मग तस्करा तेचि या ॥ ७० ॥
हरिप्रियकरे रमे इतर भाउकाचे स्तवीं ॥
स्वकांतमन गुंतलें परि कृपाप्रसादास वी ॥
कथी विनवि दीन हा स्वकर जोडुनी तूं असे ॥
तृषें पिडियल्या स्वयें कथिसि नामयाला जसें ॥ ७१ ॥
सुदीन मम वाणितें परिसुनी त्वरें प्रस्थिता ॥
विलंब हरितें पथीं करिं न कश्यपाच्या सुता ॥
तवारि-अहिचा अरी मनुजकाय बा हा असे ॥
नसे उभयतीं सुसख्य मग होय ऐसें कसें ॥ ७२ ॥

ध्वनी विनतिची प्रभुश्रवणिं रे कली-मारुता ॥
न देसि पडुं आपुल्या गतिबळें, श्रमी कां वृथा ॥
असे तुजसि सर्वदा वहक-शक्ति एका दिशे ॥
दिशा दशहि व्यापि जो श्रुत न कां तया होतसे ॥७३॥

कठोर बहु या वचें प्रभुमनास वागीश्वरी ॥
दयाद्रव न उद्भवे ह्मणुनि माधुरी दे वरी ॥
सुमुक्तिद कृपेविना न हरिनाम उच्चारतो ॥
कपाट वर मुक्तिचें भवधि तूं मुका लंघितो ॥ ७४ ॥

मला अननुकूल हा समय संप्रती केशवा ॥
ह्मणूनि धिर आगमीं स्वब्रिद तें परी शोभवा ॥
सुतार्थ वनिं पंडुच्या प्रतिकुळीं कसा धांवसी ॥
अजी कठिणचित्त कां न शरणागता पावसी ॥ ७५ ॥

झषादि-अवतारिं त्या वधुनि दुर्मती मूर्तितें ॥
श्रमापनयनार्थ तूं कलित घेसि विश्रांतितें ॥
म्हणूं तरिहि कावडी भरासि एकनाथागृहीं ॥
अशा आमित बा कृती करिसि आजि कां आग्रही ॥७६॥

मिलिंदसम ठेविलें मम पदाब्जि ज्यांहीं सदा ॥
स्वचित्त, दुजि दर्शनाविण न वासना ज्यां कदा ॥
अनादरुनि आलियां सदनिं केवि यावें कथी ॥
श्रुणु स्वजन भेटसी त्यजुनि कूर्मदासाप्रती ॥ ७७ ॥

त्यजूनि निज पंढरी प्रभुजि जासि विद्यापुरीं ॥
तशी त्यजुनि द्वारका द्विजनयार्थ तूं डाकुरीं ॥
त्वदीय असि रीति ती अजि तुतें न कां आठवे ॥
तुला कथियल्याविना मम हृदीं न ती सांठवे ॥ ७८ ॥

वियोग हरिचा रमे पलहि साहवेना तरी ॥
स्वकांतसह येउनी मुदित दर्शनें या करी ॥

बहू सुखद होय तें मज वसंतकालीं जसा ॥
प्रफुल्लितलतागतानिल सुमोद दे मानसा ॥ ७९ ॥

ह्मणे श्रुति असत्त्वता कलियुगीं द्विजीं सागरीं ॥
तसें तुज न, धावसी त्वरित दीन-हाके-सरी ॥
वदूनि इतकें प्रभो स्थिर न जाहली मागुती ॥
लुटीत हरिमुक्तितें, प्रचित कां परी या न ती ॥ ८० ॥

कलींत जितुक्या तुह्मी जडजिवांसि उद्धारिलें ॥
न अन्य युगिं तीतुक्यां श्रुतिपुराणिंही वाणिलें ॥
अनंत अवतार तूं निरमिसी अनंतां युगां ॥
त्वदीय कृति निश्चयें कथिल मंदधी कोण गा ॥ ८१ ॥

अलभ्य नरदेह हा मिळुनि कीं वृथा चालला ॥
प्रपंचहित साधिलें न अपवर्गही साधिला ॥
बहू दुरित जोडिलें जननि-यौवना च्छेदिलें ॥
रसा-भर-द माधवा जनन कासया हें दिलें ॥ ८२ ॥

दिला मनुजकाय हा बहुत हें बरें जाहलें ॥
दुज्या तनुंत कां तुझीं अठवितों कधीं पाउलें ॥
अतां करि कृपा असी फिरुनि गर्भवासाऽऽपदा ॥
न भोगिं कधिं मी प्रभो क्षणहि, वंदितों त्वत्पदा ॥८३॥

न होय मज गर्भिचें सहन दुःख नारायणा ॥
तयांत नचि घालणें कृतदया कधींही कुणा ॥
अनंत अवतार तूं मनुजदेहिंचे घेतले ॥
व्यथेस परि गार्भिच्या समजुनी तुवां त्यागिले ॥ ८४ ॥

अशा कपटि बा तुझ्या बहु कृती वदाव्या किती ॥
कधीं तरिहि दावणें विहित होय कां याप्रती ॥
परंतु समयीं खरें कुणि न दावितां राहणें ॥
नसे अनय यांत कीं वरियलें असें मन्मनें ॥ ८५ ॥

करीं सलगितें बहु प्रचुर मूर्ख वाचाल मी ॥
म्हणूनि मनिं रोष तो प्रभुवरा करा ना तुम्ही ॥
पिता स्वसुतभाषणीं धरि न रोष चित्तीं कधीं ॥
क्षमा करि, कृपाघना खचित हा असे मंदधी ॥ ८६ ॥
श्रमी करुं नये हरी तुजसिं बोलुनी ही स्पृहा ॥
दिसे न परि वारिता इतर संसृती-ताप हा ॥
म्हणूनिचि पुनःपुनः विनययुक्त गा वाहतों ॥
कृपा न करिसी जरी तरि भवार्णवीं वाहतों ॥ ८७ ॥
त्वदीय शुचि कीर्ति म्यां प्रभुजि काय वर्णावि ती ॥
हलाहलज शंभुचा शमत ताप कैशा रिती ॥
शिला तरति सागरीं, हरति दुष्कृताचे गिरी ॥
तुझ्या कृतिस वर्णितां शिणलि वासुकी-वैखरी ॥ ८८ ॥
धराधर धरी स्पृहा मनिं सहस्र वक्त्रें जया ॥
तुझें चरित गावया परि न अंत लागे तया ॥
शिणूनि तव तो शिरें विगतदर्प शय्येतलीं ॥
असा बहु समर्थ तूं स्तविल केवि ही बाहुली ॥ ८९ ॥
नसे उचित हा तुझ्या स्तवनसागरस्पर्शना ॥
परी करित चावटी म्हणुनि तूं प्रभो मर्प ना ॥
प्रिय प्रभुस सूनुचें वचन बोबडेंही गमे ॥
तसें तुज गमो, श्रमो मन भवप्रवाहीं न मे ॥ ९० ॥
पदोत्पल तुझें असूनि पद सिंधुजा-वस्तिचें ॥
निवास तयिं मागतों म्हणुनि तें तुतें ना रुचे ॥
मला विदित होय हें, करिल रोप पद्मा तरी ॥
स्विकारिन तया, नसे मजासि संमती ती बरी ॥ ९१ ॥
हरादिसुर संकटार्त सलिलार्णवीं जाहले ॥
परी न तव दर्शनोत्थसुखलाभ ते लाभले ॥

नमोक्ति करुनी तयां सुखविशी स्वभक्ताश्रमीं ॥
स्वयें करिसि नीचही कृति परी अजी कां श्रमी ॥ ९२ ॥

नसे तुजासि भक्तिसें प्रिय जगीं दुजें श्रीपते ॥
वनीं बदर भक्षिलें शबरिचें मुखोच्छिष्ट तें ॥
व्रजीं पय दधी पिशी प्रभुजि गोपवक्त्रांतलें ॥
अमंगलहि घेशि अन्न अतिशूद्रपात्रांतलें ॥ ९३ ॥

निजाल्पमतिनें तुम्हां विनवितों तसें एकदा ॥
करूनि सुदया करा, न न म्हणा प्रभो कामदा ॥
मनःस्थित मनोरथा सकल पूर्ण हो केलिया ॥
सुशांति जडुनी रमेन पदिं लीन होऊनियां ॥ ९४ ॥

गमे मज मम स्पृहा पुरित केलियासी उणें ॥
न होइल जगांतलें प्रभुजि पाहि सद्लोकनें ॥
जसें धनिक ठेवितां स्वधन संदुकीं वा खणी ॥
खणी खणुनि काढितां अवनिच्या न दूरी मणी ॥ ९५ ॥

ह्मणे जरि मनःस्पृहा करि सुपूर्ण अज्ञत्व तें ॥
परंतु न तसें करी वदति सुज्ञ तत्वज्ञ ते ॥
स्वचित्त शमवी विवेकविशिखें अगा मानवा ॥
तरी मजासि देइ ती परम शक्ति गा माधवा ॥ ९६ ॥

कवित्वकृतिनें स्तुती तुजासि केलिया मानवे ॥
यदर्थांचि यथामति प्रभुजि केलि या मानवें ॥
असे बहुत वेडिवांकुडि तसी रसें हीन ही ॥
तरीहि हरि आदरीं पदरिं दोष घेऊनही ॥ ९७ ॥

असो कशि तरी हरी प्रिय मनांत घे मानुनी ॥
सुसाधुजन पाहती कधिं न ते कसा लावुनी ॥
अभक्तिपर वा सुभक्तिपर दास हा प्रार्थितो ॥
विचार करि एवढा स्वमनिं, हेंच मी मागतों ॥ ९८ ॥

स्वरूप तव निश्चयें कुणि न जाणिलें सत्य तें ॥
म्हणे हि 'न इति' श्रुति स्मृति मुखीं करा घालिते ॥
पुराणततिही वदे 'विदित सत्य नाहीं अम्हां' ॥
अतर्क्य तव रूप तें, गवसते कुणा तत्सिमा ॥ ९९ ॥

खरें स्तवन तें तुझें करुं शके न मद्वैखरी ॥
तरी करितसोंचि भक्तिरसयुक्त कांहीं तरी ॥
कदाचित रुचे न तें तरि न रोष आणी मनीं ॥
पुरेंचि करितों अतां तव पदांबुजा वंदुनी ॥ १०० ॥

बहू विनवितों तुतें परि न पावसी श्रीहरी ॥
कळे न मज पामरा तव मनीपणा ती खरी ॥
विरोधपर भक्ति तूं त्वरित पावसी केलिया ॥
नसे मजासि शक्ति ती, तरि न संकटीं घालिं या ॥१०१॥

निवास पदिं देइ वा करवि पूज्यसत्संगती ॥
तुझ्या भजनिं मानसा जडवि कीं नको सद्गती ॥
विमुक्त भवबंधना त्वरित तोडुनी या करा ॥
उमात्मज पदांबुजा शरण जोडुनीयां करा ॥ १०२ ॥

प्रकरण ५ वें.

गोरखनाथकथा.

वसंततिलका.

वंदूनियां सविनयें वरदायकातें ॥
गोरक्षवृत्तकथना करुं आयका तें ॥
तारावयासि जन अज्ञ महीतलासी ॥
ये श्रीश विष्णु अवतार पयोऽब्धिवासी ॥ १ ॥

आर्या.

एके दिनीं मचिंदर आले भिक्षार्थ भाग्यवंताचे ॥
सदनीं, पाहुनि गृहिणी भावें त्या वंदि पाय संताचे ॥ २ ॥

इंद्रवज्रा.

देखूनि त्या दीप्तरुची यतीतें ॥ पुत्रस्पृहा त्यासम होय तीतें ॥
प्रार्थी ह्मणे तोक तुझ्यासमान ॥ व्हावा मला, दे जग ज्यास मान ३

आर्या.

होइल सुपुत्र ह्मणुनी विभूति दिधली मचिंदरें तिजसी ॥
परि मनिं विकल्प आणुनि टाकी ती उकिरड्यांत रेति जसी॥४॥

यूथिका.

त्या स्थलीं तनय माधव जाहले॥ ज्याचियाविण जगीं दल ना हले ॥
चंडभानुमित वत्सर लोटले ॥ त्या गृहीं मग मचिंदर पातले ॥ ५ ॥

भुजंगप्रयात.

ह्मणे भामिनी तोक दावी मला गे ॥
भिऊनी सती जोगि-पायासि लागे ॥
महामंतु झाला ह्मणे सांइ हातीं ॥
खळीमाजि म्यां टाकियेली विभूती ॥ ६ ॥

साकी.

ह्मणे मचिंदर चांडाली तूं विपरित बहु हें केलें ॥
अमृत लाधतां खळींत तें त्वां मानुनि विष टाकियलें ॥
॥ध्रु०॥ तें स्थल दावि मला ॥ कोपातें जोगी चढला ॥ ७ ॥

स्वागता.

भीत भीत यतितें स्थल दावी ॥ साधु-संत-कृति काय वदावी ॥
हाक मारुनि ह्मणे मम तोका ॥ येइ बाहिरि अतां अवधी कां ॥८॥

मालिनी.

परिसुनि गुरुवाणी शीघ्र बाहेरि आला ॥
त्यजुनि उकिरड्यातें, द्वादशाब्दें जयाला ॥

दिनमणिसम कांती विग्रहीं शोभमाना ॥
मिलितकर करी तो तोक आदेश त्यांना ॥ ९ ॥

अंजनीगीत.

पाहुनि सुंदर बालकातें ॥ मोह उपजला साध्वि-मनातें ॥
ह्मणे द्याजी सुत हा मातें ॥ करुनी अनुकंपा ॥ १० ॥
होता मानसिं पुत्र-हेतू ॥ विकल्पें घडला महामंतू ॥
जाणसि साधो सर्वहि हें तूं ॥ अपराधी आहें ॥ ११ ॥

आर्या.

न मिळे अतां तुला हा कथुनि असें जाय घेउनी तोका ॥
विश्वास साधुवचनीं धरति न ते पावती महाशोका ॥ १२ ॥

इंद्रवज्रा.

सच्छिष्य तो होय मचिंद्राचा ॥ संसारसंताप हरे तयाचा ॥
गोरक्ष ऐसें दिधलें सुनाम ॥ सेवा गुरूची मनिं नान्य काम ॥१३॥

ओवी.

शिष्य-दृढतर-भाव-पहावया ॥ मचिंद्रें योजुनी उपाया ॥
निद्रावस्थेच्या निशासमया ॥ सोडुनी तया वनीं जाती ॥१४॥

साकी.

घुमते घुमते मचिंद्र गुरू आये स्त्रीराज्योंमे ॥
राज्य करे तब प्रमिला राणी बात गये कानोंमे ॥
॥ध्रु०॥ सैली भेज दिई ॥ लाया मंदिरिं वो साई ॥ १५ ॥

इंद्रवज्रा.

पाहूनि तें सुंदर रूप राणी ॥ मोहीत झाली कुसुमाशुगांनीं ॥
दैवेंचि माझ्या आणिला गृहातें ॥ ठेवून घेईन कृताग्रहातें ॥१६॥
माझा जरी होइल कांत आतां ॥ ओवाळुनी टाकिन राज्यसत्ता॥
ऐशा विचारें करि भाषणाला॥आरंभ,लज्जा परि ये मनाला॥१७॥

स्वागता.

सांवरी कुचतटीं वसनातें ॥ हास्ययुक्त करुनी वदनातें ॥
बोलते कवण हो तुह्मि सांगा॥ चर्चिली विभुति कां निज आंगा१८

साकी.

कहे मचिंदर सुनोजि माई हम तो तीरथबासी ॥
चारो धामकु फिरते फिरते आये इह नगरीसी ।
॥ध्रु०॥ साई पथ मेरा ॥ क्या कहना है तेरा ॥ १९ ॥

इंद्रवज्रा.

रोषासि साई न मनीं अणावें ॥ या मंदिरीं स्वस्थ तुह्मी रहावें ॥
सेवा घडो या पदपंकजाची ॥ दासी असे ही मनिं वागवाची॥२०॥

आर्या.

सप्रेम मोहक वचीं भुलला जोगी परी मचिंदर तो ॥
स्त्रीमोहजाल दुर्धर कवणाचेंही तर्यां न चित्त रतो ॥ २१ ॥

स्वागता.

राहुनी सदनिं तो प्रमिलेचे ॥ भोग भोगित अनेक परीचे ॥
छेदि बद्धहि अली न फुलास ॥ बोध सांइ न करी स्वमनास ॥२२॥

आर्या.

इकडे जागृत होउनि पाहे गोरख मचिंदर स्वामी ॥
तों दिसती न कुठे मग जाइन शुद्ध्यर्थ मी ह्मणे धामीं ॥२३॥

शार्दूलविक्रीडित.

शोधाया स्वगुरुप्रति भ्रमतसे गोरक्ष भूमीतलीं ॥
वर्षे द्वादश लोटलीं परि न हो भेटी तया जाहली ॥
तेणें विव्हल होउनी निज मनीं चिंता बहू तो करी ॥
तों जालंदरशिष्य कानिफ तया भेटे वनाभीतरी ॥२४॥

वसंततिलका.

आदेस ते करुनि भेटति सादरांनीं ॥
अन्योन्यवृत्त पुसती मधु भाषणांनीं ॥
गोरक्ष सांगति मचिंदर साइनाथा ॥
धुंडाळितों परि न लाधति या अनाथा ॥ २५ ॥

साकी.

कानिफ कहे सुनोजी जोगी जालंदर गुरु मेरा ॥
न मिले हमसे मैभी धुंडूं होगइ बरखे तेरा ॥
॥धु०॥ अब मै क्या करना ॥ जुगुती हमकू तुम कहना ॥२६॥

आर्या.

हांसुनि गोरक्ष ह्मणे तव गुरु बंगाल-गौड-देशांत ॥
पुरिला गोपीचंदें टाकुनियां हयमलांत कूपांत ॥ २७ ॥

साकी.

लिदमे डारा गुरू तुमारा कैसे बे तुम चेले ॥
झोली लेके अलख जगाते पेन्हे चंदन टीळे ॥
॥ धु० ॥ बेशरमी तुम बे ॥ ये क्या ढोंग मचाया बे ॥२८॥
कानिफ कहे सुनो गोरखजी माचिंदर गुरु तेरा ॥
बंगालेमे रानि-मकानीं काढे हतसे कचरा ॥
॥धु०॥ दिमाख नहि करना॥ दिलमें शरम बडी रखना ॥२९॥

आर्या.

झगडुनि ऐशा परिनें जाती शोधावयास निज गुरुतें ॥
हितदायक झगडा तो कवि म्हणतो काय हो तयास रुते ॥३०॥

साकी.

घुमते घुमते गोरख साई आये एक्या ठायीं ॥
जाय मकानीं अलख पुकारे भिच्छा डारो माई ॥
॥धु०॥ भला बने तेरा ॥ आटेसे भरो कटोरा ॥ ३१ ॥

ओवी.

यतिसौंदर्या पाहून ॥ दयेनें द्रवलें गृहिणीमन ॥
ह्मणे कोठुनी आगमन ॥ कोठें गमन सांगावें ॥ ३२ ॥
गोरख ह्मणे मी तीर्थवासी ॥ आणाया गुरु मचिंद्रासी ॥
जातों बंगाल-गौडदेशीं ॥ घालीं भिक्षेसी गे माई ॥ ३३ ॥

दिंडी.

नको जाऊं बंगाल देशिं साई ॥ तिथे राजासनिं असे एक बाई ॥
मारवीते आलिया साधुसंता ॥ असो आठव हा तूजला महंता ३४

मालिनी.

परिसुनि वच ऐसें गोरखा भीति वाटे ॥
गमन न करितां तो सद्गुरू केविं भेटे ॥
जरि मरण मला ये वांकडें यांत काय ॥
स्वगुरुविण रहाणें व्यर्थ जीवंत काय ॥ ३५ ॥

इंद्रवज्रा.

मार्गस्थ झाला करुनी विचार ॥ तों भेटले त्या पथिं नाट्यकार ॥
त्यांतें पुसे कोठुनि आगमाला ॥ केलें, वदावें गमनस्थलाला ३६

आर्या.

बंगाल देशिं जातों मिळवूं दावूनि वित्त नाट्यकला ॥
नेऊं आम्हांसंगें जाणसि जरि तूं मृदंगवाद्यकला ॥ ३७ ॥

साकी.

गोरख कहे हम सबही जाने गाना और बजाना ॥
चलोजि साथे लेके हमकू फिकीर कछु ना करना ॥
॥ध्रु०॥ मै बजवैया हूं ॥ मूसे मैं क्या बात कहूं ॥ ३८ ॥

आर्या.

घेउनि मोदें अपुल्या जाती ते गोरखास संगातें ॥
ऊन पडे होतां कां साधूच्या मग सुखास संगातें ॥ ३९ ॥
इकडे साइ मचिंदर सांगे प्रमिला-प्रियेस एकांतीं ॥
येतो गोरख न्याया देशीं मजसी, न तूं करी खंती ॥ ४० ॥

अंजनीगीत.

ऐकुनि चिंता करी थोर ॥ काय करावा यास विचार ॥
जातिल आतां मचिंद्र ॥ सोडुनि मजलागीं ॥ ४१ ॥

शिखरिणी.

प्रधानातें तेव्हां अणुनि निकटीं ती कथितसे ॥
स्वराज्यामाझारी स्वजन बसवावे दश दिशे ॥
न येऊं द्यावेची जपि तपि यती भिक्षुक मुनी ॥
जरी येती राष्ट्रीं त्वरित तरि त्यां टाकि वधुनी ॥ ४२ ॥

इंद्रवज्रा.

तैसेंचि मंत्री करि दक्षतेनें ॥ कार्जी दिलें त्या बहु लक्ष तेणें ॥
येतां वधी तो यतिसाधुसंत ॥ सर्वांस झाला श्रुत हा उदंत ॥४३॥

आर्या.

ते येति कांहिं दिनिं नट त्या प्रमिलेच्याचि राजधानीतें ॥
दाविति निज नाट्यकला मासादीं मग बहू विधांनीं ते ॥४४॥
तन्नृत्यगायनगुणें आलें नाटक बहूत रंगाला ॥
गेलें प्रेक्षकजनमन मिळुनी मोहाब्धिच्या तरंगाला ॥४५॥

इंद्रवज्रा.

मचेंद्र राणीसह बैसलाहे ॥ गोरक्ष त्यातें निरखूनि पाहे ॥
तो भासला त्या प्रमिला-अधीन॥ मानी मनीं सत्य परी सुधी न४६
तों गोरखानें मग काय केलें ॥ त्यातें मृदंगांतुनि बोल बोले ॥
श्रोते तुह्मी सादर आयका त्या ॥ सोडा विकल्पा दरदायका त्या४७

साकी.

चलो मचिंदर गोरख आया धुंड फिरा सब दुनिया ॥
हो गइ बरखे बारा तेरा मजकू तोभि न पाया ॥
॥ध्रु०॥ प्रमिलामोहिं गुते ॥ छोडो अब नारीममते ॥ ४८ ॥

ओवी.

तो मृदंगांतील मधुर ध्वनी ॥ पडतां प्रमिलेच्या कानीं ॥
होउनी भयाभीत मनीं॥ ह्मणे मृदंगध्वनि ऐक नाथा ॥४९॥
दिधलें मचिंदरें चित्त ॥ तों मृदंगीं शब्द उमटत ॥
चलोजी मचिंदरनाथ ॥ न्याया गोरख पातलासे ॥ ५० ॥

इंद्रवज्रा.

मत्स्येंद्रनाथें सुत ओळखून ॥ केली भयातें प्रमिलेस खूण ॥
आला ह्मणे हा मज न्यावयाला ॥ आतां न चालेचि उपाव याला ॥
केला पुन्हां शब्द मृदंगनादें ॥ ज्ञात्यासही दुर्गति अंगना दे ॥
त्यागूनि आलिंगन देइ मोहा ॥ शिष्य स्वचित्तीं न दुजा गमो हा ५२
तेव्हां प्रमीला बहु होय कष्टी ॥ झाली ह्मणे ही प्रतिकूल गोष्टी ॥
जातील आतां मजसी त्यजून ॥ गेली अशा दुःख-ढिगीं बुजून ५३

भुजंगप्रयात.

उठोनी तदा प्रेम-आलिंगनाला ।। मचिंद्रें त्वरेनें दिलें गोरखाला ।।
मिठी घातली गोरखें स्वामिपायीं ।। ह्मणे भेटलांती बहूतीं उपायीं ।।

दिंडी.

तिथे गोरखही कांहिं काल राही।। प्रमीलेच्या गुंतला गुरू मोहीं ।।
पाहुनीयां आश्चर्य चित्तिं मानी ।। नेउं देशीं या कवण उपायांनीं ५५

इंद्रवज्रा.

एकांतिं गांठूनि गुरू-वरातें ।। ह्मणे तया जोडूनियां करातें ।।
आतां स्वदेशीं परतें चलावें।।माझ्या श्रमा सद्यश आजि द्यावें।।५६।।

स्रग्धरा.

बोले मत्स्येंद्र तेव्हां मजसि सुख इथे लाधतें तें न नाकीं ।।
यत्नें देवादिकांही कधिं न मिळत ना सांगवे आनना कीं ।।
तैशा या मिननाथा प्रियतम तनया त्यागितां दुःख चित्तीं ।।
मोठें होईल, तैशी करिल गमन ही निश्चयें प्राणपंक्ती ।। ५७ ।।

मालिनी.

परिसुनि गुरुवाणी गोरखा चोज वाटे ।।
गहिंवर बहु त्यातें येउनी कंठ दाटे ।।
स्वमनिं मग ह्मणे तो गुंततां मोहपाशीं ।।
सुजन झणिं सुटाया लागते नाव धीशी ।। ५८ ।।

इंद्रवज्रा.

ऐशा विचारें उगलाचि राही।। चिंता परी मानासिं नित्य वाही ।।
सोडील केव्हां गुरु या स्थलाला ।। कां पात्र झाला कुगती-मलाला।।

मंदाक्रांता.

रात्रीस स्त्री शयनिं असतां शौच ये मीननाथा ।।
गोरक्षा तैं गुरु ह्मणति या नेइ बाहेरि आतां ।।
तेव्हां त्यातें उचलुनि करें आणि बाह्य प्रदेशीं ।।
बोले शौचा लघविविण हो नातरी मार खाशी ।। ६० ।।

आर्या.

परिसुनि वच धाकाचें शौच न करितां उठेचि तो तैसा ॥
लघवी झाल्याविण हो सांगा होईल शौच तो कैसा ॥६१॥

स्वागता.

नीजवी शयनिं त्यास तसाची ॥ झोंप ये नचि तया परि साची ॥
शौच तो मग करी हतरूणीं ॥ जाय गेहिं मलगंधि भरूनी ॥६२॥

भुजंगप्रयात.

तदा तो गुरू बाहुनी गोरखातें ॥
ह्मणे आण धूऊनि या बालकातें ॥
बिच्छान्यावरी शौच तो आजि केला ॥
मलानें तसाची तनू माखियेला ॥ ६३ ॥
करीं घेउनी मीननाथा निघाला ॥
त्वरेनें दुरी मार्ग लंघूनि आला ॥
तडागीं धुऊनी पटातुल्य त्यासी ॥
करूनी घडी घालि वाळावयासी ॥ ६४ ॥

साकी.

पुछे मचिंदर गोरखजीकूं लडका कांहा मेरा ॥
धूनेकू तुम देर लगाई गुजरे घंटे तेरा ॥
॥धृ०॥ क्यौ नहि अबि आया ॥ कहां तुम उसकू गुताया ६५

मंदाक्रांता.

मत्स्येंद्राचे चरणकमलीं तेधवां तो नमूनी ॥
बोले तुम्ही मजसि कथिलें आण यातें धुऊनी ॥
तैसाची म्यां उदकसमुहीं धूउनीयां सुकाया ॥
प्रासादाच्या अजिरिं गुणि तो घातला सांइराया ॥६६॥

शिखरिणी.

मचेंद्रस्वामी तो परिसुनि तयाचे निनद ते ॥
ह्मणे मूढा तूतें विपरित कसें हें वदवतें ॥

धुऊनी आणावा म्हणुनि तुज म्यां जें कथियलें ॥
तदर्थांतें चित्तें तव वद असें कां अवाथिलें ॥ ६७ ॥
प्रमीला आक्रोशें बहुतपरि तैं रोदन करी ॥
ह्मणे आतां घालूं स्तनज कवणा ओदन करीं ॥
अहा या चांडाळा अनुचित कृती कां तुमजली ॥
कुणी ऐसा धूर्ती अपटुनि कधीं कां शिशु जलीं ॥ ६८ ॥

अंजनीगीत.

घेउनि हातीं पुत्रचर्म ॥ विपरीत बहू केलें कर्म ॥
आली नाहीं मनीं शरम ॥ दावाया वदना ॥ ६९ ॥
लाडकें माझें कोमल बाळ ॥ खेळुनि दावी बहू खेळ ॥
होउनि त्याचा तूं काळ ॥ अर्पियलें दुःखा ॥ ७० ॥

आर्या.

ऐशा नाना परिनें करिती ते तोकशोक त्या समया ॥
धुंडाळितां सुत दुजा लाधे ह्मणती न विश्वि त्या सम या ॥७१॥

यूथिका.

देसि तूं जरि न नंदन गोरखा ॥
नाहिं दुर्जन जगीं तुजसारखा ॥
प्राण मी त्यजिन हा दृढ निश्चयें ॥
कां दयाद्रव तुझ्या हृदयीं न ये ॥ ७२ ॥

आर्या.

गोरख मग तत्सुतसे अष्टोत्तरशत सुतांसि दावी तो ॥
सत्साधुदेवतरु हो इच्छित फल तो न एकदा वीतो ॥ ७३ ॥

इंद्रवज्रा.

घ्या ओळखूनी अपुल्या सुताला ॥ संसारमोहांत किती गुताला ॥
माया हरीची अनिवार हो कीं ॥ सुज्ञें पडावें न कधींहि शोकीं ॥७४॥

स्वागता.

देखुनी नयनिं नंदनपंक्ती ॥ होति विस्मित बहू निज चित्तीं ॥
नोळखे निज सुत प्रमिलेतें ॥ साधु शक्ति इतरां न मिळे ते ॥७५॥

वसंततिलका.

तेव्हां ह्मणे नमुनि ती पद गोरखाचे ॥
देई मला ममचि बालक साइ साचें ॥
केलें अभद्रवच ना तुज ओळखूनी ॥
दावी दया उदरिं मंतुस सांठवूनी ॥ ७६ ॥

आर्या.

त्या गोरक्षें मग निज सामर्थ्यें तोक एकशतसप्त ॥
ठेवूनि मीननाथा केले तत्काल सर्वही गुप्त ॥ ७७ ॥

साकी.

पाहुनि नंदन अपुला त्यातें प्रमोद बहु झाला ॥
आलिंगन मग देउनि हातीं धरिती पोटीं त्याला ॥
॥धृ०॥ कुरवाळुनि हातें ॥ चुंबन देती मग त्यातें ॥ ७८ ॥

इंद्रवज्रा.

मत्स्येंद्र बोले प्रमिलांगनेतें ॥ आतां त्यजी तूं विषयस्पृहा ते ॥
जाऊं अह्मी गे त्वरित स्वधामा॥ पावूं विरामा धृतरामनामा ७९

अंजनीगीत.

परिसुनि साईच्या बोलासी ॥ दुःखित झाली निज मानसीं ॥
म्हणे अजवरि दिधलें मजसी ॥ बहु सौख्य प्रेमें ॥ ८० ॥
विरहानल हा जाळिल मजला ॥ रुचेल हें कां साइ तुम्हांला ॥
नाहीं चुकलें कधिं सेवेला ॥ या पदकमलाच्या ॥ ८१ ॥
होती मजवरि बहूत प्रीती ॥ विलास केले नानारीती ॥
आतां ताटातुटि कीं होती ॥ काय मी करूं ॥ ८२ ॥

ओवी.

जाणें जरी मज सोडुन ॥ तरी मार्गीं खर्चालागून ॥
कांचन देतें घ्या ह्मणून ॥ झोळीमध्यें घाली ती ॥ ८३ ॥
मग मचिंद्र आणि गोरखनाथ ॥ सोडुनि ग्रामा चालती पथ ॥
पातले भयानक विपिनांत ॥ निर्जल निर्मानुष ॥ ८४ ॥

साकी.

कहे मचिंदर गोरखजीकूं डर बहु मुजकूं लागे ॥
मिलते अदमी नहि जंगलमें जाना कैसा आगे ॥
॥ध्रु०॥ चलो पिछे भाई ॥ आगे जाना भला नही ॥८५॥

इंद्रवज्रा.

गोरक्ष तेव्हां ह्मणती गुरूला ॥ कां मानसीं आणितसां भयाला ॥
आह्मी यती द्रव्यविहीन आहों ॥ नेतील कां तस्कर तुंबिला हो ८६

आर्या.

जातां कांहिं पुढें ते पुनरपि मत्स्येंद्र गोरखा म्हणती ॥
या भीतिद प्रदेशीं वाटे मजला बहूत रे भीती ॥ ८७ ॥

यूथिका.

साध्वसें मजासि शौचहि लागला ॥
कंप विग्रहिं तसा बहु सूटला ॥
गोरखा कथुनि ठेवुनि झोळितें ॥
सत्वरी मग दिशेप्रति जाति ते ॥ ८८ ॥

आर्या.

गोरक्ष ह्मणे चित्तीं मार्गीं साईस वाटतें भय कां ॥
सोडी मग झोळी तों देखे त्या आंत ठेविल्या कनका ॥८९॥

पृथ्वी.

न सोडि धनलोभ हा गुरुमनासि अद्यापिही ॥
असे ह्मणुनि ठेविला कनकभार हा संग्रहीं ॥
यदर्थ बहु भीतसे निज गुरू मला वाटतें ॥
करीं कनक घेउनी विपिनिं सर्वही टाकि तें ॥ ९० ॥

ओवी.

कांचनाचें जितकें वजन ॥ तितकेची श्वेत पाषाण ॥
झोळीमाजी मग घालून ॥ मुख बांधून ठेवियली ॥ ९१ ॥
बैसे पूर्व स्थलीं जाऊन ॥ मत्स्येंद्र येती दिशा सारून ॥
झोळी घेउनी मार्ग क्रमण ॥ करितां भय वाटे म्हणताती ९२

साकी.

गोरख कहे सुनोजि साई डर तो पीछे राहा ॥
दिलमे अब तुम डरना मत जी चलिये डर छोर रहा ॥
॥ध्रु०॥ बिचार इह सुनके ॥ किया मचिंदर मनिं अपके ॥९३॥

इंद्रवज्रा.

हा सांगतो राहिलि भीति मागें ॥ यांतील भावार्थ मला न लागे ॥
सोडूनि झोळी मग तींत पाही॥ तों तेथ कांतार्पित हेम नाहीं ॥९४॥

साकी.

कोपें दुःखें मचिंदरानें गोरक्षातें पुसिलें ॥
पथोपयोगी प्रमिलार्पित धन सांगे काय जहालें ॥
॥ध्रु०॥ कैचा तूं शिष्य ॥ केला कांचन-अभिलाष ॥ ९५ ॥

पडतें कामा समयीं कांचन दुजें न कांहीं तैसें ॥
ह्मणुनी झोळी पोटीं धरिली केलें त्वां हें ऐसें ॥
॥ध्रु०॥ दुजा न तस्कर रे ॥ त्वांची हरिलें तें सारें ॥९६॥

इंद्रवज्रा.

लाधे न माझें मजला सुवर्ण ॥ प्राणासि देईन खचीत जाण ॥
आणूनि दे तें द्रुत गोरखा रे ॥ माझें मला तूं अतिशीघ्र सारें ॥९७॥

आर्या.

स्त्रीसंगिं मोह गुरुला जडला कनकीं तसा विलोकून ॥
हें योग्य न साइ-पथा जाणुनि ग्यां तें दिलेंचि टाकून ॥९८॥

आतां अघटित कांहीं दाविन गुरुला म्हणून काय करी ॥
जाउनि एक्या पर्वतिं लघ्वी करितांचि होय हेमागिरी ॥ ९९ ॥

साकी.

गोरख कहे सुनोजि साई लेवो सुंना अपना ॥
चाहे उतनी झोलि भरो अब फिकीर कछु ना करना ॥
॥ध्रु०॥ गुरुने जब देखा ॥ दिलमे पडा बडा फीका ॥ १०० ॥

इंद्रवज्रा.

मत्स्येंद्र तेव्हां ह्मणती तयाला ॥ बुध्याच हा जाणुनि खेळ केला ॥
व्हावी तुझी या जगतीं सुकीर्ती ॥ अज्ञानवृत्ती धरिली यदर्थी १०१

भुजंगप्रयात.

समाधान ऐसें तयाचें करूनी ॥
पथीं जाति सप्रेम हस्तीं धरूनी ॥
जनोद्धारणा फीरती सर्वकाल ॥
शिवेना कदाही जयांलागि काल ॥ १०२ ॥

आर्या.

गोरखमत्स्येंद्रकथा श्रीराघवपादपंकजा नमुनी ॥
गाई कृष्ण सदाशिव, जावो तन्मन न गायनीं श्रमुनी ॥१०३॥

प्रकरण ६ वें.

मन चंगा तो काथवटमें गंगा.

आर्या.

जप तप पूजन साधन भेटविती मखहि ना रमारंगा ॥
दृढ भक्ति भेटवि जसी, मन चंगा त्यास काटवटिं गंगा ॥१॥
एक्या ग्रामीं भाविक अतिनिर्धन सदय चर्मकार वसे ॥
करि जातिव्यवसाया, होइल जो लाभ त्यांत तुष्ट असे ॥२॥
बैसूनि राजमार्गी पथिकांच्या सांधि जीर्ण पदरक्षा ॥
क्रमि काल सदाचारें मानी परधन मनीं जसी रक्षा ॥ ३ ॥
एके दिनिं एक द्विज वाराणासि पथग-येइ सांधाया ॥
सांधुनि तत्पदरक्षा दे त्या तंदूल मार्गि रांधाया ॥ ४ ॥

तैसाचि एक पैसा देउनि चर्मक ह्मणे नमूनि तया ॥
द्या जान्हवीस माझा जगपूता ती करील पूनित या ॥ ५ ॥
बहुत बरें ह्मणुनि द्विज तो करि वाराणसीपथीं गमन ॥
पाहुनि चर्मकवृत्ती संतोषित जाहलें तदीय मन ॥ ६ ॥
कांहीं कालें आला वाराणसि-पुण्यधामिं विप्रवर ॥
करि सविधि तीर्थयात्रा उच्चारुनि गोत्र आपुले प्रवर ॥ ७ ॥
एके दिनिं जान्हविसी जातां स्नानास होय त्या स्मरण ॥
चर्मकदत्त रुक्याचें करि अर्पण वृत्त तें निवेदून ॥ ८ ॥
तों गंगेंतुनि वरि ये कुंकुममंडित सुद्दिव्य एक कर ॥
घेउनि मणिकंकण, जें तेजें विलसे जसा सहस्रकर ॥ ९ ॥
तैसाचि जलांतुनि रव झाला, 'द्यावें प्रसादकंकण हें ॥
त्या साधु चर्मकारा,' परिसुनि तें विप्र विस्मया लाहे ॥१०॥
घेऊनि कंकण करीं पाहे निरखूनि तें अमोल दिसे ॥
चित्तीं ह्मणे अहाहा चर्मक-सम कोण भाग्यवंत असे ॥११॥
दिधलें प्रसाद ह्मणुनी गंगेनें भक्ति पाहुनी याची ॥
जें निज मौल्यें खालीं करिल ग्रीवा महान रायाची ॥ १२ ॥
द्यावें त्याचें त्यातें करि सुविचारास मानसीं आशा ॥
परि तद्विचार न टिके, द्रव्याची सोडिते कुणा आशा ॥१३॥
चित्तिं ह्मणे दारिद्र्यें पिडिलें अजवरि परंतु दैववशें ॥
बहु धन सहज मिळालें, दवडावें तें करामधूनि कसें ॥१४॥
होणार कशानें हें दिधलें कंकण ह्मणून त्या विदित ॥
विक्रयिं अगणित धन ये स्त्री सुत होतील पाहुनी मुदित ॥१५॥
करिन प्रपंच मोदें सोशियलें दुःख निर्धनत्वाचें ॥
आजवरी बहु आतां पाहिन दिन निश्चयें सु-भद्राचे ॥१६॥
ऐसा विचार करुनी एक्या श्रीमान सावकारा तें ॥
घेउनि विपुल धना दे दुष्कर्मा दुर्मति न नकारातें ॥ १७ ॥

आला गृहिं अतिमोदें दावी दारासुतांसि धनराशी ॥
पाहुनि तुष्टति सर्वहि मान मिळे कीं धनें युत नरासी ॥१८॥
संसार करी मोदें करि बहु नग कामिनीस निजतोकां ॥
परि मनिं सदा तळमळे, स्तेन कधीं स्वस्थ चित्तिं वसतो कां १९
इकडे कंकण धनिकें पाहुनि अत्यंत मौल्यवान मनीं ॥
हें ल्याया योग्य म्हणे या जगतीं होय भूमिपतिरमणी ॥२०॥
मग तें नेउनि एक्या देई तो सार्वभौम रायासी ॥
तैं भूप ह्मणे सचिवा, द्या बहु धन तुष्ट या करायासी ॥२१॥
मग भूप अप्रतिम तें दावी निज दयित पट्टराणीतें ॥
पाहुनि तोषलि परि धरि देइ दुजें ह्मणुनि हट्ट राणी ते ॥ २२ ॥
नृपति ह्मणे, एकचि हें आला होता विकावया धनिक ॥
गेला परतुनि आतां आणावें कोठुनी दुजें अणिक ॥ २३ ॥
नृपपत्नी वदत तया हें एक्या हस्तिं केवि ल्यावेंची ॥
आणावें यत्नानें धनिकें बहु वित्त घेतल्या वेंची ॥ २४ ॥
प्राप्त न होइल जरि तें मी अन्नग्रहण निश्चयें न करीं ॥
इतकेंचि नव्हे प्राणत्यागातें आपुल्या करीन करीं ॥ २५ ॥
पाहूनि अति तदाग्रह भूप ह्मणे गे दुजेंहि कंकण तें ॥
आणिन यत्नें, गुततां रमणीमोहांत कोण ना ह्मणतें ॥२६॥
पाचारुनि त्या धनिका पहिल्यापरि नृप ह्मणे दुज्या वलया ॥
द्यावें सत्वर आणुनि ना तरि पावे त्वदीय जीव लया ॥२७॥
घ्यावें विपुल धनातें अथवा देईन धाम देशाला ॥
करिसी न मान्य तरि तव छेदिन तनु छेदिती जसे शाला ॥२८॥
परिसुनि ती नृप-उक्ती निजचित्तीं धनिक फार गांगरला ॥
सभ्यासि अप्रतिष्ठा हानिकरी जसि तसी न अहि गरला ॥२९॥
दिधलें एकचि विप्रें आणावें कोठुनी अतां दुसरें ॥
धुंडाळितां नचि मिळे रत्नाकर वा समस्त सिंधु सरें ॥३०॥

आतां काय करावें ऐशा दुस्तर विचारिं तो पडला ॥
प्राणत्राण कराया त्यातें एकचि उपाय सांपडला ॥ ३१ ॥
आतां सत्य वदावें सत्यानें होति संकटें शमन ॥
विप्रें विक्रयिं दिधलें ह्मणुनि कथी करुनि मग नृपा नमन ॥३२॥
राजानें तो ब्राह्मण धाडुनि बहु दूत शीघ्र आणविला ॥
द्यावें दुजेंहि कंकण ऐसा भूपें स्वहेतु जाणविला ॥ ३३ ॥
देउनि अमित धनातें जगिं सन्मानार्ह मी तुला करिन ॥
करसी न मान्य मद्वच तरि विप्रा द्रुत तवासुला हरिन ॥३४॥
परिसुनि कठोर नृपवच तो द्विज भय मानसीं न कां पावे ॥
सुखद न परधन हरणें या कर्मीं मन ह्मणून कांपावें ॥३५॥
ब्राह्मण तैं चित्तिं म्हणे एकचि मज देइ जन्हुची तनया ॥
असुनी चर्मकधन तें अभिलाषें चूकलों खचीत नया ॥ ३६ ॥
झालें प्राप्तचि तत्फल आतां मज निश्चयें नृपाल वधी ॥
होइल होणारें परि सांगावें ऋत न लावितां अवधी ॥ ३७ ॥
मग वाडवें सविस्तर रायातें वृत्त तैं निवेदीलें ॥
त्या चर्मकार्थ तें परि धनलोभें म्यां तया न तें दीलें ॥३८॥
राया क्षमा करावी वित्तार्थें म्यां अनीतिला वरिलें ॥
परधन हरण करीतां मद्दैवें मन्मना न आवरिलें ॥ ३९ ॥
झाला कितिहि ज्ञाता द्रव्याचा तरि न लोभ मावळतो ॥
यद्यपि विदित किं तें क्षर, निशिदिनिं वित्तार्जनक्रमा वळतो ४०
द्विजधनिकांच्या संगें देउनि निजदास भूप आज्ञापी ॥
आणा चर्मक धरुनी सोडा नचि तो कितीहि विज्ञापी ॥४१॥
येइ मग चर्मकाच्या संनिध सहविप्र दासजननिकर ॥
तों वैसला विलोकिति जोडुनियां पांडुरंगभजनिं कर ॥४२॥
कथुनी सकलहि वार्ता विप्र ह्मणे, मी खचीत अपराधी ॥
आहें, कृपाचि करणें साधो करुनी उचीत अपरा धी ॥४३।

आतां संरक्षि मला तैसेंची या महान धनिकाला ॥
जरि तूं करिसी न कृपा, देतो भूपति अम्हां वदनिकाला ॥४४॥
चर्मक म्हणे द्विजवरा रायें धरिला महा दुराग्रह हा ॥
तो पुरवाया कैसा सांगे होईल पात्र विग्रह हा ॥ ४५ ॥
श्रीगंगादेवीनें दिधलें कंकण म्हणून गा वदसी ॥
यन्मौल्य न होय कुणा तैसेंची वसुमतीधरासदसीं ॥ ४६ ॥
ऐसें अमोल कंकण केविं मिळे या अकिंचनानिकट ॥
प्रार्थी जिणें दिलें तिसि,दात्याविण होय याचना फुकट ॥४७॥
पुनरपि विप्र म्हणे त्या हें संकट दूर होय ना इतरा ॥
या योग्य तूंचि साधो, संग्रामीं रक्षि काय रणभितरा ॥४८॥
ऐसें प्रार्थुनि तो द्विज गहिवरुनी आणि लोचना वारी ॥
कवण म्हणे मनिं चर्मक हें संकट जान्हवीविना वारी ॥४९॥
मग चर्म काटवट अरि रापी घेऊनि मृत्तिकापात्र ॥
सहविप्र नृपा गृहिं ये संकट हरणा मला करो पात्र ॥५०॥
पाहुनि भूप तयातें अणिलें कां कंकणा ह्मणे दुसऱ्या ॥
ओवाळुनि टाकाव्या ज्यावरुनी मौक्तिकादि हेम सऱ्या ॥५१॥
होउनि उतावळा बहु भूप ह्मणे देइ देइ झडकरि तें ॥
तत्पाशींची महिषी निजमानसिं फार थोर झड करिते ॥५२॥
विप्र म्हणे हे राया देई या चर्मकार्थ गंगा ती ॥
तो प्रार्थुनि अणिला म्यां आहे अपुल्या विलोकि संगातीं॥५३॥
देईल दुजें कंकण होतांची तत्प्रसाद हेत पुरे ॥
होतील जाण द्यावीं लागति या साधुला न वित्त पुरें ॥५४॥
नृप चर्मकाप्रति ह्मणे देई कंकण न लावणें उशिरा ॥
देसी न तरि तिघांच्या खड्गाघातें लयास नेउं शिरा ॥५५॥
चर्मक म्हणे नृपाला कैसें हें वद घडूनि येईल ॥
जें दे श्री तें द्याया मर्त्य कसा हा समर्थ होईल ॥ ५६ ॥

भूप म्हणे दूतांनीं दंतिपदिं तिन्ही शठांस मारा या ॥
तैं चर्मक बोले करिं या वाडवमंतुची क्षमा राया ॥ ५७ ॥
प्रार्थूं श्रीगंगेतें दिधलें कंकण जिणें द्विजापाशीं ॥
तीच कृपा करुनीयां हरिल तुझ्या शीघ्र दीर्घ तापाशीं ॥५८॥
ऐसें म्हणुनी चर्मक काष्टवटीमाजि घालुनी पाणी ॥
प्रार्थी एकाग्र मनें श्रीसुरसरितेस जोडुनी पाणी ॥ ५९ ॥
हे गंगे भवभंगे मंदाकिनि जाह्नवि त्रिपथगामी ॥
धावें या समयीं तूं अनन्य भावें तुला शरण गा मी ॥६०॥
दिधलें प्रसादकंकण तेणें हा अति अनर्थ ओढवला ॥
या दीर्घ संकटांतुनि हा सेवक पाहिजेचि सोडवला ॥ ६१ ॥
धावसि जरी न गंगे कोण दुजा रक्षि सांग गे माते ॥
हा नृप कंकणलोभें विप्रा धनिका वधील ही मातें ॥ ६२ ॥
होतील तीन हत्या ऐसा दिधला प्रसाद कां मजसी ॥
मागितला होता का म्यां अजवरि जान्हवी कधीं तुजसी ॥६३॥
करुनि कृपा त्वां दिधला झाला परि तो अनर्थकारकसा ॥
तुजवांचुनि इतरातें सांगे अवरेल हा प्रकार कसा ॥ ६४ ॥
होउनि सद्गद हृदयीं आणुनि मूर्ती पुनः पुन्हां नमि ती ॥
बोले क्षमा करावी दासाच्या दीर्घ मंतुला न मिती ॥ ६५ ॥
हा विप्र हा धनिक आजि तैसा मी हे मुकूंच जीवांना ॥
मग कोण ह्मणे जगिं या सांगे तव विमल कीर्ति जीवांना ६६
मन्निधन न दुःखद मज परि हा द्विज सावकार ही मरतो ॥
हा दोष कुणा मस्तकिं माते तव या विचारिं चित्त रतो ॥६७॥
येई झडकरि गंगे अगणितजडजीवपंक्ति उद्धारिली ॥
जड होय न तें तुज मग मद्विषयिंच आजि कां अडी धरिली ६८
धांवसि समयीं न जरी येणें मागून काय कामातें ॥
हेमंतीं वृष्टि जसी व्यर्थचि हें कां निवेदणें मातें ॥ ६९ ॥

आला निधनसमय तरि या दीनाची न ये तुला करुणा ॥
अथवा काय उणें तव झाल्यानें सृष्टिंतून एक उणा ॥ ७० ॥
परि तव मानस न असें निज भक्तार्थी सदैव कळवळतें ॥
तैसें स्वतोकसंकटिं जननीचेंहि कदापि ना वळतें ॥ ७१ ॥
ऐसा बहुपरि चर्मक विनवी श्रीजान्हवीस निज हृदयीं ॥
प्रेमळ भाविक भक्तीं वसताती देवता सदा सदयीं ॥ ७२ ॥
तेव्हां प्रसन्न होउनि मनिं निजदासार्थ जन्हुची दुहिता ॥
काटवटी-तोयांतुनि काढी ती कंकणान्विता हाता ॥ ७३ ॥
पडला प्रकाश त्याचा वसुधेवरि जेवि भानुचाचि पडे ॥
होय अति मोद सर्वां प्रेक्षकजननेत्र जाहले चिपडे ॥ ७४ ॥
घेउनि कंकण चर्मक तें भूपतिहस्तिं आदरें देई ॥
भाविक भक्तां पावति दैवतें वत्त कृष्ण तें गाई ॥ ७५ ॥

प्रकरण ७ वें.

मनःप्रार्थना.

आर्या.

वंदुनि विघ्नहरासी करिन मनःप्रार्थना सुदीन वचें ॥
आहे स्वामित्व जया हस्तीं या पंचभूत देहाचें ॥ १ ॥
संपूर्ण जंतु जगतीं वर्तति ते जेवि ईशसत्तेनें ॥
कर्मज्ञानादिक दश-इंद्रियसमुदाय तो तवाज्ञेनें ॥ २ ॥
चपलेहुनि चपल बहू वाताहुनि वेगवान तूं गतिनें ॥
विस्तीर्ण अनंताधिक आकाशाधिक अपार अंतानें ॥ ३ ॥

ठावहि ठावा न पडे, धरुं जातां लाधसी न हस्तासी ॥
करितां विलोकनेच्छा होसि न तूं दृश्यमान नेत्रासी ॥ ४ ॥
संरक्षण देहाचें अथवा हानिप्रकार तव हातीं ॥
पापापापादिक तीं कर्में सुखदुःखभोग तुज होती ॥ ५ ॥
इंद्रियसमूहचालक सुपथें कुपथें तयांसि वर्तविसी ॥
होउनि आज्ञांकित तीं लंघिति न कदापिही तवाज्ञेसी ॥६॥
तनुदेशचक्रवर्ती तूं, हृदयस्थान राजधानि तव ॥
मुख्य सुमंत अविद्या, षड्रिपु बल, तेवि शक्ति सैन्यधव ॥७॥
भांडार उदर, तैसे अवयव चरणादिक प्रजाजन ते ॥
तृष्णा अभिषिक्त वधू, शांति दया सद्विवेक रिपुजन ते ॥८॥
ज्ञानांत क्षेम तुझें, तैसें अज्ञान तेंचि तव हानी ॥
आहे गमन तुझें कीं नानाविध कल्पनाप्रवाहांनीं ॥ ९ ॥
नाहीं आकार तुला तैसेंची रंगरूपही नाहीं ॥
हें सत्य परी वससी व्यापुनि संपूर्ण जंतुचे देहीं ॥ १० ॥
वानुं प्रभाव किति तव, आकळिशी तूं महामहानांतें ॥
तनुसार्थकत्व करणें आहे हें तुजकडे महा नातें ॥ ११ ॥
जाऊं न देइ मतिला कुपथीं, सन्मार्गिं वर्तवी सतत ॥
कामक्रोधादिक रिपु शमवुनि साधी सुशीघ्र परम हित ॥१२॥
देते विषयनिमग्ना ही दुष्ट अतुष्ट वासना कष्ट ॥
भ्रष्ट श्रेष्ठ सुधर्मी, क्लिष्टकृती-तुष्ट, इष्ट पथिं नष्ट ॥ १३ ॥
विषयसुखांतुनि न कधीं मुरडे, चिरडे व्यथासमूहांनीं ॥
मानापमान न गणी, न कळे तथ्य स्वकीय हित हानी ॥१४॥
ऐसी निरय-द मति हे, हीतें त्वां सत्पथासि वळवावें ॥
पळवावें जड भावा, तुजाविण कवणासि सांग अळवावें ॥१५॥
वैराग्य विवेक दया शांति ज्ञान क्षमा धृती धैर्य ॥
अद्भुत तव प्रभावापुढती होती पळांत हतवीर्य ॥ १६ ॥

सज्ज्ञानें त्वत्कर्षी केला निश्चय तथापि तोहि ढळे ॥
केलें स्वांकित तुजसी ऐसा त्रिजगीं न एकही अढळे ॥१७॥
चंचल तव वृत्तीतें शमवाया योजिती महोपाया ॥
सज्ञान तत्त्ववेत्ते परि होती सर्वथैव ते वाया ॥ १८ ॥
तूं अनिवार महाबलि, तुज वळवाया सुबोध बहु टपती ॥
परि न वश तयां होसी, बुध योगी साधुसंतही हरती ॥१९॥
लावुनि देहसमाधी कर्षाया तुज मुनीहि पाहाती ॥
वातांबुकंदपर्णे भक्षुनि परि येसि तूं न त्यां हातीं ॥ २० ॥
ऐसे महामहाही शिणले, मग काय पाड या लघुचा ॥
हो सुप्रसन्न आतां क्रूरत्वें बध न अंत या तनुचा ॥ २१ ॥
जैसे श्रीजगदीशें कथिले स्वाकलनपंथ भक्तांशीं ॥
नवविध भक्ती सुपथें तैसी तूं सांग युक्ति उक्ताशी ॥२२॥
वळवी तनु सत्कर्मीं, पळवी भव-भी, स्वरूपता कळवी ॥
ढळवी न सुमार्गांतुनि, सत्संगांतुनि कदाहि ना हलवी ॥२३॥
येतों तुज काकुळती चुकवाया शक्य संसृतिभ्रमण ॥
सांगे स्वयें उपाया, करिन द्रुत तदनुसार आक्रमण ॥२४॥
विनवुनि बहु प्रकारें अणिला जरि म्यां बहूत कंटाळा ॥
तरि रोषभाव न धरी, मारुं कुणा हांक पसरुनी टाळा ॥२५॥
येइल तव इच्छेतें तैसें सार्थक करीन देहाचें ॥
वाचे न बोल बोलिन, व्हावें दर्शन परेश-पायाचें ॥ २६ ॥
या प्रार्थनाविधीचें करिती सप्रेम नित्य नियमानें ॥
श्रवण पठण जे नर त्यां देइल सायुज्यता प्रभू मानें ॥२७॥
या प्रार्थनाप्रकारीं गर्भित ठेवीत अर्थ जगदीशीं ॥
अज्ञान कृष्ण भावें, करतिल सज्जन न ते अव्हेरासी ॥२८॥

प्रकरण ८ वें.

व्याधिसंहार रविस्तोत्र.

शार्दूलविक्रीडित.

श्रीमत्सिद्धिविनायकांघ्रिकमला आरंभिं ध्याता मनीं ॥
पावे सर्व सुखास शीघ्र जगतीं निर्विघ्न तो होउनी ॥
ज्यातें वंदिति आत्मभू हर हरी तैसेच वृंदारक ॥
देवो तो मति गावया मज रविस्तोत्र व्यथानाशक ॥१॥

दे यद्बालमयूखवृंद उदयीं सुश्रीस हेमाद्रिला ॥
तेणें शैल्यवराख्य आणि उदयाद्रीनाम तो पावला ॥
इंद्रें दर्शन येथ होय ह्मणुनी केलें असे स्वोक तें ॥
रवें साधुसमूह जेथ वसती, तो संहरो व्याधितें ॥ २ ॥

यत्तेजोरुचि रक्तवर्ण उदयीं शोभे सुहेमापरी ॥
भासे मंद, परंतु वर्धनजवें तीक्ष्णत्व मोठें धरी ॥
व्यापी विष्णुपदा तशा दश दिशा टाकोनि बालत्व तें ॥
मध्यान्हीं अति तीव्र दीप्ति धरिते, तो संहरो व्याधितें ॥३॥

सायान्हीं लघुता धरूनि करिती आताम्र अस्ताचला ॥
उद्योगश्रमितां जनां समय ते देताति विश्रांतिला ॥
प्राची पश्चिम दक्षिणोत्तर असे सारे दिशाभाग ते ॥
दावीती कर ज्या सहस्र रविचे, तो संहरो व्याधितें ॥ ४ ॥

वारी कर्ष तसा अकर्ष करितो उत्फुल्ल पद्मावना ॥
देतो जागृतिकाल आत्म-उदयें निद्रानिमग्नां जनां ॥
होती सिद्ध करावयास अपुल्या कर्मा तसे सिद्ध ते ॥
ऐसा श्रेष्ठ यदंशुदीप्तिमहिमा, तो संहरो व्याधितें ॥ ५ ॥

स्वें तेजें करि दृश्य त्या घनतमें आच्छादिल्या सृष्टिसी ॥
कांतीनें अपुल्या सतेज करितो निस्तेज त्या इंदुसी ॥
ब्रम्हांडस्थसमस्तजीवनयना दे लोकना शक्तितें ॥
ऐसा मंडित आत्म-अंशुनिकरें, तो संहरो व्याधितें ॥ ६ ॥

त्रैलोक्यांतरिं यद्वशें समपणें तेजःप्रकाशत्व तें ॥
अंगीं दाहकशक्ति पूर्ण परि ते काष्ठादि ना जाळिते ॥
आनंदें रविकांतवृंद क्षरती होतां यदुत्पत्ति ते ॥
शोभे ऐसि जया मयूखसरणी, तो संहरो व्याधितें ॥ ७ ॥

नाना केतु विराजती सुकनकालंकारपंक्तीपरी ॥
आहे एक जया रथांग, विलसे छत्री तसा चामरी ॥
दीप्तीनें बहु लाजवीत हुतभुग्ज्वालामहाश्रेणितें ॥
ऐसा यद्रथ ऋक्षपंथगमना, तो संहरो व्याधितें ॥ ८ ॥

होते श्रांत कधीं न नित्य गमनें, विश्रांति नेच्छी कदा ॥
टाकी पार्श्वतटीं स्वकीय गमनें जी वायुवेगा सदा ॥
संपूर्णावयवीं जिच्या मरकता तुल्य प्रभा शोभते ॥
ऐसी सप्तहयावली रथधुरीं, तो संहरो व्याधितें ॥ ९ ॥

एक्या वासरिं लंघिती सुगतिनें संपूर्ण विश्वाप्रती ॥
पुच्छें चामरतुल्य ऊर्ध्व धरिती, सूता न ते मानिती ॥
ग्रीवा सर्पफणांपरी करिति वारंवार सुध्वान ते ॥
ज्याचे अश्व असे, महा जव जयां, तो संहरो व्याधितें ॥१०॥

हेमाद्रिप्रति लंघिती, निज खुराघातें तया भंगिती ॥
दावीती खुरलांच्छनें दिनमणिक्रांता रथाध्वाप्रती ॥
शैलाग्रीं उडती खगापरि घनांदोलें गती-मारुतें ॥
ज्याच्या अश्व असे रथास असती, तो संहरो व्याधितें ॥११॥

जंघाहीन वपू असे जरि तरी तेजें बहू आगळा ॥
जाणूनी सकलामरीं रविरथीं नेऊनियां स्थापिला ॥

ज्याच्या देहिं सुदीप्त तीक्ष्ण कनका तुल्य प्रभा शोभते ॥
ऐसा सारथि यद्रथीं वसतसे, तो संहरो व्याधितें ॥ १२ ॥

कौशल्यें करि वाजिच्या नियमना घेऊनि सूत्रें करीं ॥
हुं हुं हुं ध्वनिनें सुशीघ्र गतिनें हांकी नभाभीतरीं ॥
स्वामीच्या रुचिच्याहि पूर्विं अपुल्या दावी जना दीप्तितें ॥
ऐसा सूत रथाग्रभागिं विलसे, तो संहरो व्याधितें ॥ १३ ॥

तेजोमंडलमध्यभागिं अपुल्या बैसे सरोजासनीं ॥
कर्णीं मीनसुकुंडलें तळपती बाहू महाभूषणीं ॥
शीर्षीं चारु सतेज मौलि झळके कंठीं मणी-माळ ते ॥
हेमा तुल्य वपू, अरी दर करीं, तो संहरो व्याधितें ॥१४॥

त्रैलोक्यांतरिं यद्रुचीस उपमा द्याया नसे वस्तु ती ॥
पाहूनी अनलेंहि लज्जित मनें केलें गला खालती ॥
होती शक्य विलोकनास रुचितें ज्याच्या न चर्माक्ष ते ॥
भेटे शीत कधीं न तेवि तम ज्या, तो संहरो व्याधितें ॥१५॥

सिंची भूवरतीं घनांकडुनि जो वर्षर्तुकालीं जला ॥
हेमंतीं तशि शीतता विहितशी अर्पी महीच्या तला ॥
वासंतीं प्रखरातपा करि, परी संरक्षि जो जंतुतें ॥
तैसीं नूतन दे दलें तरुवरां, तो संहरो व्याधितें ॥ १६ ॥

देई दर्शन जंतुतें प्रतिदिनीं प्रत्यक्ष तारापथीं ॥
भक्तांच्या स्वकृपेक्षणें कुमतिच्या गाढांधकारा मथी ॥
रक्षी संकटिं आत्मतोकसम जो प्रेमें जसी माय ते ॥
विध्वंसी प्रगदांहि शीघ्र भजतां, तो संहरो व्याधितें ॥१७॥

त्रैलोक्याभरणा भ्रमे सतत जो, विश्रांति नाहीं जया ॥
आहे कारण संभव स्थिति तसा संहारही व्हावया ॥
तैसे वासर वर्ष याम ऋतुही वर्षादि जे काल ते ॥
ज्याच्यापासुनि होति, रक्षि सकलां, तो संहरो व्याधितें॥१८॥

जो नेत्रेंद्रियदेवता स्तवियला गायत्रिमंत्रें महा ॥
सामादि श्रुति ज्यास वाणिति पुराणें तेवि शास्त्रें सहा ॥
प्रातःकालिं करूनि वंदन करीं ज्या देति संध्यार्घ्य ते ॥
दे जो नित्य जनां प्रमोद सकलां, तो संहरो व्याधितें॥१९॥

ज्याचें दर्शन होय ज्या न दिवसीं दुर्दीन तो मानिती ॥
संवृद्धीमति ज्याचिया तरुलता अस्तोदयें पावती ॥
नाना रोग विनाशुनी त्वरित दे भक्तांसि आरोग्य तें ॥
ज्या सोमादिनवग्रहीं प्रमुखता, तो संहरो व्याधितें॥ २० ॥

इंद्राद्यामर लीन होउनि सदा यत्पादपद्माप्रती ॥
तैसे तापसि योगि वाडव मुनी दैत्यादिही वंदिती ॥
सिद्धाली अघमर्षणादि करुनी अर्घ्योदका अर्पि ते ॥
प्रातःकालिं जयासि जोडुनि करा, तो संहरो व्याधितें ॥२१॥

सूर्यादित्य दिवाकरारुण रवी चंडांशु भास्वान् हरी ॥
भागाहस्कर सूर पिंगल जगच्चक्षुस्तमोब्धी-अरी ॥
सप्ताश्वोष्णमयूख वैद्य हरिदश्वाहर्पती माठर ॥
दंडब्रध्न विभाकर द्युमणि पूषार्कार्यमा भास्कर ॥ २२ ॥
विश्वात्मा सुमहाबल प्रभव भूतात्मा जगज्जीवन ॥
तेजोराशि विभावसू दिनमणी श्रीकंठ नारायण ॥
जीवानंद निरंजन स्थितमती आमुक्त बाधाहर ॥
त्रैलोक्येश बलिप्रियाशुग कवी वर्चस्वि योगीश्वर ॥ २३ ॥
सिंहस्वामि कलानिधी दिनपती चित्रांगद त्र्यक्षर ॥
विश्वाधार जगत्पती पशुपती तिग्मांशु कालाक्षर ॥
लोकालोकनमस्कृतः जितरथी ध्वांतघ्न संजीवन ॥
नित्यानित्य सुरेश रुद्र तरणी साधू मरुद्वाहन ॥ २४ ॥
संध्यावंदनवंदितः नवपरमाणः तमोहिंसक ॥
आलेयातिपराक्रमारिदमनस्त्वष्टा व्यथानाशक ॥

धन्य श्रीधर कीर्तिवर्धन बृहत्कीर्तिः शरण्याच्युत ॥
श्रेष्ठा मा धरणी धरानल दुराराध्य ग्रहेशासित ॥ २५ ॥

मोक्षाधार निकेतनांबुद वषट्कार प्रभापूरित ॥
स्वाहाकार मरुत्सहस्रकिरण स्वामी नरालंकृत ॥
शिष्टाचार वरप्रदोदित घृताहारो द्वितीयानृणी ॥
गायत्रीजपसुप्रवंद्य अशिं हीं ध्यावीं सुनामें मनीं ॥ २६ ॥

ज्यालागीं बुध ते प्रभातसमयीं स्रष्टा असें बोलती ॥
मध्यान्हीं शशिखंडमंडितजटामौली मृडानीपती ॥
सायान्हीं हरि जो गदा दर अरी पद्मा धरी पाणितें ॥
ऐसा जो त्रयमूर्तिरूप सविता, तो संहरो व्याधितें ॥२७॥

कार्तीकांत जया दिवाकर असें, मार्गीं ह्मणा मित्रची ॥
पौषीं मित्रचि, माघमासिं अरुण, ज्येष्टींद्र यत्स्त्री शची ॥
आषाढीं रवि, चैत्रिं भानु, अधिकीं पूरूष, भाद्रीं यम ॥
राधीं तापन, आश्विनीं कनकरेता, फल्गु सूर्य क्रम ॥ २८ ॥

तैसें श्रावणमासिं ज्यास ह्मणती जाणा गभस्ती असें ॥
ऐसीं हीं प्रतिमासिं नामकरणें सुज्ञावली देतसे ॥
दावी जो प्रतिमासिं भिन्न अपुलें विश्वाप्रती तेज तें ॥
अंगीं ऐसि वसे विचित्र करणी, तो संहरो व्याधितें ॥२९॥

जो आधार असे सदा सकलही स्वर्गादि लोकांप्रती ॥
ब्रम्हा-विष्णु-महेश्वरामर जया श्रेष्ठाश्रयीं वर्तती ॥
पृथ्वी व्योम कबंध तेज करिता उत्पन्न तो वायुतें ॥
त्रैलोक्यांतरिं नित्य जो भ्रमतसे, तो संहरो व्याधितें ॥३०॥

सावित्रीपति पार्वतीपति तथा पद्मापती दिक्पती ॥
गाती ध्याति अपांपती रतिपती तारापती भूपती ॥
वंदीती स्तविती जयाप्रति अती होऊनियां नम्र ते ॥
ऐसा पूज्य गभस्ति जो अतिगती, तो संहरो व्याधितें ॥३१॥

नाना व्याधि विनाशुनी त्वरित दे क्षेमायु भक्ता जना ॥
दारा पुत्र तथाहि वित्त गुरुता सत्कीर्ति सद्वासना ॥
नेई तारुनि दुस्तरा भवाधिला सायुज्यतामुक्तितें ॥
नोपेक्षी शरणागतासि अपुल्या, तो संहरो व्याधितें ॥३२

या स्तोत्रें प्रति-वासरीं दिनकरा भावें सदा पूजिती ॥
त्यांतें अंतकदूत ते भिउनियां जाती, न त्यां स्पर्शती ॥
वंदी कृष्ण सदाशिवात्मज तया जोडूनियां पाणितें ॥
श्रीमद्भास्कर सर्वसाक्षि जगता, तो संहरो व्याधितें ॥३३

प्रकरण ९ वें.

भानुदास.

वसंततिलका.

श्रीविघ्नराजचरणीं नमुनी करांनीं ॥
प्रार्थीं कवित्वकृतिसंमति दे म्हणूनी ॥
विद्यापुरीं स्वकरिं विठ्ठलमूर्ति राया ॥
ने वृत्त तें कवनिं मन्मन इच्छि राया ॥ १ ॥

दिंडी.

द्विजांसंगे पंढरिंत रामराया ॥ भजे राहूनी पांडुरंगपाया ॥
तया झाली वासना मनीं ऐसी॥ निजग्रामीं न्यावेंचि विठ्ठलासी॥२

यूथिका.

एकदां नृपति राउळिं येउनी ॥ प्रार्थितो सविनयें कर जोडुनी ॥
चाल तूं मम पुरीं करुनी दया॥ होय कीं मज तयें बहु मोद या ॥३

मालिनी

म्हणसि जरि कुठे ही पंढरी सोडुनीयां ॥
गमन न करितों मी, आयके देवराया ॥
लहुळपुरिस आंगें कूर्मदासार्थ जासी ॥
मग मम पुरितें कां बाध रे यावयासी ॥ ४ ॥

परिसुनि नृपतीची भक्तिसंयुक्त वाणी ॥
निज मनिं बहु तेणें तोषला चक्रपाणी ॥
ह्मणत मज पथीं तूं ठेवितां तेवि हातें ॥
अनुचित करितां मी येइं कीं पंढरीतें ॥ ५ ॥

दिंडी.

नृपाचित्तीं आनंद थोर झाला ॥
ह्मणे देवा हें कठिण काय माला ॥
ठायिं ठायीं ठेवीन दासपंक्ती ॥
वदुनि ऐसें उचलि तो श्रीशमूर्ती ॥ ६ ॥

शार्दूलविक्रीडित.

गेला घेउनि भूप शीघ्र गतिनें त्या चारु मूर्तिप्रती ॥
विद्यानामक पत्तनीं निजकरें सन्मांदिरीं स्थापि ती ॥
पूजाकर्म यथाविधि प्रतिदिनीं सानंद चित्तें करी ॥
ऐशा या उपभोगिं विठ्ठल वसे त्यागूंनियां पंढरी ॥ ७ ॥

अंजनीगीत.

इकडे पंढरपुर क्षेत्रांत ॥ झाला महानाकांत ॥
देशोदेशींचे भक्त ॥ दर्शना येती ॥ ८ ॥

नाहीं तेथें विठ्ठलमूर्ती ॥ पाहुनि दुःखित बहु होती ॥
नेली विद्यानगराप्रती ॥ रायें परिसुनी ॥ ९ ॥

भासे पंढरी उदासीन ॥ जैसी नारी पतीविण ॥
किंवा नसतां जीवन ॥ सरिता ती जैसी ॥ १० ॥

यात्रेकरितां आषाढीचे ॥ वैष्णव येती दुर देशींचे ॥
ऐकुनि वृत्त पंढरीचें ॥ दुःखी ते होती ॥ ११ ॥
संतमहंत गरुडपारीं ॥ बैसले तैसे महाद्वारीं ॥
ह्मणती आम्हुचा कैवारी ॥ रायें कां नेला ॥ १२ ॥
घडला काय अपराध ॥ दर्शनासी आला बाध ॥
करणी त्याची अगाध ॥ न कळे कोणा ॥ १३ ॥

भुजंगप्रयात.

अतां जाउनी कोण आणील देवा ॥
करावी कुणाची अह्मी पादसेवा ॥
विचारीं अशा संतमांदी बुडाली ॥
तदा भानुदासें ग्रिवा हालवीली ॥ १४ ॥

शिखरिणी.

ह्मणे मी जाऊनी त्वरित अणितों पंढरिपती ॥
बसावें हो तुह्मी स्थिर करुनियां आपुलि मती ॥
नुपेक्षी तो दासा चरणकमलींच्या हरि कदा ॥
असें बोलूनीयां स्मरुनिचि निघे तैं प्रभुपदा ॥ १५ ॥

साकी.

विद्यानगरीं शीघ्र गतीनें जाउनि भानूदास ॥
पंढरपुरिंची विठ्ठलमूर्ती दावा जन हो यास ॥
॥ध्रु०॥ ऐसा प्रश्न करी ॥ कथिती कोणी त्या न परी ॥१६॥

आर्या.

फिरला समस्त नगरी भूपभयें सांगती कुणी न परी ॥
मग एक वैष्णव ह्मणे, आहे या मंदिरांत गुप्तपरी ॥ १७ ॥
अर्धनिशीमाजारी गेला त्या मंदिरांत तो दास ॥
करुनी कपाटिं मुद्रा जाती भासादिंचे गृहीं दास ॥ १८ ॥

इंद्रवज्रा.

पाहूनि मुद्रायुत तीं कपाटें ॥ त्या दासाचित्ता बहु दुःख वाटे ॥
भेटी कसी होइल विठ्ठलाची ॥ऐशा विचारीं रत बुद्धि त्याची॥१९॥

शिखरिणी.

ह्मणे देवा आतां करिसि न दया तूं मजवरी ॥
तरी या प्राणातें त्यजिन, अवधी न क्षणभरी ॥
कपाटातें मुद्रा करुनि बसलासी लपुनियां ॥
तुला न्याया आलों उमजुनि मनीं घेउनि भया ॥ २० ॥

शुद्धकामदा.

परि हरी तुला घेतल्याविना ॥ गमन ना करीं दिंडिरावना ॥
मुख न दाखवीं पंढरीपुरीं ॥ प्रभु तुझीच रे आण ही खरी ॥ २१ ॥

शिखरिणी.

कपाटाच्या मुद्रा सकलहि तदा खालिं गळती ॥
जशा झंझावातें तरुवरुनि पक्का फलतती ॥
विलोकूनी त्यातें बहुत मनिं आनंद करितो ॥
रिघूनी गाभारीं सुदृढ हरिपादासि धरि तो ॥ २२ ॥

साकी.

देवा करुणासागरमूर्ती त्यागुनि पंढरि-धामा ॥
आलासी कां विद्यानगरीं सांगे सत्वर आह्मां ॥
॥ध्रु०॥ सोडुं न परि तुजला ॥ संतीं निश्चय हा केला ॥२३॥

दिंडी.

दुर्बलांची नावडे तुजासि पूजा ॥ येथ उपचारा करित रामराजा ॥
सौख्य तें मानसिं बहू मानुनीयां ॥ राहिलासी या स्थलीं देवराया॥
राहिरखुमाई आणि सत्यभामा॥त्यजुनि इतुक्यांसी येसि घनश्यामा
रामरायें लाविला तुला प्रेमा॥ विसरलासी तूं ह्मणुनि काय आह्मां॥
मागुं आह्मी तूजसी प्रेमदान ॥ तया भेणें आलासि कां पळून ॥
कीर्तनाचा गलबला थोर भारी ॥ न ये तेणें निद्राचि कां मुरारी॥२६
म्हणुनि एकांतीं ठाव पाहिलासी॥विदित झालें कीं कपट हें अह्मांसी
मिळे भक्तांचा संघ असंख्यात ॥ तया भेटाया शीण तुजासि येत ॥
म्हणुनि विद्यानगरासि येउनीया॥ घेसि विश्रांती स्वस्थ देवराया॥
कसें रुचलें हें तुझ्या मानसासी॥नको कोपूं तूं साधुसंतदासीं॥२८॥

स्वागता.

ऐकुनी स्वजनदुःखितवाणी ॥ ढाळि देव नयनांतुनि पाणी ॥
वाटती प्रिय न भोग मला हे॥कीं विकल्प तुमच्या मनिं लाहे ॥२९॥

ओवी.

वस्त्रें भूषणें अलंकार ॥ नावडती मज राजोपचार ॥
कधीं पाहीन भीमातीर ॥ हाचि विचार मनिं वसे ॥ ३० ॥
रायें येथें मज आणुनी ॥ ठेविलें या कारास्थानीं ॥
तुह्मीहि निष्ठुर होउनी मनीं ॥ परती कोणी नाहीं नेलें ॥३१॥

कामदा.

बोलतां असें कंठ दाटला ॥ नेत्रिं अश्रुचा पूर लोटला ॥
स्फुंदुनी ह्मणे रुक्मिणीपती ॥ दर्शना उद्यां येइ मागुती ॥ ३२ ॥

आर्या.

बोलुनि ऐसें हरि तो काढुनि निज कंठिंची सुमणिमाला ॥
घाली दासाकंठीं जी प्राप्त न होय रुक्मिणीमाला ॥ ३३ ॥

यूथिका.

दर्शनासि नृप येइल मंदिरीं ॥ जाइं तूं इथुनि सत्वरि बाहिरी ॥
शब्द ते परसुनी द्रुत चालला ॥ द्वारसंघ कुलुपें युत जाहला ॥

आर्या.

आला प्रभातकालीं देवालयिं भूप कांकडार्तीतें ॥
साष्टांगें वंदुनियां न्याहाळी पांडुरंगमूर्ती ते ॥ ३५ ॥
तों हार सुरत्नांचा श्रीच्या कंठांत पाहतां न दिसे ॥
तेव्हां विस्मित होउनि क्रोधें तो भूप पूजकासि पुसे ॥ ३६ ॥

भुजंगप्रयात.

ह्मणे कोण रे मंदिरीं चोर आला ॥
धरूनी अणावें त्वरेनें तयाला ॥
नृपाच्या वचें दूत शोधार्थ जाती ॥
गृहें मंदिरें सर्वही शोधिताती ॥ ३७ ॥

शार्दूलविक्रीडित.

तों सद्वैष्णव भानुदास बसला ध्यानस्थ गंगातिरीं ॥
कंठीं घालुनि रत्नहार हरिचा सप्रेम शुद्धांतरीं ॥
देखूनी नृपकिंकरीं धरियला मानूनियां तस्कर ॥
बांधीती दृढ रज्जुनें निजकरीं त्या साधुचे ते कर ॥३८॥

यूथिका.

ओढुनी दरदरां पथिं आणिती ॥ पाहुनी नगरिंचे जन हासती ॥
बोलती मिरवितो जगिं साधुता ॥ अंतरीं परि पहा किति नीचता ३९

साकी.

नवरत्नांची नेउनि माला देउनि भूपाहातीं ॥
अणिला तस्कर काय तयातें शिक्षा ऐसें ह्मणती ॥
॥ध्रु०॥ बोले अविचारें ॥ शूलीं सत्वर त्या द्या रे ॥ ४० ॥

शार्दूलविक्रीडित.

शूलासंनिध न्यावया नृपतिचे निष्ठूर ते किंकर ॥
झाले सिद्ध विलोकुनी विनवि तो जोडूनि त्यांतें कर ॥
बोले दास तयांसि आजि मजला श्रीपांडुरंगाप्रती ॥
अंतींची करवा करूनि सुदया संमोक्षदा भेटि ती ॥४१॥

मालिनी.

सुमति नृपतिदूतीं कांहिं उत्पन्न होते ॥
परिसुनि विनती ती मोहती मानसातें ॥
मग मनुजवराच्या घेउनी संमतीला ॥
त्वरित बहुत नेती मंदिरासी तयाला ॥ ४२ ॥

दिंडी.

भानुदासें जोडुनी आत्मपाणी ॥ वंदियेला साष्टांग चक्रपाणी ॥
ह्मणे देवा काय हें करिसि आजी॥गोड लागलि कां विटंबना माझी॥
तुला न्याया पातलों ह्मणुनि ऐसें ॥ योजियेलें मानसीं मला भासे ॥
अर्पुनीयां निजकरें रत्नमाला ॥ मारवीसी तस्करापरी माला ॥४४॥

आर्या.

परि शतजन्मांतरिंही आह्मी सोडूं न हे तुझे चरण ॥
तुजवांचुनि कोण दुजा देवेशा करिल आमुचें भरण ॥४५॥
आतां लोभ असावा, भक्तावरि तूं कठोर करि न मन ॥
ऐसें प्रार्थुनि भावें साष्टांगें भानुदास करि नमन ॥४६॥

साकी.

भूपाचे तैं निर्दय किंकर ह्मणती चोरी करितां ॥
ज्ञानसमुह हा साधुत्वाचा कोठें गेला होता ॥
॥ध्रु०॥ ऐसें बोलोनी ॥ ओढिति बाहूतें धरुनी ॥ ४७ ॥
माथीं माखिति शेंदुर त्याच्या स्कंदीं देउनि शूल ॥
नगरामधुनी मिरवित नेती पाहुनि हांसति सकल ॥
॥ध्रु०॥ म्हणती कपटी हा ॥ बनला कैसा साधु पहा ॥४८॥
ग्रामाबाहिरि नेउनि त्यातें शूलातें मग पुरती ॥
उचलुनि हातें त्या भक्तातें ठेविति शूलावरतीं ॥
॥ध्रु०॥ त्याची तिलहि दया ॥ कोठुनि ये अदया हृदया ॥४९॥

भुजंगप्रयात.

परी स्वल्पही भी न तो भानुदास ॥
स्मरे अंतरीं विठ्ठलाच्या पदास ॥
म्हणे योग्य या शासनासी जहालों ॥
तुझी भक्ति माझ्या मनींची न हालो ॥ ५० ॥

मालिनी.

जरि नभ-चपलेचा पात अंगीं जहाला ॥
निधि समरसले वा क्षोणि गेली तलाला ॥
गलित सकल तैसीं जाहलीं पंचभूतें ॥
क्षणभरि तरि देवा सोडुं आम्ही न तूतें ॥ ५१ ॥

इंद्रवज्रा.

पाहूनि त्याचें दृढ अंतरंग ॥ झाले मनीं विठ्ठल पांडुरंग ॥
धांवूनिया त्या स्थलिं शीघ्र आले ॥ भक्तार्थ तैं कौतुक थोर केलें ५२

मंदाक्रांता.

त्या शूळाचा रमणिय असा जाहला चंड शाल ॥
ज्याच्या ठायीं फल, दल, फुलें शोभती सर्वकाल ॥
शांतस्वांतें स्मरत हरिला त्यावरी भानुदास ॥
देखोनी तें करिति नवला मानसीं भूपदास ॥ ५३ ॥

साकी.

वेगें धावुनि नरपतिकिंकर कथिती वार्ता भूपा ॥
शूळाचा तो वृक्ष जहाला, दैविक ही अनुकंपा ॥
॥ध्रु०॥ परिसुनि नरनाथें ॥ केलें येणें मग तेथें ॥ ५४ ॥
पाहुनि पादप फलपुष्पान्वित विस्मित चित्तीं झाला ॥
म्हणे न जाणुनि हरिभक्ताचा मोठा छल म्यां केला ॥
॥ध्रु०॥ साष्टांगें नमना ॥ त्याच्या धरुनी करि चरणा ॥५५॥

भुजंगप्रयात.

म्हणे जाहला मंतु हातें प्रचंड ॥ करा हो क्षमा योजुनी योग्य दंड॥
असे लीन हा त्वत्पदीं भानुदासा॥नुपेक्षी मनीं आजि या दीनदासा

यूथिका.

आदरें धरुनियां नृप तत्करीं ॥ आणि त्या त्वरित विठ्ठलमंदिरीं ॥
पाहुनी नयनिं सांवाळि मूर्ति ती ॥ जोडुनी निजकरांप्रति वंदिती५७

दिंडी.

रामराया तैं ह्मणे पांडुरंगा ॥ कोप नाणावा विभो अंतरंगा ॥
नजाणूनी जाहला महामंतू ॥ क्षमा करणें होउनी कृपाळू तूं ॥ ५८ ॥
भानुदासासी ह्मणे रमानाथ ॥ शीणलासी तूं फार रे मदर्थ ॥
नेइ आतां झडकरी पंढरीसी ॥ नको भीतीतें वागवूं मनासी ॥ ५९ ॥

यूथिका.

बोल ते परिसुनी कर जोडुनी ॥ बोलिला नृपति दुःखित भाषणीं ॥
त्यागुनी मजासि जासि कुठे हरी ॥ कोप तूं मनिं न या करि किंकरीं ॥

आर्या.

देव ह्मणे नरनाथा होतें कथिलें अधींच मी तुजला ॥
घडतां अपराध तुझ्या हातें जाईन मी स्व-पंढरिला ॥ ६१ ॥

आतां निज हृदयीं तूं भक्तिपथें जा करीत मद्ध्यान ॥
ऐसें कथुनी त्याचें केलें देवें तदा समाधान ॥ ६२ ॥

स्वागता.

भानुदास विनवी जगदीशा ॥ केविं नेउं तुजसी निजदेशा ॥
साह्य तें मज नसे मनुजाचें ॥ शक्तिचें तिलहि तेवि धनाचें ॥६३॥

इंद्रवज्रा.

हांसोनि बोले जगदीश त्यातें ॥ मी सान होतों मग नेइं मातें ॥
घालूनिया संबळिमाजि दासा ॥ ऐसें वदूनी धरि सान वेशा६४॥

ओवी.

देवासी घेउनी भानुदास ॥ आला पद्माळें ग्रामास ॥
संबळी ठेवुनी भूतलास ॥ गेला स्नानास सरोवरीं ॥ ६५ ॥
जो सकल जगाचा घेई भार ॥ तो निजभक्ताचे स्कंदावर ॥
राहिला कैसा ही शंका थोर ॥ श्रोते विचारीं न आणावी ६६
भक्तिबलें भक्ताधीन ॥ होतसे श्रीजगज्जीवन ॥
हें करणें न लागे कथन ॥ वेद पुराण हेंचि बोले ॥ ६७ ॥
इकडे संबळीतें विदारून ॥ देवें पूर्वरूप केलें धारण ॥
भानुदासें तें विलोकून ॥ खिन्न चित्त बहु केलें ॥ ६८ ॥
म्हणे देवा थोर जहालासी ॥ आतां कैसा रे नेऊं तुजसी ॥
दाऊं काय मुख वैष्णवांसी ॥ पंढरीसी जाउनी ॥ ६९ ॥

साकी.

बोले तेव्हां रुक्मिणीपती जाउनि पंढरिनगरीं ॥
विदित करावी सर्वहि वार्ता साधूसंतां निकरीं ॥
॥ध्रु०॥ मोदें या ठायां ॥ येतिल मजसी ते न्याया ॥ ७० ॥

मालिनी.

परिसुनि हरिवाणी दास संतोष मानी ॥
त्वरिततर गतीनें मार्ग तो आक्रमूनी ॥
बहु मुदित मनानें पातला पंढरीसी ॥
कथिलि सकल वार्ता वंदुनी वैष्णवांसी ॥ ७१ ॥

दिंडी.

म्हणे पश्चाळीं रुक्मिणीश आले ॥वृत्त परिसुनि संतुष्ट सर्व झाले ॥
टाळवीणादिक घेउनी स्वहातीं ॥ महागजरें सामोरि शीघ्र जाती ॥

ओवी.

देखुनीयां रुक्मिणीकांत ॥ साष्टांगें घालिती दंडवत ॥
म्हणती भेटलासि आह्मांप्रत ॥ भाग्य अमित आमुचें ॥७३॥

साकी.

बैसवुनी मग शिबिकेमाजी नगरीं मिरवित आणिती ॥
नेउनि मंदिरिं सिंहासनिं ती स्थापिति विठ्ठलमूर्ती ॥
॥ध्रु०॥ करिती वरपूजा ॥ वंदुनि भावें पदकंजा ॥ ७४ ॥

ओवी.

भानुदासाचें करिती स्तवन ॥ ह्मणती आणिला येणें जगज्जीवन ॥
ती कथा प्राकृतीं पद्यें विरचन ॥ करी कृष्ण यथामति ॥ ७५ ॥

प्रकरण १० वें.

महिम्नस्तोत्रावर प्राकृत समश्लोकी.

शिखरिणी.

यदंघ्र्यंभोजातें स्मरण करितां विघ्न हरतें ॥
अतिप्रेमें घेती निज जघनिं ज्या गोरिहर ते ॥
जया कार्यारंभीं सुरनर मुनी पादिं नमिती ॥
शिवस्तोत्रा गाया करुनि सुदया देउ सुमती ॥ १ ॥
हरा युष्मत्कीर्ती नचि परि मिता ती अविदुषीं ॥
प्रयत्नें वाणीली परि सदृशता होइल कशी ॥

स्तुती गातां झाली तव विधिचिही कुंठित मती ॥
मदीय स्तोत्रीं या मग न अपवाद प्रभवती ॥ २ ॥

मनातें वाणीतें तव महतिचा अंत न मिळे ॥
तथाही वेदांतें सुदृढतर सत्यत्व न कळे ॥
अशात्वत्श्रेष्ठत्वा कवण नर तो वर्णन करी ॥
प्रभो अर्वाचीनीं मग करिल कां तो नुति खरी ॥ ३ ॥

भवद्वाणी शंभो मधुर अमृताहूनि मधुरा ॥
गिरेचा जो स्वामी सुरगुरु तया विस्मित करा ॥
त्वदीय स्तोत्राच्या कथनसुकृतें ही मम वचा ॥
जहाला पूतत्वा खचित न मिळे निश्चय धिचा ॥ ४ ॥

तुझी शक्ती विश्वोदय भरण संहार करिते ॥
त्रयी ही या कर्माऽकलन धरिसी भिन्न तनुतें ॥
यदर्थी वादातें करिति कुमती जे जडमती ॥
परी त्यांतें होते विदित न तुझी सत्य महती ॥ ५ ॥

विधाता आधारें उदय कवणाच्या जग करी ॥
कुणाच्या देहानें तसिच तृड ती कायचि तरी ॥
तवातर्क्यैश्वर्या सुदृढ कळण्या यत्न कवण ॥
करी तर्कानेंही तव नुति परी वादद न न ॥ ६ ॥

अजन्मी किंवा हे जन अवयवी काय असती ॥
जगाचा कर्ता तूं तव जडधि आव्हेर करिती ॥
तरी विश्वोत्पत्तिक्रम करिल तो सांग कवण ॥
सुरेशा देवा कां मग नचि पडे संशयिं मन ॥ ७ ॥

कुणी सांख्या शैवा श्रुतिस अथवा वैष्णव पथा ॥
महत्त्वातें देती निजमतिं परी सर्वचि वृथा ॥
जरी स्वीकारूनी सरलकुटिलाध्वा प्रवदती ॥
परी तूझ्या पंथीं मिळति उदका न्हादिनिपती ॥ ८ ॥

तवैश्वर्या देवा जरि जन पहाती निज दिटी ॥
दिसे नंदी खट्वांग परशु विभूती नृकरटी ॥
परी तूझ्या अक्षभ्रुकुटिपतनें सिद्धि अमरां ॥
मिळे त्वद्देहीं ना तिळ विषयतृष्णा भ्रमकरा ॥ ९ ॥

कुणी या सृष्टीतें ऋत ह्मणति कोणी अनृत ही ॥
तशी सत्यासत्यान्वित वदति लोकांत किति ही ॥
विचारातें केल्या सकल ऋत तें तूंच दिससी ॥
ह्मणूनी लज्जा ये प्रभुजि करण्या स्तोत्य मजसी ॥१०॥

पहाया ऐश्वर्या तव विधि नभीं भूदरिं हरी ॥
प्रयत्नें स्वांगें ते गमन करिती श्रांताचि परी ॥
महा होऊनीया मग तव विभो भक्ति करिती ॥
तदग्रीं साक्षात् तूं प्रकटासि न दे भक्ति फल ती ॥ ११ ॥

दशास्या ब्रह्मांडें श्रमरहित होती रिपुहिन ॥
यदर्थी बाहूंतें करि कदनकंडू मिरवण ॥
स्थिरा भक्ती युष्मच्चरणकमलाची निज शिरें ॥
करी अंभोजाली करुनि, वर हें तत्फल हरे ॥ १२ ॥

भवत्सेवायोगें स्वभुजिं उपलब्ध प्रबल तो ॥
बळें कैलासाद्रिस्थल तव हरे जैं हलवितो ॥
तदा स्वांघ्र्यांगुष्ठें अलसयुत किंचित् दडपिलें ॥
तयें पातालींही अतितरमदा न स्थल मिळे ॥ १३ ॥

महेशा त्वद्दत्त प्रमुख वर जो बाणदनुज ॥
तयें शक्रश्रीतें उणिव आणिली पूर्ण सहज ॥
न कीं हें आश्चर्यप्रद पशुपते लीन चरणीं ॥
तुझ्या त्यातें श्रेष्ठत्व मग न मिळे कां त्रिभुवनीं ॥ १४ ॥

समस्त ब्रह्मांडें जलधिजविषें होति दहन ॥
विलोकूनी स्वांतीं भयचकित देवासुरजन ॥

तदा रक्षाया त्यां गरल करिसी धारण गळीं ॥
जगाचा तूं पीडाहरक तुज भूषालि सजली ॥ १५ ॥

मृडानीशा शंभो सकल जग तें मानव वर ॥
सुरादी-दैत्यांहीं युत अति तुझे तीव्र सुशर ॥
तया जिंकीती त्या तुज मदन तो जिंकुं बघतां ॥
गणूनी सामान्यामरसम मिळे अंतकपथा ॥ १६ ॥

धरा-स्वस्तित्वार्थी निज पद तुझी तो अपटितां ॥
मनीं भीती पावे गगनहि करांतें हलवितां ॥
भयार्तोडुश्रेणीयुत सुरजनस्थानहि तसें ॥
जटेतें ताडीतां, परि हृदय विश्वावनिं वसे ॥ १७ ॥

प्रवाहा गंगेच्या उडुगुणितफेनोद्भवरुची ॥
जटामौलीमाजी धरिसि विलसे बिंदुसमची ॥
जगद्द्वीपाकारी जलधि-उदकें वेष्टित तसें ॥
भवद्देहीं भासे, तव शरिर कीर्त्यान्वित असें ॥ १८ ॥

शतांग क्षोणीचा, हयततिनियंता श्रुतिमुख ॥
रथांगें हंसेंदू, करिसि धनु तो पर्वतमुख ॥
हृषीकेशाचा तो विशिख, न तवेच्छा परवशा ॥
तव प्रौढा शक्तीमति इतर औडंबर कशा ॥ १९ ॥

हरी त्वत्पूजार्थी दशशतमिती आणि कमलें ॥
वहातां त्वच्छीर्षी सविधि तयिं ऊनैक पडलें ॥
तदा भोगीशायी निजनयनकंजार्पण करी ॥
त्रिलोका भक्तीच्या अतितर बळें पालक हरी ॥ २० ॥

जरी निद्रा घेती क्रतु, करुनियां जागृति परी ॥
फळें द्यायासाठीं वससि वृषभेशा स्मर-अरी ॥
मिळे कैसें यज्ञोत्थित सुफल तें दोष घडतां ॥
मिळे तें भक्तीनें श्रुतिविधिपथें कर्म करितां ॥ २१ ॥

क्रियाकर्तव्यीं जो अतितर पटू दक्ष असुनी ॥
मखस्वामी तैसा मुरहनन, ऋत्वीज सुमुनी ॥
सदस्यांचे ठायीं सुरगण, परी सिद्ध न मख ॥
जहाला, त्वत्‌श्रद्धाविहिन म्हणुनी तो विनमुख ॥ २२ ॥

करी जैं अंभोजासन निजसुतापृष्ठिं गमन ॥
कुरंगी ती होतां विधि हरिणरूपासि धरुन ॥
त्यजूनी लज्जेतें दिवि समयिं त्या तूं धनु करीं ॥
धरूनीयां व्याधेव म्हणुनि सपत्रा अजवरी ॥ २३ ॥

प्रशंसा लावण्यीं निज मनिं धरी पंचविशिख ॥
तयातें दग्धीला तृणसम तुम्ही निर्जरमुख ॥
स्त्रियाधीनी मानी तुजासि गिरिजार्धांगिं करितां ॥
महा वैरागी तूं, बहुत असती मुग्ध वनिता ॥ २४ ॥

स्मशानीं क्रीडेतें सतत करिसी भूतनिकरीं ॥
चिताभस्मालेपा रचिसि अति मोदें स्वशरिरीं ॥
अनंगा दाहीसी, धरिसि नृकरोटी निजकरीं ॥
अमंगल्याचारी स्वजानिं वससी मंगल परी ॥ २५ ॥

समीरातें तैसें मनहि सविधीनें अकळिलें ॥
विलोकूनी तत्त्वा मग शरिरिं रोमांच उठले ॥
प्रमोदाश्रू येती बुडुनि अमृताचे हृदिं जसे ॥
खरें जें तें तत्त्व स्मरहनन तूं एकचि असे ॥ २६ ॥

गभस्ती सोम क्ष्मा अनिळ अनल व्योम सलिल ॥
तसा आत्माही तूं पृथक पृथक छिन्न सकल ॥
असें वाणी कात्यायनिपति तुझे ठायिं गणते ॥
परी तूझ्यावीणें मजासि नाचि तें काय कळतें ॥ २७ ॥

श्रुती वृत्ती तैसे अमर भुवनें हे त्रयमिति ॥
मकारोकारादि त्रयचि विकृती वार्णि असती ॥

समग्रा याहूनीं परि पृथक तूं धाम चवथें ॥
तुझें तुर्या हें जें गिरिवरवरा ॐ सुपद तें ॥ २८ ॥

प्रणाम त्वत्पादीं वृषवरपते शर्व भव हे ॥
तथा हे ईशानेश्वर भयद रुद्रावनिप हे ॥
त्वदीया ती पूताष्टक पठति वेदामरजन ॥
प्रकाशाच्या धामा प्रणतहितदाष्टांगिं नमन ॥ २९ ॥

महायोगिश्रेष्ठा धवलगिरिकांता त्रिनयना ॥
अतीदूरा भर्गा अतितरलघू मारहनना ॥
अतीदीर्घा देवा अतितरुण संपूर्णशारिरा ॥
अतिश्रेष्ठा तूतें नमन करितों जोडुनि करा ॥ ३० ॥

जगोत्पत्ती-कालीं रजगुण विभो चित्तिं धरिसी ॥
जगाच्या संहारीं तमगुण तसा दीप्त करिसी ॥
जगातें पालाया हृदयिं वरिसी सत्त्वगुण तो ॥
असा त्रीरूपी तूं भवहर तवांघ्रीस निमितों ॥ ३१ ॥

मम मन कृश तैसें साहि नित्य व्यथेतें ॥
मग तव गुणसत्यप्रौढता वाणि कां तें ॥
चकित बहु परी मद्भक्ति संप्रेरणेनें ॥
तव पदकमलार्चा वाक्यपुष्पांजलीनें ॥ ३२ ॥

जरि तव गुण शंभो लेखना पत्र धात्री ॥
करुनि अगम आली कज्जला सिंधुपात्रीं ॥
सुमनसतरुशाखा लेखनी, शारदा ते ॥
निशिदिनिं लिहितांही लीहिले जाति ना ते ॥ ३३ ॥

सुरमुनिदनुजादी पूजिती चंद्रमौली ॥
सकलगुणयशानें श्रेष्ठ जो ईश शूली ॥
प्रणुति करि तयाची पुष्पदंताभिधान ॥
रुचिर अलघुवृत्तें देति त्या सुज्ञ मान ॥ ३४ ॥

प्रतिदिनिं अतिवंद्य श्रीमहेशस्तवातें ॥
पठति परम भावें मर्त्य जे शुद्ध चित्तें ॥
वसति सतत कैलासाद्रिठायीं शिवेव ॥
धनतनययशादी लाधती होति शैव ॥ ३५ ॥

शूलीपरी नाहिं देव ॥ महिम्ना तुल्य न स्तुती ॥
अघोरा तुल्य ना मंत्र ॥ कळे तत्त्व गुरुकृपें ॥ ३६ ॥

दीक्षा दान योग तीर्थ ॥ ज्ञानयागादि सत्क्रिया ॥
न कला षोडशांशेंही ॥ महिम्नस्तोत्रपाठका ॥ ३७ ॥

कुसुमदशननामा भूप गंधर्ववंशी ॥
सतत विमल चित्तें तो भजे शंकरासी ॥
परि निजगुरुरोषें भ्रष्ट झाला तयातें ॥
मग करि सुपवित्रा या महिम्नस्तवातें ॥ ३८ ॥

मत अमरमुनीतें दायक स्वर्गमुक्ती ॥
पठति मिलित हस्तें शुद्ध चित्तें सभक्ती ॥
शिवसमिप वसे त्या किन्नरादि स्तवीत ॥
स्तवन विफल नोहे पुष्पदंतप्रणीत ॥ ३९ ॥

हें स्तोत्र दिव्य विरची नृप पुष्पदंत ॥
संपूर्णकिल्बिशविनाशक जें पसंत ॥
होवो महेश्वरमना नर कंठ पाठ ॥
केल्या तया सतत रक्षिल नीलकंठ ॥ ४० ॥

शंभुतत्त्वा न मी जाणें ॥ आहे कैसा महेश्वर ॥
जैसाची तो असे तैसा ॥ भावें नमस्कार माझा ॥ ४१ ॥

झालें संपूर्ण हें स्तोत्र ॥ महापुण्यप्रदायक ॥
वर्णना ती मनोहार ॥ उपमा ती नसे जया ॥ ४२ ॥

ही वाङ्मयी शूलिपूजा ॥ भक्तियोगें मया कृता ॥
अर्पितोंची तया पादीं ॥ होवो संतुष्ट शंकर ॥ ४३ ॥

आर्या.

प्राकृतिं महिम्ननुतिही करी महादेवशास्त्रिसाह्यानें ॥
कृष्ण सदाशिव भावें, सकलहि नाशोत किल्बिषें यानें ॥४४॥

प्रकरण ११ वें.

रामराजविकल्पनिरसन कथा.

साकी.

वंदुनि आधीं विनायकाच्या मंगलदायक चरणीं ॥
नाशी स्मरतां विघ्नसमूहा अगाध ज्याची करणी ॥
॥ध्रु०॥ देवो मज सुमती ॥ जोडुनि कर ही त्या विनति ॥१॥

वसंततिलका.

श्रीपंढरीनगरिंचा द्विज सुज्ञ एक ॥
द्रव्यार्जना भ्रमतसे नगरीं अनेक ॥
विद्यापुरीं गमन तो करि कांहिं काळें ॥
दाता असे नृपति तेथिल आयकीलें ॥ २ ॥

इंद्रवज्रा.

भेटी नृपाची अपणास व्हावी ॥ ही वासना द्वारजनास दावी ॥
ते सांगती जाउनि भूपतीला ॥ द्वारीं दरिद्री द्विज एक आला ॥३॥

साकी.

भूपाज्ञेनें तो प्रासादीं द्विजवर सत्वर गेला ॥
शुभमंत्रान्वित आशीर्वादें नृपती तोषित केला ॥
॥ ,०॥ ऐकुनि तव कीर्ति ॥ आलों मी याचक वृत्ती ॥ ४ ॥

इंद्रवज्रा.

सत्कारुनी आसनिं बैसविला ॥ थांबा ह्मणे देइन दक्षणेला ॥
श्रीदेविचें पूजन तैं कराया ॥ संगें द्विजा घेउनि जाय राया ॥५॥

शार्दूलविक्रीडित.

राजाई कुलदेवता नृपतिची, विस्तीर्ण तन्मंदिरीं ॥
पुष्पांच्या वटिका अनेक रुचिरा साधीयल्या कूसरी ॥
ठायीं ठायिं जलौघ निर्मल अति स्वादूदकें वाहती ॥
हेमाचीं शिखरें विखंडिति नभा, तेजें रवी झांकिती ॥ ६ ॥
पाचूचे माणि कोंदणीं सुजडणी केली सुसिंहासनीं ॥
त्या स्थानीं गगनीं दिसे उडुगणीं जैसी कवी चांदणी ॥
तैसी श्रीजगदंबिका नृपति तो दावूनि विप्राप्रत ॥
बोलेची मदभाषणीं त्रिभुवनीं नाहीं असें दैवत ॥ ७ ॥
पूजा मी स्वकरीं करीं, प्रतिदिनीं नैवेद्य नानापरी ॥
दावीं मी, जनही तसे नगरिंचे पूजीति शुद्धांतरीं ॥
ऐसे हे उपचार पंढरिवरा कोठूनि हो लाधती ॥
निर्द्रव्य द्विज याचना करुनियां देवासि त्या पूजिती ॥८॥

इंद्रवज्रा.

गर्वोक्ति ऐकूनि नृपाननाची ॥ कोपा चढे वृत्ति तया मनाची ॥
श्रीपांडुरंगाप्रति निंदियेलें ॥ जाणूनि चित्तीं मग काय बोले ॥९॥

यूथिका.

लाविलें रजत मंदिरिं जाणुनी ॥ घेसि तूं महति ते मनिं मानुनी ॥
विठ्ठलासम न ही तव देवता॥आयके तुजसि मी कथितों अतां १०

साकी.

पंढरपुरिंचीं सकलहि सदनें कांचनमय तीं असती ॥
मार्गोमार्गीं खड्यांपरी कीं पसरलिं माणिक-मोतीं ॥
॥ध्रु०॥ महिमा पंढरिचा॥ कथनीं शक्य न ही वाचा ॥ ११ ॥
सर्वहि पादपगुल्मलतादिक असती ते सुरतरु ची ॥
देवालयिंचीं महान शिखरें झांकिति रुचि चपलेची ॥
॥ ध्रु० ॥ महिमा पंढरिचा॥ कथनीं शक्य न ही वाचा॥१२

पावन भीमा भागिरथीपरि क्षेत्रीं निर्मल वाहे ॥
विधिहरिशंकरवृंदारकगण सदैव तेथें राहे ॥
॥ ध्रु० ॥ महिमा पंढरिचा ॥ कथनीं शक्य न ही वाचा ॥ १३ ॥

ठायीं ठायीं हरिसंकीर्तन होतें वासररजनी ॥
प्रेमानंदें नाचति वैष्णव होउनि तल्लिन भजनीं ॥
॥ ध्रु० ॥ महिमा पंढरिचा ॥ कथनीं शक्य न ही वाचा ॥ १४ ॥

शार्दूलविक्रीडित.

राजाई तव देवता प्रतिदिनीं श्रीमंदिरीं येउनी ॥
घेऊनी निज हस्तकीं करितसे संमार्जना मार्जनी ॥
नाहीं देखिलि पंढरी तंववरी मानीसि या देवितें ॥
श्रेष्ठा दैवत विठ्ठलासम परी त्रैलोक्यि या नान्य तें ॥ १५ ॥

वसंततिलका.

कुत्सा गिरा परिसुनी नृप कोप दावी ॥
मिथ्या वृथा महति ती किति रे वदावी ॥
नाहीं कधीं परिसिली पुरि पंढरी ती ॥
हेमान्विता मजसि दाखवि सत्वरी ती ॥ १६ ॥

भुजंगप्रयात.

जरी ये तुझ्या मिथ्यता भाषणांत ॥ तरी मूकासि स्वासुला तूं क्षणांत ॥
वदोनी असें पंढरीतें निघाला ॥ पडे भीतिचा विप्रचित्तांत घाला ॥

दिंडी.

ह्मणे पंढरिच्या पती देवराया ॥ भूप येतो हा पंढरी पहाया ॥
मी कथील्या परि दिसेन ती त्यासी ॥ करिल हानी प्राणासि निश्चयेंसी

कामदा.

धांव सत्वरी पंढरीपती ॥ रक्षि गा अतां या दिनाप्रती ॥
द्रौपदी सती बाहतां तुला ॥ अंबरावतारासि घेतला ॥ १९ ॥

आर्या.

जैसी साधुवरांनीं वर्णियली पूर्वीं पंढरीरचना ॥
तैसीच म्यां कथीली यास्तव लागो न दोष मद्वचना ॥२०॥

साकी.

प्ऱ्हादाचे वचनीं देवा स्तंबीं अवतरल्यासी ॥
वदलों थोरी भूपा तुझिया धरुनी अभिमानासी ॥
॥ध्रु०॥ मिथ्या ती न करी॥ हो दासाचा कैवारी ॥२१॥

शार्दूलविक्रीडित.

संतांचे वचनापरी न दिसली देवा तुझी पंढरी ॥
येतो बाध तरी तया वचनिं या चित्तीं विचारा करी ॥
कोणीहि मग ते तुला न भजती, देवत्व तें राहिलें ॥
अंगीं काय तुझ्या, वदे प्रभुवरा, रक्षी ब्रिदा आपुले ॥२२॥

आर्या.

मद्भाषणीं न येवो देवाजी गौणता कदा माला ॥
किमपिहि न अशक्य तुला दिधली कांचनपुरी सुदामाला ॥२३॥

कामदा.

पावसी न या संकटीं जरी ॥ प्राणहानि मी निश्चयें करीं ॥
कीर्तिला तुझ्या डाग लागतो ॥ ना घडो असें हेंचि मागतों ॥२४॥

चामर.

भक्तकाज-कल्पवृक्षसंघ पंढरीपती ॥
ऐकुनी तदीय वाणि रुक्मिणीस बोलती ॥
संकटार्त विप्र पंढरीचि थोरि वानुनी ॥
जाहला, यदर्थ हो तदीय सिद्ध रक्षणीं ॥ २५ ॥

पृथ्वी.

द्विजें कथियल्या परी करि अतां पुरी पंढरी ॥
उणें तिळभरी कुठे नचि पडो तिथे सुंदरी ॥

विलोकन करावया नरपती स्वयें येतसे ॥
विकल्प मनिंचा करीं सकल दूर होईलसें ॥ २६ ॥

साकी.

'आज्ञा प्रमाण मजला देवा' देवी ऐसें ह्मणुनी ॥
पंढरपुरिंची रचना करि ती न दिसे जैसी भुवनीं ॥
॥ ध्रु० ॥ महिमा पंढरिचा ॥ कथनीं शक्य न ही वाचा ॥२७॥

दिंडी.

सचिवसेनासह शीघ्र रामराया॥ येइ पंढरिच्या समिप भाग ठाया॥
पाहुनीयां कांचनापरी कांती॥भूप झाला विस्मीत फार चित्तीं ॥२८
मंदिराचे झळकती कळस भिंती॥जेवि इंदूच्या भोंवती ऋक्षपंक्ती ॥
फडकताती ध्वजसंघ कांचनाचे॥मेघसमुदायीं वीज जसी नाचे २९

इंद्रवज्रा.

विप्रें कथील्याहुनि तैं विशेषीं ॥ शोभा दिसे पंढरिच्या प्रदेशीं ॥
होऊनि गर्वातित रामराया ॥ साष्टांग वंदी प्रभुराज-पाया ॥ ३० ॥

भुजंगप्रयात.

ह्मणे बोलिलों गर्व चित्तीं धरूनी ॥ कृपादृष्टितें रक्षि आतां करूनी ॥
चला सत्वरी पांडुरंगालयासी॥असें प्रार्थि तो बद्ध हस्तें तयांसी ३१

साकी.

सकलहि मग ते शीघ्र गतीनें श्रीदेवालयिं आले ॥
देवालयिंची सुंदर रचना पाहुनि तोषित झाले ॥
॥ ध्रु० ॥ महिमा पंढरिचा॥ कथनीं शक्य न ही वाचा॥३२॥

वसंततिलका.

वृंदावनें कनक-माणिक-पाचु-युक्त ॥
संकीर्तना करिती वैष्णव साधुसंत ॥
वाद्यांसि वाजविति मंजुलतालगीतीं ॥
नामध्वनी गजर दीर्घ महा करीती ॥ ३३ ॥

मंदाक्रांता.

श्रेष्ठ द्वारीं जयविजय ते शोभती भानु साम्य ॥
मध्यागारीं मणिजडित ती स्तंभपंक्ती सुरम्य ॥
ब्रह्मेंद्रादी सकल सुर ते दर्शना तिष्ठताती ॥
रिद्धी सिद्धी निज मृदु करें मंदिरीं झाडिताती ॥ ३४ ॥

शार्दूलविक्रीडित.

त्यांमाजी कुलदेवता नृपतिची राजाइ झाडी करीं ॥
देखूनी नरपाल ती निजमनीं आश्चर्य मोठें करी ॥
बोले ती मृदुभाषणीं नरवरा, दासी अहो सर्व या ॥
आह्मी विठ्ठलपायिंच्या, नचि धरी कांहीं मनीं संशया ॥ ३५ ॥

साकी.

होउनि विस्मित भूपति चित्तीं पाहे मंदिरिं पुढती ॥
तों सकलहि नरनारी तेथिल चतुर्भुजा त्या दिसती ॥
॥ ध्रु० ॥ महिमा पंढरिचा ॥ कथनीं शक्य न ही वाचा ॥ ३६ ॥

स्वागता.

राउळांत मग भूपति गेला ॥ तेथिंची सहन दीप्ति न त्याला ॥
होय, विप्रकर तो धरि हातीं ॥ कौतुका सकल लोक पहाती ॥ ३७॥

मालिनी.

कटिकरधृत मूर्ती सांवळी गोजिरी ती ॥
विधि हरि हर जीचें ध्यान चित्तीं करीती ॥
बघुनि नृपति वंदी जोडुनीयां करातें ॥
दृढतर मिठि घाली धांवुनियां पदातें ॥ ३८ ॥

शिखरिणी.

ह्मणे देवा रक्षी करुनि अनुकंपा मजवरी ॥
न जाणूनी निंदा खचित घडली कीं मदभरीं ॥
विकल्पाचा झाला सकल परिनें नाश मनिंच्या ॥
नुपेक्षा या दासा पळहि करुणाब्धे चरणिंच्या ॥ ३९ ॥

आर्या.

तो रामराय झाला श्रीविट्ठलपादपद्मिंचा दास ॥
प्रेमें ती सुरस कथा पावे गाऊनि कृष्ण मोदास ॥ ४० ॥

प्रकरण १२ वें.

सत्संगति.

आर्या.

तीच खरी सत्संगति, होतांची दुर्मतीस जे विरवी ॥
विध्वंसी उदयातळिं येतां तमघनततीस जेवि रवी ॥ १ ॥
मदमोहकोपमत्सर हरुनि तसा लोभदंभ दे शमता ॥
ती घडलि जयाप्रति तो निंदिल कां सज्जना स्वदेशमता॥२॥
सत्य ज्ञानप्राप्तिस हरूनी अज्ञानमोह हृदयाचा ॥
करि, त्यापरि दिनरजनी सप्रेमें वांच्छि संग सदयाचा ॥३॥
मिथ्या विवाद भाषण न करी आल्याहि अंतकालघडी ॥
साक्षि न असत्य कधिं दे, सादर निजगुरुपदांबुजा रगडी॥४
जी जन्ममृत्यु-फेरे चुकवुनि संसारबंध ना शिववी ॥
बुडवी परमानंदीं प्रसु जैसी आत्मनंदना शिव वी ॥ ५ ॥
सज्ज्ञानशक्तियोगें दावी संपूर्ण विश्व हें क्षरसें ॥
दे पुष्टि ईशभक्तिसि, ये देहा पुष्टि जेवि इक्षुरसें ॥ ६ ॥
साम्यत्व सर्व भूतीं देते, मनिंचे कुतर्क हरवीते ॥
भिन्नत्व न उरवि जसी छाया स्थल भिन्नता न मह रवि ते ॥७॥
साधुत्व अंगिं येतें, पसरवि जगमंडळीं समज्ञा ते ॥
घडतां मानिति सर्वहि त्या सज्जनमंडळीसम ज्ञाते ॥ ८ ॥

वळवी सदाचरणपथिं, दे गति वर्णावयास हरिवरता ॥
देह क्षणिक गणि जसा बुद्बुद तो वारिच्या लहरिवरता ॥९॥
दुर्धर मायाजाला खंडी, पाखंड भाषणा न करी ॥
वागे अति शांतपणें निशिदिनिं मद्गत जसा महान करी ॥१०॥
हृदयीं वसे सदयता, देखुनियां अन्य दुःख कळवळतो ॥
तत्साह्रिं वळे, जैसा निजसुतसाह्यार्थ तातकल वळतो ॥११॥
अन्यीं उपकार करी, परजायापरधनीं न मन वळवी ॥
सुपथें काल क्रमुनी अंतीं सायुज्य मुक्तितें मिळवी ॥ १२ ॥
ऐसी जी सत्संगति देवा करुणाकरा जगज्जनका ॥
कृष्ण ह्मणे, मजला ती घडवाया अर्जुनि होसि सज्ज न कां १३

प्रकरण १३ वें.

जटायु–उद्धार.

आर्या.

वधुनी कनकमृगातें करिती उटजासि रामलक्ष्मण ॥
आगमन अरण्यांतुनि लावुनि सीतेकडे स्वचक्षु-मन ॥ १ ॥
जाती सुमंद गतिनें जासि धृतजलकुंभ गर्भिणी जाते ॥
होता हेतु कवि ह्मणे मंदगतीचा दुजाचि परिसा ते ॥ २ ॥
श्रीराम मृग वधाया येतां तत्पादधूलिका मुक्ती ॥
देइल आह्मां ह्मणुनी गुप्तत्वें वसति साधुंच्या पंक्ती ॥ ३ ॥
व्हाया पूर्ण तदिच्छा जाती श्रीराम मंदशा गतिनें ॥
न महातपें मिळे तें मिळतें यत्पादरेणुसंगतिनें ॥ ४ ॥

होती अपशकुन बहू, झाले जड मार्ग चालतां चरण ॥
होते फुल्लित तरु ते स्वीकारिति अप्रफुल्लिताचरण ॥ ५ ॥
पक्षी रोदन करिती, दिसती बहु मंद त्या दिशा दाहा ॥
अपसव्य वायस उडे, सुच्छाया करित अग्निसम दाहा ॥६॥
देखति आश्रमिं येउनि तो दिसला शून्य फार भणभणित ॥
भयदायक जेंवि दिसे सरसीस्थल नीरहीन ठणठणित ॥ ७ ॥
न दिसे सीता तेथें दिसती तैसे न वन्य वाडव ते ॥
राम ह्मणे, नसतेंची विपरित कालांत विघ्न ओढवतें ॥ ८ ॥
त्यागूनि आश्रमातें गेली ती मत्प्रिया कुठे जाया ॥
जीचें मम आज्ञेविण गेहाबाहिर फुटे हृदय जाया ॥ ९ ॥
प्राणाविणें कलेवर अथवा तें नासिकाविणें वदन ॥
शोभायमान न दिसे जैसेंची संततीविणें सदन ॥ १० ॥
कंठ गहिवरें भरला, वाहति दुःखाश्रु लोचनामधुन ॥
शांतवि सौमित्र बहू, परि लागे राघवा मना मधु न ॥११॥
आली मूर्च्छा रामा, भूपृष्ठीं पावला तदा पतन ॥
झाला निश्चेष्ट, मनीं सौमित्र ह्मणे अतां बरी गत न ॥१२॥
लावुनि नयनीं जीवन जगजीवन जानकीश सावध तो ॥
करुनी सौमित्र ह्मणे, सीता हरित्यास कीटसा वधतों ॥१३॥
देवादिदेव राघव यन्नामातें जपे सदाशिव तो ॥
स्त्रीहरणमोह त्यातें ज्ञाते बुध हो वदा कदा शिवतो ॥ १४ ॥
परि अवतार सुलीला केले दावावयासि जगता ते ॥
वेषानुरूप वर्तन करणें विहितचि ह्मणूनि जगतातें ॥ १५ ॥
सौमित्र ह्मणे, रामा पुसुं निकटींच्या द्रुमा नगा नभगा ॥
देखिलि कां तुह्मी ती जी धृतबहुविद्रुमानगा सुभगा ॥ १६ ॥
राम ह्मणे, जाउनियां संपादूं भूमिजा-समाचारा ॥
जी बहु निर्मल पूता श्रीवैकुंठांघ्रिजासमाचारा ॥ १७ ॥

निघती शोधार्थ वनीं ते दोघे विष्णुशेष-अवतारी ॥
पदचारी अनवाणी, बुध हो यत्पादधूलि भव तारी ॥१८॥
गिरिकंदरीं वनोवनिं 'सीते सीते' ह्मणूनि बोलविती ॥
ते करुणारव वनगतजंतूदरिं दुःख फार कालविती ॥ १९ ॥
येउनि गोदातीरीं पुसती चातकमयूरकेकांतें ॥
'देखिलि कां भूमिसुता, सांगा सत्वरि' असें अनेकां ते ॥२०॥
शार्दूल-सिंह-जंबुक-वृक-नकुल-कुरंग-दंति-शशकांला ॥
पुसती सीतावृत्ता नाना परिनें तथाहि मशकांला ॥ २१ ॥
देती न प्रत्युत्तर त्यांवरि कोपूनि तो ह्मणे अनुया ॥
आणी शरचापातें, खंडिन उत्तर न देति तत्तनु या ॥ २२ ॥
सौमित्र ह्मणे, रामा हे केवी जाणती तुझी रमणी ॥
धीर मनीं स्वल्प धरी, कथणें हें तुजासि काय वीरमणी ॥२३॥
सीताविरहें राघव भुलुनि ह्मणे लक्ष्मणासि, 'तूं कोण ॥
कां मन्निकटिं उभा रे' ऐसें गतशुद्धि मान तूकोन ॥ २४ ॥
तेव्हां सौमित्र ह्मणे, 'मी बांधव वेदवंद्य रामाचा' ॥
'राम कवण' राम ह्मणे 'जो ठावचि साधुच्या विरामाचा॥२५॥
भंगी शिवकार्मुक जो-' राम ह्मणे 'भंगिलें कुठे सांग' ॥
कथि सौमित्र पुन्हा तैं 'जनकाच्या मंडपीं' यथासांग॥२६॥
'कोण जनक कोणाचा कवणचि' हें कथि मला अधीं भावा॥
'जो जनक जानकीचा' परिसुनि 'ते जानकी कुठे दावा'॥२७॥
'हा सीते गुणसरिते कनकलते जासि त्यागुनी मज का ॥
रुचलें हें केवि तुला, त्यजती न कधीं सुदेवता भजका' ॥२८॥
सीताविरहें मूर्च्छा येउनि रघुपति पडे महीवरते ॥
सांवरि सौमित्र, जसी लघुशिशुची माय मान सांवरते ॥२९॥
जाउनि अस्ता दिनकर होतां निशि इंदु येइ उदयाला ॥
राम ह्मणे 'हा तापद तपन महा तापि, तापवी याला' ॥३०॥

तैं उर्मिलावर वदे, ‘ रामा तापद न हा सहस्रकर ॥
भासे तुला प्रियेच्या विरहें परि हा सुतीक्ष्ण शीतकर’ ॥३१॥
श्रुतिवंद्य देवदेवचि तैसा तो अजित अज अनादि, परी ॥
दावी नाना लीला जगतातें घेतल्याचि रूप परी ॥ ३२ ॥
आलिंगि पादपलता तैसे पाषणही स्वकीय करीं ॥
हें सत्य कवी न ह्मणे, तत्स्थित मुनि गुप्त त्यांसि मुक्त करी ॥३३
घेऊं अगस्त्यदर्शन, श्रुत करुं या त्याशि वर्तमानाशी ॥
तो नाशिल मद्दुःखा, जैसा चंडांशु तो तमा नाशी ॥ ३४ ॥
येती अगस्त्य-आश्रमिं तों पथ दे द्वारपाल न शिराया ॥
कथि जाउनि तो मुनितें, आला सौमित्र आणि रघुराया ॥३५॥
ज्ञानेक्षणें मुनीतें वार्ता विज्ञात होति ती वनिंची ॥
यतिवेष रावणें कीं हरिलि सुता कपट करुनि अवनीची ॥३६॥
मुनि करि मनीं विचारा, घ्यावी रामाविना न रामाची ॥
भेटी जा परत वदे, परती जी मूर्ति शिवविरामाची ॥ ३७ ॥
येउनि शिष्य कथीती, मुनि-भेट न होय ती तुह्मांसि अज ॥
जाणुनि हृद्गत मुनिचें हांसे मानसिं पयोब्धिवासि अज ॥३८॥
मागें परती पाहुनि कोपे लक्ष्मण मनीं भुजंग जसा ॥
देतां पद पुच्छावरि, वा कर्णीं भल्ल टोचितां गजसा ॥३९॥
हा निर्दय कठिण मुनी, येणें हा श्रीनिवास परतविला ॥
उपडूनि सुरद्रु जसा मूर्खें गेहीं खदीर रुतविला ॥ ४० ॥
पीयूषकुंभ सांडुनि ठेवि जसा आर्ष कांजि-नीराला ॥
वा शर्करा उकिरडीं टाकुनि भरितो सुभाजनीं राळा ॥४१॥
जाणुनि परीस फेकुनि कृष्णोपल संग्रहांत राखावा ॥
किंवा फुंकुनि हलवा प्रीतीनें जेवि धोतरा खावा ॥ ४२ ॥
ऐसें घटोद्भवें या केलें जाणूनि निश्चयें रामीं ॥
हा सुज्ञ म्हणुनि गाणि या दोषार्ह न दोषि तोचि येरा मी॥४३॥

सक्रोध लक्ष्मणमुखा पाहुनि ह्मणतात राम अनुजातें ॥
हा ज्ञानसागर मुनी, न शिवे अज्ञानदोष अणु ज्यातें ॥४४॥
मी निर्विकार निर्गुण सीता सर्वासि कारणीभूत ॥
जागृत करुनी मजसी सगुण करी तेवि विश्व उद्भूत ॥४५॥
शक्तीविणें न मजला थोरी हें जाणतो मुनी स्वमनीं ॥
लावुं नको दोष तया, जाऊं दे कोप तो तुझा शमनीं ॥४६॥
शांतवुनी सौमित्रा मग पंचवटींत येति ते परते ॥
आलिंगि पथिं तरुलता, रामा अन्य न दिसे सितेपरतें॥४७॥
तेथूनि पुढें जातां राक्षसपदाचिह्न मार्गिं त्या दिसलें ॥
कुंकुममंडित तैसें श्रीचें तें हृदयिं भल्लितुल्य सले ॥ ४८ ॥
तैसे नग सीतेचे विस्मित पाहूनि राम सौमित्र ॥
ह्मणति असुरराहूनें ग्रासियला आजि जानकीमित्र ॥ ४९ ॥
ते दिनमणिकुलभूषण जाती शोधीत घोर अटवीतें ॥
अटवीती निजतोषा, प्रसु जसि सुतशोकिं रक्त अटवीते ॥५०॥
तों देखिला दुरूनी रुधिरें चर्चित्त जटायु नभ-चर तो ॥
चरतोचि रामनामा,त्या व्यतिरिक्त न दुजा व्रता चरतो ॥५१॥
निजभक्त न जाणुनि शर मानुनि रिपु राम चापिं तो लावी ॥
खिन्न परी तन्मुद्रा स्वोद्धारीं त्यासि निकट बोलावी ॥ ५२ ॥
जातां समीप रामें आयकिला रामनामरव कानीं ॥
अधि लिप्त तशांत दुज्या खगदुःखें तो विशेष दुःखांनीं ॥५३॥
उरला प्राणचि नयनीं ऐसा निजभक्त देखुनी रामा ॥
आला गहिवर, जैशा गहिवरती तोकमृत्युनें रामा ॥ ५४ ॥
घेउनि अंकीं त्यातें दुःखें जगवंद्य राम शोक करी ॥
नाना परिनें, जैसी प्रेमें माता गतासुतोक करी ॥ ५५ ॥
पुसती जटायुलागीं, झालें बा काय वृत्त सांग मसी ॥
आयकुंदे या श्रवणीं, तूं मजला आत्मतातसा गमसी ॥५६॥

बोले जटायु तेव्हां बहु कष्टें करुनि अल्प मान वरी ॥
'लंकेसि रावणें तव कपटें नेली रघूत्तमा नवरी ॥ ५७ ॥
बहु युद्ध त्यासवें मी करुनी सीतेसि सोडविलि होती ॥
परि तेणें आण तुझी घातलि, मजला न मोडविलि होती ॥५८॥
कोठें तव मृत्यु वदे, माझें मी सांगतों तुला मरण ॥
ऐसें केल्या होइल काय खगा सांग तें अधर्म रण ॥ ५९ ॥
कथिलें म्यां सत्यपणें, मम पक्षां उपडितांचि मृत्यु मला ॥
मग कपटें तो सांगे, पादांगुष्ठासि भंगितां मजला ॥ ६० ॥
वेगें झडपुनि त्याचा भंगीं मी चंचुनें पदांगुष्ठ ॥
झाला तदंत न, परी मत्पक्षा उपडि तो महादुष्ट ॥ ६१ ॥
मी शक्तिहीन पाहुनि गेला घेऊनि ती निशाचर तो ॥
पाहीं मी मार्ग तुझा, आतां मन रूपिं हे तुझ्याच रतो' ॥६२॥
राम ह्मणे पक्षिवरा देउनि तुज पक्ष शीघ्र उठवीन ॥
तव साहाय्यबळें मी वा राक्षसकुल समग्र अटवीन ॥ ६३ ॥
पक्षि ह्मणे, देववरा ऐसा मजला न मृत्यु पुनरपि तो ॥
येइल खाचितचि रामा, त्यजुनि सुधा कांजि काय सुनर पितो ६४
आतां कृपा करूनी निजठायीं शीघ्र या स्विकारा हो ॥
कारा हो विलया ही न्या मानासिं मूर्ति ही सदा राहो ॥६५॥
अवलोकुनि राममुखा सोडी पंचासु तैं विहंगम कीं ॥
रामांकींच, कवि ह्मणे, सागरिं नादिचा जसाचि संगम कीं ॥६६॥
तपनकुलज दशरथनृप साक्षात् श्रीरामतात जो त्यातें ॥
ऐसा न मृत्यु आला, भक्त्यग्रिं न देव पाहि नात्यातें ॥६७॥
बैसुनि हंसविमानीं न्याया ये त्या विधी, नवल काय ॥
तत्स्मरणयुत मृता ये विमान, हा राघवोरुधृतकाय ॥ ६८ ॥
गेला जटायु नाकीं रामकृपेनें क्षणांत उद्धरुन ॥
गाई कृष्ण प्राकृतिं तच्चरिता मुक्तिहेतुतें धरुन ॥ ६९ ॥

प्रकरण १४ वें.

हनुमानभेट.

आर्या.

ये सानुज पंपासरिं सीताशुद्ध्यर्थ चापधर राम ॥
क्षणभरि सौमित्रांकीं करि निद्रा व्हावया श्रमाराम ॥ १ ॥
तैं ऋष्यमूकपर्वतिं असति उभे दीर्घ पांच वानर ते ॥
दिसती प्रदीप्तरुचि ते पाहुनि त्यां अर्यमाप्रभा परते ॥ २ ॥
देखुनि त्या उभयांसी मानसिं सुगलें सुसाध्वसा वरिलें ॥
होता शूर तथापी तच्छौर्यें त्या तदा न सावरिलें ॥ ३ ॥
चित्तिं ह्मणे, वालीनें मानव हे आणिले वधा माझ्या ॥
यास्तव हें स्थल सोडुनि जावें सत्वर न येति धामा ज्या ॥४॥
ऐसा विचार चित्तीं करुनि सुगल तो त्यजूनि शैल निघे ॥
न पुसुनि त्या चौघांही, परि न विहित हें मनास बोलुनि घे ॥५॥
जाउनि सत्वर वेगें थांवविलें त्या बळेंच हनुमंतें ॥
वरिली कां भीति? ह्मणे, भ्यावें प्रचितीविना न धीमंतें ॥६॥
विपरीत काय दिसलें तुजला स्वस्थलिं खरें वदे धीरा ॥
त्यागुनियां भीतीतें सुविचारें निजमनास दे धीरा ॥ ७ ॥
सुग्रीव ह्मणे, दोघे दिसती मानव महाधनुर्धर ते ॥
पाहुनि त्या वीरांतें मन्मानस दीर्घ साध्वसा धरतें ॥ ८ ॥
म्यां स्वप्न देखिलें कीं, दोन धनुर्धर महाप्रताप बली ॥
होउनि साह्य मम रिपू वधती, मत्तनु जयेंचि तापवली ॥ ९ ॥
किष्किंधेचा भूपति करिती मजला, असाचि दृष्टांत ॥
अरुणोदयीं जहाला, परि मन्मानस शिरेचि कष्टांत ॥१०॥

हृदय भयें व्यापियलें यास्तव सोडुनि गृहा वना पळतों ॥
वालि महाखल ह्मणुनी धरवेना धीर मन्मना पळ तो ॥ ११॥
त्यातें समीरनंदन धरुनी हृदयीं ह्मणे, अगा परिसे ॥
चवघे प्रधान आह्मी आहों बलवान शूर केसरिसे ॥ १२ ॥
शिक्षा करूं कृतांता, रक्षूं तुजला निजासु वेंचूनी ॥
थांबवि निज गमनातें, थांबे तद्वचन तन्मना रुचुनी ॥१३॥
हनुमान ह्मणे सुगला, जाउनि मी आणितों उदंताला ॥
त्वां स्वस्थची असावें,दिसतिल जरि रिपु करूं तदंताला॥१४॥
असतिल ते सज्जन जरि, तरि मी तुजला करेंच पालविन ॥
घालविन तुझी भीती, तत्करिं तव शत्रुदीप मालविन ॥१५॥
ते धीर वीर दिसती जैसे चंडांशु आणि शीतकर ॥
मी भेटतोंचि जाउनि त्यां, मग भेटूनि तूंहि सख्य कर ॥१६॥
ऐसें बोलुनि मारुति आला पंपासरीं सुवेगांनीं ॥
येतो त्वरित किती तें कवि ह्मणतो मज न सांगवे गानीं ॥१७॥
सरसीतटवटवृक्षातळिं दोघे स्तब्ध बैसले होते ॥
त्या पादपिं कपि बसतां त्यातें रवितुल्य भासले हो ते ॥१८॥
उड्डाण कौतुकें करि लक्षुनि रघुपतिस वांकुल्या दावी ॥
करि कपि चेष्टा यास्तव कवि ह्मणतो ती कथेंत न वदावी ॥१९॥
रामशिरीं टाकि दलें जशिं शिवलिंगावरीच बिल्वदळें ॥
वाहति भक्त स्वकरें, पाहुनि परि ते न कांहिं त्या वदले ॥२०॥
राम ह्मणे, वानर हा पाहा धृततापनीयकौपीन ॥
अनुजा गमे चतुरसा, तैसा प्रबलहि, तथापि कोपी न ॥२१॥
आठवि हनुमंत मनीं, कथिले होतेचि बोल जे प्रसुनें ॥
ओळखिल गुप्तकौपिन, तो स्वामी तव मनांत हें धरणें ॥२२॥
तें प्रत्ययासि आजी आलें, परि वीर मी बली हि तसा ॥
न तसा हा बहु कोमल, कैसा होईल हा मला हितसा ॥२३॥

शिष्याहुनि अधिक गुरू ज्ञाता असणेंचि हें असे विहित ॥
परि येथ तसें न दिसे, स्वामी हा मम करील केवि हित ॥२४॥
आणुनि मानसिं ऐसें ध्याया अनुभव मनोविकल्पाचा ॥
टाकाया तरुशाखा मोडी, जाणे न आदि कल्पाचा ॥ २५ ॥
टाकी रामावरि तो पाहुनि सौमित्र चापिं चढवि गुण ॥
राम ह्मणे, थांबावें, पाहूंया माय काय पढवि गुण ॥ २६ ॥
ऊर्ध्ववदन राम निजे, आली शाखा तदा उरावरती ॥
रामें तैं कोदंडें करुनी ती उडविली चुरा वरती ॥ २७ ॥
टाकी मग उपल तरू, तोडुनि वरचे वरीच उडवीले ॥
तेच न उडवि, कवि ह्मणे, शौर्याब्धिंत तद्विकल्प बुडवीले ॥२८॥
टाकि पुन्हां पांच गिरी करुनी बहु गर्जना महानिनदें ॥
प्रभु न उठे परि हासे, काय तया तो क्षणांत हानि न दे ॥२९॥
तैं अल्प शर-पिसारा लागे तो वायुतनयदेहातें ॥
जाउनि उडूनि तेणें भ्रमत पडे तो निराळ गेहातें ॥ ३० ॥
मारुतचक्रीं पडतां जेवि तृण न ये महीतळीं परतें ॥
वातात्मज तो तैसा भ्रमण करित राहिला तदा वरतें ॥३१॥
झाला कासाविस बहु पाहुनि तत्तात त्या धरी हृदया ॥
कुरवाळुनी म्हणे, वा जा रामा शरण तो करील दया ॥३२॥
परिसुनि तातवचातें तो मग साष्टांग रामपदिं नमना ॥
करुनी प्रार्थी विनयें, देवा मम मंतु आणि तूं न मना ॥३३॥
रामें आश्वासुनियां धरिला हृदयीं, सुता जसी जननी ॥
शीर्ष अवघ्राणुनि मग कुरवाळी प्रीतिनें करें वदनीं ॥३४॥
श्रीराम ह्मणति, वीरा सजीव शशिसूर्य तोंवरी राहे ॥
अपयश दूषण न शिवो कल्पांतींही तुझ्या शरीरा हे ॥ ३५ ॥
घेउनि मग रामाज्ञा आला सुगलासमीप हनुमंत ॥
सांगे उदंत सर्वहि परिसुनि तो तोषलाचि धीमंत ॥ ३६ ॥

मिळुनी सकलहि जाती ते केसरि रामसंनिधानातें ॥
वंदिति तोषित होती पाहुनि त्या राममूर्तिध्यानातें ॥३७॥
दे आशीर्वाद तयां श्रीराघव शेषशायि अवतारी ॥
वंदूनि कृष्ण गाई, त्यातें देवा भवार्णवीं तारी ॥ ३८ ॥

प्रकरण १५ वें.

वालिवध.

आर्या.

श्रीरामपादपद्मा वंदुनि सुग्रीववृत्त साद्यंत ॥
कथि मधुर मृदु सुवचनें जोडुनि कर वायुपुत्र हनुमंत ॥ १॥
परिसुनि राघव म्हणती, न करीं चिंता मनीं महासुगला ॥
फुगला जिंकुनि तव रिपु परि नाशिन निश्चयें रहा उगला ॥२॥
आधीं तव राज्य तुला देउनि ताराहि ती तसि तयाची ॥
करुं मग सीताशुद्धी; हा निश्चय जाण आण पितयाची ॥ ३ ॥
ऐसें बोलुनि रामें चापीं शर ओढिलाचि करकर तो ॥
करतो जगत्प्रलयची मानी ऐसें तदा कपिनिकर तो ॥ ४ ॥
म्हणती, बा हे तव रिपु वधिन अतां मी क्षणांत रोषानें ॥
त्वेषानें केसरिनें धारितां करणेंचि काय मेषानें ॥ ५ ॥
पाहुनि सक्रोध प्रभु धावुनि सुग्रीव तो धरी चरण ॥
प्रार्थूनि सविनय ह्मणे, देवा त्यासी न तूं करीच रण ॥ ६ ॥
वाली महाप्रतापी, जाणे तो रणकलेस अनिवारा ॥
त्याचे संग्रामिं मिळे रणपटुलाही क्षणेक न निवारा ॥ ७ ॥

सन्मुख रण न करी त्या अवचित टाकूनि तीक्ष्ण खग वधि तो ॥
जैसा मृगयाजीवी विपिनीं टपुनी सलक्ष खग वधितो ॥८॥
राम ह्मणति, बा सुगला वाली तव बंधु तो कसा प्रबल ॥
कां वैर तव तयासी, सांगे वृत्तांत हा पुन्हा सकल ॥ ९ ॥
मग वृत्त सुकंठ कथी, परिसा बुध हो सुचित्त देऊन ॥
होऊन शांत हृदयीं, कथनीं कविची मती न हो ऊन ॥१०॥
दुंदुभिनामें पूर्वीं होता महिषासुरात्मज प्रबल ॥
उन्मत मद्यपानी युद्धार्थीं भूवरी भ्रमे सबल ॥ ११ ॥
करणें समर मजसवें, देवा तूं लावणें न गा उशिर ॥
ना तरि जित ह्मणुनि वदे, वा त्यागुनि निज पुरा नगांत शिर ॥
परि त्या समर कराया शूर भट न भेटला महीमाजी ॥
जाउनि यमलोकिं यमा सांगे स्वमुखें स्वकीय महिमा जी ॥१३॥
परिसुनि दंडधर ह्मणे, जरि तुज इच्छाचि रण करायाची ॥
तरि ऋष्यमूकपर्वतिं घे जाउनि भेटि वालि-रायाची ॥१४॥
तो तव मनोरथातें पूर्ण करिल निश्चयें त्वरें जाणे ॥
अवधी पळ न करावी, सहबळ तन्नगरिं सत्वरें जाणें ॥१५॥
आला किष्किंधेसी जैसा मूषक भुजंगसदनातें ॥
जंबुक वा हरिसंगें निज बल नेणूनि येइ कदनातें ॥ १६॥
मारी हांक बळें बहु, परिसुनि तो धांवला बली वाली ॥
जैसा मृगेंद्र पाहुनि वारणसमुदाय झेंप तो घाली ॥ १७ ॥
शत योजनें शरीरी तो दुंदुभि वालिनें पदीं धरिला ॥
भोंवंडिला गरगरा, फिरवी घटकार जेवि तो अरिला ॥१८॥
आपटितां भूमिवरी होती शकलें तया शरीराचीं ॥
जैसी तुंबिफलाची झाली गति त्या तशीच वीराची ॥१९॥
गेले पंचासु तदा त्यागुनि देहा बलिष्ठ दुंदुभिचे ॥
होउनि आनंद सुरां करिती स्वर्गांत नाद दुंदुभिचे ॥ २० ॥

बहु कोपें वालीनें भोंवंडुनि गरगरा कलेवर तें ॥
फेंकून दूर दिधलें प्रथम बलें अपटुनी शिलेवरतें ॥ २१ ॥
दीर्घ शतयोजनें तें पडतां शव शैलपृष्ठभागाला ॥
होते मुनि-आश्रम ते सर्वहि पावति समूळ भंगाला ॥ २२ ॥
त्या शैलशिखरिं वसती मातंगमुनी सशिष्य रविसम रे ॥
त्यांहीं शाप दिला कीं, या गिरिसी स्पर्शतांचि वालि मरे २३
तें कुणप दुंदुभीचें अद्यापि शिलोच्चयीं असे राया ॥
मग दुंदुभितनय मयासुरनामा तात-सूड उगवाया ॥ २४ ॥
आला किष्किंधेसी येतो दीपावरी पतंग जसा ॥
बाहे मृगेंद्र-वालिसि कदन करायासि दैत्य तो गजसा ॥२५॥
तैं वालि वासवात्मज हाणी धांवूनि मुष्टि असुराला ॥
होउनि बहु कासाविस वदनांतुनि तो वमेहि रुधिराला ॥२६॥
पावुनि साध्वस बहु तो विवरपथें नागलोकिं करि गमन ॥
वालिहि तत्पृष्टिं तदा धांवे त्याचें करावया दमन ॥ २७ ॥
विवरद्वारीं रक्षणिं रामा मी बैसलों बहू काल ॥
गंधर्व यक्ष येती किष्किंधा घ्यावयास तत्काल ॥ २८ ॥
राखे कोण नृपाविण, वानर पळती त्यजून नगरासी ॥
सांगति वृत्तांत मला येउनि सत्वर समस्त विवरासी ॥२९॥
लावुनि शिला विवरमुखिं आलों स्वपुरीं समीरसा परते ॥
कटु रस रसज्ञ जैसा सारुनि सत्वर समी रसा परते ॥३०॥
नाशुनि समग्र अरिला केलें म्यां सौख्य त्या समस्तांस ॥
मानूनि आत्मनंदन पोशीं दंडून त्यांस मस्तांस ॥ ३१ ॥
विंशति मास जहाले, परि परता वालि तो स्वगांविं न ये ॥
ह्मणती विवरिं निमाला,बसविति नृपपदिं मला प्रजा विनयें ३२
राज्यारूढ जहालों तों घेउनि वालि ये स्ववैरिशिर ॥
पाहुनि छत्र मम शिरीं ह्मणते त्या तत्कुबुद्धि वैरिं शिर ॥३३॥

कोंडुनि मजसी विवरीं राज्यासनिं बैसलासि रे भावा ॥
इच्छुनि मम घातातें कपटपणें साधिलासि रे दावा ॥ ३४ ॥
अप्रिय बंधु त्यजावा, त्यागावी दुर्मुखांगना सुजनें ॥
अज्ञ गुरु, प्रीतीविण मित्रहि, आहेत ऐसिं श्रुतिवचनें ॥३५॥
ऐसें बोलुनि रागें धांवे घेऊन हस्ति हेतीतें ॥
मग मी पळें धरूनी, पाहुनि हरि जेवि हस्ति, भीतीतें ॥३६॥
नल नील जांबुवंत प्राणसखा हा तसाचि हनुमान ॥
घेउनि मला पळाले, करिती निज मानसीं न अनुमान ॥३७॥
हरुनी राज्य धनातें तेणें हरिलीहि अंगना माझी ॥
कोठें निर्भय ऐसा ठाव न गवसे अम्हां वनामाजी ॥ ३८ ॥
मग ऋष्यमूकपर्वतिं शापभयें वालि ये न जाणून ॥
वसतों सहपरिवारें परि ये षण्मासिं युद्ध योजून ॥ ३९ ॥
दोघेहि समान बली आह्मी, परि तद्गलीं विजयमाला ॥
त्या योगें समरांगणिं देवां युद्धीं कधीं न जय माला ॥४०॥
विषम महा सप्त तरू एक्या विशिखेंचि छेदि वीर बळें ॥
तद्धस्तें वालीचा मृत्यु, असें हें भविष्य कथियेलें ॥ ४१ ॥
परिसुनि रामें चापीं अर्धकलानिधि शरास चढवीलें ॥
अनुजपदांगुष्ठपदें दडपुनि ते सप्तवृक्ष उडवीले ॥ ४२ ॥
दडपि पदांगुष्ठा कां, ऐसें जरि हो ह्मणाल तरि ऐका ॥
तो भूधरावतारी दडपियतां येति रोषिं ते एका ॥ ४३ ॥
सुगल ह्मणे, दुंदुभिचें शव हें उचलील तेवि आत्मबलें— ॥
रामें चरणांगुष्ठें क्षणमात्रें तें दिगंतिं भिरकविलें ॥ ४४ ॥
पाहुनि रामपराक्रम पावे सुग्रीव थोर मोदासी ॥
साष्टांगीं नमुनि ह्मणे, प्रभु या प्रेमा तुझा रमो दासीं ॥४५॥
मग राम ह्मणे सुगला, पाचारी शीघ्र वालिसी कदना ॥
जाउनि किष्किंधेसी धाडूं दे त्यासि दंडधरसदना ॥ ४६ ॥

रामकृपाघनवर्षें चातकसुग्रीव परम आनंदी ॥
होउनि पाचाराया जातां राघवपदांबुजा वंदी ॥ ४७ ॥
किष्किंधेजवळी तो येतां करि मग महा भुभुकार ॥
तेणें दणाणिलें पुर, पुरुहूतात्मजहि दचकला फार ॥ ४८ ॥
घालूनि विजयमाला कंठीं वेगेंचि धांवला सबल ॥
परिसुनि कल्होळ ह्मणे, कोण तया साह्य जाहला सबळ ॥ ४९ ॥
तारा ह्मणे, प्रभुवरा गेला होता कुमार आजि वनीं ॥
परिसे तेथ, सुकंठें साह्या रामासि आणिलें ह्मणुनी ॥ ५० ॥
यास्तव समर कराया पाचारी, परि न लागलेंच रणीं ॥
जावें विचार करुनी, ऐसें बोलूनि लागली चरणीं ॥ ५१ ॥
वालि ह्मणे, गे कांते कुंजरकल्होळ केवि सिंहांनीं ॥
परिसुनि शांत रहावें, वीरांतें होय लघ्नसी हानी ॥ ५२ ॥
चालुनि मृग गृहिं येतां मग शार्दूलें कसें रहावें गे ॥
जाऊं दे मज समरा, तूं सुस्थिर मानसें रहा वेगें ॥ ५३ ॥
आजी रणीं सुकंठा मारिन अथवा मरेन निर्धारें ॥
मरतां स्वर्गीं जाइन, भोगी मग राज्य पुत्रसह दारे ॥ ५४ ॥
मारिन जरि सुग्रीवा, येइन परता तरीच, ह्मणुनि निघे ॥
होतां मृत अंतींची प्राणसखे हीच भेट मानुनि घे ॥ ५५ ॥
ऐसें बोलुनि वेगें सुगलगर्जीं वालिसिंह तो उडला ॥
आदळला तद्देहीं जैसा गिरिवरि महागिरी पडला ॥ ५६ ॥
आवेशें अन्योन्या ताडिति मुष्टिप्रहार वर्मांत ॥
कांपे धरा थरथरा, ते भट पटु मल्लयुद्धकर्मांत ॥ ५७ ॥
तुंबळ युद्ध करिति ते, पाहे राघव दुरूनि गुप्तपणें ॥
दोघेहि समसमानचि दिसती शौर्यें, बलेंहि, दीप्तपणें ॥ ५८ ॥
परि न सुकंठाकंठीं माला पाहूनि अंजनीतनयें ॥
घातलि सुमनाची, तैं केलें उक्तचि समंज नीत नये ॥ ५९ ॥

226724.

हांकें नभ भरलें तैं प्रतिनिनदें कोंदल्या दिशा दाही ॥
सांवरि शेष वसुमती, वाटे बहु भीति देववृंदांही ॥ ६० ॥
झाले जर्जर दोन्ही वीर महा ते परस्पराघातीं ॥
वर्मस्थालिं परि वीयें ताडिति इच्छा धरूनि ते घातीं ॥६०॥
धावरुनि सुगल तदा पाही रामाकडे गळा वळुन ॥
चित्तिं ह्मणे, अद्यापिहि गेलें भोक्तृत्व तें न मावळुन ॥६२॥
तैं रामें भात्यांतुन काढियला चपल शर जशी चपला ॥
सोडी सलक्ष वेगें, तेणें सुगलारि वालि तो खपला ॥६३॥
अंतसमय वालीचा पाहुनि मग राम ये तया सरिसा ॥
परिसा तयासि बोले शक्रात्मज तैं सुवाणिनें परिसा ॥६४॥
तूं एक-पत्नि-बाणी-वचनी ह्मणवीसि आपणा जगतीं ॥
मोडुनि त्या नेमातें वरिली अपकीर्ति कां अशी मग ती॥६५॥
केला अन्याय न तव, परि तूं अनयें शरा अकस्मात ॥
टाकिसि मजवरि कपटें, आहेसी दूषणार्ह तस्मात ॥ ६६ ॥
तूं रणपंडित रामा जाणसि संपूर्ण युद्धनीतीतें ॥
पाचारितां न मजसी वरिली कां जाणुनी अनीती ते ॥६७॥
राघव ह्मणे प्लवंगा, तूं दलभक्षक वनस्थ अविचारी ॥
बंधुस्त्री-अभिलाषी, ऐशातें कोण युद्धिं पाचारी ॥ ६८ ॥
व्याधानें वनपशुला करणें लागे निमंत्रणा कधिं का ॥
तैसा तूं वनचर रे, बोलसि मूर्खापरी वृथा अधिका ॥६९॥
संहारुनि तुजसम खल अवतरलों साधुसंत ताराया ॥
प्राणोत्क्रमसमयीं तरि धरिं चित्तीं साधुसंतता राया ॥७०॥
परिसुनि भाषण ऐसें झाला हृदयांत वालि सद्गद तो ॥
जोडुनि कर रामातें भावें वंदूनि काय तो वदतो ॥ ७१ ॥
झालों पावन देवा, झाला तव हस्तिं मृत्युलाभ मला ॥
मद्भाग्य काय वानूं, होय न जो विविध साधका विमला ॥७२॥

या मार्गीं भूमिसुता घेउनि गेला दशास्य खल असुर ॥
जेणें लंकादुर्गीं कारागृहिं घातले समस्त सुर ॥ ७३ ॥
म्यां आणिलाचि असता बद्ध करुनि त्या तवाग्रिं रज्जूनें ॥
कक्षीं दाबुनि मागें केलीं म्यां सप्त सागरीं स्नानें ॥ ७४ ॥
बांधूनि पालखावरि खेळविला अंगदास कुतुकानें ॥
तातें वंचुनि नेला, करणें सिंहाग्रिं काय शुनकानें ॥ ७५ ॥
हतभाग्य महापापी रामा मी, मत्करें तुझी सेवा ॥
घडली नाहीं, परि तूं करणें सुकृपा, धरीन मनिं हेवा ॥७६॥
परिसुनि शक्रसुतगिरा राम ह्मणे, तुज अतांचि उठवीन ॥
काढुनि शर वक्षांतुनि, तव साह्यें राक्षसाब्धि अटवीन ॥७७॥
वालि ह्मणे रघुनाथा, ऐसा पुनरपि न मृत्यु येईल ॥
साक्षात् त्वन्मूर्तिपुढें, त्यजुनि सुधा कोण कांजि घेईल ॥७८॥
फेकूनि कोण परिसा परिसा घेई करांत उपला हो ॥
त्यजुनि सुरद्रुच्छाया कंटकतरु-सावली ह्मणे लाहो ॥७९॥
बांधवदुःखें तेव्हां सुगलाचा मुखसुधांशु कोमाला ॥
पाहुनि इंद्रसुतें तत्कंठीं निज घातली सुमन-माला ॥ ८० ॥
तूं धन्य धन्य अनुजा, धन्य तुझें वैर, धन्य तव भक्ती ॥
कोण ह्मणिल वैर तुझें, ज्या वैरें लाधली वरा मुक्ती ॥८१॥
होउनि साह्य समस्तीं आणा सीता दशास्य खल वधुनी ॥
बोलुनि ऐसें स्वासु त्यजि तो श्रीराममूर्ति मनिं धरुनी ॥८२॥
झाला विदेह वाली, नेला बसवुनि विमानिं विष्णुगणें ॥
आली तारा सांगद बहु आक्रंदूनि राघवासि ह्मणे ॥ ८३ ॥
केलें काय अहा हें रामा तूं जाणुनीच विपरीत ॥
सर्वज्ञ सर्वसाक्षी स्वीकारिलि कां स्वयें अनय रीत ॥ ८४ ॥
केला तव मंतु वदे मत्पतिनें काय तो मला आधीं ॥
गुप्तत्वें शर टाकुनि जडाविलि या तनुस कोमला आधी ॥८५॥

तैसाचि एक मार्गण टाकुनि पंचासु ते हरी माझे ॥
तेणें अपकीर्ति तुझी सज्जनमतसी जगीं बरी माजे ॥ ८६ ॥
स्वर्गी पति जातां मग वनितांनीं राहवें न त्यामागें ॥
ऐसा धर्म सतीचा, यास्तव हें तुजसि जाणत्या मागें ॥८७॥
जैसा दीपक जातां मागें कां तत्प्रकाश राहील ॥
मत्तनुही तसि मागें, अंबुलयें सिंधु-ओघ वाहील ॥ ८८ ॥
कवळुनि वालि-प्रेता तारा अत्यंत दुःख शोक करी ॥
झालें ह्मणे न बरवें, आक्रंदे ती धरूनि तोक करीं ॥ ८९ ॥
तैं सीताकांत ह्मणे, करिसी सांगे किमर्थ शोकाला ॥
सरतां तदायु मेला, हा बोल नसे मला, तसा काला ॥९०॥
तारा ह्मणे रघुवरा, वधिलें त्वां, दोष आयुषा देशी ॥
ऋत कां हें सांग मला, जाणुनि केलेंस तोक परदेशी ॥९१॥
साहुं कसें या दुःखा, निजपतिविरहानळें जळे काय ॥
झालें शून्य जग मला, आतां राहूनि मी करूं काय ॥ ९२ ॥
राम म्हणे, प्रेताचें वाली अभिधान, तो तुझ्या पुढतें ॥
पडला जैसा तैसा जा घेउनि त्यास, कां उगा रडते ॥९३॥
तारा म्हणे, तयांतुनि गेला आत्मा निघूनि रघुनाथा ॥
आत्म्याविण देहातें काय करावें वदे दिनानाथा ॥ ९४ ॥
तनु नाशिवंत, आत्मा अविनाशी, जाण सत्य हें तारे ॥
अत एव शोक न करी चिंतुनि हें मानसांत सुविचारें ॥९५॥
तूं स्त्री देहाची वा आत्म्याची, सत्य हें वदे मज गे ॥
देह विनाशि जरी हा तरि तो वनिते सदैव काय जगे ॥९६॥
मायामय लटिका हा खेळ असे नाशिवंत देहाचा ॥
जैसा मृगजल-जलधी भासे, परि तो नसेच कीं साचा ॥९७॥
देहघटीं आत्मा रवि, घटभंगें रविहि भंगला भासे ॥
परि रवि भंगे न कदा, तैसा आत्मा तदंतिं ना नाशे ॥९८॥

प्राशिति अमृत अमृत जे बध तेही प्रलयकालिं मृत होती ॥
जें जें साकार दिसे, तें तें नाशासि जातसे अंतीं ॥ ९९ ॥
ब्रह्मांड पिंडसह हें आहे मिथ्या अशाश्वत परी तो ॥
आत्मा अक्षर शाश्वत, करिसी कां शोक तूं वृथा मग तो॥१००॥
ती राघववचनसुधा, कीं तीं बोधाब्धिचीं महारत्नें ॥
रामें तारेसि दिलीं, मिळति न ज्ञात्याहि जीं बहू यत्नें ॥१०१॥
परिसुनि रामसुबोधा वंदुनि रामा तटस्थ ती तारा ॥
राहूनि उभी विनवी, या दुःखांतुनि मजप्रती तारा ॥१०२॥
श्रीराम म्हणति, तारे मानी वाणी प्रमाण मम भावें ॥
घालुनि सुगला माला वर्तावें त्यासवेंचि पतिभावें ॥ १०३ ॥
तारा ह्मणे प्रभुवरा, हें करणें श्रुतिविरुद्ध नोहे कां ॥
हें काय वदसि भलतें, पुरवावा केवि म्यां तुझा हेका ॥१०४॥
जग काय म्हणेल मला, अनुचित कर्मासि केवि अनुसरली ॥
सरली विचारबुद्धी, म्हणुनी ही या अनुक्तपथिं शिरली ॥१०५॥
अतिनिंद्य कर्म जें तें कथिसि कसा तूं मला करायातें ॥
व्हावें पतिव्रतेनें सिद्ध कसें देवरा वरायातें ॥ १०६ ॥
हें योग्य कसें रामा गमलें तव सांग मानसामाजी ॥
व्यभिचारि वर्तनातें मिळत सतींच्या न मान सामाजीं ॥१०७॥
कोदंडधारि ह्मणती, थोर महा तूं पतिव्रतांमाजी ॥
होशील समस्त जगीं श्रेष्ठ कलानिधि जसा उडूंमाजी ॥१०८॥
अघटित घटना घडवी, स्तंभाविण थांबवी विहायस तें ॥
उदकीं वसुंधरा धरि, स्थिर चर जाच्याचि विग्रहीं वसतें १०९
सर्वाद्य सर्वकर्ता सर्वात्मा सर्वसाक्षि सर्वमत ॥
स्थितिभवनाश करी जो, त्याच्या वचनास कोण ना ह्मणत ११०
राघववचनसुधारस तारा प्राशी करूनि विमल मन ॥
घालि सुकंठाकंठीं माळा ती करुनि शोकभरदमन ॥१११॥

आनंदें कपि उडती, जयजयकारासि दीर्घ ते करती ॥
गर्जति नाना परिनें, त्या निनदें दशहि ते दिशा भरती ११२
श्रीरामकथामृतरसपानानें कृष्ण मानसीं मोदा ॥
पावे, जैसा सेवुनि भृंगसमुह पुष्पमधुरिमामोदा ॥ ११३ ॥

प्रकरण १६ वें.

बिभीषणागमन.

आर्या.

श्रीराम सिंधुतीरा आला, हें वृत्त रावण श्रवणीं ॥
परिसुनि मनीं दचकला, जैसा गज केसरिध्वनिश्रवणीं ॥१॥
येउनि समितिस्थानीं सबंधुभृत्यप्रधान सहतनय ॥
बोले सचिंत चित्तीं तो विंशतिपाणि मानसहतनय ॥ २ ॥
सुज्ञें लघु न ह्मणावें अहि, अरि, अनला, तथैव आधीतें ॥
हानि कदा करि न कळे, संहारावें यदर्थ आधीं तें ॥ ३ ॥
तो सिंधुपैलतीरा आला मद्रिपु ससैन्यपरिवारी ॥
सांगा विचार करुनी कोण तयातें कशापरि निवारी ॥ ४ ॥
येउनि एकाकी कपि जाळुनि गेला क्षणांत नगराशी ॥
वधुनी पिशिताशन बहु पाडियल्या अद्रितुल्य शवराशी ॥५॥
परिसुनि लंकेशगिरा बोलति गर्जूनि सर्व केसरिसे ॥
मारूं चिरडुनि त्यांतें पादांगुष्ठेंचि मत्कुणांसरिसे ॥ ६ ॥

ते वानरनरभल्लचि, भक्ष्य असे आमुचें अगा राया ॥
आले सहजाचि चालुनि दैववशें आमुचे अगारा या ॥ ७ ॥
एकाचि भक्षी सकलां, वीर असे थोरथोर बहु पदरीं ॥
मग कां वृथा शिरावें बलवंतें जाणुनी विलापदरीं ॥ ८ ॥
ऐसें बोलुनि सकलहि घेउनि शस्त्रांसि सिंहसे उठले ॥
तैं मनिं बिभीषण ह्मणे, सकलांचें दैव निश्चयें फुटलें ॥९॥
असतां दूर मृगादन जल्पति जंबूक आत्मशौर्यातें ॥
तैसे महान खल हे नेणुनि निजचित्तिं अन्यवीर्यातें ॥१०॥
कीं मंडुक मिळुनि बहू जिंकूं जाती जसे भुजंगाला ॥
तैसे हे खल, करतिल हंसाच्या काक काय भंगाला ॥११॥
त्यांसि बिभीषण बोले, वांचाल न तुह्मि महा मलिन कपटी ॥
नेणूनि निजबल वृथा करित असां वटवटी अनेक पटी ॥१२॥
धैर्ययशःसंपन्ना लाविति दूषण बळेंचि मतिहीन ॥
गुणगण ते रघुपतिचे वर्णाया शक्य शेषमतिही न ॥ १३ ॥
हनुमान एकलाची येउनियां जाळि सर्वही लंका ॥
गेलि न अद्यापि कशी दशकंठा तव मनांतुनी शंका ॥१४ ॥
त्या समयीं वीर तुझे होते हे कां न, तें कथीं राया ॥
नागविली सकल सभा, शक्रजिता कोंडिलेंचि विवरा या॥१५॥
गेला होता कोठें तेव्हां पुरुषार्थ तूमचा दडुन ॥
आतां शूरत्वाच्या गोष्टी करितां पुढें पुढें उडुन ॥ १६ ॥
का दशकंठ न जाणे आहे हा राम कोण अंतरिं तो ॥
परि युष्मत्संगतिनें राघवपदसेवनासि अंतरितो ॥ १७ ॥
तो वेदवंद्य राघव आद्य अजित अज अगोचर अनंत ॥
यत्सत्यस्वरुपाचा श्रुतिशास्त्रासहि न लागला अंत ॥ १८ ॥
सनकादिक मुनि त्द्दर्यीं ध्याती, तैसा महेशही ध्यातो ॥
कर्ता कारण हेतू, अवतरला जगिं महान योद्धा तो ॥१९॥

जा शरण तत्पदातें, दे त्याची त्यास जानकी नमुनी ॥
सत्कीर्ति मग वरिल तुज, दूषति तैसेंहि जाण कीं न मुनी २०
कोण सुखी नर झाला हरुनी परधन परांगनासदना ॥
तूं श्रुतिशास्त्रपरायण कां तव हें कर्म सांग नाशद ना ॥२१॥
भाषण बिभीषणाचें पीयूषाधिक बहूत रुचिकर तें ॥
न रुचे अरुची जो त्या, जन्मांधा काय भानुरुचि करते ॥२२॥
जैशा अधोमुख घटीं ओताव्या वारिच्या बहू धारा ॥
अथवा गताग्निभस्मीं व्यर्थ जसा घातला बहू वारा ॥ २३ ॥
ये मूर्खमन न सुपथीं बोधियल्या न्यायनीतिशास्त्रासी ॥
तीच गति रावणाची होउनि त्या साधुला बहु त्रासी ॥२४॥
घेउनि तीक्ष्णास्त्र करीं तो त्या साध्वंगिं सिंहसा धांवे ॥
नाचि धांवता तरि तया येतें मनिं आत्महितचि साधावें ॥२५॥
होइल पितृव्यवध, हें शक्रजितें जाणुनीच आवरला ॥
आवरि महात जैसा बहुयत्नें मत्त दंति बावरला ॥ २६ ॥
पुनरपि बिभीषण ह्मणे, सज्जनपद्धति सदैव असति अशा ॥
कथितां न एकदां जरि मूर्ख मनीं घे, पुन्हां कथिति शतशा २७
मी तेवि बांधवा तुज जोडुनि निज कर पुन्हां पुन्हां कथितों ॥
यांतिल सार मनीं घे, जैसा यत्नें घृतेच्छु दधि मथितो ॥ २८ ॥
दशकंठ ह्मणे, व्यर्थचि बडबडसी शत्रुच्याच बडिवारा ॥
ते नर, तच्छौर्य किती, लोहगिरिस काय उडवितो वारा ॥२९॥
मी बलि, मद्बंधु बली, सुतहि बली, मंत्रि तोहि बलवान ॥
या सर्वहि सिंहांच्या समरीं जंबुकसमान ते मान ॥३०॥
शिवगौरीसहितहि तो स्वकरें कैलासशैल हालविला ॥
नागविला नृप शतशा, सकलनृपतिशक्तिदीप मालविला ॥ ३१ ॥
बंदींत घातले सुर, केलेंही पालथें ग्रहां हातें ॥
पाहुनि मच्छक्ति अशी करिती सुर नर समग्र हा हा ते ॥३२॥

तेव्हां बिभीषण ह्मणे, आत्मस्तव कां उगाचि तूं करसी ॥
आत्मस्तवें स्वहानी होय, गमे द्रुत यदर्थ तूं मरसी ॥ ३३ ॥
वालीनें पालखिं तुज बांधुनि उपडा स्वतोक खेळविला ॥
तेव्हां सश्मश्रु तुझा मूत्रानें दशमुखेंदु नाहविला ॥ ३४ ॥
मिथिलापुरीं स्वयंवरिं शिवकार्मुक जैं उरावरी पडलें ॥
वदनीं वमसी रुधिरा, तेव्हां तव शौर्य तें कुठे दडलें ॥३५॥
कपटें सीताहरणीं लक्ष्मणरेषा तुला न लंघवली ॥
होतासि वीर तरि कां करुनी संग्राम ती न आणवली ॥३६॥
मखरक्षणिं बालपणीं त्रिशिरा खरदूषणादि विक्रमि ते ॥
वधिले कुणि सांग खला कां या शौर्यासि लक्ष आक्रमितें ॥३७॥
तूं निर्बल कपटि महा, आला निकटीं स्वदंतकाल खरा ॥
मद्वाक्य तुला न रुचे, रुचतें का स्वादु शर्करान्न खरा ॥३८॥
ते रीस कपि न मानीं, साक्षात् स्वर्गस्थ देव अवतरले ॥
रामा साह्य कराया, यत्स्मरणें अमित पापि भव तरले ॥३९॥
तुजसम दुष्ट खलांसी वधुनी ते भूमिभार हरतील ॥
गोविप्रसाधुसंतां प्रतिपालुनि सुखि महीस करतील ॥४०॥
यास्तव वैर करिं न तूं, करुनी सामासि रक्षि वंशाला ॥
मद्बोल फोल न करीं, अल्प तरी घे मनीं तदंशाला ॥ ४१ ॥
दे रामा परती ती, परतवि रामा ससैन्य निज धामा ॥
घे नामा मुखिं हरिच्या, पुनरपि न करीं अशा अशुभ कामा॥४२
ती वाणि विवेकखणी त्या दुष्टमनीं प्रशेवली न तिल ॥
तन्मृत्यु आडवा ये, कालवशा परत कोण आणतिल ॥४३॥
परिसुनि सुबोधवचनें रावणकोपाग्नि फार तो भडके ॥
जैसा पावक याचकमंत्रान्वित आज्य घालितां धडके ॥ ४४॥
घेउनि शस्त्र करीं तो पुनरपि उठला वधार्थ अनुजाच्या ॥
तों शस्त्र भूवरि पडे, परि मनिं होय न विवेक अणु ज्याच्या ४५

धांवे पुढें तसाची, तें शक्रजितें पुन्हांहि थांबविला ॥
परि वामपदें क्रोधें लत्ताघातें स्वबंधु लांबविला ॥ ४६ ॥
तो शांतिनिधि बिभीषण तिळहि न कोपूनि त्या ह्मणे परिसा॥
दुर्बुद्धि-उपल हृदयीं धरुनी त्यजितोसि मद्वचा परिसा ॥ ४७॥
होइल कुलक्षय पहा, हरितां परवस्तु जाहला कुशल ॥
कोण वदे या जगतीं, दशकंठा अससि तूं महा कुशल॥४८॥
ऐसें बहुपरि बोधी, नायकुनी त्यास ताडि दुर्निनदें ॥
तेव्हां बिभीषणप्रसु येउनि संसदिं तयास काय वदे ॥ ४९॥
वत्सा बिभीषणा, तूं त्यजि यांसी जेवि हंस काकांना ॥
जा शरण रामचंद्रा, घेसी दुःखद निनाद कां काना ॥५०॥
हो लीन रामचरणीं, तारिल तो, तूं न बंधुसम माजे ॥
आलासि मदुदरीं, तरि करि सार्थक आपुलें तसें माझें ॥५१॥
हे जाणुनि विष सेविति, बैसावें यांचिया न संगतिला ॥
रामपरायण तव मति, खलसंगतिचा करी न संग तिला॥५२॥
कोणि कुकर्माचारी सद्गतिला लाधला असा न दिसे ॥
मम जन्म सफल तेणें दिधली तुजला सुबुद्धि जगदीशें ॥ ५३ ॥
यास्तवचि जगज्जीवन जगनायक अज जगन्निवासातें ॥
जा शरण तनमनधनें, देइल निजधामिं तुज निवासातें ॥५४॥
परिसुनि जननीवचना सचिवचतुष्टयसमेत तो उठला ॥
गमला तदा जणूं तो काकगणांतूनि हंसची फुटला ॥५५॥
बोले दशकंठातें, जातों मी आजि राघवा शरण ॥
तूं ज्येष्ठ बंधु ह्मणुनी पुसतों, करि आत्मवंश हा भरण ॥ ५६ ॥
ऐसें बोलुनि उडला सहमंत्री वारिवाहपंथांनीं ॥
पाहुनि तदीशीतें वरिली लज्जाचि ऋक्षयूथांनीं ॥ ५७ ॥
बंधुत्रस्त बिभीषण मार्गीं श्रीरामरामजप करितो ॥
नारायण नारायण नाम मुखिं जसा कयादुसुत धरि तो ॥५८॥

पाहति वानर गगनीं तों पंचासुर महीतलीं येती ॥
कपिभल्लगणाजवळी जोडुनि कर दीनसे उभे होती ॥ ५९ ॥
त्या पांच राक्षसांवरि टाकिति पाषाण भल्ल तरु कपि ते ॥
परि ते स्तब्धचि बसती, छळितां कुटिलें महानही तपिते ॥६०॥
बोलति अनन्यभावें आहों रामांघ्रिपंकजीं शरण ॥
त्याचे कृपा करूनी दावा आह्मांसि शीघ्र हो चरण ॥६१॥
मी रावणानुज, मला ह्मणति बिभीषण, असें तुह्मी समजा ॥
बंधुत्रासें आलों शरण, असें राघवा करा श्रुत जा ॥ ६२ ॥
जाउनि कपि रीस तदा कथिती रामासि वर्तमानातें ॥
परिसति हनुमानादिक करुनीयां ऊर्ध्व आत्ममानातें ॥६३॥
पाहे श्रीराम तदा सुग्रीवाच्या मुखाकडे वळुनी ॥
जैसा शिष्य गुरुकडे शास्त्राचें तत्त्व घ्यावया कळुनी ॥ ६४ ॥
सुगल ह्मणे, ठेवुं नये अंतर्यामा न जाणतां निकट ॥
हा वृद्धाचार असे, यास्तव करणें विचार अधिंच निट॥६५॥
करुनी सेवा कागें उलुकगृहा लाविला अनल जैसा ॥
हा कपटी रजनीचर न कळे केव्हांचि घात करि तैसा ॥ ६६ ॥
मग जांबुवंत बोले, राज्य दिलें वालिचें तुवां सुगला ॥
ही कीर्ति ऐकुनीयां आला हा शरण वाटतें मजला ॥ ६७ ॥
वधुनी दशास्य नृपपद लंकेचें आपणासि लाधावें ॥
ऐशी धरुनी इच्छा त्यजुनी इकडे स्वबंधुला धावे ॥ ६८ ॥
बोले सुषेण, विषमीं येती कामा दुजे न बंधुजन ॥
हा तत्पृष्ठीं रक्षक आला हें उक्तसें गमे मज न ॥ ६९ ॥
रिपुरीति असे ऐसी, धाडुनि कपटी स्वकार्य साधावें ॥
आला तदर्थ हा का, सुज्ञें अधिं सत्य तेंचि शोधावें ॥ ७० ॥
बहु तर्क विचार बहू करिती अन्योन्य ते महाबुद्धी ॥
तैं हनुमंत ह्मणे, म्यां केली लंकेंत भूमिजाशुद्धी ॥ ७१ ॥

दिसला तेव्हांचि मला, आहे हा परम साधु सज्जनसा ॥
दिसतो वरि राक्षस परि अंतरिं माधुरि वसे जसी फणसा ७२
रक्षावे शरणागत, ब्रीद असे हें अनादि तव देवा ॥
सेवा-इच्छा धरुनी आला, त्याचा न साधु करि हेवा ॥ ७३ ॥
रावण महाखलचि तो, तद्बांधव हा खरा, परी न तसा ॥
रक्षःकुलिं उद्भवला, कंटकवनिं जेवि कल्पपादपसा ॥ ७४ ॥
पाचारुनि निकट तया द्या अभय, असें समीरसुत बोले ॥
डोले रामचि न असें, परिसुनि कपि-रीस-वृंदही डोले ॥७५॥
लोचनसंकेत तदा दावी सुग्रीव वालितनयाला ॥
जाउनि बिभीषणा कथि, आला तव भाग्यभानु उदयाला ७६
पाचारिलें तुला बा मेघश्यामें रघूत्तमें रामें ॥
चाल बहु शीघ्र आतां, तरती पापाद्रिसंघ यन्नामें ॥ ७७ ॥
परिसूनि अंगदाची पीयूषाहूनि मधुर ती वाणी ॥
मोद बिभीषणचित्तीं झाला, तो काय कविमती वाणी ॥७८॥
धरुनी करीं करातें येती श्रीरामसंनिधाना ते ॥
पाहुनि तुष्ट बिभीषण होय कृपण जेवि संनिधानातें ॥७९॥
जय जय रघुवीर असें ह्मणुनी लोटांगणासि तो घाली ॥
दंडवत पडे पुढती, वाहति आनंद-अश्रु-ओघाली ॥ ८० ॥
श्रीरामपादपद्मीं विंशतिभुजबंधु अलिपरी जडला ॥
स्तुतिगुंजारव करुनी रामकृपासिंधु माजि तो बुडला ॥८१॥
उठवी प्रेमें प्रभु त्या, ठेवी तन्मस्तकीं स्ववरदकर ॥
आश्वासुनि त्यास ह्मणे, हो अक्षयि जों सुधांशु तिग्मकर ॥८२॥
लंकेचें राज्य करीं, पातालीं जेवि तो बली करितो ॥
हनुमंत प्राणसखा तैसा तुजला स्वचित्तिं मी धरितों ॥८३॥
परिसुनि रघूत्तमगिरा झाला सकलांसि तें महानंद ॥
आनंदभरें लवला गाउनि चरितासि कृष्ण मतिमंद ॥ ८४ ॥

प्रकरण १७ वें.

लडिवाळ प्रार्थना.

आर्या.

अतिमूढ अज्ञ जड मी अज्ञत्वें प्रार्थना करीं भलती ॥
परि द्या अवधान तितें, वाद्यध्वनि जेवि ऐकतां कळती ॥१॥
बहुसुख मानुनि मोक्षीं बहुजन तो मागती तसा मी न ॥
मागें, मज न रुचे तो, दुग्धि न सुख पावतो जसा मीन ॥२॥
मुक्तीस मोक्ष ह्मणती, जगदीशा त्या चतुर्विधा असती ॥
एकाहुनि एक वरा, ह्मणुनि न मज तोषदा जशा असती ॥३॥
जरि लाधली प्रयत्नें मज न गमे ती तथापि कामाची ॥
व्यवसाय सर्व खुटवी, ऐशी न रुचे स्थिती विरामाची ॥४॥
उद्योग कांहिं तरि या दीर्घ लघू पाहिजेचि जीवातें ॥
तरिच सुखप्राप्ति, जसी होय सुखद त्यागिली न तनु वातें ॥५॥
देवा पुन्हां पुन्हांची जीवातें जन्ममृत्यु लाधावे ॥
फिरुनी घटयंत्रापरि त्वत्पदसेवाविधीस साधावें ॥ ६ ॥
जीवास मुक्ति मिळतां जन्ममरण वृद्धबालतरुणदशा ॥
सुखदुःख क्षुत् तृष्णा यांचा अनुभव घडे न जगदीशा ॥७॥
मग काय देहसार्थक दगडापरि तो न काय बनला हो ॥
वाचाशक्ती जाउनि कोण ह्मणे मजसि मुग्धता लाहो ॥८॥
अतिदृढ बद्ध असें मी दिनरजनीं पोषणीं कलत्र निज ॥
मग कां विश्रांतीच्छा होय सफल, ना ह्मणेहि रात्र निज ॥९॥

पशुपक्षिहि विश्रांती घेति सुखें यामिनींत शांतपणें ॥
काय असा पापी हा, जेणें दुःखानलीं सदा तपणें ॥ १० ॥
झटणें खपणें श्रमणें साहुनि कटुवचनदृष्टि निमुटपणें ॥
वसणें संसारिं जशीं स्वार्थाविण कृषिस पोषिती कुपणें ॥११॥
संसारभार बहु जड हा मज आतां न साहवोचि खरा ॥
दंतिभरा उचलाया साह्य जसें दंतिचें हवेंचि खरा ॥ १२ ॥
दिधला भर मस्तकिं हा झटलों उचलावयास बहुत बळें ॥
श्रमलों परि, भेरिध्वनि-सरि करितिल कां मृदंग वा तबले १३॥
झाला आतां अतिजड, उतरी हा तूंच, साहवे न मला ॥
घे स्वशिरिं क्षिप्र, भरें ताता सुत काय पाहवे नमला ॥१४॥
संसृतिदुःख किती तरि सोसावें या निशीदिनीं शरिरें ॥
झालें क्षीण, उरींही फुटलें, फुटतात जेवि रथहरि रे ॥१५॥
देवा, तव चरणाब्जा वंदुनि झिजलेंचि हें निज ललाट ॥
अंत न आतां बघणें, सोडुनि रक्षीं प्रसादजल-लाट ॥ १६ ॥
परिपरि तुज आळवितों, परि करुणासिंधु पावसी कां न ॥
चुकलों असेन, तरि तूं सुपथ धरुनि कां न दावसी कान ॥१७॥
अज्ञत्वें बाल चुके, त्या माता मानि काय अपराधी ॥
तूं मायबाप मासिं हो, अपराधीं दे न दृष्टि अपरा धी ॥१८॥
मम बोल निश्चयें तुज रुचले, म्हणुनीच बोलविसि बोल ॥
वेडे वक्र सुताचे बोल, परि प्रभु ह्मणे पुन्हां बोल ॥ १९ ॥
लडिवाळपणें सलगी दिधल्यावरि काय मान अपमान ॥
राहे, यदर्थ रोष न करसी, या तव गुणास उपमा न ॥२०॥
आतां पुरें न करिं मी प्रार्थिन कटु मधुर भाषणें तुजसी ॥
परिसुनि कृपाचि करणें, करि विसरुनि माय तोकमंतु जसी २१
तूं शठ कृपणहि तैसा, दिधल्या श्रमल्याविना न दे कांहीं ॥
सर्वश्रेष्ठ जगीं तूं, श्रेष्ठांची पद्धती वदे कां ही ॥ २२ ॥

तुज काय ऊन, धनि तूं जगतांतिल सर्वही पदार्थांचा ॥
कोठुनि मग दे पामर पूर्ण करिल हेतु कां समर्थाचा ॥ २३ ॥
दिधलेंहि यथाशक्ती, तरि तव हित त्यांत काय सांग मला ॥
तूं निर्विकार निःस्पृह, हेतु तुझा वासनेंत कां रमला ॥२४॥
ह्मणतां लोभिष्ट तुला दोष न देतील सत्यवादी ते ॥
अज्ञानि सर्प मानिति परि सज्ञानी जसे न वादीतें ॥ २५ ॥
लागेल, सत्यचि कथीं, देवा क्षीरार्णवा तृषा कशि रे ॥
तदधिक तूं, परि जैसा धनलोभें याचकांत धनिक शिरे॥२६॥
देतात तरु च्छाया, तेंवि मधुर निर्मला जला सरिता ॥
ते हि अपेक्षा करिति न, परि तूं करिशी निजा जनास रिता २७
आला शरण कवणही, तरि आधीं लाविशी कसा त्यातें ॥
हें योग्य कां तुज, जसें छळणें वद याचकास दात्यातें ॥२८॥
ह्मणती वदान्यवर तुज, मी न ह्मणें परि वदान्य, कां परिसे॥
तूं घेतल्याविण न दे, मागितलें काय आयसा परिसें ॥२९॥
दाते शोधुनि याचक करिती तद्वासना बळें पुरती ॥
तूं न तसा, कांहिंतरी घेउनि अधिं करिसि आपुली भरती॥३०॥
संपन्न सर्व तूं प्रभु, कमला दासी पदारविंदाची ॥
क्षीरार्णविं वास तुझा, कां कांक्षा परि फलांबुकंदाची ॥३१॥
तूं अदय भीरु कपटी, माझि दया ये न, कालयवनातें ॥
वधिलेंचि जरासंधा, त्वदवगुणा स्थल मिळे न कवनातें ॥३२॥
या मदविचारवचनें सहजचि तव चित्त कां न कोपावें ॥
परि न तसें करि, बालिशवच निज चित्तीं धरूं नको, पावें॥३३॥
किति तरि दृढ तव मन हें, किरकिर ही माझि केंवि सोसवती ॥
येइ न कां कंटाळा, आतां सद्बुद्धि ही वसो सवती ॥३४॥
आळवितों किति परिनें, परिसुनि पाषाणवृंदही द्रवती ॥
परि तूं कठोर ऐसा, या नातिं तव मति न होय भद्रवती ॥३५॥

कोपिष्ठ नरहि समर्थी होती अति शांत गेलिया शरण ॥
तूं कोपातीत असुनि या दासाचें न कां करिसि भरण॥३६॥
संकटहर नाम तुझें, सांप्रत किति एक संकटीं असती ॥
बाहति अनन्यभावें तुजला, परि ते न काय तुज दिसती॥३७॥
इतरांचें राहूं दे, निशिदिनिं मी बाहतों परोपरिनें ॥
शिशु जैसें मातेतें बाहे रडुनी न थांबतां सरिनें ॥ ३८ ॥
दीर्घ रवें बाहुनि तुज झाला अतिशुष्क कंठ हा खचितीं ॥
तूं निश्चयें न बहिरा,परि जाणुनि परिससी न हांकाचि ती॥३९॥
संज्ञेनें बधिरासी, निद्रिस्था जागृतीस देऊन ॥
कळवावें, तूं न तसा, जाणुनि बसलासि मीष घेऊन ॥४०॥
मज सत्य सत्याचि कथीं, देवा, तुज विषम यांत कां दिसतें॥
तुज कठिण कांहिं न असे, कथिलें तें अनृत शौनकादि सतें ४१
स्तुतिरहित बोल बोलें, ह्मणुनी द्रुत शासनार्थ धावावें ॥
स्वकरें मुखिं ताडावें, याच मिषें तरि स्वरूप दावावें ॥४२॥
रुदितशिशुवचा परिसुनि माता त्यजुनी अनेक व्यवसाया ॥
धांवे, धांवा तैसे प्रभुजी तुह्मी सुशीघ्र नवसा या ॥ ४३ ॥
कुरवाळुनि 'बाहसि कां?' ह्मणुनी पुसणें कृपाघना त्वरितें॥
ऐसें न करीसी, तरि होइल जगतीं तुझें महत्त्व रितें ॥४४॥
जोंवरि येशी न हरी, तोंवरि तुजला असाच बाहीन ॥
हें सत्य सत्य जाणें, आण तुझी, मी उगा न राहीन ॥४५॥
गुतवुनि मायामोहीं मारिसि संसार-कोरडा यातें ॥
तो साहवे न, ह्मणुनी तुजपाशीं कां नको रडायातें ॥ ४६ ॥
करिसी न आगमन कां, प्रत्यक्षाचि हेतु तो निवेदावा ॥
शरणागतासि ऐसा प्रभु तुज कां योग्य साधणें दावा॥४७॥
थोरांनीं थोरासीं वैर करावें हि रीति थोरांची ॥
मी पामर जड, इच्छा होइ गजा का सशाशिं समराची ॥४८॥

तव नुति निंदा करितां झाला भ्रम कीं मदल्पबुद्धिस रे ॥
जैसा अतियत्नेंही कुंभें जल काढितां न जलधि सरे ॥४९॥

झाली स्तब्धहि वाणी, कंठ तसा शुष्क, सबल ओरडतां ॥
गात्रें गलित जहालीं, सुजले अत्यंत चक्षुही रडतां ॥५०॥

स्थिरता कलींत धरली, तेवि बधिरताहि काय गा वरली ॥
हें सत्य असेल, तरी निरुपायें मीहि वाणि आवरली ॥५१॥

उरला शब्द तुजवरी हांकेला धांवलासि ना ह्मणुन ॥
हा बोल न तुजला, स्थिर बसतों प्रारब्धहीन मी गणुन ॥५२॥

ही लडिवाळ विनंती भासेल अबुध जनास भलतीसी ॥
परि सत्य तत्त्ववेत्ते लावितिल न तिलहि दोषमल तीसी ॥५३॥

कृष्ण ह्मणे, जगदीशा, चुकलों चुकलों खचीत मी चुकलों ॥
परि करि कृपा, गजासी पाहुनि न श्वानसा प्रभो मुकलों॥५४॥

प्रकरण १८ वें.

मार्कंडेयाख्यान.

शार्दूलविक्रीडित.

श्रीलंबोदरपादपंकज करें वंदूनियां आदरें ॥
प्रार्थीतों मतिमंद हा, सुमति द्या, काव्यीं बहू जी स्फुरे ॥
मार्कंडेयमुनी-कथा सुरसिका गाया मनीं वासना ॥
ती देवा करि पूर्ण तूं सुकरुणा आणूनि याचीमना ॥१॥

आर्या.

शौनक ह्मणती सूता, तूं अज्ञानांधकारिं पतित जना ॥
सुज्ञानदीपदर्शक, यास्तव बा लागलों तुझ्या भजना ॥ २ ॥

प्रहर्षिणी.

मार्कंडेय मुनि चिरंजिवी कथीसी ॥
येतो संशय तयिं आमुच्या मनासी ॥
राहीला प्रलयिं सजीव तो कसा रे ॥
विस्तारें मजप्रति वृत्त सांग सारें ॥ ३ ॥

इंद्रवज्रा.

जन्मासि ये तो भृगुच्या कुलांत ॥ कल्पांत नाश्या घडला युगांत ॥
कोण्यालयीं तो मग वांचला तें॥भेटे जलीं बालक केंवि त्यातें ॥४॥

मालिनी.

परिसुनि मुनिवाणी सूत ते शौनकाला ॥
ह्मणति, बहु बरा हो आजि हा प्रश्न केला ॥
कथिन सकल वृत्ता विस्तरें, आयका तें ॥
निरसुनि जनशंका नाशि जें पातकातें ॥ ५ ॥

आर्या.

होतां उपनयनविधि स्वीकारी ब्रह्मचर्यदीक्षेला ॥
जिंकुनि षड्रिपु करि तो वेदाध्ययना करूनि भिक्षेला ॥६॥

धरि वल्कल शरिरिं, जटा मस्तकिं, रुद्राक्ष कंठिं, दर्भ करीं ॥
हरिचिंतनीं रत सदा, उग्र तपातें बहूत काळ करी ॥ ७ ॥

जिंकि तपःसामर्थ्यें संपूर्णप्राणिघातकी काला ॥
हा स्वपदा हरिल, अशी वाटे मनिं भीति देवलोकाला ॥८॥

ऐशा त्या उग्र तपीं गेलीं मन्वंतरें सहा निघुनी ॥
परि तो तिळहि न ढळला, आला तें कोप वासवा बघुनी ॥९॥

मालिनी.

मग मुनितप-हानी वासवानें कराया ॥
सहजन मदनातें प्रेषिलें ऐक राया ॥
द्रुत विपिनिं तयाच्या पातला आश्रमातें ॥
शमन करित यच्छ्री पांथिकांच्या श्रमातें ॥ १० ॥

चामर.

रत्नसानु उत्तरेस पुष्पभद्र ऱ्हादिनी ॥
तत्तडागिं आश्रमांत राहिला असे मुनी ॥
चुंबनास वारिवाहमंडला द्रु पाहती ॥
कीर केक पक्षिवृंद त्या स्थलीं अलापती ॥ ११ ॥

शार्दूलविक्रीडित.

ठायीं ठायिं सरोवरीं कमलिनी पंकोद्भवें शोभती ॥
त्यांमाजी भ्रमरावली मधुरशा गुंजारवा घालिती ॥
तैसे हंस-मराळ-मत्स्य-सुसरी-कच्छादि ते क्रीडती ॥
ऐशा रम्यतराश्रमा सकल ते जाऊनि त्या पाहती ॥ १२ ॥

आर्या.

मंद सुगंध सुशीतल बहुतोषद तैं समीर तो वाहे ॥
कामोत्पत्ति कराया जणु त्या मदनास आदरें बाहे ॥ १३ ॥

वसंततिलका.

तेव्हां वसंतऋतु तो प्रकटूनि तेणें ॥
केलें तपोविपिन तें सुविहार-ठाणें ॥
शाखीशिखाग्रिं सुमनें विकसीत केलीं ॥
इंदुप्रभा निशिं विलासिसुपात्र झाली ॥ १४ ॥
गंधर्ववृंद करिती कल गायनासी ॥
देवांगना अभिनयासह तांडवासी ॥
वाद्यें मनोहरचि किंनर वाजवीती ॥
भोगस्पृहा मुनिमनीं शिरण्या पहाती ॥ १५ ॥

स्वागता

सोडि पंचशर तो स्वशरातें ॥ लक्षुनीच मुनिच्या शरिरातें ॥
अप्सरा नयन वक्र करूनी ॥ पाहती अधर दंतिं धरूनी ॥१६॥
घेउनी कनककंदुक हातीं ॥ केलियुक्त मुनिसंनिध येती ॥
क्रीडतां श्रमति त्या कुचभारें ॥ मस्तकीं विखुरले कच सारे॥१७॥
शीर्षिंचे सुमनगुच्छ गळाले ॥ वायुनें कटिपटा उडवीलें ॥
पाहुनी स्थिति अशी मदनाला॥कार्यभाग गमला निज झाला॥१८॥

आर्या.

जिंकि तपःसामर्थ्यें इंद्रियसमुदाय जो मुनी सकल ॥
काय न तदग्रिं होइल विषयांचें मोहकत्व तें विफल ॥ १९ ॥

वसंततिलका.

केला प्रयत्न बहु त्या सुरकिंकरांहीं ॥
झाला परंतु न तदा उपयोग कांहीं
भासे सुतप्त अनलापरि तो तयांला ॥
शक्ती तदग्रिं उरली नचि जावयाला ॥ २० ॥

इंद्रवज्रा.

होऊनि ते भीत तदा पळाले ॥ वाद्यादि त्यांच्या करिंचे गळाले ॥
देखूनि धांवे मृग केसरीतें ॥ संपूर्ण ते धांवति त्यापरी ते ॥२१॥

आर्या.

देवांगनादि सर्वहि धरुनी निज मुष्टिकेंत नाकासी ॥
खालीं ग्रीवा करुनी म्लान मुखें कष्टि येत नाकासी ॥ २२ ॥

इंद्रवज्रा.

पाहूनि त्यांची अति खिन्न मुद्रा ॥ आश्चर्य वाटे मनिं निर्जरेंद्रा ॥
आकाल ऐसा कुणि नाढळेची ॥ स्त्रीमोहबाणें मनिं ना ढळेची॥२३॥

आर्या.

अति उग्र तप तयाचें प्रकटे पाहुनि तदग्रिं देव हरी ॥
नरनारायणरूपें जो भक्तांची व्यथा सदैव हरी ॥ २४ ॥

वेदभुज उभय मूर्ती, करिं सुकमंडलु, गळां सुमनहार ॥
तेजें लाजे चपला, सौंदर्यी पावला मदन हार ॥ २५ ॥

इंद्रवज्रा.

मूर्ती अशा त्या मुनिनें पहातां ॥ जोडूनि भावें नमिल्या स्वहातां ॥
देऊनि पाद्यार्घ यथाविधीनें ॥ पूजीयलें सादर शुद्ध धीनें ॥ २६ ॥

माल्यभारा.

मग मानासिं ते सुतुष्ट होती ॥ नरनारायण काय बोलताती ॥
अवलोकुनि तोषलों तपाला ॥ स्वमनें ईप्सित मागणें वराला ॥२७॥

मालिनी.

परिसुनि वरदोक्ती विप्र बोले तयांला ॥
अजि चरणरजानें पूत केलेंत याला ॥
अधिक न मजलागीं मागणें कांहिं देवा ॥
सतत मज घडावी आपुली पादसेवा ॥ २८ ॥

भुजंगप्रयात.

दुजी एक आहे मनीं वासना ही ॥
तुझी योगमाया कळूं येत नाहीं ॥
महाज्ञानि लोकां महासाधनेंही ॥
मला दाखवा, मागणें अन्य नाहीं ॥ २९ ॥

विभावरी.

परिसुनी मुनिवचा मनिं हांसले ॥
परि दयार्द्र हृदयीं विष भासले ॥
ह्मणति, या भरिस तूं न पडे मुने ॥
भुलविलें सकल विश्व असे तिनें ॥ ३० ॥

वियोगिनी.

जरि आग्रह मानसीं असे ॥ तरि होईल सुनिश्चयें तसें ॥
वदुनी वरदान आननीं ॥ नरनारायण जाति काननीं ॥ ३१ ॥

आर्या.

एक दिनिं कांहिं कालें मुनि मार्कंडेय तो नदीपात्रीं ॥
असतां सायंकालीं झंझावातें तुडुंबिली धात्री ॥ ३२ ॥
घनमंडळांत होती घनसमुहाचे महा गडगडाट ॥
वर्षति घन घन धारा, गर्जे सौदामिनी कडकडाट ॥ ३३ ॥
हां हां ह्मणतां सर्वहि जलमय झाली क्षणांत भू पृष्ठीं ॥
आदळती जललहरी, झाला मुनि त्यांत सांपडुनि कष्टी ॥३४॥
जिकडे अवलोकावें, तिकडे दिसती जलाब्धिच्या लहरी ॥
वरतीं आकाश दिसे, धांवति झष कूर्म त्यापरी सुसरी ॥३५॥
पावुनि वृद्धी सागर जाउनि भिडला विहायसामाजी ॥
झाला क्षोभ महा तैं रविशशिसोमादिऋक्षसामाजीं ॥ ३६ ॥
स्वेदज उद्भिज जारज तैसेची अंडजादि तापातें ॥
पावुनि पृथ्वी बुडली उदकीं कंपास विद्युता पातें ॥ ३७ ॥

इंद्रवज्रा.

एकाकि तेव्हां मुनि त्या वनांत ॥ आहों असें पाहुनि भी मनांत॥
वेड्या पिशया तुल्य बघे सभोंती॥भक्षावया त्या जलजंतु येती॥३८॥
वाहे बुडे ये वरतीं पुन्हां तो ॥ कासाविसी प्राण बहूत होतो ॥
ऐशा स्थितीनें क्रमि काल फार॥कांहीं सुचेना मनिं त्या विचार॥३९
तों देखिला एक सुशोभिवंत ॥ न्यग्रोध शाली फलपुष्पवंत ॥
शाखीं तयाच्या दलपात्रिं एक ॥ खेळे करें पाद धरूनि तोक ॥४०॥

यूथिका.

नीलवर्ण तनु सुंदर गोजिरी ॥ शोभती वलययूथ तया करीं ॥
चंद्रमा वदन पाहुनि लाजतो॥ हस्तिं पाद धरुनी मुखिं घालितो ४१

इंद्रवज्रा.

पाहूनि त्या सुंदर बालकाला ॥ संतोष चित्तीं मुनिच्या जहाला॥
दुःखार्त त्याची स्थिति पालटोनी॥संनीध जाया सरला उठोनी ४२

आर्या.

तों आकर्षुनि शिशुच्या श्वासें नेला मुनीस उदरांत ॥
लोहासि लोहचुंबक कर्षि जसा आपुल्या अगारांत ॥४३॥

यूथिका.

त्या स्थलीं मुनिवरें अवलोकिलें ॥ ईक्षणें सकलही जग कोंदलें ॥
थोर विस्मय निजांतरिं मानिला॥ईश्वरें स्वमहिमा अजि दाविला॥

मंदाक्रांता.

होतें जैसें प्रथम मुनिनें देखिलें मेदिनीतें ॥
तैसें त्यातें उदरिं दिसलें सर्वही लोचनीं तें ॥
आकाशींचे रवि शशि तशा तारका वारिवाह ॥
सप्ताब्धी ते अचल सरिता काननादी समूह ॥ ४५ ॥

चामर.

रत्नसानु पुष्पभद्र ऱ्हादिनी निजाश्रमा ॥
पाहिले जपी तपी तसे बहु द्विजोत्तमा ॥
मानसांत थोर विस्मयास तो तदा करी ॥
श्वासपंथिं तो पडे पुन्हां तसाचि बाहिरी ॥ ४६ ॥

आर्या.

पूर्वपरी पुनरपि तो प्रलयसमुद्रांत पावला पतन ॥
खाई बहू गटकळ्या तों बालक देखिला पुन्हां दुरुन ॥४७॥

इंद्रवज्रा.

जाऊनि आलिंगन त्यासि द्यावें ॥ ऐशा विचारें मुनि शीघ्र धांवे ॥
तों त्या जलीं बालक गुप्त झालें॥तैसें समुद्रादिक सर्व गेलें॥४८॥
आहोंचि पूर्वीपरि आश्रमांत ॥ ऐसें विलोकी मुनि तो क्षणांत ॥
आश्चर्य तेव्हां मनिं थोर मानी॥माया हरीची नर काय जाणी॥४९॥

आर्या.

सूत ह्मणे, शौनक हो, ऐसा मायाप्रभाव-अनुभव तो ॥
जाणुनि शांती पावे, काय करिल त्या मुनीश्वरा भव तो ॥५०॥

मग मार्कंडेय ह्मणे, श्रीजगदीशा, तवांघ्रिला शरण ॥
आहें अनन्य भावें, मायामोहांतुनी करा तरण ॥ ५१ ॥
झाला सुविदित मजला त्वन्मायेचा अगाध तो महिमा ॥
तज्ज्ञान व्हावयातें भक्तिविना नान्य यत्न ये कामा ॥ ५२ ॥
भक्तिरहित जे ज्ञानी ते शक्य न जाणण्या कदा होती ॥
गुततां तदीय जाळीं चक्रसम फिरवि एकदा हो ती ॥५३॥

चामर.

शौनकादि त्या मुनीश्वरासि सूत सांगती ॥
कांहिं कालिं एकदा तदीय आश्रमाप्रती ॥
शूलपाणि भृत्यपार्वतीसमेत पातला ॥
तों मुनी दृढा समाधि लावुनीच बैसला ॥ ५४ ॥

पंचचामर.

शिवाकडे न पाहि तो, समाधिं चित्त गुंतलें ॥
महेश्वरें मृडानिशीं समाधिध्यान दाविलें ॥
तदर्थि मूर्तिमंत मी उभा परी न पाहि हा ॥
निरिच्छ, मेनकात्मजे, किती असे मुनी, पहा ॥५५॥

भुजंगप्रयात.

परब्रह्मरूपीं जडे वृत्ति ज्याची ॥
तया वासना ती न मोक्षादिकाची ॥
असा हा मुनी पार्वती जाण आहे ॥
ह्मणूनीच कोणाकडेही न पाहे ॥ ५६ ॥

मालिनी.

मग पशुपति त्याच्या अंतरीं सूक्ष्म देहीं ॥
करुनि गमन देहीं आणिला तो विदेही ॥
उघडुनि नयनांतें देखतां शंकरातें ॥
नमन करि तयातें जोडुनीयां करातें ॥ ५७ ॥

शार्दूलविक्रीडित.

शंपाकांतिसमान पिंगट जटा शीर्षीं बहू शोभती ॥
पंचास्यें, दश बाहु, कंठिं विलसे रुद्राक्षमालाततीं ॥
दीप्तीनें रवि लाजतो, डमरुखट्वांगादि दाही करीं ॥
ऐशा भव्य सुमूर्तितें बघुनियां वंदी मुनी आदरीं ॥ ५८ ॥

इंद्रवज्रा.

पाद्यार्घ्य देऊनि मुनी करानें ॥ पूजी भवानीसह आदरानें ॥
राहो सदा भक्ति ह्मणे मनाला ॥ मानी स्वदासापरि या जनाला ५९

आर्या.

ह्मणती शंकर मुनिला, पाहुनि तव भक्तिभाव मन तुष्ट ॥
झालें, यदर्थ मागे, देइन वर जो तुला असे इष्ट ॥ ६० ॥

विभावरी.

मुनि ह्मणे, प्रभुवरा शिवशंकरा ॥
मम मनोरथ सुपूरित हा करा ॥
सतत भक्तिरस चाखिन मानसीं ॥
मजसि द्यावि सुमति प्रभुजी असी ॥ ६१ ॥

आर्या.

गेला हर कैलासीं देउनि वर त्या मुनीस वांच्छितसा ॥
क्रमि काल मुनी मोदें, देवा, करि गानिं कृष्ण सूचितसा ॥६२॥

प्रकरण १९ वें.

श्रीशिवगीता.

आर्या.

अध्याय ४ था.

सूत ह्मणे, यापरि तो कथुनी मुनिवर निजाश्रमा गेला ॥
मग राम रामगिरिवरि पावन गोदावरीतटीं आला ॥ १ ॥
श्रीशिवलिंग स्थापुनि तो दीक्षेतें करी यथाविधिनें ॥
लेपुनि विभूति अंगीं रुद्राक्षाचीं करूनि आभरणें ॥ २ ॥
गोदावरीसुसलिलें करुनी अभिषेक अर्चनास करी ॥
कांतारोद्भव पुष्पें आणुनि काननफलें स्वकीय करीं ॥ ३ ॥
भस्मधर भस्मशायी आसनिं बैसूनि व्याघ्रचर्माच्या ॥
निशिदिनिं अनन्यभावें करी जपा शिवसहस्रनामाच्या ॥ ४ ॥
फल-अशन आद्य मासीं, दुसऱ्या पर्णें, तथैव अंबु तिज्या ॥
चवथ्या समीरभक्षण करि तो रविवंशदीप रघुराजा ॥ ५ ॥
इंद्रियनिग्रह करुनी तो शांतात्मा प्रसन्न होऊन ॥
करि हृत्पंकजवासी-अर्धांगीपार्वतीपतिध्यान ॥ ६ ॥
त्रिनयन, सुचतुर्बाहू, विद्युत्सम पिंगटा जटा धारी ॥
कोटिदिवाकरकांतीसम कांती, शीत कोटि इंदुपरी ॥ ७ ॥
मंडित सर्वाभरणीं, शोभे यज्ञोपवीत नागाचें ॥
अभय वरद कर ज्याचे, केलें परिधान व्याघ्रचर्माचें ॥ ८ ॥
शार्दूलचर्मवसनें परिवेष्टित, देवदानवप्रणत ॥
पंचास्य, चंद्रमौली, विलसति डमरू त्रिशूल हस्तांत ॥ ९ ॥

शाश्वत विकारशून्य ध्रुव अविनाशी पवित्र जो त्याचें ॥
करितां ध्यान निशिदिनीं गेले ते मास चार रामाचे ॥१०॥
झाला महाभयंकर रव मग कल्पांत-अंबुनिधिरवसा ॥
मथितां सागर गिरिनें झाला उत्पन्न शब्द कीं जैसा ॥११॥
शिवशरदहनें दग्ध त्रिपुरपुरें कोसळुनि जणु पडती ॥
ऐसा शब्द भयद तो परिसुनियां रामलोचन भ्रमती ॥१२॥
द्विज हो, यापरि तेव्हां रामाग्रीं उद्भवे महातेज ॥
नेत्र दिपुनियां होई दशदिक्प्रेक्षणिं अशक्त रघुराज ॥ १३ ॥
ऋषि हो, मोहा पावुनि ये द्रुत अंधत्व रामनेत्रांही ॥
करि तर्क चिंतनें तो कीं, कपटी दुष्टदैत्यमाया ही ॥ १४ ॥
उठुनी मग वीर महा निज धनुतें रामचंद्र सज्ज करी ॥
वेध करी दिव्यास्त्रें अभिमंत्रित वहुत तीक्ष्ण शरनिकरीं ॥ १५ ॥
आग्नेय सौम्य वारुण मोहन सौरास्त्र पर्वतास्त्रातें ॥
अंतकचक्र सुदर्शन वैकुंठास्त्रा महान चक्रातें ॥ १६ ॥
पशुपतिरुद्रपितामहशक्रसमीरणकुबेर-अस्त्रांला ॥
श्रीराम भार्गवादिकनानास्त्रांच्या करि प्रयोगाला ॥ १७ ॥
त्या तेजीं रघुपतिचीं विरलीं अस्त्रें तथाहि शस्त्रें तीं ॥
जैशा अवुंदकरका, मुनि हो, जलसागरांत विरघळती ॥१८॥
क्षणमात्रें रामाचे हस्तांतुनि पतन चाप पावूनी ॥
तूणीरांगुलिरक्षा गेली तैं गोधिकाहि ते जळुनी ॥ १९ ॥
पाहुनि सौमित्र पडे अवनीवरि भीतियुक्त मूर्च्छित तें ॥
मग कांहींहि न करितां राघव निज जानु ठेवि मेदिनितें॥२०॥
मिलिताक्ष राघव तदा गेला तारक महेश्वरा शरण ॥
श्रीशिवनामसहस्रक उच्च रवें गाइ व्हावया भरण ॥ २१ ॥
भूवरि पुन्हां पुन्हां तो करि पशुपतितें प्रणाम दंडवत ॥
झाला निनद पुन्हां तैं व्यापक दिङ्मंडलास पूर्ववत ॥ २२ ॥

पृथ्वी थरथर कांपे, पावति कंपाप्रती महीधरही ॥
क्षणमात्रें मग विधुसें बहु शीतल तेज राम तो पाही ॥ २३ ॥
दाशरथी राघव जों पाही उघडूनि नेत्रकमलाला ॥
तों देखिता जहाला सर्वालंकारयुक्त वृषभाला ॥ २४ ॥
पीयूषमंथनोत्थितनिर्मलनवनीतपिंडतुल्य सित ॥
शृंगाग्र हेममंडित विलसे शृंगप्रकाश पाचुवत ॥ २५ ॥
लघु कंठ कंबलें तो भूषित तैसाचि इंद्रनीलाक्षी ॥
शुचि चामरें निबद्धचि, मणिपल्याणें सुशोभिता कुक्षी ॥२६॥
घंटा-घुंगर-सुरवें पूरित जो करितसे दश दिशांला ॥
ऐशा त्या वृषभावरि बसलेला स्फटिकशुभ्र शिव दिसला २७
कोटिरवितुल्य कांती, कोटी चंद्रांपरी सुशीतकर ॥
यज्ञोपवीत अहिचें, शोभे शार्दूलचर्मवस्त्रधर ॥ २८ ॥
विद्युत्पिंगजटाधर सर्वालंकारयुक्त शितिकंठ ॥
पंचानन चर्मवसन, शोभे शीतांशुदीप्तिनें किरिट ॥ २९ ॥
नानाविधायुधांहीं बहु भूषित दश भुजें त्रिनेत्रानें ॥
पुरुषश्रेष्ठ तरुण जो, तैसा ज्ञानस्वरूप देहानें ॥ ३० ॥
सुखदायकासनीं त्या शोभे पूर्णेंदुतुल्यमुखकमला ॥
नीलाब्जहारदीप्ति प्रकटे पाचूसमान विगतमला ॥ ३१ ॥
मुक्ताभरणें युक्ता जैशी तारागणें निशा विमलें ॥
विंध्याचलसमपीनस्तनभारभरें जडत्व शोभविलें ॥३२॥
कटिसूक्ष्मता तियेची आणी संदेह संधिच्या सांधीं ॥
युक्ता बहु दिव्य नगें, कृतलेपन देहिं दिव्यतरगंधीं ॥३३॥
दिव्यसुमन-हारधरा, नीलोत्पलतुल्य चक्षु रम्य जिचे ॥
शोभे तांबूलें बहु, तैसाची वदनचंद्रमा सुकचें ॥ ३४ ॥
श्रीशंकरपरिरंभें यत्तनु रोमांचराजिनें युक्ता ॥
आढ्या ज्ञानानंदें, रूपें श्रीअंबिका जगन्माता ॥ ३५ ॥

सौंदर्यसारवृंदा, तीतें श्रीरामचंद्र तो पाही ॥
आरूढले स्ववाहनिं, विलसति पाणी अनेक शस्त्रांहीं ॥३६॥
सु-बृहद्रथंतरादिक सामांचें गान करित वदनानें ॥
पत्नीयुत दिक्पति ते पशुपतितें वेष्टिति प्रमोदानें ॥ ३७ ॥
श्रीहरि तदग्रभागीं गरुडावरि बैसला गदाधारी ॥
प्रलयघनकांतिसश्री श्रीदा सौदामिनीव घनधारी ॥ ३८ ॥
रुद्राध्यायजपातें एकाग्र मनें करी जनार्दन तो ॥
पश्चाद्भागीं विलसे चतुरानन देव हंसवाहन तो ॥ ३९ ॥
दीर्घसुकूर्चजटाधर गाइ चतुर्वेद रुद्र सूक्तानें ॥
चतुराननीं महेशा संयुक्त प्रियतमस्वभार्येनें ॥ ४० ॥
करित स्तुति मुनिमंडल शितिकंठाची अथर्वण श्रुत्या ॥
नीलतनू नीरार्णव सह गंगाद्या नद्या दुरित हरत्या ॥४१॥
कैलासपर्वतापरि शेषादि प्रमुख जे महानाग ॥
श्वेताश्वतर सुमंत्रें करिती स्तुति शंभुची यथासांग ॥ ४२ ॥
नानारत्नें भूषित, हस्तकमल कनकदंडसंयुक्त ॥
नंदीन अग्रभागीं गाई कैवल्य-उपनिषत्सूक्त ॥ ४३ ॥
दक्षिणभागीं गिरिपरि लंबोदर मूषकावरी विलसे ॥
तैसाचि बर्हिणस्थित षाण्मातुर तो उदीचि भागिं असे ॥४४॥
पार्श्वी भयंकराकृति शोभे चंडेशही महाकाल ॥
दावाग्निसम प्रज्वल रुद्रगणा दूर तो प्रलय अनल ॥ ४५ ॥
वक्राकृति त्रिचरणी तैसे नानाविकार वदनीं जे ॥
कोट्यावधि संख्येनें प्रमथादि महाबलाढ्य गणराजे ॥४६॥
आराद्भागीं बहुविधवाहनसंयुक्त मातृमंडल तें ॥
पंचाक्षरमंत्रजपा करिती विद्याधरादि सिद्धहि ते ॥ ४७ ॥
गाय सुदिव्यें रुद्रकगीतें किन्नरसमूह त्या ठायीं ॥
तैसा विप्रकर्दंबक सुरवें त्र्यंबकसुमंत्र तो गायी ॥ ४८ ॥

स्वर्गीं नारद गायन करित असे तेवि नृत्त्य वीण्यानें ॥
रंभादि अप्सरागण नर्तन करितात नाट्यतत्त्वानें ॥ ४९ ॥
चित्ररथप्रमुख महागायक गंधर्ववृंद गान करी ॥
अहि कंबलाश्वतर ते शोभति शिवकर्णि भूषणाकारी ॥५०॥
गाती पन्नग गीता सुरवें कुंडल कपाल फणिधर ते ॥
झाला कृतार्थ राघव ऐशा त्या बघुनि देवसंघातें ॥ ५१ ॥
भर्गा पुनःपुन्हां तो करि नमन सहर्षगद्गदें वाचें ॥
श्रीशिवनामसहस्त्रें गाऊनी स्तौत्य देवदेवाचें ॥ ५२ ॥

अध्याय ५ वा.

सूत ह्मणे, तैं प्रकटे कांचनमंडित महारहंवर तो ॥
नाना दिव्य मणींच्या दीप्तीनें जो दिगंतरा भरतो ॥ १ ॥
नल्योपांतिकपंकें चक्रचतुष्टय तथा रथीं विलसे ॥
वेष्टित शतशः शुभ्रच्छत्रें जो तेवि मौक्तिका-घोसें ॥ २ ॥
शुद्ध स्वर्ण खलीनें युत ऐशा चपल वाजिनीं युक्त ॥
मुक्ताच्छत्र विराजे उर्ध्वीं वृषकेतुचिन्ह आरक्त ॥ ३ ॥
बहुमत्तकरिणिकायुत, सुंदर तल्पें विशेष शोभविला ॥
शोभविहि पारिजातकवृक्षोत्थित सुंदरा सुमनमाला ॥ ४ ॥
मृगनाभिसमुद्भूतसुकस्तूरीपरिमलें मधुपवृंदें ॥
आकर्षिलीं तशीं तीं कर्पूरागरुसुधूपबहुगंधें ॥ ५ ॥
मलयघनघोषतुल्या नानावाद्यध्वनी महा मधुरा ॥
शोभति वीणावेणुध्वानीं रममाण किन्नरी दारा ॥ ६ ॥
पाहे रथवर ऐसा वृषभादुत्तीर्य चंद्रचूड हर ॥
स-उमा सुपट्टतल्पीं पाही त्रिपुराख्यदानवासुहर ॥ ७ ॥

दिव्यास्त्रिया सुनयना वारिति बहु शुभ्र चामरें स्वकरीं ॥
सुव्यजनचालनानें करिती संतुष्ट शंकरा शरिरीं ॥ ८ ॥
कंकणमनोहररवें तोडरमधुरस्वनेंहि रंजविती ॥
वीणावेणुध्वनिनें त्यापरि गीतें त्रिलोक त्या भरिती ॥ ९ ॥
अव्यक्तमधुर शब्दां शुकवाणी रंजनास्पदां प्रसवे ॥
तैसा श्वेत सुनिर्मल पारावतवृंद रंजवी सुरवें ॥ १० ॥
पाहुनि नगरूपी अहि हर्षभरित बर्हि नृत्य ते करिती ॥
तैं आत्मपुच्छभागीं कोट्यावधि चंद्रिकांस दाखविती ॥ ११ ॥
मग राघव नमन करी वृषभध्वजपादपद्मिं साष्टांगीं ॥
देउनि उत्थापन त्या होउनि संतुष्ट घे निज शतांगीं ॥ १२ ॥
निर्मल कमंडलुजलें भर्गें सविधी करूनि आचमन ॥
करवी रामाहि तसें निज अंकीं प्रेमयुक्त बैसवुन ॥ १३ ॥
मग दिव्य चाप तैसें दे अक्षय चंद्रचूड तूणीर ॥
पाशुपत नाम अस्त्रहि देई त्या राघवास देववर ॥ १४ ॥
बहु आदरेंचि बोले गिरिजापति रामचंद्र भूपा हे ॥
जगनाशक अतिभीप्रद तैसें बहु उग्र अस्त्र हें आहे ॥ १५ ॥
यास्तव सामान्य रणीं दाशरथे अस्त्र हें न योजावें ॥
तत्प्रतिघातक न असे त्रिभुवनिं या बहु यदर्थ रक्षावें ॥१६॥
यास्तव हें प्राणांतिक समयावांचुनि न योजिं रघुवीरा ॥
जरि संकटाविण कदा प्रेरिसि तरि करिल सृष्टिसंहारा ॥१७॥
पाचारुनि मग भर्गें गीर्वाणश्रेष्ठ लोकपालांतें ॥
बोले वधिल दशशिरा ऐसीं स्वास्त्रेंचि द्यावि रामातें ॥ १८ ॥
दिधला दशानना वर म्यां त्वद्धानी न हो सुरांहातीं॥
यास्तव वानररूपें जावें तुम्हि वीर हो महीवरतीं ॥ १९ ॥
साह्य करा रामासीं तेणें होईल शांतता भुवनीं ॥
ईशाज्ञा शिरिं वंदुनि वृंदारकवृंद जोडि निज पाणी ॥ २०॥

वंदुनि शिवचरणांतें आनंदें स्व स्व अस्त्र सुर देती ॥
नारायणास्त्र हरिनें दिधलें, ऐंद्रास्त्र दे बलाराती ॥ २१ ॥
ब्रह्मास्त्र पितामह दे, आग्नेयास्त्रास वीतिहोत्रानें ॥
स्वास्त्रास यमें दिधलें, मोहन अस्त्रास किन्नरेशानें ॥ २२ ॥
वरुणें वारुण अस्त्रा, मरुतें वायव्य अस्त्र रघुपतितें ॥
ईशान रौद्र अस्त्रा दे त्र्यंबकसख कुबेर अस्त्रातें ॥ २३ ॥
सौरास्त्र चंडकिरणें दिधलें, सौम्यास्त्र कुमुदबांधव दे ॥
पार्वत विश्वेदेवीं अर्पियलें, वसुकदंब वासव दे ॥ २४ ॥
संतुष्ट राम होउनि वंदुनि पशुपतिपदारविंदासी ॥
करित असे लीनपणें बद्धांजलि भक्तियुक्त विनतीसी ॥२५॥
भो भगवन् त्रिपुरांतक, लंघ्य नसे लवणसिंधु मनुजाला ॥
तत्परतीरीं लंका, जी कीं दुर्भेद्य देवदनुजाला ॥ २६ ॥
तेथें अनेककोटी वसती राक्षस बहूत बलवान ॥
वेदरत जितेंद्रिय ते भजती तुजलाचि, अन्य देवा न ॥२७॥
अगणितमायायुक्तहि असती ते अग्निहोत्रि धीमंत ॥
एकाकि सानुज वदे रणीं कसा मी करीन रिपु-अंत ॥ २८ ॥
शंभु ह्मणे, तुज रामा रिपुहननीं बा विचार करणें न ॥
आला असे तयाचा बहु संनिध अंतकाल गा जाण ॥ २९ ॥
पीडी बहू अधर्में विप्रांतें तेवि देववृंदाला ॥
तेणें तदायुचा क्षय तेवि श्रीचाहि तो असे झाला ॥ ३० ॥
भूपांगनाभिलाषी तो, तद्वध करिल बा त्वदीय कर ॥
पापासक्त रिपू जे होती जिंकावयास ते सुकर ॥ ३१ ॥
श्रुतिशास्त्राध्यायीही धर्मपरायण सदैव जो द्विषद ॥
निजभाग्यें होउनि तो धर्मच्युत लाभतो रणीं सुखद ॥३२॥
येतां विनाशकालाचि होतो निजधर्ममार्गि तो भ्रष्ट ॥
दशकंठानें दिधले सकला वृंदारका बहू कष्ट ॥ ३३ ॥

पिडिले द्विज ऋषिहि तसे, तेणें तन्नाश तो असे झाला ॥
किष्किंधापुरिं वानररूपें देवांश घेति जन्माला ॥ ३४ ॥
ते दुर्जय बलवत्तर तुज सीतारमण साह्य करतील ॥
करवीं बंधन तत्करिं सेतू, सागरिं शिलाहि तरतील ॥३५॥
बहुशैलबद्धसेतू-पंथें जलसिंधु लंघितील हरी ॥
आणी स्वप्रियजाया सहगण पौलस्त्य तो वधूनि अरी ॥३६॥
जोंवरि शस्त्रें रणिं जय तोंवरि योजी न अस्त्र एकोक्ती ॥
अल्पास्त्रीं निःशस्त्रीं त्यापरि रामा पलायनासक्तीं ॥ ३७ ॥
ऐशावरि जो अस्त्रें सोडी पावे स्वयेंचि तो नाश ॥
मग काय बहु वदावें, केलें उत्पन्न म्यांचि जगतास ॥ ३८ ॥
करितों नित्य अवन मी, तैसा संहार मीच बा करितों ॥
मी सर्व जन्म मृत्यु मृत्यूचा मृत्युही असें मी तो ॥ ३९ ॥
करितों भक्षण तैसें या जगता मी चराचरा सकला ॥
रणदुर्मदासुरव्रज मद्वक्त्रीं राघवा असे आला ॥ ४० ॥
आतां निमित्तमात्राचि हो तूं कोदंडपाणि रघुवीरा ॥
होइल बहु कीर्ति तुझी जिंकुनि समरांत राक्षसां वीरां ॥४१॥

अध्याय ६ वा.

भो भगवन्, याविषयीं वाटे संदेह कीं महान मला ॥
शशिशेखरा त्रिनयना शुद्धस्फटिकप्रभेपरी विमला ॥ १ ॥
त्वन्मूर्ति नियमिताकृति, अससी तूं पुरुषरूपधर देव ॥
हैमवतीसह येथें वससी निजगणजनांसह तदेव ॥ २ ॥
स्थावर जंगम भौतिक जग हें तूं केवि अंबिकारमण ॥
कथिं तें कृपा करुनि, जरि आहे मजवरि तुझी दया पूर्ण ॥३॥

ईशान ह्मणे, रामा, जें बहु दुर्ज्ञेय आदितेयांही ॥
तें कथितों परिसावें श्रुतिपंथानें महान यत्नांहीं ॥ ४ ॥
होशील अनायासें तेणें संसारसागरीं पार ॥
लोक चतुर्दश हे जे दिसती ते मद्विभूति रघुवीर ॥ ५ ॥
सरिता सरित्पति ऋषी वृंदारकगण तथैव रात्रिचर ॥
दिसती जे अन्यहि ते आहेत मदंश, चर तसे अचर ॥ ६ ॥
गंधर्व प्रमथ अही संपूर्णहि मद्विभूतिपासून ॥
पूर्वी ब्रह्मादिक सुर मद्रूपविलोकनस्पृहा धरुन ॥ ७ ॥
आले संपूर्णहि ते बहु माझ्या इष्ट मंदराद्रिवरी ॥
राहुनि उभे मदग्रीं करिति स्तुति आदितेय बद्ध करीं ॥८॥
पाहुनि त्या अमरगणा केले म्यां भ्रामित चित्तिं निजलीलें ॥
ब्रह्मादिक वृंदारक, तैसें तज्ज्ञानही नृपा हरिलें ॥ ९ ॥
मग विबुध हृतज्ञानी ते मजला 'कवण तूं' असें पुसती ॥
म्यां कथिलें त्रिदिवेशा,'आहें मी ज्या पुरातनचि ह्मणती॥१०॥
आहें सुर हो आदी तैसाची वर्तमान तो मीही ॥
होणार पुढें तें मी, जगिं या मजवांचुनी दुजें नाहीं ॥ ११ ॥
वृंदारक हो, जाणा नित्यानित्याविनाशि आहें मी ॥
त्यापरि हिरण्यगर्भहि ह्मणति जयातें अहो श्रुति स्वामी ॥१२॥
प्राच्योदीच्यावाची पश्चिम हरिता दिगंतराल तसें ॥
इतर दिशा ऊर्ध्व अधः सुरगण हो, हेंहि सर्व मीच असें ॥१३॥
गायत्री सावित्री तेवि स्त्री पुन्नपुंसि अहमस्मि ॥
त्रिष्टुब्जगत्यनुष्टुप्पंक्ती छंदांत मी श्रुतिसमस्ति ॥ १४ ॥
अतिशांत सर्वगामी त्रेतानल गुरु तथैव गुरुकर्म ॥
गौरी गव्हर अंबर जगव्यापक मी कळो तुह्मां वर्म ॥१५॥
ज्येष्ठ सुरश्रेष्ठ तसा अवशिष्टहि राघवा स्रवंतीश ॥
मी आर्य श्रीभगवान् तेज समीरण तथा असें ईश ॥ १६ ॥

ऋग्वेद यजुर्वेदहि सामश्रुति आत्मभू तथाथर्व ॥
त्यापरि सुमंत्रशास्त्रचि सुर हो अंगिरसमंत्र मी सर्व ॥ १७ ॥
इतिहासपुराणेंही मी सूत्रें सूत्रधारि भूस्वामी ॥
कृत मनुजें स्तुत्योऽहं तद्वत उपनिषद्रूप विद्या मी ॥ १८ ॥
मीच श्लोक हि सूत्रें व्याख्यानें जाण सूर्यवंशिसुत ॥
गांधर्वादिक विद्या यागाहुति मी तथैव मीच हुत ॥ १९ ॥
दत्तादत्तहि तैसा वैवस्वत लोक मीच परलोक ॥
संपूर्ण भूतनाशक खगगामी शांति दांति मी एक ॥ २० ॥
सर्वश्रुतिगुह्य तसा अज मी आरण्य मीच श्रुणु कथितों ॥
शुचि पुष्कर मध्यहि मी त्यापरि त्याहूनि मीच जो पर तो॥२१॥
अंतर्बाह्य पुरस्तात् अविनाशी तमहि मी प्रभा नृपते ॥
कर्मविषयेंद्रियें मी तैसाची मी अपंचिकृत भूतें ॥ २२ ॥
प्रज्ञाहंकार तसा संपूर्णहि विषय मीच गा रामा ॥
ब्रह्मा विष्णु महेशहि मी दुर्गा विघ्नराज शरजन्मा ॥ २३ ॥
शमनानल शतमन्यू वरुणहि मारुत कुबेर मी निर्ऋति ॥
ईशान मी तसे भूर्भुवादिही सप्तलोक मी नृपती ॥ २४ ॥
पृथ्वी सलिलहि आतप मीच समीरण तथैव मी गगन ॥
मी चंडकिरण उडुपति नक्षत्रें ग्रहहि राघवा जाण ॥ २५ ॥
मी प्राण काल मृत्यू तैसाचि अमृत्यु तोहि मी आहें ॥
भूतहि भविष्य भव्यहि सर्वांतर्व्यापि सर्व मी जग हें ॥ २६ ॥
ॐ आदि मध्यही मी तैसा मी भूर्भुवादि जे लोक ॥
गायत्रीशीर्ष जपीं मी, यास्तव विश्वरूप मी एक ॥२७॥
मी अशित पायित तसा सीतामनमोहना कृताकृत हें ॥
पर मी तेवि अपरही, सकलांचें स्थान मीच तें आहें ॥२८॥
दिव्य जगद्धित मी, मी अक्षर, मी सूक्ष्म, मीच अविनाशी ॥
ग्राह्य श्रेष्ठ पवित्र प्रजापती देवताहि सोम तशी ॥ २९ ॥

मी उपसंहारकही श्रेष्ठ ग्रासक सुतेज-ठेवा मी ॥
वसतोंचि देवतत्त्वें प्राणत्वें जंतुच्या हृदयधामीं ॥ ३० ॥
ज्याचें उत्तरदिक् शिर आवाची पाद राम शृणु कथितों ॥
तैसा तत्सर्वोत्तर साक्षादोंकार मी त्रिमात्रक तो ॥ ३१ ॥
स्वर्गीं नेणारा मी कर्ताही मी तथा अधःपात ॥
ओंकार यदर्थेचि मी नित्य सनातन धरासुताकांत ॥ ३२ ॥
जो ब्रह्मा सवकर्मीं विप्रांतें वेदमंत्र सुचवीतो ॥
ऋग्यजु सामादिक मी, तेणें प्रणव स्वतास ह्मणवीतों ॥३३॥
व्यापुनि घृतादि रस ते रघुवीरा जेवि मांसपिंडाला ॥
देती शुक्रा रुधिरा, व्यापीं मी तेवि सर्व लोकांला ॥ ३४ ॥
ब्रह्मा श्रीपति भगवान् यांतें मम आदि अंत कळला न ॥
तैसाचि इतर विबुधां, ह्मणती मजला अनंत बा ह्मणुन ॥३५॥
गर्भजननमृत्युजरासंसारसुभीतिसागरांतून ॥
रक्षीं भक्तांतें मी, ह्मणती तारक तदर्थ हें जाण ॥ ३६ ॥
उद्भीजादि चतुर्विध देहहृदायें मीच होउनी सूक्ष्म ॥
वसतोंचि जीवरूपें, यास्तव ह्मणतात गा मला सूक्ष्म ॥ ३७ ॥
दीर्घ तमीं बुडणाऱ्या निजभक्तातें प्रकाश मी देतों ॥
विद्युद्वदतुलरूपें, तेणें वैद्युत असोंचि ह्मणवीतों ॥ ३८ ॥
संहृत उत्पन्नहि मी करितों एकाकि सर्व लोकांतें ॥
प्रेक्षक पार्श्वां ग्राहक, यास्तव ईश्वर नृपान्यलोकांतें ॥ ३९ ॥
राहे न दुजें मजविण चौथें जें ब्रह्म मी स्वयें तेंची ॥
प्राण्यांच्या आत्म्यातें आकर्षक एक रुद्र तो मीची ॥४०॥
मी ईश शक्तिनेंची वागवितों सर्व लोक भूस्वामी ॥
या जंगम जगताचें स्वर्गद्रष्टाहि चक्षुरीश्वर मी ॥ ४१ ॥
अव्याहत सर्वांचा जो ईशान रघुवीर तो मीच ॥
तेवि सकल विद्येचा आहें ईशान मीच वेदवच ॥ ४२ ॥

संपूर्ण भाव पाहुनि मी आत्मज्ञानबोध मग करितों ॥
अतितानातित योगा जातों, भगवान् यद्र्थ ह्मणवीतों ॥४३॥
रामा, पुनः पुनः निज मायें उत्पन्न नाश आकलन ॥
संपूर्णहि लोकांचें करितों, ईश्वर ह्मणून मी जाण ॥ ४४ ॥
अत्यंतात्मज्ञानें योगैश्वर्येंचि जाणतों भाव ॥
होतों पूज्योत्पत्ती रक्षण कर्ताचि मी महादेव ॥ ४५ ॥
सकलादि जाहलेला गर्भीं उत्पन्न मीच गा पुढती ॥
होणार जन विरुद्धहि सर्वोऽस्म्येषास्ति देववेदोक्ती ॥ ४६ ॥
मी सर्वसाक्षि वक्ता विश्वार्थ बहु प्रयत्न कर्ता मी ॥
सर्वस्थलगामी मी सर्वप्रेरक विताहि नभ भूमी ॥ ४७ ॥
मी विश्वव्यापि वसें बालाग्रचि मात्र जंतुहृदयातें ॥
विश्वाधिष्ठानहि मी विश्वांतर्यामि पात्र मी स्तुतितें ॥ ४८ ॥
जे अंतरग माझें जाणति त्यां शांति शाश्वतीच मिळे ॥
रविवंशमुकुटसुमणे रामा, इतरांसि तेवि ती न मिळे ॥ ४९ ॥
मी प्रतिहि योनि ठायीं वसतों, तैसेंचि पांचभौतिक हें ॥
संपूर्णहि जग माझे अंशानें पूर्ण कोंदलें आहे ॥ ५० ॥
ईशान पुरुष देवहि मी, ऐसा जो विचारवंत नर ॥
अत्यंत शांतितें तो पावे, कोदंडपाणि रघुवीर ॥ ५१ ॥
ज्याचे मनिं अशनेच्छा तैशी तृष्णा क्षमाहि आहेत ॥
मानसचिन्ह असें जें वदती प्राणांत वा नृपात्म्यांत ॥ ५२ ॥
जे हेतुजालमूळा तृष्णा छेदूनि बुद्धिवीर्यानें ॥
ठेविति समग्र व्यापक मयि चित्ताभ्यास नित्य योगानें ॥५२॥
ऐसे जे मद्ध्यायक भजती मज, शांति शाश्वती त्यांची ॥
होई वसुधाकन्यामानसहरणा, न तेवि इतरांची ॥ ५४ ॥
फिरल्या सहमन वाणी यत्स्तुति अप्राप्य जाणुनी मागें ॥
आनंद ब्रह्म मला जाणति त्यांतें न कांहिं भय लागे ॥५५॥

कैवल्यज्ञानोत्तममद्वाक्यातें समग्र परिसूनी ॥
मम नामजपसुकर्तें मद्ध्यानपरायणादि ते यजनीं ॥ ५६ ॥
गेले पूर्ववतचि ते मत्सायुज्या स्वकीयदेहांतीं ॥
दिसती पदार्थ जे जे, ते सर्वहि मद्विभूतिचे असती ॥ ५७ ॥
यापरि माझे ठायीं जन्मति संपूर्ण, तेवि वसतात ॥
होतो लय सकलांचा, आहें मी ब्रह्मची सदाऽद्वैत ॥ ५८ ॥
अण्वधिक अणूही मी तेवि, महानाहुनी महान असें ॥
संपूर्ण विश्वव्यापक मी, प्रापंचिक उपाधि मजासि नसे॥५९॥
असुनी अपादकर मी, मच्छक्ती बहु अशक्य जाणाया ॥
अवलोकितों अचक्षुहि, कर्णहि न परंतु शक्त परिसाया॥६०॥
संपूर्ण जाणतों मी, परि वेत्ता मद्विविक्त रूपा न ॥
ज्ञानसुसंपन्न सदा मी दाशरथे रघूत्तमा जाण ॥ ६१ ॥
संपूर्ण वेद मी ते जाणाया पात्र, मीच वेदांत ॥
झालों मम ठायीं मी, तैसा वेदज्ञ मी, सिताकांत॥ ६२ ॥
दुष्कृत सुकृत मज नसे, तैसा होय न कदाहि नाश मम ॥
मज इंद्रियें न बुद्धी, त्यापरि मज देहही नसे जन्म ॥ ६३ ॥
न मला गगनोदकभू-अनिलानल पंच जीं महाभूतें ॥
ऐसा निर्मल अव्यय गव्हरशयनी महात्मरूपातें ॥ ६४ ॥
तैसाचि सर्वसाक्षी शुद्धहि परमात्मरूप तो मीच ॥
सदसद्विहीन, ऐसें जाणावें, रामचंद्र, एक वच ॥ ६५ ॥
जे माझ्या ऋत रूपा ऐशा जाणति, रघूत्तमा, नर ते ॥
कैवल्यसौख्य नाकीं लाधति रामा तसें फलासहिते ॥६६॥

अध्याय ७ वा.

श्रीराम ह्मणे, भगवन्, म्यां पुशिलें तें तसेंचि राहियलें ॥
मत्प्रश्नोत्तर तुमच्यापासुनि मजला अहो न तें मिळलें ॥ १ ॥
तुझिया नियमित देहीं पृथ्वी-आपादि पंचभूतांचा ॥
कैसा उत्पत्तिस्थितिलय हा, संदेह वारि चित्ताचा ॥ २ ॥
देवा, निजाधिकारासह सुर तव देहिं राहिले केवी ॥
संपूर्ण बहिर्मुख तूं कैसा भुवनें चतुर्दशहि तेवी ॥ ३ ॥
तद्विषयीं त्वद्वक्त्रें परिसुनि संदेह ये महा मजसी ॥
अप्रत्यायितमानस-संशयनाशासि योग्य तूं असती ॥ ४ ॥
भगवान् ह्मणती, रामा, जैसा वटवृक्ष सूक्ष्म वटबीजीं ॥
राहे सदैव, कोठुनि ये तो? त्यापरि असे कृती माझी ॥ ५ ॥
कोदंडपाणि रामा, पावति मम ठायिं सर्व लय भूतें ॥
जलिं सैंधवपिंड जसा धरितां पावे महाहि विलयातें ॥ ६ ॥
न दिसे पुनरपि, परि तो करितां पाकास पूर्वसम दिसतो ॥
रविमंडलाचिपासुनि प्रातःकाळीं दिसे जसा जन तो ॥ ७ ॥
त्यापरि मजपासुनिची स्थितिलय-उत्पत्ति होय जगताची ॥
जाणीं संपूर्ण तसें, सुव्रत रामा, मदीय देहींची ॥ ८ ॥
राम ह्मणे, कथितां परि देवा ज्यातें दिशाभुली पडली ॥
तद्भ्रम जसा न निरसे, काय करूं, मत्स्थिती तशी घडली ॥९॥
भगवान् ह्मणे, चराचर जग हें मम ठायिं वर्ततें कैसें ॥
अवलोकनासि हें तव चक्षुर्द्वय राघवा समर्थ नसे ॥ १० ॥
अत एव, रामचंद्रा, देतों तुज दिव्य चक्षु भूलोकीं ॥
तेणें त्यागुनि भीती मत्तेजोमंडलासि अवलोकी ॥ ११ ॥
असमर्थ चर्मचक्षू बा मत्तेजःप्रकाश देखाया ॥
मदनुग्रहाविना ते वृंदारक मर्त्य तेवि रघुराया ॥ १२ ॥

सूत ह्मणे, वदुनि असें दिव्य नयन त्या महेश्वरें दिधले ॥
अवलोकितां तयानें तन्मुख पातालतुल्यसें दिसलें ॥ १३ ॥
कोटी सौदामिनिपरि अत्युग्र भयंकर प्रकाशातें ॥
पाहुनि भयार्त राघव ठेवी निज जानु मेदिनीवरते ॥ १४ ॥
वंदी पुनःपुनः तो संतुष्टोक्त्या करि स्तुती तैसी ॥
उठुनी मग वीरमणी लागे हो जों तदा पहायासी ॥ १५ ॥
तों इंदुमौलिवदनीं ज्वालापंक्तींत कोटि ब्रह्मांडें ॥
दिसती चटकापरि हो, पाहे मुनिवर्य राम तो तिकडे ॥ १६ ॥
मंदारमेरुविंध्यादिक पर्वत, तेवि सप्त सागर ते ॥
सोमप्रभाकरादिक दिसती सुर, पंचही महाभूतें ॥ १७ ॥
विपिनें, महाफणि, तशीं प्रतिब्रह्मांडीं चतुर्दशहि भुवनें ॥
दिसती आननिं त्यातें, अवलोकिलिं तीं धरासुतारमणें ॥ १८ ॥
संग्राम देवदनुंचा झालेला, तेवि पुढति होणार ॥
श्रीहरिदशावतारा तत्कर्मातें विलोकि रघुवीर ॥ १९ ॥
त्रिदिवेशपूर्वजन्मां गिरिकन्यावरकृतत्रिपुरदाहा ॥
उद्भूतानुद्भुत लय होय तसा, त्याहि पाहि वीर महा ॥ २० ॥
झाला भयार्त राघव, करि साष्टांगें पुनः पुनः नमन ॥
तत्त्वज्ञानहि लाभे मिथिलापति जनककन्यकारमण ॥ २१ ॥
नंतर उपनिषदांच्या सारार्थें तो करि स्तुती राम ॥
त्या श्रीमहेश्वराची, जो दे शरणागतासि आराम ॥ २२ ॥
देवा प्रसन्न व्हावें, नतपीडाहरण आपगेंदुधरा ॥
विश्वेश विश्ववंद्या, या दीना भवसमुद्रपार करा ॥ २३ ॥
झालें जग तुजपासुनि, वसती भूतें सदा तुझ्या हृदयीं ॥
पावति विलया तैसीं, वृक्ष लता जेवि भूमिचे ठायीं ॥ २४ ॥
विधिरुद्रेंदुमरुद्गण वृंदारक यक्ष सिद्ध गंधर्व ॥
वसती त्वद्वक्त्रिं तशीं गंगादि सरिज्जलाशयें सर्व ॥ २५ ॥

त्वन्मायाविरचित जग, तुझिया ठायींच शंभु तें दिसतें ॥
सर्व भ्रमें परि मृषा, रज्जौ अहि जेवि रौप्य शुक्तीतें ॥२६॥
भरलें जग तव तेजें तेजःप्रद करिसि तूं प्रकाशातें ॥
तव तेजावांचूनियां देवा क्षणमात्र ही न तें दिसतें ॥ २७ ॥
राहे महान लघुंत न, विंध्याद्री कोंडवेल अणुंत कसा ॥
आहे जग तव वदनीं करितों निश्चय तव भ्रमें ऐसा ॥२८॥
होतो महाभयप्रद जेवि मनातें भुजंग रज्जूचा ॥
तो तींत परी न असे, होय न तैसाचि नाशही त्याचा॥२९॥
करितां विचार वाटे भवदाधारीं असे जगवृंद ॥
तेंही मदविद्येनें, परि असशी पूर्ण सच्चिदानंद ॥ ३० ॥
पूर्तादिसुक्रियाफल देसी उपभोगकास तें विहित ॥
ऐसें वचन अनृत तें, तुझियापासुनि न भिन्न किंचीत ॥३१॥
अज्ञानमूढ मुनि ते वदती, पूजादि बाह्य उपचारें ॥
तोषसि तूं, हें मिथ्या, शून्याकृति तुजासि हेतु केवि हरे॥३२॥
किंचित् पर्णादिक तुज अर्पियल्या तूं महेश्वरा देसी ॥
त्रैलोक्यश्रीहि जना, हें अज्ञत्वेंचि भासतें मजसी ॥ ३३ ॥
भगवन्, व्यापियलें त्वां एकाकी सकल विश्व तेवि दिशा ॥
तव हानि न तन्नाशें, जसि घटनाशें न हानि आकाशा ॥३४॥
जलपूरित पात्रीं बहु दिसती बिंबें अनेक जशिं रविचीं ॥
त्यापरि, देवा, छाया अंतःकरणांत राहते तुमची ॥ ३५ ॥
विश्वोत्पत्तिलयावनिं किंचितही बा नसे तुजाशिं कार्य ॥
परि जंतुपूर्वकर्में करिसी स्वज्ञेव वृद्धि देवार्य ॥ ३६ ॥
सूक्ष्म स्थूल जडाजड तनु आत्म्यावांचुनी न ती असते ॥
यास्तव सुख दुःख सदा करिसी श्रुतिवाणि तूं असें ह्मणते ३७
सच्चित्सागरहंसा कालात्मक कालकाल नमन तुतें ॥
संहारक सर्वांच्या हे मिथ्या चित्तवृत्ति उपभोक्ते ॥ ३८ ॥

सूत म्हणे, ऐशापरि अग्रस्थित बद्धपाणि विस्मित तो ॥
करुनी प्रणाम राघव परमेश्वर चंद्रमौलितें ह्मणतो ॥ ३९ ॥
राम ह्मणे, विश्वात्म्या, तव जगदैकात्म्य--विश्वरूपातें ॥
जाणावया महेशा होते कारण तवानुकंपा ते ॥ ४० ॥
श्रीमज्जगदीश ह्मणे, रविकुलभूषण रघूत्तमा पाहीं ॥
या संपूर्णहि लोकीं मजवांचूनि अन्य तें नसे कांहीं ॥४१ ॥
सूत ह्मणे, कथुनि असें करि उपसंहार भर्ग निज देहीं ॥
ब्रह्मादि देवतांचा; मीलितदृग् नृप सहर्ष जों पाही ॥ ४२ ॥
तों पर्वतशिखरावरि पंचाननचर्म–आसनावरतें ॥
अवलोकी कोदंडी त्र्यंबक शितिकंठ पंचवदनातें ॥ ४३ ॥
शार्दूलचर्मपटधर चर्चित सुविभूति सर्व अंगाला ॥
फणिकंकणनगमंडित धरि अहियज्ञोपवीतसूत्राला ॥ ४४ ॥
विद्युत्पिंगजटाधर शोभे उपवस्त्र व्याघ्रचर्माचें ॥
एकाकि चंद्रमौली अभयवरद पाणि शोभती ज्याचे ॥ ४५॥
खंडपरशुमृग हस्तीं तेवि चतुर्भुज महेश विश्वपती ॥
तस्याग्रिं तदाज्ञेनें बैसे करुनी प्रणाम तो नृपती ॥ ४६ ॥
देव ह्मणे मग, रामा, इच्छिसि जें चित्तिं सर्व तें पूस ॥
मजवांचुनि अन्य नसे दाशरथे राघवा गुरू तूस ॥ ४७ ॥

अध्याय ८ वा.

पुशि राम, पांचभौतिकदेह-स्थिति-जनन-हानि होय कसी ॥
या लिंगदेहि, भगवन् तद्रूपकथनासि योग्य तूं असती ॥ १ ॥
शिव ह्मणति, पंच भूतें मिळुनी बा देह पांचभौतिक हा ॥
त्यांत प्रधान पृथिवी, तेजादिक इतर साह्यभूत पहा ॥ २ ॥
स्वेदज उद्भिज जारज अंडज हे चार भेद शरिराचे ॥
कथिलें तें शरिर असें पृथ्वीआपादि पंचभूतांचें ॥ ३ ॥
पंचम मानसविग्रह, तो देवांचा असे, नृपा, जाण ॥
कथितों त्याविषयिं अधीं, जो जारज मुख्य देह त्यांतून ॥ ४ ॥
शोणितशुक्रापासुनि होते, रामा, जरायुजोत्पत्ती ॥
शुक्र स्त्रीगर्भाशयिं ऋतुकालीं तें पडेल जरि, तरि ती ॥ ५ ॥
ऋतुवंती स्त्री असतां होतो उत्पन्न देह जारज तो ॥
रज-बाहुल्यें योषित्, शुक्राधिक्यें पुमान तनु होतो ॥ ६ ॥
त्या शुक्रशोणिताच्या साम्यत्वें क्लीब होय निर्माण ॥
आदित्यवंशकेतो जनकसुताचित्तरंजना जाण ॥ ७ ॥
ऋतुवंती नारीचा तुर्यदिनापासुनी ऋतूकाल ॥
दिन षोडश पर्यंताचि कथिला आहे वसुंधरापाल ॥ ८ ॥
युग्मदिनिं पुरुष होतो, होतो स्त्री तो अयुग्मदिनिं देह ॥
षोडश दिनिं गर्भ जरी राहे, नृप होय तो, न संदेह ॥ ९ ॥
ज्याचें मुख ऋतुवंती पाहूं इच्छी तदाकृती बाल ॥
होतो, स्त्रीनें यास्तव अवलोकावें स्वकांतमुखकमल ॥ १० ॥
ह्मणती जरायु स्त्रीच्या उदरांतिल सूक्ष्म चर्मकोशातें ॥
त्यांत रुधिरशुक्राच्या संयोगानें शरीर उद्भवतें ॥ ११ ॥
होतो गर्भ जरायुंत, यास्तव ह्मणती जरायुजाचि त्यातें ॥
अंडज सर्पखगादिक, गणिले स्वेदजाचि कीटकादिक ते ॥ १२ ॥

उद्भिज गुल्मलतादिक, तैसे देव मुनि मानसोद्भूत ॥
या ठायीं जन्म सदा, रामा, कर्मानुरूप तो होत ॥ १३ ॥
शुक्ररज आदिमासीं गर्भालयिं राहतें द्रवी रूप ॥
तैसेंचि कलल बुद्बुद होतें घन मग सचित्त श्रुणु भूप ॥ १४ ॥
तो घन द्वितीय मासीं होत असे पिंड, राघवा, कोशीं ॥
पाणिचरणशीर्षादिक होती उत्पन्न तीसरे माशीं ॥ १५ ॥
होई चवथे मासीं जीवाभिव्यक्ति लिंगदेहास ॥
मग जननीजठरीं तो लागे गर्भ स्वयें फिरायास ॥ १६ ॥
दक्षिण कुक्षिंत नंदन, कन्या वामींच राहते जाण ॥
राहे नपुंसकचि तो उदराचा मध्यभाग व्यापून ॥ १७ ॥
जरि गर्भ पुमान् असला, दक्षिण पार्श्वीं प्रसू शयन करिते ॥
होती अंगोपांगें एका समयींच मासिं त्या चवथे ॥ १८ ॥
श्मश्रू दंतादिक ते जन्मामागूनि होति निर्माण ॥
तदितर अवयव चवथे मासीं ते व्यक्त होति वा जाण ॥ १९ ॥
स्थिर गर्भ पुमान् असतो, स्त्रीजाती गर्भ राहतो भितरा ॥
तेवि नपुंसक गर्भा होती द्वयभाव मिश्र रघुवीरा ॥ २० ॥
करितो विषयमनोरथ जे मातोदरिंच गर्भ तो तेवी ॥
करि वांच्छा प्रसु, यास्तव गर्भसुवृद्ध्यर्थ शीघ्र पुरवावी ॥ २१ ॥
म्हणती दौहृदिनी तिस, वा ह्मणती द्विहृदयांगना तीस ॥
पुरतिन जरि तद्दोहद, तरि येते व्यंगताचि गर्भास ॥ २२ ॥
करिते कीं विषयेच्छा जननी, तेणेंच आर्त सुत होतो ॥
चित्त प्रबुद्ध मासीं पंक्त्यर्धे, मांसशोणितें स्थुल तो ॥ २३ ॥
आस्थि स्नायु नखर कच लोमांकुर व्यक्त साहवे मासीं ॥
बलवर्णवृद्धि सप्तम मासाप्रति अंगपूर्णता त्यासी ॥ २४ ॥
कर्णा आच्छादुनि कर असती पादांतरांत गर्भाचे ॥
उद्विग्न गर्भवासें राहे, भययुक्त चित्त तें त्याचें ॥ २५ ॥

मग गर्भदुःखयुक्त प्रकटज्ञानी पुनः पुनः शोक ॥
पश्चात्तापयुत करी स्वात्मीं हा हा ह्मणून बहु दुःख ॥ २६ ॥
बहु तप्त उदर अनलें जो पित्ताख्य रसाबिंदुवृंद अती ॥
गर्भाशयीं विरत मी मत्कोमलविग्रहास तो दहती ॥ २७ ॥
ज्या कूटशाल्मलिद्रुमकंटकपरि जठरकीटकास्यांनीं ॥
व्यथित बहू, तैसाची जननीच्या कुक्षि-अस्थिक्रकचांनीं ॥२८॥
गर्भी जठराग्नीनें दीपित दुर्गंधयुक्त जें मज तें ॥
देतो यदधिक न असे यमलोकीं दुःख कुंभिपाकज तें ॥२९॥
प्राशुनि पू श्लेष्मासृग् वमनाशन तेवि भक्षुनी जीवा ॥
अशुची कृमिभाव महा होतो उपलब्ध जो न तो बरवा ॥३०॥
म्यां गर्भाशयिं असतां अनुभविलें दुःख जेवि त्यापरिस ॥
नरकींचें अधिक नसे, संपूर्णहि दुःख, राघवा, परिस॥३१॥
एवं पूर्वप्राप्ता तो बहुविध जाति यातना स्मरुनी ॥
मोक्षोपायाभ्यासी राहे ध्यानस्थ शांत मन करुनी ॥ ३२ ॥
जें पीत रक्त पांडुर हृदयोद्भव जीवनास कारण तें ॥
ओजहि अष्टम मासीं कर्णयुगल चर्म तेवि उद्भवतें ॥ ३३ ॥
तें चंचलोज मातोदरिं गर्भाप्रति पुन्हा पुन्हा धावे ॥
यास्तव अष्टम मासिं न ओज-रहित गर्भ जन्मल्या जीवे॥३४॥
तो किंचित्कालें स्थिर राहे श्रांतागसा सुसंस्कारें ॥
तत्प्रसवकाल होतो नवमासापासुनी रघूत्तम रे ॥ ३५ ॥
प्रसु-अस्त्रवहा नाडी करुनी आश्रयाचि गर्भनाल वसे ॥
जी माता रक्षणरसवाहिनि तेणेंचि गर्भ नाल वसे॥३६॥
जननी-आहाररसें पोषित तैसाचि अस्थियंत्रानें ॥
बहु पीडित गर्भ पडे पृथ्वीवरि मातृकुक्षिपंथानें ॥ ३७ ॥
मेद-रुधिरलिप्ततनू तो परिवेष्टित जरायुनें तेवी ॥
प्रसु-उदरबाह्यगामी दुःखि अधोवदन रुदत दीर्घ रवीं ॥ ३८ ॥

होतां उदरविमुक्तचि करुनी ऊर्ध्वास्य भूमिपृष्ठिवरी ॥
न समर्थ आत्मरक्षणिं तो पावे पतन मांसपिंड परी ॥३९॥
श्वानविडालादिक त्या दंष्ट्रींपासाव रक्षिती स्वजन ॥
मानी दनुस पित्यासम, तैशी निजमातृतुल्य डाकीण ॥४०॥
यावत्श्लेष्माच्छादित धमनि सुषुम्ना वसेचि गर्भाची ॥
तावत्काल न येते गर्भाला शक्ति व्यक्त वर्णाची ॥ ४१ ॥
यास्तव गर्भाशयिं तो होतो, रामा, न शक्त रुदनास ॥
होतां प्राप्तचि यौवन बहु उद्धत तेवि वश्य मदनास ॥४२॥
करि गायन दीर्घरवें तैसाची वल्गना अकस्मात ॥
वेगें चढे तरुवरी, होतो उद्विग्न तो पळें शांत ॥ ४३ ॥
कामक्रोधमदांहीं पाही कवणा न अंध होऊनी ॥
अस्थी मांस शिरांचे स्त्रीचे आसक्त पंचशरसदनीं ॥ ४४ ॥
तें कामालय राहे मंडुकच्छिन्नोदरापरी अशुची ॥
परि मन्मथाशुगार्ती करितो बहु आपणासि पीडितची ॥४५॥
अस्थित्वग्मांसशिरांविण देहीं अन्य वर्ततें काय ॥
परि ललनामायेनें किंचित जगता न पाहि रघुराय ॥४६ ॥
हा मृगनयनादेहांतुनि जातां प्राणवायु मग तीतें ॥
षट्पंचवासरांतीं नेत्रेंही पाहवेन मनुजातें ॥ ४७ ॥
होतां प्राप्त जरा ती केवल जी स्थल महापमानाचें ॥
श्लेष्में उदर भरूनी होय न तैं पचन भक्षितान्नाचें ॥ ४८ ॥
गलित रद, मंद दृष्टी, तैसा भक्षी कषाय कटु तिक्त ॥
कटि कंठ भुग्न वातें, होतो कर ऊरु पदिं बलासक्त ॥ ४९ ॥
बहु व्याप्त गदें शतशः, अवमानित तेवि बंधुवर्गानें ॥
अशुचि मलें दिग्ध तनू, परिरंभित दृढ महान उषितानें ॥५०॥
होउनि अस्थिर चित्तीं ध्यायी चित्तीं महान भोगांला ॥
सर्वेंद्रियक्रियाहिन बहु हास्यास्पदहि होय तो बाळां ॥५१॥

मग दृष्टांतरहित जें मृत्यूचें दुःख होय तें प्राप्त ॥
यास्तव मृत्युव्यथेनें होतो प्राणी महाभयें लिप्त ॥ ५२ ॥
नेतो जंतुस मृत्यू जरि आलिंगितहि बंधुवर्गाहीं ॥
जैसा नागांतक ने झडपुनि सागरजलांतरस्थ अही ॥५३॥
हा कांते! हा पुत्रा! हा धन! ऐसा भयंकराक्रोश ॥
करि बहु, परि मंडुकसा गिळि यमफणि लावितां न अवकाश५४
प्राणानिल मर्मांतुनि जातां, तैसाचि संधि भेदूनी ॥
जी पीडा म्रियमाणा होते, जाणावि ती मुमुक्षूंनीं ॥ ५५ ॥
दृढबद्ध मृत्युपाशें, गतदृष्टी, तेवि चेतनारहित ॥
त्यातें रक्षणकर्ता होय न उपलब्ध, राघवा, महित ॥ ५६ ॥
आच्छादित यमपटलें, तैसाची अल्पसावध स्वांतीं ॥
पाचारितांहि आप्तें तो पाहे दीन चक्षुंनीं वरती ॥ ५७ ॥
आकर्षती स्वबांधव मायापाशें, कृतांत निजपाशें ॥
त्या जंतुलिंगदेहा मग तो प्राणी विलोकि दाहि दिशे ॥५८॥
पीडित हिक्काबाधें, झाला बहु शुष्क कंठ तो श्वासें ॥
आकळिला मृत्यूनें, त्यातें त्राताचि निश्चयें न दिसे ॥ ५९ ॥
संसृतियंत्राधिष्ठित, आकर्षित शमनकिंकरें पाशीं ॥
'करुं गमन कुठे' ऐसें करि तो अत्यंत दुःख चित्तासी ॥६०॥
'काय करूं, जाउं कुठे, त्यागूं स्वीकारुं काय काय,' असे ॥
नाना विचार करितां होउनि कष्टी निजासु सोडितसे ॥६१॥
यमकिंकरें प्रकर्षित हृद्वारासी सूक्ष्म यातनादेह ॥
यमयातना यमपुरीं भोगी सकला त्यजून लोक इह ॥ ६२ ॥
तत्रोपलब्ध पीडा वर्णाया ती समर्थ तो कवण ॥
कर्पूरचंदनानें परिलेपित जें सदैव चिर गणुन ॥ ६३ ॥
जें भूषणें सुभूषित, आच्छादित बहु सुचित्र वासांनीं ॥
अवलोकनार्ह, परि तें होतें अस्पर्श त्यागितां असुंनीं ॥६४॥

काढिति निलयांतुनि तें स्थापिति पलमात्रही न गेहांत ॥
जाळुनि मग काष्ठभरें त्याचें क्षणमात्रिं भस्म करितात ॥६५॥
अथवा भक्षण करिती कुक्कुट वायस शृगाल गृध्रादी ॥
कोटी शत जन्मांहीं पुनरपि तें, राघवा, दिसे न कधीं ॥६६॥
माता पिता स्वजन गुरु माझे माझे ह्मणे असें, परि तें ॥
होईल केंवि सत्यचि, माया जगतांत कीं अनृत दिसते ॥६७॥
यास्तव तो एकाकी निजकृतकर्मानुसार करि गमन ॥
हा जीवलोक आहे जैसा विश्रामवृक्ष एक वन ॥ ६८ ॥
सायंसमयीं जैसे जमती पक्षी निवासतरुवरतीं ॥
प्रातः स्वस्वपथानें तैसे ज्ञाती-समूह ते जाती ॥ ६९ ॥
मृतिबीज जन्म होतो, जन्माचें मृत्यु हा असे बीज ॥
घटयंत्रातुल्य फिरे अव्याहत तो पुनःपुन्हा मनुज ॥ ७० ॥
गर्भोत्पत्तीपासुनि कथिलें आमरणकालपर्यंत ॥
त्या दीर्घ दुःखसंगा, अन्य न, करि मद्यौषधी अंत ॥७१॥

प्रकरण २० वें.

श्रीगंगालहरी.

शिखरिणी.

प्रणामा साष्टांगीं करित गणनाथांघ्रिकमला ॥
अघग्रावाचें जी करि हनन गंगा सुविमला ॥
जगन्नाथें केली स्तुतिलहरि तीची कविवरें ॥
यथाशक्ती तीतें अनुसरत मी प्राकृत गिरें ॥ १ ॥

विनाशो गंगेचें सकलमहि-सौभाग्यद जल ॥
शिवश्रीरूपी जें, श्रुतिमथित आसार सकल ॥
वृषादी देवांचें सुकृत, अमृतातुल्य मधुर ॥
अमृत्युत्वातें दे, द्रुत मम हरो पापनिकर ॥ २ ॥

महीलोकीं एक्या समयिंहि तवौघासि नयनीं ॥
विलोकीतां दैन्याघकुमति नुरे, जाय विरुनी ॥
अविद्यावृक्षच्छेदन गुरुपरी बोधहि करी ॥
समर्पो वित्तातें, अवधि न करो तो क्षणभरी ॥ ३ ॥

प्रभातार्कारक्तप्ररुचिसम रक्ताक्षयुगला ॥
मृडानीदेवीच्या बघुनि लघुसापत्नकृतिला ॥
शिरःस्था श्रीगंगा--लहरि पशुपाच्या भययुता ॥
सकंपा त्या नाशो सकलहि भया तेवि दुरिता ॥ ४ ॥

तवाधारें, गंगे, प्रचुर अविचारें मदभरें ॥
अवज्ञा म्यां केली विबुधसमुहाची स्वशरिरें ॥
मदुद्धाराठायीं जरि मनिं उदासीन वससी ॥
तरी कोणापाशीं करुं रुदन तूं सांग मजसी ॥ ५ ॥

तुझी मूर्ती, माते, स्मरण करितां किल्बिषि नरें ॥
तमः शुभ्रांशूची द्रुतरुचि अविद्यातम हरे ॥
तवांबु प्रीतीनें अमरसरणी सेवन करी ॥
हरो तापाघाली त्रिविध तव नीरौघलहरी ॥ ६ ॥

दयासिंधो गंगे, तपन--उदयीं भूपरमणी ॥
करीती स्नानातें, कुचयुगलकस्तूरिसरणी ॥
मिळे त्वत्तोयातें, ह्मणुनि मृग ते नंदनवनीं ॥
यथेच्छ क्रीडेतें करुनि वसती दिव्यवपुंनीं ॥ ७ ॥

तुझ्या सन्नामातें स्मरण करितां एक समयीं ॥
तसें गातां पापें हरति, जडते शांति हृदयीं ॥

श्रुतीतें लागे जें खचित मधु ' गंगा ' पद असें ॥
मदीयांतीं होवो मम वदनिं तें शोभनियसें ॥ ८ ॥

तुझ्या तीरीं क्रीडा करुनि खग जे काक वसती ॥
सुखाची स्वर्गाच्या मनिं कधिं न वांच्छाहि करिती ॥
निवासी जे तीरीं पुनरपि न त्यां जन्ममरण ॥
करो तें, हे गंगे, निखिल अमुचें कष्टहरण ॥ ९ ॥

न जाणे प्रत्यक्ष श्रुतिहि सकलाभेदरहिता ॥
कळे चित्तोक्तीतें नचि, जननिचा ठाव पुरता ॥
असें जें चिद्ब्रह्म, त्रिदशनदि, तें तूंच असती ॥
दुजे सृष्टी-ठायीं क्षर विषय, त्यां तुल्य नससी ॥ १० ॥

महादानें ध्यानें यजनसुतपें मोक्ष न मिळे ॥
परी सर्वां देसी समतरपणें तूं निजबळें ॥
कराया गे तूझी जगिं कवण तो योग्य तुलना ॥
असे आम्हांलागीं, जननि, करि तें तूंचि कथना ॥ ११ ॥

समग्रक्ष्माराज्या त्यजुनि तृणसे लोक वसती ॥
जिथे विश्वप्राणें प्रचुर हलती वेतसतती ॥
अशा सांद्रच्छायातटिं अमृततुल्योदक पिती ॥
तदानंदश्रेणी सुखद दिव-मार्गाहि हसती ॥ १२ ॥

शिवासापत्नत्वें जनित शिवचित्तीं मलिनता ॥
न ती झाली तीचें त्यजुनिहि समाधान करितां ॥
धरी शीर्षीं तूतें, भवभय तुझ्या दर्शनिं हरे ॥
अशा त्वन्मूर्तीचा कवण महिमा वाणिल बरें ॥ १३ ॥

मदोन्मत्तें मर्त्यें बहुतराचि तें निंदित असे ॥
न त्या प्रायश्चित्ताहे पतित नरें त्यागित तसें ॥
स्वयें व्रात्यांनींही पुलकयुत जी किल्बिषतती ॥
विनाशीसी ती तूं श्रमि न विजयी एक जगतीं ॥ १४ ॥

जगन्माते गंगे, अवनितलिंचा शोक हनन ॥
करायातें स्वर्गांतुनि महिवरी होसि पतन ॥
यदर्थीं श्रीशूली तुज निज जटाजूटिं धरितो ॥
अलोभी चित्ताही तव शुचि गुणें लोभ जडतो ॥ १५ ॥

मुके प्रज्ञाचक्ष्वंघ्रिहिन जड वेडेहि बधिर ॥
महापापी, ज्यांचे भरणिं हृतशक्ती सुरवर ॥
सदा कुंभीपाकादिक निरयिं वास्तव्य करिती ॥
अशा मर्त्यांतें तूं परम अगदेव त्रिजगतीं ॥ १६ ॥

अघाद्रिप्रध्वंसे विबुधसरिते जन्हुदुहिते ॥
तव क्षीरात्यंत प्रविमल असे शीतलहि तें ॥
जयाचा अत्यंत प्रवर महिमा सर्व जगतीं ॥
दिवीं अद्यापीही सगर करिती हर्षित नुती ॥ १७ ॥

अभक्षाहाराल्पाघभव अनुतापायुत जना ॥
बहू तीर्थें, माते, असति जगतीं पापशमना ॥
परी प्रायश्चित्ता न विदित असी पावक दुजी ॥
तुझ्या वीणें, गंगे, नसति, करिसी पूत सहजीं ॥ १८ ॥

विनाशो पापा ती श्रुतिकथितधर्मस्थल तव ॥
न तूं तीर्थस्वामी त्रिजगपट हर्षाप्रति नव ॥
कुबुद्धी-तर्कघ्ना दुरमति नरा दृश्य न तसी ॥
महानिर्वाणश्री सकलहि जना हो सुखदसी ॥ १९ ॥

समीरें संचारें चलित-लहरी-कंपित असें ॥
व्रजाच्या पद्माच्या रज-समुदयें रक्ततरसें ॥
अमर्त्यस्त्रीस्तोमस्तनगलितचारू-परिमल ॥
सुशीघ्र च्छेदो तें भवनिधिज जाला तव जल ॥ २० ॥

तवोत्पत्ति श्रीशांघ्रिकमलंपुटीं, जान्हवि, असे ॥
जटाजूटोकीं तूं अचलपतिच्या नित्यचि वसे ॥

स्व-उद्योगास्त्रानें हतपतित-उद्धार करणें ॥
त्वदुत्कर्षख्याती त्रिभुवनिं वसे जागृतपणें ॥ २१ ॥

वियोग क्ष्मालोकीं तव मजसि कां तें परिसणें ॥
धनाच्या लोभानें धनपतिनृपाग्रीं दवडणें ॥
त्यजीं सत्यस्वार्था, ह्मणुनि अपराधी खचित हा ॥
यदर्थीं, माते, तूं क्षणभरि दयालोचनिं पहा ॥ २२ ॥

प्रसु श्रीत्रिस्रोते, सुकवि उपमा किंचित तरी ॥
तुझी छाया लाधे जगिं न सरिता त्यास दुसरी ॥
उमेशाच्या शीर्षीं गिरिभव नदी कोण वसली ॥
वदे, श्रीशांघ्रिक्षालन करितसे आत्मसलिलीं ॥ २३ ॥

जनेच्छा संपूर्णा करिसि, जननी, जागृतपणीं ॥
करो सच्चिद्ब्रह्मा मग हरिहि निद्रा स्वशयनीं ॥
तसा शूली नृत्या, जप तप विधी दानहि तसें ॥
नको प्रायश्चित्तार्चनहि, महदाश्चर्य न कसें ॥ २४ ॥

तृषाक्रांतानाथ प्रगदयुत हा बालक तुतें ॥
अनन्यें सद्भावें शरण कलुषी देवसरिते ॥
द्रवूनी स्नेहानें शुचिगतिपथें तारिसि जना ॥
क्षुधा देहीं याचे, करि भिषगसी शीघ्र अवना ॥ २५ ॥

जहाली भूलोकीं जंव तव कथा प्राप्त शिवदा ॥
स्थिरावे पाप्यांचा यमसदनिं कोलाहल तदा ॥
यमाचे शोधार्थी गण कलुषिच्या दूर गमन ॥
तुझ्या स्नानें पानें दिवपथिं विमानां अडचण ॥ २६ ॥

नदी तूं देवांची, तव लहरिच्या ज्या रजतती ॥
समीराच्या वेगें, जनमलहरे, फार हलती ॥
प्रसिद्धा होवो त्या भवजनिततापासि हनना ॥
स्पृहादंभक्रोधान्वित सतत संघादि वृजिना ॥ २७ ॥

जगन्माते, सप्ताद्विगुणित अशी सृष्टिसरणी ॥
वसे ब्रह्मांडीं जे सुखसदनची ते लहरिंनीं ॥
फिरे चोंही भागीं तव जल सदा तिन्दुकपरी ॥
जटाजूटीं जें कीं मम मल हरो तें लवकरी ॥ २८ ॥

जनोद्धारालागीं इह भुवनिं गोदादि तटिनी ॥
परी लज्जायुक्ता तव शुचि यशें त्या निज मनीं ॥
सदा होती, तैसे श्रवणिं सुरही ठेविति कर ॥
समस्तां तीर्थांची मदहरक तूं, या शुचि कर ॥ २९ ॥

करावीं किंवा ना विविध दुरितें आचरण तीं
अशा चित्तीं शंका धरुनि मग अंतीं उपरती ॥
जहाल्या चांडाळें त्यजित गृह त्याचें खचित हा ॥
मदुद्धारा सिद्धा करिल नुति तूझी कसि पहा ॥ ३० ॥

असा कोणी पापी अजवरि तुला ना अढळला ॥
जया उद्धारीतां त्वरित जग पावेचि नवला ॥
त्वदिच्छा ऐसी ती सफल करण्या फार दिनिंची ॥
तवाग्रीं मी आलों द्रुत तरि मला दे सुगतिची ॥ ३१ ॥

फिरूनि श्वानेव प्रचुर विधि उद्योग करुनी ॥
प्रपंचा संपादीं, सतत अनृतोच्चार वचनीं ॥
कुतर्काभ्यासी मी झटुनि परनिंदेसि करितों ॥
अशा माझ्या, सांगे, क्षणहि वदना कोण बघतो ॥३२॥

जयें ना देखीली रुचिर तव मूर्ती स्वनयनीं ॥
विशालाक्षाची त्या तरि सफलता काय भुवनीं ॥
पडे ना ज्या कर्णीं तव सुलहरींचा कलकल ॥
वृथा ते, दोषी नेंद्रिय मनुज ते दोषि सकल ॥ ३३ ॥

विमानीं बैसूनि सुकृति करिती स्वर्गिं गमन ॥
तसे कालप्रेषाधिन निरयिं ते किल्बिषि जन ॥

व्यवस्था ही जेथें वृजिनहरका तूं न वससी ॥
वसे पापी देशीं, तव तटिं मिळे काय कलुषी ॥ ३४ ॥

द्विजांचीही हत्या सतत करुनी प्राशित सुरा ॥
गुरुस्त्रीतें इच्छी, हरि धन, अशा किल्बिषि नरा ॥
मिळे अंतीं वस्ती तव जलिं, तदीयांघ्रिकमला ॥
सुरादी वंदीती, त्वरित वरि तो श्रेष्ठ गतिला ॥ ३५ ॥

न जो प्राशान्या तो द्रुत सुमनसौगंध हरितो ॥
तसा स्त्रीपुत्रांचा विरहजनित प्राणि वधितो ॥
असा जो मारुत् त्वल्लहरिसमुहानें सुचलित ॥
पवित्र त्रैलोक्या करि, नवल हें काय बहुत ॥ ३६॥

जगीं या लोकाचे स्वविहित हिता साधक नर ॥
जपादीकें स्वर्गीं वसति कृतदेहा शुचिकर ॥
दुही लोकींचाही तुजवरि जगन्नाथ भर हा ॥
वसे ठेवूनीया खचित दृढ निद्रायुत महा ॥ ३७ ॥

असंस्कारी तूझ्या शुचि जलिं तसे नीच नर ते ॥
मरूनी तत्प्रेतें जरि पडलिं, तद्रक्षण तुतें ॥
बहु स्नेहें लागे, जननि, करणें, त्वच्छुचि गुणा ॥
न तूं त्यागी, तैसे त्यजवति न या दुष्कृतिगुणां ॥ ३८ ॥

हरो तापा शूली नरतनिं जटाजूटचलिता ॥
तदास्ताव्यस्तत्वें चलित लहरीच्या चपलता ॥
करातुल्य क्रीडा करिति जणु वारी डमरुची ॥
तया शब्दें नृत्या करि रुचिर भागीरथि शुची ॥ ३९ ॥

सदा तूझे ठायीं जननि मम कल्याणभर तो ॥
अनन्या बुद्धीनें चरणि नत हा दीन धरितो ॥
प्रसंगीं या माते अकपटि दया टाकिसि जरी ॥
निराधारी तैसा जनभरवसा जाइल तरी ॥ ४० ॥

मृडानीप्रीत्यालिंगनद शिवमौलीमधुनिया ॥
निघूनी सीमंतीं चरति परि सापत्न सुभया ॥
शिवेच्या पाहूनी स्वकरकमलें कर्षित अशा ॥
जया ते लाधो त्या तव सुलहरी आसुखदशा ॥ ४१ ॥

महीस्थ प्राणी कां शरण न तुतें येतिल बरें ॥
असे तद्धेतू हा पुरविशि मनीषा निजकरें ॥
स्वभावें त्वत्ठायीं अपरिमित मी प्रेम धरितो ॥
वहातों मी आण त्वरित मम ही पूर्ण करितो ॥ ४२ ॥

तूझ्या रेणूचा तो तिलक जननी भालिं करितां ॥
विनाशी प्राण्यांच्या सुदुरिततमा जेवि सविता ॥
तशी दारिद्र्यादी-विधिलिखितदुष्टाक्षरतती ॥
अशी जी रेणू ती मम सकल हो शोक हरती ॥ ४३ ॥

जया देशीं ना तूं वससि पुनिते, तेथिल नरा ॥
प्रफुल्लीताद्र्याली हसति, बसती ज्या तव तिरा ॥
सुगंधातें देती अमरततितें पुष्पसमुहें ॥
सदा सप्रेमें त्या मज सुहृदशा हो जननि हे ॥४४॥

किती अत्यंतोग्रामरपुजन ते लोक करिती ॥
किती योगी तैसे सुयमनियमीं मग्न असती ॥
परी तूझ्या नामा स्मरुनि जननी मी वसतसें ॥
जगज्जालातें या मनिं तव दयें मानि तृणसें ॥ ४५ ॥

किती आत्मायुष्या सुजन सुकृताध्वें दवडिती ॥
तयांचे कल्याणीं सुकुशल किती देव असती ॥
निराधारी लोकां परि तुजविणें कोणिहि नसे ॥
परत्रीं हे माते, अति सुखकरा तूं मज दिसे ॥ ४६ ॥

तवांबु प्राशूनी दुर गमन मी मूढ सुहृदां ॥
सर्वे केलें क्रीडार्थ बहु, परि विश्रांति न कदा ॥

परी लाधे आतां तव जघनिं, निद्रायुत कर ॥
अनिद्रिस्था या तूं सदयहृदये काल सुचिर ॥ ४७ ॥

जगन्नाथोद्धारीं बहु विहित आहे समय हा ॥
यदर्थीं देवी या अजि सदयदृष्टीयुत पहा ॥
कटी बांधी, तैसा मुकुटिं शशिभूषाकृति अही ॥
करी नोपेक्षा गे, इतरसि न तूं, ऐक नुति ही ॥ ४८ ॥

शरच्चंद्रश्वेते मुकुटिं शशि शुभ्राहि विलसे ॥
करी कुंभांभोजा भय वर सदा धारण तसे ॥
करीसी तू शुभ्रांबर, अरुढसी श्वेतमकरी ॥
अशा तूतें ध्याती, जग न तदुपेक्षा कधिं करी ॥ ४९ ॥

सुकिंचित् हास्यानें रुचिरमुखज्योत्स्ना अमृत तें ॥
प्रपंचाग्निज्वालाग्रसितजनचिंता शमवितें ॥
महामाये देवी, शशिसुरुचिविस्तार करिसी ॥
अशी जी जाया शंतनु महिपतीची सुखदसी ॥ ५० ॥

मुरार्यंघ्र्यांभोजा निजलहरिनें क्षालन सदा ॥
करीसी, नाशीसी द्रुत भवफणी-दंशज गदा ॥
हराया गायत्र्यादिकविविधमंत्राहिनपणा ॥
तसें ये निर्वीर्यत्व अगदलता तेंहि शमना ॥ ५१ ॥

अधःपातातें घे अमृतरसही त्यागुनि गुणा ॥
पडे भीती स्वांतीं अमृतरसपानी सुरजना ॥
विषघ्ने पाषाणें भिउनि करिजेलीं स्वशकलें ॥
अतां कोणा तूझ्याविण शरण मी जाउं न कळे ॥५२॥

मृडानीनें द्यूतीं पशुपसकलैश्वर्य हरिलें ॥
पणीं तेव्हां देहा त्रिपुरमथनानेंहि धरिलें ॥
जितायातें अंबा तुज तुजकडे पाहि नयनीं ॥
तदा केलें जें तूं नरतन असो तें मदवनीं ॥ ५३ ॥

महेशाच्या शीर्षा, सुरनदि, सुशोभीत करिसी ॥
जनांच्या दुःखातें सतत, जननी, शीघ्र हरिसी ॥
वहाती उच्चा ती चपल लहरी सर्व समया ॥
अशी जी श्रीगंगा द्रुततर करो आजि शुचि या ॥ ५४ ॥

जगन्नाथें केलें त्रिदशसरितास्तोत्र रुचिर ॥
तयें लाधे मुक्ती अतितर वरा काल सुचिर ॥
यथाशक्ती कृष्णें नमुनि हरिला प्राकृत वचें ॥
प्रमोदें गाईलें स्मरुनि पदपद्मा स्वगुरुचें ॥ ५५ ॥

प्रकरण २१ वें.

गौरीगर्वहरण.

मालिनी.

नमिन वरदमूर्ती मंगलस्वामि भावें ॥
हरति सकल विघ्नें शीघ्र नामप्रभावें ॥
मिलितकर यदंघ्रीं तिष्ठती अष्टसिद्धी ॥
त्वरित भजासि देवो देव तो साधुबुद्धी ॥ १ ॥

इंद्रवज्रा.

गाईन दाक्षायणि-गर्वहानी ॥ जे गाइली ग्रंथिं महामहानीं ॥
चालेल गर्व प्रभुसी कुणाचा ॥ या पाड कैचा नरमत्कुणाचा ॥ २ ॥

स्रग्धरा.

श्रीकैलासाद्रिमाजी त्रिशुलधर हरें लावुनी नेत्रपातें ॥
स्वांतीं एकाग्रतेनें करि दुरितहरा रामनामा जपातें ॥

देखोनी अंबिकेनें मधुर मृदु वचें प्रश्न केला शिवासी ॥
त्रैलोक्यस्वामि तुह्मी, परि करित कुणाच्या वदावें जपासी॥३॥

मालिनी.

परिसुनि सति-वाक्या हासला शूलपाणी ॥
दशरथकुलभूषा राम जो चापपाणी ॥
करिं सतत तयाच्या नाममंत्रा जपाला ॥
नरमुनि-अमरादी साधिती यत्तपाला ॥ ४ ॥

साकी.

हांसुनि तेव्हां अंबा बोले, काय विभो हें वदसी ॥
भूमितलींचा मानव राघव, तज्जप कां मनिं करिसी ॥
॥ध्रु०॥ विपरित हें दिसतें ॥ पूज्य न मानव देवातें ॥ ५ ॥

वसंततिलका.

तो राम काननिं फिरे ललनावियोगी ॥
सीता ह्मणूनि कवळी उपल द्रु योगी ॥
नाहींच शुद्धि तिलही, भ्रमला भ्रमानें ॥
कां व्यर्थ शीण रसनेसि सदा जपानें ॥ ६ ॥

स्रग्धरा.

बोले श्रीशूलपाणी, रघुपतिमहिमा-ठाव नाहीं श्रुतीला ॥
वर्णीतां शीण आला दशशतवदनीं वासुकीच्या मतीला ॥
जो पूर्ण ब्रह्म आदि स्थितिभवविलया कारणी मुख्य आहे ॥
त्यातें भ्रांति भ्रमाची क्षणभरिहि, शिवे, होय ती केंवि पाहे॥७॥

इंद्रवज्रा.

बोले उमा तैं अतिगर्ववाणी॥ स्त्रीमोहजालीं रत चापपाणी ॥
आहे, असें दाविन मी तुह्मांतें॥ दावीं पुन्हां नातरि या मुखातें ॥८॥

आर्या.

करुनी अशा पणातें चित्तिं ह्मणे मी क्षणांत भुलवीतें ॥
अतिवैराग्यशिलाच्या वैराग्या स्त्रीकटाक्ष पळवीते ॥ ९ ॥

साकी.

काय न राघव मोहक वनिता बघतां मोहा पावे ॥
रामार्थ फिरे त्या ठकवाया लागति श्रम न करावे ॥
॥ध्रु०॥ करुनि विचार असा ॥ त्यजुनि निघे ती कैलासा॥१०॥

स्रग्धरा.

कांतारीं शीघ्र आली धरुनि जनकजेच्या सुरम्या स्वरूपा ॥
मोदें चित्तीं ह्मणे ती, द्रुत भुलविन मी सानुजा राम भूपा ॥
बैसे वृक्षातलीं ती श्रमित बहु अशी मार्ग-उल्लंघनांनीं ॥
झाला सौमित्र हर्षी बघुनि इजसि तो, बर्हि जैसा घनांनीं॥११॥

इंद्रवज्रा.

जाऊनि सांगे रघुनायकातें ॥ सीतासुवार्ता प्रभु आयका ते ॥
बैसे शिणोनी सति काननांत ॥ कां खेद आतां धरितां मनांत॥१२॥

दिंडी.

चला सत्वर दावितों आदिमाया ॥
बैसली जी पाहुनी वृक्षछाया ॥
भवद्विरहें म्लानता देहिं आली ॥
मार्ग उल्लंघुनि श्रांत फार झाली ॥ १३ ॥

मालिनी.

अनुजकर धरूनी राम चाले पहाया ॥
तरुतलिं अवलोकी बैसली आदिमाया ॥
धरुनि जनकजेच्या पूर्ण रूपा अभिन्ना ॥
रघुपतिविरहानें दावि मुद्रा सुखिन्ना ॥ १४ ॥

वसंततिलका.

पाहे न राम तिकडे उघडोनि पातें ॥
झाली भयार्तचि जशी चपलानिपातें ॥
सौमित्र विस्मित मनींचि उगाचि राहे ॥
श्रीराम जानकिकडे अजि कां न पाहे ॥ १५ ॥

साकी.

राघव वानिं तैं पहिल्याहुनीही तो करि बहु शोकातें ॥
स्मरुनी सीतासद्गुणराशी दुःख करी चित्तातें ॥
॥ध्रु०॥ भान नसे देहीं ॥ बोले अनुजासि न कांहीं ॥ १६ ॥

स्रग्धरा.

'हा हा सीते' ह्मणूनी तरु उपल लता ते पुन्हा तो करांनीं ॥
आलिंगी, प्रेमयुक्तें जसि जननि करें लाधतां तोक रानीं ॥
प्रार्थी सौमित्र जेव्हां असुनि समिप हे जानकी शोक वांया ॥
स्वीकारा स्वप्रिया ही द्रुत, उचित कसा मी तुह्मां शीकवाया १७

आर्या.

राम तदा निज निकटीं घे प्रिय जो बंधु लेंकरापरिस ॥
कुरवाळुनि त्यास ह्मणे, कथितों ही कोण तें अतां परिस ॥ १८ ॥

इंद्रवज्रा.

सीता नव्हे ही शिवशक्ति माया ॥ आली करूनी पण भूलवाया ॥
ही वंद्य आहे सकला जगातें ॥ देखूनि येते मज लाज गा ते ॥ १९ ॥

वसंततिलका.

वंदी रघूत्तम तितें कर जोडुनीया ॥
आलीस कां, जननि, घोर महावनीं या ॥
शंभू-वियोग तुजला रुचला कसाची ॥
कां व्यर्थ शीण दिधला शरिरा तसाची ॥ २० ॥

साकी.

जावें परतें कैलासातें, होसी श्रमिता भारी ॥
शंकरसेवायुक्त रहावें, न शिरावें अविचारीं ॥
॥ध्रु०॥ तो सकलयोगिवर ॥ महिमा त्याचा बहु थोर ॥ २१ ॥

मालिनी.

परिसुनि नृपवाणी म्लानता ये तियेतें ॥
धरुनि निज सुरूपा रामसंनीध ये ते ॥

रघुपतिचरणाब्जा वंदुनी काय बोले ॥
हररघुपतिमाजी भेद नाहीं कळालें ॥ २२ ॥

इंद्रवज्रा

म्यां गर्व केला तुमजूनि चित्तीं ॥ आली तयाची मजला प्रचीती ॥
संतुष्ट झालें तुजसी पहातां ॥ मागें वरातें, करि ऊर्ध्व हाता ॥२३॥

मंदाक्रांता.

देखोनी श्रीरघुपति तदा सुप्रसन्ना भवानी ॥
प्रक्षाली तो चरणयुगला, प्रेमभावास वानी ॥
प्रार्थी देवी, करुनि सुदया वास येथें करावा ॥
संसाराब्धी नरतनु तुझ्या दर्शनानें तरावा ॥ २४ ॥

इंद्रवज्रा.

झाली तदा ती तुलजा भवानी ॥ तीच्या प्रभावा नर काय वानी ॥
हा कृष्ण वंदी पदिं गाउनीया ॥ रक्षी स्वदासापरि मानुनीया॥२५॥

प्रकरण २२ वें.

श्रीदामाजीपंतचरित्र.

आर्या.

श्रीगणपतिपद नमुनी श्रीदामाजीचरित्र गाईन ॥
होइन पवित्र तेणें विठ्ठलपदिं शिर–सरोज वाहीन ॥ १ ॥

स्रग्धरा.

ोता श्रीबेदरासी यवन नृप महा जाणता पुण्यशील ॥
ामाजीपंत त्याचे पदरिं करितसे कारभारा सुशील ॥
ाणोनी ज्ञान त्याचें करि अधिप तया मंगलावेढियाचा ॥
ान्यायें वर्तनासी करि सदय हृदीं दास तो विठ्ठलाचा ॥२॥

इंद्रवज्रा.

दुर्भिक्ष तेव्हां पडलें महान ॥ अन्नाविणें मूर्च्छित थोरसान ॥
अत्यंत तैं संकट होय सर्वां ॥ माता सुताचीहि धरी न पर्वा ॥३॥

साकी.

सर्वहि जन ते दुर्भिक्षानें भूवरि अतिशय पिडिले ॥
न मिळे भोजन एक दिवसही पोटभरी, कृश झाले ॥
॥ध्रु०॥ दुर्घट समयासी ॥ कोण पुसे हो कोणासी ॥४॥

स्रग्धरा.

येऊनी पंढरीतें सकल जन तदा मंदिरीं विठ्ठलाचे ॥
साष्टांगें वंदुनी त्या मिलितकर उभे बोलती दीन वाचे ॥
'रक्षी रक्षी दयाला करुनि बहु दया अन्नदानें अह्मांशी ॥
जाऊं हा प्राण पाहे, उशिर न बरवा, राहवेना उपाशी' ॥५॥

इंद्रवज्रा.

प्रार्थूनि ऐसें बहु विठ्ठलासी ॥ येती त्वरें मंगलवेढियासी ॥
दामाजिपंता ह्मणती, उपाशी ॥ अन्नार्थि आलों द्विज तूजपाशीं ॥६॥

आर्या.

रक्षावें, दामाजी, आह्मां देऊनि अन्नदानाशी ॥
आहों क्षुधार्त अतितर, दात्या, ही शीघ्र आपदा नाशी ॥७॥

इंद्रवज्रा.

ऐकोनि तेव्हां अतिदीनवाणी ॥ दामाजि नेत्रांतुनि ढाळि पाणी ॥
देवा, असा कां बहु कोपलासी॥ भक्षावयाही न मिळे मुलांसी॥८॥

स्रग्धरा.

बोले दामाजि तेव्हां, 'क्षणभरि जन हो स्थीर व्हावें स्वचित्तीं ॥
कैवारी श्रीविठाई करिल पुरित ती वासना तूमची ती ॥
ठेवूनी भाव त्याचे दृढतर चरणीं भाक्तिनें आळवावें ॥
विश्वत्राता दयाळु करिल हरण तो संकटा स्वप्रभावें' ॥९॥

शार्दूलविक्रीडित.

जावोनी सदनीं प्रियेसि कथितां साध्वी जशी द्रौपदी ॥
बोले, विन्मुख विप्र ते न दवडा लीनत्व दावा पदीं ॥
आहे संग्रहिं धान्य जें नृपतिचें द्या वांटुनी सर्व तें ॥
संदेहीं न पडा, स्मरा प्रभुवरा, होणार होईल तें ॥ १० ॥

साकी.

परिसुनि सतिची सधैर्यवाणी तोषे मनिं दामाजी ॥
देतों धान्य, स्थीर असावें, बोले त्या सामाजीं ॥
॥ ध्रु०॥ परिसुनि ती वाणी ॥ गेले द्विज मनिं तोषोनी॥ ११॥

शार्दूलविक्रीडित.

भांडारें उघडोनि सेवककरें पाचारि सर्वां जनां ॥
घ्यावें धान्य ह्मणे तुह्मांसि जितुकें लागेल तें भोजना ॥
ते ऐकोनि उदार वाणि सकलां झाला महानंद तो ॥
वर्णाया असमर्थ शेषहि, तिथे हा मंद का वानि तो ॥ १२ ॥

इंद्रवज्रा.

बांधोनि मोटा धरिती शिरीं ते ॥ सानंद चित्तें स्मरती हरीतें ॥
दामाजिपंता ह्मणती तदा ते ॥ केलेंत दूरी जन-आपदांतें ॥ १३ ॥

साकी.

बादशहाचा धान्य-खजीना पंतें विप्रां दिधला ॥
पाहुनि त्याची धार्मिक बुद्धी साहेना दुष्टाला ॥
॥ध्रु०॥ कुजनाची रीती ॥ साधूतें सतत छळीती ॥ १४ ॥

वसंततिलका.

तें वृत्त बेदरिं नृपासि मुजूमदार ॥
धाडी स्वयें बहुत मत्तचि कामदार ॥
दामाजिपंत-करणी न रुचे तयाला ॥
नाहीं कधीं परदया शिवली जयाला ॥ १५ ॥

आर्या.

अवलोकुनि तें लेखन त्या दुष्टमति मुजुमदाराचें ॥
तें कृत्य बादशाला न रुचे दामाजि कामदाराचें ॥ १६ ॥

स्रग्धरा.

झाला संतप्त तेव्हां बहुत नृप ह्मणे, दुष्ट दामाजिपंत ॥
आणा बांधूनि येथें, अवधि न करणें, चित्तिं माना न संत ॥
भूपाज्ञें दूत येती अदयहृदय ते शीघ्र दामाजि-गेहीं ॥
क्रोधानें बोलताती बहुत कटुवचें, लेशही शांति नाहीं ॥ १७॥

इंद्रवज्रा.

देखोनि त्यांतें भयभीत झाला॥ कां पांडुरंगें आजि रोष केला॥
रक्षी दयाले वरदे विठाई ॥ राहो सदा चित्त तुझेचि ठाईं ॥१८॥

कामदा.

जाउनी वदे कामिनीप्रती ॥ काल फीरला ऐक संप्रती ॥
धान्य-अर्पणें भूप कोपला ॥ दूत पातले न्यावया मला ॥
काळजी न तूं वागवी मनीं ॥ स्वस्थ राहवें गेहिं कामिनी ॥
रक्षिता सखा पंढरीपती ॥ जाउनी त्वरें पाहुं भूपती ॥१९॥

स्रग्धरा.

झालें सिद्धान्न आतां करुनि अशन तें बेदरीं स्वामि जावें ॥
प्रस्थानीं अग्रभागीं, बुध कथिति, कदा नान्न येतां त्यजावें ॥
सारोनी भोजनासी गमन उचित हें जाणतां सर्व कांहीं ॥
साध्वी तें किंकरांतें गहिंवरुनि ह्मणे, प्रार्थना आयका ही ॥२०॥

इंद्रवज्रा.

ते दुष्टकर्मी नाचि मानिताती ॥ दामाजिलागीं करिं ओढिताती॥
अर्पोनि तेव्हां नग त्यांस तीनें॥ संतुष्ट केलें मग त्या सतीनें॥२१॥

आर्या.

द्रव्याच्या सामर्थ्यें होती नृपही वश प्रसंगातें ॥
किति पाड किंकरांचा, कोपाद्रिहि तें करील भंगातें ॥ २२ ॥

मालिनी.

निघति सकलही ते सारुनी भोजनासी ॥
अतितर नगरींच्या दुःख झालें जनासी ॥
हरिभजन करीतो पंथिं दामाजिपंत ॥
दुरुनि तयिं विलोकी पंढरी भाग्यवंत ॥ २३ ॥

स्रग्धरा.

साष्टांगें वंदुनी ती विनवि बहुपरी भूपती-किंकरांतें ॥
दावा श्रीपांडुरंगा करुनि बहु दया, जोडि त्यांतें करातें ॥
नेत्रीं पाहीन मूर्तीं रुखमिणि-पतिची, आवडी एकवारी ॥
कैंचीं आतां मला ती पुनरपि घडते पंढरीनाथ-वारी ॥२४॥

इंद्रवज्रा.

आली दया त्या नृपकिंकरांतें ॥ पंतासि नेती पुरि पंढरीतें ॥
भीमातटीं स्नान करावयाला ॥ अत्यंत हर्षें हरिभक्त गेला॥२५॥

स्रग्धरा.

मंदीरीं रुक्मिणीतें गहिवरुनि बहू काय बोले मुरारी ॥
नेती दामाजि भक्ता धरुनि यवन ते बेदरीं शस्त्रधारी ॥
जातों अंतेजरूपें यवननृपगृहीं धान्य-दामा भराया ॥
होतों कीं नीचरूपी त्यजुनि महतितें भक्तदुःखा हराया॥२६॥

इंद्रवज्रा.

झाली विठाईच विठू महार ॥ कंठीं विराजे मणिगुंजहार ॥
काठी करीं,घोंगडि, व्हाण पायीं॥लंगोटि कासे, बनला शिपाई २७

आर्या.

जाऊनि राजद्वारीं नमुनि ह्मणे, मायबाप जोहार ॥
घ्या रसद हि धान्याची, पंताचा मीच राबता ह्मार॥२८॥
बारिक नाजुक अडलें पडलें झडलेंचि काम पंताचें ॥
करणें स्विकारिलें मी, बोले तो पूर्ण धाम संतांचें ॥ २९ ॥

साकी.

दामाजींचा बहु दिवसांचा बंदा मी हा आहें ॥
काज तयाचें स्विकारिलें यास्तव शिरिं ओझें वाहें ॥
॥ध्रु०॥ विश्वासू साचा ॥ जाणाजी दास तयाचा ॥ ३० ॥

इंद्रवज्रा.

सोडोनि पोतें गणती करावी ॥ ऐसें वदे तो जगदाकरावी ॥
मोजोनि घेतां शिण हातिं आला॥चित्तीं महाविस्मित भूप झाला ३१

स्त्रग्धरा.

पाहे निरखोंनि तेव्हां नृप निज नयनीं ब्रह्मरूपी महार ॥
तच्चित्तातें सुचेना शयन गमनही राजधंदा अहार ॥
झाला तल्लीन रूपीं, क्षणभरि न ढळे नेत्र-पातें तयाचें ॥
राहे येथें ह्मणे त्या, विनवि बहुपरी, आयके का कुणाचें ॥३२॥

इंद्रवज्रा.

घेऊनि हस्तीं नृप-पावतीतें ॥ जातो स्वपंथीं जन पाहती तें ॥
झाला क्षणार्धें न दिसेचि ऐसा॥ राहे उभा भूप तटस्थ जैसा ॥३३॥

साकी.

भूपाल कहे अपने दिलमे कैसा इहा हाय घेड ॥
एक बतखके मुलाखतोमे मुजकु लगाया बेड ॥
॥ध्रु०॥ अब मै क्या करना॥ चाहिये मुलाखत होना॥३४॥

मंदाक्रांता.

पाचारा हो त्वरित विठुतें मागुता एकवार ॥
पाहूं त्याच्या वदनशशितें, स्नेह वाढे अपार ॥
धांवा, धांवा, क्षणहि न करा काळ हो दूत तुह्मी ॥
राहे जैसा न कधिं उदकावीण मासा, तसा मी ॥ ३५॥

स्त्रग्धरा.

आली मूर्छा नृपातें, पतन महिवरी पावला तो निचेष्ट ॥
सर्वांगीं घर्म वाहे शशिर, थरथरे, होति अत्यंत कष्ट ॥

व्याकूल प्राण होती, नरपतिवदनीं शब्द कांहीं निघेना ॥
मंत्री नाना उपाया करिति, उघडुनी भूप चक्षू बघेना ॥३६॥

इंद्रवज्रा.

झाली नृपातें ह्मणती महाधी ॥ ईशस्वरूपीं जडली समाधी ॥
नेणेच कोणी, करिती उपाया॥झाले तदा ते परि सर्व वाया॥३७॥
वेगें उठोनी नृप शीघ्र धावे॥बोले स्वभृत्यां विठुसी बघावें ॥
आतां न देखें तरि काय जीणें॥झाला महाग्रस्तचि काळजीनें॥३८॥

आर्या.

होऊनि बावरा नृप भटके भूतलिं विठू विठू करित ॥
जैसी धेनु न दिसतां धावे विपिनांत वत्स हंबरत ॥ ३९ ॥

कामदा.

धांवती तदा ते चहूंकडे ॥ शोधितां श्रुती ते न सांपडे ॥
काय लाधतो अज्ञ माकडा॥ भाविकापुढें जाय रोकडा॥४०॥
शीणले बहू येति मागुती ॥ भूप आधिनें व्यापिला अती ॥
संकटास या कोण वारिल॥ बोलती, 'विठू पंत दाविल'॥४१॥

आर्या.

जावें शरण तयाला आहे तो सर्वमान्य हरिदास ॥
तदनुग्रहाविणें ना विठुदर्शन होय, बोलती दास ॥ ४२ ॥

साकी.

मंत्री सेना सह तो नृपवर चाले भेटूं पंतां ॥
हृदयिं विठूचें स्वरूप भरलें विठुची भासे चिंता ॥
॥ध्रु०॥ऐसी झालि स्थिती ॥ न दिसे विठुविण दुजि मूर्ती॥४३॥

आर्या.

गगाजिपंत इकडे भीमातीर्थीं करून तो स्नान ॥
गीतापुस्तकिं विस्मित नृप-पावती विलोकून ॥ ४४ ॥

इंद्रवज्रा.

मत्तुल्य तो दुष्ट नसे जगांत ॥ यत्कीर्ति धाता निगमादि गात ॥
अत्यंत म्यां कष्ट दिले तयाला॥ऐशा भरीं कां भरिलेंत याला॥४५॥

आर्या.

केलें काय अहा हें, देवा, मजसाठिं होसि कां ह्मार ॥
वानूं किति तव महिमा, पायीं श्री लीन तेवि कामहर ॥४६॥

इंद्रवज्रा.

कां कष्ट ऐसे मजसाठिं केले ॥ ऐशा स्वरूपा नचि आयकीलें ॥
घेता जरी प्राण अविंध याचा ॥ होता न तो मंतु विभो तयाचा ॥४७॥

कामदा.

कासयास हा जन्म लाधला ॥ पढरीपती कष्ट पावला ॥
धिक धिक हें जाहलें जिणें ॥ म्लेच्छहस्ति या कां न मारणें ॥४८॥

इंद्रवज्रा.

केलात कां लोभ महान याचा ॥ हा पंथ नाहीं प्रभुजी नयाचा ॥
ऐकोनि मातें हसतील संत ॥ होईल का तें तुजसी पसंत ॥४९॥

शुद्धकामदा.

रसद-भार तो पृष्टिं वाहिला ॥ चरणचालिनें मार्ग लंघिला ॥
ह्मणसि कीं मुखें ह्मार राबता ॥ तुज न लाज कां आलि बोलतां५०

इंद्रवज्रा.

तों भूप आला अतिशीघ्रतेनें ॥ दामाजिपादा नमिलें तयानें ॥
दावी ह्मणे दास विठू महार ॥ तद्दर्शनावीण न घे अहार ॥५१॥

शुद्धकामदा.

अवधि ना करीं, प्राण जातसे ॥ मम मना महा लागलें पिसें ॥
अजुनि कां न ये तूजसी दया ॥ हरपला मनींचाचि माद या ॥५२॥

साकी.

परिसुनि भाषण बादशहाचें विस्मित मनिं दामाजी ॥
काय ह्मणे हें नकळे मजला, भुलवी हा मति माझी ॥
॥ध्रु०॥ कैचा तो ह्मार ॥ विदित मला न समाचार ॥५३॥

इंद्रवज्रा.

श्रीविठ्ठलाचीच अगाध करणी ॥ ठावें न मातें, कर ठेवि कर्णीं ॥
जाणे तयाची कृति तोचि कांहीं ॥ म्यां धाडिला सत्य विठूस नाहीं५४

शुद्धकामदा.

परिपरी नृपा पंत बोलती ।। तिळहि नायके मेदिनीपती ।।
अमित संकटां दास पावला ।। ह्मणति विठ्ठला दावि पाउलां ।।५५।।

उभयतां त्वरें येति राउळीं ।। रुक्मिणीपतीमूर्ति सांवळी ।।
निज करीं द्विजें तीस दाविलें ।। नृपति-अंतरीं नाहिं रूचलें ।। ५६ ।।

कामदा.

संकटी बहू पंत जाहला ।। हस्त जोडुनी स्तब्ध राहिला ।।
त्राहि त्राहि या श्रीहरी अतां ।। दाविल्या रुपा दावि मागुता ।।५७।।

शुद्धकामदा.

कळवळे बहू मानसीं हरी ।। स्वजनसंकटें शीघ्र जो हरी ।।
धरि विठूचिया दाविल्या रुपा ।।सतत जो करी भाविकीं कृपा ।।५८।।

इंद्रवज्रा.

अंतेजरूपा धरि पांडुरंग ।। संतुष्ट झालें नृप-अंतरंग ।।
ठेवी पदीं मस्तक तो तयाचे ।। आनंद तो वर्णनिं ये न वाचे ।।५९।।

कामदा.

त्राहि त्राहि गा विश्वपालका ।। आत्मदास या मानि बालका ।।
संसृती-भवीं पार या करी ।। वंदितों तुझे पाय मी करीं ।। ६० ।।

इंद्रवज्रा.

उद्धारिलें त्या उभयांसि तेव्हां ।। भावें तुझी लीन सदंघ्रितें व्हा ।।
पूर्णा करो तो मन कामनेतें ।। गाई कथा कृष्ण शुची मनें ते ।।६१।।

प्रकरण २३ वें.

ज्ञानगंगास्नान.

आर्या.

चिंतामणिपद्पद्मीं चित्ताली चिर अविघ्नता लाधो ॥
साधो ज्ञानस्नाना, गुंजारविं कुमतिताप नाचि बाधो ॥ १ ॥
हरिचरणोद्भव गंगातीर्थांत स्नान केलिया मुक्ती ॥
ज्ञानापगासुतीर्थीं होइल काय न तशी विचारांतीं ॥ २ ॥
करुनी बहु तप सगरें अळवुनि हरिलागिं आणिली गंगा ॥
ज्ञानापगाहि जीवें चुकवाया अमित योनिंच्या संगा ॥ ३ ॥
झाली उत्थित गंगा नारायणचरणपंकजीं जेवी ॥
श्रीज्ञानजाह्नवी ती जीवापासोनि जाहली तेवी ॥ ४ ॥
धरि शशिशेखर गंगा निज मस्तकिं गरलताप शमवाया ॥
तैशी ज्ञानसुरनदी अंतःकरणसुचतुष्टया ठाया ॥ ५ ॥
तेथोनि जाह्नवी ती हेमाद्री-शिखरिं पावली पतन ॥
ज्ञानसरिता तशी ती जीवाचे बुद्धि-ठायिं करि गमन ॥ ६ ॥
श्रीनारायणपद्जा पृथ्वीपृष्ठावरी जवें वाहे ॥
तैसी ज्ञाननदी ती हस्तादिक त्या दशेंद्रियीं राहे ॥ ७ ॥
संचारुनि भूमिपथें श्रीगंगा जाय ती जलाब्धीतें ॥
नाडि-सुषुम्ना-मार्गें ज्ञाननदी ब्रह्मरूपिं ते मिळते ॥ ८ ॥
गंगापानस्नानें नासति तनुकृत अनंत पापमल ॥
ज्ञानसुगंगा नाशी कामक्रोधादि वैरि ते सकल ॥ ९ ॥
श्रीभागीरथ्युदरीं वसताती याद मत्स्यकच्छादी ॥
या ज्ञाननदीमाजी तेवि समाधानवृत्ति आनंदी ॥ १० ॥

आली गंगा भूतलिं सगरनृपतिपितर उद्धरायास ॥
श्रीज्ञानमहागंगा जीवाचे पंचभूति देहास ॥ ११ ॥
या ज्ञानमहातीर्थीं जो सुविचारी करी सदा स्नाना ॥
गंगास्नानाधिक त्या जोडे फल सत्य सत्य हें जाणा ॥ १२ ॥
हा ज्ञानस्नानविधी गाई हा कृष्ण चंडमंदमती ॥
बुधजनिं न उपेक्षावा, हंसापरि सुजन दोष ते त्यजती ॥ १३ ॥

प्रकरण २४ वें.

श्रीदत्तस्तव.

इंद्रवज्रा.

आरंभिं वंदूनि गणेशपायां ॥ आरंभि दत्तस्तवना कराया ॥
सिद्धिप्रती नेइं दयेंकरून ॥ अज्ञानमूढा मतितें हरून ॥ १ ॥
पापी महाही कलिच्या युगांत ॥ तारावया ते भवसागरांत ॥
अत्र्याश्रमीं ते अवतीर्ण होती ॥ ब्रह्मा मुरारीश्वर या त्रिमूर्ती ॥ २ ॥
शीर्षीं जटाजूट, विभूति अंगीं ॥ भालीं त्रिपुंड्राक्षयरक्तरंगी ॥
अत्यंत चारु त्रय आननें तीं ॥ पुष्पा तिलाच्या सम नासिकें तीं ॥ ३ ॥
कर्णद्वयीं कुंडलयूथ भूषा ॥ नेत्रांबुजीं शोभति इंदु पूषा ॥
मीनाकृतीशा रुचिरा भ्रुकूटी ॥ कस्तूरिकाकेशरचंदनोटी ॥ ४ ॥
रुद्राक्षमाला करिं कंठिं साजे ॥ स्कंदीं सुकृष्णाजिन तें विराजे ॥
काकोदराचें कटिसूत्र भव्य ॥ कौपीन संपाटलवर्णि दिव्य ॥ ५ ॥
पायीं खडावा रुचिरा सुवर्णा ॥ रुद्राक्षभूषा विलसेचि कर्णा ॥
शोभे जया विग्रहिं गौर कांती ॥ ऐशी सुभव्या गुरुराजमूर्ती ॥ ६ ॥

एक्या करीं चक्र, दुज्या त्रिशूळ ।। तैसा तिज्या दंड बहू सुढाळ ।।
चौथ्या गदा, पंचमिं पानपात्र ।। षष्ठीं कराब्जीं डमरू ससूत्र ।। ७ ।।
ध्याऊं अशी श्रीगुरुराजमूर्ती ।। भावें सदा आणुनि आत्मचित्तीं ।।
यन्नाम घेतां मुखिं एकवार ।। संपूर्ण पापें द्रुत होति दूर ।। ८ ।।
कृष्णातिरीं गाणगपूरिं वास ।। केला गुरूंनीं नतरक्षणास ।।
क्षेत्रीं तसा श्रीनरसिंहवाडी ।। पूत स्थळीं अक्कलखोपिं झाडी ।। ९ ।।
वास्तव्य छाये अवदुंबराचे ।। पद्मासनीं ध्यान वसे गुरूचें ।।
संचार पृथ्वीतळिं सर्व काल ।।भक्ताचिया काजिं फिरे दयाळ।।१०।।
वाराणशीक्षेत्रिंचि नित्य स्नान ।। कोल्हापुरीं भोजन तेवि जाण ।।
माहूरिं निद्रा करिती गुरू ते ।। ऐसे सदा त्रिस्थळिं वर्तती ते ।। ११।।
भीमामरीसंगिं दुज्याहि ठाया।। वास्तव्य तूझें गुरुदत्तराया ।।
देशी नतां दर्शन ठायिं ठायीं।।या कां न दे लीन असूनि पायीं।।१२।।
रूपें बहू दर्शन देसि भक्तां ।। याची न कां ये करुणाचि चित्ता ।।
व्हावें मनीं तें,धरिलाचि हेत।। तो पूर्ण कीजे,नचि पाहिं अंत।।१३।।
संसार-डोहीं बुडुनीच गेलों ।। तेणें बहू श्रांत विभो जहालों ।।
आतां न साहे मज हा त्रिताप।। नाशो त्वरेनें तव सुप्रताप ।। १४ ।।
कामादि तैसे रिपु ते महान ।। अत्यंत या गांजिति नित्य जाण ।।
यांतूनि देवा मज शीघ्र रक्षीं ।। शक्ती न अन्यांप्रति सर्वसाक्षी ।। १५
या मंतु हातें घडले अनंत ।। घालूनि ते सर्व निजोदरांत ।।
या दीन दासीं सुदया करून।।तारीं विभो शीघ्र भवाब्धितून।।१६।।
दारा सुताच्या गुतलोंचि मोहीं ।। सेवा तुझी या घडलीहि नाहीं ।।
म्यां पीडिले साधुजन प्रमादें ।। तारा दयाब्धे तरि हा प्रसादें ।।१७।।
उद्धारिलें पापि असंख्य लोकां ।। दत्ता परी या नाचि कां विलोकां ।।
प्रार्थूं कुणासी,मजला वदावें।।तोडी दुजा कोण भवाब्धि-दावें।।१८।।
मातें नसे कीं प्रभु अन्य थारा ।। हा सर्व आहे क्षरची पसारा ।।
कामीं कुणी येति न अंतकाळीं।। तूं एक आहेस अनाथ-वाळी।।१९।।

म्यां काय तूझ्या स्तुतितें करावें ॥ शास्त्र श्रुती वर्णनिं शीण पावे ॥
ऐशी तुझी थोर अगाध लीला॥हा योग्य का पामर गायनाला॥२०॥
पायीं नमावें अधिकार माझा ॥ न्या तो तरीं शेवटिं दत्तराजा ॥
आतां उपेक्षा न कराचि याची॥तारा भवीं, हें नत कृष्ण याची॥२१॥

प्रकरण २५ वें.

करुणाष्टक.

इंद्रवज्रा.

देवा मला एक तुझाचि थारा ॥ त्या वेगळा व्यर्थ दिसे पसारा ॥
नाहींच कोणी तुजवीण आतां॥ मद्दुःखराशी द्रुत दूरकर्ता ॥ १ ॥
देवा तुला म्यां जरि नाळवावें ॥सांगे कुणातें तरि आळवावें ॥
होतील ते मानव काय शूर ॥ नाशावयातें मम दुःखभार ॥ २ ॥
देवा अहाहा किति भाग्यहीन ॥गाया स्तवाया मति योग्य ही न ॥
संतुष्ट कैसें तुजसी करावें ॥ जाऊनि कोणा पदिं लीन व्हावें॥३॥
देवा मला हे किति गांजिताती॥ कामादि वैरी, जसि तीव्र हेती ॥
तारील कोण प्रभुजी वदावें ॥ सोडील तो कोणचि जीव-दावें॥४॥
देवा नको हा भवसिंधुताप ॥ वारील यातें तव सुप्रताप ॥
जाणूनि आलों चरणांबुजासी॥त्राता दुजा कोणि नसेचि यासी॥५॥
देवा न जाणें तव भक्तिसेवा ॥ चित्तीं धरावा ह्मणुनी न हेवा ॥
माझा न झाली शुचिमार्गदीक्षा॥ हा दीन मागे तुजपाशिं भिक्षा ॥६
देवा तुझे मीं नमितोंचि पाय ॥ जाते न ते सांडूनि बाल माय ॥
माता पिता तूंचि तिहीं जगाचा ॥ वर्षाव दासावरती दयेचा ॥ ७

देवा करावी सुदया त्वरीत ॥ पाहूं नये रे शरणागतांत ॥
घालूनि पोटीं सकलापराधा ॥ नाशीं दिनाची भवदुःखबाधा ॥ ८॥
या अष्टकें श्रीप्रभुजीस गातां ॥ येईल सुश्रीवरमुक्ति हातां ॥
गाऊनि कृष्णें करुणास्वरांनीं ॥ वंदी तयाच्या चरणां करांनीं॥९॥

प्रकरण २६ वें.

बालक्रीडा.

आर्या.

या आर्यांत आद्य व तृतीय चरणीं "कृष्णाय वासुदेवाय हरये परमात्मने । प्रणतक्लेशनाशाय गोविंदाय नमो नमः ॥" हा मंत्र तृतीय अक्षरीं साधला आहे.

गाऊं कृष्ण चरित्रा वंदुनि आरंभिं देव गजवदन ॥
तो तृष्णा भक्तांची पूर्ण करी, चातकाचि जेवि घन ॥ १ ॥
गोपि यशोदे-सदनीं सांगति येऊनि कृष्ण-खोडीतें ॥
बाई वाट धरूनी तरुणींचे वसनकच्छ सोडी ते ॥ २ ॥
यातें सुबुद्धि यावी यास्तव करिं बाइ संकटा चवती ॥
पूजी देव विनायक, कथिती नंदांगनेस व्रजयुवती ॥ ३ ॥
बरवा उपाय मानुनि केलें सतिनें व्रता यथाविधिनें ॥
श्रीद्वयमातुःपुजनें त्यजिली मासैक खोडि त्या हरिनें ॥ ४ ॥
बहु हर्षें जननी तैं करि नैवेद्या सहस्र मोदक ते ॥
श्रीहरसुताग्रभागीं ठेवुनि दीपार्थ जाय सदनातें ॥ ५ ॥
तेथें येउनि कृष्णें भक्षण केलेंचि मोदकां सकलां ॥
पाहे परती येउनि, मोदक पात्रीं न एकही उरला ॥ ६ ॥

तें थोर विस्मय मनीं करि सति ती, काय हें ह्मणे नवल ॥
झालें मातें तुमजे, मोदक येथूनि कोण ने सकल ॥ ७ ॥
तों आत्मज तेथ उभा, पुसतां त्यातें ह्मणे परिस, माते, ॥
नेला नैवेद्य अमित भीती दाऊनि मूषकें मातें ॥ ८ ॥
त्यांत प्रमुखावरतीं होता तो बैसला द्विरदवदनी ॥
वारणकरें समग्रहि तेणें उचलूनि घातले वदनीं ॥ ९ ॥
भीतींत पडुनि मी, गे आई, बहु जाहलों त्वरें दूर ॥
होती क्लेश महा कीं, धडधडतो बहुत पाहि हा ऊर ॥ १० ॥
घाली शरिरा प्रसुच्या धावुनि वेगें भयार्तसा मिठिला ॥
वदनाकडे विलोकुनि मायह्मणे बा मुखेंदु कां मिटिला ॥ ११ ॥
मेघश्यामा कृष्णा, भक्षियलें त्वांचि मोदकां गमतें ॥
तूं पय भक्षिसि चौर्यें, या कर्मी चित्त कां तुझें रमतें ॥ १२ ॥
दावीं गोपसुता तूं निज मुख पसरूनि, पाहुं दे मजला ॥
हे गोविंदा वत्सा, कशि अनुचित खोडि लागली तुजला ॥ १३ ॥
तेव्हां दावी निज मुख पसरुनि उदरीं अनंत विघ्नेश ॥
तेवि यशोदा विधि सुर विचरति सूर्येंदु ईश मेघेश ॥ १४ ॥
पाहुन विस्मित झाली, लाधालि तेव्हां महा समाधीतें ॥
अति मोदद स्वरूपीं जडली लंघूनि ती भवाब्धीतें ॥ १५ ॥
घालून योगमाया आणी देहावरी तिला हरि तो ॥
न नमः कोण ह्मणे त्या हरिला जो संसृती भया हरितो ॥ १६ ॥
हे मंत्रबालक्रीडा श्रीहरिचरणांबुजा नमुनि भावें ॥
गाई कृष्ण सदाशिव, संसारार्णवें तयास तारावें ॥ १७ ॥

प्रकरण २७ वें.

सुदामचरित्र

आर्या.

या आर्यांत **रामनारायणानंत मुकुंद मधुसूदन । कृष्ण केशव कंसारे हरे वैकुंठ माधव** ॥ हा श्लोक आद्य व तृतीय पादीं पंचमाक्षरीं साधिला आहे.

श्रीविघ्नहरा नमुनी गाइन सुकथा सुदामदेवाची ॥
कपिलानाम नगरि जी होती, ती जन्मभूमिका त्याची ॥ १ ॥
त्याची ललना सुमती साध्वी ती, द्रौपदी जशि सुशीला ॥
मागुनि कोरान्न तयें सन्मार्गें आप्तवर्ग पोशीला ॥ २ ॥
पडलें भयप्रद महा तेव्हां दुर्भिक्ष तें महीवरती ॥
कोणिहि कुणा पुसेना, अन्नाविण सानथोरही मरती ॥ ३ ॥
तें साध्वि विनंतीतें करुनि ह्मणे स्वामिसी, सखा तुमचा ॥
द्वारावतींत आहे भूप श्रीकृष्ण जो सकल महिचा ॥ ४ ॥
अन्नाविना मुलेंही मरती, हें वृत्त त्या करा कथन ॥
करिलाचि कुंतिसुतांपरि साह्य हरी देउनी तुह्मांहि धन ॥ ५ ॥
रिक्त करीं दर्शन तें घेउं नये भूप, देवता, गुरुचें ॥
यास्तव दे मज कांहीं, देइन भेटी, तदुक्ति तीस रुचे ॥ ६ ॥
दुःखार्त वधू मनिं परि आणी उसनेच मूठभर पोहे ॥
नयनीं अस्रू वहाती, चित्तिं ह्मणे हरिस काय न्यावे हे ॥ ७ ॥
तो श्रेष्ठ यादवपती या पृथुकांचा कसा करिल मान ॥
परि तो दीनदयाळू द्रौपदितें मागि भाजिचें पान ॥ ८ ॥
संचित सुकृत जरि असे पदरीं, तरि होय आजि मज भेटी ॥
सोडुनि उष्ण श्वासा छिन्न पटी ठायिं ठायिं दे गांठी ॥ ९ ॥

त्यजुनी भुकेलिं बालें निघतां नयनास ये बहुत पाणी ॥
उत्तम सुशकुन होती, सन्मुख युवती सकुंभयुत पाणी ॥ १० ॥
धेनू सवत्स पुढें ये, उजत्रा वायस, नकूल अपसव्य ॥
जाय शितिकंठहि तसा, दाविति होणार तें सुभवितव्य ॥ ११ ॥
मार्गीं धरि सांवरुनी पृथुकाच्या त्या लहानशा ग्रंथी ॥
पाही शिखरें द्वारावतिचीं झळकति सतेज नभपंथीं ॥ १२ ॥
कांचनसिंह मृगादन नीलाचे दंति बर्हि कोकील ॥
ताशिं वानरें बिदोबिदिं, पांचेचे कीर गाति मंजूल ॥ १३ ॥
लाल हिरे वैडूर्यहि, नानारत्नांनिं बांधिलीं सदनें ॥
मृगमद्कुकुंमचंदानिं माखियले राजमार्ग हळदीनें ॥ १४ ॥
घंटाध्वान ठणठणा, ऐसी द्वारावती विलोकून ॥
आनंद न माय मनीं पृथुकातें सांवरी करीं धरुन ॥ १५ ॥
होईल अधनिकाया अमरावतिसम पुरीं प्रवेश कसा ॥
जरि यादव वारिति तरि नोपेक्षिल तो हरी मला सहसा ॥ १६ ॥
चिंतातुर राजगृहीं जातां पाहूनि कृष्ण ये पुढती ॥
आलिंगी प्रेमभरें, गुरुबांधव ह्मणुनि ते गळां पडती ॥ १७ ॥
निज आसनावरी तैं बैसवुनि क्षेमवृत्त त्या पुसिलें ॥
अष्टहि वरस्त्रियांनीं सप्रेमें भाउजी ह्मणुनि नमिलें ॥ १८ ॥
दिधलें काय अह्मांला, पाहूं, दावाचि, जाउबाईनीं ॥
अवधी क्षणही न बरी, ऐसें ह्मणती बहूत घाईनीं ॥ १९ ॥
भेटीनें आनंदाचि झाला ह्मणती, परी न त्यासि रुचे ॥
कष्टी मनांत होउनि द्याया प्रत्युत्तरें न त्यासि सुचे ॥ २० ॥
झाला स्तब्ध मुक्यापरि, पृथुकाच्या घेति त्या बळें ग्रंथी ॥
दे उद्ककुंभ शकुनीं तत्फल हें ह्मणुनि होय मनिं खंती ॥ २१ ॥
स्नाना उष्णोदक त्या घालुनि अर्पिति अमूल्य मृदु पट ते ॥
जेवविला मधुरान्नीं, गृहचिंता काय ती परी सुटते ॥ २२ ॥

मंचकिं मधुर कथा कथि, निजवुनि तैसें हरी पदा रगडी ॥
जो त्रिजगसूत्रधारी भक्ताचा होय खासदार गडी ॥ २३ ॥

नाहींच भेद उभयीं, वर्ते ऐसाचि विश्वपाल हरी ॥
क्रमितां दिन बहु तेथें अवलोकी मग हरी कृपालहरी ॥२४॥

आणवुनि कृष्ण तेव्हां पृथुकांची गांठडी स्वयें सोडी ॥
शीत न उष्ण विलोकी, आहे प्रभुलागिं भक्तिची गोडी ॥२५॥

रुक्मिणि धाकें धरि कर, सर्वहि देईल भक्षितां सकल ॥
न उरे अंशहि आम्हां, होइल मग जन्म आमुचा विफल ॥२६॥

वांटुनि अवघ्या घेती त्या पृथुकांचेचि एक एक कण ॥
ह्मणती, सुकंकणें द्या, कोणी ह्मणतात, द्याचि साडि खण॥२७॥

श्रीहरिला साधु तदा जाया स्वगृहीं निरोप तो मागे ॥
ठेवा हे सारे, मग जावें स्वपुरा, असें हरी सांगे ॥ २८ ॥

ठेवुनि ते हरिमंदिरिं जाया स्वपुरा निघे सुखिन्नमुखी ॥
केलें न वरें, देवा, पडले असतील वत्स मृत्युमुखीं ॥ २९ ॥

क्रमितां नावेक पुढें देखुनि कांचनपुरी ह्मणे भुललों ॥
स्वगमन कुंठि, फिरे, तों मंत्रि ह्मणे, स्वामि, न्यावया आलों॥३०

भरला कंठ गहिवरें, देवाजी काय हें ह्मणे नवल ॥
हेमरथामाजि बसुनि तद्भार्या तैं सवत्स ये जवळ ॥ ३१ ॥

करणी अगाध हरिची, दिधालि ह्मणे संपदा तुह्मां तेणें ॥
धरितां भाव हरिपदीं नाशिल भवभय, दरिद्र कृष्ण ह्मणे ॥३२॥

प्रकरण २८ वें.

शंभुप्रणाम

आर्या.

पशूनां पतिं पापनाशं परेशं गजेंद्रस्य कृत्तिं वसानं वरेण्यम् ।
जटाजूटमध्ये स्फुरद्गांगवारिं महादेवमेकं स्मरामि स्मरारिम् ॥
हा श्लोक या आर्यांत प्रथम व तृतीय पादीं चतुर्थाक्षरीं साधिला आहे.

श्रीगणपतिपद नमुनी भावें श्रीशंभुचें करूं स्तवन ॥
जो चिरशून्योपाधी, साष्टांगें तत्पदीं सदा नमन ॥ १ ॥

कैलासीं नांदे जो सहगिरिजा रामनामजप करुन ॥
म्हणती पशुपति ज्यातें, साष्टांगें तत्पदीं सदा नमन ॥ २ ॥

दर्शन त्रिकाल घेती प्रतिदिनिं नारायणादि अमर जन ॥
शौनक पाराशरही, साष्टांगें तत्पदीं सदा नमन ॥ ३ ॥

दे निजपद भक्तांप्रति, केली अर्धांगि पार्वती वरुन ॥
जो अर्धनारि नटला, साष्टांगें तत्पदीं सदा नमन ॥ ४ ॥

संदग्ध शंबरा करि नेत्रकटाक्षेंचि लागतां क्षण न ॥
हरि ताप सज्जनांचा, साष्टांगें तत्पदीं सदा नमन ॥ ५ ॥

ज्यातें सुरेश म्हणती सकल सुरांमाजि थोर तो म्हणुन ॥
त्यापरि शंकर शमधी, साष्टांगें तत्पदीं सदा नमन ॥ ६ ॥

माखी अंग विभुतिनें, भूतांसह करि श्मशानिं जो क्रिडन ॥
त्याला गजेंद्रचर्मा, साष्टांगें तत्पदीं सदा नमन ॥ ७ ॥

गण रुद्र पिशाचपती शृंगी भृंगी तथाहि दशवदन ॥
करि दास्यत्व सदोदित, साष्टांगें तत्पदीं सदा नमन ॥ ८ ॥

करुनि कृपा अब्धिमथनिं रक्षी सुर कालकूट सेवून ॥
न विपत्तिंत बुडवि कदा, साष्टांगें तत्पदीं सदा नमन ॥९॥
दृढभाव रावणाचा अर्पी त्या स्वात्मलिंग पाहून ॥
भोला ऐसा शंकर, साष्टांगें तत्पदीं सदा नमन ॥ १० ॥
आरूढ नंदिवरतीं घेउनि अंकीं उमा सगजवदन ॥
हेमाद्रिवनीं विचरे, साष्टांगें तत्पदीं सदा नमन ॥ ११ ॥
नामोच्चारें ज्याच्या जाती प्राणी भवार्णवीं तरुन ॥
स्थलवाण्यंगोद्भव जो, साष्टांगें तत्पदीं सदा नमन ॥ १२ ॥
संपूर्ण जगत्-स्थितिलय होय भवहि यन्मनोरथें करुन ॥
विश्वहदा भरवी जो, साष्टांगें तत्पदीं सदा नमन ॥ १३ ॥
धनुरज्जूद्भव शब्दें कांपे भू, तेवि कोंदलें गगन ॥
अरिकटक करि पलायन, साष्टांगें तत्पदीं सदा नमन ॥१४॥
त्रिपुर मथिला भयानक जेणें विक्राळ रूप तें धरुन ॥
सकलां ध्येय प्राण्यां, साष्टांगें तत्पदीं सदा नमन ॥ १५ ॥
निघति स्फुलिंग ज्याच्या क्रोधावसरीं तृतीय चक्षुंतुन ॥
भक्तां परम दयालू, साष्टांगें तत्पदीं सदा नमन ॥ १६ ॥
प्रियसद्गांधर्वगुणी भक्तिप्रिय तेवि अन्य दैवत न ॥
शांती राग नसे ज्या, साष्टांगें तत्पदीं सदा नमन ॥ १७ ॥
गंगाप्रवाह निर्मल वाहे ज्याच्या सदा जटेमधुन ॥
शोभे शिरींदुभूषा, साष्टांगें तत्पदीं सदा नमन ॥ १८ ॥
सत्त्व तम रजादि गुणां दुर राहे पंच भूतिं व्यापून ॥
लाधे न हातिं कोणा, साष्टांगें तत्पदीं सदा नमन ॥ १९ ॥
जो नारदें स्तवियला, तैसें विधि सर्वदा करी स्तवन ॥
श्री माधवहि जयाचें, साष्टांगें तत्पदीं सदा नमन ॥ २० ॥
ज्या अगमें निगमेंही शोधियलें, लाधला तयां परि न ॥
जो गिरिकंदरिं राहे, साष्टांगें तत्पदीं सदा नमन ॥ २१ ॥

वाटे विस्मय चित्तीं अघटित घटना जयाचि पाहून ॥
वेद पुराणांहि तसा, साष्टांगें तत्पदीं सदा नमन ॥ २२ ॥

होउनि मिलिंद चरणांबुजि करिती भक्त मुक्तिमधुपान ॥
शिवखुस्मरणालापा साष्टांगें, तत्पदीं सदा नमन ॥ २३ ॥

श्रीशंकरासि नमुनी प्रार्थी हा कृष्ण, तारि भविं ह्मणुन ॥
हरहरिंत भेद न गणी, साष्टांगें तत्पदीं सदा नमन ॥ २४ ॥

प्रकरण २९ वें.

गीतामाहात्म्य.

आर्या.

श्रीगणपति पदिं नमुनी गाऊं प्राकृतिं महात्म्य गीतेचें ॥
जें श्रीवसुंधरेप्रति कथिलें श्रीविष्णुंनीं स्वकीय वचें ॥ १ ॥

कोणे एके समयीं प्रार्थुनि नारायणा ह्मणे जगती ॥
प्रारब्धभोग पुरुषा होय कसी भक्ति अद्वया जगतीं ॥ २ ॥

परिसुनि वसुधावाणी कथिती श्रीवासुदेव ते मग तें ॥
प्रारब्ध भुज्यमानहि गीतारत जाहल्या विमल चित्तें ॥ ३ ॥

होतो विमुक्त सुखि तो लोकत्रयिं सर्वकाल, जाण मही ॥
त्यातें निजकृत कर्में पूर्वार्जितही न बाधती तिलही ॥ ४ ॥

गीतारतनरहस्तें झालें जरि कर्म पापपुण्ययुत ॥
द्विजहत्यादिक, तरिही न वसे, जल जेंवि पद्मपर्णांत ॥ ५ ॥

जेथें गीतापुस्तक, अथवा तत्पाठ होय ज्या स्थानीं ॥
तेथें प्रयागतीर्थादिक तीर्थें वसति, निश्चयें मानी ॥ ६ ॥
सकलहि सुर ऋषि योगी पन्नग गोपाल गोपि देव मुनी ॥
उद्धव पार्षदगणही होती बहु साह्य ते त्वरें करुनी ॥ ७ ॥
गीताविचार तैसें श्रवण पठण जेथ निश्चयें सतत ॥
त्या ठायिं, मेदिनी गे, वसतों मी होउनीचि साह्यभुत ॥ ८ ॥
गीता हे अत्युत्तम आहे कीं प्रीतिपात्र मम सदन ॥
तज्ज्ञानाश्रय करुनी त्रैलोक्याचेंहि मी करीं अवन ॥ ९ ॥
गीता परमा विद्या हृतशंका ब्रह्मरूपि हे आहे ॥
ही अर्धाक्षर मात्रा, हे नोच्चारिक पदात्मिका पाहे ॥ १० ॥
आनंदरूपि भगवान् जो यदुकुलदीप कृष्ण निज वदनें ॥
समराजिरांत कथितो प्रिय पार्थातें सुबोधपर वचनें ॥ ११ ॥
ऋग्वेद साम तेवी यजुः श्रुतित्रयिं असेचि हे गीता ॥
दायक परमानंदा तत्त्वार्थज्ञानबोधमार्गयुता ॥ १२ ॥
अध्यायाष्टादश जो निश्चल चित्तें करील जप नित्य ॥
तो ज्ञानसिद्धि पावुनि मग उपभोगील आत्मपद सत्य ॥ १३ ॥
गीता समग्र अथवा तदर्ध एकाग्र जो करी पठण ॥
गोदानपुण्य त्यातें लाधे, संशयि यदर्थिं करि न मन ॥१४॥
तृतियांश पाठ करितां श्रीगंगास्नानपुण्य तें लाधे ॥
तैसें षडंशपाठें, हे वसुमति, सोमयागफल साधे ॥ १५ ॥
अद्वैतभक्तिसंयुत पठण करी नित्य एक अध्याय ॥
तो रुद्रलोकिं जाउनि चिरकालचि शूलपाणिगण होय ॥ १६ ॥
अध्याय वा प्रतिदिनीं पठण करि श्लोकपाद जो नर तो ॥
यावत् भूलय तावत् नररूपी होउनी धरे वसतो ॥ १७ ॥
गीतेचे श्लोक दहा अथवा ते सात पांच चार मिती ॥
वा तीन दोन एकहि किंवा श्लोकार्ध नित्य जे पठती ॥ १८ ॥

ते चंद्रलोकिं वसती संवत्सरदशसहस्रपर्यंत ॥
होती नरदेहि पुन्हा गीतापाठयुत जाहल्या अंत ॥ १९ ॥
करितां पुनरपि गीतापाठाला यतिनरोत्तमा मुक्ति ॥
गीतानामोच्चारित होतां मृत साधते वरा सुगती ॥ २० ॥
गीताश्रवणीं तत्पर जरि ते असतील पापि अत्यंत ॥
तरि जाउनि वैकुंठीं रमती सहविष्णु जाहल्या अंत ॥ २१ ॥
गीतार्थचिंतन सदा करुनी रममाण कर्मिं यद्यपि ते ॥
जीवन्मुक्त गणावे, देहांतीं जाति परम मुक्तीतें ॥ २२ ॥
गीताश्रयें बहुतची जनकादिक ते वसुंधराकांत ॥
झाले विनष्टकल्मष, गीता सायुज्यदा त्रिलोकांत ॥ २३ ॥
गीतापाठ करूनी नाचि करिती तन्महात्म्य जे पठण ॥
त्यांचा पाठ वृथा तो, केवळ ते अर्थहीन श्रम जाण ॥ २४ ॥
ऐशा फलश्रुतीसह गीतेचा करिति जे दृढाभ्यास ॥
ते तत्फलासि पावुनि पावति उत्तम अलभ्य लाभास ॥२५॥
सूत ह्मणे, गीतेचें माहात्म्य असें अनादि तें कथिलें ॥
गीतापाठांतीं जे पठती, ते लाधती तदीय फलें ॥ २६ ॥
ऐशा पूत श्रीमद्भगवद्गीतामहाफलश्रुतितें ॥
वर्णूनि बालभाषाणें वंदी सप्रेम दास कृष्ण तितें ॥ २७ ॥

प्रकरण ३० वें.

संतमहाजन.

आर्या.

देवो मला वरदकर संतचारित्रासि गायना सिद्धी ॥
भक्तिप्रेमरसान्वित ऐसी जी सुज्ञमान्य सद्बुद्धी ॥ १ ॥

ओवी.

ग्वालेरप्रांतीं महाजन ॥ होता हरिभक्तिपरायण ॥
धनसुतदारादिकें करून ॥ बहु संपन्न गेहाश्रमी ॥ २ ॥

चामर.

साधुसंतवैष्णवांसि पाहतांचि लोचनीं ॥
भक्तियुक्त तत्पदांसि वंदि हस्त जोडुनी ॥
नेउनी स्वगेहिं त्या जना करूनि पूजना ॥
घालि आदरें निशाहिं इच्छितान्नभोजना ॥ ३ ॥

इंद्रवज्रा.

सेवा तयांची करि भक्तिभावें ॥ मागा ह्मणे जें निजचित्तिं भावे ॥
वास्तव्य गेहीं करणें सुखेंची ॥ इच्छा असे जोंवरि मानसाची ॥४॥

स्वागता.

घालि कंठिं तुलसीमणिमाला ॥ रेखितो तिलकचंदन भाला ॥
रामनाम धरुनी मुखिं राही ॥ ढोंगि संत जरि तो असलाही ॥५॥

इंद्रवज्रा.

साष्टांग त्यातें करुनी प्रणामा ॥ अत्यादरें आणुनि आत्मधामा ॥
सेवा करी हस्तिं गुरूसमान ॥ उणें पडूं दे कधिं या क्रमा न ॥६॥

मंदाक्रांता.

देशोदेशीं पसरलि बहू कीर्ति माहाजनाची ॥
ऐकूनी ते स्वमनिं धरुनी वासना लोकनाची ॥
येती तेव्हां अगणित महातापसी साधुसंत ॥
त्यांची सेवा तिलहि न करी ऊन तो भाग्यवंत ॥७॥

इंद्रवज्रा.

ऐसा क्रमीला बहु काल तेणें ॥ देवासि झाला बहु भार तेणें ॥
लावूनि पाहीन ह्मणे कसासी ॥ संकल्प ऐसा करि मानसासी ॥८॥

आर्या.

धरुनी सुमलिन वेषा तुलसीमाला गळ्यांत लेवून ॥
आला महाजनगृहीं त्या तो पाहून वंदि धावून ॥ ९ ॥

बैसवि सदासनीं, मग पूजा करि आदरें यथाविधिनीं ॥
मिष्टान्न अर्पि भोजन, राहावें गृहिं म्हणे कृपानिधिनीं ॥ १० ॥

इंद्रवज्रा.

राहे तयाच्या गृहिं पांडुरंग ॥ देखावयालागिं तदंतरंग ॥
सेवेसि कोठें न परी ढळेची ॥ चित्तीं म्हणे, यासम नाढळेची ॥ ११ ॥

यूथिका.

बावळी धरुनि मूर्ति रमाधवें ॥ लाविला कसवटी बहु लाघवें ॥
भक्तितें परि कुठे नचि चूकवी ॥ मान तें बघुनि माधव तूकवी ॥ १२ ॥

ओवी.

मग काय करी शारंगधर ॥ होता महाजनाचा लघु कुमर ॥
तया नेउनी ग्रामाबाहेर ॥ घेउनी अलंकार मारिला ॥ १३ ॥
खणुनी खळी वाळवंटांत ॥ तया वेळीं तें सुतप्रेत ॥
पुरुनी हातें बहु त्वरित ॥ सदनाप्रत पातला ॥ १४ ॥

इंद्रवज्रा.

तें कर्म एका यतिनें दुरूनी ॥ देखीयलें सर्वहि नीरखूनी ॥
तेव्हां ह्मणे मानसिं हायहाय ॥ हें साधुदीक्षेप्रति योग्य काय ॥ १५ ॥

कामदा.

देखती गृहीं माय बाप ते ॥ बाल ना दिसे, घेति भीतितें ॥
शोधिती पथीं तैं गृहोगृहीं ॥ सांदि कोपरे वापि कूपही ॥ १६ ॥
ग्रामिंचे बहू लोक धावती ॥ शोध ना लगे दुःख पावती ॥
बोलती गृहीं साधु बावळा ॥ ठेविला असे तो नसे भला ॥ १७ ॥
वित्तलोभ तो थोर त्याप्रती ॥ मारिला तयें बाळ निश्चिती ॥
त्यास पूसती खोदखोदुनी ॥ त्यांचि मारिला बाळ नेउनी ॥ १८ ॥

आर्या.

कांहीं विदित न मजला ह्मणुनी तो ठेवि साधु कर कानीं ॥
भिववूं पाहति त्यातें, भिववावा जेवि सिंधु करकानीं ॥ १९ ॥

तें वृत्त पुराधीशा होतां श्रुत तोहि शोध लावाया ॥
करि यत्न, जनांसि ह्मणे, सत्य वदेसा सुबोध लावा या ॥२०॥

मालिनी.

मग परिपरिनें ते बोलती बावळ्यातें ॥
बहु धन तुज देऊं बाल रे लाधल्या तें ॥
कथि विदित तुला जें भीतितें सोडुनीया ॥
परि तिलहि न बोले मुग्धसा होउनीया ॥ २१ ॥

इंद्रवज्रा.

तेव्हां ह्मणे तोकपिता जनाला ॥ पीडा न ती द्यावि महाजनाला ॥
दुष्कर्म ऐसें न करी कदा हा ॥ देईल तो काय मृगांक दाहा ॥२२॥

साकी.

सुतशोधार्थी ग्रामीं दौंडी करवी मग तो नृपती ॥
शुद्धि सुताची लाविल त्यातें देइन बहु संपत्ती ॥
॥ध्रु०॥ श्रवणीं परिसुनि तें ॥ कथि वृत्त यती सकलांतें ॥२३॥

इंद्रवज्रा.

नेऊनि दावी मग तो जनाला॥निक्षेपिलें तें स्थल नंदनाला ॥
प्रेता पहातां उकरूनि हातें ॥ पीटीति वक्षासि करूनि हा ते ॥२४॥

अंजनीगीत.

ऐसा कवण तो चांडाळ ॥ जेणें वधिला नगार्थ बाळ ॥
नाहीं शिवला त्या कां काळ ॥ दुष्कर्माआधीं ॥ २५ ॥
महाजनासी एकचि सुत ॥ त्याचा झाला ऐसा घात ॥
नाना परिनें जन समस्त ॥ दुःखार्त होती ॥ २६ ॥

ओवी.

महाजन ह्मणे तयांतें ॥ न चुके कदापि होणार तें ॥
दोष न द्यावाची अन्यातें ॥ ईशचरित्रें अगाध हो ॥ २७ ॥
मग इंधनांतें आणून ॥ शास्त्राधारातें पाहून ॥
शवासी देउनियां अग्न ॥ सकल जन गृहीं जाती ॥ २८ ॥

साकी.

सुतदुःखातें मनीं न आणुनि निशिदिनि करि तत्सेवा ॥
उपवर कन्या मदीय ती या अर्पिन साधू देवा ॥
॥ध्रु०॥ ऐशा सुविचारीं॥सिद्धता करी तो सारी ॥ २९ ॥

इंद्रवज्रा.

धाडी तदा लीहुनि लग्नपत्रां ॥ आणी विवाहास्तव इष्टमित्रां ॥
पाहूनि त्याचा दृढ भक्तिभाव ॥ संतुष्ट होती मनिं वासुदेव॥ ३० ॥

स्वागता.

पूर्ण हा उतरला कसिं माझ्या॥पीडिलें बहुत म्यां, न सिमा ज्या॥
ठेवणें विहित दुःखिं न यातें ॥ ठेवितां घडतसे अनयातें॥३१॥

ओवी.

मग काय करी जगद्गुरू ॥ महाजनाचा होता जो गुरू ॥
नाम तयाचें देवगुरू ॥ स्वप्नीं जाऊनि तयाच्या ॥ ३२ ॥

ह्मणे महाजनाचा सुत ॥ दहन केला स्मशानांत ॥
जाउनी तुवां त्या स्थलांत ॥ कीर्तनाप्रत करावें ॥ ३३ ॥

इंद्रवज्रा.

लाधेल तेणें सुत तो तयाचा ॥ देई तया, बोलुनि ऐशि वाचा ॥
पद्मालयाकांत अदृश्य होती ॥ गेला गुरू शिष्यगृहीं प्रभातीं ॥३४ ॥

यूथिका.

स्वप्निंचें कथुनि वृत्त महाजना ॥ दाखवी स्थल अह्मां, तव नंदना ॥
दाहिलें, करूं तिथे हरिकीर्तन॥ देव देइल तुझा तुज नंदन ॥३५ ॥

साकी.

सर्वहि मग ते स्मशानिं जाउनि गजरें कीर्तन करिती ॥
टाळमृदंगादिक बहु वाद्यें मधुरध्वनि वाजविती ॥
॥ध्रु०॥ भरती आकाशा ॥ तैशाही त्या दाहि दिशा ॥३६॥

अभंग.

धांव धांव देवा गोविंदा माधवा ॥ अच्युता केशवा देवराया ॥
गजेंद्राचे हांके धांवलासी जैसा ॥येसी न कां तैसा पांडुरंगा ॥
द्रौपदी संकटीं बाहे तुज देवा ॥ धांवासि केशवा अर्धरात्रीं ॥
प्ऱ्हादाच्या बोला देउनियां मान ॥ स्तंभिं प्रकटून रक्षियेलें ॥
तृषेनें पीडिला नामदेव दास ॥ देसी उदकास धांवुनीयां ॥
तैसा हाहि तूझा दास महाजन ॥ तयाचा नंदन देई त्यातें ॥
आह्मी सर्व आहों शरण चरणा॥मानसीं करुणा शीघ्र आणी॥३७॥

आर्या.

ऐसा धांवा करितां द्रवला करुणाब्धि मानसीं हरि तो ॥
भक्तापदा सदा जो पळही अवधी न लावितां हरितो ॥३८॥
आला धांवत बालक सालंकृत जेवि खेळुनी खेळा ॥
यावा, देखुनि त्यातें मोदें उचलूनि घेति काखेला ॥ ३९ ॥

इंद्रवज्रा.

आनंद झाला सकला जनाला॥ हर्षें गृहीं आणिति नंदनाला॥
तों बावळा साधु दिसे न गेहीं ॥सर्वांस झाला अनुताप देहीं॥४०॥

आर्या.

देखाया भक्तमना परमेश्वर लावितो बहूत कसा ॥
अत एव न निंदावा, कृष्ण ह्मणे, तो असोहि संत कसा॥४१॥

प्रकरण ३१ वें.

गोमाई.

इंद्रवज्रा.

साष्टांगिं वंदूनि विनायकातें ॥ गोमाइ-वृत्ता कथुं, आयका तें ॥
होती दरिद्री विधवातिवृद्धा॥देवद्विजीं मानसिं राखि श्रद्धा॥१॥

आषाढि एकादशिच्या प्रसंगीं॥ जाया निघे होउनि विप्रसंगी ॥
श्रीपंढरीतें प्रभुदर्शनातें ॥ सामुग्रि मुष्टीभरि पिष्ट घेते ॥ २ ॥

युथिका.

फाटकें वसन एकचि विग्रहीं॥ भक्षणा इतर कांहिं न संग्रहीं ॥
रक्षि ती स्वतनु याचकवृत्तिनें ॥ देवतार्चन करी बहु भक्तिनें ॥३॥
मंदमंद गतिनें पथ लंघुनी ॥ पातली गुळसऱ्या दशमी-दिनीं ॥
तों पुरें भरियली भिवरा धुनी॥घाबरे निज मनीं तिस पाहुनी॥४॥

पद.

कोण करिल मज पार॥ आतां कोण करिल मज पार॥ध्रु०॥
द्याया आतर रुका न जवळी, सरिता भरली फार॥ १ ॥
दीनदुर्बला वित्तहीन मी, नाहीं मज आधार ॥ २ ॥
विठ्ठलदर्शन होइल कैसें, करुं या काय विचार ॥३॥ ॥५॥

आर्या.

सरिता पार करीती देती धन त्यांसि तरणिवाहक ते ॥
न्या मज विनवि असें ती, परि पशुसम तींस जाहले हकते ॥ ६ ॥

यूथिका.

नाविकेवरि बळें चढुं पाहतां ॥ लोटिती उदकिं न क्षण लागतां ॥
धांवतां घसरुनी पडली जळीं ॥ कर्दमें घनरसें तनु भीजली ॥७॥

इंद्रवज्रा.

कोणी न घेती तरणींत तीतें ॥ टाकी तमाच्या रजनी ततींतें ॥
संपूर्ण गेले जन पैल तीरीं॥ पाहूनि वृद्धा करि दुःख भारी॥८॥

भुजंगप्रयात.

रडे, ओरडे, हांक मारी बळें ती॥ह्मणे, धांव देवा, करूं काय युक्ती॥
भवदर्शनासाठिं धावूनि आलें॥ परी दग्धदैवें मला आडवीलें॥ ९ ॥

दिंडी.

धांव जगदीशा, धांव पांडुरंगा ॥ जाणतोसी तूं दास-अंतरंगा ॥
दर्शनेच्छा मानसीं धरीयेली॥परी सरिता ही विभो आड आली१०

इंद्रवज्रा.

एकादशीसी तव पादपद्म ॥ दृष्टी पडावें ह्मणुनी स्वसद्म ॥
सोडूनि आलें पथ आक्रमूनी ॥ गेली तनूही जरठा श्रमूनी ॥११॥

साकी.

सर्वहि जन ते आनंदानें पाहातिल तव चरणा ॥
ही पापिणि त्या सुखास मुकली, नाहीं केली करुणा ॥
॥ ध्रु० ॥ त्यागिन हा प्राण ॥ दृढतर निश्चय हा जाण ॥१२॥

अंजनीगीत.

पाहुनि ऐसा तीचा भाव ॥ मनीं कळवळे विठ्ठल देव ॥
त्यागुनि पंढरपुरिचा ठाव ॥ आला तन्निकटीं ॥ १३ ॥
उतारूचा वेष धरूनी ॥ स्कंधिं सांगडीभर वाहूनी ॥
बोले तिजला चक्रपाणि ॥ रोदन कां करसी ॥१४ ॥

इंद्रवज्रा.

बोले तदा ती कर जोडुनीया ॥ यात्रार्थ आलें गृह सोडुनीया ॥
श्रीपंढरीच्या,परि मार्ग नाहीं॥झाला वृथा शीण सुचे न कांहीं॥१५॥

आर्या.

मी द्रव्यहीन वृद्धा, द्याया आतर रुका नसे हातीं ॥
मग कोण पार नेती, कथितां नेत्रांबुपाट वाहाती ॥ १६ ॥

चामर.

एक मुष्टि पिष्ट कष्ट म्यां करूनि आणिलें ॥
नाव-वाहकासि द्यावयासि सिद्ध जाहलें ॥
घेति तें कुणी परी न, लोटिती तरी-तलीं ॥
कर्दमांत चीर तेवि सर्व मूर्ति भीजली ॥ १७ ॥

इंद्रवज्रा.

पाहीन दृष्टी कधिं पांडुरंग ॥ झालें उतावीळ ममांतरंग ॥
संपूर्ण यात्रा उतरूनि गेली॥या पापिणीचा न कुणीहि वाली॥१८॥

आर्या.

तेव्हां प्रभु ह्मणति तिला, नेइन उतरूनि मी नदीपार ॥
जड दुर्बल तारावे, करितों हाची सदैव व्यापार ॥ १९ ॥
तुज तारणें मज न जड, तारीतों मी महामहा जड गे ॥
तारीन पृष्ठिवरि, जें तारायातें महा जहाज डगे ॥ २० ॥
वैसे माझ्या स्कंधीं, मानी मज मानसीं जनकसाच ॥
ती काय अज्ञ जाणे, आहे हा कीं जगज्जनक साच ॥ २१ ॥

इंद्रवज्रा.

स्कंधीं निघे घेउन दीन जाया ॥ कां त्यासि दे मार्ग नदी न जाया ॥
होऊनिया पात्रिं तदा दुभागा ॥ सेतूपरी दे पथ इंदुभागा ॥२२॥

साकी.

घेउनि तीसी पैल तिरासी नच लवतांही पातें ॥
आले विठ्ठल उतारुवेषें मध्यनिशासमयातें ॥
॥ध्रु०॥ उतरुनि महिवरती ॥ जा श्रीमंदिरिं मग ह्मणती ॥२३॥

आर्या.

किति दीनदयाळ हरी, वृद्धेच्या ये हकेस धाऊन ॥
निजभक्त-हाक गोडचि लागे, त्याहुनि तया सुधा ऊन ॥२४॥

इंद्रवज्रा.

वाटे महाश्चर्य तदा तियेला ॥ ऐसा उतारू नचि देखियेला ॥
न स्पर्श होतां जलबिंदु देहा ॥ ये लंघुनी केवि महानदी हा ॥२५॥

आर्या.

त्यासि ह्मणे ती, तरसी पदाहि न भिजतां कसा महाधुनितें ॥
ही कृति त्यांहि न साधे, जे घालुनि करिति जप महाधुनितें ॥२६॥
तेव्हां उतारु वदला, ऐसे मी तारितों बहू जननी ॥
मी जें करिं तें शिशुचें करण्यालाही ह्मणे न हूं जननी ॥ २७ ॥
ऐसें वदूनि झाले पंढरिपाति ते तदा दिसेनासे ॥
होतां प्रभुदर्शन मग काय कलुष हो बहू दिसे, नासे ॥ २८ ॥

वृद्धे मनिं होतें कीं, अर्पावें तें उतारुसी पीठ ॥
परि काय तीस लाधे बैसति त्याहीन घालुनी पीठ ॥ २९ ॥

शार्दूलविक्रीडित.

गोमाई मग दर्शना प्रभुजिच्या जाऊनिया मंदिरा ॥
पाही लोचनिं श्यामवर्ण विमला मूर्तीस त्या सुंदरा ॥
साष्टांगें नमुनी करी विनवणी पाणिद्वया जोडुनी ॥
त्राहि त्राहि विभो भवार्णवजलीं दुर्वासना खंडुनी ॥ ३० ॥

आर्या.

उद्धरुनी गोमाई गेली स्वर्गास अंतसमयास ॥
कृष्ण ह्मणे, जगदीशा, दे स्थल अंतीं तदीयसम यास ॥३१॥

प्रकरण ३२ वें.

शबरकथा.

शार्दूलविक्रीडित.

आरंभीं नमितों विनायकपदा जोडूनिया पाणिला ॥
दे जो नाशुनि अंतराय भजका अत्यंतशा मंगला ॥
कार्यारंभिं जया सुरादिक सदा अत्यादरें वंदिती ॥
देवो तो मजला सुकाव्यरचनीं विद्वन्मता सन्मती ॥ १ ॥

आर्या.

होता आर्यावर्तीं पांचालप्रांतिं एक शबरसुत ॥
बाळपणापासूनी निजभूपतिदास्य तो असे करित ॥ २ ॥

साकी.

एके समयीं तो शबरात्मज नृपसुतसंगें विपिनीं ॥
जाय कराया मृगयाकेली बैसुनि वाजी-वहनीं ॥
॥ध्रु०॥ वनोवनीं फिरले ॥ एकहि पशु परि त्यां न मिळे ॥३॥

ओवी.

आला मध्यान्हीं चंडकिरण ॥ पीडिले तृषेनें संपूर्ण ॥
उदकार्थ फिरती रानोरान ॥ परी जीवन नाढळेची ॥ ४ ॥

इंद्रवज्रा.

तों देखती जीर्ण शिवालयासी ॥ विच्छिन्नता आलि बहू जयासी॥
जातां तया स्थानिं किराततोक ॥ देखे शिलेचें शिवलिंग एक ॥५॥

मालिनी.

उचलुनि बहु हर्षे घेतलें तें किरातें ॥
कृपण धन जसा घे लाधतांची करातें ॥
स्वमनिं मग ह्मणे तो नेउनी हें गृहासी ॥
करिन पुजुनि भावें पूत या विग्रहासी ॥ ६ ॥

आर्या.

तें अवलोकुनिया तो वसुधापतिसुत ह्मणे पुलिंदाला ॥
करिसी काय वदे रे वेउनिया छिन्नभिन्न लिंगाला ॥ ७ ॥
शबर ह्मणे, पूजिन या ऐसा मनिं उद्भवे नृपा हेतू ॥
परि पूजाविधि न श्रुत, तो कथि मजला, करी कृपा हे तूं ॥८॥

इंद्रवज्रा.

भूपालतोकें विधि पूजनाचा ॥ सांगूनिया श्रीशिवपूजनाचा ॥
अर्पी ह्मणे नित्य चिताविभूती ॥ होतो तयें तुष्ट महेश चित्तीं ॥९॥

साकी.

परिसुनि पूजाविधी शबर तो तोषित मानसिं झाला ॥
स्नान करूनी नित्य प्रभातीं पूजिन दुर्गापतिला ॥
॥ ध्रु० ॥ ऐशा संकल्पा ॥ करि हरुनी स्वांतविकल्पा ॥१०॥

इंद्रवज्रा.

साहित्य संपादुनि पूजनाला ॥ भावें करी श्रीशिवपूजनाला ॥
अर्पी चिताभस्म महेश्वरातें ॥ आणूनिया नूतन नित्य हातें ॥ ११ ॥

वसंततिलका.

ऐशा क्रमें बहुत काल अनन्य भावीं ॥
पूजा करूनि मग आपण अन्न सेवी ॥
एकान्हि त्याप्रति मिळे न चिताविभूती ॥
ग्रामें फिरे बहु तथापि न लाधली ती ॥ १२ ॥

झाला मनीं बहुत कष्टि तदा पुलिंद ॥
तो लाधतां न मकरंद जसा मिलिंद ॥
आला सुदीन वदनें परती गृहासी ॥
टाकी गतासुसम भूवरि विग्रहासी ॥ १३ ॥

अंजनीगीत.

पाहूनीया शबरकांता ॥ दीर्घ स्वानें करि आक्रांता ॥
काय झालें प्राणनाथा ॥ सांगा हो मजसी ॥ १४ ॥
नित्य जातां शिवपूजेसी ॥ चिताभस्म आणायासी ॥
आजहि तैसे स्मशानासी ॥ जातां कां स्थिति ही ॥ १५ ॥
झडपियलें का स्मशानभूतें ॥ पीडियलें वा कुणि मार्गातें ॥
काय झालें न कळे मातें ॥ काय मी करूं ॥ १६ ॥

आर्या.

शबर ह्मणे, गे वनिते, आजि न मज लाधलें चिताभस्म ॥
शिवपूजन अंतरतें या दुःखें होय काय हा भस्म ॥ १७ ॥
साध्वि ह्मणे जोडुनि कर, कां वांया दुःख मानसीं करितां ॥
द्या पावक मद्देहा, संपादा भूति ती पुजेकरितां ॥ १८ ॥
मी तुमची अर्धांगी, या देहाचे तुह्मी धनी प्रिय हो ॥
मत्कायचिताभूति श्रीभूतेशासि पूजनिं प्रिय हो ॥ १९ ॥

यूथिका.

पांचभौतिक तनु क्षर, तीवरी ॥ कोण सुज्ञ हृदयीं ममता धरी ॥
निश्चयें टपुनि अंतक बैसला॥घाव घालिलचि ना लगतां पळा ॥२०
काल आज अथवा शतवत्सरीं॥पाशबद्ध करुनी अपुल्या करीं ॥
घेउनी खचित जाइल देह हा॥कामिका मग अशाश्वत दे हहा॥२१॥

आर्या.

सत्कर्मीं देहार्पण होतां अत्यंत मोद ज्यां वाटे ॥
ते जाती अपवर्गीं, गेले मुनिसाधुवृंद ज्या वाटे ॥ २२ ॥
अत एव पुण्यकर्मीं मद्विग्रह शीघ्र आजि हा लावा ॥
मायामोहें तुमचा पूजानिश्चय न आजि हालावा ॥ २३ ॥

साकी.

प्रार्थी ऐसें विनीत वचनें जोडुनिया निजपाणी ॥
प्राणवल्लभा उठूनि सत्वर द्यावा मजसी वन्ही ॥
॥ध्रु०॥ घेउनि विभूतिसी ॥ पूजावें श्रीपशुपतिसी ॥२४॥

मालिनी.

परिसुनि सति-वाणी अंतरीं तोषला तो ॥
परि निज वनितेचा घात या कर्मिं होतो ॥
अनुचित कृति हातें केवि म्यां ही करावी ॥
अविहित कुमती कां स्वार्थि हे स्वीकरावी ॥ २५ ॥

स्रग्धरा.

अन्याची हानि हातें करुनि निजहिता साधिती सभ्य ना ते ॥
आहे या अंगनेचें कविगुरुमत तें श्रेष्ठ अत्यंत नातें ॥
ऐसी जी, केवि तीतें दहन निजकरीं पावकीं म्या करावें ॥
याहूनी मन्मनाला बहु विहित गमे आप आंगें मरावें ॥ २६ ॥

इंद्रवज्रा.

ऐशा विचारीं अति मग्न झाला ॥ कैसें करावें शिवपूजनाला ॥
दोहींत त्याचें मन गुंतलें तें ॥ पाहूनि कांता वदते तयातें ॥२७॥

भुजंगप्रयात.

म्हणे प्राणनाथा विचारीं न गुंता ॥ त्यजावा मनांतूनि मायीक गुंता ॥
पसारा वृथा हा पहा सर्व आहे ॥ चिरंजीव विश्वीं कधीं कोण राहे ॥
धरापृष्ठिं जो जीव जन्मासि येतो ॥ तया निश्चयें काल घेऊनि जातो ॥
वृथा शाश्वती मानिती अज्ञ देहीं ॥ तसे ना तुह्मी, जाणतां सर्व कांहीं ॥

आर्या.

शबर ह्मणे, कांते तूं रूपवती बालयौवना सुशिला ॥
अद्यापि न देखियलें गेहसुखा तेवि नंदना कुशिला ॥ ३० ॥
'स्नेहें पाळी' ह्मणुनी तव पितरें मज विवाहसमयातें ॥
कथिलें, तें आठवतें, मग होइल हें न कां विषम यातें ॥३१॥
माझ्या जडेल तुजसी स्त्रीहत्यापाप दाहितां शिरिं तें ॥
यास्तव मदीय वांच्छा कां न करिल पापदा हितासि रितें ॥ ३२ ॥

साकी.

परिसुनि पतिची उदास वाणी पुनरपि बोले त्यातें ॥
शिवपूजेस्तव धनंजयातें अर्पण करितां मातें ॥
॥ध्रु०॥ दोष न लागेल ॥ शिव सुप्रसन्न होईल ॥ ३३ ॥

मंदाक्रांता.

तेव्हां तीतें बसवुनि गृहीं लावुनीया कपाटें ॥
देतां वन्ही तिलभरि तया खेद चित्तीं न वाटे ॥
घेऊनीया मग निजकरें भस्म तीचें किरातें ॥
अत्यानंदें विहित विधिनें पूजिलें शंकरातें ॥ ३४ ॥

इंद्रवज्रा.

पूजा यथासांग समग्र केली ॥ नाहीं स्मृती मानसिं दाहिलेली ॥
नित्यापरी तो निज अंगनेला ॥ बाहे प्रसादाप्रति घ्यावयाला ॥ ३५ ॥

साकी.

गेहामधुनी पुलिंदकांता आली शीघ्र गतीनें ॥
पतिचरणांतें वंदुनि केला ग्रहण प्रसाद तीनें ॥
॥ध्रु०॥ होतां शंभुकृपा ॥ दे का पावक मग तापा ॥ ३६ ॥

आर्या.

शबर ह्मणे, कांते तुज पूजाभस्मार्थ आजि दाहियलें ॥
असुनी, कथी मला, तव देह तसे प्राण केवि राहियले ॥३७॥

मालिनी.

मृदु मधुर वचा तैं बोलिली भामिनी ते ॥
विदित मज न कांहीं, झोंप ये यामिनीतें ॥
तदधिक दृढ निद्रा लागली आज होती ॥
परि मज तव हाके दीधली जागृती ती ॥ ३८ ॥

इंद्रवज्रा.

आश्चर्य मोठें करि तो मनातें ॥ श्रीशंकरानें मम पूजनातें ॥
स्वीकारुनी थोर कृपाप्रसाद ॥ केला ह्मणूनी मनिं मानि मोद ॥३९॥

साकी.

पाहुनि दृढतर तद्भक्तीतें शंकर प्रसन्न झाला ॥
साक्षाद्दर्शन देउनि त्यांचा उद्धारहि मग केला ॥
॥ध्रु०॥ गाई कृष्ण कथा ॥ शिवपदिं ठेवुनि निज माथा ॥४०॥

प्रकरण ३३ वें.

सेनान्हावी.

साकी.

साष्टांगें अधिं वंदुनि चरणीं मंगलदायक प्रभुचे ॥
गाइन वृत्ता भक्तमणी जो सेना नापित त्याचे ॥
॥ ध्रु० ॥ पावो ते सिद्धी ॥ देवा, ऐसी दे बुद्धी ॥ १ ॥

इंद्रवज्रा.

भक्ती तथापी हरिची करीतो ॥
विष्णु पूजी विधिनें सुचित्तें ॥२॥

आर्या.

स्वोदरभरणास्तव तो जाती-धर्मानुरूप भूपाची ॥
अनुदिनिं करि सेवा, परि वागवि चित्तांत भीति पापाची ॥३॥
एके दिनिं प्रभातीं श्रीहरिपूजेस बैसला सदना ॥
तैं भूपति पाचारण धाडुनि त्यातें करी स्वदासजना ॥ ४ ॥

इंद्रवज्रा.

जाऊनिया किंकर तद्गृहासी ॥ ते सांगती नापित-अंगनेसी ॥
पाचारितो भूप तुझ्या पतीला ॥ त्या प्रेषि, होतो धिर भूपतीला ॥५॥
सांगे गृहीं जाउनि ती वराला ॥ आला असे दास निमंत्रणाला ॥
सेना ह्मणे, जाउनिया तयातें ॥ नाहींत ऐसें कथि गे गृहातें ॥६॥

ओवी.

येउनिया निजांगणीं ॥ बोले किंकरा मधुर वचनीं ॥
नाहींत पति अहो सदनीं ॥ गेलेति बाहेरि ह्मणुनिया ॥७॥

साकी.

येउनि किंकर राजगृहातें तैसेंची तो वदला ॥
सेना न्हावी असे न सदनीं, बाहिर कोठें गेला ॥
॥ धृ० ॥ ऐसी तज्जाया ॥ वदते, ऐके हे राया ॥ ८ ॥

मालिनी.

पुनरपि निजदूता तद्गृहीं धाडियेलें ॥
परि परति तसाची येउनी तोहि बोले ॥
परिसुनि निज चित्तीं कोपला बादशाहा ॥
पकडकर हजामा ले अवो अबि याहां ॥ ९ ॥
वपन मज कराया आवधी फार होतो ॥
परि नृपति ह्मणे रे सेनिया कां न ये तो ॥
पुनरपि मग दूता तद्गृहीं धाडियेलें ॥
परि परति तसाची तोहि येऊनि बोले ॥ १० ॥

ओवी.

समीप होते जे दुर्जन ॥ ते ही संधी विलोकून ॥
ह्मणती, सेना करीत पूजन ॥ घालुनी आसन बैसलासे ॥ ११ ॥

चामर.

कोपला नृपाल फार मानसांत ऐकुनी ॥
तीन चार पांच सात दूत देत धाडुनी ॥
मोट बांधुनी नदींत शीघ्र त्यास बूडवा ॥
मत्त सेवकासि भूतलाभधूनि घालवा ॥ १२ ॥

साकी.

भूपति आज्ञा परिसुनि ऐसी किंकर जन ते निघती ॥
साधुजनाचा घात कराया दुर्जन संधी बघती ॥
॥ध्रु०॥ होतां नृप-आज्ञा ॥ वरिल दया कां तत्प्रज्ञा ॥ १३ ॥

ओवी.

सर्वसाक्षी रुक्मिणीपती ॥ कोपला पाहूनी भूपती ॥
सेनियाचें रूप धरीती ॥ स्कंधीं धोंगटी घेऊनिया ॥ १४ ॥

आर्या.

ध्यान जयाचें करिती विधिहारिहर तेवि साधुसंत मनीं ॥
घालुनि दृढतर आसन कामक्रोधादि वैरिगण शमुनी ॥ १५ ॥
त्यांही पावे न, परी सेना-भक्तार्थ होय कंतक तो ॥
जातां शरण, कवि ह्मणे, त्यातें मग कारिल काय अंतक तो ॥ १६ ॥
आद्य अनंत अजित अज जो क्षीरार्णवनिवासि भगवान ॥
भक्तार्थ नीच रूपा घ्याया तो धरि मनांत परवा न ॥ १७ ॥

इंद्रवज्रा.

॒पतिच्या गृहातें ॥ भूपा करी तो मुजरा स्वहातें ॥
नमिती प्रणाम ॥ नो होय दासास्तव भूपदास ॥ १८ ॥

सर्व हारला ॥
राहवी मज ॥ १९ ॥

साकी.

मांडुनि कांचन चौरंगासी बैसे नरवर वपना ॥
सुगंधि उष्णोदक शिरिं त्याच्या लावी श्रीहरि सेना ॥
॥ ध्रु०॥ भाग्य किती त्याचें ॥ वर्णनिं ये नचि कविवाचे॥२०॥

इंद्रवज्रा.

छाया वसो मस्तकिं ज्या करांची॥ही वासना साधु मुनी सुरांची॥
यत्नेंहि न प्राप्त तयांसि होते॥ मर्दींति ते हस्त नृपाशिरातें ॥२१॥

स्वागता.

होय सौख्य मग कां न तयाला ॥ तोषयुक्त नृपती मनिं झाला ॥
आत्मकर्मिं कुशलातिमहान ॥ निश्चयेंचि इतरांसम हा न ॥२२॥

साकी.

सारुनि सेना श्मश्रू मग तो घे भाजन तैलाचें ॥
राहुनि पृष्ठीं उभा तयाच्या मर्दी मस्तक त्याचें ॥
॥ ध्रु०॥ तैलीं नृप पाहे ॥ प्रतिबिंबीं हरि दिसताहे ॥ २३ ॥
श्याम चतुर्भुज सुंदर मूर्ती चक्रगदायुधधारी ॥
चपलाकांती किरीट शोभे, कुंडल मकराकारी ॥
॥ध्रु०॥ आपद सुममाला॥पाहुनि विस्मित नृप झाला॥२४॥

कामदा.

ऊर्ध्व पाहतां सेनिया दिसे ॥ तैलिं देखतां श्रीश तो असे ॥
तो पुन्हा पुन्हा त्यापरी करी॥तो दिसे तया पाहिल्यापरी॥२५॥
लोकनाकडे चित्त वेधलें ॥ देहभान तें नाहिं ऊरलें ॥
आवधी बहू जाहली परी॥त्या क्रमासि तो ना पुरे करी ॥२६॥

शुद्धकामदा.

भ्रमितसा तदा भूप पाहुनी ॥ नवल मानिती दास ते मनीं ॥
ह्मणति, आजि या काय जाहलें॥ वपनकर्म तें नाहिं ऊरलें ॥२७॥

मालिनी.

अवधि बहु जहाली भोजनातें कराया ॥
ह्मणुनि मृदुवचानें बोलती लोक राया ॥

परि तिळभरिही तो त्यांकडेची न पाही ॥
ह्मणति, जडालि आजी काय आधी नृपा ही ।'२८॥

इंद्रवज्रा.

सेन्यासि राया करि आग्रहातें ॥ राही सदा तूं मम या गृहातें॥
तूं दूर जावें पळही न कोठें॥ जातां मला होइल दुःख मोठें ॥२९॥

आर्या.

सेना म्हणे, नृपाला, मी कोणापासुनीहि दूर न गा ॥
सर्व ज्ञाते मजला पाहति कीं जेवि चोरुं चोर नगा ॥ ३० ॥
परि मी कुणा न लाधें, लाधें दासासि दाससा राया ॥
आकारशून्य होतों साकारी दुर्मदास साराया ॥ ३१ ॥
स्थिरचर सकलहि जगता व्यापुनि अत्यंत शेष गा उरलों ॥
ऐसा जरी तथापी भक्तांच्या हृदयमंदिरीं मुरलों ॥ ३२ ॥
हे खोल बोल त्याचे नुमजति त्या अज्ञ बादशाहातें ॥
धनलोभार्थ वदे हें मानुनि धन दे प्रसन्नशा हातें ३३ ॥
सत्वर येतों म्हणुनी ये प्रासादामधूनि बाहेरी ॥
नृपदृष्टि त्याप्रति जसी मेघास्तव बर्हिणी नभा हेरी ॥ ३४॥

दिंडी.

गुप्तरूपें श्रीपती शेषशायी ॥ भक्तकाजास्तव विविध रूप घेई ॥
येउनीया तो सेनिया-गृहातें॥ मोहरांसह धोंगटी ठेवि हातें॥३५॥

साकी.

सेनान्हावी गेला पाहुनि दुःखित भूपति झाला ॥
अन्नाच्छादन राजभोग तो गोड न लागे त्याला ॥
॥ध्रु०॥ कोठें तो सेना ॥ जाउनि सत्वर त्या आणा ॥३६॥
भेटेना तो कंतक तरि हे जातिल पंचप्राण ॥
सेवक जन हो, धुंडुनि त्यातें आणा माझी आण ॥
॥ध्रु०॥ अवधी न करा हो॥ एकवार तरि तो लाहो ॥३७॥

मूर्च्छा येउनि धरणीवरती कुणपापरि तो पडला ॥
दारा नंदन आप्तादिक गण पाहुनि दुःखें कढला ॥
॥ध्रु०॥ आक्रोशें रडती ॥ करणें काय अतां ह्मणती ॥३८॥

मंदाक्रांता.

नाना यत्नें करिति जन ते औषधींच्या उपाया ॥
भूपालातें, परि सकलही होति अत्यंत वांया ॥
अज्ञानी ते ह्मणति, जडली दुर्धरा यास आधी ॥
आहे हे कीं, कुणिहि नुमजे, श्रीशरूपीं समाधी ॥ ३९ ॥

स्वागता.

तों नृपासदनिं नापित आला॥भूप सावध पळें मग झाला ॥
सत्वरी उठुनि तच्चरणातें॥मेदिनीश दृढ घालि मिठीतें ॥४०॥

वसंततिलका.

नेत्रांतुनी विपुल वाहति अश्रुधारा ॥
मज्जीवितासि असशी ऋत तूंचि थारा ॥
रूप प्रभातिं मज दाखवि दाविसी तें ॥
ना दाविसी, तरि ममासुततो हि जाते ॥ ४१ ॥

भुजंगप्रयात.

मनीं अल्पही कोप ना त्वां धरावा ॥ दयामेघवर्षाव साधो करावा ॥
तुतें बाहिलें धाडुनी दूत मत्त॥नको क्षोभवूं तूं तथापि स्वचित्त॥४२॥

वसंततिलका.

माता पिता गुरु सहोदर तूंच मातें ॥
त्राता दुजा कवण या नचि आधमातें ॥
आतां उशीर न करि द्रुत रूप दावी ॥
जें पाहतांचि मम वृत्ति भुलूनि जावी ॥ ४३ ॥

साकी.

परिसुनि सेना अघटित वार्ता मनिं बहु विस्मित झाला ॥
काय वदे हा स्वामी अपुला कांहीं न कळे मजला ॥
॥ध्रु०॥ कैसें तें रूप ॥ भुलला ज्यातें हा भूप ॥ ४४ ॥

आर्या.

ठेवुनि पाणि श्रवणीं तो कृंतक तें ह्मणे नरवराशी ॥
कांहींहि विदित न मला, परिसवती तव न दीनरवराशी ॥४५॥
मी न प्रभातिं आलों, नाहीं केलें नृपा तुझें वपन ॥
दाविलें रूप न मी, करुनी कथितों तवांघ्रिचें शपन ॥४६॥
भूप ह्मणे, गा साधो, सुज्ञें मिथ्या न बोल बोलावे ॥
पद्धति अशी असे कीं, सत्यावदली न फोल तोलावें ॥४७॥
दिधले होन तुला मी कोशांतिल हस्तिं अंजलीभर ते ॥
उघडुनि धोंगटि पाही, पाहुनि तें ये तदश्रुला भरतें ॥ ४८ ॥

शुद्धकामदा.

मग अणूनिया तैलभाजना ॥ नरपती म्हणे, शीर्षमर्दना ॥
करि अतां करें, पाहुं दे मशीं ॥ दिसत मूर्ति का पाहिली तशी॥४९॥

साकी.

बैसे नृप मग कांचनपीठीं सेना घेउनि तैल ॥
लावुनि शीर्षा सर्वांगाही काढी तनुचा मैल ॥
॥ध्रु०॥ पाही नृप तैलीं॥तों ती मूर्ति न त्या दिसली॥५०॥

इंद्रवज्रा.

सेना म्हणे, दर्शन पांडुरंगें ॥ तूतें दिलें त्या भवभीतिभंगें ॥
तो लाभ झाला न मदीय देहा॥ ऐसें म्हणूनी करुनी रडे हा ॥५१॥

भूजंगप्रयात.

म्हणे, नीच रूपा मदर्थीं धरीलें॥कुकर्मासि ऐशा मनें कां वरीलें॥
जरी प्राण माझा नराधीप घेता॥तरी त्यांत त्याचा न कीं मंतु होता॥

आर्या.

भक्तार्थ बहुत रूपें घेसी तूं, परि असें न आजवरी ॥
केलें वपना, परिसुनि देवा माचित्त कां न लाज वरी ॥५३॥
घेसी विठाइ खांदीं धोंगटि नीचार्थ या कशाला गे ॥
या सुदयाघाताहुनि शतपटिनें ऊन ती कशा लागे ॥ ५४ ॥

होउनि विन्हल ऐसा ढाळी प्रेमाश्रु तो दिवाकीर्ती ॥
कवि म्हणती, भक्तांच्या गाति न बुध कां निशा दिवा कीर्ती ॥
प्रभुदर्शन तव संगें झालें मज, नृप ह्मणे तदा त्याला ॥
परि तृप्ति न मन दावी, दाविल का तृप्ति अर्थि दात्याला ॥५६॥

इंद्रवज्रा.

झाला तदा तो हरिभक्त राया ॥सत्संग नौका भव हा तराया ॥
आहे,यदर्थीं कवण्याहि बीजें॥तो जेवि जोडे अशि बुद्धि कीजे॥५७॥

आर्या.

श्रीहरिभक्तिबलानें गेले ते उभयतांहि अपवर्गीं ॥
कृष्ण म्हणे, हे देवा, लोटिं न मज दुष्टलोक-अपवर्गीं ॥५८॥

प्रकरण ३४ वें.

सुरदास.

शार्दूलविक्रीडित.

जयाच्या नामाचें स्मरण करितां संकट हरे ॥
मृडानी-अंकीं जो बसुनि मिठि घाली गळिं करें ॥
तयाचे पादाब्जा नमुनि विनयें भक्तचरितें ॥
करूं पद्यें गाना, द्रुत हरिति जीं सर्व दुरितें ॥ १ ॥

ओवी.

कलियुगीं भक्त सुरदास ॥ तयाचें चरित्र बहु विशेष ॥
श्रोते परिसोत सावकाश ॥ करुनी मानस एकाग्र ॥ २ ॥

आर्या.

गोकुळिं एके समयीं कृष्णप्रिय नित्य सत्यभामा जी ॥
तद्गृहिं अक्रुर ये, जो चतुर महा सर्व यादवांमाजी ॥ ३ ॥

इंद्रवज्रा.

देखूनि त्यातें सति सत्यभामा ॥ पावे तदा चित्तिं बहू विरामा ॥
देऊनिया आसन बैसवीलें॥ त्यातें मनींच्या गुजगोष्टि बोले॥४॥

मालिनी.

बहुत दिन जहाले, कृष्ण या मंदिरातें ॥
पळभरिहि न येई, राधिकासुंदरीतें ॥
भ्रमित बघुनि झाला, काय यातें करावें ॥
मजसि जनहि तैसे हांसती केकि रावें ॥ ५ ॥

साकी.

षोडशसहस्त्रनारीवृंदीं कोठुनि मी ही दिसतें ॥
एकीहूनी एक रुचीरा कोण मजसि मग पुसतें ॥
॥ ध्रु० ॥ व्यर्थचि हें जीणें ॥ याहुनि बरें दिसे मरणें ॥ ६ ॥
तद्विरहानल दाहि शरीरा, गोड न लागे कांहीं ॥
तळमळतें मी मत्स्यापरि हो, होते तनुची लाही ॥
॥ ध्रु० ॥ भेटे कधिं मजला ॥ गौरीहर कां ना पुजिला ॥७॥

इंद्रवज्रा.

नाहीं मला इष्ट तुझ्यासमान ॥ लाधे तुझा काय दुजीस मान ॥
तूं पट्टराणीच कृताभिषेका॥ऐसें कथी तो, परि हें असें कां ॥८॥

दिंडी.

अहो भाऊजी, कृष्णनाथ आजी ॥ मला भेटेना तरी तनू माझी ॥
पुन्हा तुमच्या दृष्टीस पडेनाची ॥ आण निश्चित या पादपंकजाची ॥

मालिनी.

अति दृढतर तीच्या देखुनी निश्चयातें ॥
निज मनिं बहु पावे साधु तो विस्मयातें ॥
जरि इजसि न भेटे कृष्ण तो या प्रसंगा ॥
करिल खचित साध्वी आपुल्या प्राणभंगा ॥ १० ॥

आर्या.

ऐसा विचार करुनी तो साधु ह्मणे तिला अहो परिसा ॥
वहिनी, काय वदावें, अन्य नसे अनृतवादि या हरिसा ॥११॥

यूथिका.

शोधुनी द्रुत अजी परि आणितों ॥ मी सुदर्शनगदायुतपाणि तो ॥
तोंवरी स्थिर तुह्मी वहिनी रहा ॥ काळजी तिळभरी न मनीं वहा १२

आर्या.

शोधार्थ वनोपवनीं फिरती सुर साधु संत योगि मुनी ॥
न तथापि त्यांहि गवसे, होय फलप्राप्ति काय त्यां श्रमुनी ॥१३॥
षोडशसहस्रनारीमंदिरिं दिनयामिनी सदा फिरतो ॥
तो काय अतां गवसे, ऐसा स्वमनीं विचार मग करि तो ॥१४॥
द्रुत जरि न भेटवावा, करिल तरी सत्य सत्यभामा तें ॥
स्ववच, मग जडेल शिरीं माझ्या दुष्कृत न तें नभा मातें ॥१५॥
आपणचि कृष्णरूपें जावें कीं या कठीण समयास ॥
ऐसा विचार करि मनिं, मानि दुजी योजना विषम यास ॥१६॥

चामर.

कृष्णरूपि जाय होउनी तदीय मंदिरीं ॥
पाहुनी स्वमानसांत तोषयुक्त सुंदरी ॥
होउनी करावयास येइ पादवंदना ॥
येत तोंचि सत्य कृष्णमूर्ति कंसमर्दना ॥ १७ ॥

इंद्रवज्रा.

तेव्हां ह्मणे श्रीहरि अक्रुराला ॥ चित्तीं तुवां काय विचार केला ॥
मी मंदिरातें नसतांचि येसी ॥ कालीं कलीच्या जननांध होसी १८
भामेसि ‘तूंही नृपदासि होसी’ ॥ शापी असें श्रीहरि तो तयांसी ॥
प्रार्थी तदा अक्रुर दीनवाणी ॥ कां कोपलाती आजि चक्रपाणी ॥१९॥

आर्या.

तूं सर्वसाक्षि देवा, जाणशि मम मानसाशयासि न कां ॥
करुनि कृपा अतिदुःखद त्या कलिकालांत धाडुं यासि नका ॥

दिंडी.

तुझ्या विरहानें दुःखि सत्यभामा ॥ ह्मणुनि धरियेलें रूप हें विरामा ॥
प्राणहानी निश्चयें करूं पाहे ॥ ह्मणूनीया योजिली युक्ति म्यां हे ॥

आर्या.

तेव्हां श्रीकृष्ण ह्मणे, किति तरि पाल्हाळ बोल बोलावे ॥
आतां पुरे करि, जशी भग्ना मुक्ता न मोलिं मोलावें ॥२२॥

चामर.

उद्धरावयासि अज्ञ जीव तूं महीवरी ॥
जन्म-अंध होउनीच जन्म घेइ सत्वरी ॥
दासिवेशिं भेटतांचि सत्रजीत-नंदना ॥
मी तुह्मांसि उद्धरीन देउनी स्वदर्शना ॥ २३ ॥

साकी.

मथुरादेशीं अक्रुरजी तो द्विजकुलिं जन्मा आला ॥
जननीजठरीं गर्भीं असतां पावे अंधत्वाला ॥
॥ध्रु०॥ पूर्वस्मृति परि ती ॥ होती सर्वहि तच्चित्तीं ॥ २४ ॥

यूथिका.

सूरदास अभिधान तयाप्रती ॥ अंध जाणुनि पिता प्रसु ठेविती ॥
तो हरी-भजन वासरयामिनी ॥ भक्तिनें करि, न आस दुजी मनीं २५

साकी.

छंद प्रबंध नूतन पद्यें करुनी कीर्तन करि तो ॥
प्रपंचव्यवसायावरि मानस तिलही ना वावरितो ॥
॥ध्रु०॥ पूर्णचि हरिभक्त ॥ भूतदयेनें मन लिप्त ॥ २६ ॥

आर्या.

यात्राजन एके दिनिं श्रीहरिच्या दर्शनार्थ मथुरेला ॥
जाती अत्यानंदें, तत्संगें सूरदासही गेला ॥ २७ ॥

शिखरिणी.

महाद्वारापाशीं गमन करुनी शीघ्र गतिनें ॥
नमूनी साष्टांगें मिलितकर तो दीन वदनें ॥

म्हणे, देवा, यातें तव चरणसेवा न घडली ॥
परी दैवें माझ्या बहु दिनिं तुझी गांठि पडली ॥ २८ ॥

इंद्रवज्रा.

झाला नसूनी अपराध हातें ॥ देवा वृथा शापियलेंसि मातें ॥
जाणूनिया तूं मम आशयासी॥बुद्धया दिली ही स्थिति कासयासी॥

आर्या.

देवा दीनोद्धारा करुणाब्धे भक्तवत्सला हरि हे ॥
घननीला जगदीशा, करुनि कृपा चक्षुरंधता हरि हे ॥३०॥
कृष्णावतारिं होतों अक्रुर तैं एक मंतु करियेला ॥
मी नेलें कंसगृहीं तुज, म्हणुनी रोष काय धरियेला ॥३१॥
झाले नंद यशोदा दुःखि, तसे गोपगोपिकाजन ते ॥
तिकडे न विलोकुनि मी केलें अतिनिंद्य, योग्य काज न तें ॥३२॥
किति तरि विनवाणि माझी केली सकलें नमूनि परिपरिनें ॥
अडव्या रथाग्रिं पडती, पसरिति पदरास दीनपरि परिनें॥ ३३॥
दुखें कढती, पडती, दडती, युवतीतती अती रडती ॥
म्हणती याप्रति कुमती,घालिति माती शिरींहि ओरडती॥ ३४॥

यूथिका.

कृष्णरूप धरिलें जरि मंदिरीं॥हेतु ठाउक असे तुज अंतरीं ॥
तो न होय अपराध मदीय रे॥जाणसी सकल तूं कथुं काय रे॥ ३५॥
वाहतात नयनांतुनि आसवें॥कोपल्या प्रसु तरी शिशुकासवें ॥
काय सांग करणें प्रभुजी तयें॥मद्दया अजुनि कां तुजसी न ये॥ ३६॥

आर्या.

ऐकुनि तत्करुणावच तो करुणार्णव दयोर्मिनें खवळे ॥
साक्षाद्दर्शन द्याया माय जसी आत्मतोक-हाकें वळे ॥ ३७॥
होऊनि सगुणरूपी आलिंगन देइ सूरदासातें ॥
कुरवाळुनि देव म्हणे, दुःखि न हो, मी न दूर दासातें ॥३८॥

दिधली दृष्टी तुजला, ऐसें कथिलें तयास जगतातें ॥
झाला समर्थ हरिला तो तेवि पहावयास जगतातें ॥ ३९ ॥

इंद्रवज्रा.

साष्टांगिं वंदी हरिच्या पदांतें ॥ देवा, हरीलेंसि ममापदांतें ॥
मूर्ती तुझी पाहिलि लोचनांहीं॥कांहीं स्पृहा या उरलीच नाहीं॥ ४०

मालिनी.

दिधलि मजसि दृष्टी, माझिया ही न कामी ॥
वळविल मन माझें निश्चयें हीन कामीं ॥
बहु विहित गमे ही अंधता देवराया ॥
करुनि सु-अनुकंपा ही असो, दे वरा या ॥ ४१ ॥

आर्या.

प्रभु ह्मणति, सूरदासा, मागसि कां या अयोग्य वरदाना ॥
कधिंहि न वर मागावा ऐसा, जो होय योग्य वरदा ना॥४२॥
तो दास ह्मणे, देवा, कथिसी ऋत तें, मला परि न भावे ॥
दे मागें तें, ह्मणसी कां तर नचि विषयसौख्य लाभावें ॥४३॥
देव ह्मणे, भक्तांचे पुरवावे बोल लागती मजसी ॥
पुरवी सांतःकरणें शिशुचे लडिवाळ बोल माय जसी ॥४४॥

यूथिका.

चक्षुहीन मग तो पहिल्यापरी ॥ होउनी स्मरतसे हृदयांतरीं ॥
सर्व काल हरिला अतिभक्तिनें॥नूतन पद्य करुनी करि कीर्तनें॥४५

साकी.

अवंतिनगरीं भीमकनामें भूपति सात्त्विक वेत्ता ॥
त्याचे पदरीं गायकजनगण पंचशतमिती होता ॥
॥ध्रु०॥ तानसेन तयीं ॥ होता श्रेष्ठ महा गवयी ॥ ४६ ॥

आर्या.

एक दिनिं तानसेनें गाइयलें भूप-ओकसामाजी ॥
अति उत्तम परिसुनि तें झाला आनंद लोकसामाजीं ॥४७॥

तो दीप लावि समयीं मालवि तैसेहि गानरागांनीं ॥
सकल ह्मणति, जिंकिल हा गंधर्वां गायकां नरां गानीं ॥४८॥
तैं तानसेन वदला रायातें तेवि समितिलोकाला ॥
आहेत बहू मदधिक गायक जन या वसुमति-लोकाला ॥ ४९ ॥
आहे मथुरानगरीं गानकलानिपुण सूरदास महा ॥
सांप्रत वसुंधरेवरि केवल नाकर्षि नारदासम हा ॥ ५० ॥
परिसुनि तद्वच रायें पाचारणिं धाडिलें अमात्यासी ॥
आणिति ते बहु मानें होउं न देतां पथीं श्रमा त्यासी ॥ ५१ ॥

यूथिका.

तानसेन नृपती बहु आदरें ॥ वैष्णवा नमुनि त्या स्वशिरें करें ॥
प्रार्थिती, परिसणें तव कीर्तन ॥ वासना मनिं अशी करिती जन ५२

आर्या.

मग सूरदास वीणा घेउनि आरंभ कीर्तनास करी ॥
जें श्रवणीं पडतांची संसृतिरतचित्तवृत्तिनाश करी ॥ ५३ ॥
रागोपराग रागिणि वर्जावर्जादि भेद छंदाला ॥
गाई, जेणें जनमन न वरी कवण्याहि अन्य छंदाला ॥५४॥
ऐसें अव्याहत तो कीर्तन करि एक मास हरिदास ॥
तत्कीर्तनिं ताल धरी स्वकरीं भक्तार्थ होय हरि दास ॥५५॥

साकी.

पंचशतनृपतिजायासदनीं वार्ता ती श्रुत झाली ॥
ऐकविं कीर्तन त्या साधूचें, ऐसी विनती केली ॥
॥ध्रु०॥ रायातें त्यांनीं ॥ मानवलें तें भूपमनीं ॥ ५६ ॥

पृथ्वी.

विचार मग मानसीं नरपती तदा तो करी ॥
ह्मणे, नयनहीन हा किमपि बाध न्याया घरीं ॥

नसे, ह्मणुनि मंदिरीं करविलें नृपें कीर्तना ॥
महामुदित जाहल्या परिसुनी नृपालांगना ॥ ५७ ॥

मंदाक्रांता.

दासीवेषें नृपतिसदनीं सत्यभामा वसे ती ॥
त्या साधूतें नयनकमलें जाहली ती पहाती ॥
होऊनीया स्मरण तिजला पूर्वजन्मांतरीचें ॥
वंदायातें द्रुत निज करीं धांवली पाय त्याचे ॥ ५८ ॥

इंद्रवज्रा.

लाधे तदा दृष्टिस सूरदास ॥ पाहे विलोकूनि सभासदांस ॥
होती बहू लज्जित भूपरामा ॥ जाती निघूनी सकला स्वधामा ॥५९॥
ती सत्यभामा प्रभुकृष्णरामा ॥ लाधे मनीं देखुनि तो विरामा ॥
बोले, वृथा लाधलिस श्रमातें ॥ नेवो हरी तूज निजाश्रमातें ॥ ६० ॥
तेव्हां प्रसन्न प्रभु होउनीया ॥ साक्षात् तयां दर्शन देउनीया ॥
उद्धार त्यांचा करि विश्वपाल ॥ ती गाइ कृष्णाख्य कथा रसाल ६१

प्रकरण ३५ वें.

काशीखंड—मुक्तिमंडपाख्यायिका.

आर्या.

वंदुनि दुर्गातनया गाऊं श्रीक्षेत्र-काशि-महतीतें ॥
मंदमति करिल गाया उत्साहे तत् विकाशि मह तीतें ॥ १ ॥
कथिली स्कंदपुराणीं काशीखंडांत कार्तिकेयांनीं ॥
कुंभोद्भव मुनिला जी, प्राकृतिं गाईन गीति आर्यांनीं ॥२॥

जोडुनि हस्त सविनयें सिंधुप्राशक ह्मणे महासेना ॥
मुक्ती-मंडपमहिमा कथिं, तुजला कठिण हें महासें ना ॥ ३ ॥
स्कंद ह्मणे, प्रश्न तुझा आणी कथनाब्धिवारिला भरती ॥
शंभुकथाकथनाला घाली हा प्रश्न बुद्धिलाभरती ॥ ४ ॥
अंत्यज सेतूबंधीं एक वसे भाग्यवंत पुरुनामा ॥
ईश्वरभक्तिपरायण, करि मनिं चिंतन सदैव हरिनामा ॥ ५ ॥
एके वासरिं झाली तन्मनिं उपरति असारिं संसारीं ॥
न वसें यांत ह्मणे मी, मीन जसा कीं अवारि कासारीं ॥ ६ ॥
मग कांतेसि ह्मणे तो, गेहव्यवसाय अर्पुनी तनया ॥
जाउनि काशीक्षेत्रीं संपादूं मोक्षधर्मनीत नया ॥ ७ ॥
आहे अगणित धन तें क्षेत्रस्थ ब्राह्मणां समर्पून ॥
सार्थकता जन्माची करुं सुर पितरांहि पूर्ण तर्पून ॥ ८ ॥
द्रव्यार्जन यत्नानें करुनी सत्कर्मि तें न वेचावें ॥
जरि तरि तें होय वृथा, पाषाणीं बीज जेवि रोचावें ॥ ९ ॥
कांता ह्मणे, सुबुद्धे, मानासिं आणिला विचार उत्तम हा ॥
होय सफल तनु येणें, पावे मोदा मदीय चित्त महा ॥१०॥
परि संदेह मनीं ये, घेइ कवणें दान हीन जातीचें ॥
घेईल कनकपुष्पा कोण त्यागूनि सुमन जातीचें ॥ ११ ॥
देतां दान अपात्रीं लाभे दुर्गति, न पुण्य लाभेल ॥
औषध ह्मणुनहि घेतां, सांगा, विषवल्लि कां न बाधेल॥१२॥
या केवि जातिहीनां दर्शन होईल काशिकापतिचें ॥
बोले ऐसें साध्वी चरणीं ठेवूनि मस्तका पतिचे ॥ १३ ॥
तीतें सदा पुरु ह्मणे, स्वीकारिति जरि न विप्र दानातें ॥
गंगार्पण करुं हातें, ती काय ह्मणे तरी कदा ना तें ॥ १४ ॥
करुनी सुविचार असा घेउनि बहु धन अमोल वासाला ॥
तें दंपत्य शुचि मनें काशीक्षेत्रीं निघे निवासाला ॥ १५ ॥

कांहीं कालें गेलें तें श्रीवाराणसींत मेहूण ॥
झाला आनंद तयां मुक्तिप्रद पुण्यभूमि पाहून ॥ १६ ॥
तो सज्जन मज्जन करि दुरितहरा जाह्नवींत सकलत्र ॥
घ्या दान, ह्मणे विप्रां, ह्मणती ते, ग्राह्य हें न सकलत्र ॥१७॥
या क्षेत्रीं दान तुझें घेइल जो विप्र, जाय तो नरका ॥
खदिरांगार कधीं हो बांधिल पदरांत जाणता नर का ॥ १८ ॥
अतिशूद्र तूं, प्रतिग्रह कैसा तव होय योग्य विप्रवरा ॥
घेतां कलंक लागे गोत्रातें तेवि आपुल्या प्रवरा ॥ १९ ॥
अन्यस्थलकृत पापें या पुण्य क्षेत्रिं पावती नाशा ॥
करितां पुण्य क्षेत्रिं न, यास्तव आह्मां न पापद धनाशा ॥२०॥
विनवी बहु परिपरिनें, परि कोणि न अंगिकारिती दाना ॥
मग मनिं ह्मणे, अमृतफल-ज्ञ कसा तो संग्रहील वृंदांना ॥२१॥
खिन्न मनें स्त्रीसि ह्मणे, स्वीकारिति कोणिही न दानातें ॥
मी हीनकुलज मानुनि ह्मणती वृक नोक्त दंति मानातें ॥ २२ ॥
संपत्ति कां दिलि अशी, दैवें कोणीहि दान घेति न ती ॥
पाहुनि दुःखें मजला होती, मन्मानसा सहाति न तीं ॥ २३ ॥
ऐशा चिंतार्ते मनें क्रमिले त्या क्षेत्रिं मास तीन तयें ॥
एकाह्नि उषःकालीं तो स्नाना जाह्नवीप्रती नत ये ॥ २४ ॥
तों एक द्विज देखुनि अंजुलि भरुनी सुतापनेयानें ॥
घे दान ह्मणूनि ह्मणे, विप्रा, मम दूर ताप ने यानें ॥ २५ ॥
वाडव म्हणे पुरूतें, घेइन मी परि कुणा न वदशील ॥
तैसेंच संग्रहाचें जरि दानीं वित्त सर्व देशील ॥ २६ ॥
अल्पार्थ दूषित कधीं सहसा करणें न योग्य कार्यातें ॥
निष्कांचननरसदनीं चौर्य कधीं करुनि भाग्य का येतें ॥ २७ ॥
प्राकृतिं ह्मण ऐसी कीं, उच्छिष्टातें घृतार्थ सेवावें ॥
यत्नें महाद्रि खणुनी खनकातें काढणें जसे वावे ॥ २८ ॥

तें विप्रवचन पुरुच्या अमृताधिक मधुर लागलें श्रवणा ॥
चित्तिं ह्मणे, दुर्दैवें अजवरि हे स्वन न लाधले श्रवणा ॥२९॥
विप्रासि म्हणे, देइन धन शेष न ठेवितां तिलहि तुजला ॥
सत्कर्मी व्यय सोडुनि संचयपथिं सुज्ञ कोण गा अमला ॥३० ॥
नेउनि गृहिं सन्मानें अर्पी द्विजकरिं समस्त दानिं धन ॥
संकल्पयुक्त पुरु तो चुकवाया जन्म-आपदा निधन ॥ ३१ ॥
गुप्तपणें आनंदें घेउनि धन जाय तो स्वगेहातें ॥
कांतेसि म्हणे, जपुनी ठेवी हें संग्रहास गे हातें ॥ ३२ ॥
आनंदयुत म्हणे ती, कोण अजी भेटला महादानी ॥
जेणें दारिद्र्याचा तरु तापद उपटिला महादानीं ॥ ३३ ॥
विप्र ह्मणे, गे परिसे, शतसूर्याधिक महान रुचिमान ॥
जो विश्वेश्वर तेणें धाडियला बहुधनाढ्य यजमान ॥ ३४ ॥
पुनरपि वदे तया ती, सांगा कोठील कोण हें मज गा ॥
किति तरि दिधलें त्यानें आम्हांतें, जें अलभ्य हेम जगा ॥३५॥
वास्तव्य सेतुबंधीं पुरुशर्मा ध्येयजाति अतिशूद्र ॥
गेहाश्रमप्रवर्ती भक्तिपरायण, तदाचरण भद्र ॥ ३६ ॥
घेति न दान तयाचें हीन कुलींचा म्हणूनि विप्र जन ॥
गेलें होतें त्याचें मन चिंताकर्दमांत गे रुजुन ॥ ३७ ॥
परि मी बहु गुप्तपणें केलें हें ग्रहण हेमदान करीं ॥
ही वार्ता क्षेत्रस्थां विप्रां श्रुत, गृहिणि हे, कदा न करीं ॥३८॥
बोले ती, बहुत बरें, करणें बहुसाल कांचनाभरणें ॥
बहुमोल वास आणा, साहित्यें गेहभाजनां भरणें ॥ ३९ ॥
तैसेंचि तो द्विज करी, शाल्योदन नित्य भोजना करिती ॥
विविधोपभोग भोगिति, झालें तें गृह सुखी अनेक रिती ॥४०॥
मानिति तुच्छ समस्तां, देहा श्रेष्ठत्व आपुल्या देती ॥
लक्ष्मीप्रभाव ऐसा, बुध म्हणती, कधिं न गुप्त नांदे ती ॥४१॥

भार्या परांगनांतें आत्मालंकार दावुनी हिणवी ॥
करुनी स्तौत्य पतीचें जगतीं बहु धन्य आपणा म्हणवी ॥४२॥
पाहुनि धनवान तया क्षेत्रींचे विप्रवृंद कुजबुजती ॥
व्यक्त न बोलति, परि त्या श्रीमानासि न दरिद्रि का बुजती ४३
म्हणती, सनिश्चय तयें स्वीकारीलेंचि दान हीनाचें ॥
लाभ अलभ्य जहाला प्रारब्धवशें, म्हणूनि हा नाचे ॥४४॥
श्रुतिशास्त्राधारें तैं द्विजवृंदें ज्ञातिबाह्य तो केला ॥
झाला अपंक्त, तेणें अत्यंताचि तो स्वचित्तिं धाकेला॥ ४५ ॥
ये श्यामता मुखावरि, चिंतेनें ग्रासिलें तया मतिला॥
न सुचे कांहिं, कवि म्हणे, ज्ञातीहुनि वित्त ऊन किमतीला॥४६॥
कांतेसि म्हणे, आतां या क्षेत्रीं राहणें न हितकर तें ॥
झाले धनार्थ रिपुसे, होते जे सर्व काल हितकरते ॥४७॥
जाऊं अन्य क्षेत्रीं, अथवा जाऊं सुदूर परदेशीं ॥
घेऊं धनोपभोगा त्या स्थलिं, अनुमोदनासि जर देशी ॥४८॥
त्यजितां स्वसुखार्थ बुधें देश ग्रामा गृहाहि आप्तांना ॥
दोष न लागे कांहीं, यास्तव बहु शीघ्र सोडुं या स्थाना॥ ४९ ॥
कांतासुतस्नुषेच्या स्वधना अपुल्याहि शीर्षिं वाहुनि घे ॥
त्यागुनि काशीक्षेत्रा दक्षिणदिक्पंथिं जावयास निघे ॥ ५० ॥
क्रमितां कांहीं वासर मार्गीं स्तेनांहिं समय मानून ॥
गांठियलें, पाहुनि ते भासति त्या चित्तिं सम यमा नून ॥५१॥
हरुनी सकल धनातें नेउनि चौघांहि घोर कांतारीं ॥
वधिती शस्त्राघातें, ईश्वर पातकि अघोर कां तारी ॥ ५२ ॥
नेती कृतांतकिंकर करुनी दृढपाशबद्ध चवघांतें ॥
करिती उभे यमाग्रीं, कथिती पाथिंचा उदंत अवघा ते ॥५३॥
आणूनि चित्रगुप्ता पुशिलें तत्पापपुण्य धर्मानें ॥
हा क्षेत्रस्थ, म्हणे तो, दान परी घेतलें अधर्मानें ॥ ५४ ॥

यासाठिं कुक्कुटाचा क्रौंचपुरीं एक जन्म भोगति ते ॥
मग काशिवासपुण्यें संपूर्णहि पावती वरा गतितें ॥ ५५ ॥
ते जन्म कुक्कुटाचा क्रौंचपुरीं घेति दानदोषानें ॥
बुध ह्मणती, घ्यावें नाचि यास्तव हिनजातिदान पुरुषानें ॥५६॥
तों सेतुबंधिंचे जन आले त्या स्थानिं काशितें जाया ॥
ते त्या चारहि पक्ष्यां घालिति धरुनी स्वकावडी-ठायां ॥५७॥
आणुनि काशीक्षेत्रीं सोडिति ते कापडी विहंगम ते ॥
विश्वेश्वरालयाच्या निकटीं राहूनि जाहले रमते ॥ ५८ ॥
शिवदर्शन नित्य तयां होय, करिति जन्हुजांबुपानातें ॥
करिती वेदश्रवणा, नाना स्मृतिंतें महापुराणांतें ॥ ५९ ॥
ऐसे मुक्तिक्षेत्रीं क्रमिती नव अब्द अंतरिक्षगम ॥
झाला तेणे त्यांतें सौख्यद कैलासपंथ तो सुगम ॥ ६० ॥
आले विमान घेउनि शिवभवनांतुनि सुदिव्य शिवगण ते ॥
भस्मोध्दूलितदेही शिवभजनीं रत तदीय शिव गणते ॥६१॥
बैसविति आदरानें शिवकिंकर पाखरें विमानीं तीं ॥
पूजिति बिल्वदलानें, ते त्यां शिवतुल्य चितिं मानीती ॥६२॥
गेला उद्धरुनि द्विज सहजन कैलासिं दानपापि परी ॥
काशीवासफलानें, मुक्तिद न क्षेत्र अन्य काशिपरी ॥ ६३ ॥
ज्या स्थलिं मुक्ती लाधालि कुक्कुटपक्ष्यांस त्या स्थला म्हणती ॥
मुक्तीमंडप ऐसें, घटजा स्वमुखें षडास्य ते वदती ॥ ६४ ॥
स्कंदपुराणिं कथा जी प्राकृतिं ती गाइ गीति आर्यांनीं ॥
कृष्ण सदाशिवसुत हा, न करावी हे अमान्य आर्यांनीं ॥६५॥

प्रकरण ३६ वें.

बालक्रीडा—गोपीगाऱ्हाणीं.

आर्या.

दे, देवा, मति गाया हरिची या मंद बालकें लीला ॥
नमुनी तवांघ्रिकमला गाइन मी नंदबालकेलीला ॥ १ ॥
भगवंत शेषशायी करि लीला गोकुलांत अवतरुनी ॥
ती गातां विमल मनें दुर्धर पापीहि जाति भव तरुनी ॥ २ ॥
एके दिवशीं येउनि गाऱ्हाणीं सांगती यशोदेशीं ॥
गोकुलच्या बहु नारी, आतां आम्ही न या वसों देशीं ॥३॥
एक ह्मणे गोपस्त्री, येउनि सदनांत गोरसा हरि तो ॥
जो स्थित तुझ्या कडेवरि निमुटपणें तोचि चोरसा हरितो ॥४॥
तोडी शिंकीं हातें, फोडी दधिदुग्धभाजनां दंडीं ॥
आजि यशोदे यातें घाली नचि तेंवि भोजना, दंडी ॥ ५ ॥
ठेवुनि उरीं करातें पुसतो दृढतर धरूनि 'हें काय' ॥
तेणें बहु सुख वाटे, कुरवंडिन यावरूनि हे काय ॥ ६ ॥
तीस यशोदा बोले, चावट बाई तुह्मीच हा केला ॥
नेउनि गृहांतरीं या मारिसि कांगे उगीच हांकेला ॥ ७ ॥
याच्या भयें, दुजि म्हणे, ठेवीं नवनीत संदुकांमाजीं ॥
भक्षुनि घट करि उपडा जातां बाहेरि कोणि कामा जी ॥८॥
येउनि हळूच सोडुनि गाई वत्सांसि धाकुल्या दावीं ॥
पळवी अति वेगानें, धरूं जातां बाइ वाकुल्या दावी ॥ ९ ॥
हांसे, उडे कपीसा, दीर्घ रवें ओरडूनि धांवतसे ॥
धरितां यत्नें यातें गतजीवीसा रडूनि दावितसे ॥ १० ॥

तों रोषें तिसरि ह्मणे, सांगूं खोडी कितीक गे याची ॥
चाल ह्मणे गृहिं मजला, जातां भलतीच वस्तु मग याची ॥११॥
प्राशुनि दहिं दुध आपण निजहस्तें माखुनी सुतावदना ॥
प्यालिस तूंच ह्मणूनी कथिन, ह्मणे, येउंदे प्रसू सदना ॥१२॥
गोपी एक ह्मणे, गे आणुनि हा यामिनींत नकुलातें ॥
सोडुनि गृहिं भिववि मुलें, ही तुमच्या योग्य नीत न कुलातें १३
एक ह्मणे, धेनूंचीं नेउनि वत्सें वनांत दडवीतो ॥
दधि पय विकावयातें जातां मथुरेसि मार्गिं अडवीतो ॥१४॥
मागे दधि दुध प्याया, देतांही हा परी करी कुत्सा ॥
सोडूनि दावें हातें वंध्या ह्मैसीस पाजि गोवत्सा ॥ १५ ॥
एक ह्मणे, जलघट मी जातां घेऊनि हा करें नयन ॥
झांकी मागुनि येउनि, देसी कां, चोरटे, म्हणे, पय न ॥१६॥
हांसुनि जारापरि हा संज्ञा करि चढवुनी मला भिवयी ॥
करितो विचित्र करणी, यातें मानूं नको लहान वयी ॥१७॥
निद्रिस्थ सपति शयनीं असतां दे ग्रंथि दाढि-वेणीला ॥
न सुटे कुणाहि, परिसुनि वाटे आश्चर्य नंदराणीला ॥ १८ ॥
येउनि गृहीं मुलांच्या लघुशा हा गे महान सामाजीं ॥
भक्षुनि दधि घृत नवनित जातां हागे महानसामाजीं ॥१९॥
आला वानर वानर लावुनि सुतमुखिं म्हणे घरोश्याला ॥
सदनोसदनीं फिरवी, देखुनि ये गोपिसंघ रोषाला ॥ २० ॥
हा औखळ बहु, यातें बांधी घेऊन दाम उखळासी ॥
करि शिक्षा अति मोठी, हो या चित्तिं न कदा मज खळासी २१
आहे हा बहु खट गे, भलभलतें मज पुसेचि, न वदावें ॥
सोडीं न गृहा बाहिर, घेउनि या स्तंभि बांधि नव दावें॥२२॥
ऐशा नाना परिचीं गाऱ्हाणीं सांगती यशोदेशी ॥
दाविति असत्य कोपा, प्रेमें परि पाहती हृषीकेशी ॥ २३ ॥

दाविति बाह्य क्रोधा, परि मनिं सप्रेम भाव वापरती ॥
ह्मणुनि परम सुख लाभे, सारिति त्या स्वर्गिं वासवा परती २४
कथितां मुखाकडे त्या कृष्णाच्या पाहतात मायेनें ॥
शांतवन गोपिकांचें करुनी नेला गृहांत मायेनें ॥ २५ ॥
काढुनि दृष्ट तयाची प्रेमें ती नंदकामिनी तनया ॥
कुरवाळुनी ह्मणे, कां त्यजुनि शिरसि निंद्य कामिनीत नया २६
दे दुर्बुद्धी सोडुनि, सद्बुद्धीचाचि अंगिकार करी ॥
आण तुला कंठाची, न घडो ऐसा तुझ्या प्रकार करीं ॥२७॥
आहेत गोपिका ह्या चावट तैशा लबाड गोकुलिंच्या ॥
ठकवितिल तुला वत्सा मधुमधु सांगूनि गोष्टि त्या झुलिच्या २८
कृष्ण ह्मणे, गे माते, अजपासुनि मी असें करिन, जाणें ॥
देती त्रास बहु मला, कधिंही आतां तयां घरिं न जाणें ॥ २९ ॥
आहेत लबाड महा, गाऱ्हाणीं त्या असत्य वदताती ॥
जीं कृत्यें ठकवुनि मज करिती येती तुला न वदतां तीं ॥३०॥
ही गाऱ्हाणी-सुकथा गाई प्रेमें सदाशिवात्मज तो ॥
जो निशिदिनिं हनुमंता पदिं नमुनि सदा शिवात्मजा भजतो३१

प्रकरण ३७ वें.

अनुशासनपर्वांतील अध्याय पहिला.

आर्या.

धर्म ह्मणे, सर्वज्ञा गांगेया, शांति बहुविधाकारा ॥
बहु सूक्ष्मा ह्मणति तसी, ती माझ्या नाचि शिवे त्वदागारा ॥१॥

हे वीरमणे भीष्मा, आहें दुःखार्त मी महान कसा ॥
कथितों, करुनी सुदया तैसें देऊनि लक्ष तें परिसा ॥ २ ॥
शरसंघातें व्रणयुत रुधिरस्रावेंहि माखिली काया ॥
वर्षाकालिं गिरि जसा, ती पाहुनि होय दुःख ना का या ॥३॥
तैसेचि बांधवांसह बहु नृप जे वीर धीर समराशीं ॥
पडले, पाहुनि देहीं दुःखाच्या पडाति अद्रिसम राशी ॥ ४ ॥
हें सर्व काल माझ्या मानासिं येऊनि मद्धृदय फुटतें ॥
जैसी वर्षाकालीं वृष्टीनें कंजचारुता तुटते ॥ ५ ॥
केलें सुयोधनानें तैसें म्यांही सुनिंद्य कर्माला ॥
कामक्रोधाधीनाचि झालों, पात्रहि तसा अधर्माला ॥ ६ ॥
गमतो मज बहुत बरा धृतराष्ट्रात्मज अजी सुयोधन गा ॥
उरला नाचि सोसाया उरलों मी बहुत पापि दुःखनगा ॥७॥
पाहुनि दुःखार्त तुह्मां या समरांगणिं हि पावतां पतन ॥
होतें दुःख असह्यचि, सोसे काशि हा मदीय ताप तन ॥८॥
कुलदूषणद सुयोधन होता जरि आप्तबंधुहानिकर ॥
तोहि न तथापि उरला, पाहाया दुःखसिंधु हा निकर ॥९॥
झाले मृत जे समरीं, वाटे मज लाधले सुभविकातें ॥
असते सजीव जरि ते, तरि या बुडते न दुःखभविं कां ते १०
जरि मी सहारिपु समरीं होतों मृत, वा सबंधु नोत्पन्न ॥
तरि बहु बरेंचि होतें, या तव दुःखासि देखितों मग न ११
आह्मी प्रत्यक्षाचि हें दुःख तुझें पाहतों स्वनयनानें ॥
किति तरि पापी, कां यां केलें निर्माण वेदवदनानें ॥१२॥
जातां परलोकिं अह्मी होऊं पापांतुनी विमुक्त असें ॥
शिव वांच्छिसि तूं अमुचें, तरि कथिं सदुपाय, हेंचि विनवितसें
असतों जरि पुण्यात्मा, तरि या तव दुःखपर्वतसमूहा ॥
नसतें विलोकिलेंची, परि मी न तसा, असेंचि पापि महा ॥१४॥

भीष्म ह्मणे, पांडुसुता, ईशाधिन तूं असूनि परतंत्र ॥
ह्मणसी कारण कर्मा, धर्मा, हा पारिसिला कुठे मंत्र ॥१५ ॥
मी ह्मणसि कर्म करिता, परि न तसें, अन्य तो असे गुप्त ॥
जो इंद्रियां अगोचर, कर्मविकारें न होय तो लिप्त ॥ १६ ॥
यद्विषयीं तुज, भूपा, कथितों प्राचीन एक इतिहास ॥
त्यांतिल लुब्धकपन्नगमृत्युवचन गौतमीवचहि परिस ॥१७॥
होती गौतमिनाम्नी वृद्धा स्त्री बहुत शांतियुत एक ॥
झाली एके दिवशीं देखति निज सर्पदंशहत तोक ॥ १८ ॥
तें अर्जुनकव्याधें क्रोधें अहि पाशबद्ध तो करुनी ॥
आणुनि वृद्धेसन्मुख मारुं ह्मणे कोणत्या वदे कृतिंनीं ॥१९॥
टाकुनि अग्नित वा करुं खंडुनि शस्त्रेंचि पात्र मरणाला ॥
त्वद्बालघातकी हा न असे कीं योग्य जीवभरणाला ॥२०॥
गौतमि म्हणे, अबुद्धे, सोडी यातें, करी न तूं हनन ॥
वद कोण पापकर्में अपणा करि लिप्त, हें करीं मनन ॥२१॥
वधिल्या हा फणि आतां होइल तरि का न तोक मेलासा ॥
असला जरी सजीवी, व्याधा, तव नाश काय वद तैसा ॥२२॥
प्राणयुतजंतुलागीं देती जे जीवदान मानव ते ॥
जातिल का यमलोकीं, असुनि असें हें कसेंचि मानवतें॥२३॥
संपूर्णांच्या दुःखा जाणुनि जे दुःखि चित्तिं होतात ॥
ते दुष्ट सजीवांही नाचि बहु यत्नें करूनि वधितात ॥ २४ ॥
लुब्धक ह्मणे, गुणज्ञे, सर्वार्तज्ञजन होति पापयुत ॥
त्यांहूनि भिन्न त्यातें तव हे उपदेश होति कीं विहित ॥२५॥
मी सर्वार्तज्ञचि गे, यास्तव मारीन या भुजंगाला ॥
हा दुष्ट तापदायक, योग्य न कीं दुष्ट साधुसंगाला ॥२६॥
कालगति भिन्न जाणुनि त्यागी ज्ञाता विचारि शोकाला ॥
तैसेचि अज्ञ मोहें करिती नाशास आत्मभविकाला ॥ २७ ॥

असती सर्वज्ञ महा, यास्तव तूं या भुजंगघातानें ॥
व्हावें खिन्न न चित्तीं, वद, वधुं का हेतिच्या विघातानें २८

बोले तदा वयःस्था व्याधातें, मत्समान जे नर ते ॥
धर्मात्मेचि अहिंसक, तन्मानस दुःखसौख्य तें न रते ॥२९॥

जरि हा मम नंदन, तरि जन्मासमवेत नित्य मृत्यु वसे ॥
यास्तव भुजंगमा या माराया मी समर्थ जाण नसें ॥ ३० ॥

जे ब्रह्मतत्त्ववेत्ते, त्यांतें दुर्गतिद कोप तो न शिवे ॥
कोपें निरयप्राप्ती त्यजितां कां लाधतील तो न शिवे ॥३१॥

व्याध म्हणे, गे परिसे, यातें वधिल्यास लाभ सौख्यकर ॥
होईल, केंवि ह्मणसी, कथितों तें श्रवण चित्तयुक्त कर ॥३२॥

वधितां रणिं शत्रूतें यजनीं पशुतें तसेंचि बलि देणें ॥
येणें अक्षय लाधे परलोकीं श्रेष्ठ सौख्य तें जाणे ॥ ३३ ॥

वधितां या सर्पासी होइल जो लाभ त्या वृथा त्यजसी ॥
कालें होणाऱ्या कां दृष्टी लाभीं परत्रिंच्या देसी ॥ ३४ ॥

बोले पुनरपि वृद्धा, वधितां हा प्राप्ति काय होय अरी ॥
तैसा विमुक्त करितां होतो तव नाश काय, कथन करी ॥३५॥

या शत्रुरूपि उरगा कवण्या बीजें क्षमा न गा करणें ॥
करणें विहित गमे मज, जाणुनि कां अनुचितासि अनुकरणें३६

व्याध ह्मणे, या एका वधितां रक्षण असे अनेकांचें ॥
मारवुनि अनेकांप्रति करणें रक्षण न योग्य एकाचें ॥३७॥

करिती कृतापराध्या ज्ञाते जन ते क्षमा क्वचित्समया ॥
हा बहु तापद जाणें, वधणें अत एव योग्य अतितम या॥३८॥

जरठा ह्मणे, फणीतें वधितां सुत जीविता न लाधेल ॥
यास्तव सजीव त्यातें सोडीं, वधितां न पुण्य साधेल ॥३९॥

मृगयी वदे पुन्हां तो, वधुनी वृत्रासुरा सुनाशीर ॥
झाला सुखि, शिव दक्षा, घे देवकृति, न करी वधीं उशिर ४०

धर्मासि भीष्म म्हणती, बहु ऐसें लुब्धकें तिला कथिलें ॥
अनुमोदना परि न ती दे दधि विष का किती जरी मथिलें॥४१॥
तो पाशबद्ध पन्नग किंचित् श्वासीं धरूनि धैर्यातें ॥
ऊर्ध्वानन करुनि म्हणे बहु मंद वचें तया अनार्यातें ॥ ४२ ॥
सर्प म्हणे, रे मूर्खा, कवणाचा दोष हा तुला गमला ॥
अन्याधीन असें मी, तेव्हां मम दोष काय, सांग मला ॥४३॥
ही प्रेरणा यमाची, केला अत एव दंश या बाला ॥
मी क्रोधानें अथवा इच्छुनि निज मानसीं न लाभाला॥४४॥
मत्पापकर्म गमतें तुज हें, परवश परंतु मी खचित ॥
शर जीवहानि करितो, दोष कुणाचा कथीं मनें उचित ॥ ४५ ॥
व्याध ह्मणे, परवश तूं, परि केलें त्वांचि पापकर्माला ॥
तूं हेतु, ह्मणुनि पापी तुज म्हणतां बाध ये न धर्माला ॥४६॥
जैसी मृत्पात्रकृती कल्पिति जन काष्ठदंड अरिठायां ॥
ते कारणिभूत जशी, तैसा तूंची महान पापा या ॥ ४७ ॥
अत एव निश्चयें तूं असती बहु पापि, सत्य जाण अहे ॥
तूं वध्य, तुज वधावें, करणें सुदया कधीं न सूचित हें ॥ ४८ ॥
दंदशुक म्हणे, जैसे अरिदंडादिक निजात्मवश नसती ॥
तैसाचि मीहि, यास्तव तनयवधाचा न दोष मजवरती॥४९॥
अन्योन्यकारणीभुत ऐसा जरि वा तुझा अभिप्राय ॥
तरि त्यांत कोण कर्ता, शंका याविषयिं दूर ना होय ॥ ५० ॥
आहे ऐसें, तरि मी दोषी पापी न वध्य हें खचित ॥
वा दोष कार्यकारणिं, होसी मग मद्वधीं कसा उचित ॥ ५१ ॥
लुब्धक ह्मणे, न कर्ता, तूं कारणहि न, तथापि नाशाला ॥
आहेस कारणीभुत, यास्तव तूं वध्य भाससी मजला ॥५२॥
दुष्कार्यानें, भुजगा, कर्ता दोषि न, असें त्वदीय मत ॥
परि चोरादि कुकर्मी वधितां राजा न होय पापयुत ॥५३॥

तैसा अशास्त्रवर्ती होतो पापीचि सत्य निःशंक ॥
यास्तव वध्य असाशि तूं, व्यर्थचि कां जल्पसी धृतकलंक ॥५४॥
सर्प म्हणे, कार्य नसे, मग कोठुनि बा क्रियाचि असणार ॥
या दुष्ट कर्मिं कारण जरि मी मत्कार्य काय करणार ॥५५॥
वानिं वृक्षघर्षणादिकवन्हीनें लागतो वना वणवा ॥
होतो कुठारघातें च्छेदित तरु, कोण सांग दोषित वा ॥५६॥
म्यां वधिलें या पुत्रा, ऐसें जें मानिसी स्वचित्तांत ॥
तें सत्य नसे, व्याधा, या कर्मीं मी न कारणीभूत ॥ ५७ ॥
रे, मीच कारणीभुत ऐसें जरि सत्यसें तुला गमलें ॥
तरि मी अन्यप्रेरित, दोषी प्रेरक न का असें ठरलें ॥ ५८ ॥
बोले मृगयाजीवी, अससी तूं बालघातकी क्रूर ॥
तैसा दुष्ट दुरात्मा, वध्याचि, कां विफल बोलसी फार ॥५९॥
पुनरपि भुजंगम वदे, द्रव्यें ऋत्वीज अर्पिती यागीं ॥
तत्फल न प्राप्त तयां, तैसा मी पात्र ना वधालागीं ॥ ६० ॥
भीष्म ह्मणे, कुंतिसुता, ऐसें बहुपरि भुजंग बोलतसे ॥
तैं मृत्यु तेथ येऊनि बोल सर्पासि काय तें परिसें ॥ ६१ ॥
मृत्यु ह्मणे, कालानें प्रेरियलें मज ह्मणून मी तुजसी ॥
यास्तव तूं मीहि तसा जाणें कारण न बालहननासी ॥६२॥
जैसा नृप चोरातें वधितो ह्माता कथूनि गजहातीं ॥
दोषि न या कर्मिं तदा भूपादिक ते त्रिवर्गही होती ॥६३॥
जिकडेचि समीरण ने मेघातें जाय तो जसा तिकडे ॥
कालाधीन तसा मी, अनुचर त्याचा, न दोष तो इकडे ॥६४॥
सात्त्विक राजस तामस कालात्मक हे समस्त गुण असती ॥
तत्तद्गुणभावपरे जाणे संपूर्ण चेतनीं वसती ॥ ६५ ॥
तैसें स्थावर जंगम पृथ्वी आकाश सर्व हें जगत ॥
आहे कालात्मकची, जाणे काकोदरा मनीं खाचित ॥ ६६ ॥

संसार मोक्ष यांच्या मार्ग कृती त्याहि सर्व दंदशुका ॥
असती कालात्मकची, कालें त्यजिलें न सांगवे अमुका ॥६७॥

विधि हरि हर रवि शशि सुर अनलानिल शक्र सिंधु वसु अष्ट ॥
सरिता विहायसादिक कालोत्थित होति काळिंची नष्ट ॥६८॥

आहे जरि ऐसें हें, मानिसि, उरगा, कसा सदोषि मला ॥
दोषि न मी, तूंहि तसा, करिसी मग कां सदोषि याचि मला ६९

सर्प ह्मणे, बा मृत्यो, निर्दोषी वा सदोषि कांहिं नची ॥
वदलों प्रेरियलें मज मृत्यूनें, मात्र सत्य इतकेंची ॥ ७० ॥

दोषार्ह काल यद्यपि, न तथापि तसेंहि मी वदें वदनें ॥
निर्दोषसदोषाच्या निर्णयिं अधिकारि मी नसें जाणें ॥७१॥

या बालकहत्येचा दोष नसो कीं मदीय देहाला ॥
मृत्यू दोषी अथवा न दोषि यद्विषयिं हेतु काय मला ॥७२॥

भीष्म ह्मणे धर्मातें, व्याधा अहि मृत्यु बोलती परिसें ॥
दृढपाशबद्ध अहिला राहूं देणें तुला न हितकरसें ॥ ७३ ॥

व्याध ह्मणे, मृत्यूचें परिसियलें तेवि बोलणें तव रे ॥
परि निर्दोषि न तूं त्वां केला प्रत्यक्ष मंतु हेंचि खरें ॥७४॥

अससी मृत्यु तथा तूं कारण या दीनबालहानीतें ॥
मी मानितोंचि ऐसें निष्कारण ये न मृत्यु जननीतें ॥ ७५ ॥

क्रूर दुरात्मा दुःखद साधुजना मृत्यु, त्यास धिक्कार ॥
तूं पापि दुःखदायक, वधितों तुज जाणुनीच अपकार ॥७६॥

मृत्यु ह्मणे, दोघेही परवश आह्मी निवेदिल्या कर्मीं ॥
आह्मी न दोषि होतों, तूं सुविचारें विलोकि सद्धर्मीं ॥७७॥

उभयांहि कालतंत्री गणिलें, तरि हर्षरोष कां होती ॥
हें मृत्यु दर्विकारा सांगा श्रवणासि वांच्छि मी चित्तीं ॥७८॥

मृत्यु ह्मणे, बा परिसे, ह्या सकला ईश्वरी कृती मानी ॥
याविषयीं अधिंच तुला, व्याधा, कथिलें असेचि उभयांनीं ७९
यास्तव आह्मी दोघे कालें निर्दिष्टिल्यानुरूप असों ॥
दोषि न हें जाणुनिया निजकर्मीं सर्वदाहि वर्ततसों ॥ ८० ॥
भीष्म ह्मणे, मग तेथें धर्मार्थदिनिर्णयासि ये काल ॥
बोले लुब्धकपन्नगमृत्यूंतें, सांगतोंचि, अयकाल ॥ ८१ ॥
काल ह्मणे, मी न तसे सर्वहि तुह्मी न दोषि जंतुवधीं ॥
तैसेचि न प्रयोजक, जाणा करुनी स्वकीय त्हतमल धी ॥८२॥
केलें न कर्म हें मी, प्रेरक आम्हांसि बालकर्म असे ॥
हेतु न दुजा विनाशा, निजकर्में बाल होय मृत, परिसे ॥८३॥
प्राण्याचीं निजकर्में होती कारण तदीय नाशाला ॥
संपूर्ण जीव तैसे आहों आह्मीहि वशचि कर्माला ॥ ८४ ॥
अवलंबुनि कर्मातें कर्मप्रेरक समस्त हे लोक ॥
कर्मस्वरूप असती तैसे आह्मीहि सर्व, हें लोक ॥ ८५ ॥
जैसीं मृत्पिंडाचीं इच्छित पात्रें कुलाल ते करिती ॥
तैसीं कृत कर्मेंची मनुजातें पापपुण्यफल देती ॥ ८६ ॥
आतप आणि छाया राहति संबद्ध सर्व काल जसीं ॥
आत्मकृत कर्म तैसें, रे व्याधा, लिप्त जाण कर्त्यासीं ॥८७॥
यास्तव या शिशुमरणा कारण मी वा न मृत्यु वा फणि तूं ॥
तैसी गौतमि वृद्धा, तत्कर्मचि जाण बा असे हेतू ॥ ८८ ॥
झाला निजसुत मृत, हें जाणुनि चित्तीं फल स्वकर्माचें ॥
वृद्धा वदे, न कारण काल भुजंगमहि मृत्यु, हें साचें ॥८९॥
झाला मृत निजकर्में, मत्कर्में पाहतें तया मृत मी ॥
सोडुनि उरगा, व्याधा, जावें सर्वांहिं आपुल्या धामीं ॥९०॥
भीष्म ह्मणे, जाती ते, झाला गतशोक व्याध वृद्धाही ॥
आहे ऐसें, धर्मा, दुःखी कां तूं विचारिं हें पाहीं ॥ ९१ ॥

हें कर्म तूं न अथवा केलें दुर्योधनेंहि नचि मानी ॥
झाले मृत भूपादिक संपूर्णहि ते स्वकीय कर्मांनीं ॥ ९२ ॥

प्रकरण ३८ वें.

श्रीकृष्णास अन्नार्पण.

आर्या.

मंगलदायक चरणीं प्रथम नमुनि पाणिमस्तकें लीला ॥
गाऊं श्रीकृष्णाची प्रेमभरें गोकुळांत केलीला ॥ १ ॥
नानाविध नंदसुतें केलें क्रीडन ह्मणूनि विप्रजन ॥
निंदुनि सोडुनि गोकुल यमुनातटिं वनिं करीति ते यजन ॥ २ ॥
जगवंद्य कृष्णरूपा निंदिति नेणूनि अज्ञ परिपरिनें ॥
भ्रष्टविलें व्रज ह्मणुनी, निंदावा परिस जेवि खापरिनें ॥३॥
श्रीरामकृष्णदर्शन वांच्छिति विधिवासवादि दिनरजनी ॥
व्रजविप्र मंदभागी नेणति जो श्रेष्ठ सर्व अमरजनीं ॥ ४ ॥
एके दिनिं त्याच वनीं संगें गोपाल गाइ घेऊन ॥
श्रीरामकृष्ण जाती तातडिनें निज सिदोरि विसरून ॥ ५ ॥
सोडुनि सवत्स गायी तृणठायीं खेळती अनेक विधी ॥
उडती, नाचति, गाती, गाय कसी कौतुकास त्या कविधी ॥६॥
मध्याह्नसमय होतां लागलि अत्यंत तैं क्षुधा त्यांतें ॥
उदरव्यथा कठिण बहु, समयीं ती सोडिना विधात्यातें ॥ ७ ॥
मग तोक ह्मणति, कृष्णा, आलों विसरुनि गृहीं सिदोऱ्यांसी॥
भुलुनी तव केलीला आणियलें अन्न ह्मणुनि दोऱ्यासी ॥८॥

एक ह्मणे, हे कृष्णा, लागलि मजला क्षुधा, सहावेना ॥
आतां काय करावें, क्षणभरिहि सख्या उभें रहावेना ॥ ९ ॥
किति एक दीन वदनें झाला ह्मणतात काल न्याहरिचा ॥
२ क्षुत्पीडा अतिदुःसह, कोमालाही मुखेंदु तैं हरिचा ॥ १० ॥
श्रीकृष्ण ह्मणे त्यांतें, यमुनातटिं विप्र याग करितात ॥
जा, त्यांसि अन्न मागा, माखिं भोजन मागत्यासि देतात॥११॥
यज्ञप्रसाद घेतां दोष नसे, वेदवाणि ही वदते ॥
सुरही करिति तदिच्छा, या अन्नें लाधतें वरास्पद तें ॥१२॥
श्रीकृष्णवचन परिसुनि जाती गोपाल यज्ञठायासी ॥
धांवति याजक जैसे दात्यागृहिं संपदा लुटायासी ॥ १३ ॥
जाऊनि यज्ञमंडपिं ह्मणती, आह्मी क्षुधार्त गोपसुत ॥
३ तैसेचि रामकृष्णहि, द्या अन्न, विलंब ना करा, त्वरित ॥१४॥
पाहुनि गोपसुतां द्विज कोपानें रक्त चक्षुतें करुन ॥
म्हणति,वनिंहि गांजाया आले आम्हांसि, दंत करकरुन॥१५॥
भ्रष्टविलें व्रज गोकुल, म्हणुनी या राहिलों तपो-रानीं ॥
येथेंहि पातले ते, द्यावा किति ताप सान पोरांनीं ॥ १६ ॥
द्विज म्हणती, पोरांनों, न मिळे हें पूत अन्न, जा परते ॥
नेणति सुरभी आल्या, कोण असे भाग्यहीन यांपरते ॥१७॥
पूतत्वाचे गर्वे झिडकारिति गोपतोकसमुहातें ॥
निंदिति कृष्णहलधरां, ज्यां म्हणती सुर हरादि 'नमुं हातें' १८
निष्ठुर निर्दय निंदित गर्वोक्ती ध्वंदसी श्रवण करिती ॥
धिक्कारुनि त्यां जाती झांकुनिया बालकें श्रवण करिं तीं॥१९॥
४ जाउनि कृष्णासंनिध कथिती वृत्तांत, अन्न देति न ते ॥
करणें आतां कैसें, सांग उपायासि, जाहलों न [illegible]ते ॥२०॥
पिडिलों बहु क्षुधेनें, जाऊं हे प्राण पाहती त्वरितें ॥
ही होय क्षुधा असुरी, करिते श्रवणमननार्चनास रितें ॥२१॥

कृष्ण ह्मणे, जाउनिया त्या द्विजपत्न्यांस अन्न मागावें ॥
आहेत क्षुधित वनीं सुत नंदाचे, असेंहि सांगावें ॥ २२ ॥
देतील निश्चयें त्या अन्न तुह्मां, सुज्ञ साध्वि त्या असती ॥
लाजवितिल निजपतितें, सति--औदार्यें जसी विरे असती २३
जाउनि मग अन्यपथें सत्वर त्या यज्ञशालिकेमार्गें ॥
असती तेथ सती त्यां गोपसुतसमूह अन्न तो मागे ॥२४॥
श्रीरामकृष्णहि वनीं आहेत क्षुधित वृक्षछायेसी ॥
द्या अन्न शीघ्र ह्मणती, जेंवीं लघु बालकें स्वमायेसी ॥२५॥
परिसुनि त्या तोकवचा द्रवल्या विप्रांगना मनामाजी ॥
तो अन्न याचि, ह्मणती, करि यत्सेवार्थ कामना मा जी ॥२६॥
विप्रें छळुनि दवडिलें, म्हणुनी आलों तुह्मांस मागाया ॥
आहांत भक्त हरिच्या, योग्य तशाची सतीसमा गाया ॥२७॥
परिसुनि ती सुतवाणी त्या साध्वी चित्तिं फार कळवळल्या ॥
व्यवसाय दुजे त्यजुनी अर्पाया अन्न त्या सकळ वळल्या ॥२८॥
एकीस एक म्हणती, भुलले कीं विप्र हे अहंमतिनें ॥
हा श्रीवैकुंठपती अमरांच्या वंदिला सदा ततिनें ॥ २९ ॥
पूर्णावतार हा कीं, ध्यायी हृदयीं सदा सदाशिव तो ॥
नेणति दुर्मति हे द्विज, कुमतिस सद्भाव कां कदा शिवतो॥३०
यत्प्राप्त्यर्थीं जप तप करिती मख साधनें अनुष्ठानें ॥
तो अन्न याचि, अमुचा भाग्योदय जाहला अकष्टानें ॥३१॥
मायामोहीं द्विज हे झाले गुंतूनि यास दवडीते ॥
चिंतामणि फेकुनिया राखिति कीं संग्रहास कवडीतें ॥३२॥
यद्यपि जल्प[illegible]तिवरि पडलें, तरि अन्न देउं या तनयां ॥
करितां आचरण असें चुकलों होईल काय यांत नया ॥३३॥
करुनी सुविचार असा षड्रस अन्नें भरूनि पात्रांतें ॥
तल्लीन जाति होउनि हरिरूपीं त्यजुनि त्या अपात्रांतें ॥३४॥

सिंधूस जेवि सरिता जाती अव्याहता मिळायातें ॥
तैशा वाडवरामा, कोण असे शक्य त्यां वळायातें ॥ ३५ ॥
पथिंचे गुल्मलतागिरिपादपखग कृष्णरूप त्यां दिसती ॥
लक्ष न मार्गक्रमणीं, रत हरिपादिं जेवि कांतपादिं सती॥३६॥
एक ब्राह्मणललना घेतां अन्नसि राहिली मागें ॥
तों ये तत्कांत, ह्मणे क्रोधानें, करिसि काय कामा गे ॥३७॥
पाहुनि सक्रोध पती ती झाली चित्तिं फार गांगरती ॥
ताडुनि मुखीं वदे, या कोण ह्मणे वर्तनें तुह्मां गरती॥३८॥
गेल्या कोठें इतरा वनिता हें कळत त्यास वृत्त खरें ॥
मग तो ह्मणे, इतें मी जाउं न देईन, राहुं द्या नखरें॥३९॥
परम भ्रष्ट गवळि हे, त्यां कां हें पूत अन्न देतां गे ॥
कवण्या शास्त्रीं आहे, पूजावे गोवळे, मला सांगे ॥ ४० ॥
पूजियले न मखद्विज, अन्न कसें आजि विटाळिलें गे हें ॥
त्या भ्रष्टांच्या धाकें त्यजलीं तत्संग टाळिले गेहें ॥ ४१ ॥
पतिकरिं अग्निब्राह्मणसन्मुखची अर्पिलें तुम्हां तातें ॥
त्या पतितें त्यजुनि कशा पूजाया गवळि सांग जातां तें ॥४२॥
ऐसें म्हणुनी तीतें बांधी स्तंभासि दंत करकरुनी ॥
जासि कसी पाहुं ह्मणे, यष्टीनें ताडि बद्धकर करुनी ॥४३॥
मग ती म्हणे पतीतें, आहे मम काय पांचभौतिक हा ॥
यावरि तुझीच सत्ता, यास्तव घे ठेवुनी स्वकीय गृहा ॥४४॥
ऐसें म्हणुनि सती ती ढाळी प्रेमाश्रु कंठ गहिवरुनी ॥
श्रीनंदनंदनातें ध्यायि मनश्चंचलत्व आवरुनी ॥ ४५ ॥
हे कृष्णा गोविंदा गोपाला माधवा जगज्जनका ॥
द्यावें अन्न तुला, हा पुरवाया हेतु होसि सज्ज न कां ॥४६॥
गेल्या इतरा युवती द्याया तुज आजि अन्न बहु विधिचें ॥
तो लाभ भालिं मम का लेखाया हस्त चूकले विधिचे॥४७॥

व्हावें तव दर्शन, परि झालें मी आजि दैवहीन कसी ॥
तें उमजलें, उतरली त्वद्भक्तीच्या खचीत ही न कसीं ॥४८॥
सार्थक नचि या तनुचें झालें, ह्मणुनी निजासुतें सोडी ॥
हरिरूपिं मग्न होतां देहाची काय लागते गोडी ॥ ४९ ॥
श्रुत होय सकल विप्रां गेल्या कीं सर्व आपुल्या रामा ॥
यज्ञान्न द्यावयाला कृष्णातें तेवि गोवळ्यां रामा ॥ ५० ॥
येऊनि पाकगेहीं द्विज देखति, तों तिथे कुणि न रमणी ॥
होती थक्क न कां हो ललनांचें धैर्य ऐकुनि नरमणी ॥ ५१ ॥
एक ह्मणे क्रोधानें, आली जरि का मदंगना परती ॥
लाविन शिक्षा ऐसी, करिती किं सहन कदाहि ना पर ती॥५२॥
तेवि दुजा विप्र म्हणे, आतां गृहिं कासयास वर्तावें ॥
घेऊनि चतुर्थाश्रम संसाराच्या भयास परतावें ॥ ५३ ॥
किति एक ह्मणति, आम्ही झालों बहु वृद्ध जाणुनी हो त्या ॥
गेल्या, हें अधिक न, कां, अजवरि आम्हांसि मानुनी होत्या ५४
एक म्हणे, उत्तमची झालें, संसारताप हा सरला ॥
पुरुषें कितिही प्रेमें वागावें, परि न त्या पहा सरला ॥५५॥
दृढ निश्चयें ह्मणति ते, जरि आल्या मागुती गृहीं रमणी ॥
तरि घेउं न, मूर्ख जसा मानुनि कंकर झुगारि हीरमणी ॥५६॥
जेणें स्वकीय पत्नी स्तंभातें बांधिली करें होती ॥
तो द्विज सकलांसि ह्मणे, म्यां जाउं न दीधली पहा हो ती ५७
जाउनि तो तन्निकटीं सोडुनि रज्जू ह्मणे, प्रिये वनिते ॥
बंधन ताडण केलें, परि आतां आणुं तूं नको मनिं तें ॥ ५८ ॥
ती काय बोल बोले, जी श्रीकृष्णस्वरूपिं समरसली ॥
जेणें स्वभक्तकाजा अत्युत्साहें सदा कटी कसली ॥ ५९ ॥
नुघडी लोचन, तैसा वाहे नासाग्रिं न प्रभंजन तो ॥
पाहुनि गतासु तिजला कष्टी अत्यंत जाहला जन तो ॥६०॥

जाती तरि बहुत बरें, आली असती कधीं तरी परत ॥
अवरोधिली वृथा मी, तेणें झालोंचि दुःखतापरत ॥ ६१ ॥
ऐसा बहु शोक करी, टाकी निज देह मेदिनीवरता ॥
कवि म्हणती, हरिभक्ता च्छळितो तो होयची सुखा परता ॥६२
अन्नार्पणकांक्षेनें त्यजिले जीणें निजासु निरुपायें ॥
तद्धेतु पूर्ण व्हाया करुणानिधि हरि तिच्याच रूपा ये ॥६३॥
नानाविध पक्वान्नें भाजनिं भरुनी समस्तभामाग्रीं ॥
जाई, हरिपदिं मग्ना, काय उणी तिसि पडेल सामग्री ॥६४॥
इतरा रामा म्हणती, ईतें अवरोधिली वरें होती ॥
आली परंतु कैसी सकलसुवनिताग्रिं सत्वरें हो ती ॥ ६५ ।
गजगति युवती जाती देखति घनकांति मापती हरि तो ॥
वंदिति अतिभक्तिपथीं जो द्रुत निजदाससंकटें हरितो ॥६६॥
अर्पुनि बहुविध अन्नें स्वकरें त्या रामकृष्णगोपाला ॥
झाल्या बहु संतुष्टा, विसरति संसारदुःखतापाला ॥ ६७ ॥
मखविप्रभामिनी त्या श्रीकृष्णाच्या पदाब्जमकरंदा ॥
भ्रमरी होउनि सेविति, कविमति त्या काय वर्णि आनंदा ६८
झाला संतुष्ट हरी त्यांच्या प्रेमार्पितेंचि अन्नरसें ॥
बोले स्वर्गीं अंतीं बहु सुख भोगाल देवकिन्नरसें ॥ ६९ ॥
जा आतां निज सदनीं, ठेवुनि मच्चरणिं चित्त नांदावें ॥
सन्मानितिल पति तुम्हां, धरतिल तिलही तुम्हांसि ना दावे ७०
त्या म्हणती, हे कृष्णा, असती पति बहु कठोर कोपी ते ॥
वसतों तुझ्याच संनिध, त्यजुनी पीयूष तक्र कोण पितें ॥७१॥
पुनरपि कृष्ण म्हणे त्यां, करणें चिंता न आग्रहीं जाच ॥
मद्वच तथ्याचि माना, होय न अल्पहि तुम्हां गृहीं जाच ॥७२॥
कृष्णाज्ञेनें ललना निजसदनीं जावयास अनुसरती ॥
दर्शन पुनःपुन्हांही म्हणती होवो न भेट ही सरती ॥ ७३ ॥

जातों, परंतु कृष्णा लोभ असावा, कृपा शिरीं राहो ॥
तव भजनीं चित्त रतो, मुक्तीचा लाभ या शरीरा हो ॥७४॥
जी बांधिली पतीनें होती स्तंभासि, ती तदा मिळली ॥
श्रीहरिरूपीं, जैसें लवण समुद्रीं, न मागुती वळली ॥ ७५ ॥
पतिभयभीता रामा करुनी श्रीहरिपदाब्जि नमनातें ॥
मूर्ति हृदयिं धरुनी ती करिती पथिं मंद मंद गमनातें ॥७६॥
येती निजगृहिं भामा, परि पति त्यां दाविती न कोपाला ॥
ह्मणती, उत्तम केलें, अन्न दिलें रामकृष्णगोपाला ॥७७॥
अज्ञान मूढ आम्ही गेलों भुलुनी वृथाभिमानांनीं ॥
पूर्णावतार हरि हा केला तुम्हि तृप्त अन्नदानांनीं ॥ ७८ ॥
धन्य तुम्ही, धन्य जिणें, धन्य तशी भक्ति, धन्य आचार ॥
धन्य तुम्हां संगें अम्हि, म्हणती मनिंचा त्यजूनि अविचार ७९
घेउं अतां हरिदर्शन, ऐसा ते द्विज विचार मनिं करती ॥
परि गोविप्र वधाया कंसाचे दूत काननीं फिरती ॥ ८० ॥
या धाकें ना जाती, परि करिती यज्ञ पूर्ण वाडव ते ॥
सहपत्नी, श्रीमाधवपदनतकार्यास कोण आडवतें ॥ ८१ ॥
ते ब्राह्मण ललनांसह इह सुख भोगूनि अंतिं उद्धरिले ॥
तें वृत्त कृष्ण गाई, जेणें दृढ हरिपदांबुजा धरिलें ॥ ८२ ॥

प्रकरण ३९ वें.

मोदरामायण.

आर्या.

(यांत ' मोद ' हा शब्द प्रत्येक आर्येत साधिला आहे.)

सुतशोकें मृत्यु, म्हणुनि देई श्रावणपिता वनीं शापा ॥
परि मोद पुत्रहीना त्यायोगें होय दशरथा भूपा ॥ १ ॥

दोहदयुत कौसल्या होतां अत्यंत मोद मानि मनीं ॥
श्रीरामरूपिं मग्ना, झाली परि सिद्ध ती दनुजदमनीं ॥ २ ॥
अवतीर्ण तूर्ण होइल पद्मापति पद्मनाभ पद्मकर ॥
जाणूनि मोद मानी काराग्रहवासि जो अमरनिकर ॥ ३ ॥
तैसीच मेदिनीही होइल खलभार दूर पृष्ठींचा ॥
ह्मणुनी मोद करी कीं, रविकुलिं अवतरत तात सृष्टीचा ॥ ४ ॥
पाहुनि दोहदचिन्हें होउनि हृदयीं वसिष्ठ संतुष्ट ॥
मोद पवे जगकर्ता सुरमुनिंचे द्रुत हरील कीं कष्ट ॥ ५ ॥
जातिल मख सिद्धीतें, होइल खलताटकांत रामकरीं ॥
वधहि खरदूषणांचा, मनिं विश्वामित्र ह्मणुनि मोद करी॥६॥
होय शिला मुनिशापें मुनिपुंगवगौतमांगनाऽहल्या ॥
करि मोद राघवपदस्पर्शें होईन सारखी पहिल्या ॥ ७ ॥
देहीं असुनि विदेही, अनुपम सत्साधु भूप तो जनक ॥
बहु मोद मनीं पावे, होइल जामात सृष्टिचा जनक ॥ ८ ॥
घालीन निज करांनीं राघवकंठीं स्वयंवरीं माला ॥
ह्मणुनि करी मोद मनीं सकलजगद्वंद्य जानकी बाला ॥ ९ ॥
श्रीशिवकार्मुक जेणें असुरवधें अमित पातका केलें ॥
उद्धार राघवकरें होइल ह्मणुनी समोद तें डोले ॥ १० ॥
मिथिलापुरीं स्वयंवरिं दशमुख अवमानिला, परी मोद ॥
मानी, ह्मणे, बहु बरें, झाला उत्पन्नबीज हा वाद ॥ ११ ॥
धाडी विपिनीं रामा दशरथ भूपाल, मोद परि मानी ॥
कीं जरि जाइल न वनीं राहिल खलभारयुक्त ही अवनी १२
जातां श्रीराम वनीं कौसल्या मनिं न खेद करि मोद ॥
साध्वीपद्धति ऐशी, पतिवचना येउं देति नच भेद ॥ १३ ॥
मोद सुमित्रा पावे, राघवसेवा घडेल तनयातें ॥
अनुजें श्रेष्ठ भ्रात्या साह्य करावें त्यजूनि अनयातें ॥ १४ ॥

अतिदूरदृष्टि कैकयि जरि मी रामा न धाडिं कांतारीं ॥
जातां मज मोद खरा होइल नातरि अतथ्य-अवतारी॥१५॥
वाल्मीकिवचन सत्यचि जातां श्रीराम होय विपिनांत ॥
अत एव वसिष्ठमुनी निज ह्रदयीं मोद तो करी बहुत ॥१६॥
प्रियतम बहु कैकयितें कलिकालग्रसित मंथरा दाई ॥
जातां श्रीराम वनीं स्वामिनि-कार्यार्थ मोद तिसि होई ॥१७॥
पितृवचनार्थ विहितपथिं जाणें अतियोग्य, राम ह्मणुनि वनीं॥
जातां न खेद मोदचि करि, सत्सुतलक्षणें असींच जनीं १८॥
प्रेमें रघुपति विपिनीं बदरें उच्छिष्ट भक्षि शबरीचीं ॥
करि ती मोद ह्मणूनी, तो भक्तिप्रिय राम तीं ह्मणे बरिंची॥१९॥
कपटी कुरंग मारिच झाला विपिनांत जानकीहरणीं ॥
प्रभुहस्तें मृत्यु ह्मणुनि मानी मोदचि, न खेद निजमरणीं २०
हरि सीता यतिरूपें, परि ती मनिं मोद मानि,कां परिसा॥
खलमंतु पूर्ण झाले, आतां वधितील राम त्या पर-सा ॥२१॥
राणें पक्षहीन पक्षी झाला, परि मोद मानसीं करि तो ॥
भेटेल श्रीराघव आतां, जो भक्तसाध्वसा हरितो ॥ २२ ॥
प्रभु ऋष्यमूकपर्वतिं येतां भेटूनि मोद हनुमान ॥
मानी, नल नील तसे सुगलादिक कपि महान बलवान॥२३॥
अनयें रामें वधिला वाली सुगलार्थ, मोद परि मानी ॥
तो, तद्धेतु स्वसुता संरक्षिल राम दास-अभिमानी ॥ २४ ॥
वालिप्रमदा तारा रामाज्ञा भंगिना, ह्मणुनि मोद ॥
वरि तिजला, थोरांचें मानावें लागतें वचन वेद ॥ २५ ॥
सीताशुद्धि कराया जातां हनुमान मोद बहु मानी ॥
होइल अंबादर्शन, दंडिन तो दानवेंद्र बहुमानी ॥ २६ ॥
सीताशुद्धिसुवार्ता कर्णीं पडतां कपीसमूहातें ॥
अत्यंत मोद झाला, ह्मणती 'तत्पद कधीं नमूं हातें' ॥२७॥

सिंधूस उपलसेतू पावति करितांच मोद ते उपल ॥
रामाक्षरमुद्रेनें झाले ते धन्य, तज्जनन सफल ॥ २८ ॥
लंकापुरि हनुमंतें जाळिलि, परि मोद ती करि, न खेद ॥
होइन शुचि रामपदस्पर्शानें, स्तविति नित्य ज्या वेद ॥२९॥
सौमित्र रणीं पडतां उपडुनि द्रोणाद्रि आणि हनुमंत ॥
परि मोद करि, न कोपे, प्रभुदर्शन लाभ मानि अत्यंत॥३०॥
साक्षात् श्रीरामाग्रीं निधन तसा अन्य लाभ काय असे ॥
ऐसें दशास्यपृतना मानुनि अत्यंत मोद मानितसे ॥ ३१ ॥
दशमुखबंधु बिभीषण, तद्वच हितकारि मानि तो खल न ॥
तैं त्या त्यजि बंधूला राघवसेवेंत मोद मनिं गणुन ॥३२॥
थोर सती मंदोदरि पतिनिधनीं खेद मानसीं न करी ॥
मोद करी, तद्धेतू पापार्जन तें अतां न कांत करी ॥ ३३ ॥
वासवजित् घटकर्णा श्रीरामागमन देइ मोद अती ॥
कीं देवां जिंकियलें आजवरी, जिंकुं आजि देवपती ॥३४॥
दशवदन मोद मानी, केलें म्यां विहित जानकीहरण ॥
तें न घडतां न येते मम धामा रामजानकीचरण ॥ ३५ ॥
लंकासज्जनजन ते येतां श्रीराम तो सुवेळेसी ॥
करिती मोद, अतां द्रुत मर्दिल समरांगणीं दशास्यासी॥३६॥
कारास्थित बंदीजन काराक्लेशार्त मोद मानीती ॥
मुक्त करिल राम अतां, जाणे तो न्याय उत्तमा रीती॥३७॥
दशवदनदासदासीमंत्रीजनचित्तिं मोद तो शिरला ॥
खलसेवा दुर्गतिदा, दुर्जनदंडार्थ राम अवतरला ॥ ३८ ॥
विंशतिभुजशस्त्रास्त्रें प्रभुवरि सोडील आमुचा स्वामी ॥
ह्मणुनी मोद बहु तयां, ह्मणती मग लीन होउं त्या रामीं ३९
मोद दशास्यहि पावे, झाली मत्कृत विरोधपर भक्ती ॥
फलदा सत्य, अतां मज देइल जगवंद्य तो वरा मुक्ती॥४०॥

पापरत दशाननवध आतां होईल रामचंद्रकरीं ॥
हा लाभ अलभ्य गणुनि मंदोदरि मानसांत मोद करी॥४१॥
रामासिं रण कराया जागृति देतील कुंभकर्णातें ॥
मग होय रामदर्शन,होइ ह्मणुनि मोद अंतरंगातें ॥ ४२ ॥
साध्वी सुलोचना श्री-रामाग्रीं पतिशिरास हसवीन ॥
पातिव्रत्यहि दाविन, ह्मणुनी ती मोद मानि भयहीन ॥४३॥
मुनिदत्ततीक्ष्णविशिखें रामें वधितांचि रावणास रणीं ॥
झाला मोद त्रिजगा, अनुपम यत्समरिं रावणा-सरणीं॥४४॥
बसवुनि शिबिकेमाजी आणिति जगवंद्य माय वानर ते ॥
मोद करिति, तन्मानस सीतेविण अन्यिं तेथवा न रते॥४५॥
खलभार वाहिला बहु दिन, आतां आरुढेल रघुराय ॥
सचमू, यास्तव पुष्पकयाना अत्यंत मोद तैं होय ॥ ४६ ॥
लंकेंतुनि अणितां श्रीजगमाता वंदिली कपीनिकरें ॥
वंदिति वीर सकलही, नाचति पावूनि मोद मोदभरें ॥४७॥
कुलहानिखेद विसरुनि मोद बिभीषण तदा मनीं मानी ॥
घडलि ह्मणे मज सेवा समयीं तो रामकार्य-अभिमानी॥४८॥
येतां आयोध्यापथिं मार्गीचे पावले मुनी मोद ॥
द्विज तैसे, सेविति जे भक्तिपथें प्रभुपदाब्ज-आमोद ॥४९॥
बहु शोधितां कविमना गमला रामावतार मोदकर ॥
सकलांहि सुमोद जयीं झाला, कवणाहि हा न खेदकर ॥५०॥
बसतां प्रभु सिंहासनिं भरती नभ मोदमोद मोदरवें ॥
होती बहु सोहाळे, तद्वर्णन कृष्णधीस ना करवे ॥ ५१ ॥

प्रकरण ४० वें.

इंदुकांति नाटक.

चामर.

रामनाम सर्व काल ध्यायकेशनंदना ॥
पाणिपाद जोडुनी करूनि त्यास वंदना ॥
गावयास इंदुकांतिभूमिपालकीर्तना ॥
देउ तो सुकाव्यकर्मि सन्मतीस मन्मना ॥१॥

रत्नसानुपर्वताग्रिं कांचनाख्य पत्तनीं ॥
सार्वभौम चंद्रचूडनाम भूपसन्मणी ॥
न्यायराजनीतिधर्मपंथिं राज्य तो करी ॥
धेनु विप्र साधु संत पाळि थोर आदरीं ॥ २ ॥

साकी.

त्याची भार्या महासाध्वी सुमती नामें होती ॥
तत्पर पतिच्या सेवेठायीं सादर वासरराती ॥
ध्रु०॥ संतति परि पोटीं ॥ नाहीं ह्मणुनी अतिकष्टी ॥ ३ ॥

आर्या.

नानापरिनें देवादिकांसि झालें न हीत नवसून ॥
तें पाहुनि चित्तिं ह्मणे, व्यर्थचि जगतांत ही तन वसून ॥४॥

दिंडी.

जया नाहीं संतान प्राप्त झालें ॥
तया पितरांचा स्वर्ग-ठाव हाले ॥
सौख्य कैचें त्या भूतलीं परत्रीं ॥
मनीं आणुनि हें ढाळि अश्रु नेत्रीं ॥ ५ ॥

वसंततिलका.

साध्वी ह्मणे पतिस तैं कर जोडुनीया ॥
द्यावा रुकार कृत मद्वच मानुनीया ॥
आतां करावि दुसरी ललना सुतार्थ ॥
होऊं तयें सकलही जगतीं कृतार्थ ॥ ६ ॥

आर्या.

आहें हो मी तुमची जाया, परि लाधलां न संततिला ॥
दुजि करितां ईशदयें होइल सुत, मानुं भाग्यवंत तिला ॥ ७ ॥

कामदा.

संततीविना शुन्य भासतें ॥ गेह तें जिवावीण देह ते ॥
चंद्रमाविना यामिनी जसी ॥ संततीविना कामिनी तसी ॥ ८ ॥

साकी.

परिसुनि तीचें सुबोध भाषण भूपति खिन्नचि झाला ॥
मान्य करावें कैसें म्यां जें करिलाचि बहु कलहाला ॥
ध्रु०॥ ईशेच्छा जैशी॥ राहावें त्यांताचि तोषी ॥ ९ ॥

आर्या.

भार्याद्वययुत होण्या आधिं करणें सद्विचार सुज्ञानें ॥
जरि मग तें उक्त दिसे, तरि करणें दूरदृष्टि सुज्ञानें ॥१०॥

कामदा.

संतती–सुखाहूनि दुःख तें ॥ दोन नारिंचें फार गांजितें ॥
जाणुनी कसें घेउं हें शिरीं॥ अग्नि भक्षितां भस्मची करी ॥११॥

साकी.

बोले पुनरपि सुमति प्रार्थुनि, मान्य करा पतिराया॥
साधन संतति एक असे हें संसाराब्धि तराया ॥
ध्रु०॥ यत्नें फलप्राप्ती ॥ होते निश्चित, बुध ह्मणती ॥१२॥

आर्या.

अत्यंत आग्रह तिचा पाहुनि मत भूप दे विवाहातें ॥
बहु सुज्ञाचेंही मन होणारातुल्य भावि वाहातें ॥ १३ ॥

मालिनी.

मग कलहपुरींची मेदिनीपालकन्या ॥
वरुनि नरपतीनें केलि लोकांत धन्या ॥
विधियुत अभिधाना कैकयी दे तियेतें ॥
तिचि साति सुमतीच्या मानसीं प्रीति येते ॥१४॥
क्रमिति मुदित चित्तें काल त्या दोघि जाया ॥
करिति अलस ना त्या भुपतीतें भजाया ॥
परि युवति न झाली धाकटी गर्भिणी ते ॥
म्हणुनि सुमति राया खिन्न होती मनीं ते ॥ १५॥

साकी.

केला प्रयत्न सफल न झाला दुःखी ह्मणुनी राया ॥
सुमति सतीही त्यापरि कष्टी राहे मनिं तज्जाया ॥
ध्रु०॥ ह्मणती चित्ताशा ॥ पूर्ण करी तूं जगदीशा ॥१६॥
काहीं कालें सुदैवयोगें झाली गर्भिणि सुमती ॥ ॥
पाहुनिया तें कैकयि-चित्तीं उपजे सापत्नमती ॥
ध्रु०॥ द्वेष करी तीचा ॥ स्वभाव हाची सवतीचा ॥ १७॥

आर्या.

देउनि गाली देवा ह्मणते, केलेंस काय विपरीत ॥
वृद्धा गर्भिणि व्हावी कोठुनि ही काढिली नवी रीत ॥ १८॥

शिखरिणी.

अतां तीची हानी द्रुत करिन मी जाण खचित ॥
तरी या जन्माची मम सफलता होय खचित ॥
विकल्पा आणूनी विविध परिनें भूपतिमनीं ॥
विनाशातें तीच्या करिं, तरिच मी सत्य रमणी ॥१९॥

इंद्रवज्रा.

ऐशा विचारा करुनी मनीं ते॥आली नृपासंनिध कामिनी ते ॥
बोले नृपातें मधु भाषणानें॥तैसी सुहास्या मुदिताननानें ॥२०॥

कांता, तुझी प्रीति मदीय ठायीं ॥ ती गोड वाटे तासि ना मिठाई ॥
आनंद तेणें बहु मन्मनांत ॥ नाहीं दुजी मत्सम या जनांत ॥२१॥

साकी.

परंतु आतां युष्मत्प्रीती कैसी मजवरि राहे ॥
कांता तुमची सुमती महिषी राया गर्भिणि आहे ॥
ध्रु०॥ यदर्थ कोण मला ॥ पुसतें कीं या वंध्येला ॥२२॥

आर्या.

कथितां हें कोमेजलि रविकिरणीं वाल्लि जेवि कोमजते ॥
सोडुनि उष्ण श्वासा पाहायासी ह्मणे नको मज तें ॥२३॥
त्यागीन प्राण ह्मणुनि टाकी तनु भूवरी अचेष्टितसा ॥
होय सभय पाहुनि तें तो धैर्यगिरी परंतु कष्टितसा ॥ २४ ॥

यूथिका.

अंकिं घेइ तिजला उचलूनी॥ प्रीतिनें धरि त्द्दीं कवळूनी ॥
घालि शीतल समीर पटानें ॥ योजिले बहु उपाय भटानें॥२५॥

साकी.

सावधता ती तिळहि न दावी, उघडि न मिलितां नयनां ॥
चलनवलनहिन देह जाहला, वाटे भय भूपमना ॥
ध्रु०॥ पाचारुनि दास ॥ अणिलें निकटिं प्रधानास ॥२६॥

शार्दूलविक्रीडित.

पाहूनी चतुर प्रधान मग तो मिथ्या ह्मणे हें मनीं ॥
दावाया भय काय योजिति न तें ठावें पडे कामिनी ॥
आतां मी करितों उपाय न अशा ढोंगीं पडावें तिनें ॥
रायासी मग तो ह्मणे, क्षणभरी राहा उगे शांतिनें ॥२७॥
आतां काय उपाय यासि करणें ऐशा विचारीं पडे ॥
जो सज्ञान महा तयासि समयीं युक्ती न कां सांपडे ॥
आणावी मग तीस शुद्धि ह्मणुनी सद्बुद्धि बोधी तिला ॥
नाहीं चित्तिं परी तिणे तिळभरी स्वीकारिलें शुद्धिला २८

मंदाक्रांता.

बोले तेव्हां प्रतिनिधि, इतें वात झाला महान ॥
डागावीणें इतर कृतिनें शांत होईल हा न ॥
वन्ही शस्त्रादिक सकलही वस्तुंला सिद्ध केलें ॥
राजस्त्री यास्तव पदतलीं दोन डागांसि दीलें ॥ २९ ॥

आर्या.

नाहीं तथापि तीनें उघडियलें मिलितचक्षु–पापणितें ॥
स्त्रीधैर्यचरित करितें पुरुषाच्या तर्कवृक्ष–कापणितें ॥ ३० ॥

पाहुनि तें मंत्रि ह्मणे, किति तरि ही अंगनांगिं सोसिकता ॥
यत्नेंही द्रवति न त्या, यत्नें समयीं द्रवेल जरि सिकता ॥३१॥

मग तो ह्मणे, नितंबीं तेवी डागा पयोधरीं श्रवणां ॥
अवधी तिलहि न करणें, निष्ठुर ते बोल ती करी श्रवणा ॥३२॥

मग उघडुनि निजनयनां सुसकारा टाकि हळुच विवळून ॥
आतां पुरे करावें, ऐसें निजहस्तिं दाखवि वळून ॥ ३३ ॥

साकी.

मग ती होई सावध ऐसें पाहुनि नृप ये जवळी ॥
काय दशा ही अहा जहाली, प्रेमें त्हदयीं धरिली ॥
ध्रु०॥ कुरवाळुनि हातें ॥ शांतवि सुवचें मग तीतें ॥ ३४ ॥

शिखरिणी.

प्रधानादी गेले सकल जन ते आत्मसदनीं ॥
पुसे राया तीतें मग, करिसि कां दुःख ह्मणुनी ॥
जहालें ऐसें तें विपरित गमे काय तुजसी ॥
विकल्पातें, कांते, त्यजुनि मनिंच्या सांग मजसी ॥३५॥

इंद्रवज्रा.

दुःखासि तूझ्या द्रुत मी हरीन ॥ होसी सुखी त्यापरि गे करीन ॥
होईल कीं ना करि कल्पना ही ॥ या सार्वभौमा न अशक्य कांहीं ३६

तेव्हां ह्मणे, गर्भिणि सौति झाली ॥ चिंता तयें मन्मनिं ते जडाली ॥
आतां करूं मी वदणेंचि काय॥ ठेवीन हा भूवरि नाचि काय ॥३७॥

दिंडी.

जिणें वाटे हें विफल महीलोकीं॥कोण आतां मन्मुखा जगिं विलोकी
सर्व आतां तीजला मानितील॥तिच्या थोरीचीं गाणिं वानितील३८

आर्या.

अजवरि न ऐकिलीं तीं वचनें श्रवणास केविं परिसवती ॥
आहेत अंगनांतें अतिदुःखद शत्रुसंघपरि सवती ॥ ३९ ॥
यास्तव आतां सत्याचि पळभरिही या न ठेविं जीवातें ॥
ऐसें ह्मणुनि पडे ती भूमिवरी कर्दली जसी वातें ॥ ४० ॥
लावूनि उदक नयनीं पुनरपि सावध तिला करी राया ॥
काय उणें तुजासि, ह्मणे, त्यागिसि कां तूं वृथा शरीरा या ४१

इंद्रवज्रा.

तेव्हां ह्मणे ती, मज पाहवेना ॥ सापत्नसौख्यें जगि राहवेना ॥
माझा जगीं या अपमान झाला ॥ आतां कसें दाखवुं आननाला ४२

आर्या.

राहिन तरिच सजीवी, जरि मद्वचनास द्याल मानातें ॥
न न ह्मणती बुध समयीं पाहुनिया देशकालमानातें ॥ ४३ ॥
या न्यायें भूप ह्मणे, देइन गे तव वचास मी मान ॥
तुजवरि मम अनुकंपा, इतरां न मिळे तुझ्या समी मान ॥४४॥

दिंडी.

प्रिया,परिसे माझिया भाषणासी॥तिला सोडुनिया देइ काननासी॥
दूर करणें ना तरी जगांतून ॥ तरिच माझें होईल समाधान ॥४५॥

साकी.

तीची दुःखद वाणी विस्मित भूपति झाला ॥
। काय गिरा, जी मूर्च्छित करिते माला ॥
वेत्तीं ॥ किति तरि ही हो दुष्टमती ॥४६॥

मालिनी.

मग तिजसि ह्मणे तो, ऐक गे मद्वचातें ॥
बहुत दिनिं जहाला लाभ हा आपणातें ॥
ह्मणुनि तुजासि व्हावा मोद अत्यंत चित्तीं ॥
त्यजुनि परि तया कां मानसीं घेसि खंती ॥ ४७ ॥

जरि सुमतिसि झाला पुत्र ईशप्रसादें ॥
तरि तुजसि कधींही अंतरातें न मी दें ॥
जनन सफल होतें पुत्रवक्त्रा पहातां ॥
अतितरवरमुक्ती लाधते अंतिं हाता ॥ ४८ ॥

यूथिका.

ती ह्मणे, वचन द्या निज हातें ॥ मत्करीं करिन सत्य सदा तें ॥
मोहजालिं गुतुनी वचना दे ॥ गुंतता अहि जसा स्वरनादें ॥४९॥

दिंडी.

कांहिं कालें सुमतितें पुत्र झाला ॥ पाहुनीया आनंद समस्तांला॥
चंद्रचूडोदरिं हर्ष तो न मावे ॥ कैकयी ते अत्यंत दुःख पावे ॥५०॥

मालिनी.

प्रतिदिनिं सुत वाढे शुक्लपक्षेंदु जैसा ॥
कुमति कयकयीच्या द्वेष चित्तींहि तैसा ॥
मग मनुजवरानें नामकर्णासि केलें ॥
बुधसुजनविचारें इंदुकात्याख्य दीलें ॥ ५१ ॥

इंद्रवज्रा.

खेळे, हसे, बालक पालखीतें ॥ पाहूनि होते सुमती सुखी ते ॥
सौती-मनीं यासि वसों न दावा ॥ ऐसा प्रसाद प्रभुनें करावा॥५२॥

ऐसें सदा वासरयामिनीतें ॥ वाटे तियेचें भय कामिनीतें ॥
रक्षी बहूतापरि बालकाला ॥ सौतीस भी तेवि न भी हि काला ५३

साकी.

कैकयीमनीं विषाद वाढे पाहुनि सुख सवतीचें
काय करूं, या दुष्ट विचारीं जडलें मानस तीचें ॥
ध्रु०॥ दुष्टा दुर्बुद्धी ॥ व्हाया लागे नाचि अवधी ॥ ५४ ॥

तेव्हां तीणें निजदासीतें कथिला मनिंचा हेतू ॥
सहसुत हानी त्या सवतीची करि कार्य ह्मणीं हें तूं ॥
ध्रु०॥ देइन वित्त बहू ॥ किति तरि या दुःखा साहूं ॥५५॥

दिंडी.

दासि बोले तैं हस्त जोडुनीया॥काय दुर्घट हें असे मज कराया ॥
करुनि नाना यत्नांसि करिन कार्या॥तरिच दासीवर्गांत होय आर्या

आर्या.

कैकयि ह्मणे सखीतें, दे हानिमद अही–हलाहल तें ॥
बहुतचि बरें, ह्मणे ती, दुष्टमती दुष्ट करणिला हलते ॥५७॥

वा मध्यरात्रिं तीच्या लावावा वीतिहोत्र सदनाला ॥
अथवा शस्त्रें वधणें, खाउनि ऐसें ह्मणे स्वरदनाला ॥५८॥

सैरंध्री वदत तदा, बाई तव हेतु पूर्ण हा करितें ॥
हा कठिण मज न, जैसा कदलीविध्वंस तो महाकरितें॥५९॥

मग ती स्वगृहीं येउनि चिंति म्हणे, करिन कार्य कइकइचें ॥
अवधि न लावीन, जसें केलें अजवरि झटूनि कइक इचें ६०

प्रासादीं जाउनि मग एकांतीं राज्ञि-पाककारातें ॥
दावुनि ती प्रेम ह्मणे, मत्कार्य करि, न करी नकारातें ॥६१॥

साकी.

देई विष राज्ञी सुमतीतें अन्नीं मिश्रित करुनी ॥
देतें तुजला बहूत धन, घे, करणें विचार न मनीं ॥
ध्रु०॥ स्त्री वित्ता न भुले ॥ ऐसा जगतीं कोण मिळे ॥६२॥

इंद्रवज्रा.

तेव्हां ह्मणे तो, अति ठेवि गुप्त ॥ तूझ्या स्पृहेलागिं करीन तृप्त ॥
चिंता करावी नचि मानसांत॥ जाई सुखें तूं अपुल्या गृहांत ६३

साकी.

षड्रस अन्नीं मिळवुनि गरला साध्वीसुमतीपुढती ॥
भोजनपात्रीं वाढुनि ठेवी निशिमाजी तो कुमती ॥
ध्रु० ॥ भोजनपात्रांत ॥ वृश्चिक पडे अकस्मात ॥ ६४ ॥

मंदाक्रांता.

तेव्हां तीनें द्रुत बघुनिया सारिलें पात्र दूर ॥
बोले त्यातें विपरित महा जाहला हा प्रकार ॥
आतां मी ना करिन अशना आजिच्या यामिनीतें ॥
ऐसें साध्वी म्हणुनि शयनीं जाउनी बैसली ते ॥ ६५ ॥

साकी.

भक्षण केलें त्या अन्नासी एक्या मार्जारानें ॥
तत्कालचि तें तळमळ करुनी मृतची झालें तेणें ॥
ध्रु०॥ पाहुनि तें सुमती॥ विस्मित झाली निजचित्तीं ॥६६॥
बल्लव तेव्हां विस्मित होउनि येउनि दासीसदनीं ॥
वृत्त सकल तें तिजासि निवेदी होउनि खिन्नचि वदनीं ॥
ध्रु०॥ कार्य तुझें गे तें ॥ घडलें नाहीं मम हातें ॥ ६७ ॥

मंदाक्रांता.

दासी तेव्हां निजमनिं ह्मणे, कार्य तें अन्यहातें ॥
नाहीं झालें, परि खचित मी शीघ्र आतां करीतें ॥
तीच्या तल्पीं निशिसमयिं ती दीर्घ सर्पासि सोडी ॥
तद्ग्रीवेतें तयिं नकुल तो पाळिला क्षिप्र तोडी ॥ ६८ ॥

कामदा.

पाहुनी अही भीत अंतरीं ॥ रक्षिता हरी जाहल्यावरी ॥
दासि बापुडी काय ती करी॥दुष्टबुद्धिला सिद्धि का वरी६९

साकी.

झाला तीचा यत्न विफल तें पाहुनि अतिसंतापें ॥
आतां सहसुत त्या दुष्टेला जाळिन पावकतापें ॥
ध्रु०॥ ऐसें योजि मना ॥ लावी अग्नी तत्सदना ॥ ७० ॥

आर्या.

पाहुनि वह्निज्वाला घाबरली साध्वि ती मनीं बहुत ॥
वाटे तेव्हां तीतें, या करतिल धामगृहकदंब हुत ॥ ७१ ॥
उचलुनि बालक कडिं घे, जाया कोठें दिसे न मार्ग तिला ॥
चित्तिं ह्मणे, हें लघु मुल आतां पावेल कोणत्या गतिला ७२
धांवा, धांवा, जन हो, शिशुरक्षणिं पंथ तो मला दावा ॥
त्या दुष्टा सवतीनें आजि पहा केवि साधिला दावा ॥७३॥
हे देवा, या समयीं तुजवांचुनि मारुं मी हका कवणा ॥
तद्दुःखासि, कवि ह्मणे, होइल हा मंद योग्य का कवना॥७४॥
संरक्षि तानुलें हें, मद्देहाची मला नसे आशा ॥
मन्मंतु काय ऐसा, दुःखीं मज घातलें कसें आशा ॥७५॥

कामदा.

वीष घालितां रक्षिलें हरी॥ सर्पही तसा दंश ना करी ॥
आज कां परी ना करी दया॥ कोण रक्षि गा तानुल्यासि या॥७६॥

शुद्धकामदा.

शरण मी तुला पायिं वंदितें ॥ विमल मानसें तूज बाहतें
जरि अतां न तूं धावसी हरी॥इतर कोण गा रक्षणा करी ॥७७॥
परिपरी तिनें प्रार्थिला हरी ॥ कळवळे तदा तो निजांतरीं ॥
करि बहू तदा मेघवृष्टिला ॥ अनल तो तयें शांत जाहला ॥७८॥

इंद्रवज्रा.

ो कैकइदासिचित्तीं ॥ उत्पन्न झाली अतिथोर खंती ॥
ो सर्वहि वर्तमान॥तीतें कथी घालुनि खालिं मान ॥७९॥

उदंतासि त्या ऐकुनी कैकईनें ॥ ह्मणे कार्य होईल आतां कशानें ॥
मनीं आपुल्या ती करी चिंतनासी॥अतां जाउनी प्रार्थितें भूपतीसी
तयें दीधली भाक मातें स्वहातें॥ अतां धाडितें सौतितें काननातें ॥
मुलाही तसें काननीं घालवीन ॥ घडेना तरी हें गृहीं मारवीन ८१

साकी.

करुनी ऐसा विचार चित्तीं भूपासंनिध आली ॥
निज वचनातें सत्य करावें, ऐसें क्रोधें वदली ॥
ध्रु०॥ घाबरला नृपती ॥ झाला भयार्त निजचित्तीं ॥८२॥

भुजंगप्रयात.

ह्मणे ती,अधीं सौतिसी मारवावें ॥ तसें कारटें विश्वि राहू न द्यावें ॥
दिली भाक ती सत्य आतां करा हे ॥ न होतां धरित्रीतलीं मी न राहें

साकी.

ऐसीं तीचीं कठोर वचनें शिरलीं नृपमनिं शरसीं ॥ ॥
ह्मणे, अहाहा काय वदे हें परिसवतें नाचि मजसी ॥
ध्रु०॥ न टळे होणार ॥ राहावें सावध फार ॥ ८४ ॥
भाक दिल्याची स्मृती नृपातें झाली तीच्या वचनें ॥
अविचाराचें फल हें आलें, आतां कैसें करणें ॥
ध्रु०॥ यास्तव अधिं सुज्ञें ॥ विचार दूरवरी करणें ॥८५॥

शुद्ध कामदा.

वचनहानितें केलिया जरी ॥ करि न सत्य तें, दोष ये शिरीं ॥
नृपति तैं अशा चिंतनीं पडे ॥ हृदय गुंतलें दोहिंहीकडे ॥ ८६ ॥

कामदा.

स्तब्ध राहुनी कांहिं काल तो ॥ कैकयीप्रती काय बोलतो ॥
भाक सत्य मी निश्चयें करीं ॥ घात सोशितों,होय तो जरी॥८७॥

मालिनी.

मग तिजसि ह्मणे तैं, ऐक गे मद्वचाला ॥
सुमतितनयहत्या घोर लागेल माला ॥

ह्मणुनि विपिनिं त्यागीं सान पापेष्ट भासे ॥
तिलभरि सुख यानें होय, होई न कैसें ॥ ८८ ॥

सहतनय तियेतें धाडितों काननांत ॥
तिलभरि न विषाद त्वां धरावा मनांत ॥
द्रुत निज सदनातें जाउनी स्वस्थ राहा ॥
बुध परि वचनातें गुंतला तेवि मोहा ॥ ८९ ॥

साकी.

आला नृप मग साध्वीसदनीं, पाहुनिया तें सुमती ॥
सादर त्याच्या नमुनी चरणा सुखासनीं बैसवि ती ॥
॥ध्रु०॥ कां अजि आगमन ॥ समुचित समयातें त्यजुन॥९०॥

दिंडी.

कांहिं कालाचि तो स्तब्ध भूप राहे ॥ म्लान मुद्रेतें सुमति तदा पाहे ॥
म्हणे, आजि न कां करित भाषणासी॥ काय झाला मंतु तो वदा ईसी

आर्या.

मग टाकुनि सुसकारा नरपति अतिमंद भाषणें तिजसी ॥
कथि चित्तविचार, तयें कोमेजे माय नंदनांतिं जसी ॥ ९२ ॥

कर जोडूनि ह्मणे ती, अपराधी मी न शासना विहित ॥
वर्तति सज्जन ऐशा पंथीं होईल सत्य जेवि हित ॥ ॥ ९३ ॥

स्त्रीघात बालहत्या होइल, हा का मनीं विचार न ये ॥
आला प्रसंग तरिही करि बुध तो वर्तनासि चतुर नयें ॥९४॥

दुष्टस्त्रीवचनातें परिसुनि सुखि कोण जाहला नर तो ॥
जाणसि तूं सर्वहि हें, तव मन दुर्गतिद दुर्मला न रतो ॥ ९५ ॥

या तान्हुल्यास घेउनि राहुं कशी मी वनीं भयानकशा ॥
त्वद्वचन तीक्ष्ण लागत, लागति तैशा सुतीव्र या न कशा ॥९६॥

साकी.

आतां माझी एक विनंती परिसा सुकृपा करुनी ॥
रक्षावें हें बालक तुह्मी मज सोडुनिया विपिनीं ॥
॥ध्रु०॥ ऐसें ती कथुनी ॥ आणी अश्रूंतें नयनीं ॥ ९७ ॥

नाना यत्नें नाना नवसें त्यापरि बहुतां दिवसें ॥
पुत्रप्राप्ती तुह्मां जाहली, आतां करितां ऐसें ॥
॥ध्रु०॥ ह्मणातिल काय जन ॥ करणें मनिं हें तुह्मि मनन॥९८॥

आर्या.

होइल अपकीर्ति जगीं, लागेल तसा कलंक गोत्रास ॥
करणें विचार, वनिंचा हा शिशु सोशील काय तो त्रास ॥९९॥

कामदा.

आणखी अतां सांगतें नृपा ॥ दासिच्यावरी राहुं दे कृपा ॥
दूर जाहलें नाणि हें मनीं ॥ बोलली असें हस्त जोडुनी ॥१००॥

आर्या.

ती अतिशय गहिवरली, पाहुनि भूपहि तसाचि गहिवरतो ॥
करि तें म्लान मुखाला, समयीं म्लानत्व पन्नगहि वरतो॥१०१॥
तुज धाडितोंचि विपिनीं, मग या शिशुला न धाडणें न बरें ॥
हीरमणि दवडिल्याची हानि भरे केवि राखुनी शबरे ॥१०२॥

साकी.

मग नृप तीतें सहसुत विपिनीं भयदायकशा धाडी ॥
पाहुनिया तें अतितर दुःखें हंबरडा ती फोडी ॥
॥ध्रु०॥ दुःखित नृप झाला ॥ म्लान मुखें ये सदनाला ॥१०३॥

भुजंगप्रयात.

रडे, ओरडे, मारि भूपासि हाका ॥
कसें त्यागिलें हो मला तेवि तोका ॥
दया तूमच्या मानसा कां न आली ॥
असी सौतिठायीं कशी प्रीति झाली ॥ १०४ ॥

वनीं एकली काय हो म्यां करावें ॥
दिसे उक्त हेंची अतांची मरावें ॥
परी तानुल्यालागि रक्षील कोण ॥
सजीवी रहाणें मला हो ह्मणून ॥ १०५ ॥

कामदा.

ना तरी अतां व्यर्थ हें जिणें ॥ तानुल्यामुळें दुःख सोसणें ॥
भाग तें मला काननांतरीं ॥ रक्षि रक्षि या बालका हरी ॥१०६॥

बालकाप्रती घेउनी कडे ॥ पाहते सती ती चहूंकडे ॥
ना कुठे दिसे स्वल्प आसरा ॥ भानु पातला मध्य वासरा ॥१०७॥

तापली मही, पाद पोळती ॥ देह तापवी अर्यमा अती ॥
लागली क्षुधा, तानुलें रडे ॥ मूर्च्छना जडे, भूमिसी पडे ॥१०८॥

त्यापरी तृषा लागली ह्मणे ॥ ठाव ना दिसे जीवनाविणें ॥
पाहुनी सती फार घाबरे ॥ काय मी करूं, सांग रे हरे ॥१०९॥

आर्या.

सर सरिता वापींतें शोधी, परि त्या कुठे न आढळती ॥
झाली अति दुःखी ती, नेत्रांतुनि अश्रु ढळढळा ढळती ॥११०॥
आतां काय करूं ह्मणे, भटके साध्वी जलार्थ घोर वनीं ॥
तों रवि अस्ता गेला, भरली अत्यंतशा तमें अवनी ॥ १११ ॥
मार्गहि दिसे न गमना, थांबलि एक्या तरूतळीं मग ती ॥
हिंस्त्र पशु पाहुनी भी, बुध हो, कैसी पहाहि कालगती ॥११२॥
नख जीचें यत्नेंही न पडे दृष्टीस, ती वनीं भटके ॥
ऽधीन विभव तें जाणुनि बुध मानिती सदा लटकें॥११३॥

कामदा.

। यक्ष डाकिणी ॥ व्याघ्र ऋक्ष ते धांवती वनीं ॥
। वारुळांतुनी ॥ येति बाहिरी शीघ्र धावुनी ॥ ११४ ॥

आर्या.

कोठुनि निद्रा तिजला, पाही हातें क्षणोक्षणीं तनया ॥
काय दशा विपरित ही, भूपानें पाहिलें न नीत नया ॥ ११५॥
न दिसे शिशुहि निकटिंचें, ऐशा त्या अतिभयंकरोग्रतमीं ॥
शयना न स्थल, ऐशा बहु दुःखें कंठिली समग्र तमी ॥ ११६॥

मालिनी.

दिनकर उदयीं ये, पाहुनीया सती तें ॥
क्षणभरिचि बरेंसें वाटलें चित्ति तीतें ॥
स्वमनिं करि विचारा, येथुनी अन्य ठाया ॥
गमन विहित वाटे रक्षणार्थीं सुता या ॥ ११७ ॥

भुजंगप्रयात.

कडे घेउनी बालकातें पुढें ती॥निघे जावयातें, तथापि स्वचित्तीं॥
ह्मणे, काननीं मार्ग आतां पुरातें॥कसा लाधतो जावया दूबळीतें ॥

कामदा.

रक्षिता हरी जाहल्यावरी ॥ काल बापुडा काय तो करी ॥
रक्षिलें जयें दीर्घ पावकीं ॥ तो कृपा करी कां न बालकीं ॥११९॥

आर्या.

रुतती कंटक कंकर, चाले अत्यंत मंदशा गतिनें ॥
कधिंही न देखिलेला सोशियला चंड दुःखभाग तिनें॥१२०॥
चाले बहु कष्टें, परि कोठेंहि न राजमार्ग सांपडला ॥
दावी रजनी निज मुख, तेणें बहु अंधकार तैं पडला ॥१२१॥
मग दैववशें तीच्या पडला दृष्टीस जीर्ण भग्न मठ ॥
जाउनि तयांत सहसुत बैसे शयनार्थ हंतरूनि पट॥ १२२ ॥

कामदा.

बाल नीजला, तीहि नीजली॥ दोन याम जैं रात्रि जाहली ॥
तों तिथे महासर्प पातला॥ राजपत्निच्या पायिं डंकला ॥१२३॥

वसंततिलका.

तेणें तदा सुमति ती मृत होउनीया ॥
झाली अचेष्टित अशी निजल्याच ठाया ॥
तों तोक होय मग जागृत कांहिं कालें ॥
आनंदयुक्त हसुनी प्रमुदेंहि खेळे ॥ १२४ ॥

कामदा.

डंकला अही, तोचि येउनी ॥ तानुल्यावरी काढुनी फणी ॥
छत्रसी धरी, डंक ना करी ॥तानुलें तया खेळण्यापरी ॥ १२५॥

आर्या.

त्या समयीं मणिपुरिंचा मणिनृप मृगयार्थ येइ त्याच वनीं ॥
एकहि पशु न दिसे त्या, तैसा पशुरवहि नायके श्रवणीं॥ १२६॥
झाला तृषार्त, मग तो शोधाया उदक संचरे रानें ॥
ये त्याच मठानिकटीं, पाहे पूरित तडाग नीरानें ॥ १२७ ॥

इंद्रवज्रा.

प्राशूनिया वारि मठांत आला ॥ तों खेळतां बाळक देखियेला॥
माता तयाची निजलीच पाही॥काढूनि डोले फणिला महाऽही१२८

स्वागता.

डोलवी शिशुशिरीं फणि पाहुनी॥ पावला नवल भूप तदा मनीं॥
ना कसा शिशु धरी तरि डंकितो॥ना उठे जननि, यास्तव शंकितो ॥

साकी.

मारी हांका भूपति तिजला, परि ती कांहिं न हाले ॥
विस्मित मानसिं होउनिया तो काय ह्मणे हिज झालें ॥
ध्रु० ॥ अहिदंशाचि झाला ॥पाही निरखुनिया तिजला॥ १३०॥

कामदा.

प्राण जाउनी प्रेतसी दिसे ॥ जीवचिह्न तें ना कुठे वसे ॥
तो फणी तदा जाय तेथुनी ॥ पाहि तो पुन्हां वस्त्र सारुनी ॥ १३१॥

आर्या.

झाली निश्चित मृत ही, पाहुनि करि भूपती विषाद मनीं ॥
काय उपाय करावा, ऐसें चिंतन करी विषा-दमनीं ॥१३२॥

शुद्धकामदा.

प्रसुतनूवरी बाळ खेळतें ॥ मुख पयोधरीं प्रेमयुक्त तें ॥
हसुनि ठेवितें, दुग्ध ना मिळे॥ह्मणुनि खिन्नता थोर पावलें ॥१३३॥

कामदा.

रडत बघुनिया अंबिकानना ॥ प्रेमयुक्त तें घेइ चुंबना ॥
पाहुनी नृपापोटिं कालवे॥ नेउं धामिं हें आपुल्या सवें॥१३४॥

आर्या.

तैसेंच धामिं जाउनि आणावें औषधीस विषशमनीं ॥
या सुविचारें शिशु हर्यि घेतां दुखार्त तो विशेष मनीं १३५

कामदा.

बाल घेउनी भूप चालतां ॥ तो पुन्हा पुन्हा पाहि मागुता ॥
माय दूर ती जाहली असे ॥ म्लानता मुखीं त्याचिया दिसे॥१३६॥

मालिनी.

मग मणिपुरमार्गें चालतां मेदिनीश ॥
पथिंच पथग मंत्री भेटला एक त्यास ॥
तयिं सकलहि भूपें वृत्त त्यातें कथीलें ॥
परिसुनि महिपाला काय तो मंत्रि बोले ॥ १३७ ॥

इंद्रवज्रा.

दावी मला ती युवती नृपाला ॥ मी जाणतों मंत्र अही-विखाला ॥
ईशप्रसादें उतरावयातें ॥ ऐकूनि आनंद बहू नृपातें ॥ १३८ ॥

साकी.

सकलहि मग ते पथ आक्रमुनी सत्वर त्या मठिं येती ॥
पाहुनिया त्या साध्वीप्रेता मंत्रि ह्मणे निज चित्तीं ॥
॥ध्रु०॥ दुर्धर अहि भासे ॥ योजिन मंत्रा सायासें ॥१३९ ॥

इंद्रवज्रा.

ऐसें ह्मणूनी सरतीरिं आला ॥ तो स्नान तेव्हां विधियुक्त केला ॥
घेऊनि हस्तीं उदकासि पात्रीं॥आला सतीसंनिध शीघ्र मंत्री १४०

स्वागता.

मंत्रयुक्त जल घेउनिया करीं ॥
सिंचना करि तिच्या शरिरावरी ॥
कांहिं काल विधियुक्त सुमंत्र ते ॥
घालि तो, परि न सावध होय ते ॥ १४१ ॥

मालिनी.

मग पुनरपि मंत्री आठवूनी गुरूतें ॥
उदक शरिरिं तीच्या सिंचि मंत्रोक्त हातें ॥
विषद उरग तेव्हां संचरे साध्वि-देहीं ॥
निरखुनि बहु कोपें मंत्रिवक्त्रास पाही ॥ १४२ ॥

भुजंगप्रयात.

ह्मणे,कोण रे,कासया येथ येसी॥अतां जाइ तूं आपुल्या ओकसासी
मदग्रीं जरी चालवीसी स्वमंत्रा॥तरी पावसी निश्चयें तूं परत्रा १४३

साकी.

तेव्हां मंत्री ह्मणे तयासी, तुजसम बहु अहि म्यां ते ॥
देखियले, परि आजवरीही केलें शासन त्यांतें ॥
ध्रु० ॥ लाविन तुज शिक्षा॥आतां न करीन उपेक्षा ॥१४४॥

इंद्रवज्रा.

कां डंकिलें त्वां इजसी कथी तें॥ झाला इच्या मंतुचि काय हातें॥
अल्पापराधास्तव चंडघात॥ रे दुष्ट, तुह्मी करितां खचीत ॥१४५॥

आर्या.

उरग ह्मणे, रे मंत्री, दोपिसि आह्मां, परी न तें विहित ॥
कथितों पूर्व उदंता, सांग मग, काय दोष या अहित ॥१४६॥

इंद्रवज्रा.

ही पूर्वि होती धनिकाचि जाया॥पूजा इयेच्या गृहिं मी कराया ॥
होतों, पुढें मानसिं कांहिं कालीं ॥ श्रीक्षेत्रि जावें अशि बुद्धि झाली ॥

मालिनी.

मग निजधनकुंभा ठेवुनी ईजपासी ॥
समुत गमन केलें क्षेत्र वाराणसीसी ॥
क्रमुनि बहु पवित्र क्षेत्रिं मी काल कांहीं ॥
तिथुनि परत आलों पूढती आत्मगेहीं ॥ १४८ ॥

स्वागता.

वित्तकुंभ मग मी तिसि दे ह्मणें ॥बोलली बहुत निष्ठुर वाणिनें ॥
ठाउका न धनकुंभ तुझा मशी ॥ होउनी तव मना भ्रम बोलशी १४९

आर्या.

नाना परिनें परता माझा मज दे ह्मणूनि विनवीत ॥
परि तिलहि न धनलोभें या दुष्टेचें दयेस मन वीत ॥१५०॥
मद्द्वेष करुनि मजला दिधलें अन्नीं भुजंग–हलहाल ॥
तेणें मृत मी झालों होउनि अत्यंत दीर्घ हलहाल ॥ १५१ ॥
या अपराधार्थ इची केली म्यां प्राणहानि डंकून ॥
हे बोल सत्य असती, दे माद्विषयीं कुबुद्धि टाकून ॥१५२॥
या लघु बालावरती कां केली म्यां दया, अतां परिस ॥
अनुतापें मम सुत ही अधिकत्वें पोशि निजसुतापरिस॥ १५३ ॥
मंत्री म्हणे, तुझी ही आहे उरगा खचीत अपराधी ॥
करुनी क्षमा परि अतां तिजविषयीं धरि उचीत अपराधी॥१५४
भुजग ह्मणे, अपराध्या करणें शासन यथार्थ आहेना ॥
कां मग ऐसें वदसी, हीचा हृदयांत मंतु साहेना ॥ १५५ ॥

वसंततिलका.

मंत्री ह्मणे, वदसि तूं जरि हें यथार्थ ॥
आतां क्षमा त्यजुनि वैर करी मदर्थ ॥

आहेस आश्रित इच्या गृहिंचा अनादी ॥
केल्या दया तुजसि सज्जन काय निंदी ॥ १५६ ॥

इंद्रवज्रा.

प्रत्यक्ष तेव्हां अहि येउनीया ॥ तो डंखिल्या साध्विस दंशठाया ॥
घेऊनि जाई परते विषातें॥झाली तदा सावध योषिता ते ॥१५७॥
प्रेमें शिशू घेउनि तैं कडेला ॥ विस्मीत वक्त्रें बघते नृपाला ॥
राया पुसे,कोण;वनांत कां गे॥संपूर्ण वार्ता सति त्यास सांगे १५८

साकी.

सहसुत तीतें अपणासंगें घेउनिया तो नृपती ॥
अत्यानंदें निज नगरीतें सत्वर आला परती ॥
ध्रु० ॥ संरक्षी तीतें॥ स्वसुताधिक तो त्या शिशुतें॥१५९॥

वसंततिलका.

तो चंद्रचूड इकडे सुमती वनांत ॥
त्यागूनि येइ, परि दुःख करी मनांत ॥
अन्याय कांहिं नसतां त्यजिली सवत्सा ॥
आतां करीति मम कां न सुजाण कुत्सा ॥ १६० ॥

इंद्रवज्रा.

नाना परीचे गद कैकयीला ॥ पीडीति, पावे तिल ना सुखाला ॥
झाला शवातुल्य तनू तियेचा ॥साहे न मंतु प्रभुला कुणाचा ॥१६१॥

ओवी.

चंद्रचूडाचें राज्य हरण ॥ दायादें केलें समर करून॥
ठेविलें कारागृहीं नेऊन ॥ कैकयीसह भूपातें ॥ १६२ ॥
इंदुकांति ह्मणे जननीसी ॥ दुःख करिसी अहर्निशीं ॥
काय चिंता गे तव मानसीं॥सत्वर मजसी निवेदावें॥१६३ ॥

आर्या.

सतीनें कथिलें निजवृत्त इंदुकांतीतें ॥
येती गहिवरुनि न अश्रुबिंदु कां तीतें ॥१६४॥

परिसुनि तें तोक ह्मणे, माते, सापत्नवैर उगवीन ॥
दुःख न करीं, स्थिर रहा, तरिच तुझा सत्य वत्स ह्मणवीन ॥

चामर.

प्रौढ होय इंदुकांति, पाहुनी मणीनृप ॥
राज्य देउनी तया करावया महा तप ॥
जाय तो सकामिनी हिमालयीं तपोवनीं ॥
क्रोध काम दंभ लोभ मत्सरादि त्यागुनी ॥ १६६ ॥

आर्या.

सहकटक इंदुकांती मग ये सापत्न–सूड उगवाया ॥
कांचनपुरि चित्तिं ह्मणे, दुष्टेनें त्या छळीयलें वाया॥१६७ ॥

ओवी.

तों श्रुत झालें वर्तमान ॥ दायादें राज्य हरण करून ॥
कारागृहाप्रती नेऊन ॥ माय बाप ठेवियले ॥ १६८ ॥
निकरें करुनिया कदन ॥ दायादातें रणीं जिंकून ॥
जननीजनकासी सोडवून ॥ करूनी वंदन काय बोले ॥१६९॥
दायादें दिधलें परमदुःख ॥ परी आतां भोगावें राज्यसुख ॥
मी आहें तुमचा बालक ॥ सुमतितोक जाणावा ॥ १७० ॥
कथिला सकल वृत्तांत ॥ संतोषित झालें नृपचित्त ॥
हृदयीं धरूनिया स्वसुत ॥ कुरवाळूनी आलिंगी ॥ १७१ ॥

आर्या.

झाला अनुताप तदा पाहुनि तें दुष्टकैकयीहृदया ॥
करणें क्षमा ह्मणे ती जोडुनि कर मंतुतें करूनि दया॥१७२॥
सुमति सुमतिपुत्र तदा बोलति तिजला, अतां न खेद कर॥
होणारें होत असे, सज्जनपद्धति अशीच मोदकर ॥ १७३ ॥

ओवी.

मग आणुनी सुमतीस ॥ राज्यीं स्थापिलें इंदुकांतीस ॥
आनंद झाला सकल जनास॥कृष्णें त्या कथेस गाइलें॥१७४॥

प्रकरण ४१ वें.

संत प्रेमनिधि.

आर्या.

वंदुनि सदा पदा श्रीशिवदा मतिदा सशारदा वरदा ॥
गाइन संतकथा, जी दे सुख मोदा, हरी भवा दरदा ॥१॥
प्रेमनिधी अभिधानें होता सत्साधु हस्तिनापुरिंत ॥
श्रीरामाची भावें पूजा प्रतिवासरीं असे करित ॥ २ ॥

भुजंगप्रयात.

उषःकालिं ऊठूनि गंगेस जाई ॥ कृतस्नान गंगांबु घेऊनि येई ॥
पुजी राघवा स्नान घालूनि तेणें ॥ कधीं या क्रमातें पडों दे न ऊणें ३

शार्दूलविक्रीडित.

एके वासरिं अर्धरात्रसमयीं अंभोदवृष्टी महा ॥
होवोनी पथ कर्दमें भरियला, काष्ठा तमेंही दहा ॥
चालाया पथ ना मिळे, घसरुनी जाती पदें भूवरी ॥
ऐशा तो विषमीं पथीं परि निघे जाया नदीच्या तिरीं ॥४॥

स्वागता.

तैं पडे गमनिं तो निसरूनी ॥ कुंभ जाय करिंचाहि सुटूनी ॥
कर्दमें भरियला मग काय ॥ रामपूजन कसें अजि होय ॥ ५ ॥

आर्या.

ऐशा बहु चिंततें तो प्रेमनिधी मनीं तदा पावे ॥
निजभक्त–साह्यकारी घेउनि मग दीपिका करीं धावे ॥ ६ ॥
त्या सुप्रकाश दावित दुरदुरुनी हळु हळु प्रभू जाती ॥
मनिं ह्मणति, धरुं न दिवटी, तरि कोठुनि आसि मिळेल पूजा ती ॥

इंद्रवज्रा.

गेला प्रकाशें सरिता-तटातें ॥ टेकीं वसे दावित दीवटीतें ॥
स्नानासि सारूनि गृहीं निघाला ॥ तोयें शिरीं घे भरुनी घटाला ॥

यूथिका.

दावि पूर्ववत राघव दीपिका ॥ जो करी सतत भाविक भाउका ॥
लंघुनी पथ सुखें गृहिं जाय तो ॥ गुप्त होय सहदीवटि देव तो ॥९॥

आर्या.

प्रेमनिधी चोज मनीं करुनि ह्मणे, कोण दीपिकाधारी ॥
दावित जो दासापरि येउनि संगें प्रकाश आंधारीं ॥ १० ॥

भुजंगप्रयात.

पहावें तयातें पथीं ये ह्मणूनी ॥ दिसे दीपिका ना तसा दास कोणी
ह्मणे,राघवा,काय हें आजि केलें॥ मदर्थीं अशा कां स्वरूपा धरीलें॥

मालिनी.

भरण मजसि येतें कर्दमीं त्या रुतूनी ॥
बहु विहित, परी हें काय केलें प्रभूंनीं ॥
धरियलि दिवटी त्वां आपुल्या हातिं देवा ॥
मम करिं तरि ऐसी जाहली काय सेवा ॥ १२ ॥

आर्या.

देवाधिदेव तूं कीं, त्वत्पद घेऊनि इंदिरा अंकीं ॥
चुरिते मृदु करकमलें, ते या दासार्थ रुतविले पंकीं ॥ १३ ॥
जरि हा पंकीं पडता, मरता, बुडता नदींत घसरूनी ॥
तरि काय उणें होतें, जाती का दासमालिका सरुनी ॥१४॥
रुतती कंकर कंटक त्या मृदुपदपंकजीं तमामाजी ॥
साहुनि तें त्वां केली कींव कशाला रघूत्तमा माजी ॥ १५॥

स्वागता.

शीणलासि बहु तूं मजसाठीं ॥ होय तें सहन दुःख न पोटीं ॥
वंदितों चरण मी तव आतां ॥ ना पुन्हां करि असें भगवंता ॥१६॥

यूथिका.

नित्य पूजन करूनि यथाविधी ॥ कीर्तनासि निशितें करि तो सुधी ॥
प्रेमभाव बहु मानासिं दाटुनी ॥ नृत्य तो करि न लज्जित होउनी १७

शार्दूलविक्रीडित.

ग्रामींचे जन सान थोर युवती जाताति तत्कीर्तना ॥
होती तन्मय आयकूनि, करिती नाचूनि ते गायना ॥
टाळ्या वाजविती करूनि वरती दोन्हीहि हस्तांप्रती ॥
पाहूनी मनिं तें कुटाळ जन ते रात्रंदिनीं जल्पती ॥१८॥

इंद्रवज्रा.

एके दिनीं कीर्तनिं येत रंग ॥ तल्लीन झालें जन-अंतरंग ॥
साहे न तें देखुनि त्या कुटाळां ॥ जाऊनि तें सांगति भूमिपाळा १९

आर्या.

प्रेमनिधी अभिधानें आहे या पत्तनांत एक जन ॥
भुलवी स्त्रियादि जन तो दावुनि बहु ढोंग साधुता भजन २०
करवुनि ऊर्ध्व करांतें कीर्तनिं निर्लज्ज नाचवी रमणी ॥
लागे कलंक आह्मां, यास्तव करि शासनास वीरमणी ॥२१॥

मालिनी.

परिसुनि वच त्यांचें कोपला बादशाहा ॥
पकडकर लिआओ उसकू अबि याहा ॥
सुनत हुकुम आये दौरते चोबदार ॥
कहति, अबि चलोजी, मत्करो तूम देर ॥ २२ ॥

इंद्रवज्रा.

तेव्हां ह्मणे प्रेमनिधी तयांसी ॥ यावें कसें सोडुनि कीर्तनासी ॥
ो निशी अर्ध, तमांत जाणें ॥ होईल कैसें,तुह्मि कां न जाणें २३

वसंततिलका.

े बोलती, हुकुम हा जन बादशाही ॥
ीथे चले नचि कुणाचिहि चातुराई ॥

जाऊं जरी त्यजुनिया तरि आपणातें ॥
तो निश्चयें करिल तीव्रचि शासनातें ॥ २४ ॥

इंद्रवज्रा.

ऐकूनि निष्ठूर तदीय वाणी ॥ श्रीरामपादांबुज तें नमूनी ॥
तो साधु जाई मग दाससंगें ॥ भीती न चित्तीं, शुचि अंतरंगें २५

साकी.

कहत ढलाइत बादशहाकूं हुजुर हुकुमसे जाके ॥
प्रेमनिधीकूं मौलुदमेसे लाया मकानिं अपके ॥
॥ध्रु०॥ हुजुर हुकुम होना ॥ इसकूं काहा अभि धरना ॥२६॥
हुजर कहे तब ढलाईत कूं, लेजाना देवडिमे ॥
सूबह हूया साथे लेके लाना दरबारोंमे ॥
॥ध्रु०॥ इनसाफ तब बने ॥ अब राखो तावेमें अपने ॥२७॥

शिखरिणी.

सर्वे घेऊनीया गमन करिती प्रेमनिधिला ॥
अणोनीया द्वारीं निकटिं अपुल्या तो बसविला ॥
ह्मणे तेव्हां, देवा, तव चरणसेवा विसरली ॥
यदर्थी या दासावरिल ममता काय सरली ॥ २८ ॥

इंद्रवज्रा.

लागे तृषा तूजसि मध्यरात्रीं ॥ मी ठेवितों यास्तव तोय पात्रीं ॥
तें राहिलें आजि विभो चुकूनी ॥ त्वत्कंठ जाईल तृषें सुकूनी ॥२९॥
भूपें मला आणुनि बैसवीलें ॥ सेजे अर्धी म्यां नचि ठेवियेलें ॥
हा मंतु झाला बहु थोर हातें ॥ देवा, क्षमा तूं करि आजि यातें॥३०॥

आर्या.

येऊनि भक्तरक्षक रघुनायक भव्य काजि-वेशानें ॥
बोले निद्रिस्थ नृपा हाणुनि लत्ता बहू अवेशानें ॥ ३१ ॥
क्यौं बे तुम झोंपि गया, लग रहि हमकू बहू बडी प्यास ॥
ऐसें बहु रोषानें ह्मणती श्रीराम बादशाहास ॥ ३२ ॥

साकी.

निंदोमेसे उठके देखे आगे साहिब काजी ॥
प्यास लगी तो चाहे उतना पीओ अच्छा जलजी ॥
॥ध्रु०॥ हमकु न ये भावे ॥ प्रेमनिधी हमसे देवे ॥ ३३ ॥

इंद्रवज्रा.

बोलूनि ऐसें मग गुप्त होती ॥ आश्चर्य मोठें करि भूप चित्तीं ॥
कुत्सी जनाची धरुनी अहंता ॥ पीडीयलें प्रेमनिधी महंता ॥३४॥

साकी.

बादशहा कहत ढलाईतकू, छोडो प्रेमनिधीकू ॥
झूटी दुर्जन बात सुनायी, मारो गुद्दे उनकूं ॥
॥ध्रु०॥ खैंचकर लिआवो ॥ साधूकूं तुम न दुखावो ॥३५॥

आर्या.

मग ते प्रेमनिधीतें ह्मणती, साधो, सुखें गृहीं जावें ॥
आणिलें अनयें रायें, परि मनिं करणें क्षमा, न कोपावें ॥३६॥
येउनि गृहिं मग तो श्रीरामपदा वंदि जोडुनी पाणी ॥
सेजेसंनिध ठेवी शीतल नित्य क्रमापरी पाणी ॥ ३७ ॥

ओवी.

इकडे बादशाहा स्वमनांत ॥ विचार करी, यह क्या है बात ॥
काजी होउनी तृषाक्रांत ॥ अर्ध निशींत केवि आला ॥३८॥

आर्या.

न मिळे स्वकीय गेहीं काजीला तोय का तृषाशमना ॥
कीं आले मम सदनीं, वाटे आश्चर्य हें विशेष मना ॥३९॥
मग धाडुनि दूतातें आणुनि काजीस वृत्त पुसिलें तें ॥
तो कर्णीं कर ठेवुनि बोले, ठावें मला न कसलें तें ॥ ४० ॥

साकी.

बडा अचंबा मानुनि नृपवर चकित दिलमें हूवा ॥
कुत्सित जनकी बात सुनी, मै विचार न किया बरवा ॥
॥ध्रु०॥ जाके पाव धरूं ॥ बनाउ अपना उसकु गुरू ॥४१॥

भइ सुबह, तब राजा उठके साथे मंत्री लेके ॥
प्रेमनिधीके मकानिं आया, लागे पायीं उनके ॥
॥ध्रु०॥ बडी भूल भई ॥ माफ करोजी वो साई ॥ ४२ ॥
दुर्जन मुहकी बात सुने हम, बिचार कुछ नहि कीया ॥
रातोराती ले आनेका हुकूम हमने दीया ॥
॥ध्रु०॥ माफ करो साई ॥ ह्मणुनी शिर ठेवी पायीं ॥४३॥

इंद्रवज्रा.

प्रार्थूनि ऐसें विनयें नृपानें ॥ थाली भरीयेलि सुकांचनानें ॥
ठेवी तदग्रीं,कथि हें स्विकारा॥ दे काय तो साधु तया रुकारा ४४

आर्या.

ऐशा साधुचरित्रा वर्णाया काय शक्त मतिमंद ॥
परि भार कृष्ण हरिवरि ठेवुनि कवनीं मनीं धरी छंद ॥४५॥

प्रकरण ४२ वें.

वामनावतार.

शार्दूलविक्रीडित.

श्रीमन्मंगलदायकांघ्रिकमलीं विघ्नार्णवाभीतरीं ॥
भावें वंदनमज्जनासि करितां निर्विघ्नता सत्वरी ॥
लाधूनी मतिमंदता हरुनिया भक्तासि सद्बुद्धितें ॥
देतो, तत्पदपंकजासि नमितों, देवो मला सिद्धितें ॥ १ ॥

चामर

वामनावतारवृत्तगायनासि मन्मना ॥
होतसे न जाणुनी स्वमंदबुद्धि कामना ॥

वाम ना करी जरी हरी स्वकीय लोचना ॥
लागते करावयासि ना कुणाहि वंचना ॥ २ ॥

भुजंगप्रयात.

बली दानवें शक्रलोका हरीलें॥ह्मणूनी दिव त्यागुनी देव गेले॥
तयें दुःख झालें तयां जन्मदेतें॥झुरे मानसीं यामिनीवासरीं ते॥३॥

मालिनी.

अदितिमुखशशीतें ग्रासिलें म्लानतेनें ॥
बघुनि मुनिवरें त्या पूसिलें कश्यपानें ॥
गलितदलसमाना कांति भासे तवांगीं ॥
कथन करि मला गे दुःख कां अंतरंगीं ॥ ४ ॥

मृदु मधुरसयुक्ता वाणिनें भामिनी ते ॥
मिलितकरपुटा ती बोलली त्या मुनीतें ॥
मम तनय सुरांना गांजुनी दानवांनीं ॥
हरुनि सकल वित्ता धाडिलें घोर रानीं ॥ ५ ॥

वैश्वदेवी.

या दुःखाग्नीनें पोळतो नित्य काय ॥
सांगे देवा या योजणें युक्ति काय ॥
मी आहें दासी पूज्य युष्मत्पदाची ॥
सीतें यूक्ता छाया करी त्वत्कृपेची ॥ ६ ॥

मालिनी.

परिसुनि विनती ती साध्विची दुःखयुक्ता ॥
मुनिमनिं करुणा त्या उद्भवे तैं विरक्ता ॥
अघटितघटना त्या विश्वकर्त्या हरीची ॥
न कळत कवणाही, कुंठिली धी श्रुतीची ॥ ७ ॥

आर्या.

ऐशा त्या प्रभुपायीं जावें भावें, प्रिये, तुवां शरण ॥
तैसें विधियुक्त करी फलदायक तें पयोव्रताचरण ॥ ८ ॥

इंद्रवज्रा.

होतील तेणें तव पूर्ण काम ॥ ऐकूनि पावे मनिं ती विराम ॥
श्रद्धान्विता श्रेष्ठ पतिव्रता ते॥भावें करी त्या फलद व्रतातें ॥९॥

चामर.

भक्तकामकल्पवृक्ष पीतवास तो हरी ॥
देखुनी तिच्या व्रतासि तोषला निजांतरीं ॥
मूर्तिमंत ये तदग्रिं भक्तिभाव जाणुनी ॥
धावुनी सती तयासि वंदि हस्त जोडुनी ॥१०॥

आर्या.

सविनय तैं अदिति ह्मणे, देवा पुरुषोत्तमाच्युतानंता ॥
कर्ता, हर्ता, त्राता रक्षिसि भक्ता स्वपदनत अनंता ॥११॥
मीही शरण तव पदीं मम दुःखाचें करी प्रभो हरण ॥
जाणसि आशय मनिंचा, साष्टांगें वंदितें तुझे चरण ॥१२॥

स्रग्धरा.

बोले तोषें मुरारी सतिस, न करिं तूं काळजी अंतरासी ॥
देतों केव्हांहि, साध्वी, न पदरत जना संकटीं अंतरासी ॥
इच्छा पूर्णा करीतों द्रुत तव मनिंची, तूझिया जन्म पोटीं ॥
घेऊनी दानवांतें वधिन निजकरें, बोलिला विश्वजेठी ॥१३॥

आर्या.

श्रीहरिवरप्रसादें झाली ती अदिति गर्भिणी काळें ॥
त्या दिवसापासुनि त्या सुररिपुचे प्राण कर्षिले काळें ॥१४॥
सुररक्षक गर्भाचें स्तौत्य करी ब्रह्मदेव वेदास्यें ॥
बहु थोर भाग्य सतिचें, झालें प्राप्त न रमेस जें दास्यें ॥१५॥
नव मास पूर्ण होतां भाद्र सितद्वादशीस सुमुहूर्तीं ॥
प्रकटे तदग्रिं साक्षात् श्रीनारायण चतुर्भुजा मूर्ती ॥ १६ ॥
तिल पुष्पतुल्य नासिक, लोचन पद्मेंचि, वदन इंदुसम ॥
श्यामरुची पीतवसन पाहुनि ती मूर्ति तोषली परम ॥१७॥

चामर.

आद्य सत्यरूप मूर्ति पाहुनी सती वदे ॥
हें स्वरूप मन्मनाप्रती बहूत तोष दे ॥
दृश्य होय ना कधीं विरिंचिशंकरां सुरां ॥
दाविलें परी मदर्थ बालरूपताधरा ॥ १८ ॥

इंद्रवज्रा.

ऐकूनि तीच्या वचना रमेश ॥ घेई त्वरेनें बटुरूपवेश ॥
सप्रेम मोदें सुत घे निजांका ॥ होऊनि चित्तीं विगतस्वशंका ॥१९॥

आर्या.

संवृद्धि शशिकलांसम पावे कश्यपसदाश्रमा हरि तो ॥
धरुनी नाना रूपां भक्तांच्या जो सदा श्रमा हरितो ॥२०॥
पाचारुनि सुरमुनिंतें केलें उपनयन कश्यपें वटुचें ॥
उपदेशी मंत्र रवी, बांधी तत्तात सूत्र तें कटिचें ॥ २१॥
कृष्णाजिन मेदिनि दे, तैसा शशि दंड, अदिति कोपीन ॥
ऋषिजन दर्भ, कमंडलु धाता, भिक्षार्थ पात्र वैश्रवण ॥२२॥
दे मेखला सरस्वति, तैसी दे स्वर्गदेवता छत्र ॥
घाली भिक्षा देवी, सजला या वैभवें अदितिपुत्र ॥ २३ ॥

चामर.

सर्व शक्तिमान ये बटू न यज्ञमंडपीं ॥
तोंच कांतिहीन होति दैत्य याज्ञिकी जपी ॥
देखुनी स्वमानसांत तर्क फार योजिती ॥
यज्ञलोकनार्थ ये गभस्ति वा निशापती ॥ २४ ॥

मालिनी.

मग सकल उठोनी शीघ्र सामोरि जाती ॥
धरुनि करिं तयाला आदरें आणिताती ॥
बसविति मणियुक्ता आसनीं त्या बटूतें ॥
नमिति दनुज तैसे यागकर्मी पटू ते ॥ २५ ॥

इंद्रवज्रा.

पूजा यथासांग बली करी तो ॥ पादाब्जतीर्था स्वशिरीं धरीतो ॥
ही यज्ञशाला भवदागमानें ॥ झाली पवित्रा ह्मणती क्रमानें ॥२६॥

भुजंगप्रयात.

ह्मणे तैं बली, मागणें कांहिं मातें ॥ अशी वासना दीसते त्वन्मनातें ॥
तरी शीघ्र आज्ञा मला ती करावी॥असें सिद्ध, शंका मनीं ना धरावी
महाश्रेष्ठ तुह्मी, अहो विप्रवर्य ॥ घडो या करें आपुलें कांहिं कार्य ॥
सुखें जें तुह्मी आजि मागाल देतों विवाहासि कन्या द्विजाची अधीतों

इंद्रवज्रा.

त्या धर्मनिष्ठान्वित भाषणातें ॥ ऐकूनि वाटे बहु वामनातें ॥
संतोष चित्तीं, मग काय बोले ॥ आतिथ्य माझें अतियोग्य केलें ॥

आर्या.

परलोकप्राप्तीचें साधन जो धर्म तो तुला विदित ॥
करिती भार्गवसम, मग होइल कां तव करें तुझें अहित ॥३०॥

इंद्रवज्रा.

सांगे शुकाचार्य परिक्षितीतें ॥ आरंभि तो देव दनुस्तुतीतें ॥
प्ऱ्हाद जाणे नयधर्मनीती ॥ तीन्ही जयाचें यश लोक गाती ॥३१॥

आर्या.

बटु वदतो, तव वंशीं विमुख कुणाही न याचका केलें ॥
दिधलें वित्त रणादिक, जें जें याचकमुखेंचि याचियलें ॥३२॥
प्रपितामह तुमचा जो सकलावनिचा पती हिरण्याक्ष ॥
होता धीर रणपटू, तैसाची दानकर्मिं बहु दक्ष ॥ ३३ ॥
तद्बंधु हिरण्यकशिपु, होता तैसाचि तो महान बली ॥
जिंकियले सुर जेणें, कथितों त्याचा उदंत एक, बली ॥३४॥
सुरवैर हिरण्याक्ष स्वर्गीं साधावया करी गमना ॥
पाहुनि त्या भय वाटे दनुजवरासी तदा मुरारिमना ॥३५॥

इंद्रवज्रा.

आतां दडूनी बसणें विहीत ॥ त्यावांचुनी होइल केवि हीत ॥
ऐशा विचारें द्रुत सूक्ष्मवेश ॥ घेई, करी तज्जठरीं प्रवेश ॥३६॥

आर्या.

शुक ह्मणती, हे राया, शिरला हृदिं शत्रुच्याचि हें नवल ॥
वाटे, परि वाटुं न दे, कथितों तद्धेतु, आयके सकल ॥३७॥
देहाभिमानि जन जे तद्दृष्टी बाह्य वस्तुवरि असते ॥
अज्ञानालिप्त बुद्धी होई जी, अंतरंगिं ती नसते ॥ ३८ ॥
ऐश्वर्यशक्तिगर्वें सत्य परब्रह्म जाणती ना ते ॥
सर्वश्रेष्ठचि आपण, ऐसें अपणासि लाविती नातें ॥ ३९ ॥

यूथिका.

ऊर्ध्व खालिं निरखी असुरेश ॥ त्या न तो परि दिसे जगदीश ॥
क्रोध तैं बहु तया मनिं आला ॥ गर्जुनी तिथुनि शीघ्र निघाला ॥४०॥

इंद्रवज्रा.

आकाशपातालदिशासरोऽब्धी ॥ शोधी जवें धावुनि मंदबुद्धी ॥
लाधे कुठेही परि तो न त्यातें ॥ राहे उभा स्तब्ध, विचारि चित्तें ४१
बोले तदा दैत्य निजांतराला ॥ म्यां शोधिलें आजि तिहीं जगांला ॥
झालेचि माझे श्रम सर्व वाया ॥ गेलाचि तो ये परती न ठाया ॥४२॥
वैरत्व ना तें करणें विहीत ॥ होतां द्विषद्धानि असे स्वहीत ॥
ऐशा विचारा करुनी मनांत ॥ झाला तदा दानव तो निवांत ॥॥४३॥

यूथिका.

ज्या विरोचन असें अभिधान ॥ तात तो तव बलिष्ठ महान ॥
सांगतों तुजसि गोष्टि तयाची ॥ आयके बहुत थोरपणाची ॥४४॥

चामर.

देववृंद विप्रवेश घेउनी विरोचना ॥
तो करी तदायु—लागिं बद्धहस्ति याचना ॥

छद्म तें विरोचनें निजांतरांत जाणिलें ॥
त्या तथापि तत्क्षणींच तुष्टमानसें दिलें ॥ ४५ ॥

मालिनी.

बटु ह्मणति तयातें, तूंहि तैसा उदार ॥
असासि सकलवेत्ता थोर संग्रामशूर ॥
तुजजवळि मला रे मागणें एवढेंची ॥
त्रिपद वसुमती दे, अन्य कांहीं न याचीं ॥ ४६ ॥

इंद्रवज्रा.

राया बहू तूं अससी समर्थ ॥ मन्मानसीं ना परि अन्य अर्थ ॥
कार्याविणें वस्तुविशेष घेतां ॥ अज्ञत्व ये, पाप जडे स्वमाथां ॥४७॥

आर्या.

बलि भूप ह्मणे, वत्सा, तव भाषण वृद्धवृद्धजनमान्य ॥
आहे, परंतु वाटे, जाणसि तूं याचकत्व सामान्य ॥ ४८ ॥
मत्तुल्य सार्वभौमा मागावें काय, हें तुज न ठावें ॥
याचकवृत्ति अशी कीं, थोर स्वार्थीं सदा बहु झटावें ॥४९॥
तव मागणें जसें कीं, पर्वत कोरूनि काढणें खनका ॥
तें मान्य मी जरि करीं, सुज्ञ तसे हासतील लेख न कां॥५०॥
होतां प्रसन्न सुरभी अथवा संतान, मागणें काय ॥
लागे विचार करणें, असुनि असें मागतोसि हें काय॥५१॥
जें इच्छि मानस तुझें, देइन तें सत्य सत्य सत्य बटो ॥
दिधलें त्रिवार वच हें, अनृत तुझ्या मानसा न गा वाटो ॥५२॥
या त्रैलोक्याधीशा ऐसें तूं शीघ्र मागणें मागे ॥
आजन्म याचना कीं करणें कोणाहि ना कदा लागे ॥५३॥
भगवान ह्मणती, परिसे, राया, जे पुरुष इंद्रियाधीन ॥
त्यां त्रैलोक्यींचें प्रिय देतांही विषयतृप्तता कधिं न ॥५४॥
जलधिवलया महीचे वैन्यगयादिक महामहा भूप ॥
झाले न तृप्त तेही, नाहीं तृष्णेस तृप्ततारूप ॥ ५५ ॥

पृथ्वी.

यदर्थ वसुधापते तुजसि जें मुखें याचिलें ।।
पुरे मजसि तें, नको अधिक त्वां जरी गा दिलें ।।
स्वदैवगतिनें मिळे, मनिं तयांत तुष्टे सदा ।।
तयासि वरमुक्ति ते वरित, ना कदा आपदा ।।५६।।

युथिका.

सांगतो शुक्रमुनी नृपतीतें ।। बोधि तो बलि जरी बहु त्यातें ।।
वासना न बटुची दुजि कांहीं ।।हांसुनी बलि करी नवलायी ।।५७।।

मालिनी.

मग बलि नृपती तो बोलला वामनातें ।।
त्रिपद-अवनिदानीं कामना जी मनातें ।।
पुरविन बटुविप्रा, बोलुनी याहि रीती ।।
उदक करिं तयाच्या घालण्या योजि चित्तीं ।।५८।।

यूथिका.

शुक्र दैत्यगुरु तो मतिमंत ।। ओळखी स्वमनिं हा भगवंत ।।
जाणुनी कपट सर्व हरीचें ।। बोलिला बलिस तो निज वाचे ।।५९।।
हे विरोचनसुता बलिराया ।। सांगतों, मम वचा परिसे या ।।
जाणसी न पुढल्या निजघाता ।। घेसि दानजलपावक हातां ।।६०।।

पृथ्वी.

त्वदीय करणें मला नचि दिसे नृपा चोखटें ।।
तुला गुतविलें अजी वचनवागुरीं या भटें ।।
न हा भट खरा, असे खचित हा जगाचा पती।।
दिवौकसहितार्थ जो अवतरे स्वयें भूपती ।। ६१ ।।

इंद्रवज्रा.

संपूर्ण हें विश्व शरीर ज्याचें ।। प्रौढत्व तें वर्णिल कोण त्याचें ।।
त्रैलोक्य हा दोन पदीं भरील।।दातृत्व कोठें मग तें उरेल ।।६२।।

मालिनी.

मग निजवचनातें पाळिसी सांग केवी ॥
तृतियपद तयाचा तो कुठे देव ठेवी ॥
तरि करि मनिं, राया, पूर्ण तूं या विचारा ॥
असुखद निरयाचा आपणातें न थारा ॥ ६३ ॥

शार्दूलविक्रीडित.

केलें मान्य तुवां, नृपा, त्रिपद तें धात्रीप्रदानीं खरें ॥
नाहीं शक्ति परी तुझ्या शरिरिं, तें होईल केवी करें ॥
राया, त्वां दिधलें तया वचन तें दारिद्र्य आणी घरा ॥
ऐशा दानपरा कसा वद मिळे त्रैलोक्यिं रे आसरा ॥६४॥

चामर.

धर्म अर्थ काम कीर्ति अंगना स्वनंदना ॥
यांसि देइ जो विभागुनी निजार्जिता धना ॥
स्वर्गलोकिं सौख्यलाभ होतसे तयाप्रती ॥
दूर दृष्टि देउनी करी विचार भूपती ॥ ६५ ॥

आर्या.

भार्गव ह्मणे, बलिनृपा, देतों ह्मणुनी फिरूनि नाहिं कसें ॥
बोलावें, ह्मणसिल, तरि आहे आधार यास, तें परिसे ॥६६॥
ऋग्वेदीं ॐशब्दें करुनी उच्चारिलेंचि तें सत्य ॥
कथिलें नाहीं ह्मणुनी, होतें तें, भूवरा, मग असत्य ॥६७॥
सत्याठायीं किंचित् असतो कीं अंश तो असत्याचा ॥
त्यावांचुनि सिद्ध न तें होय, जसें देहरूप वृक्षाचा ॥६८॥
फलपुष्पभाग सत्यचि मूल तयाचें अनृत असे राया ॥
सांगे श्रुति यास्तव ज्या सत्प्राप्ती सत्यरूप फल व्हाया ॥६९॥
इच्छा असेल तेणें मूलाच्या रक्षणा करावें तें ॥
होतां मूलावन मग राहुनि जीवंत सत्य फल येतें ॥ ७० ॥

उच्चाटितांचि मूला मग तो पादप सुकूनि जाईल ॥
येतां रुक्षत्व तया फल तें कोठूनि सांग येईल ॥ ७१ ॥
यास्तव तनुभरणार्थीं करणें रक्षण बुधेंहि अनृताचें ॥
तें करितां संपादन केलें ऐसें न होय पापाचें ॥ ७२ ॥
सत्याठायीं कांहीं दोष तसे गुण असत्यिंही असती ॥
ह्मणुनी बुधजन समयीं सत्यासत्योपयोगही करिती ॥७३॥
ॐ ह्मणजे देतों या शब्दा उच्चारितां वदान्याचे ॥
नेतो सर्वहि वित्ता, मग त्या धन आपणा उरे कैचें ॥७४॥
आतां नाहीं ह्मणतां असती गुण भूपते किती परिसे ॥
मम संग्रहास नाहीं म्हणतो, तत्पाणिंतूनि जाय कसें ॥७५॥
बोलावें अनृत सदा, ऐसा मद्भाषणार्थ गा नाहीं ॥
येतां प्रसंग सुज्ञें वदता अनृता न दोष तो कांहीं ॥ ७६ ॥
गोब्राह्मणजीवतनूरक्षणिं अनृत प्रसंगिं बोलावें ॥
तैसें स्त्रीसि विनोदीं बोलुनि अनृता स्वकार्य साधावें ॥७७॥

मालिनी.

परिसुनि कविबोधा दानवाधीश चित्तीं ॥
करुनि मग विचारा बोलिला काय उक्ती ॥
निजकुलगुरुवर्या, बोधिली धर्मरीती ॥
बहु उचित, तथापी मानवेना मला ती ॥ ७८ ॥

चामर.

अर्थ काम कीर्ति वृत्ति साधनासि व्हावया ॥
धर्म जो कथीयला असेचि योग्य तो नया ॥
एकदां ह्मणूनि अर्पितों वचेंच बोलुनी ॥
नाहिं बोलतां स्ववंश होय युक्त लांछनीं ॥ ७९ ॥

आर्या.

विश्वंभराहि ह्मणते, भार सहन मी करीन सर्वांचे ॥
परि मज न साहवति ते किंचित्‌ही अनृतवाणि जीवांचे ॥८०॥

अनृतासमान नाहीं त्रैलोक्यांतरिं अधर्म तो दुसरा ॥
तो मी स्वीकाराया आजि तुह्मी बोधकर्मिं नानुसरा ॥८१॥
वचनभ्रष्टत्वाधिक दुःख नसे मजशिं अधिक निरयाचें ॥
तैसें दारिद्र्याचें, मृत्यूचेंहि न गमे मनीं साचें ॥ ८२ ॥
राहति निकटिं कदाचित्, उशना, द्रव्यादि मृत्युपर्यंत ॥
येती समवेत न ते मनुजाचा जाहल्यावरी अंत ॥ ८३ ॥
आहों सजीव जोंवरि, तोवरि दिधल्यास वांकडें काय ॥
आहेत निश्चयानें सकलांचे नाशिवंत हे काय ॥ ८४ ॥

इंद्रवज्रा.

निर्वाह व्हावा ह्मणुनीच कांहीं॥ ठेवूं तरी याचक तृप्त नाहीं ॥
ऐसें कशाला मग दान द्यावें ॥ देतों असेंची न अर्थी ह्मणावें ॥८५॥

विभावरी.

शिबिसमान नृप याचकवासना ॥
करिति पूर्ण, मनिं लाविति वेळ ना ॥
निजजिवित्विं कधिं चित्त न ठेविती ॥
मग अधीक तरि का धनसंतती ॥ ८६ ॥

मंदाक्रांता.

युद्धें दानें मिळविलि महा कीर्ति जी दानवांनीं ॥
त्यांचे पश्चात् त्रिभुवनिं असे राहिली ती भरूनी ॥
कांहीं कालें खचित हरितो काल द्रव्यादिकाला ॥
कल्पांतीं मी परत न फिरें बोलिल्या आत्म-बोला ॥८७॥

आर्या.

विमुख रणांत न होतां वेंचिति तनुला असेहि झुजणार ॥
आढळतिल, परि लाधे विरळा इच्छित वदान्य देणार ॥८८॥

इंद्रवज्रा.

सर्वस्व देतां धनहीनता ये ॥ ऐशा विचारीं तव चित्त जाये ॥
सामान्यही याचक तृप्त होतां ॥ दारिद्र्य आलें तरि भी न दाता ८९

आर्या.

त्वत्तुल्य महाज्ञानी, पुरुषेच्छा पूर्ण जाहल्या हातें ॥
आली दरिद्रता, तरि होतें तद्दुःख ना वदान्यातें ॥ ९० ॥
ह्मणतां कीं, गुरुवर्या, साक्षात् जगदीश विष्णु हा आहे ॥
मग या सर्वस्वार्पणिं दात्याचें चित्त कां न हो वाहे ॥९१ ॥

इंद्रवज्रा.

संकल्प माझा दृढ चित्तिं झाला॥श्रीविष्णु भिक्षार्थ गृहासि आला॥
याहूनि सौभाग्य विशेष काय ॥ तोषार्थ त्याच्या दवडीन काय ९२

स्रग्धरा.

व्हाया प्राप्ती जयाची द्विज नृप करिती अश्वमेधादि यागा ॥
तैसेंची साधितातो जपि तपि मुनिही धूम्रपानादि योगा ॥
ईशानाब्जासनादी अमरनिकर ते मानसीं ध्याति ज्यातें ॥
देतों बोलूनि आधीं न कधिं 'न' कधिं मी प्राण गेल्याहि त्यातें ॥

इंद्रवज्रा.

भीऊनि मातें द्विजरूपवेशीं ॥ ये याचनार्थी, मज तो न नाशी ॥
वाटेल त्या काय बुडो स्वकीर्ती ॥ गाती जगीं जी विमला सुकीर्ती ॥

आर्या.

युद्धें मारुनि मजला घेइल जरि भूमि राज्य वा, वधिन ॥
मी त्यातें, परि वदनें 'दान न देतों' असें ह्मणें कधिं न ॥९५॥
अमृताधिक मधुर तदा बोधगिरा ती रुचे न त्या कविची ॥
मानी दानवपतिला, जन्मांधा काय होय रुचि रविची ॥९६॥

पृथ्वी.

परिक्षिति नृपाप्रती शुकमुनी तदा बोलिले ॥
अनेकपरि भार्गवें भविक-दायका बोधिलें ॥
परी न मनिं मानि तें, बघुनि काव्य त्या शाप दे ॥
'हरूनि तव राज्य तें तुडवि हा तुला रे पदें' ॥९७॥

स्वागता.

शापिलें जरि तया उशनानें ॥ दानकर्मिं न ढळे स्वमनानें ॥
बाहुनी स्वसदनांतुनि जाया ॥ धूतसे बटुपदा बलिराया ॥९८॥
पूजुनी सविधि वामन हातीं ॥ घालि दानजल दानव हातीं ॥
होय हर्ष बहु तैं अमरांतें ॥ लाधलें न यश जें समरातें ॥९९॥

आर्या.

बलिनिष्कपटकृतीची औदार्याची तशी प्रशंसा ते ॥
करुनि ह्मणति सुर, यानें संपादिलि धन्यता स्ववंशातें ॥१००॥

स्वागता.

पुष्पवृष्टि करिती बलिशीर्षीं ॥ होउनी सुर मुनी बहु हर्षी ॥
जाणुनी सकलही रिपुला दे॥कोण चेतन असा जगिं लाधे॥१०१॥

आर्या.

अगणितशक्ति विभूचें वाढे तेव्हां स्वरूप बहु थोर ॥
कोण समर्थ जगीं, जो त्यासि ह्मणे हा लहान बटु पोर ॥१०२॥

इंद्रवज्रा.

व्यापी धराकाशरसातलातें ॥ अब्धी तसें स्थावर जंगमातें ॥
देवर्षि आचार्य समस्त लोक ॥ एक्या पदाब्जें बटु विप्रतोक १०३

आर्या.

चरणीं वसुंधरा गिरि ऊरुवरि शैल पक्षिगण दिसती ॥
जंघीं समीर गुल्फीं सकलामरवृंद पाहि दैत्यपती ॥१०४॥
कटिभागिं मरीच्यादिक, नाभीचे ठायिं अंतरिक्षजन ॥
उदरीं सप्ताब्धि, तशी वक्षःस्थलिं सिंधुजा, भुजीं सुमन १०५
कंठीं सामश्रुति ती, श्रवणीं अष्टा दिशा, शिरीं स्वर्ग ॥
घ्राणीं प्राणसमीरण, नेत्रीं रवि, रोमभागिं घनवर्ग ॥१०६॥
वदनीं वैश्वानर तो, वाणीच्या ठायिं चार वेद तसे ॥
जिव्हास्थलिं प्रचेता, भ्रुकुटीतटिं विधि निधीश तेवि दिसे ॥

क्रोध ललाटीं, ओष्ठीं लोभ, तसाची त्वचेस्थलीं काम ॥
घन रत रेतःस्थानीं, प्रतिबिंबामाजि तेवि यमधर्म ॥१०८॥
हास्यांत योगमाया, धमनीमाजी समस्त त्या सरिता ॥
दिसती पाषाण नखीं, व्यापुनि भासे समग्र त्यासि रिता ॥

वसंततिलका.

राजा परिक्षितिसि तैं शुक सांगताति ॥
भूतांसह स्थिरचरां सुर पाहताती ॥
देहीं तया, मग भयार्त मनीं जहाले ॥
बोलावया निनद तद्रसना न हाले ॥ ११० ॥

चामर.

हस्ति शंख चक्र पद्म, शोभते तशी गदा ॥
कंठिं वन्यमाल, लोकपाल तिष्ठती सदा ॥
जोडुनी करा, असी त्रिविक्रमोग्रमूर्ति ती ॥
व्यापि भूमि नाक, ठाव ना जिच्या पदाप्रती ॥१११॥

इंद्रवज्रा.

व्यापी दुजा जो पद देवलोक ॥ ब्रह्मादि त्या अर्चुनि देवलोक ॥
स्तौत्यासि नाना विधिनीं करीती ॥ क्षाळूनि तत्तीर्थ शिरीं धरीती ॥
सांगे मुनी तैं वसुधापतीतें ॥ पाहूनि छद्मा बटुच्या कृतीतें ॥
ये कोप त्या दानव सैनिकांला ॥ झाले तदा सिद्ध वधावयाला ॥

स्वागता.

देखुनी बलि तयांप्रति बोले ॥ त्यागिले दनुज संप्रति कालें ॥
घेतलें पदरिं देवजनाला ॥ हा विचार करणें स्वमनाला ॥११४॥
वक्र कालगतिच्या समयातें ॥ सिंहपत्निहि अजासम होते ॥
स्वस्थ यास्तव तुह्मी अज राहा ॥ मद्वचेंचि न ह्मणा अजरा हा ११५

आर्या.

जाणुनि भगवद्वांच्छा बांधियलें सुदृढ पाशिपाशानें ॥
त्या दानवपति बलितें विनतानंदनविहंगमेशानें ॥११६॥

वामन ह्मणे बलीतें, राहियला काय सांगणें भाग ॥
द्याया तिजा पदातें, तुज ना तरि निरय भोगणें भाग ॥ ११७॥
बोले गंभीर वचें बलि नृप तो वामनासि, परिसा, हें ॥
जावो वैभव सर्वहि, कृपणत्व न मन्मनास परि साहे ॥ ११८॥

चामर.

दत्तवाक्य सत्य तेवि मी करीन वामना ॥
प्राणहानि हो, विचार ना करीं नवा मना ॥
नाशिवंत काय हा असे यदर्थ नासता ॥
मत्समान जाणत्यासि दुःख होय ना सता ॥ ११९ ॥

मालिनी.

प्रथम लघु शरीरा दावुनी छद्मभावें ॥
त्रिपद वसुमतीतें याचकाचे स्वभावें ॥
मम यजनगृहातें याचिलें येउनीया ॥
ठकविसि अजि देहीं दीर्घ तूं होउनीया ॥ १२० ॥

इंद्रवज्रा.

शोभेल हें कां जगचालकासी ॥ माता कसी वंचिल बालकासी ॥
जाणूं, प्रभू तूं जगतांत माता ॥ हें सत्य मिथ्या, वद, देव, आतां ॥
मिथ्यात्व ये यांत कुणाकडे हें॥ कोणी ह्मणे कां मज, वांकडें हें ॥
जाणूनि केलें कपटासि तूं कीं॥ हा न्याय माते करणें न तूकीं॥ १२२॥

मालिनी.

अनुचित जरि थोरें कांहिं केलें करांनीं ॥
तरिहि ह्मणुं नये त्या वांकडे लेंकरांनीं ॥
सकल जगिं महा तूं थोर आहेस देव ॥
तृतिय पद तुझा तो माझिया शीर्षि ठेव ॥ १२३ ॥

आर्या.

देवा अपकीर्ति जगीं होइल, या साध्वसा भितों जितका ॥
तितका दुजा न कोणी, होतां ती, योग्य राहणें जित कां॥ १२४॥

त्या समयीं त्या ठायीं आला प्रल्हाद बलिपितामह रे ॥
तैसी बलिपत्नी ये, करिती स्तोत्यास वंदुनी स्वकरें ॥१२५॥

इंद्रवज्रा.

स्रष्टा ह्मणे तैं प्रभु वामनातें ॥ आणी न तन्मंतु अतां मनातें ॥
सर्वस्व याचें हरिलें त्रिपादें ॥कल्याण आतां करणें प्रसादें ॥१२६॥

वसंततिलका.

दूर्वांकुरादि करितां तुज अर्पणातें ॥
भावें तसें निजकरें जलतर्पणातें ॥
लाधे सुमुक्ति, तरि या छळणें न आतां ॥
या दानवीं करि दया, जसि तोकिं माता ॥१२७॥

आर्या.

जगदीश ह्मणे विधिला, ज्यावरि करणें असे प्रसाद मला ॥
तत्सर्वस्व हरीं मी व्हाया मम ठायिं तन्मती विमला ॥१२८॥

इंद्रवज्रा.

संपत्तिगर्वें मज नाठवीतो ॥ दुर्बुद्धि चित्तीं बहु सांठवीतो ॥
माझी स्मृती त्या कधिं होत नाहीं॥भोगी अशी तो मग यातना ही ॥

लाधावया हा नरजन्म जीवा॥ कीटादियोनी गरका फिरावा ॥
लागे, पुढें तो करि वित्तगर्व ॥त्याचें क्षणें मी हरितोंचि सर्व॥१३०॥

आर्या.

विद्या, रूप, वय, धनें होय न जो मत्त तो मला मान्य ॥
वृद्ध असो, तरुण असो, वा ज्ञातीनें असोहि सामान्य ॥१३१॥

हा सत्यनिष्ठ दानव, ऋतवादी, तेवि हा वदान्यवर ॥
आहे, विधिदेवा, या देइन संपूर्णविश्वमान्य वर ॥ १३२ ॥

मंदाक्रांता.

गेलें याचें सकल धन तें, राज्यही तेवि गेलें ॥
ज्ञाती-वर्गें कठिण समया पाहुनी त्यागियेलें ॥

पाशी-पाशें तदरिनिकरें बांधिला देह याचा ॥
यानें केली तिलहि न परी आपुली भ्रष्ट वाचा ॥१३३॥

स्वागता.

कोण जिंकिल अहो मम माया ॥ जिंकिली परि अजी दनुजें या ॥
धर्म म्यां कथियला कपटानें॥त्यागिलें ऋत परी न भटानें ॥१३४॥

आर्या.

जें बहु दुर्लभ विबुधां, ऐशा हा श्रेष्ठ ठायिं जाईल ॥
सावर्णी मन्वंतरिं सुरलोकींचा सुरेंद्र होईल ॥ १३५ ॥
ग्लानी, मनोव्यथा, भय, तनुदुःखारहितशा महासुतलीं ॥
रक्षक मी द्वारिं असा, तावत् राहील हा महान बली ॥१३६॥
ऐसें कथुनी विधिला, बलिला 'तव शिव असो' असें वदला ॥
जाउनि सहपरिवारें वसणें तूं स्वस्थ मानसें सुतला ॥१३७॥

चामर.

वासवादि लोकपाल काल व्याल ते तुला ॥
पीडिती न, पीडितां सुदर्शनेंचि हानिला ॥
पावतील, मी असें सदैव गेहरक्षिता ॥
नाशि दैत्यदुष्टवृत्ति माझि सुप्रसन्नता ॥ १३८ ॥

स्रग्धरा.

ईशाज्ञेनें बली तो नमुनि हरिपदा जोडुनीया कराला ॥
गेला पाताललोकीं स्वतनय ललना घेउनीही जनाला ॥
राहे आनंदवृत्ती स्मरुनि शुचि मनें वामनाचे पदास ॥
सप्रेमें प्राकृतीं ती बहु पुनित कथा गाइ कृष्णाख्य दास ॥

प्रकरण ४३ वें.

नामदेवचरित्र.

आर्या.

आधीं स्मरुनी भावें मंगलदायक सुनाम देवाचें ॥
प्रेमें प्राकृतिं चरिता गाइन हरिभक्त नामदेवाचें ॥ ॥ १ ॥

वसंततिलका.

श्रीशेषशायि हरि जो पय-सिंधुवासी ॥
पाचारुनी कथितसे शुक-उद्धवांसी ॥
जाऊनि भूतलिं तुह्मी अवतीर्ण व्हावें ॥
लावूनि अज्ञ जन सत्पथिं उद्धरावे ॥ २ ॥

मालिनी.

परिसुनि ह्मणती ते, हे प्रभो श्रीनिवासा ॥
न करुं गमन आह्मी भूतलीं गर्भवासा ॥
सहन न करवे तें गर्भिंचें दुःख आह्मा ॥
ह्मणुनि न कवण्याही घालणें योनिजन्मा ॥ ३ ॥

इंद्रवज्रा.

हांसूनि नारायण त्यां वदे तो ॥ गर्भाविणें जन्म तुम्हांसि देतों ॥
जन्माल पोटीं तुह्मि शुक्तिकांच्या॥तेणें समाधान मनीं तयांच्या ४

कामदा.

एक टाकिला भींवरा-जला ॥ तो स्मरे सदा श्रीश विठ्ठला ॥
उद्धवांश तो पंढरीपुरीं ॥ दामशेटिच्या लाधला करीं ॥ ५ ॥

ओवी.

दामशेटी वैष्णवजन ॥ श्रीपांडुरंगा[illegible] [illegible] ॥
[illegible]नें ॥ ६ ॥

आर्या.

तत्कांता गोमाई होती साध्वी पतिव्रता सुशिला ॥
परि बहुकाल न तीच्या संतानप्राप्ति जाहली कुशिला ॥७ ॥
प्रार्थी विनयें पतितें, मागा जाऊनि पांडुरंगाला ॥
सुत एक, जगीं जेणें वदनीं पावे न पांडु रंगाला ॥ ८ ॥

वसंततिलका.

अज्ञान तूं असासि, बोलति दाम भक्त ॥
कां मानसा करिसि गे विषयांत रक्त ॥
आली जरा उभयदेहिं, पहा, विचारी ॥
देईल कोठुनि अतां सुत कैटभारी ॥ ९ ॥

भुजंगप्रयात.

कृमी भक्षिल्या जीर्ण झाल्या बिजासी ॥
वदे, पेरितां त्या फळें येति कैसीं ॥
जसें तैल झाल्यावरी दीपसूत्र ॥
वृथा सारितां, मागसी तेवि पुत्र ॥ १० ॥

अंजनीगीत.

कांता ह्मणे प्राणनाथा ॥ बुद्धिदोष मजला देतां ॥
परि अधिक ईशसत्ता ॥ नकळे कोणाही ॥ ११ ॥
तारियले उदकीं पाषाण ॥ गाई गोप होई आपण ॥
आह्मां देतां सुतसंतान ॥ विषम त्या कैचें ॥ १२ ॥

भुजंगप्रयात.

अतां जाउनी राउळीं विठ्ठलातें ॥
निवेदीन इच्छा तुझी मी तयातें ॥
असें बोलुनी मंदिरीं शीघ्र आला ॥
प्रणामा करी विठ्ठलाचे पदाला ॥ १३ ॥
ह्मणे, देवराया, निरोपासि ऐक ॥
तुला मागते भामिनी तोक एक ॥

कथूनी असें आत्मगेहासि आला ॥
स्मरूनी हरीपाद निद्रिस्थ झाला ॥ १४ ॥

साकी.

स्वप्नीं येउनि विठ्ठलमूर्ती बोले दामाजीतें ॥
होइल इच्छा पूर्ण तुझी मनिं करिते भामा जी ते ॥
॥ध्रु०॥ उदयिक स्नानासी ॥ जातां लाधसि तनयासी ॥१५॥

आर्या.

अवतार उद्धवाचा येइल तव गेहिं जाण दामाजी ॥
भरिल जगत् कीर्तीनें, करिल महाभक्ति तो सदा माजी ॥१६॥

साकी.

जागृत होतां स्वप्न निशीचें सांगे गोणाईतें ॥
परिसुनि झाला आनंद तिच्या मावेना हृदयातें ॥
॥ध्रु०॥ हर्षित होऊनी ॥ मानी धन्यत्व स्वमनीं ॥ १७ ॥

मालिनी.

मग दिनिं दुसऱ्या ते दामशेटी प्रभातीं ॥
उठुनि तटिं भिमेच्या मज्जनासाठिं येती ॥
दुरुनि उदकिं येतां देखिली शुक्तिका ती ॥
उकलुनि निज हातीं तत्क्षणीं ते पहाती ॥ १८ ॥

इंद्रवज्रा.

तों देखिलें बाल तयांत तानें ॥ सानंद चित्तें स्वगृहांत त्यानें ॥
आणूनि दीलें ललनाकरातें ॥ चित्तीं स्मरूनी करुणाकरातें ॥१९॥

श्रीपांडुरंगें दिधलें तुला हें॥ स्वप्नप्रतीती अजि आलि, पाहे ॥
आतां करी रक्षण बालकातें ॥ त्या आठवूनी जगचालकातें ॥२०॥

नामा असें नाम तयास देती ॥ गोणाइ त्यातें स्तनपान दे ती ॥
पावे जसा शुक्लमृंगाक वृद्धी ॥ तें पाहुनी त्या सुख होय वृद्धी ॥२१॥

दिंडी.

दामशेटी एकदा गांविं जाई ॥ तदा नाम्यातें वदलि त्याचि आई ॥
जाउनीया मंदिरीं विठ्ठलातें॥दावि नैवेद्या आजि तुझ्या हातें ॥२२॥

इंद्रवज्रा.

नैवेद्य घेऊनि करांत नामा ॥ चित्तीं स्मरूनी हरिच्या सुनामा ॥
आला त्वरेनें मग राउळासी ॥पुष्पादिकें पूजित विठ्ठलासी ॥२३॥

दिंडी.

ह्मणे, नैवेद्या शीघ्र पांडुरंगा ॥ करी भक्षण संसारतापभंगा ॥
हटा गेलासे आजि दामशेटी ॥ ह्मणुनि आलों मी जाण विश्वजेटी ॥

कामदा.

हस्त जोडुनी तो उभा पुढें ॥ राहुनी ह्मणे काय साकडें ॥
उद्भवे मनीं सांग तें हरी ॥ भीति अंतरीं स्वल्प ना धरी ॥२५॥

शुद्धकामदा.

उशिर जाहला जावया गृहा ॥ शिणविसी किती, सोडि आग्रहा ॥
करिल माय कीं रोष यावरी ॥ वससि तूं सुखें देउळांतरीं ॥२६॥

कामदा.

लागली क्षुधा जाणुनी तुला ॥ शीघ्र पातलों जाण विठ्ठला ॥
राहिलों उभा नाहिं मी पथीं ॥ आण तूझि रे रुक्मिणीपती ॥२७॥
भूक लागली जेवि बा तुला ॥ लागली तसी जाणही मला ॥
सोसशील तूं थोरला, परी ॥ मी लहान रे, ना बरोबरी ॥२८॥
जेविल्याविणें मी न जेविन ॥ जाण तूं मनीं सत्य ही खुण ॥
लावुं तूं नको धीर केशवा ॥ भक्त हा नसे जाण कीं नवा ॥ २९ ॥

भुजंगप्रयात.

रडे आणुनी लोचनीं प्रेमपाणी ॥
करूनी कृपा जेविं गा चक्रपाणी ॥
जरी भक्षिसी नाचि हें आजि अन्न ॥
शरीरांतुनी प्राण होतील भिन्न ॥ ३० ॥

आर्या.

दृढतर निश्चय त्याचा पाहुनि अंतरिं रमेश कळवळला ॥
नैवेद्यभक्षणातें प्रभुचित्ताचा अशेष कल वळला ॥ ३१ ॥

वसंततिलका.

पाषाणसंहनन ओदन केवि जेवी ॥
नामा स्वकीय मनिं हा न विकल्प ठेवी ॥
निर्जीव वा सजिव वैष्णवमानसातें ॥
हा भेद ना कधिंहि, सर्व समान त्यातें ॥ ३२ ॥

साकी.

उठुनी तेव्हां प्रेमें विठ्ठल नाम्यातें आलिंगी ॥
कुरवाळी निजहस्तें, जेवी माता तनयालागी ॥
॥ध्रु०॥ करुणाकर विठ्ठल ॥ पुरवी भक्ताचे लडिवाळ ॥३३॥

दिंडी.

धरुनि हट्टातें ह्मणासि नामदेवा ॥ आणिला हा नैवेद्य मला जेवा ॥
परी कलियुगिं होऊनि उपलमूर्ती॥राहिलों मी जाण कीं स्तब्धवृत्ती

भुजंगप्रयात.

तुझी व्हावया कामना पूर्ण आतां ॥
स्वयें जेवितों, सांग कोणा न वार्ता ॥
असें बोलुनी सर्व नैवेद्य खाई ॥
महानंदि नामा स्वचित्तांत होई ॥ ३५ ॥

मालिनी.

नमुनि हरिपदातें पातला गेहिं नामा ॥
अवधि किति ह्मणे तैं माय या अल्प कामा ॥
करिसि, ह्मणुनि दावी अंतरीं रोष फार ॥
मजसि नाचि तुझा हा आवडे रे विचार ॥ ३६ ॥

इंद्रवज्रा.

नैवेद्य पात्रांतिल काय झाला ॥ नामा ह्मणे, श्रीहरि जेवियेला ॥
गोणाइ आश्चर्य मनीं करी ती॥मिथ्या वदावें असि तोकरीती॥३७॥

दिंडी.

गृहीं येतां स्वपतीस वर्तमान ॥ निवेदी ती भामिनी रोषमान ॥
ह्मणे, मिथ्या बोलतो पोर फार ॥ करा याचा सत्वरी सद्विचार ॥

कामदा.

केवि जेविला रुक्मिणीपती ॥ चाल दाखवी आपणाप्रती ॥
पूजनाऽयती घेउनी करीं ॥ जाय दामजी श्रीशमंदिरीं ॥ ३९ ॥

साकी.

पूजुनि भावें यथाविधीनें नामा विनवी देवा ॥
काल जसे तुह्मि जेवियलां कीं, तैसे आजहि जेवा ॥
॥ ध्रु० ॥ अवधी नाचि बरवी ॥ तातविकल्पातें हरवी ॥४०॥

आर्या.

नामा ह्मणे, कपटि तूं अससी, देवा, मला न हें ठावें ॥
आहे तुझ्या मनीं कां, ताता मद्वच असत्य वाटावें ॥ ४१ ॥
परि मी स्वमुखें, देवा, वदलों ना अनृत वर्ण ही एक ॥
कांहीं तरि वदुनि अतां फसविसि जाणूनि काय मज तोक ॥

इंद्रवज्रा.

हांसे तदा पंढरिनाथ चित्तीं ॥ भक्तार्थ दावी इतरां प्रचीती ॥
घेऊनि नैवेद्य करांत जेवी ॥ अत्यंत हर्षोनि क्षुधार्त जेवी ॥ ४३ ॥
पाषाणमूर्ती करिं जेवियेली ॥ दामाजिनें लोचनिं देखियेली ॥
आनंद झाला उभयां महान ॥ तद्वर्णना कृष्ण समर्थ हा न ॥४४॥

प्रकरण ४४ वें.

साधु संतबा पवार.

आर्या.

वंदुनि मंगलदायक पदपद्मा अंबिकाकुमाराच्या ॥
गाइन साधुचरित्रा सप्रेमें संतबा पवाराच्या ॥ १ ॥

शार्दूलविक्रीडित.

राहे रांजणगांविं एक कुणबी श्रीमान गेहाश्रमी ॥
संतोबा अभिधानिं तो शुचि मनीं होता महा विक्रमी ॥
दारापुत्रसुतान्वितानुकुलता सत्ताहि होती करीं ॥
चित्तीं लीनपणा परी दिननिशीं तो वागवी अंतरीं ॥२॥

स्वागता.

एकदा परिसुनी तुकयाच्या ॥ कीर्तनासि अनुताप तयाच्या ॥
जाहला मनिं महा, मग देहीं ॥ श्रेष्ठ साधुसम होय विदेही ॥ ३ ॥

वसंततिलका.

पाचारुनी सकलही निजसेवकांतें ॥
हातें निरोप धन देउनि दे तयांतें ॥
संपत्तिही अमित अर्पुनि तो द्विजांला ॥
संसारबंधन-उपाधिविमुक्त झाला ॥ ४ ॥

स्वागता.

नेसुनी वसन जीर्ण कटाला ॥ भीवरा तटिनिच्या सुतटाला ॥
जाउनी विपिनिं तो करि वास ॥ ध्यात मानसिं पयोऽब्धिनिवास ॥
पंजरांतुनि सुटे शुक जेवी ॥ संतबा त्यजिति संसृति तेवी ॥
फोडि भृंग कमला अनुतापें ॥ जीर्ण कात जणु टाकिलि सापें ॥ ६ ॥

भुजंगप्रयात.

समाचार तो ऐकुनी ग्रामपौर ॥ मनीं मानिती तेधवा चोज थोर ॥
तयाची प्रसू दुःख कूपारि वाहे॥ह्मणे, काय केलें अरे माधवा हें ॥७॥

इंद्रवज्रा.

हा पुत्र संपत्ति लुटूनि हातें ॥ झाला विदेही, करुं काय यातें ॥
आतां अहा हांसति सर्व लोक ॥ झाले मला शून्यचि सर्व लोक॥८॥

आर्या.

आणावा संसारीं स्त्रीलोभें मोहुनी स्वसुत परता ॥
योजी युक्ति अशी, परि काय करिल मोहपाश सुतप-रता ॥९॥

नेणूनि हें स्नुषेतें श्रृंगारुनि संतबाकडे धाडी ॥
कीं तद्वैराग्या ही नाशो, जासि कृषि-पिका शलभ-धाडी ॥१०॥

साकी.

सरिताकांठीं बेटावरतीं पवार बसले होते ॥
शिबिकायानीं बसुनी गेली सुंदरि ती तेथें ॥
॥ ध्रु०॥ पाहुनि तद्वृत्ती ॥ विस्मित झाली निज चित्तीं ॥११॥

इंद्रवज्रा.

राहे उभी ती कर जोडुनीया ॥ संताजि बोले तिस पाहुनीया ॥
आलीस कां, जा परती गृहास ॥ संभाषणाच्या धरि नाग्रहास ॥

ओवी.

कांता बोले ते अवसरीं ॥ मी न तुह्मांपासुनी दूरी ॥
राहीन एक क्षणभरी ॥ जलाविण मीन जैसा ॥ १३ ॥

वसंततिलका.

राहे न कांचनरुची त्यजुनी तयाला ॥
राहील का त्यजुनि पादप आत्ममूला ॥
भर्त्याविणें गति दुजी न पतिव्रतेला ॥
संतां मनीं न मिळतें स्थल तीव्रतेला ॥ १४ ॥

इंद्रवज्रा.

राहीन मी आपण जेथ तेथें ॥ वर्तेन तेवी तुमच्याचि पंथें ॥
आह्मी उदासीन वसों सदाही ॥ साहे तुला न स्थिति दुःखदा ही ॥

मालिनी.

जरि तव मनिं वाटे मत्समीपीं वसावें ॥
सकल नग अर्धी त्वां याचकांलागि द्यावे ॥
न विहिताचि गमे हें तूझिया मानसास ॥
तरि गमन करावें मागुती गे गृहास ॥ १६ ॥
परिसुनि पतिवाणी याचकां बाहुनीया ॥
सकल नग तयांतें अर्पिले काढनीया ॥

त्यजुनि रुचिर वस्त्रें नेसली जीर्ण वास ॥
स्व उपपट चिरूनी देइ तो अर्ध तीस ॥ १७ ॥

भुजंगप्रयात.

धरूनी मनीं ते उदासीन वृत्ती॥ हरीनाम चित्तीं सदा ध्याति गाती॥
क्षुधा लागतां प्राण व्याकूळ झाले ॥ तदा संतबा काय कांतेस बोले ॥

साकी.

क्षुधातृषा ही बहु दुर्धर गे, तेणें सर्वां जितलें ॥
तैसाची वनवास विषम, हें होतें पहिलें कथिलें ॥
॥ध्रु०॥ अतां न दुःख करी ॥ वर्ते साधुपथाचारीं ॥१९॥

आर्या.

भिक्षार्थ पारगांवीं जावें, जाये, नदीपलीकडल्या ॥
निःशंक मनें, न कधीं वचकावें इष्टसोयिऱ्यां वडिलां ॥ २०॥

लावुनि ममता जन जे बोलति, बोले न तूं तयां संगें ॥
देतां भाकर सगळी न स्वीकारी, असें तिला सांगे ॥२१॥

आज्ञा प्रमाण ह्मणुनी सत्वर त्या ग्रामिं ती प्रवेश करी ॥
गर्जत विठ्ठलनामें भिक्षेचें पात्र घेउनी स्वकरीं ॥ २२ ॥

स्वागता.

हिंडतां नगरिंच्या सदनांत ॥ पाहुनी स्थिति तिची वदनांत ॥
घालिती जन करांगुलि तेव्हां ॥ बोलती, उपरती असि केव्हां ॥
पातली अजिरिं ती नणदेच्या ॥ जाय तन्निनद कानिं तियेच्या॥
जाणुनी वहिनिचा रव चित्तीं ॥ धावुनी सभय बाहिर ये ती ॥२४॥

साकी.

मारुनि मोहें कंठीं मिठितें आणुनि नयनीं पाणी ॥
ह्मणे, अहाहा काय स्थिती ही, सांगा मातें, वहिनी ॥
॥ ध्रु० ॥ न वदे परि कांहीं ॥ भिक्षा घाल ह्मणे माई ॥२५॥

पुनरपि मोहें म्हणे वहिनितें टाकुनि मौल्याभरणें ॥
जीर्ण पटातें ल्यालिस कां गे, सांगे सुंदरि सुमनें ॥
॥ ध्रु० ॥ दिससी वैरागी ॥ कां क्लेशातें या भोगी ॥ २६ ॥
कांहीं उत्तर परी न दे ती, गृहिं मग सत्वर गेली ॥
आणुनि रोट्या दोन तियेच्या घृतयुत झोळिंत घाली ॥
॥ ध्रु० ॥ आग्रह बहु करुनी ॥ स्वीकाराचि म्हणे वहिनी ॥२७॥

स्वागता.

ती ह्मणे, बघुनि हें बहु अन्न ॥ निश्चयेंचि पति होतिल खिन्न ॥
घालतील तुकडे तरि घ्यावे ॥ नातरी त्यजुनि तें गृह जावें ॥२८॥

आर्या.

आज्ञा असी मला हो आहे पतिची, यदर्थ हें परतें ॥
घ्यावें, ह्मणे तदा, तें परिसुनि फारचि नणंद गहिवरते॥२९॥

दिंडी.

दिलें मायेनें खचित बये जाणे ॥ आश्रमासी लौकरी अतां जाणें ॥
करा भोजन हें, अवधि फार होते ॥ आत्मकंठाची आण घालि तीतें ॥

मालिनी.

परिसुनि वहिनीची पूर्ण सप्रेम वाणी ॥
द्रुत निज उटजातें ये सुवैराग्य-खाणी ॥
मिलितकर ह्मणे ती, आणिली अन्नभिक्षा ॥
नमुनि निजपतीच्या पादपद्मासि, भक्षा ॥ ३१ ॥
उघडुनि जंव पाहे अन्न झोळींत हो तें ॥
दिसति, न तुकडे, तैं दोन पोळ्या तयातें ॥
घृतयुत दिसती त्या, पाहुनी काय बोले ॥
सुमधुर रुचिरान्ना कासया आणियेलें ॥ ३२ ॥

साकी.

साध्वी तेव्हां जोडुनि पाणी वार्ता सकलहि सांगे ॥
दिधलें तुमच्या भगिनीनें हें घालुनि आणचि आंगें ॥
॥ ध्रु० ॥ आग्रह थोर करी ॥ बांधी स्वकरें ती पदरीं ॥ ३३ ॥

वसंततिलका.

तेव्हां ह्मणे, परत जाउनि शीघ्र गेहीं ॥
मिष्टान्न मागुति तिचें तिजसीच देई ॥
हें मान्य तूं न करिसी जरि मोहपाशीं ॥
ना भक्षितां खचित राहिन मी उपाशी ॥ ३४ ॥

इंद्रवज्रा.

ऐकूनि वाणी सुदृढा पतीची ॥ त्या मान्य झाली शुचि बुद्धि तीची ॥
घेऊनि अन्ना परतोनि मागें ॥ जाऊनि वार्ता नणदेसी सांगे ॥३५॥

आर्या.

प्रेमानें वाइ तुह्मी दिधलें जें भोजनास ओदन तें ॥
घृतयुक्त बहु स्वादू, ह्मणुनी दे पतिमनास मोद न तें ॥३६॥
यास्तव अपुल्या सदनीं घ्या ठेवुनि हें, अह्मां नको, परत ॥
ऐसें ह्मणुनी प्रार्थुनि वदली नणदेस, ‘ व्हा न कोपरत ’ ॥३७॥

स्वागता.

अर्पितान्न गृहिं ठेवुनि तीच्या ॥ पातली द्रुत तटीं भिवरेच्या ॥
जाय तों तपन अस्तगिरीला॥ यामिनी निबिड दावि तमाला॥३८॥
वाहे सवृष्टी अनिल प्रचंड ॥ आलें नदीला जलही उदंड ॥
नाहीं पतीसंनिध मार्ग जाया ॥ झाली स्वचित्तीं बहु दुःखि जाया ॥

अंजनीगीत.

असती कांत उपोषित ॥ जाया नाहीं मजसी पंथ ॥
कैसें कळे त्यां हें वृत्त ॥ काय मी करूं ॥ ४० ॥
धांव धांव पांडुरंगा ॥ जाणसि भक्त–अंतरंगा ॥
तुझियाविणें या प्रसंगा ॥ कोणातें बाहूं ॥ ४१ ॥
द्रौपदीचें करुणावचन ॥ ऐकुनि येसी सत्वर धांवुन ॥
संकटिं असतां मी महान ॥ अवधी कां करिसी ॥४२॥

आर्या.

परिसुनि करुणावाणी पंढरिपति पांडुरंग कळवळला ॥
जावें साह्यार्थ तिच्या, ऐसा प्रभु-अंतरंग-कल वळला॥ ४३ ॥

मालिनी.

धरुनि जरठरूपा घेउनी हस्तिं काठी ॥
त्वरित निकट येई ह्लादिनी-ओघ-कांठीं ॥
तिजसि मग पुसे तो, बैससी येथ कां गे ॥
रजनिसमय झाला, काय वृत्तांत, सांगे ॥ ४४ ॥

मम पति उपवासी भीवरा पैल कांठीं ॥
गमन मज कराया होय ही आडकाठी ॥
भ्रमुनि नगरिं, वृद्धा, आणिली अन्नभिक्षा ॥
उशिर बहु जहाला, मीळती ते न भक्षा ॥ ४५ ॥

आर्या.

पतिसेवा अंतरतां बहु पाप पडे पतिव्रता-पदरीं ॥
आहें पतिव्रता मी, ढकलीतें दैव तीव्रतापदरीं ॥ ४६ ॥
वृद्ध ह्मणे, जाणें मज आतांचि असे नदीस उतरून ॥
मद्भगिनी तूं, तरि ये, मत्स्कंधीं करिन पार बसवून ॥४७॥
स्कंधीं घेउनि तीतें जलशायी मग जलांत शिरला हो ॥
किति भाग्य तिचें,यत्पद सुरहि ह्मणति वंदना स्वशिर लाहो ॥
ती मनिं ह्मणे, जरठ हा कैसा लंघील या महापूरा ॥
परि जंघाहि न भिजतां चाले, तयिं मानि, हा महा पूरा ॥४९॥
वाटे दुजें तिस असें कीं, सहज तरेल हा महांबुनिधी ॥
हा भवतारक, हें तिज काय विदित, मानि ज्यास शंभु निधी ॥

भुजंगप्रयात.

नदी पैल तीरासि नेऊनि तीतें॥ह्मणे जा अतां भेट साध्वी पतीतें॥
करें भोजना ओदना दे वरा या ॥ अदृश्य स्वरूपा धरी देवराया ॥

मालिनी.

नमुनि पतिसि ठेवि अन्न तें अग्रभागा ॥
तिजसि पति पुसे तैं, वारिनें चंद्रभागा ॥
भरिलि दुहि थडीनें, येसि कैसी, वदावें ॥
कथिलि सकल वार्ता साध्विनें शुद्धभावें ॥ ५२ ॥

भुजंगप्रयात.

ह्मणे, पांडुरंगें तुला दर्शनाला ॥ दिलें, जाण गे निश्चयें तूं मनाला ॥
महापापि मी, लाभ तो या न देहा ॥ यदर्थी कदा ओदनासी न घे हा ॥
दिलें दर्शना, एवढेंची न केलें ॥ तुझ्या स्कंधि भाराप्रती वाहियेलें ॥
नदीपूरिं आंधारिं होई उतारू ॥ मला तारण्याला परी कां न तारूं ॥

इंद्रवज्रा.

आतां मला दर्शन होय जेव्हां ॥ मी निश्चयें घेइन अन्न तेव्हां ॥
आला जरी मृत्यु मदीय देहीं ॥ राहीन अन्नाविण मी विदेही ॥ ५५ ॥

साकी.

ऐसा दृढतर करुनी निश्चय राहे तो उपवासी ॥
येउनि करुणा करुणानिधि कथि येउनि पार–पुरासी ॥
॥ ध्रु० ॥ स्वप्नीं वणिकातें ॥ घाली जेवुं पवारातें ॥ ५६ ॥
जागृत होउनि वणिक तदा तो करवुनि मिष्टान्नाला ॥
घेउनि हातीं सत्वर गतिनें आला त्या विपिनाला ॥
॥ ध्रु० ॥ स्वप्नीं मज कथिलें ॥ सेवन करणें हें पहिलें ॥ ५७ ॥

वसंततिलका.

ऐकोनि तें वचन सज्जन काय बोले ॥
साक्षात् दिलें तुजसि दर्शन विश्वपालें ॥
आहे तुझ्या पदरिं पुण्य महा खचीत ॥
नाहीं तसा पतित दर्शनिं हा उचीत ॥ ५८ ॥

इंद्रवज्रा.

पावेन जेव्हां प्रभुदर्शनाला ॥ घेईन तेव्हां मुखिं ओदनाला ॥
आतां तुह्मी आग्रह ना करा हो ॥ जावें गृहीं, निश्चय हा खरा हो ॥

आर्या.

दृढ निश्चयें उपाशी राहुनि करि सर्वकाल हरिभजना ॥
भक्तिप्रिय हरि भक्तां स्वात्माधिक मानि अंतरीं स्वजनां ॥६०॥
धावुनि पंढरिनाथें देउनि दर्शन पवार उद्धरिला ॥
पूर्ण करो हरि, कृष्णें संतकथागानिं हेतु जो धरिला ॥ ६१ ॥

प्रकरण ४५ वें.

श्रीहनुमानजन्म

आर्या.

वंदुनि विनायकातें गाऊं पवमानतोकजन्मकथा ॥
गाती वाल्मीक्यादिक मुनिवर ज्या, तेवि संत-सन्माला ॥१॥
सुतकामेष्टि दशरथें करितां दिधला प्रसाद अग्नीनें ॥
तैं भाग कैकयीचा वेगें झडपूनि घारि गगनीं ने ॥ २ ॥

साकी.

सुनोजि कायकु पंछी घारी पिंडा लेगइ बदनें ॥
सुरलोकनकी कंचनि, उसकू शाप दिया विधिनें ॥
॥ ध्रु० ॥ नरतनिं भूल गई ॥ शापा इह बाते पायी ॥ ३ ॥

इंद्रवज्रा.

कंजोद्भवाचे पद वंदुनीया ॥ उःशाप मागे कर जोडुनीया ॥
तूं कैकयीच्या हारितांचि पिंडा ॥ बोले विधी लाधसि पूर्वपिंडा ॥४॥

आर्या.

त्या घारि-चंचुमधुनी पिंड समीरें क्षणांत उडवीला ॥
तो ऋष्यमूकपर्वतिं अंजनिच्या अंजलींत टाकियला ॥ ५ ॥

अंजनि केसरिभार्या बहु उग्र तपें शिवासि आराधी ॥
ती सप्तसहस्राब्दें उपवासी नाचि करूनि अपरा धी ॥ ६ ॥

साकी.

पाहुनि तीच्या उग्र तपातें प्रसन्न शंकर झाला ॥
जाउनि तीच्या समीप बोले, मागे इच्छित तुजला ॥
॥ ध्रु० ॥ ऐसें परिसूनी ॥ पाहे लोचन उघडूनी ॥ ७ ॥

ओवी.

ती आराध्य मूर्ति विलोकून ॥ बहु तोषित झालें तन्मन ॥
शिवचरणीं शिर ठेवून ॥ ऐसें वरदान मागे ती ॥ ८ ॥

इंद्रवज्रा.

व्हावा मला पुत्र तुझ्यासमान ॥ त्रैलोक्य देईल जयास मान ॥
तो वज्रदेही चिरजीव वीर ॥ श्रीरामभक्तिप्रिय तेवि धीर ॥ ९ ॥

साकी.

तूझ्या उदरीं अकरावा तो रुद्रचि गे अवतरुनी ॥
पुरविल इच्छा, ऐसें कथुनी होती अंतर्धानी ॥
॥ ध्रु० ॥ अर्पिल पिंड अनिल ॥ भक्षी तूं तो तत्काल ॥ १० ॥

ओवी.

मग अंजनी अंजुली पसरूनी ॥ ध्यानस्थ बैसली नेत्र झांकुनी ॥
कैकयीविभाग पवनें आणूनी ॥ हस्तीं तियेच्या अर्पिला ॥ ११ ॥

आर्या.

पायसकवल करिं तिच्या पडतां तत्काल भक्षि भक्तीनें ॥
तो दिन आजि, मनिं ह्मणे, दिधला मज वर शिवें वरोक्तीनें ॥

इंद्रवज्रा.

होतां तियेतें नवमास पूर्ण ॥ झाला जसा नंदन चंडकीर्ण ॥
कौपीन मौंजी कटिदेशिं साजे ॥ कंठांत यज्ञोपविती विराजे ॥ १२ ॥

कामदा.

पाहुनी सुता अंजनीमनीं ॥ हर्ष होय, तो ये न वर्णनीं ॥
लागली क्षुधा बालकाप्रती ॥ जाय काननीं तैं फलार्थ ती ॥ १४ ॥

इंद्रवज्रा.

बालार्क आकाशिं सुरक्तरंगी ॥ पाहूनि वातात्मज अंतरंगीं ॥
हें भक्षणाचें फल मानुनीया ॥ उड्डाण वेगें करि धावुनीया ॥१५॥

आर्या.

घे जेवि अंतरिक्षीं उड्डाणावरि सुपर्ण उड्डाणें ॥
तैसा उडे, मनिं म्हणे, चाखिन या फलरुचीस तुंडानें ॥१६॥

ओवी.

गगनीं उडाला सुत पाहून ॥ जाइल तपनतापें आहळून ॥
ऐसें निजमानसीं जाणून ॥ धांवे पवन धरूं त्यातें ॥ १७ ॥
होतें रविग्रहण त्या दिनीं ॥ ये राहु रविग्रासालागूनी ॥
तयासी मध्यंतरीं देखूनी ॥ चपेट हाणी हनुमंत ॥ १८ ॥

साकी.

तेणें घबरा होके राहू भागा अमरापुरिमे ॥
जोरकर हाथ खडा हुवा तो वासवके संसदिमे ॥
॥ ध्रु० ॥ कहता रोरोके ॥ मारा बानरके लरके ॥ १९ ॥

इंद्रवज्रा.

ऐकोनि सक्रोध सुरेंद्र झाला ॥ ऐसा ह्मणे वानर कोण आला ॥
ऐरावता प्रेरि धरावयासी ॥ मुष्टिप्रहरा कपि दे तयासी ॥२०॥

आर्या.

होऊनि विमुख दंती धावे परता, हरिध्वनिश्रवणीं ॥
हरिण जसा भीत मनें, आलें तें वृत्त वासवाश्रवणीं ॥ २१ ॥

पृथ्वी.

सुरेंद्र मग धावला सहचमू धराया हरी ॥
बसूनि बहु संभ्रमें निज महामतंगावरी ॥
तदा रण करी अधीं शमन तो कपीच्या सवें ॥
तया नयानिं आणिलीं कपिवरें रणीं आसवें ॥ २२ ॥

इंद्रवज्रा.

पुच्छें यमा पाडुनि भूमिपृष्ठीं ॥ मारी तयाच्या हृदयांत मुष्टी ॥
घे हातिंचा दंड हिरोनि वेगें ॥ भयार्त चित्तें यम पायिं लागे ॥२३॥

ओवी.

कृतांत ह्मणे, मी तुजला शरण ॥ तैसेंचि ह्मणती कुबेर वरुण ॥
तें अमरनाथ विलोकून ॥ गर्जी आरूढून धावला ॥ २४ ॥

स्वागता.

दंतिपुच्छ धरुनी स्वकरांनीं ॥ वासवासह वळें फिरवूनी ॥
आपटी महिवरी हनुमंत ॥ देखुनि सुरचमू भयभीत ॥ २५ ॥

इंद्रवज्रा.

श्रेष्ठावसानें मग वासवानें ॥ प्रेरीयलें वज्र महा जवानें ॥
तें लागलें त्या हनुमंत-ओष्ठीं ॥ तेणें पडे मूर्च्छित भूमिपृष्ठीं ॥२६॥

आर्या.

झाला मूर्च्छित नंदन, अवलोकुनि वायु आत्मतोक करीं ॥
उचलुनि, घेउनि अंकीं, कुरवाळुनि तन्मुखेंदु, शोक करी ॥२७॥

साकी.

क्रोधें तेव्हां स्वमनिं ह्मणे तो, अटविन सकला जगता ॥
होतां विश्वप्राणाकर्षण पडली जगता चिंता ॥
॥ध्रु०॥ विबुध कर जोडून ॥ करिती वायूचें स्तवन ॥२८॥

दिंडी.

लोकजीवेशा ह्मणति अमर तेव्हां ॥
पुत्रमोहें वधिसि कां सकल जीवां ॥
उठवुं आह्मी तूझिया अतां तोका ॥
करुनि अनुकंपा रक्षि सकल लोका ॥ २९ ॥

ओव्या.

मग विधिद्विषादि सुरवर ॥ देती वातात्मजासी वर ॥
वज्रदेही चिरायु बाळ थोर ॥ होउनि भूभार हरिल हा ॥३०॥

शक्रवज्र ओष्ठीं झगटलें ॥ ह्मणूनि हनुमंतनाम दिधलें ॥
समीरें आनंदें कडिये घेतलें ॥ आणुनि दिलें बाल अंजनीला ॥
करिती सकलहि जयजयकार ॥ वृंदारक वर्षति सुमनभार ॥
ती कथा बालभाषणीं कृष्ण किंकर॥ गाइ नमस्कर करुनि तया॥

हनुमान पाळणा.

जो जो जो जो रे हनुमंता, अंजनीच्या सुता, रक्षिसि पादनता, निजभक्ता, नाशुनि भवभयचिंता ॥ ध्रु० ॥ भूतालिं अवतरतां, फल सविता, मानुनि अंबरपंथा, उडसी पाहूनी, भीत मनीं, झाला तीव्रहि तरणी ॥१॥ रघुपति रामाचा परम सखा, होउनि जाळिसि लंका, सीताशुद्धीतें आणून, वधविसि खल रावण ॥२॥ अहिमहि असुरांतें, मर्दूनी, राघव राज्यासनीं, बैसविसी तूं वीरमणी, वंदी कृष्ण चरणीं ॥ ३ ॥ जो जो ॥ ॥ ३३ ॥

हनुमान आरती.

(चाल—आरती ज्ञानराजा०)

आरती हनुमाना, मरुताच्या नंदना ॥ राघवभक्त होसी, राक्षसकुलविध्वंसी ॥ध्रु०॥ उडुनी जलनिधी, केलि जानकिची शुद्धि ॥ जाळिली लंकापूरी, सेतु बांधिला सागरीं ॥१॥ सौमित्र शक्तिघातें, पडियला रणातें ॥ आणुनि द्रोणाचल, उठविसि तात्काल ॥२॥ रावणकुंभकर्ण, सहनंदन मर्दून ॥ आणुनि सीतामाता, तोषविलें रघुनाथा ॥३॥ बिभीषण लंकापती, करुनिया रामहातीं ॥ केला तो चिरजीवी, थोरी किति तव गावी ॥४॥ आणुनि रघुपति, सेनेसह साकेतीं॥ स्थापिला राज्यासनीं, नमि कृष्ण तच्चरणीं ॥ ५ ॥ ॥ ३४ ॥

प्रकरण ४६ वें.

सीताजन्मकथा.

आर्या.

श्रीसीताजन्मकथा गाइन वंदूनि विश्वजनकातें ॥
असुनीहि आदिमाया तात ह्मणे जी नृपाल जनकातें ॥१॥
तद्वृत्त गाधिजानें जातां तीच्या स्वयंवरा मिथिले- ॥
पंथीं निजाननानें दिनमणिकुलदीप राघवा कथिलें ॥ २ ॥
वर्णीन बालभाषणिं भावें मी मूढ परि यथामति तें ॥
मन्मूडत्व जरि ह्मणे, योग्य न मन्मति, यदर्थ 'थांब' तितें॥३॥
परि थांबतां न पुढती निज मनिंच्या हेतुलाचि अनुसरतों ॥
देतील दोष कविजन, या भीतीनें न मागुता सरतों ॥ ४ ॥
पद्माक्षनाम भूपति होता विख्यात पूर्वि भूमिवर ॥
तेणें प्रसन्न कमला करुनी मागीतला तपें सुवर ॥ ५ ॥
होउनि तूं मम कन्या खेळावें माझिया तुवां अंकीं ॥
परिसुनि पद्माक्षवचा झाली ती मानसांत साशंकी ॥ ६ ॥

पद.

अनुचित करितां वांच्छा ॥ होइल ती फलदा कैसी ॥ध्रु०॥
परिसुनि भूपतिवाक्या ॥ देवी तैं बोले वचन ॥
राया, तूं बहु अविचारें ॥ मागसि हें वरदान ॥
येतां तव सदनीं जाण ॥ होइल तव नाशचि पूर्ण ॥
चाल ॥ योग्यायोग्य न बघती ॥ ते संकटकूपीं पडती ॥
करणें सुविचारा चित्तीं ॥ दुर्मतितें कां मनिं वरिसी ॥ १ ॥
भूप ह्मणे, देवी माते ॥ मान्य करी मम वचनातें ॥
होय हानि जरि देहातें ॥ त्यापरि या राज्यपदातें ॥

अथवा निजकुलवंशातें ॥ मानीं मी नचि खेदातें ॥
चाल ॥ स्वीकारिन आनंदांनीं ॥ व्हावें तूं दुहिता सदनीं ॥
हा निश्चय दृढ मम मानी ॥ पुरविणें कोड हें तुजसी ॥ २ ॥
दृढ निश्चय त्याचा जाणून ॥ बोले श्री त्याप्रति वचन ॥
आहें मी श्रीहरि अधिन ॥ प्रार्थीं त्या जाउनि शरण ॥
हरि आज्ञा मजसी मान्य ॥ दासी मी त्याची जाण ॥
चाल ॥ आज्ञा मज हरिची होतां ॥ होइन मी तव गृहिं दुहिता ॥
पुरवणेंचि मग तव हेता ॥ तत्प्रीत्यर्थ साधि तपासी ॥३॥ ॥७॥

इंद्रवज्रा.

जाऊनि पद्माक्ष महावनासी ॥ भावें करूनी तप-हावनासी ॥
संतुष्ट केलें कमलापतीतें ॥ मागे वरा, दे दुहिता रमा ते ॥ ८ ॥

दिंडी.

हसें आलें परिसुनी देवराया ॥ काय ऐशा तूं मागसी वरा या ॥
नाडियेलें संपूर्ण विश्व ईणें ॥ करिल तुझिया नाशासि सत्य जाणे ९

आर्या.

पद्माक्ष ह्मणे, देवा, मन्मनिंचा हेतु हा करी पुरता ॥
साहीन सकल दुःखां, कृत निश्चय मी परी न घें परता १०

साकी.

मातुलिंग फल तदा हरीनें देउनि त्याच्या हातीं ॥
सकल मनोरथ पूर्ण तुझे ते, भूपा, येणें होती ॥
॥ध्रु०॥ ऐसें बोलोनी ॥ झाले गुप्त तया स्थानीं ॥११॥

पृथ्वी.

सहर्ष फल घेउनी नृपति ये त्वरें मंदिरा ॥
ह्मणे सुदृढ निश्चयें सदनिं आणिली इंदिरा ॥
जिवाधिकाचि त्या फला जतन तो सुयत्नें करी ॥
तयासि नवमास ते भरियल्या भवे सुंदरी ॥ १२ ॥

अंजनीगीत.

पाहुनि तीतें तो भूपती ॥ झाला हर्षित बहु चित्तीं ॥
दिवसेंदिवस वृद्धीमती ॥ पावे शशि जैसा ॥ १३ ॥
झाली पाहुनि उपवर ॥ मागूं येती सुरासुर ॥
महामुनी बहु नृपवर ॥ पद्माक्षीलागीं ॥ १४ ॥

मंदाक्रांता.

पद्माक्षातें सकल म्हणती, योजि कांहीं पणातें ॥
जिंकूनिया नवरि करुं ती निश्चयें आपणातें ॥
तेव्हां क्रोधें नरपति ह्मणे, वाणीं मेघासमानी ॥
देई त्यातें खचित नवरी, तात अन्या न मानी ॥१५॥

साकी.

भूपबचन तब कठोर सुनके भये सबहि नाराजी ॥
लडे हमसे यहि बखत वे ले आवे तेरे राजी ॥
॥ ध्रु० ॥ ऐसी बात बने ॥ भये तयारी तब लढणे ॥१६॥

इंद्रवज्रा.

पद्माक्ष सप्ताह करी रणासी ॥ शौर्यें, न लाधे परि तो यशासी ॥
छेदीयलें शीर्ष रणीं तयाचें ॥ लाधे फल श्री गृहिं आणिल्याचें १७

पद. (काय मला भूल.)

बघुनि तातहानि सुता खेद करि मनीं ॥
त्यागुनिया गेह जाय घोरतर वनीं ॥ ध्रु० ॥
मंदमंद गमन करी कमललोचना ॥
कुरळ केश शोभविती इंदु-आनना ॥
सिंह कटी पाहुनिया लाजतो मनीं ॥ १ ॥
दशानन त्याच समयिं जाय त्या वना ॥
देखुनि ती चारुगात्रि बालयौवना ॥
धावे तिस धरायास कामें व्यापुनी ॥ २ ॥

पद्माक्षी बघुनि त्यासि घाबरे मनीं ॥
पवनजवें दशग्रीव येत धावुनी ॥
टाकि उडी अग्निकुंडिं त्वरित जाउनी ॥३॥ ॥१८॥

इंद्रवज्रा.

अग्नींत गुप्ता अशि पाहुनीया ॥ कामानलानें बहु पीडुनीया ॥
कुंडांत हातें खणि तो प्रयत्नें ॥ तों लाधलीं त्या तयिं पंचरत्नें ॥१९॥

साकी.

ले हातोमे दशाननजि तब दौरे लंकापुरिमे ॥
बडे हरखसे रख दिया ती जोहर संदुक खनमे ॥
ध्रु० ॥ बात न कहे कवना ॥ विचारिं डारे दिल अपना ॥२०॥

इंद्रवज्रा.

एकांतिं मंदोदरि सुंदरीतें ॥ वार्ता वनींची कथि आदरीं ते ॥
संपादिलीं पांच महाप्रयत्नें॥पेटींत तीं पाहि अमूल्य रत्नें ॥२१॥

कामदा.

पेटि आणण्या जाय कामिनी ॥ स्वल्प नाढळे भूमिपासुनी ॥
रावणें स्वयें वीस हस्त ते॥ लाविले, परी ना हलेचि ते ॥२२॥
विस्मया बहू मानसीं करी ॥ खिन्न जाहला फार अंतरीं ॥
मंत्रिहस्तिं ती ऊघडी बळें ॥ रत्न कन्यका तींत देखिलें ॥२३॥

मंदाक्रांता.

षण्मासाची बघुनि तनया रावणा तोष झाला ॥
पाहूनी ते वदलि मयजा विघ्न भासे गृहाला ॥
श्रीमाया ही वरिल वर तो मेघसा श्यामकांती ॥
पद्माक्षादी माहितालिं हिनें मर्दिल्या भूपपंक्ती ॥ २४ ॥

अंजनीगीत.

राहिल जरि ही लंकापुरितें ॥ समूळ अपुला नाशचि करिते ॥
यास्तव धाडा बाहिर हीतें ॥ अवधि नको कांहीं ॥ २५ ॥

पाचारूनी सेवकजन ॥ संदुक दिधली शिरिं उचलून ॥
जातां शब्द करि आंतून ॥ बुध हो, परिसा तो ॥ २६ ॥
पुनरपि येइन लंकापुरितें ॥ वधिन रावणा सहपुत्रातें ॥
परिसुनि ऐशा त्या वाणीतें ॥ दचके दशवदन ॥ २७ ॥

ओवी.

रावण बोले क्रोधें वचन ॥ आतांचि हिचा वध करीन ॥
धावूनि मयजा धरी चरण ॥ पुढिल विघ्न आजि कां ॥ २८ ॥

दोहरा.

कहे दशमुख सेवककु, लिजावा इसकु दूर ॥
गाडो जांहा जनककी नगरी जो मिथिलापूर ॥ २९ ॥

साकी.

घेउनि संदुक दास शिरीं ती वेगें मिथिले येती ॥
खणुनि मेदिनी बहु लगबगिनें रातोरातचि पुरती ॥
॥ ध्रु० ॥ न कळे होणार ॥ माये भुलला दशशीर ॥३०॥

आर्या.

पद्माक्ष भूप जन्मे कांहीं कालें सुविप्रवंशांत ॥
झाला विद्वान बहू, होता परि अंतरांत अति शांत ॥ ३१ ॥
त्या वाडवासि जनकें दिधली ती भूमि दान समयासी ॥
तो ती द्विज नांगरितां लाधे संदूक ती तदा त्यासी ॥३२॥
पाहुनि विस्मित होउनि मानि मनीं वित्त जनक रायाचें ॥
हें न स्वीकारिन मी, अधनातें काय मज करायाचें ॥३३॥

पृथ्वी.

विचार मनिं तो असा करुनि जाय भूपा गृहीं ॥
ह्मणे, नृपति, ठेवि या तव धना तुझ्या संग्रहीं ॥
तुवां मजसि दीधल्या कृषिंत हें मला लाधलें ॥
तया न अधिकारि मी नयपथें महानिर्मलें ॥३४॥

साकी.

द्विजवचनातें परिसुनि भूपति विस्मित चित्तीं झाला ॥
ह्मणे, नवल हें वाटे बहुताचि, ब्राह्मण हा किति भोळा ॥
॥ध्रु०॥ मिळत्या वित्ताला॥ अर्पितसे कां हा मजला ॥३५॥
जोरे हाथ करे बिनंती भूपति तब बह्मनकूं ॥
यह धन तेरा, नहीं हमारा, भू दान दिया तुजकूं ॥
॥ध्रु०॥ इसके तूम धनी ॥ लेजावो आप मकानीं ॥ ३६ ॥

इंद्रवज्रा.

बोले पुन्हा तो द्विज भूपतीला ॥ हें योग्य नाहीं नयपद्धतीला॥
स्वीकारि, ऐशा करि आग्रहातें॥ पाही ह्मणे ती उघडूनि हातें॥३७॥

ओवी.

पेटी उघडुनिया पाहतां ॥ आंत पांच वर्षांची सुंदर सुता ॥
हर्ष झाला द्विजभूपचित्ता ॥ बहु अद्भुता मानिती ॥ ३८ ॥

पद.

विप्रा, मजसी तूं देई ॥ गोरटि ही तनया ॥ ध्रु० ॥
दैवें आली माझ्या सदनीं ॥ योगमाया प्रणवरूपिणी ॥
सकल जगाची ही जननी ॥ अवनीभार हराया ॥ १ ॥
होइल त्रिजगीं ही विख्यात ॥ दुष्ट जनांचा करील घात ॥
अवतरली ही महीलोकांत ॥ साधुसंत ताराया ॥ २ ॥
वरिल विश्वजनकाप्रती ॥ हीच्या स्मरणें पापें हरती ॥
उद्धरील मुनिंच्या बहु पंक्ती ॥ भविं तरणी तराया ॥३॥३९॥

आर्या.

संतोषें विप्र ह्मणे, आहे राया तुझीच ही कन्या ॥
रक्षी आत्मसुतेपरि, होइल ही त्रिभुवनांत बहु धन्या ॥ ४० ॥

कामदा.

मानुनी नृपें आत्मनंदिनी ॥ पोषिली गृहीं इंदु-आननी ॥
माळ ती तुला आजि घालिल ॥ लग्नसोहळा थोर होइल ४१

आर्या.

सीताजन्मकथा हे गाई प्राकृतिं नमूनि हरिचरण ॥
सेवक उमातनय हा आहे सज्जनपदांबुजा शरण ॥ ४२ ॥

प्रकरण ४७ वें.

श्रीरामजन्म.

आर्या.

वंदुनि जगदीशाला वर्णूं श्रीरामजन्मचरितातें ॥
घेतां यन्नाम मुखीं हरितें जन्मार्जिताहि दुरितातें ॥ १ ॥

शिखरिणी.

अयोध्येचा राणा दशरथ महावीरमणि तो ॥
सुधर्में न्यायानें सकल महिचें राज्य करितो ॥
नसे पोटीं त्याच्या तनयतनयारत्न ह्मणुनी ॥
करी नाना यत्नांप्रति, परि न त्यां पाहि सदनीं ॥ २ ॥

ओवी.

घोरतर वनीं जाऊन ॥ एक स्त्री आणि पुरुष दोन ॥
तयांचा घेतला नृपें प्राण ॥ ऐसें स्वप्न विलोकिलें ॥३॥

दिंडी.

होइ विस्मित तो भूप आत्मचित्तीं ॥ स्वप्नवार्ता गुरुजींस निवेदीती॥
गुरू ह्मणती, जाउनी मृगयेसी॥वधी राया तूं तीन श्वापदांसी ॥४॥

इंद्रवज्रा.

गेला वनासी मृगया कराया ॥ लाधे पशू एकहिं ना वधाया ॥
होता तमिस्रासरसीसमीप ॥ वृक्षीं बसे कार्मुक सज्ज भूप ॥ ५ ॥

आर्या.

वृद्ध पिता तशि माता स्कंधीं घेऊनि कावडीमाजी ॥
जाय श्रावण तीर्था, उष्णभयें मार्ग लंघि निशिमाजी ॥ ६ ॥

कामदा.

लागली तृषा वृद्ध मेहुणा ॥ तोय तूं अह्मां देइ श्रावणा ॥
झारि घेउनी ये सरोवरीं ॥ मुदित मानसें नीर तो भरी ॥७॥
शब्द जाहला कर्णि ऐकुनी ॥ बाण सोडि तो भूप लक्षुनी ॥
श्रावणा उरीं येउनी शिरे ॥ भूतलीं पडे, राघवा स्मरे ॥ ८ ॥

मालिनी.

परिसुनि नरवाणी भूप विस्मीत झाला ॥
तरुतलिं उतरूनी श्रावणापाशिं आला ॥
मग नृपति पुसे त्या, कोण तूं, सांग मातें ॥
व्यथित पथग बोले काय भूपोत्तमातें ॥ ९ ॥

अंजनीगीत.

श्रावण ऐसें मजला ह्मणती ॥ वाडववंशीं मम उत्पत्ती ॥
जरठ मातापितरांप्रती ॥ स्कंधीं वाहून ॥ १० ॥
तीर्थयात्रा करायासी ॥ जात होतों घेउनि त्यांसी ॥
तृषा लागली मार्गी त्यांसी ॥ जलार्थ सरिं आलों ॥११॥
तुवां बाणें मज पाडीलें ॥ तृषेनें ते बहु पीडीले ॥
यास्तव उदक त्यांसीं पहिलें ॥ नेऊनी देई ॥ १२ ॥
त्यांसीं न करी तूं संभाषण ॥ निमूटपणें दे जीवन ॥
ऐसें वदुनी तो श्रावण ॥ त्यागी प्राणांतें ॥ १३ ॥

इंद्रवज्रा.

झारी तदा नेउनि भूप हातीं ॥
ठेवी तदग्रीं धृतमौनवृत्ती ॥
ते बोलती, बा बहु शीणलासी ॥
तो दे न त्यांतें प्रति उत्तरासी ॥ १४ ॥

पद.

माझ्या बाळा रोष मनीं ॥ श्रावणा कां धरिसी ॥ ध्रु० ॥
जन्मापासुनि तुजसी सुख ॥ नाहिं दिलें, परि दिधलें दुःख ॥
दाविसि कधीं न खिन्नित मुख ॥ होसी मूक कां यासी ॥ १ ॥
झालों आह्मी वृद्ध फार ॥ नेत्रीं आला अंधकार ॥
असती आह्मां तूं आधार ॥ स्कंधीं भार वाहासी ॥ २ ॥
मागों उदक निर्शी ह्मणून ॥ क्रोधीं चढलें तुझें मन ॥
भाषणाविणें जलसेवन ॥ न करूं जाण निश्चयेसी ॥ ३ ॥ ॥ १५ ॥

ओवी.

ऐकूनी सदुःख भाषण ॥ गहिवरुनि दशरथ बोले वचन ॥
श्रावण वधिला अजाणून ॥ करा जलपान तृषित हो ॥ १६ ॥

अंजनीगीत.

टाकिति देह धरणीवर ॥ शोक करीती अनिवार ॥
श्रावणा ऐसा कुमार ॥ त्रिजगीं न लाधे ॥ १७ ॥
राया तुवां तया वधिलें ॥ सुतशोकीं यां लोटीलें ॥
तीन हत्येचें पाप जडलें ॥ घेई शापाला ॥ १८ ॥
आह्मां ऐसा दुःखी होसी ॥ सुत सुत करुनी तूं रे मरसी ॥
शापुनि ऐसें भूपतीसी ॥ सोडिति ते प्राण ॥ १९ ॥

आर्या.

परिसुनि शाप तयांचा मानि मनीं भूप त्यांस संतान ॥
वांच्छित फलास देती, शापें तरि मजसि होउ संतान ॥ २० ॥
शापशकुनसुग्रंथी बांधुनि उत्तरिपटीं नृपाल करी ॥
उत्तरविधी तयांचा काष्ठादी आणुनी स्वकीय करीं ॥ २१ ॥

दिंडी.

येउनीया भूप तो स्वधामासी ॥
कथी वनवार्ता गुरू वसिष्ठासी ॥

मुनी ह्मणती, करि तनयकामहोमा ॥
आणुनीया ऋषि श्रृंगि आत्मधामा ॥ २२ ॥

इंद्रवज्रा.

धाडूनि रंभादि सुरांगनांला ॥ आणीयलें मोहुनि त्या मुनीला ॥
देऊनिया पालित नंदिनीसी ॥ लग्नें करी भूपति तुष्ट त्यासी ॥२३॥

साकी.

श्रृंगऋषी मग सहमुनिजन तो साधी सुतकामेष्टी ॥
मंत्रें नानाहुतिंतें देउनि करि वैश्वानरतुष्टी ॥
॥ध्रु०॥ राघवजननासी ॥ परिसा, हरि जें दुरितासी ॥२४॥

चामर.

मूर्तिमंत वीतिहोत्र तैं प्रसाद द्यावया ॥
पायसासि आत्महस्तिं घेउनी वदे तया ॥
हा प्रसाद भक्षितांचि शीघ्र भूपकामिनी ॥
वीरपुत्ररत्न गेहिं पाहतील लोचनीं ॥ २५ ॥

आर्या.

तेव्हां वसिष्ठमुनि तो नृपललनांतें स्वयें विभागून ॥
दे कौसल्येसि अर्धी, मग सुहृदे, कैकयीस मागून ॥ २६ ॥
देतां ऐशा परिनें आला तैं कोप फार कैकइस ॥
ह्मणतिल कां न, कवि ह्मणे, पाहुनि तत्कृतिस दुष्ट कैक इस ॥

साकी.

हाथोमे ले प्रसाद कैकइ बैठे आधोबदनी ॥
स्फुंदस्फुंदुनी रोये तब वो ढाली आंसू नयनीं ॥
॥ध्रु०॥ राघवजननासी ॥ परिसा, हरि जें दुरितासी ॥२८॥

ओवी.

तेव्हां बोले वसिष्ठ वचन ॥ करावा प्रसाद क्षिप्र भक्षण ॥
अवधी न करा एक क्षण ॥ करितां विघ्न होईल ॥ २९ ॥

साकी.

कैकइ बोले, सुनो मुनीजी, मान बडा हय मेरा ॥
सबके पीछे मुजकु दिया तूं, दिल भूल गया तेरा ॥
॥ध्रु०॥ राघवजननासी ॥ परिसा, हरि जें दुरितासी ॥३०॥

वसंततिलका.

तों घारिनें झडपुनी हुत कैकयीचा ॥
नेला विभाग गगनीं करिंचा तियेच्या ॥
तेव्हां समस्त करिती बहु हाहकार ॥
दुःखासि ते मनिं करी ललना अपार ॥ ३१ ॥

ओवी.

मग कौसल्या आणि सुमित्रा सती ॥ स्वविभागांतुनी तियेप्रती ॥
अर्ध अर्ध विभागातें देती ॥ तेणें हर्ष चित्तीं सर्वांच्या ॥ ३२ ॥

दिंडी.

होति राणी गर्भिणी कांहिं कालें ॥ चित्त भूपाचें हर्षयुक्त झालें ॥
जाय मग त्यां दोहदा पुसायासी ॥ अर्धी कैकइ राणिच्या मंदिरासी ॥

ओवी.

नृप कैकयीच्या मंदिरीं ॥ येतां न ये ती तया सामोरी ॥
बसलीच राहे मंचकावरी ॥ अपमान करी रायाचा ॥३४॥
राव तत्समीपीं येऊन ॥ ह्मणे, काय वांछितें तव मन ॥
दोहद तुझे मी पुरवीन ॥ करी कथन सुंदरी ॥ ३५ ॥
ती ह्मणे, कौसल्यासुमित्रानंदन ॥ द्यावे घोरतर वनीं धाडून ॥
मम पुत्रासी राज्यासन ॥ अर्पावें, ह्मणून बोलियली ॥३६॥

साकी.

परिसुनि तद्वच दशरथ नृपवर अंतरिं बहुतर खोंचे ॥
भाषण कंटक ऐसें तेव्हां श्रवणीं त्याच्या रोंचे ॥
॥ ध्रु० ॥ राघवजननासी ॥ परिसा, हरि जें दुरितासी ॥३७॥

भुजंगप्रयात.

करी भाषणातें न तो तीस कांहीं॥सुमित्रा सतीच्या त्वरें जाय गेहीं॥
तदा वंदुनी आदरें पादकंजा ॥ उभी राहि ती मोदयुक्ता सलज्जा ॥

दिंडी.

भूप बोले दोहदा पुसायासी ॥ येइ रमणी मी तुझ्या मंदिरासी ॥
काय इच्छा उद्भवे मानसातें॥ वदे धरितां नच मनीं संशया ते॥३९॥

आर्या.

बोले मृदु मधुर वचें, कौसल्योदरिं परेश येईल ॥
तत्सेवा मम तनयें करणें हें मजसि सुखद होईल ॥ ४० ॥

इंद्रवज्रा.

ऐकूनि तिची अमृतेव वाणी ॥ थोरी तियेची कवि कां न वाणी ॥
झाला तयें जो बहु हर्ष माया॥भूपोदरीं त्या न मिळेचि माया ॥४१॥

मालिनी.

गवरव बहु तीचा मेदिनीशें करूनी ॥
अमित धन तदा दे याचकांतें करांनीं ॥
करिन तव मनीषा पूर्ण, ऐसें कथूनी ॥
गमन करि गृहासी कौसलेच्या तिथूनी ॥ ४२ ॥

दिंडी.

येइ कौसल्यासदनिं महीपाल ॥ जिच्या उदरीं अवतरे विश्वपाल ॥
परब्रह्मीं लावुनी समाधीसी ॥ बसलि, देखीली नृपें तीस ऐसी ॥

ओवी.

कांहीं न बोले ती वचन ॥ आत्मस्वरूपीं होउनी मग्न ॥
चारी अवस्था ओलांडून ॥ 'अहं ब्रह्मीं' स्थिरावली ॥४४॥
नाहीं अल्पहि देहभान ॥ मी स्त्री वा पुरुष हें स्मरण ॥
गेलें सकलहि विसरून ॥ समाधी लावून बैसली ॥ ४५ ॥

पृथ्वी.

प्रयत्न बहु तो करी तिजसि व्हावया भाषणा ॥
न एक वचही परी उघडुनी करी लोचना ॥

तदा नृप मनीं ह्मणे, झडपिलें इतें कां भुतें ॥
वसिष्ठ मुनितें निमंत्रुनि कथी स्वयें वृत्त तें ॥ ४६ ॥

दिंडी.

कौसलेच्या मुनिवर्य मंदिराशी ॥ शीघ्र आला सर्वज्ञ तपोराशी ॥
परब्रह्मीं मीनली तिची वृत्ती ॥ पाहुनीया संतुष्ट होय चित्तीं ॥४७॥

ओवी.

सत्यस्वरूपीं समाधी पाहून ॥ वसिष्ठहि जाहला देहभानहीन ॥
तो ही महासमाधी पाहून ॥ झाला तल्लीन आत्मरूपीं ॥४८॥

साकी.

देखे नृप जव गुरूसमाधी भया बडा मनिं घवरा ॥
अहवाल यही क्या वन रहि है गुरु बावरा अजि करा ॥
॥ध्रु०॥ अब मैं क्या करना ॥ गुरुभी होगया दिवाना ॥४९॥

पृथ्वी.

वसिष्ठ मुनि तो तदा उतरुनी समाधीप्रती ॥
ह्मणे, दशरथा, न ही झडपिली असे गा भुतीं ॥
इच्या उदरिं गर्भ तो सकल विश्वकर्ता हरी ॥
असे, ह्मणुनि हे तुसीं अजि न भाषणातें करी ॥ ५० ॥

ओवी.

कौसल्या करीं घेउनि चापबाण ॥ ह्मणे, कुठे रे तो दुष्ट रावण ॥
त्याचीं दाही शिरें च्छेदून ॥ आतांचि पाडीन भूतलीं ॥ ५१ ॥
सोडविन कारांतुनी सुरवर ॥ उतरीन महीचा दुष्टजनभार ॥
करिन सुखी धेनुद्विजवर ॥ चराचरव्यापक मी ॥ ५२ ॥

मालिनी.

परिसुनि सति–वाणी भूप संतुष्ट झाला ॥
नमुनि गुरुपदा घे धन्यता आपणाला ॥
स्थितिलयभवकर्ता बालरूपा धरूनी ॥
भरिल सकल विश्वा आत्मलीले करूनी ॥ ५३ ॥

ओवी.

होतां नवमास परिपूर्ण ॥ चैत्र शुक्ल नवमी भानुदिन ॥
मध्याह्नीं येतां चंडकिरण ॥ प्रसवे नंदन कौसल्या ॥ ५४ ॥
सुमित्रेसि एक सुत ॥ दोन झाले कैकयीप्रत ॥
झाला समस्तां आनंद बहुत ॥ तो कविमत न वर्णवे ॥५५॥

आर्या.

वृंदारकवृंद तदा वर्षति ते मेघ पुष्पवृष्टीचा ॥
आनंद तद्दिनींचा वर्णिल कवि कोण भूमिपृष्टींचा ॥ ५६ ॥

पृथ्वी.

यथाविधि करी करीं नृपति आद्य संस्कार तो ॥
वसिष्ठ मग जातका निजमुखें नृपा वानितो ॥
हरील खलभार हा करुनिया स्वभक्तावना ॥
पयोऽर्णवनिवासि जो करित आगमा भूवना ॥ ५७ ॥

ओवी.

राम कौसल्यानंदन ॥ सुमित्रेचा तो लक्ष्मण ॥
कैकयीचा भरत रिपुघ्न ॥ त्रिगुणातीत अविकारी ॥ ५८ ॥
मिळुनिया नगरनारी ॥ सोहळा करिती नानापरी ॥
नाहवूनी पालखाभीतरी ॥ घालिती स्वकरीं बालका ॥५९॥

पाळणा.

निज रे निज बाळा, घननीळा, कर्ता विश्वा सकळा ॥ध्रु०॥
अनंत ब्रह्मांडें, तव उदरीं, त्रिगुणातित अविकारी ॥
कामक्रोधादी, षड् वैरी, जिंकुनि वससी दूरी ॥
दुर्मतिजनसमुहा, नाशाया, अवतरसी महिठाया ॥
स्वभक्त साधुजना, ताराया, करिसी विविधोपाया ॥
निर्मल रविवंशीं, जन्मासी, येउनि दशरथसुत होसी ॥
आनंद बहु तेणें, सकलांसी, हलवूं तुजसी दासी ॥
निज रे निज बाळा ॥ ६० ॥

आर्या.

श्रीरामजन्मचरिता गाई प्राकृतिं यथामती भावें ॥
कृष्ण ह्मणे, जगदीशा, मन्मन या न प्रपंचिं लोभावें ॥६१॥

प्रकरण ४८ वें.

हनुमानस्तव.

या आर्यांत 'नमो भगवते हनुमंताय' हा मंत्र प्रत्येक अर्धाचे आद्याक्षरीं साधिला आहे.

आर्या.

नमुं शरण रिघुनि भावें एकादशरुद्र मारुती राया ॥
मोह हरुनि संसृतिचा नेवो भवसिंधु-पैल-तीरा या ॥ १ ॥
भक्तेच्छाकल्पद्रुम ह्मणुं, तरि उपमा अयोग्य हे खचित ॥
गमते, अनुचितही तो दे, न तसें हा, सदैव दे उचित ॥२॥
वसुमतिवरि अवतरला श्रीराघव, सख्यकार्य साधावें ॥
तेजें लाजे वह्नी, नतरक्षणिं बापमायसा धावे ॥ ३ ॥
हरितां सीता वनिता रघुनाथाची दशाननें कपटें ॥
नुरवी राक्षसवंशा दावुनि शौर्या रणीं अनेक पटें ॥ ४ ॥
मंत्र मुखिं 'राम राम' प्रेमें ज्याच्या सदैव तो शिरला ॥
तारक तो त्रिजगाचा, व्यस्तोच्चारेंहि वाल्मिकी तरला ॥५॥
यन्नामोच्चाररवें भूतपिशाचें दिगंतरीं पळती ॥
न वळति पुनरपि मागुति, धरती धैर्यासि नांतरीं पळ तीं ॥६॥
मोठी शक्ति जयाची, हस्तांगुलिनें गिरी सहज उपटी ॥
भव्योग्रवज्रदेही, विक्रम अमरांहुनी सहस्रपटी ॥ ७ ॥

गरुडाधिक गगनिं उडे, तैसा वेगें प्रभंजना हरवी ॥
वनचर सुगल स्वसखा, त्यातें श्रीरामसख्य तो करवी ॥८॥
तेजोनिधि रविला फळ मानुनि भक्ष्यार्थ जन्मतां उडला ॥
हरि भव्य पाहुनी रवि भीतीनें भीतिसागरीं बुडला ॥ ९ ॥
नुति किति करणें त्याची, यत्साह्यें सफल राम अवतार ॥
मंथुनि खलजन झाला, सकलहि ह्मणती, जयास भवितार १०
तापत्रयीं न बुडवी, आल्या शरणागता जना रक्षी ॥
यमपीडा दूर करी, कृष्ण तया मूर्तितें सदा लक्षी ॥ ११ ॥

प्रकरण ४९ वें.

रामचरित्र.

आर्या.

या आर्यांत 'श्रीराम जयराम जयजयराम' हा मंत्र
प्रत्येक अर्धाचे आद्याक्षरीं साधिला आहे.

श्रीमद्गजाननाच्या शुचि भावें नमुनि पादपद्मातें ॥
राघवचरित्र गाइन, चुरि ज्याचे स्वकरिं पाद पद्मा ते ॥ १ ॥
मर्दाया मदमत्तां जगनायक रविकुलांत अवतरला ॥
जन्मादि तच्चरित्रा गाउनि वाल्मीकि दुःखभव तरला ॥ २ ॥
यज्ञावनार्थ मुनिच्या त्रिशिराखरताटकादि बलवानां ॥
रात्रिचरां बालपणीं वधि, कोण न कथि तदीय बल वाना ॥३॥
मखसिद्धि करुनि मिथिलानगरातें समुनि येइ जनकाचे ॥
जनकात्मजेसि वरि तो भंगुनि धनु विघ्नराजजनकाचें ॥ ४ ॥

यश दशरथ भूपाचें कैकइ बहु आग्रहेंचि मळवी तें ॥
जगदीश वनीं धाडुनि, दुष्टस्त्रीमन सदैव मळ वीतें ॥ ५ ॥
यत्किंचित खेद मनीं नाणुनि सश्री वनांत राम निघे ॥
रावण सीताहरणीं दुष्टेच्छा बहु भयंकरा मनिं घे ॥ ६ ॥
मरिचिसुता मृगवेषें धाडुनि जनकात्मजा हरी खळ तो ॥
श्रीपति शोधार्थ निघे, हरितां च्छावा न जेवि हरि खळतो ॥७॥
राक्षसवरें जनकजा हरिली, हें वृत्त अंडजें कथिलें ॥
मनिं तात मानुनी त्या रामें तत्काल त्यासि उद्धरिलें ॥ ८ ॥
जरठ जटायु स्वर्गीं धाडुनि पंपासरीं रघूत्तम ये ॥
यजमान जाणुनी त्या राघवपद वंदिले मरुत्तनयें ॥ ९ ॥
रामादत्ताभरणग्रंथीतें सोडुनी पहातां त्या ॥
मन अतितर दुःखिं विरे, ये उचलायासि कंप हाता त्या ॥१०॥
जवनिधि सुग्रीव सखा करुनी तद्वैरि वालि वधियेला ॥
यत्नें महीसुतेच्या शुद्धीचा तो उदंत आणियला ॥ ११ ॥
जलनिधिवरी जडशिलासेतू बांधूनि रावणादि खळ ॥
यमलोकीं धाडियले, दिधलें नृपपद विभीषणा अढळ ॥१२॥
राज्य करि अयोध्येचें सश्री अठरा सहस्र वत्सर तें ॥
मन्मन तद्भजनिं रतो, स्तानिं,कृष्ण मार्थि, जेवि वत्स रते ॥१३॥

प्रकरण ५० वें.

शिवस्तव.

आर्या.

या आर्यांत ' **शिव शिव** ' हा मंत्र आद्याक्षरीं साधिला आहे.

शिरसाष्टांगें नमितों भावें श्रीशंकरांघ्रिकमलातें ॥
वरवृंदारकगणिं जो स्मरतां हरि दुःखदायक मलातें ॥ १ ॥
शितिकंठ नाम साजे, भोळें तत्तुल्य अन्य दैवत न ॥
वरदानीं व्याज नसे, लेपन करि भूतिनें सदैव तन ॥ २ ॥
शिरिं हरिपदजा, कंठीं रुद्राक्षाच्या तशा नृशिरमाला ॥
वसणें स्मशानभुवनीं, धारण करि नागदंतिचर्माला ॥३॥
शिखरीं शिखरीं विहरे बैसुनि सहपार्वती वृषावर तो ॥
वसनें तूलोर्णाचीं त्यागुनि वस्त्रार्थ दश दिशा वरतो ॥ ४ ॥
शिखरीप्रती जयाच्या धवलगिरी हें असे सदभिधान ॥
श्रीरामनाममंत्राविरहित रसनेसि अन्य न विधान ॥ ५ ॥
शिळ शांत, तपोग्र महा, तत्सम अन्य न विरक्त विश्वांत ॥
वर गणिला सुरमुनिंनीं, दाता न दुजा तसा वदान्यांत ॥६॥
शिणलीं शास्त्रपुराणें आगमनिगमादि वेदवाणी ती ॥
वर्णाया यन्महिमा, त्या नर किति मंदबुद्धि वाणीती ॥ ७ ॥
शिष्यसमुदाय ज्याचा भूतपिशाचें महाभयंकर तीं ॥
वारिलि अमंगलता, परि करि मंगलदा दया नतावरतीं ॥८॥
शिवद प्रसाद ज्याचा, ह्मणुनी अन्वर्थ होय नाम शिव ॥
वदती सुरमुनि सकलहि, भजका देईल काय तो अशिव ॥९॥
शिशिर निशींत निशापति शीतल शुभ्रांशु आत्मकरनिकरीं ॥
वर्धन करि जनमोदा, तदधिक शिव निज दयेंकरूनि करी ॥ १० ॥

शिवति न दूत यमाचे शिवनामोच्चारका कदा समया ॥
वळवि सुपथिं कवि कृष्णा, शंभो, मानी न दुर्मदासम या ॥११॥

प्रकरण ५१ वें.

मायाप्रभाव–नारदी.

(देवी भागवत, स्कंध ६, अध्याय २८.)

आर्या.

गाऊं नमुनी वरदा श्रीहरिमायामहाप्रतापातें ॥
ज्ञात्यांहि करुनि मोहित दे सुख अथवा महाप्रतापातें ॥ १ ॥
आला एके समयीं वैकुंठीं दर्शना रमापतिच्या ॥
सुरमुनि नारद, तेव्हां होती अंकावरी रमा पतिच्या ॥ २ ॥
पाहुनि नारदमुनितें होउनि लज्जायमान हरिजाया ॥
उठली पट सांवरुनी लगवगिनें ती गृहांतरीं जाया ॥ ३ ॥
नमन करुनि देवमुनी जोडुनि नारायणासि करकमला ॥
प्रश्न करी, देखुनि मज कां लज्जित विश्वसौख्यकर कमला ॥४॥
मी धूर्त न, जार न मी, जिंकीं मी षडरि इंद्रियांसहित ॥
ज्ञाता मी, पंडित मी, न कळे मग कां स्वकीय यास हित ॥५॥
ऐसें असुनी उठली, देवा, देवी गृहांत कां जाया ॥
तद्धेतु मज कथावा, समर्थ तुह्मी अहांत काजा या ॥ ६ ॥
देव ह्मणे, गा साधो, मम मायामोह चंड दुस्तर तो ॥
शशिमंडन हर मीही शक्य न जाणावया सविस्तर तो ॥७॥
नीती अशी असे कीं, राहुं नये अन्यपुरुषानिकट ॥
केव्हांही वनितांनीं, जातें वैराग्य ना तरी फुकट ॥ ८ ॥

मग तो जितेंद्रिय असो, योगी, वा तापसी निराहारी ॥
तत्सामर्थ्या पावकसंगें ये जेवि कर्पुरा हारी ॥ ९ ॥
नारद ह्मणे, असे ती दावा हो मजसि एकदा कसली ॥
वास कुठे, शक्ति किती, मोहाया कटि जिणें सदा कसली ॥१०॥
देव ह्मणे, दाविन मी, जरि वांछी मन तुझें पहायासी ॥
परि पडसिल तूं तेणें भुलुनी, मुनिपुंगवा, महायासीं ॥११॥
संगें घेउनि नारद ये श्रीहरि कान्यकुब्जदेशाला ॥
आकाशपथें दावित अवनिस्थित सर गिरी नद्या शाला॥१२॥
एका विस्तीर्ण महा अतिरम्य सुनिर्मलांबु कासारीं ॥
जाउनि हरि मुनिसि ह्मणे, संध्यास्नानादि अह्निका सारी ॥१३॥
मीही स्नान करिन मग, तोंवरि वीणाजिना तिरीं ठेव ॥
जतन करिन मी त्यातें, कृपण जतन तो जसा करी ठेव॥१४॥
हांसत हांसत ऐसें बोलुनि धाडी सरांत सुरमुनितें ॥
देखुनि अतिनिर्मल जल मज्जानिं मुनिचित्त जाय सु-रमुनि तें १५
मारी बुड्या मुनि जलीं, तों वीणा अजिन घेउनी हरि तो ॥
जाय सदय वैकुंठीं, जो मायामोह शीघ्रची हरितो ॥ १६ ॥
स्नान करूनि सरस्तटिं येतां झालें शरीर कामिनिचें ॥
वस्त्रालंकारान्वित, जाउनिया ज्ञानही तया मानिचें ॥ १७ ॥
तों त्याच सरस्तीरीं आला मृगयार्थि कान्यकुब्जपती ॥
पाहुनि सलज्ज त्या ती शाखीपृष्ठासि जाहली लपती ॥१८॥
दृष्टी तिजवरि त्याची जाउनि तो कां ह्मणे दडालीस ॥
असशी तूं कोण, वदे, कां या निर्जन वनांत आलीस ॥१९॥
दिससी श्रेष्ठ कुलांतिल तैसी अविवाहिताहि उपवरसी ॥
मी नृप या देशाचा, पावसि सुख तूं जरी मला वरसी॥२०॥
चाल मम प्रासादीं, चित्तीं तिलही करी न अनमाना ॥
तुज करिन पट्टराणी, पावसि मग तूं महान सन्माना ॥२१॥

लज्जित मंदस्मित मृदु मधुर वचें वस्त्र हस्तिं सांवरुनी ॥
बोले ती भूपाला स्वग्रीवा खालती तदा करुनी ॥ २२ ॥
मी कोण, कोण माता, कोण पिता, हें नसे मला विदित ॥
आलें कोठुनि तेंही, परि पाहुनि जाहलें तुला मुदित ॥२३॥
आहें निराश्रित तसी, दैवावरि ठेविला असे भार ॥
झालें अधीन तुम्हच्या, मानुनि चित्तांत फार आभार ॥२४॥
परिसुनि तदुक्ति नरपति पावुनि संतोष नेइ गेहातें ॥
पाहूनि शुभ मुहूर्ता, तत्सगें करि सविधि विवाहातें ॥ २५ ॥
तें दंपत्य प्रेमें करि कालक्रम महाप्रमोदांनीं ॥
प्राशुनि निशिदिनिं मादिरा करि वर्तन तें महाप्रमादांनीं ॥२६॥
स्त्रीरूपि नारदातें झाली संततिहि कांहिं वर्षांनीं ॥
द्वादश सुत अष्ट सुता, तेणें तन्मन भरे सुहर्षांनीं ॥ २७ ॥
वहु संतति संततिला होउनि वाढे प्रपंचपरिवार ॥
अनियमितसुरापानें झाले उन्मत्त फार अनिवार ॥ २८ ॥
सौख्य गृहस्थाश्रमिंचें उपभोगी सर्व काल परिपरिचें ॥
धन्य वहु मानि अपणा, क्षणही नाम स्मरे न परि हरिचें॥२९॥
ऐसा नारदमुनि तो मायामोहें प्रपंचडोहांत ॥
गेला बुडुनि, कवि ह्मणे, कोणावरिहि न तिचा पडो हात॥३०॥
परचक्र कांहिं कालें आलें युद्धार्थ त्या नृपावरतें ॥
सेना प्रचंड घेउनि, होतें त्या नृपवरा अनावर तें ॥ ३१ ॥
गेला घेऊनि ससुत मंत्री सेना करावयासि रण ॥
पावूनि तैं पराभव मंत्री सुत सकल पावती मरण ॥ ३२ ॥
होऊनि विमुख सदनीं आला एकाकि पाहुनी कांत ॥
परिसुनि सुतवधवार्ता ती नारदि करि महान आक्रांत॥३३॥
स्मरुनी नाना सुतगुण टाकी धरणीवरी स्वदेहातें ॥
अपटी शिर पाषाणीं, लोळे आक्रंदुनी, वदे 'हा' ते ॥३४॥

सांत्वन बहु जन करिती वृद्धाचारें अनेकशा विधिनें ॥
शांत परि न होय, ह्मणे, प्राक्तनिं लिहिलें असें कसें विधिनें ३५
प्राणत्याग कराया झाली ती सिद्ध नारदी रमणी ॥
माया बलिष्ठ किति हो, भुलवी ही ज्ञानवान धीरमणी ॥३६॥
बघुनि तिचा दृढ निश्चय आला हरि वृद्धविप्रवेशानें ॥
कां करिसि आत्महत्या, विचार करि मनिं, ह्मणे अवेशानें॥३७॥
कां शोक वृथा करिसी, आहे बाई प्रपंच लटका हा ॥
कोण सुखि यांत झाला, क्षणिक वपुस्तव करीसि मग कां 'हा' ॥
तूं कोण, सुत कुणाचे, करि मानासिं पूर्ण या विचारातें ॥
त्यागुनि मोह अविद्या मृतमुक्त्यर्थीं करी पुढिल विधितें ॥३९॥
ऊठ त्यजुनी रोदन, करुनी मज्जन तिलांजली दे त्या ॥
स्वर्गीं जातिल तेणें, करणें तुझें कधीं न तनुहत्या ॥ ४० ॥
वृद्धब्राह्मणबोधें मग ती स्नानार्थ सपति त्याच सरीं ॥
विप्रामागुनि गेली, परि सुतशोका मनीं न ती विसरी॥४१॥
तेव्हां तो विप्र ह्मणे, गे वांया शोक सांग कां करिसी ॥
बहु जन्म घेतले, परि त्यांतिल कोणासि आज तूं स्मरसी ॥४२॥
किति तात बंधु नंदन माता भगिनी सुता पती मरती ॥
आजवरी तच्छोका करिसी का जेवि जन्मनी करती ॥४३॥
हा सर्व भ्रम आहे, संसार स्वप्न, जाण हें खचित ॥
असती क्रिया तयांतिल असत्य हें मानणें नसे उचित ॥४४॥
मग ती स्नानार्थ सरीं जाउनि बुडि मारुनी वरी आली ॥
तों स्त्रीत्व नष्ट होउनि पुंस्त्व पुन्हा देहिं पाहती झाली ॥४५॥
पाहूनि पूर्व देहा नारदमुनि मनिं करी महा नवला ॥
मायाप्रभाव हाची या देहा आजि पूर्ण अनुभवला ॥४६॥
मनिं करि विचार ऐसा, तों देखे अग्रभागिं मा-पतितें ॥
नमुनि ह्मणे, वर्णावा त्वन्मायामोह काय या पतितें ॥४७॥

मायाप्रभाव ऐसा श्रीहरिनें नारदास दाखविला ॥
तो वृत्तांत यथामति कवनें कृष्णें मनास चाखविला ॥४८॥

प्रकरण ५२ वें.

स्कंधपुराणांतील विनायकमाहात्म्य.

अध्याय पहिला.

आर्या.

श्रीमत्सिद्धिविनायकपादसरोजासि वंदुनी भावें ॥
गावें चरित्र त्याचें, या मद्धेतुसि तयेंचि पुरवावें ॥ १ ॥
करुनी असी विनंती आरंभी दास हा कथा गाया ॥
ते परिपूरित व्हावी, ऐसी देवा सुबुद्धि दे गा या ॥ २ ॥
स्कंद ह्मणति, शिव शंभो, आहां त्रिजगा तुह्मीच सुखदाते ॥
भवदाननें परिशिलें पापविनाशक कथासुवृंदातें ॥ ३ ॥
ज्या, बहु पवित्र अद्भुत, शाक्त तशा सौर वैष्णवां शैवां ॥
भवदुःखाब्धि हरूनी देती पुरुषार्थ चारिही, देवा ॥ ४ ॥
होय न तृप्ति, परि मना जेवि गमे अमृत सेवितां थोडें ॥
यास्तव विनायककथा सांगा, जेणें मनासि सुख जोडे ॥५॥
अवतार गणपतीचे झाले नरलोकरक्षणाविषयीं ॥
इतिहासासह कथना योग्य तुह्मी चंद्रचूड या समयीं ॥६॥
ईश ह्मणे, बा स्कंदा, प्रश्न तुझा रे बहूत उत्तम हा ॥
कथितों, परिसे, तेणें संतोषित खचित होय चित्त महा ॥७॥
निर्गुण निरहंकारी शून्याकृति तेवि वासनारहित ॥
अक्षर नित्य निरामय, रूपें भक्तावना धरी विहित ॥ ८ ॥

आद्य अजहि अविनाशी कर्ता कारण तथैव कार्यहि तो ॥
आहे, सर्वा जगता व्यापुनि भिन्नचि, षडानना, वसतो ॥९॥
विधिशक्तिविष्णुशंकर या रूपा धारणासि तो करितो ॥
जोडुनि आत्मपाणी सकलसुरसमूह ज्या सदा स्तवितो ॥१०॥
स्थिरचरविश्वहितास्तव नानारूपी धरूनि अवतार ॥
करि रक्षण जगताचें, कथितों परिसे तदाद्य अवतार ॥११॥
कोणे एके कालीं त्रैलोक्याचाहि जाहला प्रलय ॥
तैं देवयोगधारक पाहुनि गणपति समस्त वारिमय ॥ १२ ॥
आत्मप्रकाशि अक्षय नित्यचिदानंद योगिगम्य परी ॥
मजविण अन्य न कोणी, ऐसा निजमानसीं विचार करी ॥१३॥
एकाकि योग्य असणें न बरें, ऐसें मनांत आणून ॥
व्हावें बहु, या इच्छें प्रथम त्रिगुणा करूनि उत्पन्न ॥ १४ ॥
करुनी रजोगुणातें आद्योत्पत्तीस तैं विधात्यातें ॥
श्रुतिशास्त्रपुराणादिक कथिल्या विद्याहि बहुविधा त्यातें ॥१५॥
आज्ञापिलें सुवचनें मग त्या लंबोदरें प्रजापतितें ॥
करि निर्माण स्वकरें चित्रविचित्रा अनेक सृष्टीतें ॥ १६ ॥
होतां प्रवृत्त तेव्हां विधिवत् ब्रह्मा सुसृष्टि निर्माया ॥
येती अनंत विघ्नें नानाविध तीं तदीय कर्मा या ॥ १७ ॥
कोणी ओढिति त्यातें, ओढिति कोणी धरूनि केशाला ॥
कोणी भयद रव करी, कोणी हस्तध्वनीहि ऐशाला ॥१८॥
करिती दुंदुभिनादा, दृश्यादृश्य क्रियेसि दर्शविती ॥
या विघ्नां निरसाया होउनि असमर्थ शोक करि चित्तीं ॥१९॥
तेव्हां प्रजापति ह्मणे, मी ईशाज्ञेनुरूप हें करितों ॥
येती परि बहु विघ्नें, काय करूं या उपाय ना सुचतो ॥२०॥
जरि गणवरा पुसावें, तरि अंतर्धान पावले प्रभुजी ॥
आतां काय करावें, काय वदावें विनायका म्यां जी ॥२१॥

ईशान ह्मणे, ऐसा चिंतेनें ग्रस्त होउनी विधि तो ॥
करुनी स्मरण शुचि मनें जोडुनि पाणि स्तुती तदा करितो २२
तेजोमय देवा तूं, देखाया तुज समर्थ नच दृष्टी ॥
येती विघ्नें बहुपरि आज्ञांकित दास निर्मितां सृष्टी ॥२३॥
या विघ्नां निरसाया अससी देवा समर्थ तूं एक ॥
धावे, पावे आतां, आहे बहु संकटीं तुझा तोक ॥ २४ ॥
श्रुतिशास्त्रगणादिक ते शक्य न हा विघ्नवृंद नाशाया ॥
शीघ्र न वारिसि यातें, तरि उरलि न सृष्टिकर्मि आशा या२५
भर्ग ह्मणे, ऐसा स्तव परिसुनि तो देवदेव गजवदन ॥
झाला प्रकट तदग्रीं, बोले करुनी प्रसन्न बहु वदन ॥२६॥
श्रीवक्रतुंडमंत्रा कथितों तुज, जो समस्तसिद्धिकर ॥
होशील तत्प्रसादें विघ्नरहित, भी न, शीघ्र सृष्टि कर ॥२७॥
भूतेश ह्मणे, परिसुनि ऐशा त्या वरदवाणितें, स्कंदा ॥
होउनि संतुष्ट तसा परमेष्ठी पावला महानंदा ॥ २८ ॥
उघडुनि नेत्र सुहर्षें जाय कराया तपा यथाविधिनें ॥
श्रीवक्रतुंडसुजपा करि दिनरजनीहि शुद्ध बुद्धीनें ॥ २९ ॥
ऐसीं द्वादश वर्षें अति उग्र करी तपासि परमेष्ठी ॥
तेणें करुणासागर वक्रानन चित्तिं पावला तुष्टी ॥ ३० ॥
आरक्त नेत्र, गजमुख, चर्चित सिंदूर, इंदुसम कांती ॥
कोटी रवि प्रकाशित, देखाया शक्य नेत्र नचि होती ॥३१॥
त्रैलोक्यव्यापक तें पाहुनि अति उग्र रूप विधि भ्याला ॥
त्यागुनि तैं मंत्रजपा द्विगुणित चिंतार्त मानसीं झाला ॥३२॥
येउनि पडेहि मूर्च्छा, झाला, स्कंदा, क्षणेंचि सावध तो ॥
पाहुनि निज इष्ट अशा रूपा साष्टांगें वंदुनी वदतो ॥ ३३॥
परमानंदानंदा, जयजयकाराचि सदा तुझा राहो ॥
हे निखिलजगज्जनका, गाळाया भीति तूंचि झारा हो ॥३४॥

तूं सत्त्वरूपि केशव, तमरूपी भर्ग तूं, गुणातीत ॥
स्वाहा स्वधाहि तूंची, नमुं नमुं युष्मत्पदा सदोदीत ॥३५॥
तूं तेजोनिधि, देवा, ठेवी या दीनदासशीर्षिं कर ॥
हो सुप्रसन्न मजसी, आतां सुकृपामहाप्रसाद कर ॥ ३६ ॥
या सृष्टिकर्मिं विघ्नें येती बहु, तीं विभो सुदूर करा ॥
आहे शरणागत हा, बहु विनयें प्रार्थि जोडुनी स्वकरा ॥३७॥
पशुपति ह्मणति कुमारा, ऐसी विधिदीनवाणि परिसून ॥
बोले श्रीवक्रानन, ध्यासि तया पाहि अक्षि उघडून ॥३८॥
निशिदिनिं ध्यासी ज्यासी, तो हा साक्षात् त्वदग्रिं परमेष्ठी ॥
योगें सनकादि मला देखति ऋषिजन करूनि परमेष्टी ॥३९॥
मजवांचुनि किंचितहि न पाहति, तैसें न जाणती अन्य ॥
पाहुनि तवोत्तमतपा असती सप्रेम तूं मला मान्य ॥ ४० ॥
आलों वर द्याया मी, ज्यातें श्रीवक्रतुंड ह्मणतात ॥
आतां तिलही चिंता न करी, चतुराननास्य, चित्तांत ॥४१॥
वांछिसि निज मानसिं तो वर मागे, द्यावया असें सिद्ध ॥
शिव ह्मणति, परिसुनी तें बोले धाता करूनि मन शुद्ध॥४२॥
यदि सुप्रसन्न, देवा, द्या अद्भुत शक्ति सृष्टि विरचाया ॥
होईन शक्य ऐशी आयकुं दे ती प्रसादवाचा या ॥ ४३ ॥
जी प्रार्थना विधे त्वां केली, त्यापरि समस्त होईल ॥
सामर्थ्य सृष्टिरचनाचातुर्यान्वित तवांगिं येईल ॥ ४४ ॥
देतों दुजा वर तुतें, होइल सद्भक्ति सर्वदा तेणें ॥
तैसींच मत्प्रसादें होती विघ्नें कदा न तुज, जाणें ॥ ४५ ॥
लब्धसुवर प्रजापति निजकन्या ऋद्धि सिद्धि वरदा त्या ॥
अर्पी सुआदरानें बहु हर्षें तोषयुक्त वरदा त्या ॥ ४६ ॥
घेउनि विधिदत्त सुता तो अंतर्धान पावला देव ॥
गेला विरिंचिहि तदा निजधामा, सांगती महादेव ॥ ४७ ॥

स्कंदा, तेव्हांपासुनि लाधुनि निर्विघ्नता प्रजापति तो ॥
वेंचुनि बहु चातुर्या नानाविध सृष्टिसंभवा करितो ॥ ४८ ॥
स्कंद ह्मणति देवेशा, प्राप्त कसें वक्रतुंड अभिधान ॥
झालें विनायकातें सांगा, श्रवणीं असे मदवधान ॥ ४९ ॥
वृत्तांत ऐकतांची पावे जन्मार्जिताघनग नाशा ॥
अत एव कृपा करुनी पूर्ण करा शीघ्र ती सुदीनाशा ॥५०॥
शशिखंडमंडन ह्मणे, पुसिलें उत्तम तुवांचि, सेनानी ॥
परिसे सुसावधानें, कथितों तें प्रेमयुक्त वचनांनीं ॥ ५१ ॥
होउनि वक्र सुकार्यीं विध्वंसिति जे करूनि विघ्न भया ॥
कृतवक्रतुंडवधित्वा, यास्तव ह्मणतात वक्रतुंड तया ॥ ५२ ॥
करि आज्ञा सत्त्वगुणी श्रीमन्नारायणासि वक्रमुख ॥
संपालन बहुयत्नें करुनी निशिदिनिं जगासि देइ सुख ॥५३॥
तैसें तपःस्वरूपी भस्मोद्धूलित स्मशानवासि हरा ॥
आज्ञापी वक्रानन, करणें तुह्मीच सृष्टिसंहारा ॥ ५४ ॥
शंकर ह्मणती, कथिला तुज प्रथम वक्रतुंड अवतार ॥
श्रीमद्विनायकाचा पापविनाशक उदंडसौख्यकर ॥ ५५ ॥

प्रकरण ५३ वें.

प्रार्थनाशतक.

आर्या.

जोडुनि करांघ्रि भावें वंदूं प्रभु, जो अजिंक्य शत-काला ॥
त्याच्या कृपाप्रसादें गाइन मी प्रार्थनासुशतकाला ॥ १ ॥

जगचालका सुरवरा देवा, जरि म्यां तुला न अळवावें ॥
अळवावें कोणातें, करुनि कृपा तूंचि मजासि कळवावें ॥२॥
जरि मानवाकडे म्यां जावें मद्दुःखराशि अटवाया ॥
ते काय समर्थ, जसा अटवाया पय सछिद्र घट वांया ॥३॥
तुजसि मम याचनेचा, देवा, आला असेल कंटाळा ॥
हें सत्य, तथापि न मी याचीन दुज्यासि पसरुनी टाळा ॥४॥
तूं मायबाप, बांधव, इष्ट सखा तूंच, तूंच यजमान ॥
तुजवांचुनि नान्य दुजा, राहो त्वन्मनिं मदीय अभिमान ॥५॥
आधार निराधारां नाहीं तुजसम समस्त जगतांत ॥
ह्मणती यदर्थाचि तुला श्रुतिशास्त्रादिक समस्त जग-तात ॥६॥
दीनांचा पालक तूं, हा न परी काय दीनसा गमला ॥
वात्सल्य आटलें तव, किंवा करुणार्ह मी न, सांग मला ॥७॥
शंका ही विपरीत किं, ये आट तुझ्या कृपानदीनाला ॥
कल्पांतिंही न आटे, आहे कीं काय तो नदी नाला ॥८॥
उपमा तुझ्या दयेला जलनिधिची अति अयोग्यसी गमते ॥
भूलोकिंच सिंधु वसे, त्रैलोक्यीं तव दया सदा रमते ॥ ९ ॥
परि हा तियेसि दिसला न असे न ह्मणे परंतु अल्पतरे ॥
यास्तव पावुनि दुःखा दुर्धरसंसारसिंधु हा न तरे ॥ १० ॥
समयीं तनु ही सोसूं शतवृश्चिकदंशदुःख तेंहि सके ॥
परि या प्रापंचाचे सोसवती नाचि असह्य ते हिसके ॥ ११ ॥
किति तरि दुःखद हा, हा! उपमा या द्यावयासि ना गवसे ॥
नृसुखहनानिं टपुनि जसा मंडुक भक्षावयासि नाग वसे ॥१२॥
तरला यांत कवण नर, सांगाया शक्य हें न इतिहास ॥
मग मर्त्य काय सांगे, करति न याचा सुसाधु सहवास ॥१३॥
टाळुनि तयास वसती गिरिगव्हरिं, म्हणुनि काय भेरू ते ॥
न जसेंचि कधिं ह्मणावें लघु टेकाहूनि सान गेरूतें ॥ १४ ॥

साधु जन श्रेष्ठ खरे, परि हा संसार त्यांहि दर दावी ॥
मग या जड मूढ जना तो बहुदुःखद न काय दरदावी ॥१५॥
संसारसिंधु तरणें शक्य न सज्ज्ञानि लोकसमुहातें ॥
यास्तव यांतुनि तारक तूं एक, ह्मणुनि तुलाचि नमुं हातें ॥१६॥
ढकलियलें, देववरा, कां या दुस्तर असह्य संसारीं ॥
तुजविण कोण, विभो, वद या दीनाचा सुताप हा सारी ॥१७॥
कृतकर्म निस्तरावें, ह्मण ऐसी प्राकृतांत, कर्त्यानें ॥
अससी तूं जगकर्ता, प्रार्थावें तुज यदर्थ मर्त्यानें ॥१८॥
ह्मणणें न तुज न साजे, कां तरि देऊनि चित्त आइक रे ॥
बुडतां जलीं स्ववत्सा प्राणहि वेंचूनि काढि आइ करें ॥१९॥
निज लेंकरूं न ह्मणसी, तरि तुज हसतील साधुसंतमुनी ॥
तारिसि अतां न जरि या, गेलें ह्मणतिल तुझें मन भ्रमुनी ॥
संसारजलधिमग्ना कोठुनि होईल सौख्य तिलभर तें ॥
विसरुनि तव पदपद्मा दुःखाचे नित्य वाहतिल भर ते ॥२१॥
आतां पुरे करी हें, किटले ऐकूनि कान, रडगाणें ॥
ह्मणसी, परि गाइन मी, तारिसि तोंवरि, असीच रड गानें ॥
देवा, त्वन्मायेचा आहे संसार एक हा खेळ ॥
तो फार मोहक असे, त्यापासुनि कोण अन्य राखेल ॥२३॥
त्वन्माया भवडोहीं, देवा, बुडवी भल्याभल्यांलाही ॥
आहे तापद रविच्या तापाधिक ती, क्षणांत करि लाही ॥२४॥
तीचा प्रभाव ऐसा, जें अनृत किं ऋत असेंचि वाटावें ॥
तैसें सत्य असत्यचि, काय खरें तें न होउं दे ठावें ॥ २५॥
दुःखद संसारभरें विशिखासनतुल्य देह हा लवुनी ॥
गेला, तथापि कोणी श्रमला ह्मणती न तोंड हालवुनी ॥२६॥
आली जरा शरीरीं, गोचरसमुदाय जाहला नष्ट ॥
तरि तैलयंत्रवृषभासम करणें लागती सदा कष्ट ॥ २७ ॥

देवा शिणलों, शिणलों, सांगावें हें किती तरी वदनें ॥
येउनि दया तवोदरिं ना भी धार्मी अतां तरी वद ने ॥२८॥
क्लेश न होति सहन या संसाराचे, ह्मणूनि आरडतों ॥
हतसुतवार्ता परिसुनि तज्जनक जसा करूनि आ रडतो॥२९॥
सोशियले अजवरि ते तरुणतनुबळें कशा तरी विधिनें ॥
सोसे न अतां, न कळे लिहिलें प्रारब्धि काय तरि विधिनें ३०
पापी हें सत्य, परी आहें भावें प्रभो पदीं नत मी ॥
तूं करुणरवी असतां बुडणें हा योग्य काय दीन तमीं ॥ ३१ ॥
उद्धरिसी जड बहु तूं, त्यापरि कां या न, सांगणें मजसी॥
कुस्त्री पतिच्छलार्थीं करिते निज मानसांत नेम जसी ॥३२॥
तैसा त्वां म्हणुं केला, तरि हें म्हणणें किती अमंगल हो ॥
इच्छील काय माता स्वसुताचें मानसीं न मंगल हो ॥३३॥
आहें बहु जन्मींचा पापि तसाही महान अपराधी ॥
करणें क्षमा विहित तुज, त्यागिल कां जनक तोकिं अपरा धी
चुकलों, तरि 'न चुकावें पुनरपि' ऐसें प्रभो वदा याला ॥
खर्चे तुझें होय, तरी होऊ दें काय तें वदायाला ॥ ३५ ॥
मम मंतु पोटिं सांठवि, सांठविले अमित कोश उदरांत ॥
होऊनि दयार्द्र ह्मणा, 'तारीतों तुज, नको पडुं दरांत' ॥३६॥
रक्षावे शरणागत, बांधियलें ब्रीद हें तुवां स्वभुजीं ॥
नत हा परी न दिसला, न असें, कृत नेम चालवा प्रभुजी ॥३७॥
बहुतांतें उद्धरुनी, देवा, शिणलासि काय, सांग मशीं ॥
वदती निरालस तुला, आळशिसा तूं अजी कसा गमसी ॥ ३८
योगक्षेम जगाचा चालविणें, काज हें तुवां वरिलें ॥
मी कां जगबाह्यींचा, मजविषयीं ते न हेतु वा वरिले ॥३९॥
संसारी परवशता तितकी व्यवहारिं ना दुज्या जितकी ॥
विकते अलभ्य तनुला राहूं दे ना तथैव ती जित कीं ॥४०॥

संसृतिच्या दुःखाहुनि ऊन बहू दुःख घोर नरकाचें ॥
सांप्रत अतिप्रिय महा आहे ज्यां, ते खचीत नर काचे ॥४१॥
मानक्षय बहु भूषण वाटावें काय जाणत्यांनाही ॥
ही होय कालसत्ता, काय करावें, उपाय त्या नाहीं ॥४२॥
कालापुढें कुणाची विद्वत्ता ज्ञानशक्ति चतुराई ॥
न चले, जैशी गिरिला तूर्की जिंकील काय हो राई ॥४३॥
कालाधीन असें मी, हें ऋत, परि काल तो तवाधीन ॥
काले यदर्थ न नता बुडवी नौका जसा जलाब्धी न ॥ ४४ ॥
जरि तूं मौन कलियुगीं धरुनी कांहीं न बोलसी बोल ॥
तेंही मान्य मज असे, पीडि न आसि त्या स्वमान तरि डोल ॥
न रुचे हेंहि तव मना जरि, तरि करि हरि बरी करीं संज्ञा ॥
मग काय काल करितो, भूपाग्रीं काय किंकर-आज्ञा ॥ ४६ ॥
कालासि दोष देणें हाही अपराध मानसा दिसतो ॥
कालातें कारण नृप, नृपकर्मा करिल काय माणुस तो॥४७॥
तूं काल, तूं महीपति, तूं मन, तूं मोह, शक्ति, तूं माया ॥
तूं कार्य, तूं करविता, कर्ता तूं, मी ह्मणेन हें वाया ॥४८॥
मी अज्ञ, मला भाजी हा संसृतिजातवेद पापड से ॥
तूं सर्व करविताची, यास्तव मजलागिं केवि पाप डसे ॥४९॥
या न्यायें अघहिन मी आहें, तरि कां मला न उद्धरिसी ॥
स्वीकारुनि अनयपथा मद्विषयीं कोप कां मनीं धरिशी ॥५०॥
वाचालता सलगि तशि करितों बहु, ह्मणुनि तूं न कोपावें ॥
ओपावें भक्तिरसा, याहुनि कांहीं मला नको, पावे ॥५१॥
राखी सर्वां बहुसुखि, तैसें द्यावें चिरायु सर्वांस ॥
निष्काम दास नचि हा, तरि देइ न या तथापि दुर्वास॥५२॥
इच्छाहीन नरानें कांहीं तुज मागणें न हें विहित ॥
आहे सकाम मी, तरि करि मम होईल तेवि जेवि हित॥५३॥

देसी निष्कामि जना अलभ्य सायुज्यता वरा मुक्ती ॥
मग तव सेवा न घडे, तरि असणें बरि सकाम ही युक्ती ॥५४॥
केवि असें, तें परिसें, नाहीं सुख दुःख ज्यांत तें जनन ॥
व्यर्थ कसें न ह्मणावें, होतें श्रवणाविणे जसें मनन ॥५५॥
मोक्षप्राप्ति जयांनीं साधिलि तत्सर्व नाहिं का सरलें ॥
येउनि भूतालिं जन्मा काय तयांचें जगांत मग उरलें ॥५६॥
सृष्टिसुखासुख-अनुभव ज्या वारंवार तो न लाधतसे ॥
तो पुरुष व्यर्थ न का, टाकुनि उद्योग बैसणेंचि जसें ॥५७॥
घ्यावा जन्म, मरावें, देखावें सृष्टिच्या चमत्कारा ॥
जें यांत सौख्य आहे, होय कसें प्राप्त तें निराकारा ॥५८॥
यास्तव साधुनि मुक्ती व्हावें मग शून्य, हें मला न रुचे ॥
लावावा कंटकतरु तोडुनि गृहिं जेवि रोप सुरतरुचें ॥५९॥
वा भिरकावुनि परिसा पाषाणचि संग्रहांत राखावा ॥
किंवा सुधारसातें सांडुनि चिखलांत धोतरा खावा ॥६०॥
मम मागणें असें हें आहे विपरीत, हें मला समजे ॥
दोषितिल मुमुक्षु, परी दोष न देतील मन्मतासम जे ॥६१॥
तूं निरुपाधी असुनी स्वीकारिसि जेवि जगदुपाधीला ॥
मी ग्रस्त उपाधीनें, स्थिर ह्मणुनी बैसवे न मद्धीला ॥६२॥
एवंच बैसणें स्थिर कवणाही वाटतें न हितकर तें ॥
याचि नयें हें माझें मोक्षाची वासना न मन करितें ॥६३॥
क्षीरार्णवांत वससी तूं, मी वसतों वसुंधरेमाजी ॥
या बहु दीर्घांतरिं मग होय श्रुत हांक केवि रे माजी ॥६४॥
ऐसी अनुचित शंका मनिं ये, परि जाहली स्मृती मजसी ॥
तूं सकल जगद्व्यापक व्यापुनि सकलां दशांगुलें उरसी ॥६५॥
श्रुतिशास्त्रोक्ति असीची, मग मम ऐकूं न येति कां हांका ॥
वा बहु पापी, म्हणुनी न गमे तुज पात्र भावुका हा का ॥६६॥

किंवा प्रभंजनानें दिधलें उडवूनि दीन-हाक-रवा ॥
न दिसे योग्य दयेला, तरि इतरा हस्ति योग्य हा करवा ॥६७॥
त्वां निजभक्तां ठायीं ठेवियली शक्ति पापि-उद्धरणीं ॥
कथि त्यां, होतिल मज ते या संसारार्णवांत उत्तरणी ॥६८॥
संसारविमुक्त नरा कलिकालहि पीडितो न भीत मनें ॥
करुनि दया तूं माझें संसारोत्थित महा नभीं तम ने ॥६९॥
लटपट खटपट चटपट वटवट पुटपुट करी स्तवार्थ मुखीं ॥
हा खट नट शठ उद्धट झटपट कटपट करूनि राखि सुखी ॥७०॥
सर्वज्ञ सर्वसाक्षी असुनी दिसला न काय पामर हा ॥
दिसला तरि करुनि कृपा सांगे, ना भी अतां विराम रहा॥७१॥
ह्मणसी, स्मरति मला जे, तत्कल्याणार्थ कास मी कसली ॥
स्मरतों वा न स्मरतों निशिदिनिं, ही स्मृति मनीं न का वसली ॥
माता सलक्ष परिसे मारियल्या लघुरवेंहि तोकांनीं ॥
हाका दीर्घ रवें मी मारीं, परि त्या न येति कां कानीं ॥७३॥
मूकत्व कलित धरिलें, तेव्हां वधिरत्व दावणें विहित ॥
यांतहि वक्र न कांहीं, साधिति वहु बुद्धिमंत वेश हित ॥७४॥
जरि वधिर तुज ह्मणावें, धावसि किति एक दास-हाकेला ॥
तैसें धावुनि सत्वर तृप्त न कां एक दास-हाकेला ॥ ७५ ॥
स्वजनेच्छा परिपूरित करितां व्यय होय, मानसी वाटे ॥
परि हें न योग्य, जैसें देतां जलबिंदु सिंधु का आटे ॥७६॥
शरणागतीं न धरणें तिळभरिही वक्रता मनीं, देवा ॥
जैसें तव इच्छेसी येइल, त्यापरि तया न दे, दे वा ॥७७॥
प्रारब्धि नसे ह्मणुनी दासें तुज आळवूनि मागावें ॥
देसि न तथापि, मग त्या त्वद्भजनीं शिर लवूनि कां गावें ॥७८॥
होइल असें कसें हो, कथिलें कीं वेदशास्त्रनीतनयें ॥
प्रार्थावें प्रभुसि जसें निज मातेतें पुनःपुन्हा तनयें ॥७९॥

येतील तिच्या करुणापारावारा भराभरा लहरी ॥
आह्मां जनक जगाचे, मग कां न तसें तुह्मी कराल हरी ॥८०॥
झिडकारिलें कितीही शिशुला दावूनि कोप मायेनें ॥
तरि घे क्षणें जवळि ती जैसें, तैसें न कोणि मायेनें ॥८१॥
हा नयपंथ अनुसरुनि वाहीन तुला पुनःपुन्हा विनयें ॥
कूपपतितसुतवार्ता माता परिसूनि शीघ्र केवि न ये ॥ ८२ ॥
परि कां न येसि, न कळे, पडली कां भीड साधुसंतांची ॥
जासि अधीं तिकडे, मग कैची स्मृति या सुदीन पंताची ॥८३॥
श्रेष्ठांची रीति असी, त्यागुनि अधि थोर दीन पाळावे ॥
ती लंघिशि दोष कसे दीनें तुह्मां वरांस लावावे ॥८४॥
स्तब्ध रहावें, तरि हा बुडवी संसारसिंधु, नचि तारी ॥
दे प्रभु जन्म, न तारी, चित्रीं दे जीव जेवि न चितारी ॥८५॥
देवा, एक विनंती दासाची परिस चित्त देऊन ॥
ह्मणसि, अहंता सकलें त्यागावी आत्ममानसांतून ॥ ८६ ॥
अन्यासि बोध करण्या बोधकिं गुण तोचि पाहिजे वसला ॥
तैसा प्रकार मजला, देवा, तिळही तवांगिं ना दिसला ॥८७॥
ह्मणसी, सकळां व्यापक, मी कर्ता करविताहि, मी हंता ॥
सर्वे मला भजावें, ही काय वसे तवांगिं न अहंता ॥ ८८ ॥
भू नभ जल तेज अनल, मी स्थिर चर, बुद्धि, मीच जीव शिव॥
मी दानव, मी मानव, मी सुर, मी आत्मभू गभस्ति शिव ॥८९॥
या सर्व तवोक्तीनें निरहंकारी ह्मणेल कोण तुला ॥
त्यागा तुम्ही अहंता, हें कथणें योग्य होय कां अतुला ॥९०॥
एवंच अहंकारें नाहीं कवणाहि सोडिलें पाही ॥
मंतुक्षमा दयेनें करि, तेवि कुतर्क खोडि लेपा ही ॥९१॥
या मम विनंतिशतकीं मंतु तसे जाहले प्रमादाती ॥
ते क्षामक तूंच, जसी करिते शिशुचे प्रसू जननदाती ॥९२॥

वत्स जसें भलभलतें अज्ञत्वें बोलतें स्वमायेतें ॥
परि ती क्षमाच करिते, तैसें हें लेकरूं शरण येतें ॥ ९३ ॥
याची इच्छा बरवी पुरवी, नुरवी कुबुद्धि, जेंवि रवी ॥
नासुनि अनंतहि तमा दीप्तीनें मेदिनी नभा भरवी ॥ ९४ ॥
दुःखी खराच, ह्मणुनी हा उद्धारार्थ काकुलति येतो ॥
सुदया अजामिलाचें देखियलें सांग कां कुल तियें तों ॥९५॥
झाला भावें हा हें तत्श्रम परि व्यर्थ जाति न तयाची ॥
अर्ध पळीं उद्धरिला करि, तें पाहासि जाति न तयाची ॥९६॥
बुडवी भवसागर हा, कथितों हें नाननेंचि लेखांहीं ॥
ऐशा पुनीत करि तूं, पापीव न मानवेचि लेखा ही ॥९७॥
मग होइल धन्य जगीं होइल सार्थक्य कायजननाचें ॥
होय तव कृपा ज्यावरि, धन्य ह्मणुनि तो न काय जन नाचे ९८
स्तव हा पुरे करीतों वंदुनि तारक पवित्र पदकमला ॥
दे नामस्मृति, होइल ती उद्धरणार्थ कंठिं पदक मला ॥९९॥
नामस्मरणें तरला नाहीं, ऐसा जगांत नाढळला ॥
पावुनि परम सुखातें तो नर संसारयातना टळला ॥१००॥
मान्य करावी, देवा, वेडी वांकुडि सान हे विनती ॥
त्यागुनि वात्सल्यकृती शिरवावें मानसा न हेविं नतीं ॥१०१॥
श्रीप्रार्थनाशतक हें प्राकृतिं गाई सदाशिवात्मज तो ॥
झालें पूर्ण ह्मणूनी प्रौढत्वानें न मानसीं सजतो ॥१०२॥

प्रकरण ५४ वें.

हरिश्चंद्राख्यान.

मंदाक्रांता.

श्रीभर्गांबाप्रियतम गणाणीश सिद्धिप्रदानी ॥
वंदूं त्याचे प्रथम चरणीं होउनी बद्धपाणी ॥
देतो सिद्धी सुरमुनिनरां नाशुनी अंतराया ॥
देवो मातें रविकुलकथा उत्तमा बुद्धि गाया ॥ १ ॥

स्रग्धरा.

आयोध्याधामिं होता सुशिल नृप हरिश्चंद्र नामाभिधाना ॥
ज्याची कीर्ति त्रिलोकीं रविकिरणसमा कोंदली दीप्यमाना ॥
भार्या तारामती ती परम सतिवरा, पुत्र तो रोहिदास ॥
सत्त्वाचा पूर्ण सिंधू, सुतसम सकलां पालि धेनुप्रजांस ॥२॥

शार्दूलविक्रीडित.

एके वासरिं ये नृपा सदनिं तो स्कंधीं विणा घेउनी ॥
श्रीनारायणनामघोष करितो टाळी करीं पीटुनी ॥
त्रैलोक्यांतरगामि नारदमुनी देखूनि सिंहासनीं ॥
रायें बैसवुनी तदा पुजियलें पादांबुजा वंदुनी ॥ ३ ॥

इंद्रवज्रा.

संतुष्ट झाला मुनि आदरानें ॥ प्रेमें नृपातें धरुनी करानें ॥
आलिंगि जैसी जननी सुताला ॥ बोले, सदा क्षेम वसे नृपाला ॥

मालिनी.

शिवद वच वदूनी पातला स्वर्गलोकीं ॥
सहमुनिसुर शक्रा संसदीमाजि लोकीं ॥
कथि विधिज तदा तो, भूतलीं सत्त्वशील ॥
त्रिभुवनिंहि हरिश्चंद्रापरा नाढळेल ॥ ५ ॥

आर्या.

तुकवुनि मान वसिष्ठें कथिलें, हें सत्य सत्य सत्य असे ॥
धुंडाळितां त्रिलोकीं तत्सम भूपाल तो दुजा न दिसे ॥ ६ ॥
परिसुनि गाधिज बोले क्रोधानें, सत्त्वहानि मी करिन ॥
न घडे जरि हें, त्यातें जन्मार्जित तपफलासि अर्पीन ॥ ७ ॥
करुनी असी प्रतिज्ञा शक्रसभेंतुनि मुनि त्वरें उठिला ॥
ये भूतलिं, सुचवि मनीं सुजनछलोपाय सुचति जे कुटिला ॥८॥
इकडे वसिष्ठ येउनि साकेतामाजि भूपसदनातें ॥
कथि, सत्त्वहानि न शिवो, विघ्नें जैसीं न दंतिवदनातें ॥९॥
करि भद्रकालिहवना मुनि गाधिज तो निजाश्रमामाजी ॥
मखपूर्णाहुति होतां प्रकटे देवी स्वयें सहसमाजी ॥ १० ॥

इंद्रवज्रा.

मागें, ह्मणे, शीघ्र मुने वरातें ॥ ठेवी शिरीं तैं वरदा करातें ॥
निर्मी, ह्मणे, क्रूर पशू अमीत ॥ श्री त्या वरा देउनि होय गुप्त ॥

शार्दूलविक्रीडित.

नाना हिंस्रक ऋक्ष जंबुक महाशार्दूल दंष्ट्री हरी ॥
तैसे गंडक सैरिभ प्रचुर ते उन्मत्त उष्ट्रे करी ॥
क्रोधें संचरती वनोपवनिं, ते संत्रासिती मानवां ॥
झाली स्तब्ध कृषि, प्रजा कथितसे भूपाप्रती तेधवा ॥१२॥

कामदा.

श्वापदें बहू रानिं माजलीं ॥ सर्वही प्रजा फार गांजली ॥
मार्ग नाचले संकटाप्रती ॥ वारि तूं, दयासिंधु भूपती ॥ १३ ॥

मालिनी.

परिसुनि जनवार्ता भूपशौर्याब्धि दाटे ॥
परि गुरुवचनोक्ती-लंघना भीति वाटे ॥
कथुनि मजसि गेले, काननातें न जावें ॥
परि निजजनदुःखा कोणि आतां हरावें ॥ १४ ॥

आर्या.

गुर्वाज्ञाभंगाचा आला जरि दोष माथिं वाहीन ॥
परि पौररक्षणार्थी प्राणत्यागाहि सिद्ध राहीन ॥ १५ ॥
करुनि मनिं विचार असा सह मंत्री कटक घेउनी विपिनीं ॥
जाई पशुहननातें, पशुभय शूरा शिवे नच स्वप्नीं ॥ १६ ॥
वधिले असंख्य भल्लुक, तैसे बहु मत्त दंति केसरि ते ॥
नाना व्याघ्र मृगादन वृक जंबुक, कानना करीत रितें ॥१७॥
आला वनिं नृप पाहुनि लाधे मुनि चित्तिं हर्षरंगाला ॥
निजहेतुसाधनास्तव निर्मी कपटें कनक कुरंगाला ॥ १८ ॥

इंद्रवज्रा.

आला नृपाग्रीं मृग वेशधारी ॥ चांचल्य तो दावुनि जाय दूरी ॥
पृष्ठीस धावे वनिं त्या धराया ॥ तों गुप्त झाला, श्रमि फार राया ॥
विश्रांतितें शोध करी स्थलाचा॥तों देखिला आश्रम गाधिजाचा॥
जेथें करी केसरि भल्ल गायी ॥ सप्रेमभावें स्थिति एक ठायीं ॥२०॥
श्रीगौरिभर्गालय दीप्यमान ॥ शोभे सरोंबु स्फटिकासमान ॥
सौगंधिपुष्पान्वित वृक्षहारी ॥ भूपासि योग्य स्थल तें विहारीं ॥

आर्या.

येउनि सक्रोध मुनी बोले, मद्वृत्सपशुंस कां वधिलें ॥
त्वां मत्पराक्रमातें निजगुरुवदनें न काय आयकिलें ॥२२॥
झालासि मदांध, नृपा, राज्यमदें मातलासि अनिवार ॥
परि सहन करी आतां रे मम बहु तीव्र कोप-तलवार ॥२३॥
वंदुनि नृप नम्र वचें बोले, मुनिनायका, क्षमा करणें ॥
परि तो शांत न होतां गेला ताडीत भूमितें चरणें ॥ २४ ॥
करुनि स्नान सरोवरिं करि सहभार्या शिवांबिका-पुजन ॥
व्हाया श्रमशमन तदा महिषी-अंकीं नरेंद्र तो शयन ॥२५॥

द्विजवेषें स्वप्नीं ये, दारिद्र्यें व्यापिलें, म्हणेचि मुनी ॥
सत्कारुनि बोले नृप, 'काय मनोरथ वदा' पदा नमुनी ॥२६॥
दे छत्र चामर, तसें निजसिंहासनहि, दे प्रजा सकला ॥
'दिधलें' म्हणतां हणिली कालपुरुषें शिरांत आरगला ॥२७॥

वसंततिलका.

झाला भयार्त नृपती, बरळेचि झोपीं ॥
देखोनि जागृति तया सति हस्ति ओपी ॥
कां भीतितें नरपते मनिं लाधलासी ॥
दुःस्वप्न तो तंव वदे सचिवा प्रियेसी ॥ २८ ॥

इंद्रवज्रा.

तैं पातला गाधिज, तो ह्मणे कीं ॥ दे दक्षिणा विंशति अष्ट तूकीं ॥
हेमासि मातें, तरि तृप्त जाणें ॥ अर्पीन साधो, सदनासि येणें ॥

मालिनी.

वहनिं बसवुनी त्या भूप चाले पदानें ॥
त्यजुनि जनहि पायीं चालती आत्मयानें ॥
विविध सुखद वाद्यें वाजती तालगीती ॥
मिरवित नृपगेहीं गाधिजा आणिताती ॥ ३० ॥

भुजंगप्रयात.

वसे जाउनी भूपगेहीं कपाटीं ॥ करीं घेउनी तापली लोहकाठी ॥
नृपें अर्पिलें सर्व हें दानिं मातें॥ह्मणे, मान्य आतां मदाज्ञा तुम्हांतें॥

इंद्रवज्रा.

क्रोधें धरूनी महिषीकचांतें ॥ ओढोनि बोले कठिना वचातें ॥
द्या दक्षिणेतें,अवधी न कामा ॥ बोलूनि ताडी भयभीत रामा ॥३२॥

भुजंगप्रयात.

रडे ओरडे नायकेची परीतो॥तदा भूपती पादपद्मा धरी तो ॥
ह्मणे स्थीरता मानसीं स्वल्प यावी क्षणें दक्षिणाआपुली स्वामिघ्यावी

शार्दूलविक्रीडित.

भांडारें उघडूनि सेवकजनां आणा ह्मणे कांचना ॥
घाला तोलुनि भूसुरा पदरिं तें, संतुष्टवा तन्मना ॥
तैं क्रोधें मुनि बोलिला नृपतितें, देसी कुणाच्या धना ॥
दानीं सर्वहि अर्पिलें असुनिया कां चित्तिं दुर्वासना ॥३४॥

इंद्रवज्रा.

दे सत्वरी कांचन तोलुनी तें ॥ पाडी नृपा ताडुनि मेदिनीतें ॥
होतात कष्टी जन पाहुनीया ॥ देऊं अह्मी बोलति तापनीया ॥३५॥

भुजंगप्रयात.

ह्मणे तो, प्रजा तेवि संपत्ति माझी ॥
तुह्मां अर्पिण्या स्वामिता नाहिं आजी ॥
हरिश्चंद्रतारामतीतेंहि दंडें ॥
हणी, पाहुनी तें प्रजाचित्त खंडे ॥ ३६ ॥

द्रुतविलंबित.

नमुनि बालक दीन वचें वदे ॥ क्षणभरी सुदयानिधि वाहुं दे ॥
शरिर विक्रायिं हें मम घालिन॥सकलही ऋण तें द्रुत देइन ॥३७॥

वसंततिलका.

बोले मुनी, कवण हा, सुत हा कुणाचा ॥
घेतों शिरीं सकल भार, ह्मणे, ऋणाचा ॥
रायें तदा कथियलें, रविवंशि यास ॥
मत्पुत्र यासि ह्मणती जन रोहिदास ॥ ३८ ॥

प्रभावती.

त्रिवर्ग हे जरि वसतील मीलितें ॥
मदीय होइल सुतपासि हानि ते ॥
करूनि मानसिं सुविचार तापसें ॥
वसे न देशिं मम, नृपा वदे असें ॥ ३९ ॥

मालिनी.

परिसुनि मुनि-आज्ञा बोलिला काय राया ॥
करिन गमन आतां काशिखंडीं वसाया ॥

वसुमति नवखंडाहूनि तें खंड भिन्न ॥
त्रिदश दिनिं तिथे मी अर्पिन, स्वामि, रीण ॥ ४० ॥

आर्या.

न घडे सत्य जरी हें, तरि मत्क्रोधानलीं करीन हुत ॥
सहनंदन सहजाया, बोले ऐसें अशांत गाधिसुत ॥ ४१ ॥
त्यजुनी स्वपुर निघे, तैं झाला आक्रांत थोर पौरजनीं ॥
टाकिति धूलि स्वशिरीं, तेणें दिन असुनि भासली रजनी॥४२॥
हा दुष्ट सत्य कौशिक कौशिकधर्मानुसार वागतसे ॥
याच्या तमःक्रियेनें केलें आह्मांस जीवितां मृतसे ॥ ४३ ॥
रे रे दुष्ट कृतघ्ना, नृपरविला केतुसा कसा गिळसी ॥
गहिवरुनी बहु ह्मणती, भूपा, आह्मां अतां कधीं मिळसी॥४४॥
शांतवुनि नृप म्हणे त्यां, जातों कीं लोभ तो कमी न करा ॥
मुनि आज्ञा मानावी, जोडा,तुमचाचि तोक मी,न करा ॥४५॥

इंद्रवज्रा.

आला मुनी तैं द्रुत धावुनीया ॥ जातां कुणाचे नग घेउनीया ॥
ऐसें वदे तो, मग त्या सतीनें ॥ काढूनि दीले नग त्यास तीनें ॥४६॥

भुजंगप्रयात.

हरिश्चंद्र तारामती रोहिदास ॥ त्यजूनी वनीं जाति संपूर्ण दास ॥
यदग्रीं सदा तिष्ठती वेत्रधारी॥वनीं एकले चालती पादचारी॥४७॥

आर्या.

मुनि आज्ञापी रविला, तपणें अत्यंत तीव्र तापांनीं ॥
तैसें वरुणाहि वदे, करि अजल वन, न कुठे मिळो पाणी ॥४८॥
उष्णें तनु होरपळे, बिंबाधर चारु ते अती सुकले ॥
नुचले चरण, व्याकुल होती, सत्त्वा परी न ते चुकले ॥४९॥
तनय श्रमित विलोकुनि तारामति शीघ्र घेइ त्यासि कडे ॥
करि छाया स्वपटाची, कुरवाळुनि पाहि तन्मुखेंदुकडे ॥५०॥
तों बाल ह्मणे, पाणी दे, जननी, लागली तृषा बहुत ॥
या तीव्र आतपानें होइल तनु काय हे, कळे न, हुत ॥५१॥

'पाणी पाणी' ह्मणतां गेला शोधार्थ भूप सरवापी ॥
शोधी बहुपरि, परि त्या झाल्या शुष्क प्रदीप्तरवितापीं ॥५२॥
जलहीन परत नृप ये, पाहुनि सुत देह टाकि धरणिवर ॥
पडला अचेतन, करी तें अवलोकूनि शोक धरणिवर ॥५३॥

इंद्रवज्रा.

घाली पटें शीतल मंद वात ॥ होऊनि तो सावध पाहि तात ॥
कंठीं मिठी घालुनि याचि पाणी ॥ ये भूपतीच्या नयनासि पाणी ॥

वसंततिलका.

तारामती गहिंवरें अति दाटली ते ॥
पाहूनि पाक्षिहृदयें बहु फाटलीं तें ॥
छाया पराचि करिती हृदयीं द्रवोनी ॥
राहे परी मुनिमना न दया शिवोनी ॥ ५५ ॥

कामदा.

चालती बहू कष्टिं काननीं ॥ विप्र होउनी पातला मुनी ॥
रुतती खडे मार्गिं पांथिका ॥ दे ह्मणे नृपा चर्मपादुका ॥५६॥

शुद्धकामदा.

सहकलत्र मी क्षेत्रिं चालिलों ॥ परिसुनी तुझी कीर्ति धावलों ॥
पथिं पहा अह्मां सौख्य होइल॥जरि उपानहां शीघ्र देसिल ॥५७॥

कामदा.

सत्त्वसिंधु तो काढुनी करीं ॥ दे उपानहा, तुष्ट त्या करी ॥
काजवा कसा भानु झाकिल ॥ विघ्ननायका विघ्न भक्षिल ॥५८॥

आर्या.

कंटक कंकर रुतती, शिरिं आतप, तप्त भूमिका चरणीं ॥
वाहे रुधिर पदांतुनि, दैवाची बहु विचित्र हो करणी ॥५९॥
पाडी भेद तिघांतहि, लावी कपटें तिघांहि तीन पथां ॥
पिडिलें तृषें बहु, परी त्यजतिल ते काय साधु सत्त्वपथा ॥६०॥
निर्मिलि मायिक अद्भुत मार्गीं बहु रम्य कौशिकें वटिका ॥
स्थापी प्रपास्थलातें, करुं पाहे सत्त्वहानिसी त्वटिका ॥ ६१ ॥

इंद्रवज्रा.

घेऊनि हातीं जलपात्र धावे ॥ प्राशूनि, भूपा, श्रमशांति पावें ॥
चाले गृहातें, करि भोजनासी॥वांछीत देतों पथिका जनासी ॥६२॥

मालिनी.

नमुनि नृपति बोले पाणि-शालोदकासी ॥
दिनकरकुलवंशी आह्मि सेवूं न त्यासी ॥
जरि मरणहि आलें धार्मिकां दैवयोगें ॥
तरि न शिवुंचि जाणे धर्म-अन्नांबु आंगें ॥ ६३ ॥

भुजंगप्रयात.

मुनी बोलिला, देहसंरक्षणेंची ॥ घडे प्राप्ति गा धर्ममोक्षादिकांची ॥
बळेंची करीं त्या धरी, चाल, बोले॥ नृपें नायकीलें, स्वपंथेंचि चाले ॥

स्रग्धरा.

आली तारामती तैं श्रमित बहु असी मार्ग-उल्लंघनांनीं ॥
तैसी व्याप्ता तृषेनें, पतिसुतविरहें म्लान मुद्रा सुखिन्नी ॥
देखोनी तापसी ये विमल सलिल तें भाजनीं घालुनीया ॥
'प्राशी प्राशी' ह्मणे तो बहु मधुर वचें पाणितें जोडुनीया॥६५॥

इंद्रवज्रा.

साध्वी तदा ती तिकडे न पाहे॥तो व्याजि मार्गांत उभाचि राहे ॥
घे शीघ्र कां यास विलंब आतां॥देतों सदा मी पथिकां तृषार्तां॥६६॥

उपेंद्रवज्रा.

सती तदा लावुनि हस्त भाळीं ॥ ह्मणे, विधीनें लिहिलें कपाळीं ॥
चुके न साचें, परि सत्त्वहानी ॥ न होय ऐसें करि, चक्रपाणी ॥६७॥

मंजुभाषिणी.

मुरडोनि पंथ सति चालली त्वरें॥मुनि कोपुनी वदत काय उत्तरें॥
बसला सुखेंचि पति पैल मंदिरीं॥अवलोकि,तो तुजाति पालवी करीं।

शिखरिणी.

प्रपागारीं पाहे निरखुनि सती तो नरपती ॥
मृदू तल्पीं निद्रा करित, चरणा नारी चुरती ॥

ह्मणे, कैसें झालें, विपरित बहू आजि दिसतें ॥
तमें गुंडाळीलें रविस अथवा पर्वतसुतें ॥ ६९ ॥

इंद्रवज्रा.

झालें कसें हें जगदीश राया॥कां भ्रांति आजी पडली वरा या ॥
गेला जरी प्राण, न घें जला मी॥बोलूनि झाली निजपंथगामी॥७०॥

यूथिका.

रोहिदास चरणीं हळु चालतां ॥ माय सोडुनि वसे बहु मागुता ॥
काननीं स्वजननीजनकांप्रती ॥ शोधितां श्रमित होउनि त्या पथीं ॥

शुद्धकामदा.

विपिनिं देखुनी बाल एकला ॥ मुनि ह्मणे, करूं सत्त्वहानिला ॥
उदकभाजना घेउनी करीं ॥ वदत, रे मुला, पान हें करी ॥७२॥

मालिनी.

जननि जनक तूझे सेवुनी शीत नीर ॥
कथुनि मजासि गेले, पृष्ठिं येतो कुमार ॥
क्रमण करुनि पंथा जाहला श्रांत, त्यातें ॥
शितल सलिल द्यावें, बोलिले ते अह्मांतें ॥ ७३ ॥

शुद्धकामदा.

परिसुनी मुनी-वाणि अंतरीं ॥ पतन पावला दुःखसागरीं ॥
नचि घडे असें पूर्वजां करीं॥ वरिल हंस का काकसुंदरी ॥७४॥

आर्या.

करुनी प्रणाम मुनिला परिसा तो बाल काय बोलतसे ॥
धर्मार्थतोयपानें या रविवंशा कलंक लागतसे ॥ ७५ ॥
ऋषि-ऋण आम्हां मस्तकिं, व्हाया उत्तीर्ण देह खरचीन ॥
चुकवीन निरयगतितें, सत्त्वाचा भानु लोकिं दिपवीन ॥७६॥
प्रतिस्पर्धिजनक मुनि तो राहो कीं स्वस्ति, मागुं हें हरिला ॥
फेडूं क्षणांत तद्दण, जिंकिल जंबूक काय तो हरिला ॥७७॥
भूपहरिश्चंद्रगिरी मुनिमूषक काय त्यासि ढासळिल ॥
ऐसें वदूनि गेला निजपंथें तो न सेवितां सलिल ॥ ७८ ॥

शुद्धकामदा.

शिणविलें तुला घोर काननीं ।। म्हणुनि होसि कां स्तब्ध आननीं ।।
स्तनतटीं पहा क्षीर वाहतें ।। उघडुनी मुखा शीघ्र घेइ तें ।।९८।।

कामदा.

पाडसा वदे काय मी करूं ।। एकटें मला तूंच लेंकरूं ।।
तूंहि चालसी आजि सोडुनी।।हस्तकीं कुणा ईस देउनी ।।९९।।

इंद्रवज्रा.

ऐसा बहू शोक सती करी ती ।। बोले मुनी, हे उचिता न रीती ।।
झाली निशी,चाल मदीय गेहा।।दाही प्रभातीं उभयांहि देहां १००
जावें कसें सोडुनि यांस येथें ।। जाईन मी शीघ्र तदीय पंथें ।।
राहोनि आतां करणेंचि काय ।। आक्रोशुनी ती करि हायहाय ।।१।।

त

आर्या.

होऊनि अदृश्य मुनी निर्मी नाना भयप्रदां पशुंसी ।।
करिती भयानक रवा, दाविति सतितें प्रचंड भीतीसी ।।२।।
विक्राल व्याघ्र गाधिज होउनि सक्रोध ये सतीसमिप ।।
हलवुनि पुच्छ अहिपरी घाली प्रेतावरी बळें झडप ।। ३ ।।
उदर विदारुनि नखरें काढी स्नायूंस, भक्षि पिशिताला ।।
प्राशी रुधिर मटमटा मिटक्या मारूनि, दावि भीतीला ।।४।।

कामदा.

वन्हिनें अर्धीं देह कार्पिलें ।। व्याघ्र-आननीं अंतिं अर्पिलें ।।
दैवयोग तो भिन्नची असे ।। तो कुणा कधीं ठाउका नसे ।।५।।

स्रग्धरा.

गेले स्वर्गांप्रती ते पति तनय, अतां राहुनी पाठिमागें ।।
दावावें काय लोकीं वदन, मरण तें ईश्वरापाशिं मागें ।।
नेई शीघ्र स्वधामीं करुनि बहु दया दुःखि ही देवरा ।। ।।
आकर्षी पंच आसू अकलनविधिनें सिद्ध झाली मराया ।।६।।

इंद्रवज्रा.

तें ज्ञानदृष्ट्या मुनि चित्तिं जाणे ॥ केलें जरी आत्मवधासि ईणें ॥
हा दोष लागेल मदीय माथीं ॥ ऐशा विचारासि करूनि चित्तीं ॥७॥

मालिनी.

सहृतनय नृपातें आणि साध्वीसमीप ॥
निरखुनि नयनीं ती जाहला दुःखि भूप ॥
गहिवरुनिचि बोले, शीणलीसी, उठी गे ॥
परिसुनि पतिवाक्या ती नृपपायिं लागे ॥ ८ ॥

इंद्रवज्रा.

आलिंगुनी तोक उरीं धरी ते ॥ झाला पुनर्जन्म ह्मणे तुह्मातें ॥
संपूर्ण वृत्तांत तया कथी ती ॥ विस्मीत झाला महिपाल चित्तीं ॥९॥

शिखरिणी.

ह्मणे, दैवें केलें बहुत बरवें, रीण मुनिचें ॥
दिल्यावीना आह्मां गमन न दिलें कालपुरिचें ॥
असो, आतां नानाविधहि करुनी कष्ट शरिरें ॥
अर्धी ब्रह्मस्वातें अरपिन ह्मणे या निजकरें ॥ १० ॥

भुजंगप्रयात.

कडे घेउनी चालती बालकातें॥पथीं देखिलें अद्भुता आयका तें ॥
महाभीतिदा ओस जी एक पूरी ॥ जयीं संचरे खेचरी रात्रिचारी ॥

इंद्रवज्रा.

पाहोनि तारामति भीति पावे ॥ या तानुल्या केवि अतां जपावें ॥
दुष्टा कुकर्मा शिशुभक्षका ही ॥ रक्षा करूनी सुउपाय कांहीं ॥१२॥

भुजंगप्रयात.

ह्मणे भूपती,रक्षिता विश्वपाल ॥ जयें रक्षिलें वन्हिमाजीहि बाल ॥
नुपेक्षील तो संकटीं, पाहि [illegible]गे॥स्मरूनी तयातें करूं पंथिं जाणें ॥

स्रग्धरा.

मार्गी जातां अपाया करि अदय मुनी होउनी तप्त तैसा ॥
कल्पांतीं चंडभानु प्रखर निजकरें विश्वदाहार्थ जैसा ॥

नाहीं दुःखाविणें त्या पळभरिहि कधीं तापसें सोडियेलें ॥
ऐसे ते एक मास क्रमिति पथ, परी नाचि सत्त्वा ढळाले ॥१४॥

शार्दूलविक्रीडित.

श्रीवाराणसि पुण्यभूमि नयनीं जाता पुढें देखिली ॥
आनंदान्वित चित्तिं होउनि तदा साष्टांगिं ते वंदिली ॥
ब्रह्मा विष्णु महेश रुद्र सुरही जेथें सदा वर्तती ॥
मुक्तिस्थान दुजें नसें त्रिजगतीं, तत्कीर्ति वानूं किती ॥१५॥

कामदा.

पापनाशिनीजन्हुजातिरीं ॥ स्नान साधुनी जाति मंदिरीं ॥
विश्वनाथ ते पूजिती करीं ॥ पातला मुनी तेथ सत्वरी ॥ १६ ॥

शिखरिणी.

करें ओढोनीया अवनिवरि पाडी नृपतितें ॥
म्हणे, झाले रीणा बहुत दिन, दे आजि मज तें ॥
बहू ठायीं ठायीं तुज हुडकिलें, ना गवससी ॥
अतां पाहूं वक्त्रा चुकवुनि कुठे सांग वससी ॥१७॥

कामदा.

हस्त जोडुनी भूप वीनवी ॥ चित्तिं शांतता स्वल्प वागवी ॥
देह विक्रयीं घालुनी अतां ॥ पावतों अजी रीणमुक्तता ॥ १८ ॥

आर्या.

करमुद्रिका नृपा जी दिधली होती त्रिशंकुमहिपालें ॥
तत्तृण घेउनि मस्तकिं बांधुनि तनुविक्रया तिघे सजले ॥१९॥
साध्वी म्हणे, मज अधीं करुनी विक्रय मुनीस तोषाविणें ॥
तैं रोहिदासहि तसें, द्विज यानें दक्षिणा पुरी न, म्हणे ॥२०॥
द्वितुक नृप, एक तुक ते तारामति, अर्ध रोहिदास तुक ॥
ऐसें तोलुनि सत्वर दे मजला दक्षिणार्थ रे कनक ॥ २१ ॥
फिरवुनि पुरी समग्रा आणी गाधिज तिघांहि हाटवटीं ॥
पाहुनि सकलत्र नृपा ठेविति कर गौर ते ललाटपटीं ॥२२॥

कालगति विचित्र पहा, वर्ते सकल प्रजा यदाज्ञेंत ॥
तो तृण बांधूनि शिरीं देह विकायासि जाय हाटांत ॥ २३ ॥

स्वागता.

कालकौशिक तदा कनकातें ॥ देउनी सतिस एक तुकातें ॥
घेइ तो सदनिं पाक कराया ॥जाय वंदुनि सती पतिराया॥२४॥

शुद्धकामदा.

जननि जाय तें पाहुनी सुतें ॥ नयनिं आणिलें दुःख-आसुतें ॥
फिरफिरोनिया माय देखुनी ॥ रुदन तो करी दीन आननीं ॥२५॥

चामर.

रोहिदास विप्रपादिं मस्तकासि ठेवुनी ॥
बद्धपाणि दीनवाणि बोलिला सुभाषणीं ॥
एकवार माय-आस्य लोचनींहि पाहुं दे ॥
राइतुल्य मानसीं दयार्णवासि वाहुं दे ॥ २६ ॥

इंद्रवज्रा.

घेऊनि आज्ञा सुत माय-वाटी ॥ धावूनि येतां धरि त्यासि पोटीं ॥
कष्टी बहू होउनि ओष्ठ ओष्ठीं ॥ ठेवी, ह्मणे गा कधिं सांग भेटी ॥
कंठीं मिठी घालुनि काय बोले ॥ कां आजि लोभामति ऊन केलें ॥
सोडूनि जासी मजलागि आतां ॥ हें योग्य कैसें गमलें स्वचित्ता ॥

स्वागता.

दाटलें गहिवरें सतिकंठा ॥ धांव गा द्रुत ह्मणे शितिकंठा ॥
तानुल्या त्यजुनि मी कसि राहूं ॥ दुःखपर्वत कसा शिरिं साहूं ॥

कामदा

दीन वाणिनें कालकौशिका ॥ प्रार्थुनी ह्मणे याहि बाळका ॥
तूंच घेइ हे धार्मिका महा ॥ गेहिं आवरी स्वल्प काम हा ॥३० ॥

इंद्रवज्रा.

आली दया त्या द्विजसत्तमातें ॥ देऊनि घे कांचन बालकातें ॥
नेई स्वगेहा उभयांप्रती तो ॥ भूपा विकाया मुनि सिद्ध होतो ॥३१॥

यूथिका.

दोन तूक कनकाप्रति अर्पुनी ॥ डोंब वीरभुज भूपतिलागुनी ॥
घेउनी स्वकिय मंदिरिं चालला ॥ खिन्न मानसिं बहू नृप जाहला ॥

इंद्रवज्रा.

डोंबें स्वकांतेप्रति दावुनीया ॥ हा घेतला देउनि तापनीया ॥
या बाह्य कामासि तुवां वदावें ॥ हा दास ऐसें मनिं वागवावें ॥ ३३ ॥

भुजंगप्रयात.

शवातुल्य हा आणिला कासयासी ॥
वदूं काय हो सांगिजे काज यासी ॥
वृथा कांचनातें अजी वेचियेलें ॥
विचारें कसें नाहिं कार्यासि केलें ॥ ३४ ॥

इंद्रवज्रा.

दे मृत्तिकाकुंभ तया करीं ती ॥ गंगोदका आणि ह्मणे स्वहातीं ॥
आज्ञा ह्मणूनी उदका निघे तो ॥ शीर्षीं घटीं नीर भरूनि घेतो ॥ ३५ ॥

भुजंगप्रयात.

पथीं गाधिजें येउनी काय केलें ॥
करें लोटुनी भूतलीं पाडियेलें ॥
तदा मृत्तिकाकुंभ भंगूनि गेला ॥
बहू खिन्न चित्तीं महीपाळ झाला ॥ ३६ ॥

शुद्धकामदा.

भग्न कुंभ करिंचा अवलोकुनी ॥ वीरबाहुललना बहु कोपुनी ॥
ताडिते नृपतितें अदया मनीं ॥ वक्रकालिं शिशु ताडिति कामिनी ॥

वसंततिलका.

हा दीर्घ कुंभ मजला नचि झेंपला हो ॥
देईं दुज्या लघु घटा मज वीरबाहो ॥
कोपासि मानासिं न हो तुह्मि वागवावें ॥
देहासि या निज मनोरथिं वागवावें ॥ ३८ ॥

शुद्धकामदा.

लघु घटें जला ओति रांजणीं ॥ मुनि तया करी छिद्र येउनी ॥
निशिदिनीं भरी बिंदु ना उरे ॥ युवति देखुनी मारि ती करें ॥३९॥

इंद्रवज्रा.

अस्ताचलीं भास्कर गेलिया तो ॥ शुष्कान्न भूपाप्रति डोंब देतो ॥
गंगातटीं स्नान करूनि हातें ॥ पाका करी, तों द्विजवेषि तेथें ॥४०॥

शार्दूलविक्रीडित.

आला गाधिज वृद्ध शुष्कशरिरी काठी करीं घेउनी ॥
संकेतें करिं दाखवी, क्षुधित मी संरक्षि अन्नार्पणीं ॥
जाऊं पाहति आसु पंचहि, असें दावी, पडे भूमिसी ॥
रायें अन्न विभागुनी प्रथमची बैसा म्हणे त्याजशीं ॥४१॥

कामदा.

अन्न आर्पितां शीघ्र ऊठला ॥ आत्मभाग तो सर्व भक्षिला ॥
नेत्र लाविले शेष अन्नि ते ॥ जाणुनी नृपें अर्पिलें हि तें ॥४२॥

इंद्रवज्रा.

ऐसें प्रतीवासरिं भक्षि अन्न ॥ राजा करी जन्हुसुतांबुपान ॥
होई उपासें नचि काज हातीं ॥ डोंबांगना क्रोधि बहूत होती ॥४३॥

आर्या.

गृहकृत्य होय न तया, जाणुनि डोंबें स्मशान रक्षाया ॥
मसणस्तंभ असें त्या देउनि अभिधान ठेविलें राया ॥ ४४ ॥
इकडे तारामति ते सहनंदन राहि कौशिका सदनीं ॥
तच्छल करावयातें अति निष्ठुर चित्तिं सिद्ध होय मुनी ॥४५॥

कामदा.

सेवकासवें पुष्पवाटिके ॥ रोहिदास तें बाल लाडकें ॥
जाउनी अणी पुष्पपत्रिका ॥ काय तैं करी विप्र, आयका ॥ ४६ ॥
तक्षका ह्मणे, जाउनी वनीं ॥ पोर मारिजे शीघ्र दंशुनी ॥
मान्य उक्तितें भोगि जाहला ॥ तो लतातलीं गुप्त बैसला ॥४७॥

इंद्रवज्रा.

तोडीत पुष्पें वनिं संचरे तों ॥ दैवें भुजंगस्थित ठायिं ये तो ॥
व्यालें बलें झेपुनि डंकियेलें ॥ तत्काल पंचासु निघूनि गेले॥४८॥

शुद्धकामदा.

पतन पावला बाल देखुनी ॥ भय बहू शिरे सेवका मनीं ॥
पळत पातले आश्रमाप्रती॥सतिस सांगती जाहली स्थिती ॥४९॥

इंद्रवज्रा.

वाढीत होती द्विजभोजनासी ॥ तों तोकवार्ता कळली तियेसी ॥
दुःखाब्धितें ये भरती तियेच्या ॥ डागावरी डाग बसेचि साचा ॥

शुद्धकामदा.

गहिवरे सती कंठ दाटला ॥ नयनिं अश्रुचा पूर चालिला ॥
थरथरा वपू कांपुं लागलें ॥ अवयवीं बहू घर्म सूटले ॥ ५१ ॥

मालिनी.

स्थिति जरि अशि झाली सद्विचारें तरी ती ॥
निज मनिं ह्मणते कीं, जेविते विप्रपंक्ती ॥
त्यजुनि उठति अन्ना, दोष येईल माथीं ॥
स्वनयन अचलानें पूसुनी वाढि हातीं ॥ ५२ ॥

इंद्रवज्रा.

सारी त्वरें सर्वहि गेह-काज ॥ अस्ता रवी जाउनि होय सांज ॥
तैं कौशिकालागिं उदंत सांगे॥आज्ञा वनातें गमनार्थ मागे ॥५३॥

आर्या.

परिसुनि विनति तियेची कौशिक आज्ञापि, जा, परी परती ॥
ये सत्वरी, ह्मणे तो, जातां तनया स्मरे परीपरि ती ॥ ५४॥

कामदा.

मार्गिं चालतां दुःखसागरीं ॥ पूर येउनी रूदना करी ॥
गुंतलां कुठे तुह्मि भूपती ॥ बाळका पहा काय ही गती ॥५५॥
यामिनी तमीं घोर दाटली ॥ श्वापदें वनीं भुंकुं लागलीं ॥
मार्ग ना दिसे, होय कष्टि ती ॥ पुष्पवाटिके पातली सती ॥५६॥

शुद्धकामदा.

हुडाकि काननीं तानुल्यास ते ॥ स्वधन शोधितो लोभि जेवि तें॥
परि न सांपडे, खिन्न जाहली॥नयन झांकुनी स्तब्ध राहिली॥५७॥

इंद्रवज्रा.

आणोनि तेव्हां शव गाधिजानें ॥ तें ठेविलें सन्निध लाघवानें ॥
लागे तिचा पाद तदा तयाला॥बाळा उठी चाल ह्मणे गृहाला॥५८॥

कामदा.

अंकिं घेउनी बालका सती ॥ बोल गा ह्मणे तानुल्यास ती ॥
काय जाहलें, सांग सत्वरी ॥ कां अजी असा रोष अंतरीं ॥५९॥

शुद्धकामदा.

तुजसि दीधले कष्ट फार मी ॥ परि न दाविलें आस्य त्वां श्रमी ॥
सतत बोलसी प्रेमभाषणें ॥ अजि न एक कां शब्द आननें ॥६०॥

कामदा.

भालिं भाल तैं ठेवुनी सती ॥ चुंबि आननें आननास ती ॥
प्रेमयुक्त त्या पोटसी धरी ॥ लावि आस्य गा या पयोधरीं॥६१॥

इंद्रवज्रा.

शीण येउनी झोंप कां अली ॥ काय बा तुला भूक लागली ॥
सांग गा मला तानुल्या मुखें ॥ जाहले किती ओष्ठ हे सुके ॥६२॥
नाना विलापें करि रूदनाला ॥ विप्रस्वरूपें मुनि तेथ आला ॥
येथें ह्मणे कां वद रूदतीस ॥ दुःखी बहूसी मज भासतीस ॥६३॥
अंकीं तुझा हा सुत सांग काय॥याचा दिसे कीं गत-आसु काय ॥
आहे सजीवी अथवा निमाला॥वृत्तांत हा गे कथि शीघ्र माला॥६४
दुःखी ह्मणे ती, मज एक बाल॥त्या स्पर्शला आजि विखारिव्याल॥
तेणें समस्तासु निघूनि गेले ॥ या दुःखितेसी अति दीन केलें ॥६५॥

भुजंगप्रयात.

ह्मणे विप्र तेव्हां,वृथा काय शोक॥निमाला न ये मागुता जाण तोक॥
त्वरें अग्नि देईचि, होतां प्रभात ॥ शवा जाळितां डोंब मागेल वित्त ॥

इंद्रवज्रा.

आणोनि काष्टें तुजलागि देतों॥तैसें स्मशानस्थल दाखवीतों ॥
ऐसें वदूनी सहतोक तीतें॥ आणी स्मशानीं धरुनी करातें ॥६७॥

मालिनी.

रचिलि निजकरानें गाधिजें तैं चितेला ॥
वसनभव समीरें वन्हि तो चेतवीला ॥
वसवुनि सति तेथें शीघ्र तो गुप्त होय ॥
गतसुत सति चित्तीं आठवी कांतपाय ॥ ६८ ॥

भुजंगप्रयात.

त्वरें पातला तैं स्मशानाधिकारी॥धना दीधल्यावीण कैशा प्रकारीं॥
करीसी कसी दग्ध सांगे शवाला॥करें ओढुनी काढि बाहेरि बाला॥

यूथिका.

अग्नितें विझवुनी मग रक्षकें ॥ ताडिलें सति-मुखीं निजहस्तकें॥
वीरबाहुसि जरी श्रुत होइल॥तो करें मजसि गे बहु ताडिल ॥७०॥

आर्या.

ऐसें बोलूनि पुन्हां तो दंडें बहुत ताडि त्या सतितें ॥
किति दुःखीं पडली ती, तें वर्णाया न ये कवी-मतितें ॥७१॥

स्वागता.

अर्धदग्ध तनया धरि पोटीं ॥ काय काय विधिलेख ललाटीं ॥
ठाउका न कवणा पडतो कीं॥काय ही स्थिति अजी हरि तोकीं॥७२

भुजंगप्रयात.

महाश्रेष्ठ भूपोदरीं जन्मलासी ॥ परी सौख्यभागा न तूं पावलासी ॥
सदा कष्टवीलें तुतें आह्मि तोका॥फणी दंशुनि जाशि तूं काललोका॥

यूथिका.

हेतु पूर्ण तव ते नचि जाहले॥ विप्ररीणहि तसें शिरिं राहिलें ॥
दास्यतेस पतिच्या तसि मूकलें॥ मृत्युनें अजुनि कां नचि देखिलें ॥

कामदा.

दैवहीन मी पूर्ण केशवा ॥ शक्य नानला द्यावया शवा ॥
ठेविलीस कां ही महीवरी॥ ने हरी तुझ्या धामिं सत्वरी ॥७५॥

इंद्रवज्रा.

ऐकोनि ऐसी सति-दीनवाणी॥आणी स्मशानस्थित नेत्रिं पाणी ॥
तूं कोण,सांगे मज गे,कुणाची॥झाली स्थिती कां असि बालकाची ॥

स्रग्धरा.

बोले साध्वी तयातें, रविकुलज हरिश्चंद्र राजा सुशील ॥
भार्या तारामती मी तदिय, सुगुणि हा रोहिदासाख्य बाल ॥
विप्रातें राज्य दीलें, परि नचि दिधली दक्षिणा, याचि योगें॥
देहातें विक्रयीलें ह्मणुनि परगृहीं दास्यता भोगुं आंगें ॥७७॥

आर्या.

परिसुनि अतिदुःखार्ता त्या वनितेची धरावरें वाणी ॥
होऊनि दुःखि तोही ढाळी नयनांतुनी तदा पाणी ॥ ७८ ॥

इंद्रवज्रा.

मद्दुःख देखूनि बहूत कष्टी ॥ होसी, वदे, कां सुदयार्द्रदृष्टी ॥
आत्माभिधानाप्रति हो वदावें ॥ चित्तीं विकल्पा नचि वागवावें ७९
दाटूनि कंठीं बहु होय दुःखी ॥ बोले हरिश्चंद्र नृपाल मी कीं ॥
डोंबा गृहीं सत्त्वसुरक्षणार्थ ॥ राहें, स्वदैवें घडला अनर्थ ॥ ८० ॥
अन्योन्य तेव्हां मनिं ओळखूनी ॥ आलिंगिती प्रेमभरें करूनी ॥
दुःखाब्धि-ऊर्मीत बुडूनि जाती॥तोकाप्रती देखुनि रूदताती॥८१॥

शिखरिणी.

अहा कैसी झाली विपरित सुतालागि गति ही ॥
डसे अन्यायी हा नसुनि मग कां दुष्टचि अही ॥
त्यजूनी आह्मांतें गमन करिसी, हें न बरवें ॥
तुझ्यावीणें आह्मां क्षणभरि न बा धीर धरवे ॥ ८२ ॥

स्वागता.

शोक ते बहुपरी करिताती ॥ अंतरीं सुतगुणां स्मरताती ॥
तानुल्या, वद मुखें गुजगोष्टी ॥ एकदा उघडुनी बघ दृष्टी ॥८३॥

इंद्रवज्रा.

तारामतीतें नृप बोलिला तो ॥ डोंबासि आज्ञा पुसुनीच येतों ॥
त्वां तोंवरी येथ अगे बसावें ॥ वैश्वानरातें मग यासि द्यावें ॥८४॥
गेला वदूनी नृप डोंब-गेहा ॥ तों पातला गाधिज तेथ तेव्हां ॥
बोले, स्मशानीं कशि एकटी गे॥येथें तुतें कां नचि भीति लागे ८५
येतील आतां पशु काननींचे ॥ नेतील ते वत्स तुझ्या करींचें ॥
त्वत्कांत ये तोंवरि देवळांत ॥ जाऊनि बैसे, दिसतें विहीत ॥८६॥

मालिनी.

सहशव तिजसी तैं नेउनी देउळांत ॥
बसवुनि कपटी तो युक्ति योजी मनांत ॥
दृढतर तिसि निद्रा लावि आत्मप्रभावीं ॥
रुधिरपिशितभक्षा भासवी जेवि लावी ॥ ॥ ८७ ॥

इंद्रवज्रा.

काढोनि अंत्रेंहि शवोदरींचीं ॥ तत्कंठिं घाली जसि मालिकाची ॥
ऐसें करुनि द्रुत ये पुरांत ॥ आली ह्मणे लावचि देउळांत ॥८८॥
सांगे जनांतें, शिशु मारुनीया॥ रात्रिंचरीसी बसलीच खाया ॥
मातें धराया बहु धावली ते ॥ मी पातलों हो पळुनीच येथें ॥८९॥
आतां तुह्मां दाखवितों चलावें ॥ जाऊनि शस्त्रें तिजसी वधावें ॥
ऐसें वदे व्याजि सकंपदेही ॥ जाती तदा लोक बहू समूहीं ॥९०॥

शिखरिणी.

अहो आहे आहे ह्मणति दुरुनी देउळिं पहा ॥
शिशूतें भक्षीते, कथित नच मिथ्या मनुज हा ॥
हणा, मारा, ठोका, उशिर न करा धैर्य धरुनी ॥
वदोनी ऐसें तो त्वरित शिरला देवसदनीं ॥ ९१ ॥

रथोद्धता.

पाडिती धरुनि केश भूतळीं ॥ लाथ मारिति बळें स्वपाउलीं ॥
देहिंचें वसन फाडिती करें ॥ ओढिती फरफराचि निष्ठुरें ॥९२॥

ग्रामिंचीं लघुलघूहि लेकरें ॥ भक्षिलीं वधुनि तीं इणें करें ॥
कालकौशिक गृहांत वाढि जी ॥ तीच ही दिसत लाव हो अजी ९३
लोक ते बहुपरी विटंबिती ॥ राजमंदिरिं तियेसि आणिती ॥
लाव ही धरिलि बालभक्षका ॥ भक्षि जी नगरिं नित्य बालकां ॥

स्वागता.

बोलिला नृपति तो अविचारी॥ फीरवा नगरिंच्या पथिं चारी ॥
गर्दभावरि इतें बसवूनी ॥ टाकणें नगर बाह्रिं वधूनी ॥ ९५ ॥

इंद्रवज्रा.

भूपाल-आज्ञा परिसूनि दूतें ॥ बीभत्सिली ओढुनि त्या वधूतें ॥
आस्यीं तिच्या कज्जल फासिताती ॥ सिंदूर माथीं बहु घालिताती ॥

कामदा.

गर्दभावरी बैसवूनि ती ॥ चालवीति ते ग्रामभोंवती ॥
जन्हुजातिरीं शीघ्र आणिली ॥ लोकना प्रजा फार लोटली ॥९७॥
जान्हवीजलें स्नान घातलें ॥ डोंब-किंकरें शस्त्र घेतलें ॥
ऊर्ध्वहास्ति तो काय बोलिला ॥ आठवी अतां इष्ट जें तुला ॥९८॥

स्रग्धरा.

बोले तेव्हां सती ते, स्मरुनि मनिं हरी, पाणितें जोडुनीया ॥
राहो तो जन्मजन्मीं पति नृपति हरिश्चंद्रची होउनीया ॥
होवो तैसा वसिष्ठ स्वगुरु, तनय तो रोहिदासासमान ॥
विश्वामित्रापरी तो अतिथि मज असो, मागणें हेंचि दान ॥९९॥

इंद्रवज्रा.

प्रार्थूनि ऐसें सकला जनासी ॥ ग्रीवा पुढें ती करि कृंतनासी ॥
योजी मनीं किंकर घाव द्याया ॥ तों पातला गाधिज त्याचि ठायां॥

भुजंगप्रयात.

जटाजूट माथीं, करीं दंड साजे ॥ कटीं वल्कलें,भालिं भूती विराजे॥
प्रती सृष्टिकर्ता, रवीतुल्य कांती॥ प्रकोपांबुधी, तैं परी दावि शांति ॥

इंद्रवज्रा.

दूता करींच्या असितें करांनीं॥ घेऊनि बोले मधुर स्वरांनीं ॥
सत्त्वाप्रती पाहुनि तुष्ट झालों ॥ द्याया तया मत्सुकृतासि आलों॥२॥

ऐसें वदूनी द्रुत तो करांनीं ॥ आलिंगि लोभें नृपतीस मानी ॥
तारामतीच्या शिरिं ठेवि हात॥साध्वी तुझ्या तुल्य नसे जगांत॥ ३॥

चामर.

रोहिदास बालकास ऊठवीहि सत्वरी ॥
प्रेमयुक्त आत्महस्त ठेवुनी तया शिरीं ॥
तीहि लोकिं सत्त्वशील ते दुजे न देखिले ॥
बोलुनी स्वकीय पुण्य त्यासि सर्व अर्पिलें ॥ ४ ॥

शार्दूलविक्रीडित.

आकाशांतुनि पुष्पवृष्टि करिती वृंदारकांच्या हरी ॥
अत्यानंदचि होय चित्तिं सकलां, वाद्यध्वनी सुस्वरी ॥
सावित्री कमला सुरालयसुता साध्वीप्रती वानिती ॥
स्वर्गापासुनि ये विमानहि तदा न्याया त्रिवर्गाप्रती ॥ ५ ॥

इंद्रवज्रा.

बोले मुनी तें सुरकिंकरांना॥ स्वर्गीं न हे सांप्रत येति जाणा ॥
मत्पुण्य यांच्या पदरांत आहे॥ त्यां स्वर्गिंचें सौख्य न काय लाहे ॥

स्वागता.

राज्यसौख्यहननिचा बहु दोष ॥ लागला मजसि तोहि विशेष ॥
गांजिलींचि शरिरें अतिदुःखीं॥दूर तो करिन मी शिण सौख्यीं ॥

शिखरिणी.

वदोनी ऐसें तो निज करिं तयांते धरुनिया ॥
अयोध्यापंथानें करित गमना, तें बघुनिया ॥
त्वरें आला तेथें धृत-अरगला वीरभुज तो ॥
अरे नेसी या तूं कवण, ह्मणुनी पाणि धरितो ॥ ८ ॥

इंद्रवज्रा.

म्यां घेतलें देउनि हेम यास ॥ आजन्म आहे मम हाचि दास ॥
नेसी बळें तूं तरि याचि दंडें ॥ त्वद्विग्रहाचींहि करीन खंडें ॥ ९ ॥
तों पातला नारद त्याचि ठाया॥ हा डोंब ना दिव्यज योगिराया॥
अंतज-गेहीं ऋषिशापयोगें॥ जन्मे, तया उद्धरि तूंच आंगें ॥ १०॥

यूथिका.

तें सुरर्षिवच ऐकुनि सत्वरी ॥ दिव्यदेहि करुनी मुनि उद्धरी ॥
जाय डोंब नमुनी सुरधामिं तो॥ये नृपासह मुनी नृपधामिं तो॥२११॥

स्रग्धरा.

झाला आनंद तेव्हां सकल जनमना भूपती पाहुनीया ॥
येती अत्यादरें तैं अमित नृपति ते संपदा घेउनीया ॥
गाधीजें राजसिंहासनिं निज करिं त्या आदरें बैसवीलें ॥
कृष्णें या सच्चरित्रा नमुनि हरिपदा प्राकृतीं गाइयेलें ॥२१२॥

प्रकरण ५५ वें.

श्रीसूर्यशतक.

स्रग्धरा.

रिद्धीसिद्धीसअष्टा युवतिगण जया अर्चनीं लीन राहे ॥
ऐसा जो चंद्रमौलीतनय, गणपती नाम हें ज्यास आहे ॥
कार्यारंभीं जयातें सुर मुनि नर ते बद्धपाणि स्तवीती ॥
देवो तो चंडभानुस्तुतिपठणिं मला सर्वमान्या मती ती ॥१॥

ते संरक्षोत वित्ता सुकिरण तुमच्या भानुचे रक्तवर्णी ॥
आली आरक्तता ज्यां हरिकरिशिर-सिंदूरसंघर्षणांनीं ॥
किंवा हेमाद्रिच्या धातुरसरुचिरविस्तीर्णदीर्घौघसंगें ॥
कंजारण्यप्रभेचा समय सम, जगा श्री यदुत्पत्तियोगें ॥ २ ॥

घ्याया नम्रा स्वभक्ता रविकमलपरागोदरापासुनी ते ॥
काढाया लोकमाता सतत धरियलें मानसीं वासनेतें ॥
पद्मारण्या विकासा नवदलसमभा नित्य भद्रा तुम्हांसी ॥
कारातुल्यांधकारानपतितसमग्रांडभीनाशनासी ॥ ३ ॥

तुल्यत्वें कंजगर्भीं चरति शिखरिंच्या दुर्गमीं सूक्ष्मभृंगीं ॥
तैसेची एकरूपें रविकिरण दिनोत्पत्ति अस्तप्रसंगीं ॥
कल्याणार्पोत तुह्मां त्रिभुवनअजिरीं साम्य आत्मप्रकाशें ॥
झाले संतप्त भारी पथचिरगमनें होति ते पांथ जैसे ॥ ४ ॥

जातां विश्वोपरीचा तम उपपट तो पाहुनी नग्न जंतू ॥
तंतूकारेव हंसें त्वरित पसरिले दीर्घ ते रश्मितंतू ॥
झाले अत्यंत तेव्हां घनदशहरिताप्रांतभाग क्रमानें ॥
ऐसे ते वासरूपी अमलकिरण सौभाग्य देवोत मानें ॥ ५ ॥

हस्तांघ्रीत्यादि अंगें हृत विविधगदें, तेवि अव्यक्त वर्णीं ॥
झाली श्लेष्में, तथा ही वहुत पिडियलें दीर्घपापावलीनीं ॥
सिद्धें दत्तार्घ्य देतां हरुनि गद पुन्हां पूर्वकाया-नुकंपें ॥
स्वांतीं निर्विघ्नवृत्ती द्विगुण अभिदया, ते विनाशोत पापें॥६॥

रश्मी-उत्पत्तियोगें हृतरुचि शशितें पाहुनी हीनकांती ॥
झाल्या सर्वौषधींच्या गतपतिरमणीतुल्य संपूर्ण पंक्ती ॥
आधीं सन्मानिली जी रविमणि-अनलें, नाश सर्वा व्यथेचा॥
रक्तस्रावेव दावी उदयगिरिशिला पक्षनाशव्रणाचा ॥ ७ ॥

आधीं ने सूक्ष्मतेतें धरुनि पुनरपी दीर्घता पावती जे ॥
व्यापीती खांतराला, मग दशहि दिशा त्यापरी आत्मतेजें ॥
नाशोनी अंधकारा मुदित जग जसें वामनें त्या बलीतें ॥
ज्याच्या प्राग्वृद्धिलीलें उपहसित हरी नाशिती संकटातें ॥८॥

अत्यंतारक्तवर्णें अरुण अरुणता लाधतो ती जयांच्या ॥
देती कांती खलीनक्षतरुधिरसमा वाजिवक्त्रीं रथाच्या ॥
तैसेचा शोभवीती गिरिशिखरशिलांतें शिरोभूषणेव ॥
आकाशीं दीप्यमानोदयदिशवदना पूरिती सौख्यभाव ॥९॥

देती आनंद विश्वा समुचित समयीं वारिकर्षापकर्षें ॥
होती पूर्वाण्हकालीं प्रस्तुत दश दिशे ते तुह्मां युक्त हर्षें ॥

सायंकालीं लघुत्वा धरिति, सकलही पावकांमाजि थोर ॥
नौकाची ते तराया अमितअसुखसंसारभीसिंधुनीर ॥१०॥

हेतु स्वांतीं धरीती मिलितकरमहासिद्ध बंधप्रणाशीं ॥
देती फुल्लत्व जैसें कमलवनयुथा जागृता ते जनासी ॥
होवोत प्रार्थनेचे अनुदिनिं तुमच्या ते महा कल्पवृक्ष ॥
पापातें धूमकेतू, प्रखरतिमिर जे व्यापिती अंतरिक्ष ॥११॥

निर्द्रव्यातें करीती धनिक, जव तसे संकटीं हस्त देती ॥
कुंभीपाकाद्यगारीं पतितजनगणा तत्त्ववेत्या-ग्निजोती ॥
स्वर्गप्रस्थीतघंटा पथगदुरितभीपासुनी रक्षणातें ॥
होती सर्वां प्रभातीं सुखद मुनिजनां वेत्रपाणीव जे ते ॥१२॥

शीर्षालंकारतुल्य प्रथम हिमनगीं शोभती अल्पकाल ॥
अष्टाशा-अर्चनातें परिमलसलिला अर्पिती ते विपूल ॥
सोत्कंठें आदरीलें बहुततर जया चक्रवाकाक्षपातें ॥
ते भानूबालरश्मी सुउचित तुमच्या पूर्तता कामनेतें ॥ १३ ॥

जें ज्योती एकरूपी असुनि वसतसे जंतुच्या दोन नेत्रीं ॥
भूम्यादी पंचभूतीं, मुख तिजगिं विधी बोलिला वेदवक्त्रीं ॥
तैसा साहा ऋतूंतें विविधसुखद, तो क्षेम देवो तुह्मांतें ॥
लाधे प्राण्हीं नवत्वा, स्तविति सुरमुनी, व्यापि अष्टा दिशांतें ॥

जे वारंवार विश्वीं भ्रमुनि तृषित संश्रांतसे स्वातपें तें ॥
ग्रीष्मीं दावाग्नितापें पिडिति जन, परि प्राशिती भूरसातें ॥
वर्षाकालीं करीती वमन अतिशयक्षीरपानव्यथीसे ॥
हेमंतीं सूक्ष्म होती, रविकिरण तुह्मां सौख्यकूपार ऐसे ॥१५॥

देती दिग्भामिनीच्या स्पृहणिय रुचिरा सुंदरावस्थतेसी ॥
लाधे तारुण्यता, ती बहु उचित गमे श्यामता भूषणेसी ॥
मार्तंडांभोजचक्षू समुहविकसिता उद्भवे यत्प्रभातीं ॥
स्मश्रूश्रेणीव दीप्ता सुखद दशशताची तुह्मां रश्मिपंक्ती ॥१६॥

झाला भाहीन तेजें न शशि ह्मणुनि शंभु स्तवी शीर्षचूड ॥
पंकोत्पत्ती-विकासें स्तवि विधि अपणा लाधलें स्थान चंड ॥
तैसा पद्मापतीही निज तनुसितताहानिभीतीभयानें ॥
रश्मीउत्पत्ति रक्षो तिमिररिपु तुह्मां नूतनाऽतीदयेनें ॥ १७ ॥

देतो विस्तीर्णतेतें द्रुत गगनदिशांतें, तथा सिंधुनीरा ॥
दावी यातू तमिस्त्रा तमपतितमहीपर्वतग्रामपूरा ॥
नाशूनी तो निशीतें कमलिनिसमुहा दे प्रभातीं विकास ॥
विध्वंसो भानुरश्मीसुउदय तुमच्या क्षिप्र सर्वाऽसुखास ॥ १८ ॥

नाहीं नष्टत्व ज्यातें, रुचिहनन नसे, नाशभावांधकार ॥
दूरस्थानीं वमूनी हरि जगतिमिरा, दर्शवी दिक्प्रकार ॥
तैसाची कालमाना त्रिभुवनगमनी प्राग्दिशोत्पत्तिअंशु ॥
तत्साम्या सद्मजोती करि पर अवलंबा तुह्मां क्षेम आशु ॥ १९ ॥

जाती नाथा न यावी कमलिनिसि मृदू नागकायेस म्लानी ॥
लोकालोकाद्रिभागीं पतित न सुदयें अव्ययरक्षार्थ दोनी ॥
ज्यांहीं ब्रह्मांडखंडस्फुटनबहुभयें आत्मदैर्घ्य त्यजीलें ॥
ते स्वेच्छावर्ति तुम्हां शिवकर रविचे व्योमसीमेसि केले ॥ २० ॥

होते तेजें प्रभातासितजगपुरितध्वांतहानीहि तैसी ॥
येतें नष्टत्व सीताद्रिसाचि न उदयें अंशुच्याही शशीसी ॥
सद्योगीसंवहस्तासचि न मुकलिता इंदु अभोज देशा ॥
जे योग्य प्रेक्षणासी बहु उचित शिवा शीघ्र देवोत ऐशा ॥ २१ ॥

सुज्योत्स्ना पंकजाची हरिति न, करिति क्षिप्र रम्य प्रभा जे ॥
नक्षत्रांच्या प्रकाशा धरति न, परि ते झांकती नित्य तेजें ॥
त्रैलोक्यां ते निमेषा न घडि दिन ऋतू सर्वकाला करीती ॥
प्रीती सामान्यचक्षूसुविपरित तुह्मां विश्वचक्षू गभस्ती ॥ २२ ॥

जी संतप्तेव रात्रीं दवशिशिरमही स्पर्शना शीघ्र येते ॥
बोधादिग्दंतिशुंडा रुचिरसरतटीं पुष्कराणीव देते ॥

लंघी प्रातः ऱ्हियार्ता द्रुततर गतिनें दूर तारापथातें ॥
जाळो उच्छृंखलासी द्युति दिनमणिची तूमचीं दुर्निमित्तें ॥२३॥

नाशातें जी न पावे अवनितलगिरिच्छेद्य कल्पानिलेंही ॥
दे प्रातःकाळिं शोभा प्रसृत सुविमलाही न जी कज्जलेंही ॥
अन्या दीप्ती पतंगें हरति, परि न तैसी पतंगोद्भवा ती ॥
देवो सौख्यासि तुह्मां सकल निखिलदीपार्कनिर्वर्ति जोती ॥

संपूर्णाशाप्रसार प्रवरवरगुणा वर्णनीयाकृती जे ॥
ऊषारंभीं तथाही रजनिमुखिं सदा ऊर्ध्व वक्त्रीं विराजे ॥
जी जाणायास गूढा, पलहि न वसते सांधकारार्क जोती ॥
संपूर्णा वासनेतें द्रुत बहु तुमच्या पूर्ण योग्या करो ती ॥२५॥

आहे ज्या भार्गवादी उडुसमुहरुची नाशका श्रेष्ठशक्ती ॥
लीलेनें खालतीं जो करित शिखिसही शीघ्र त्या हेमकांती ॥
होतो तो अंधकारीं बहु सुखद सदा जंतुंच्या लोचनासी ॥
सेनानीव प्रकाशातुलशिशुरविचा सर्व लक्ष्मी तुह्मांसी ॥२६॥

जोत्स्नांशें स्वल्प पांडू तममशि अवशिष्टाल्पनील स्वभासें ॥
शोभे पिंग प्रभातीं रविकमलपरागावलीच्या विकासें ॥
तैसें आरक्तवर्णी दिनकररुचिनें विश्व चित्रावलीसें ॥
भासे जें तूलिकासी रुचिरचिररुची तें तुम्हां युक्त हर्षे ॥२७॥

येते कीं काय मेरूसरणि अरुणता लाधली पद्मरागें ॥
किंवा ये स्यंदनाचा ध्वज दिनमणिच्या माखला रक्तरंगें ॥
तैसेंची चामरेवाश्वशिरचलितरोमावली देखुनी ती ॥
होता साशंक नाशो जन अघ तुमचें भानुची तेजपंक्ती॥२८॥

नाशी सर्वांधकारा, परि न तपतसे लोकनाशक्यरूपें ॥
तैसेंची यामिनीतें द्रुत परि न वसे ती महातीव्रतापें ॥
नित्योत्पत्ती जयेची गगन अणि दिशा संधिचे ठायिं आहे ॥
आशापूर्ती करोनी न च तुमचि वसो भानुदीप्ती महा हे ॥२९॥

दृष्टीतें गोचरा जी विपुल अतिमहा जी प्रसिद्धा प्र उष्णा ॥
त्रैलोक्यीं शोभमानास्तउदय अचिरा बाह्यरूपास जाणा ॥
मुक्तीहेतुप्रमुख्या बहुत लघुचिरा जाणती योगिनी ते ॥
रक्षो तुह्मां अदृश्या दिनकररुचि जी बाह्यअभ्यंतरातें ॥३० ॥

देते ती रत्नदीप्ती प्रचुररुचिरता योजिल्याची स्थलातें ॥
जाळी दावाग्नयरण्या, शशि निजशिशिरें दे महासंमुदातें ॥
भूतादी लोकभूषा द्रुत दुरितहरा दृष्टिनें ल्हाददात्री ॥
अत्यंताधिक्यकार्योद्धृततमरिपुभा नित्य रक्षो तुह्मां ती ॥३१ ॥

आलें मूढत्व कर्णीं मिलितनयनिं जे घ्राणव्यापारनष्टा ॥
आत्मोद्योगाक्षमी त्वग्विवासितमन ही श्वासमात्रावशिष्टा ॥
अस्ताव्यस्तत्व तैसें करचराणिं शिवा स्वापगाढत्वयोगें ॥
कालाहिग्रस्तविश्वा अगदपरि तमारिप्रभा भव्य वेगें ॥३२॥

नेत्रांबूबिंदु ऐसे रजनिदवकणव्यूथ जी शीघ्र नाशी ॥
रात्रीसंबंधिदोषा अरुणरुचिरभा सावकाशेंचि तैसी ॥
देतो त्रैलोक्यअक्षा प्रचुर सुरुचिरा दृष्टिसी औषधीव ॥
विध्वंसो तो विरुद्धा त्वरिताचि तुमच्या भानुदीप्तिप्रभाव ॥३३॥

उत्पन्न प्राग्दिशेसी हरि निशिपतिची होउनी शीतलाभा ॥
सन्नीला रक्तवर्णी रविकमलसमूहा विकास प्रगल्भा ॥
संपूर्णा श्री प्रदात्री त्रिभुवनसदना ते प्रकाशीत कर्त्री ॥
संचारे शोभमाना, रविरुचि तुमच्या श्रीस वृद्धी करो ती॥३४॥

विश्वोद्यानीं सुमेरूअगमशिखरभूवर्तुलप्रालवाली ॥
कौतूकारात्रिकन्या उडुपतिकलशें अंबुओघासि घाली ॥
तेणें भूतप्रवालासम तपनरुची वृक्षअंकूर तूर्ण ॥
देवो प्राक्संभवी तो हरुनि सकलही दुःख आनंद पूर्ण ॥३५॥

विद्रूमातुल्यकांती अरुणसुरुचिनें किंचिदन्यत्रवर्णी ॥
जो संपूरीततारागणविविधसुरत्नप्रकाशव्रजांनीं ॥

अत्यंतश्यामदीप्ती जलधिपरि तमःप्राशकादित्यजोती ॥
दीप्तारण्याग्नितुल्या ह्मणिं दहन करो तूमच्या पातका ती॥३६॥

गंधर्वें गद्यपद्यें बहुमधुरवचें गाइला वाद्ययुक्त ॥
तैसाची वेदवेत्ते अमरवरमुनी नारदेंही स्तवीत ॥
पावे तारुण्यतेतें पुनरपि यदुगमें विश्व तें स्वप्रकाश ॥
खंडो सर्वा वृजीना अनुदिनिं तुमच्या भानुदीप्तिप्रकाश ॥३७॥

झाला नष्टांधकारास्त्रवितशशिमणी तारका हीनकांती ॥
तैसाची औषधीश प्रत्त्दतनिजरुची औषधी वृक्षपंक्ती ॥
ऐसीं हीं पंचबीजें उदयगिरितटीं पाहुनी सर्व लोक ॥
झाला भानुप्रकाशोद्भव ह्मणति, तुह्मां देउ तो पूर्ण तोख ॥

आधीं पूर्वाद्रिश्रृंगीं विपिनतरुदलें शोभती रक्तकांती ॥
पश्चात्तारुण्यरूपें गिरिगुहरिं लघू तीं ह्मणूनी न जाती ॥
आहे उत्पत्तिवेला सम कमलपरागावलीच्या जयेची ॥
मैत्रीणीतुल्य देवो कुशल चिर तुह्मां रश्मिपंक्ती रवीची ॥३९॥

देते श्री फुल्लितांभोरुहयुतसलिला नातितापा तथैव ॥
चाक्षुज्ञानोपयुक्तोदयचि परि न दे दृष्टितें कूटिभाव ॥
आरंभीं पूर्वशैला पुनित करि, पुन्हां पुष्करादिङ्मुखातें ॥
स्तुत्यर्हब्रध्नदीप्ती दिनवदनभवा ती हरो कल्मषातें ॥ ४० ॥

विस्तारें गाइला जो विबुधगुरुवचें गोत्रभिद्बोधकर्त्या ॥
वेदोत्पत्तिस्थलांभोरुहभववदनक्षीरजा ही तथा त्या ॥
कीर्त्यब्धीतें जयाच्या बहु सचिरचिरा वर्णितां नांत लागे ॥
दैदीप्यार्कप्रकाश त्वरित बहु तुह्मां वृद्धितें स्वानुरागें ॥४१॥

दावी जो धातुवर्णा गिरिशिखरिकुटीकंजतंतुप्रभेतें ॥
कूपारीं विद्रुमत्वा ककुभकरिशिरीं सांद्रसिंदूरतेतें ॥
हेमाद्रीश्रृंगभागोद्भवकनकपरी भा खसीमाप्रदेशीं ॥
प्रातर्द्योतैकदेश द्रुत दिनमणिचा सौख्य देवो तुह्मांसी ॥४२॥

होतां शुभ्रांशु अस्तार्णवजविषसमानांधकारप्रणाश ॥
लोकांहीं पारिजाद्भुतनवदलपरी पाहिलें प्राग्दिशेस ॥
पीतारक्तप्रदीप्ती नभिं तपनरुची श्रीहरिश्रीसमाना ॥
देवो पद्माश्रिता ती त्वरित बहु तुह्मां क्षेम आरोग्य माना॥४३॥

न भ्राते कौस्तुभादी जलनिधिज जिचे सिंधुजन्मोर्मि नाहीं॥
तैसें नांभोज हस्तीं, न हरिउरगृहीं वास जीचा कदाही ॥
दैदीप्या आत्मतेजें त्रिभुवनभुवनीं जी व्यवस्थेस दावी ॥
ऐसी तेजोद्भवा श्री आणिं दिनमणिची सौख्य देवो तुह्मां ती ॥

हेमाश्मासंघ जीचे न अशुतरगतीलाघवें चूर्ण होती ॥
मानीनी नारुणाज्ञा पवनगतिजिता उल्लरश्म्यश्वपंक्ती ॥
जीणें हेमाद्रिभागीं निजगमनपथा दाविलें कीं खुरांकीं ॥
तैसेंची भानुकांतानलिं, भरण करो ती तुह्मां पापपंकीं॥४५॥

झाली सांनिध्यतेनें रविकरपतनाच्या जिची कृष्णपृष्टी ॥
एकाची वासरीं ते सकलनभपथोल्लंघनें शोषि कष्टी ॥
अत्यायासें पिपासा दिनकरतुरगश्रेणितें थोर तीव्रा ॥
देवो सांनिध्यगंगांबुकृतनतगला प्राशना सौख्यभावा ॥४६॥

पार्श्वी आत्मात्मबिंबा स्फटिकिं हय दुजे मानुनी जाय वेगीं ॥
झाली कीं अस्तसंधी फिरुनि दिवस मंदांघ्रि दे पद्मरागीं ॥
सादृश्यें मृतकष्टी हयगण न दिसे नीलरत्नप्रभेच्या ॥
संचारें रक्षु लब्धा ध्रुवगतितुरगश्रेणि शीर्षा गिरीच्या ॥४७॥

चांचल्यें ने रथातें सुनियमनकृता वैनतेयाग्रजानें ॥
जिंकीला जन्हुजेचा अजडजव जिनें स्यंदनाच्या जवानें ॥
दावी विस्तारतेनें स्वकिय असितता फेनशोभा मुखीं ती ॥
संपूर्णाश्रेय नाशो रविभवयमुनातुल्य मित्राश्वपंक्ती ॥ ४८ ॥

मेरूसांनिध्यभागीं नमिलि सुरसमूहें तथा वंदिली ते ॥
सव्रीडाकिन्नरीच्या गिरिकुहरमुखीं पाहुनी आननातें ॥

केल्या ग्रीवा स्व वक्रा, धारिलि जडगती ताडिल्याहि स्वसूतें ॥
नाशो सप्ताश्वसप्ताश्वसरणिनिनद क्षिप्र ते कल्मषातें ॥ ४९ ॥

पार्श्वीं स्वत्विट् समाना हरितरुचि चलन्मेघसक्पक्ष भाती ॥
मूर्ध्नी उत्तान कर्ते खलिनज रुधिरें रक्तवर्णास्यपंक्ती ॥
व्योमीं उड्डीयगामी स्वकिय गतिवशें क्षेमदादित्यवाजी ॥
कीरश्रेणीव जाती कनकशिखरिशालाग्रशाखालिमाजी ॥ ५० ॥

प्रातर्ग्रावाग्ररंगोर्वितलिं निशिछदा वारुनी श्रीस दावी ॥
अन्योद्भूता विसर्जी उडुनिकरसुपुष्पांजली सूत्रि जेवी ॥
आहे तैसी समाप्ती दिवसकृतरुची वेदयामांकिं जीची ॥
संरक्षो ती तुह्मांतें जगदटनमहानाटिका काश्यपीची ॥ ५१ ॥

आकाशीं पाहिला ज्या दुरुनि कृतनमस्कार दत्तार्घ्य सिद्धीं ॥
सूर्याचा सारथी तो त्वरित बहु तुह्मां देउ नाथत्व वृद्धी ॥
प्राशोनीया प्रभातीं शशिमणिसलिलातें हिमा तेवि सेवी ॥
काष्ठोद्भूताग्रभागीं दिनकरकिरणापृष्ठभागास तेवी ॥ ५२ ॥

सोडी स्वेच्छें प्रभातीं निजकिरण, तसे आकली अस्तकालीं ॥
आहे उक्त प्रयत्नोडुपथगमनिं यत्स्तोत्रिं थोरी स्तवीली ॥
दावी कालाधिकत्वें खगपतिसि कनिष्ठत्व रक्षो तुह्मांतें ॥
केला सेवानुरागें निजसममहिषारूढतातें जयातें ॥ ५३ ॥

बाह्यस्वांकीत केला पशुपरिहरिनें जो तथा पक्षपातें ॥
संचारें विश्वविश्वीं उरगअभिजनद्वेषि त्या पक्षपातें ॥
जिंकी नाशो वृजीना हरिहरिनियता कर्मसाक्षीनसूत ॥
स्थैर्यें तेजें निधीसा समदृशिवयसि श्रेष्ठ सूताग्रणींत ॥ ५४ ॥

आहे रात्रीलतेतें परशुपरि, तमिस्राटवीवन्हिज्वाला ॥
केला हस्ताग्रभागीं भगणधवलकंजाटवी ध्यावयाला ॥
विश्वद्रष्टा विधीसा अवनिगगनसंभेदना घाटतुल्य ॥
अश्वश्रेणीविनेता दिनमणिचि हरो तूमचें दुःखशल्य ॥ ५५ ॥

देवो सौख्यासि वर्षासमय उदयकथोद्भवस्पर्शनेत्र ॥
श्रोताग्नीअग्रधूम प्रथम भवमुनीवर्यमन्वादिकेव ॥
किंवा ओंकार जैसा श्रुतिअधि विनतासूनुसूतारुणाचा ॥
संध्यानृत्येच्छुलोका रव पशुपतिच्या नंदिनांदीगणाचा ॥५६॥

शोभे तो पद्मरागासम विमलतर स्वर्णशीलाप्रदेशीं ॥
सप्ताश्वस्यंदनाचे तुरग अनुकृती नीलरत्नप्रकाशी ॥
देतो अत्यंत सुश्री नगसरणिपरी रत्नसानूगिरीतें ॥
सर्पारिश्रेष्ठबंधु त्वरित वहु हरो तूमच्या कल्मषातें ॥ ५७ ॥

सूताचा करो तो सदवन नृपतिद्वारपालासमान ॥
केल्या तो सप्तकक्षा स्वनियमनवशी सप्तवाजीव्रजीन ॥
केला वेत्रप्रतोदा इतरपरि तमा वारुनी श्रेष्ठग्रावा ॥
बैसे भानूरथाग्रीं त्रिभुवनव्यवहाराप्रती दावि सर्वां ॥ ५८ ॥

रक्षो सूर्याग्रणी तो प्रतिककुभिं वदे अष्टदिग्पालकांसीं ॥
इंद्रासी अक्षपद्मा विकसित, अनला हो न हो वा प्रकाशी ॥
वंदीता तो यमातें करि दुर महिषा, राक्षसा स्वस्थ राहा ॥
सिंची अश्वांसि पाशी, अनिल सजव हो, वित्तपेश स्तवी हा ॥

आशा ईशानपाशासि अरुण वरुणा अश्वसूत्रार्थ मागे ॥
वांच्छी न श्रीशचक्रा, निज रथ न चले काय एक्या रथांगें ॥
तैसा नोचैःश्रवा तो हरिहयहय जो अश्वपंक्तीसमर्थ ॥
अन्यापेक्षा त्यजी ती, जगदुपकृतिचंडांशु शिक्षीत अर्थ ॥६०॥

नाहीं पांथापरी ज्या जगदटनश्रमें मूर्च्छना क्लेश शोष ॥
तैसी न च्छिन्न वांच्छा भ्रमणिं अवहिता ते करो तूर्ण नाश ॥
झाला तो ताप त्यातें दिनकरकिरणें तेवि विश्वीं भ्रमून ॥
आरामेव प्रनाशा सवितुरथहरित्सप्तवाजिव्रजीन ॥ ६१ ॥

स्वर्गगारेणुपंकीं रुजुनि जड महा जाहले खूर ज्यांचे ॥
शृंगांचे संघ तैसे विषमतर कडे लंघुनीही गिरीचे ॥

दूर्वापर्णेव चित्तीं मरकतदृषदा मानुनी स्थीर होती ॥
ऐशा अश्वासि जो तो अभिभरण करो हांकि हूं शद्बगीती ॥६२॥

वाजीपीनोरभागें जलधरपटला वारिलें कीं जयाच्या ॥
पृष्ठांघ्रिप्रास्थितेनें प्रसरित दिसती आकृती तद्वपूच्या ॥
तेणें उत्तानमूर्धा विपरितनमनीं दीसतो सारथी तो ॥
जो हीनध्वांतचक्री नभगमनि रथ क्षेमरूपी करो तो ॥६३॥

वाहे रश्मी सहस्रा तिमिरपटलसंहारदीक्षागुरूची ॥
ऐसी जी सूर्यमूर्ती बहुत जड जहाला तदारोहणेंची ॥
तैसा सामर्थ्यहीन श्रमित परि मरुद्वार घ्याया जयाचा ॥
जो वायुस्कंधगामी, रथ दुरित हरो तूमचें तो रवीचा ॥६४॥

चंचूधाराग्रभागीं ग्रसित अहिपरी दाम आहेत ज्यांच्या ॥
भाती पार्श्वप्रदेशीं द्रुत चलितपिसारेव माला घनांच्या ॥
वाजी वांच्छा प्रचारी निज द्रुतगतिनें तोषवी काश्यपीतें ॥
ऐसा जो भास्कराचा रथ खगपतिसा संहरो पातकातें॥६५॥

होती ते नष्ट ज्याच्या ग्रहगण धुरिनें, इंदु हाले ध्वजानें ॥
तैसा ग्रासाभिलाषी पुनरपि पडिला राहु चक्रव्यथेनें ॥
हाले आकाशगंगाजल श्रमित हयश्वासमात्रें तुह्मांसी ॥
होवो कल्याणदायी दिनकररथ, जो आक्रमी अंबरासी ॥६६॥

झालें विच्छिन्न पार्श्वीं अवनितल,उडे स्वर्णधूळी खुरांनीं ॥
आली खोली नगाग्रां सतत रथरथांगप्रधीघर्षणांनीं ॥
जो शोषी आत्मउष्णें पथतटउदका एकमार्गी रवीचा ॥
स्वर्गंगातुल्य ऐसा द्रुतग रथ करो घात तो कल्मषाचा ॥६७॥

सद्रक्षाबंधनातें करिति धुरिपुटीं, योजिताती युगासी ॥
दृष्टीसंहारवस्तुत्व करि दहन धूस्तंभभागीं धुपासी ॥
धूर्दंडीं पुष्पवृष्टी परिमल मलयें चक्रपूजाविधीतें ॥
सिद्धस्त्रीसंघ संध्यासमयिं नभपथीं, तो हरो पातकातें ॥६८॥

आली वंदावया जी सुरगणसरणी मार्ग तोची ज़याचा ॥
धूलीका चक्रपातें रजसमुह उडे जोचि तारांगणाचा ॥
तो नेमिध्वांतवाजीगणनिनदभरें रत्नसानूगुहांतें ॥
रक्षो भूव्यक्तचिन्ही रथसम रथ तो पूषणाचा तुह्मांतें ॥ ६९ ॥

त्रैलोक्यादीर्घमार्गा अजडतर असा लंघि एक्या दिनींची ॥
तूकीं ऐसा स्वतूकें मणिरुचिशिखरें भंगि हेमाचलाचीं ॥
तैसा सर्वोपरी जो प्रथम पुनरपी खालिं अस्ताद्रिच्याही ॥
रक्षो तुह्मांसि ऐसा दिनकररथ यच्चांचलत्वांत नाहीं ॥७०॥

आकाशीं व्योमयानीं बसुनि विबुधवृंदारकानंदयुक्त ॥
वंदाया वांच्छितातीं द्रुत, परि न तयां वंदना लब्ध होत ॥
चाले चांचल्यतेनें सुरधुनिपुलिनीं मंद मेरूदरीं ते ॥
ज्याचे मंदारपुष्पें अरिअर पुजिले, तो तुह्मां रक्षणातें ॥७१॥

सप्रेमें चक्रिचक्रा हरिहयहरितें धूर्जटी धूर्ध्वजातें ॥
तैसा शुभ्रांशु अक्षा जलपति अरुणा यक्षराट् कूबरातें ॥
वेगातें देववृंद स्तवि अनुदिनिं विश्वोपकारें प्रदीक्षा ॥
ऐसा तो भास्कराचा रथ भरण करो,जो फिरे अंतरिक्षा ॥७२॥

केलें सारथ्य ज्याचें बहुविहितपणें काश्यपीनें स्वहस्तीं ॥
तैसें चक्रप्रदेशीं विबुधगणमरुत्सिद्धसंघ स्तवीती ॥
चाले व्योमार्णवीं जो बालितुरगजवाकर्षणें वेगवान ॥
देवो श्री दीर्घकीर्ती द्युमणिरथ दुज्या मेरुशैलासमान ॥७३॥

घस्राचें मूलबीजें तमपटल हरी लोचना अंजनेव ॥
मुक्तीचें द्वार तैसें सकलजगमहा आतपाच्या गृहेव॥
वृष्टीचा मुख्यहेतू अवनिरससुधाप्राशना पानपात्र ॥
होवो तें भद्र तुह्मां दिनकररुचिचें मंडल क्षेमछत्र ॥ ७४ ॥

सिंधुक्षीरेव पावे नियमितसमयीं वृद्धि तैसें नभेव ॥
दावी ताराग्रहार्धा स्वउगमसमयीं लक्षणें माधवेव ॥

नाशी अन्यप्रकाशा उदयगिरिशिरीं भूषणश्रेणितुल्य ॥
खंडी ध्वांत प्रभातीं दिनकरपरिधी ते हरो दुःखमूल ॥७५॥

शोभे ते पद्मरागासमकनकरुची दीप्ति हेमाद्रिशृंगीं ॥
भासे किंजल्कपुंजापरि अलिकुलरुग् व्योमअंभोजभागीं ॥
कालाहीचिन्ह तैसें, दिवसशिरिं महारत्नकांतीसमान ॥
देवो त्रैलोक्यभूषा दिनमणिपरिधी ते तुह्मां क्षेमदान ॥ ७६ ॥

पावे उत्पात्ति होतां उडुपवपु लया, कोण रक्षी उडूंसीं ॥
ये ग्लानी शूलिअक्षा, मधुरिपु हरिच्या मंदता कौस्तुभासी ॥
वह्नी हीनत्वतेतें अवनिनभतमा क्षिप्रतेनें विनाशी ॥
ऐसें तें भास्कराचें द्रुत पुनित करो मंडल प्राणिराशी ॥७७॥

प्राचीतें उद्भवे तें, ह्मणति ह्मणुनि कीं सर्वदिग्द्वार्शि पूर्वा ॥
होतो उत्पन्न तैसा दिवस यदुगमें, देउ ते मुक्ति सर्वा ॥
संरक्षी जे क्रमानें त्रिभुवनभुवना मध्यअह्निंप्रदीप्त ॥
विश्वात्मा विश्वकर्ते जगदुपकृतितें मंडलाकांतिलिप्त ॥ ७८ ॥

शोषी सप्तार्णवातें अजलमरुमहीच्या परी कल्पकालीं ॥
तैशा ज्याच्या प्रतापें फुटति तडतडा लोहितुल्याद्रिआली ॥
देवो आनंद तुह्मां ग्रहपतिपरिधी विश्वहानी भयें ते ॥
आकर्षोनी स्वतेजा धरि विहित असें चक्षु तें सूक्ष्मतेतें ॥७९॥

भेदोनी व्योमवापी तमपटलमहाकर्दमीं उद्भवे जें ॥
ज्याच्या वाहानपार्श्वीं अरुणसुरुचिनें रक्तिमा संविराजे ॥
ग्रासाया कृष्णकांती तम असकृत ये भृंगसा ठायिं ज्याचे ॥
देवो तें मंडल श्री शिवकमलपरी शीघ्र तुह्मां रवीचें ॥८०॥

जाळी भर्गाक्ष कामा द्रुत, परि न तसें जें करी पूर्ण कामा ॥
लोटीते पोत देते अवधितिरिं मरुद् वंदिती स्वर्गधामा ॥
अश्रांतत्वें भ्रमे जें, भ्रमण हरि परी संसृतीचें जनाचे ॥
रक्षो तें पथ्यकारी असुनि मग विरुद्धक्रियी जें रवीचें ॥८१॥

सिद्धांनीं सप्रमाणें, विधियुत विबुधें, चारणें प्रेमयुक्तें ॥
गीतें गंधर्वमुख्यें, रजनिचरकुलें तेवि एकाग्र चित्तें ॥
वारंवाराहि राजे मुनिमुदितमनें सिद्ध अर्घ्यप्रदानीं ॥
रक्षो तुह्मां स्तवीला रवि विविधविधें मोक्षवांच्छी जनांनीं॥८२॥

द्योतें यन्मंडलाच्या अधिकतर महातीक्ष्ण जो तापवीला ॥
भंगीला खूरटंकें तुरगसरणिच्या स्यंदनाच्या जवाला ॥
घर्षीला कीं असंगी निजरथ अरिच्या नेमिच्या घर्षणानें ॥
रक्षो हेमाचलातें रवि निजगमनें तो परीक्षी विधीनें ॥८३॥

होते शुष्का न गंगा, परि विकसितता हेमकंजासि येते ॥
यत्तापें जो न जाळी बहुरुचिरतरश्रीस दे नंदनातें ॥
श्रृंगातें शुद्धता ये वितळति न कधीं तापनीयाचलाच्या ॥
रक्षो तुह्मां असोनी धरि रवि मृदुता दीप्तयोगें दयेच्या ॥८४॥

नाशी एक्या तमातें न, मलिनजनअंहासि नाशीहि तैसा ॥
भक्तज्ञाना विकासी चि न करित असें, देइ पद्मां विकासा ॥
दीप्तीनें केवलान्हा करि न, बहु शिवातें जनाच्या करी तो ॥
विश्वाचे भद्रहेतू विविध असति यत्कर्मिं, रक्षो रवी तो ॥८५॥

निश्चेष्टी मृत्तिकेव, श्रितशयनपटा, हीनउद्योगदेही ॥
संदेही जीवितत्वीं निबिडतरतमें व्याप्त काष्ठांसि पाही ॥
दीर्घश्वासी हि तैसा, परमपरवशी व्याप्त शोकें नृलोक ॥
होतो मित्रान्यलोका स्वगमन करितां, तो तुह्मां रक्षु अर्क ॥८६॥

त्रैलोक्यालंघनीं जो चपल, परि सदा स्थीर विश्वोपकारीं ॥
प्राण्यांच्या लोकनासी प्रखर बहु, परी लोचना हीतकारी ॥
जो तेजें तापदायी, हरि तपिमुनिंच्या संसृतीच्या त्रितापा ॥
उत्पत्त्याधिक्यवृद्धी दिनकरकमला देउ नाशोनि पापा ॥८७॥

ज्याच्यापासूनि होती ऋतुयुत समय, व्रीहि, पर्जन्यवृष्टी ॥
नक्षत्रें दीप्त तैसीं, वहति पवनही, पावती देव तुष्टी ॥

पालीती भूप भूतें, हृततिमिर दिशा, लंघिती नाब्धि सीमा ॥
ज्याच्या वीणें त्रिविश्वें न चलति, रवि तो सिंधुजा देउ तुह्मां ॥

जेणें उत्पत्ति तैसी स्थितिलयहि सदा घेतले आत्महस्तीं ॥
क्रीडे कैलासि सौख्यें हर हृतविरही घेऊनी शैलजा ती ॥
कूपारीं शेषतल्पीं हरि शयन करी, योग साधी विरिंची ॥
रक्षो तो भानु तुह्मां सतत धरितसे चित्तिं चिंता जगाची ॥८९॥

तो ऋग्वेद प्रकाशे नभिं दिनमणिचें मंडलाकारतेज ॥
तैसेंची मंडळीं जो अणुपुरुष वसे, तें यजुर्वेदबीज ॥
दैदीप्या कांति तेची द्विजवर गणती तीसरा सामवेद ॥
ऐसा त्रीवेदरूपी अमृतद सविता तो तुह्मां देउ मोद ॥९०॥

वाह्य स्वांकीत केला पशुपरि हरिनें जो तथा पक्षपातें ॥
संचारे विश्वविश्वीं उरगअभिजनद्वेषि त्या पक्षिपातें ॥
जिंकी नाशो वृजीना हरिहरिनियता कर्मसाक्षीनसूत ॥
स्थैर्यें तेजें विधीसा समद्दशिवगासि श्रेष्ठ सूताग्रणींत ॥९१॥

दैत्यांचा नाशकर्ते असुनि आदितिचे पुत्र इंद्रादि तैसे ॥
पालीती विश्वविश्वा विहितपथिं, परी नाम आदित्य ऐसें ॥
झालें कीं प्राप्त एका रविस निजगुणें, देउ लक्ष्मी तुम्हांला ॥
त्रैलोक्यश्रेष्ठवृंदारकमुनिनिकरें सादरें जो स्तवीला ॥ ९२ ॥

स्वर्गीं वास्तव्य ज्यांचें रिपुहननपटू पालिती या जगाही ॥
इंद्राद्यादित्य साचे, परि अदितिसुताख्याचि रक्षी स्वदेहीं ॥
जो नानासद्गुणें, त्या त्रिजगिं नमिति जे नारदादि स्तवीती ॥
देवो तो नित्य तुम्हां वहु सुकुशलता अंशुमान् श्रीगभस्ती ॥

तेजोकक्ष्मास्वरूपी जलमय जगता वृष्टिनें वारिरूपी ॥
वायूत्पत्तीस कर्ता अनिल ह्मणुनिया दाहकें अग्निरूपी ॥
प्रार्थीतार्थप्रदानी ह्मणुनिचि यजमानेंदुदर्शी स्वहंस ॥
तारापंथस्थ देवो शिव रवि हरसा अष्टमूर्ती तुह्मांस ॥९४॥

प्रातःप्राफुल्लिताब्जीं रुचिर किरण ते शोभताती जयाचे ॥
त्यागूनि भक्तियोगें अरुण हय तसें दुःख खोलंघनाचें ॥
नेती चौदाहि लोकीं, स्तविति निकर ज्या निर्जरांचे सदैव ॥
संरक्षो सर्व कालीं मुररिपुहरिसा तो तुह्मां भानुदेव ॥९५॥

अंभोत्पत्तीस कर्ता महद्‌चलवरोत्पत्तिचें बीज एक ॥
त्रैलोक्योर्ध्वी विवासी, बहुविषम परालंघनातें यदोक ॥
वक्त्रें चत्वारि ज्याचीं द्युतियुत किरणें दीप्त चत्वारि आशा ॥
देतो पद्मा विकासा सुपुरित विधिसा ब्रध्न तो युष्मदाशा ॥

पृथ्वीद्युग्रावसिंधुप्रयुतदशदिशा दाशिता स्वप्रकाशीं ॥
सर्पारिज्येष्ठबंधू बहु चतुरपणें हांकि ज्याच्या हयांसी ॥
दृष्ट्योत्पत्तीस कर्ता अमरवरजगीं होय ज्याचें न साम्य ॥
रूपें जो द्वादश स्व प्रकट करि लयीं, भानु तो पूर्ण काम्य ॥९७॥

जातां जो अन्य लोकीं ऱ्हदनदसरितामानसादी सुतीर्थें ॥
होती कीं व्यर्थ, तैसे निरयदकलुषच्छेद्यअर्घ्यंबु होतें ॥
होती न स्नान केल्या पुनित सुरनदीतीर्थिंही मोक्षकांक्षी ॥
बीजान्होत्पत्तिचें जो शिव बहुत तुम्हां देउ तो सर्वसाक्षी ॥९८॥

सृष्टीच्या पूर्विं जैसीं सकलहि जगतें लुप्त पाताळपंकीं ॥
तैसीं अज्ञाननिद्रायुत अगणितची लक्षणीं ही अतर्की ॥
जाती ज्याच्या वियोगें प्रतिरजनितमीं सर्व विश्वें बुडूनी ॥
त्यातें उत्पत्तिकर्ता उदयतरणिचा तो तुह्मां क्षेमदानी ॥९९॥

जातां या द्वीपिं अस्ताद्रिवरिचि उदया पावतो अन्य विश्वीं ॥
तैसीं चंद्रप्रकाशप्रयुत निशि जहाल्या परत्रोष्ण दावी ॥
कर्ता जो काल देशा, परि न वश कधीं होय जो देशकाला ॥
तो आत्मस्वामितेनें त्रिभुवनिं हित दे भानु रक्षो तुह्मांला १००

यद्रश्मी वासराधी सकलहि उदया नालिया बालकाली ॥
कांतीहीन स्वतेजें करिति गिळ्ानि जे चंद्रमादिग्रहाली ॥

देती श्री श्रेय तैसें सुरपुरकनकग्राव अश्मासमान ॥
येतां हेमाद्रिदेशीं अवनिस उदया, नाशु युष्मदृजीन ॥१०१॥
गीर्वाणीं जें मयूरें प्रथम विरचिलें आत्मबुद्धिप्रभावें ॥
तें कृष्णें प्राकृतार्थीं निजलघुमतिनें गाइलें प्रेमभावें ॥
देवो हें नित्य गातां रविशतक महास्तोत्र सर्वा जनातें ॥
श्रीमोक्षारोग्यतादि प्रचुरतर, सदा प्रार्थना ही तयातें ॥१०२॥

प्रकरण ५६ वें.

लहुकुशआख्यान.

आर्या.

श्रीरामचंद्र आला मर्दुनि खल रावणा घटश्रवणा ॥
आयोध्या नगरीसी, पुढिल चरित्रा करा तुह्मी श्रवणा ॥१॥
अकरा सहस्र वर्षें केलें शून्यारि राज्य रामानें ॥
पाळी प्रजा सुतापरि, लिप्त न नर कोणिही जरामानें ॥ २ ॥
झाली गर्भिणि सीता, होतां षण्मास सोहळे करिती ॥
कौसल्यादिक माता, ग्रामींचे पौरही अनेक रिती ॥ ३ ॥
वासंतिक निशिसमयीं पाहुनि पूर्णेंदुसुप्रकाराला ॥
राम ह्मणे, सीतेसह जावें पुष्पकवनीं विहाराला ॥ ४ ॥
पाचारुनि भूमिसुता जाई दंपत्य पुष्प-आरामीं ॥
पाहुनि वटिकाश्रीतें होती ते मानसांत आरामी ॥ ५ ॥
सीताकरांगुलीतें धरुनी दावी लतामहिरुहांतें ॥
नानाविध जातींच्या सप्रेमें रामचंद्र निज हातें ॥ ६ ॥
एकांत समय पाहुनि राम पुसे दोहदास जानकितें ॥
सांग सखे विमल मनें तूं कांहीं, आपणा उणें न किं तें ॥७॥

पुरवीन निश्चयें तें, न धरी शंका मनांत तिळभर ती ॥
पाहुनि तव मुखशशिला ये प्रेमें चित्तसिंधुला भरती ॥ ८ ॥
मंद सुहास्या करुनी बोले साध्वी, दुजें न मज भावे ॥
एक श्रीरामाविण, तत्पदिं मन तें सदा जडो भावें ॥ ९ ॥
त्यागूनि सखे लज्जा कथन करी, सर्व काम पुरवीन ॥
कैसेंहि असो मग तें, तव मनिंच्या हेतुला न उरवीन ॥१०॥
मृदुमधुसुभाषयुक्ता नमुनि ह्मणे रामपादपद्मातें ॥
इच्छा एक मनिं असे, विचार परि ये त्रपाद पद्मा ते ॥११॥
परि आग्रहासि पाहुनि कथितें, करुणाघना, मना नाणा ॥
रोषा, पंच निशीं म्यां वसणें गंगातिरीं मुनीसदना ॥ १२ ॥
करणें शयन तृणासनिं, भक्षावें कंदमूलपर्णांतें ॥
वाटे मन्मनिं ऐसें, पूजावें श्रेष्ठविप्रवर्णांतें ॥ १३ ॥
परिसुनि राम मनिं ह्मणे, पूर्वी वनवास भोगिला असुनी ॥
झाली तृप्त न मानसिं, जाणुनि पुढिला कथी बरें ह्मणुनी ॥१४॥
एके समयीं रामें ग्रामींचे हेर आणुनी पुशिलें ॥
निंदिति जन वा वंदिति मजला पुरिंचे, खरें कथा पहिलें॥१५॥
संचरतां नगरिं सदा, जनवार्ता ऐकतां स्वयें कानें ॥
प्रियअप्रिय ह्मणति मज, अभय तुह्मां सर्वतोपरी जाणें ॥१६॥
ह्मणती ते रघुराया, नगरींचे सर्व जन तुह्मां स्तविती ॥
परि आहे ग्रामींचा एक रजक, तो महान पापमती ॥ १७ ॥
तो निंदि आपणातें लावुनि दूषण उगाचि भलतेंसें ॥
कथिल्या दंडुं तयातें, तत्सम दुर्जन न कोणि अन्य दिसे ॥१८॥
राम ह्मणे, दूतांनों, देतो दूषण कथाचि काय मला ॥
कथना भय न धरावें, नेणो मद्दोष त्या असे गमला ॥१९॥
दूत ह्मणति, त्या रजकें एके दिनिं ताडिलें स्वभार्येतें ॥
तद्रोषें तातगृहीं जाउनि वहुदीर्घकाल राहे ते ॥ २० ॥

काहीं काळें परती तातें जामातगेहिं आणून ॥
प्रार्थुनि बहु बोले त्या, घ्यावी ईतें गृहांत नांदवुन ॥ २१ ॥
क्रोधें जामात ह्मणे, ईतें मी निज गृहीं न घेईन ॥
त्या परती तुह्मि तुमची, अनुचित कर्मा न पात्र होईन ॥२२॥
मी तो राम नव्हें कीं, नांदवि आणूनि गेहिं सीतेसी ॥
जी रावणें स्वसदनीं ठेविलि षण्मास आपणापाशीं ॥ २३ ॥
निर्मलचि रजक आह्मी, परवस्त्राचेहि डाग धूणार ॥
डाग न लावुं निजकुला, रामापरि अनुचिता न करणार ॥२४॥
परपुरुषाच्या सदनीं करितां वास्तव्य अंगना विमल ॥
राहील कां वदा हो जाणुनि अपणास सुज्ञ लावि मल ॥२५॥
स्त्रीमोहें राम जसा सोडुनि नयनीति नांदवी तीतें ॥
स्त्रीलंपट मी न तसा, सभ्य न वरिती असभ्य रीतीतें॥२६॥
झाला तप्त रघुपती, अहि जैसा पुछिं पाद तो देतां ॥
पाचारुनि सौमित्रा सांगे संपूर्ण दूतवृत्तांता ॥ २७ ॥
रजकें मज निंदियलें, यास्तव सोडीन जानकी विपिनीं ॥
दिधलें दूषण त्यानें, मानावें सत्य कां न तें सुजनीं ॥२८॥
म्यां दशवदना वधुनी आणिलि वसुधासुता सुवेळेसी ॥
विधिवृषविबुधांसन्मुख करि ती दिव्यास त्याच वेळेसी ॥
रजक परी लांछन दे, सौमित्रा तें न सोसवे मजला ॥
त्यागिन यदर्थ सीता, त्यागि जसा प्राण रक्षिल्या तनुला ॥
अथवा प्रपंच तापसि, माया ममता त्यजी मुनी जैसा ॥
अपवादमूल सीता त्यागिन मी निश्चयें अजी तैसा ॥३१॥
सौमित्र ह्मणे, रामा, पाखंडी म्लेंच्छ दुर्मती जन ते ॥
निंदिति शास्त्रश्रुतिला, त्यागिति कधिंही परंतु सुज्ञ न तें ॥
मुक्तेस निंदि वायस, परि टाकिति काय राजहंसतती ॥
अथवा भ्रमरां दर्दुर, परि ते कमलिनि कधींहि न त्यजिती ॥

निंदक निंदी संतां, भाविक जन ते तथापि वंदीती ॥
दोषी तस्कर शशिला, परि त्या प्रेमें चकोर इच्छीती ॥३४॥
नीचाचे बोल कधीं ज्ञात्यांनीं मानसीं न आणावे ॥
कुटिलाचे तोषा कां सुजनें तन्मतिसमान वागावें ॥ ३५ ॥
सतितें निंदिति जारिणि, म्हणुनि तिनें कां स्वधर्म सोडावा ॥
यवनभयें मेल्याही विप्रें निजधर्म नेम मोडावा ॥ ३६ ॥
राज्याधिकारि राजा सर्वहि जन कधिं बरें न कीं म्हणती ॥
किति निंदिति,किति वंदिति,म्हणुनी राज्यासनासि कां त्यजिती
विहिताविहितत्वाचा करणें लागे विचार अधिं सुज्ञें ॥
सर्वज्ञ तुम्ही रामा, सांगावें काय म्यां तुम्हां अज्ञें ॥ ३८ ॥
च्छेदीन रजकजिव्हा जाउनि आतां, न ठेवितों वदनीं ॥
निंदिलि जिणें कुमतिनें जगवंद्या जानकी जगज्जननी ॥३९॥
श्रीराम म्हणे, अनुजा, दंडियल्या खल म्हणूनि रजकातें ॥
असुनी दोषांगिं वृथा म्हणती जन दंडिलें न मज कां तें ॥
साहुनि जन-अपवादा भोगावें राज्य हें न मज रुचतें ॥
त्यागावें सीतेतें त्यावांचुनि अन्य कांहिं ना सुचतें ॥४१॥
दे सोडुनि वनिं सीता जाउनि अनुजा, न लावणें उशिर ॥
देईन जीव ना तरि च्छेदुनि आतां स्वपाणिनें स्वशिर ॥४२॥
पाहुनि निर्वाण असें उठिला तो शीघ्र उर्मिलाकांत ॥
त्या दुःखें स्वमनीं तो धैर्यगिरी परि करीत आकांत ॥४३॥
तेव्हां विव्हल होउनि आला सौमित्र जानकीसदनीं ॥
वंदुनि उगाचि राहे, म्लानी परि दावितो न कीं वदनीं॥४४॥
पाहुनि सीता त्यातें आशीर्वादासि देउनी बोले ॥
भाऊजी, कां आजी येणें तुमचें अकालिं या झालें ॥ ४५ ॥
जोडुनि पाणि ह्मणे तो, श्रीरामें धाडिलें मला माते ॥
वनिं मुनि-आश्रम दाउनि पूर्ण कराया त्वदीय कामातें॥४६॥

परिसुनि हर्षें बोले, मागें म्यां प्रार्थिलें प्रभुस होतें ॥
दोहद पुसिले तेव्हां, पुरवाया धाडिलें तुम्हां हो तें ॥ ४७ ॥
क्रमुनी वनि पांच निशी साधु तपोनिष्ठ आश्रमीं मुनिच्या ॥
मागुति सत्वर येऊं स्वपुरीं पुरवूनि हेतुला मनिंच्या ॥४८॥
परिसुनि शेष मनिं ह्मणे, आतां कैची गृहास येणार ॥
प्रभु-आज्ञा मान्य मला, होवो जें जें असेल होणार ॥ ४९ ॥
नानालंकारपटा घेउनि बैसे रहंवरीं महिजा ॥
सारथ्य फणींद्र करी, दुःखि परी गरलपानिंसा अहिजा ॥५०॥
आच्छादुनि रथ सुपटें होतां श्रुत तें न वृत्त कवणासी ॥
आले जान्हवितीरा, अवलोकिति भीतिदायक वनासी ॥५१॥
मार्गी अपशकुन बहू जनकसुतेला क्षणोक्षणीं दिसती ॥
पाहुनि मानसिं दचके, जैसी दचके खला विटासि सती ॥५२॥
देखुनि विपरित चिन्हें सौमित्रातें ह्मणे महीतनया ॥
सव्याक्ष लवे माझा, गमनीं मजला दिसेचि हीत न या ॥५३॥
परि तो न करी भाषण, आणी गहिंवरुनि लोचनीं वारी ॥
या आजि संकटातें कवण, विभो, तो ह्मणे मनीं, वारी ॥५४॥
प्रभु तूं संकटहर्ता, परि संकटिं तूंच घालिसी आजी ॥
आतां काय कथुं इतें, पुसते पसरूनि दीनसी आ जी ॥५५॥
पुनरपि सती ह्मणे ती, तुमचा अजि कां मुखेंदु कोमाला ॥
झाले श्रम प्रवासें, सांगा हो काय दुःख तें माला ॥ ५६ ॥
श्रीजान्हवीतटींचे मुन्याश्रम ते पवित्र पाहून ॥
स्वपुरा सत्वर जाऊं आनंदें पांच रात्रि राहून ॥ ५७ ॥
बोले कांहीं न परी, राहे असुखी तटस्थ चिंतितसा ॥
देतां नोत्तर अल्पहि साध्वि ह्मणे काय चित्तिं चिंतितसा ॥५८॥
नौकेमाजी सहरथ बसवुनि मग जानकीस पैलतिरा ॥
उतरुनिया देवनदी जातां बोले, अतां इथे उतरा ॥ ५९ ॥

तें घोर भयानक वन, तेथें शार्दूल सिंह संचरती ॥
दिसति न मुनि, मुनिआश्रम, तेव्हां बहु घाबरेचि अंतरिं ती॥
सीता ह्मणे, मज तुह्मी नेतां कोठें त्यजूनि पंथाला ॥
विपरीत आजि दिसतें, झाली कीं काय कुमति संताला ॥ ६१ ॥
श्रुतिघोष श्रुत होय न विप्रमुखींचा, तसे न मख दिसती ॥
स्वाहास्वधाध्वनीहि न, आहे हें काय, ती तया पुसती ॥ ६२ ॥
घालूनि भुवि तृणासन सौमित्र ह्मणे, बसा, अहो माते ॥
आज्ञापिलें रघुवरें कथितों परिसा सलक्ष जें मातें ॥ ६३ ॥
बोलुनि ऐसें स्तब्धचि राहे, कांहीं न बोलवे त्यातें ॥
कैसें कथूं, मनिं म्हणे, वदवति का हीन बोल वेत्त्यातें ॥६४॥
परि रामाज्ञा लंघन करणें न, असा विवेक करुनि मनीं ॥
आणुनि नेत्रीं जल तो स्फुंदित कथि तत्पदांबुजा नमुनी ॥६५॥
निंदियलें रजकानें, ह्मणुनी सोडूनि ये त्वरें तुजला ॥
घोर भयंकर विपिनीं, ऐसें कथिलें असे मुखें मजला ॥६६॥
आणिलि त्यापरि तुजला, आतां राहे स्मरूनि रामाला ॥
तीं भाषणें पवीसम करती आघात त्या सुरामेला ॥ ६७ ॥
मूर्च्छा येउनि पडली, जैसी कमलिनि पडे तडिद्घातें ॥
अथवा रंभा जैसी पावे पतनासि कीं महावातें ॥ ६८ ॥
करुनी प्रदक्षिणा तिसि वंदुनि चरणीं रहंवरीं चढला ॥
परि निज ह्रदयामाजी विश्वप्रसुदुःखवह्निनें कढला ॥ ६९ ॥
भूजलतेजोनिलनभ अहिखगवृकभल्लसिंहदंतींतें ॥
प्रार्थूनि सविनय ह्मणे, संरक्षावें अतां तुह्मी तीतें ॥ ७० ॥
गेला समीरवेगें त्यागुनि निजपत्तनास एकलिला ॥
जैसा देउनि येती वनिंच्या वनदेवतेप्रती बालिला ॥ ७१ ॥
वंदुनि राघवचरणीं कथि, कथिल्यापरि त्यजूनि घोरवनीं ॥
आलों श्रीभूमिसुता, परि मज तें दुःख सोसवे न मनीं॥७२॥

इकडे सावध होउनि ती सति अवलोकि उर्मिलाकांता ॥
न दिसे परि रथसह तो, होउनि विव्हल करी महाकांता ॥७३॥
करुनी ऊर्ध्व करांतें दीर्घ रवें मारि त्यास हाकेला ॥
त्यजुनी जातां मजसी, ऐसा म्यां काय मंतु हा केला ॥७४॥
करुनी सत्वर मम वध जाउनि सांगा उदंत रघुपतितें ॥
गेली परत्रिं सीता, पढवावें काय सज्जना पतितें ॥ ७५ ॥
टाकूनि एकलीला जातां विपिनांत, काय ही रीत ॥
होतें तरी बरें, हा देतां लोटूनि काय विहिरींत ॥ ७६ ॥
त्यागुनि निष्ठुरता ती, सौमित्रा, धाव धाव तूं परता ॥
त्यजिसी मंतुविना मज, न दिसे जगतांत नीच तुजपरता ॥७७॥
यद्यपि कथिलें प्रभुनें, तरि तूं कां जाणसी न नीत नया ॥
कथिलें, परी तुझें कां झालें उद्युक्त कर्मिं चित्त न या ॥७८॥
होतें त्यागार्ह जरी, आणिलि मग कां दशास्य वधुनि तरी ॥
आहे बरी ह्मणुनि ती स्वस्थ न बसतां किमर्थ यत्न करी ॥
सोडिसि वनांत, त्याहुनि जरि मजसी दडपितासि अवनींत ॥
होतें बरें, न ह्मटलें असतें तुज मी, 'वरीसि अवनीत' ॥८०॥
केलें बहु निंद्य तुवां, म्हणतिल तुज साधु काय तीं लोकीं ॥
ह्मणुनि असें चोहिंकडे चुकतां सुत जेवि माय ती लोकी ॥८१॥
धावे, पडे, उठे ती, आक्रोशें मारि थोर हाकाला ॥
शोकाला पार न त्या, विसरसि कां मज म्हणे महाकाला ॥८२॥
तूं धांव धांव रामा, पाहसि किति दीन दासिचा अंत ॥
सुदयादृष्टि विलोकीं, ना तरि होतो अतां हिचा अंत ॥८३॥
हे रामांबुदशामा, ही रामा विपिनिं केवि आरामा ॥
पावेल, काय पावति सोडुनि ऋषि जीवितास जलधामा॥८४॥
पशु पक्षि देव वनिंचे तैसे पाषाण वृक्ष भृंगतती ॥
पाहुनि रूदन करिती तीची दुःखें स्थिती विसंगत ती ॥८५॥

त्याजिलें जेणें ईतें, तो केवल निश्चयें शिलात्त्हृदयी ॥
असता कोमल अंतरिं, न शिरे तरि, ह्मणति, कर्मि या अदयीं ॥
कांपे धरा थरथरा, शिरिं तिसि धरणीधरा न सांवरवे ॥
रडती सहतरु गिरिवर, भरलें त्या गगन शोकभावरवें॥८७॥
किति एक पक्षि पक्षें करिती छाया महीसुतेवरती ॥
आणुनि शीतल निर्मल जल चंचूनेंहि सिंचना करती ॥८८॥
वनधेनु आत्मपुच्छें घालिति त्या मंदमंदसा पवन ॥
तपन त्यजि तापातें, तैसा हिंस्र पशुवृंद साप वन ॥ ८९ ॥
करिती सकल उपाया व्हाया तद्दुःखवन्हि तो शमन ॥
परि होय न तिळभरही, तोषे का शशिविना चकोरमन ॥९०॥
हे रामा, हे रामा, मनविश्रामा रघूत्तमाऽकामा ॥
वामा या रामेवरि होतां पावसि कसाचि आरामा ॥ ९१ ॥
आतां काय करूं मी, घे भूमाते मला उदरिं परती ॥
कां प्रसवलीस अशि ही, नाहीं दुःखी जगांत मजपरती ॥९२॥
मातास्वभाव ऐसा होतां जरि दुःख आत्मसंततितें ॥
घे कवळुनि उदरिं तसी मजला, लागेल का उसंत तितें ॥९३॥
त्यागावा स्वासु जरी, तरि येइल आत्महानि-अघ शिरिं तें ॥
तैसीच बालहत्या, आहें गर्भिणि यदर्थ ना करितें ॥ ९४ ॥
जन्मादारभ्य कधीं केलें वर्तन न मी अधर्मानें ॥
स्वप्निंहि कुबुद्धि न धरीं, परि हें फल भोगिं पूर्वकर्मानें ॥९५॥
मी अज्ञत्वें सहजीं कथिला पुसतां स्वहेतु, ह्मणुनि तसें ॥
करणें न योग्य, माता वर्ते काधिं कां स्वतोक मानि तसें ॥९६॥
तूं माता, तूंचि पिता, तूं गुरु, तूं बंधु, तूं सखा, धनि तूं ॥
हंता तूं, प्राणहि तूं, रक्षक मायाप्रभावबंधनिं तूं ॥ ९७ ॥
जावें कुठे वदे मी, थारा मज कोण देइ रघुराया ॥
करुनी आतां सुदया नेई परती त्वरें निज घरा या ॥९८॥

ऐसी नाना परि ती त्या भयद वनीं करी विलापातें ॥
न चि सांवरी शरीरा, मग ते नग केवि कचकलापातें ॥९९॥
विसरुनि ममापराधा करुणासिंधो दयाघना रामा ॥
रामा ही निजधामा नेउनि पावविं मनीं सु-आरामा ॥१००॥
अत्यंत दुःखि झाली, आली मूर्च्छा न तीस सावरली ॥
पडली अचेष्टित असी, भासे जणु काय भूमिनें वरली ॥ १ ॥
आला दैवें तीच्या वाल्मीकिमुनी सशिष्य त्याच वनीं ॥
तों बहु करुणापर रव येउनि अनुचित पडे तया श्रवणीं ॥२॥
जाणे त्रिकालवृत्ता, जो निज तेजें दिवाकरा हरवी ॥
वर्णी जन्मापूर्वीं रामकथा, कीर्तिनें जगा भरवी ॥ ३ ॥
ऐके तो करुणस्वर फिरतां विपिनीं स्वयें मुनी कानीं ॥
जो बहु परिपूरितसा गमला अत्यंत दुःखशोकांनीं ॥ ४ ॥
जातां सीतेनिकटीं गमली ती प्रणवरूपिणी माया ॥
आली तपसामर्थ्यें प्रकटुनि या रूपिं आजि या ठायां ॥५॥
ह्मणती, शुभकल्याणी, सांगे तूं कवण, कां वनीं फिरसी ॥
कां मन विव्हल दुःखें, कवणें पिडिलें किमर्थ गे तुजसी ॥६॥
बोले त्रिजगन्माता, आहें मिथिलेश्वराचि मी कुमरी ॥
पत्नी दाशरथीची, जेणें वधिलें दशानना समरीं ॥ ७ ॥
अपराध तिलहि नसतां सोडी सौमित्र आणुनी विपिनीं ॥
आहें अनाथ मी, मज रक्षावें मानुनी सुता स्वमनीं ॥ ८ ॥
ऋषि बोले, गे बाळे, मजला वाल्मीकि लोक ह्मणतात ॥
रघुपतिहि मला जाणे, आतां तूं त्यागि शोक, ह्मण तात ॥९॥
श्रीरघुनाथभविष्या जन्मापूर्वींच म्यां असें कथिलें ॥
जेवि सुधाप्राप्तीस्तव विबुधांनीं आधिं सिंधुतें मथिलें ॥१०॥
त्वत्तात सुहृद मम तो, तेव्हां तूं कन्यकाचि, हें नातें ॥
कथणें न लागतें कीं, चाल अतां तूं मदीय सदनातें ॥ ११ ॥

तूं प्रसवशिल सुतद्वय, होतिल ते वासवापरी वीर ॥
होइल यदग्रिं अजयी सहदल सौमित्र आणि रघुवीर ॥१२॥
वंदी साष्टांगें ती मुनिपदकमलासि आदरें लवुनी ॥
मानुनि ताताधिक जी गेली होती महादरें लवुनी ॥ १३ ॥
गेला आश्रमिं घेउनि, तों मिळती भोंवती मुनीजन ते ॥
पाहुनि तत्सौंदर्या आलें विघ्नचि असें मनीं गणते ॥ १४ ॥
आह्मी भोळे ब्राह्मण, त्यजिलें ग्रामासि या भयें असुनी ॥
तेंचि पुढें ये, पळतां न सुटे तो मृत्युच्या भयें असुंनीं ॥१५॥
येथें वास्तव्य अतां न दिसे बरवें, परस्परां वदती ॥
तारुण्यभरें लवली सौंदर्यश्रेष्ठ अप्सरा वदती ॥ १६ ॥
जाइल तपश्चरण तें हरुनि तपीचेंहि काय नव नीत ॥
स्त्रीवास्तव्य तपोवनिं, कढवि तपा जेवि वह्नि नवनीत ॥१७॥
वाल्मीकि म्हणे, मुनि हो, आहे ही प्रणवरूपिणी माया ॥
आली दैवें येथें, तुमच्या भाग्या न ठाव त्या माया ॥१८॥
मुनि म्हणती, सीता सति जरि ही सत्याचि असेल, देवधुनी ॥
आणिल उटजानिकटीं, ना तरि अजि टाकुं निश्चयें वधुनी ॥
परिसुनि मुनिजनभाषण विनवी श्रीजान्हवीस मिलित करीं ॥
हे हरिपदजे माते, पावुनि मज मुनिकुतर्क गलित करी ॥२०॥
हे गंगे भवभंगे, तव संगें नाशती महाघाली ॥
ओघाली फिरवावी, आलीचे मंतु पोटिं तूं घाली ॥ २१ ॥
सगरकुल उद्धराया ब्रह्मांडा खंडुनी महीपृष्ठीं ॥
येसी, त्रिलोकगामिनि, धावे झडकरि, करी न ही कष्टी॥२२॥
कमलोद्भव कमलापति वृषभध्वज वासवादि सुर कमला ॥
गंधर्व किन्नर ऋषि स्तविती जोडुनि तुला स्वकरकमला ॥२३॥
तव अणुमात्र जलाचा होतांची स्पर्श पापगिरि जळती ॥
स्नानप्राप्ति नरांना होतां ते अक्षयी पदा मिळती ॥ २४ ॥

हे त्रिस्रोते पुनिते सुरसरिते जन्हुनंदिनी माते ॥
या समयीं अनुकंपा करुनि करी तूं यशस्विनी माते ॥२५॥
ऐशा नाना परिनें करितां स्तौत्यासि ओघ तो फिरला ॥
बुडती जयांत गिरिही, ऐसा मुनि आश्रमांत तो शिरला॥२६॥
त्यागुनि आश्रम पळती, स्तविती किति हस्त जोडुनी सतितें॥
रक्षी रक्षी ह्मणती, अज्ञत्वें निंदिलें तुला पतितें ॥ २७ ॥
मग वसुमतीसुता ती प्रार्थुनि निश्चल करी प्रवाहातें ॥
पाहुनि वाल्मीकि ह्मणे, राहे सति मम सुखेंचि गेहातें ॥२८॥
नव मास पूर्ण होतां झाली शुभ अह्नि जानकी प्रसुत ॥
मध्याह्निं भानु येतां प्रसवे रविशशिसमान दोन सुत ॥२९॥
कथिती वाल्मीकीतें जाउनि तैं शिष्य जान्हवीतीरा ॥
झाली प्रसूत सीता, प्रसवलि ती दोन सुंदर कुमारां ॥३०॥
परिसुनि ती शुभवार्ता झाला मुनिमानसीं महानंद ॥
जैसा दशरथभूपा होतां श्रीराम सच्चिदानंद ॥ ३१ ॥
घेउनि कुशलव हातीं आला मुनि शीघ्र सूतिकागेहीं ॥
पाहूनि ह्मणे, विक्रमि होतिल वत्सें प्रसूतिके गे हीं ॥३२॥
श्रुतियुत विधान करितां लहु तो अभिषेकिला लवें ह्मणुनी॥
अभिषेकिला कुश कुशें, अभिधानें ऐशिं त्यांस देइ मुनी ॥
पावति वृद्धिप्रत ते, जैसा कीं शुक्लपक्षिं रात्रिपती ॥
क्रीडति मुनिसुतसंगें, मुनि मुनिललनाहि त्यां बहू जपती ॥
होतां सप्ताब्दें त्यां व्रतबंधाचा सुयोग पाहून ॥
आणी साहित्यार्थी मुनि तो सुरकामधेनु बाहून ॥ ३५ ॥
आरंभिलें सुकार्या पाचारुनि बहु मुनीसमूहातें ॥
काय उणें मग, जेथें पुरवी त्रिदिवेशधेनु निज हातें ॥३६॥
करि सोहाळे बहुपरि उल्हासें तो मुनी दिवस चार ॥
मीलित सकल जनांचा अति उत्तम घेउनी समाचार ॥३७॥

या उभय रामतनयां देती मुनि विप्र ते आशिर्वादा ॥
होतिल श्रीयशमंडित, पात्र न होतील लोक-अपवादा ॥३८॥
वाल्मीकि तया पढवी चौसष्ट कला, तशीं सहा शास्त्रें ॥
सकलश्रुतिविद्याही, युद्धकला, तेवि सर्व शस्त्रास्त्रें ॥ ३९ ॥
झाले प्रवीण सकलीं, मग रामचरित्र त्यांसि पढवीलें ॥
चढवीलें ज्ञानशिखरिं, सद्गुणबोधें बहूत मढवीलें ॥ ४० ॥
रंजविती सीतामन दावुनि ते बालकौतुका नाना ॥
वदति वच बोबडें, तें लागे तीच्या सुधेव कानांना ॥ ४१ ॥
आणूनि कंदमूलें देती ते प्रेमयुक्त मायेतें ॥
पाहुनि तद्वदनशशी होय तिला सुख, कुठे न माये तें ॥४२॥
घडतांचि सत्समागम जन्मीं संसारदुःख तें विसरे ॥
सीतादुःख तयांतें पाहुनि मागें क्षणैक तेवि सरे ॥ ४३ ॥
होतां दशवर्षी ते जाती मृगयेस घोरतर विपिनीं ॥
वधुनी आणिति पशुंतें, पाहुनि भ्यावें मनांत ज्या तपिंनीं॥४४॥
एके दिवशीं जाती मृगयार्थी काननांत दोघे ते ॥
वाल्मीकिबंधु शृंगी शैलीं ध्यानस्थ बैसले होते ॥ ४५ ॥
शृंग असे शिरिं म्हणुनी मानुनि पशु वधिति मारुनी विशिखा॥
आणिति आश्रमिं ओढुनि चापाग्रीं वांधुनी तदीय शिखा ॥
पाहुनि वाल्मीकि म्हणे, केलें विपरीत आजि हें काय ॥
हा विप्र बंधु माझा, यद्घातें दुःखि होय हें काय ॥ ४७ ॥
झाला अनिवार तुम्ही, मुनिशृंगीचा मृगेव वध केला ॥
जडली द्विजहत्या शिरिं, रे वत्सानों, हि कोण विध खेला ॥
कृतबंधूत्तरकार्या येउनि मुनि कथि महीकुमारीला ॥
या धीटांनीं विपिनीं मृगयाव्यसनें सुविप्र मारीला ॥ ४९ ॥
घडली वाडवहत्या, जी बहु यत्नाविणें न परिहारे ॥
सीता म्हणे पित्या, त्या आधिं करि यत्नासि, ज्यापरी हारे ॥

हे सूर्यवंशि उग्रचि, त्यांतून सकलकला प्रावीण केलें ॥
ताता तुम्ही कृपेनें, त्याचेंची हें तुम्हांसि फल आलें ॥५१॥
वाल्मीकि ह्मणे, यांनीं कांचनकमलें सहस्र आणूनी ॥
अर्चावें पशुपतितें भावें विधिवत् समंत्र वाहूनी ॥ ५२ ॥
तेव्हां लहुकुश म्हणती, ताता, आहेत तीं कुठे वदणें ॥
आणूं सत्वर जाउनि, बोलति ते धैर्ययुक्तशा वदनें ॥५३॥
असति अयोध्यानिकटीं ब्रह्मसरोवरिं सदा असंख्यात ॥
परि तेथें रक्षाया वसति श्रीरामदूत विख्यात ॥ ५४ ॥
प्रतिवासरिं त्या कमलीं राम पुजी श्रीशिवामहेशासी ॥
त्या दुर्घट ठायींचीं प्राप्य कशीं तीं तुह्मां किशोरांसी ॥५५॥
परिसुनि गद्गद हांसति, ते ह्मणती, आणुं लागतां न पळा ॥
शिष्य तरिच हे तुमचे, जाऊं जासि शीघ्र जाय ती चपळा ॥५६॥
त्या रामदूतशशकें करणें या काय सिंहिच्या तनया ॥
जिंकाया रामाही लागे अवधी रणांगणांत न या ॥ ५७ ॥
ऐसें बोलुनि जाती बहु सत्वर ते समीरशा गतिनें ॥
जातां पाहूनि भयें मोहें भुवि टाकिलें निजांग तिनें ॥ ५८ ॥
तीतें वाल्मीकि ह्मणे, लघुहि अनल तृणगिरीस दाहितसे ॥
सति मनिं न भी, तुझे सुत विजयी शंकर जसा सदाहि तसे॥५९॥
आले ब्रह्मसरस्तटिं घेउनिया चापसायकां हातीं ॥
तों मुनिनें कथिल्यापरि फुल्लितपंकजसमूह पाहाती ॥ ६० ॥
तोडी कुश बहु कमलें त्या कासारीं तदा प्रवेशोनी ॥
तें पाहुनि वारणसे धावति त्या हरिवरी अवेशोनी ॥ ६१ ॥
संहारुनी अनेकां धाडी लहु त्यांसि कालधामातें ॥
उरले शेष पळूनी जाउनि कथिती उदंत रामातें ॥ ६२ ॥
करि आश्चर्य रघुपती परिसुनि वृत्तांत मानसीं थोर ॥
वधिलें दूतांसि जयें, ऐसे आहेत कोण ते पोर ॥ ६३ ॥

घेउनि कमलें लहुकुश देती आणूनि आश्रमीं मुनितें ॥
करि आश्चर्य बहु मनीं मुनिपुंगव जानकीहि पाहुनि तें ॥ ६४ ॥
नूतन शिवलिंगावरि अर्पियलीं पंकजें यथाविधि तीं ॥
झाले निर्दोषि, असें द्विजमुनि जनकात्मजेस ते कथिती॥६५॥
एके दिवशीं लहुकुश पुसती चुरितां पदास मातेतें ॥
अस्मत्पिता क्वण तो कथि निजकुल तेवि देश माते ते ॥ ६६ ॥
तेव्हां ह्मणे महीजा, कथितें वृत्ता सलक्ष परिसा रे ॥
जो नृपति अयोध्येचा दशरथ, ज्या देति भूप कर सारे॥६७॥
तत्सुत राम, पिता तो तुमचा, तैसा सहस्रकरवंश ॥
ही निर्मला त्यजिलि वनिं करुनि कठिण मानसा जसा वंश ॥
दिधलें दूषण रजकें, ह्मणुनी त्याजिलें रघूत्तमें मजला ॥
घोर भयंकर विपिनीं, कथितां तत्कंठ गहिवरें सजला ॥६९॥
परिसुनि वदती लहुकुश होउनि संतप्त फिरवुनी नयनां ॥
करुं तुच्छासन, तेणें केलें हें कर्म पाहुनी नय ना ॥ ७० ॥
सीतात्यागापासुनि पडलें दुर्भिक्ष राज्यि रामाच्या ॥
होय न वृष्टी समयीं, झुकली प्रकृती पथा अरामाच्या ॥७१॥
भासे सकल उदासिन, देति न पय धेनु, होति उत्पात ॥
जन गांजिले गदांनीं, तैसे भूकंप चंचलापात ॥ ७२ ॥
पाहुनि अशुभद चिन्हें तें दाशरथी पुसे वसिष्ठाला ॥
करिती मेघ न वृष्टी, पावति कां सर्व पौर कष्टाला ॥ ७३ ॥
बोले वसिष्ठ मुनि तो, अपराधाविण महीसुता त्यजली ॥
जी सतिवृंदिं शिरोमणि, अविचारा तव मती कसी सजली ७४
आतां करि हयमेधा, तेणें विघ्नें समस्त हरतील ॥
होतील पौर सौख्यी, वृष्टीतें वारिवाह करतील ॥ ७५ ॥
हय श्यामकर्ण पाहुनि सोडावा भूतलीं सरक्षकसा ॥
जिंकुनि भूप महीचे करणें भूलोक हा अकंटकसा ॥ ७६ ॥

रामें निमंत्रुनी तैं आणियले विप्र तेवि मुनिवर ते ।।
सुगलबिभीषणआदिक होते जे आपणासि हित करते ।।७७।।
मंडप शरयूतीरीं घालविला बहु विशाल दासकरीं ।।
तैसें मखसाहित्या मंत्रीहातें समग्र सिद्ध करी ।। ७८ ।।
जाउनि वसिष्ठ राघव हयशालेमाजि आणिती वाजी ।।
संपूर्ण लक्षणें युत शास्त्रीं कथिल्याचि योग्य जो याजीं ।। ७९ ।।
मग त्या तुरंगभालीं बांधिति ते हेमपत्रिका लिहुनी ।।
दाशरथी रामें हा हयमेधीं सोडिला असे ह्मणुनी ।। ८० ।।
जरि कोणि असेल बली, तरि तेणें अश्व हा धरावा जी ।।
सहदल रिपुघ्न रक्षी त्यासी,रणशक्ति तरि धरा वाजी।।८१।।
पूजूनि हय यथाविधि सोडियला तो वसुंधरेवरते ।।
तद्रक्षक शत्रुघ्नें जिंकियले रणिं असंख्य नरवर ते ।। ८२ ।।
सीताहेमप्रतिमा करुनि यजे राम अश्वयजनातें ।।
किति आश्चर्य,कवि ह्मणे,देतो जो स्थान अक्षय जनातें ।।८३।।
पातालिं तेच कालीं आरंभी यज्ञ सिंधुपति वरुण ।।
तेणें वाल्मीकीतें नेलें होतें निमंत्रणा करुन ।। ८४ ।।
जातां पातालिं कथी तो मुनि, रक्षी लहूस उपघटिका ।।
गुर्वाज्ञेपरि तो करि, न विसंबे त्यासि एकही घटिका ।।८५।।
तों श्यामकर्ण आला बहु धावत त्याचि वाटिकेमाजी ।।
तो पाहुनि ऋषिनंदन पळती ते पर्णकूटिकेमाजी ।। ८६ ।।
त्यांसी ह्मणे लहू तैं, भ्यालां कां धावतां, कथा मजसी ।।
थांवा म्हणेचि माता भयरुदित बालकासि थांब जसी ।।८७।।
धरुनी मग वाजिशिखा लहु बालक हेमपत्रिका वाची ।।
जाणुनि आशय चित्तीं दावीन ह्मणे शीघ्र सत्रका ऽवाची।।८८।।
गदगद हासूनि ह्मणे, झाला बलवंत त्रिभुवनीं तो कां ।।
नेइ कसा,पाहुं अतां, परता या अश्व जिंकुनी तोकां ।।८९।।

प्रसवालि काय तया प्रसु, झाली निर्वीर काय ही वसुधा ॥
त्याचें शौर्य मदग्रीं केवि टिके लाधतांचि हीव सुधा ॥९०॥
करि तो असी प्रतिज्ञा, धरिला सोडीन हय कदाही न ॥
सफल तरीच जनन हें, ना तरि वन्हींत देह दाहीन ॥९१॥
वेष्टुनि वस्त्र करिं गळीं बांधी नेऊनि कर्दलीस हया ॥
होउनि सज्ज मनिं ह्मणे द्विषदां, युद्धार्थ मंडळीसह या ॥९२॥
ऋषिनंदनां ह्मणे, हा पाहा कैसा तुरंग नाचतसे ॥
या निकटीं,न भिणें या,नाचति विपिनीं कुरंगनाच तसे ॥९३॥
ऋषिबालक तैं म्हणती, धरियेलें त्वां बलें नृपहयातें ॥
जरि येती रक्षक,तरि हाची वृत्तांत रे कथुं तयांतें ॥ ९४ ॥
रक्षक धावत येउनि पुसती, हा कोणि बांधिला हय रे ॥
सभयें ऋषिसुत म्हणती, विदित न, ठेवूनि कर्णि कर हय रे ॥
किति एक भिउनि म्हणती,हा हय या बांधिला किशोरानें ॥
लहु मग म्हणे तयांतें, हृदिं कर ठेवूनि 'याच वीरानें' ॥९६॥
बोलति रक्षक हांसुनि, हें बाल लहान, कौतुकें यानें ॥
धरिला हय,सोडा, गृहिं वसणें भक्षूनि भातुकें यानें ॥९७॥
कोपें त्यासि लहु म्हणे, आहे हा बाल काल कालाचा ॥
तोडीन शिरें तुमचीं, समरीं पाहा प्रताप बालाचा ॥ ९८ ॥
भ्रूसंज्ञा भृत्यांतें ' सोडा वाजी ' रिपुघ्न म्हणुनि करी ॥
आणा उचलूनि तया अज्ञाना आपुल्या चमूनिकरीं ॥९९॥
सोडूं जातां हय तो बोले लहु तस्करापरी काय ॥
करितां कर्म, राणिं अधीं जिंका हा भास्करापरी काय ॥२००॥
परिसुनि तद्भाषण ते म्हणती, हा बाल फार सुकुमार ॥
घेउनि धनु लीला करि, खेळावें संगती मुनिकुमार ॥१॥
सोडाया हय येती, तों लहु लावूनि बाण चापातें ॥
पाडी असंख्य वीरां, पडती द्रुम जेवि चंचलापातें ॥ २ ॥

क्रोधें रिपुघ्न धावुनि पाहे जों तों किशोर रघुपतिसा ॥
त्यातें म्हणे, कुणाचा कवण, मला तूं उदंत सांग तसा ॥३॥
दल मार्दिलें अमित तूं, लाविन शिक्षा अतां, किशोरा, ही ॥
पाहा मार्गणवृष्टी करितों, तैशा न मेघधाराही ॥ ४ ॥
त्यातें लहू म्हणे, रे जल्पसि कां बहुत आननीं वाया ॥
त्वद्दर्पाग्निस पल ही लागे या नंदना न निववाया ॥ ५ ॥
सोडी शर 'बल पाहूं' ऐसें बोलूनिया विशिख लव तो ॥
रिपु थोर म्हणुनि नच भी, पाहुनि अहिसंघ कां विशिख लवतो॥
परिसुनि गंभिर तद्वच कोपें शतशः रिपुघ्न शर टाकी ॥
तें च्छेदी एक शरें, दाविति बल अर्णवाग्नि सर टाकी ॥ ७ ॥
पुनरपि त्यावरि सोडी नानाशस्त्रें सकोप रिपुहनन ॥
छेदी, प्रताप दावी, दनुजरणिं तसा मयूरवाहन न ॥ ८ ॥
करि जर्जर शत्रुघ्ना समरीं अतितीक्ष्णबाणनिकरानें ॥
नाटोपे करितां तो लहु त्याशीं तुमुलयुद्ध निकरानें ॥ ९ ॥
मग रामदत्त मार्गण निर्वाणींचा सतेज अरिदमन ॥
ओढुनि आकर्ण धनू सोडी, विद्युत्परी करी गमन ॥ १० ॥
पाहुनि लहु चित्तिं ह्मणे, जाणे कुश वीर तन्निवारण तें ॥
असता जरि या समयीं, वधिता तो सिंह शत्रुवारण ते ॥११॥
मग धैर्यें तीक्ष्णशरा सोडुनि करि दोन दीर्घ तच्छकलें ॥
लागे एक शकल लव–हृदिं, शरसंधान तें नची चुकलें ॥१२॥
येउनि मूर्च्छा तेणें पडिला भूपृष्ठिं वीर लव तनया ॥
झाला रिपुघ्न कष्टी, हें न नवल, शूर वीर लवत नया ॥ १३ ॥
उतरूनि रथाखालीं आला तन्निकटिं शीघ्र धावून ॥
व्हावें वैराग्य दुजें बालाच्या काय तों वधाहून ॥ १४ ॥
ऐसें चित्तिं ह्मणे, मग घे त्यासी उचलुनी रथामाजी ॥
हें बाल एकलें रणिं, कोण अतां मज ह्मणेल थामा जी ॥१५॥

स्वपुरा शेषचमूसह परती शत्रुघ्न जावयास निघे ॥
पाहुनि रामासि मुद्रा सप्रेमें स्यंदनीं निजासनिं घे ॥ १६ ॥
नेला लहूस पाहुनि ऋषिनंदन आश्रमाकडे पळती ॥
बघतां गलुलिधर जसीं वसती स्वस्थलिं न माकडे पळ तीं १७
येउनि उदंत वनिंचा कथिती सीतेसि रूदती बहुत ॥
धरि हय लव भूपाचा, रणिं करि शरिं अरिचमूकदंब हुत ॥ १८ ॥
द्विषदें निर्वाणशरें लहुतें मूर्च्छित रणांत पाहून ॥
नेलें आत्मपुरिकडे, काकू, त्यातें रथांत घालून ॥ १९ ॥
परिसुनि सीतासति ते महिवरि तत्काल टाकि देहातें ॥
ढाळी बहु अश्रु, करी सुतदुःखोद्भवमहागदें हा ते ॥ २० ॥
उटजिं न कुश वाल्मीकिहि, काय करावेंचि दैवदुबळीनें ॥
आतां कवणालागी मम लहुतनयाप्रती वदुं बलीनें ॥ २१ ॥
अति कोमलतनु त्याची शस्त्राघातें विदारिली काय ॥
पाषाणमूर्तिपरि ती भूमिवरी अचल टाकि निज काय ॥ २२ ॥
तों कुश विपिनांतुनि ये, टाकिसि भूपृष्ठिं अंग कां माते ॥
गेला लहु तो कवण्या, माते, तूं कष्टि, सांग, कामातें ॥ २३ ॥
लावी नयनीं वारी, घाली पटिं मंद शीत समिरण, ते ॥
सावध होऊनि ह्मणे, करुनि लहुस शत्रु ने असमि रण तें ॥ २४ ॥
लघुतोकावरि वीरें टाकावें कां हननकरा विशिखा ॥
चुकला तो तरि त्याची थोरांनीं निजकरें धरावि शिखा ॥ २५ ॥
परि मूर्छित करुनि शरें नेला रथिं घालुनी सुत परांनीं ॥
कोण असे बलि ऐसा, परता त्या आणि या सुतप रानीं ॥ २६ ॥
गुर्जुनि तदा कुश ह्मणे, समरीं मी मर्दुनी रिपुजनासी ॥
आणिन पळांत लहुतें, ना तरि तव नाधिकारि पुजनासी ॥ २७ ॥
ऐसें बोलुनि वेगें घेउनि निज चापमार्गणांस करीं ॥
खंडीन ह्मणे द्विषदां, खंडि जसा इक्षुकाननास करी ॥ २८ ॥

चपलागतिनें धावुनि गांठी सहसैन्य शत्रुशमनातें ॥
चित्तिं ह्मणे जिंकाया केसरिसी करि जसें विषम नातें ॥२९॥
दे दीर्घ रवें हांका, जातां कोठें, ह्मणे, अतां परता ॥
तापरता वीर वधी, वधितो कां बालका अतापरता ॥ ३० ॥
जरि धैर्य असे अंगीं, तरि सत्वर संगरार्थ या परती ॥
केलीत कृति तुह्मी, रे मूर्खांनों, निश्चयें नया परती ॥ ३१ ॥
परिसुनि कुशोद्धतगिरा क्षोभुनि सचमू रिपुघ्न तो परते ॥
कुश मनिं तदा ह्मणे, मी जिंकिन सकलहि पळांत तो, पर ते ॥
पाहुनि शत्रुघ्न कुशा चित्तिं ह्मणे, श्रीरघूत्तमासम हा ॥
भासे, कटकासि हरी जैसी रविची रुची तमास महा ॥३३॥
शत्रुघ्न ह्मणे, बाला, कवणाचा कवण तूं, अधीं वद रे ॥
तुज जीवदान देतों, करिन चि,ना भी, अवन अधीव दरें॥३४॥
तूं एकला लहानचि, करिसी आह्मांसवें कसें रण रे ॥
सिंहसमूहापुढती कैसा लाधे यशासि वारण रे ॥ ३५ ॥
तैं कुशवीर ह्मणे त्या, लघु न ह्मणावें कणास बर्हीच्या ॥
बहु तुह्मि कायाचि करणें, जैसें बहु ईक्षणांस बर्हीच्या ॥३६॥
एकाचि रवि, परि करितो हनना संपूर्ण ऋक्षकांतीते ॥
सान कुठार, ह्मणुनिया भंगिल अतिदीर्घ वृक्ष कां तीतें ॥३७॥
मूर्च्छित करुनी लहुतें मानिसि पुरुषार्थ मानसीं तूं कीं ॥
परि करि रण मजसंगें, हेमाचें साम्य रू कसा तूंकीं ॥ ३८॥
कोपें शतशः मार्गण सोडी शत्रुघ्न तो कुशावरती ॥
एकशरेंची कुश ते प्रेषी मुक्त्यर्थ तो कुशावरती ॥ ३९ ॥
पाहुनि तदतुलविक्रम रणिं शत्रुघ्नें स्वमान डोलवली ॥
डोलविलि न, कवि ह्मणती, खालति ती कुशपराक्रमें लवली ॥
पुनरपि रिपुघ्न सोडी मार्गण जैशा महान घनधारा ॥
भंगी त्याही, लाधे हरिनामें जेवि तें अघ न थारा ॥ ४१ ॥

वाल्मीकिदत्त शर मग सोडी कुशवीर तत्तनूवरती ॥
तो धडके तद्हृदयीं, तेणें त्या होय मूर्छना वरती ॥ ४२ ॥
पडिला रहंवरांतुनि वसुधातालें वीर तो अचेष्टितसा ॥
झाला पाहुनिया तें शेष कटकयूथ फार कष्टितसा ॥ ४३ ॥
त्यागुनि रणांगणातें दाहि दिशीं धांवती अयोद्धे ते ॥
किति एक वृत्त रामा येउनिया सांगती अयोध्येतें ॥ ४४ ॥
मग कुश निज बंधूस्तव धुंडाळुनि काढि सर्वरणवसुधा ॥
काढिति अतितर यत्नें मथुनि जसे सिंधु दैत्यदेव सुधा ॥४५॥
शत्रुघ्नरथीं मूर्च्छित पाहुनि कुशवीर लहुस शोक करी ॥
पुसुनि पटें तल्लोचन उचलुनि घे तो निजांकिं तोक करीं ॥४६॥
सावध होउनि लहु मग उघडुनि नयनांसि पाहि बंधूतें ॥
उठुनि ह्मणे, कोठें पर, अटविन जैसा अगस्ति सिंधूतें ॥४७॥
शांतवुनि कुश ह्मणे त्या, वीरा, श्रमलासि तूं अजी समरें ॥
नाहीं या भूलोकीं युद्धकला जाणता तुझ्या सम रे ॥४८॥
तेव्हां म्हणे लहु कुशा, करुनी वसनें निबद्ध हा वाजी ॥
न्यावा, उटाजिं कसा तो गमन करी, बांधवा, पहावा जी ॥४९॥
येतील वीर आतां कदन कराया यदर्थ येथून ॥
जावें नाचि भीरुपरी, जाऊं सहवाजि त्या सचमु मथुन॥५०॥
इकडे रिपुघ्न समरीं पडतां येऊनि भीरु साकेतीं ॥
मखमंडपिं रणवार्ता कथिती, सहबंधु राम ऐके ती ॥ ५१ ॥
राम म्हणे कवण असे जिंकिति समरीं किशोर रिपुदमना ॥
बुडविति चिंतार्णविं जे निज सामर्थ्यें मदीय शमदमना ॥५२॥
मग सौमित्रासि ह्मणे राघव, जा तूं ससैन्य समरासी ॥
जिंकुनि आणि सुत हय जे पाडिति चमुच्या महाद्रिसम राशी ॥
रामाज्ञें रामानुज घेउनि बहुवीर तोवि कटकाला ॥
चित्तिं म्हणे, जिंकाया अवधि न, जासि खगपतीस चटकाला ॥

द्रुत गतिनें लंघुनि पथ ये रणिं जसि मेघमालिला चपला ॥
सज्जशरासनविशिखें विपिनीं अवलोकि बालका चपला ॥
ते उभयतांहि त्यातें गमले श्रीराममूर्तिसम खचितें ॥
लक्ष्मणधैर्य खचे त्यां पाहुनि करिधैर्य केसरी खचतें ॥
कोण तुह्मी ह्मणुनि पुसे, ह्मणती ते, करिं अधिं समरा यासी॥
त्यजुनि सुखभोग येसी कां सिंहाग्रीं वृका मरायासी ॥५८॥
ज्या पंथीं तव बांधव धाडियला त्याच धाडुं तुजला रे ॥
जा परती रण सोडुनि, समरविचारीं न, घे उमज, सीरे ॥
वधियेलें इंद्रजिता, ह्मणुनी स्वमनांत गर्व वागविसी ॥
परि या संग्रामाजिरिं खचित खचित त्या यशास नागविसी ॥
जरिका न जासि परता, तरि तूं वेत्ता प्रबुद्ध साच न रे ॥
तूं वृद्ध, मानि बालहि कथितां तद्धित अबुद्धशाच नरें ॥६१॥
झाला विस्मित चित्तीं परिसुनि तद्वच, अनंत अवतार ॥
मी घेतले परि असे सुत न विलोकिंच अनंत-अवतार ॥
पुनरपि सौमित्र म्हणे, कोण तुम्ही हें वदा, किशोरांना ॥
जिंकाया हि न सुर ही जिंकूं ह्मणतां अशाहि शूरांना ॥६३॥
ते म्हणती, भ्यालासी चित्तीं, आह्मां ह्मणून कां पुससी ॥
कर रण, साही शर हे, मृदुता तुज आलि काय कापुससी ॥
ह्मणुनि असें शरवृष्टी करिती, त्यातुल्य मेघवर्ष न ते ॥
वाहविती रुधिरनद्या, त्यामाजि करि कटकाघमर्षन ते ॥६५॥
होय अहःकार बहू, कोपिं चढे सैन्ययूथ अहिसाच ॥
देतां शरांघ्रि शिरिं तो कां नाचि कोपिष्ट होय अहि साच ॥
रवितुल्यप्रखराशुग सोडी त्यावरि असंख्य सौमित्र ॥
त्यां देति न वसुं रणिं ते, जेवि तमातें न दे वसों मित्र॥६७॥
सोडी नाना शस्त्रें, तैसीं अस्त्रें, स्वदंत खाऊन ॥
छेदिति संपूर्णहि तीं, करिती जे समरिं अंतका ऊन ॥६८॥

मग लहु म्हणे कुशातें, हा फणि-अवतार, यास झुलवावें ।।
अति मंजुळ नादें, हें तुज सर्वज्ञास म्यां न कळवावें ।।६९।।
सोडी नादास्त्र तदा, नादें संपूर्ण कोंदलें ख, रसा ।।
लागे तें सौमित्रा, तेणें विसरेचि सौख्यदुःखरसा ।। ७० ।।
पडला लक्ष्मण मूर्छित, पाहुनि करि सैन्य खेद अतिशय तें ।।
साकेतीं रामातें कथिती येऊनि युद्ध-आशय ते ।। ७१ ।।
घायाळ कथित वार्ता, परिसुनि रघुनाथ शोकनिधित शिरे ।।
हे वत्सा सौमित्रा, झाली तव गति अजी अशी कशि रे।।७२।।
शक्रजितादिक योद्धे जिंकिसि, परि अपयशा कधिं न शिवसी।।
हे वीरवरा धीरा, वरिसी कां समरिं कीर्ति अपाशिवसी ।।
मेध अतां कैचा हा, म्हणुनी तो यज्ञकंकणा सोडी ।।
दुर्दैवें यज्ञाची झाली कीं आजि अशंक नासोडी ।। ७४ ।।
घेउनि हनुमंतादिक वीर महा ते असंख्य समवेती ।।
तैसीच दीर्घ पृतना हयगजरथयुत, कुणा न गणवे ती ।।७५।।
येती अतितरसत्वरगतिनें सकलहि महान संग्रामीं ।।
नानाशस्त्रास्त्रान्वित, वीर असा एकही नुरे ग्रामीं ।। ७६ ।।
भरत समीरसुत पुढें होउनि अवलोकिती किशोरांना ।।
ते अज्ञानाल्पवयी, झुजणें यांसीं न योग्य शूरांना ।। ७७ ।।
ह्मणती, रघुपतिसमची दिसताती निश्चयें उभयता ते ।।
हे श्रीसीतानंदन, वरिल कसी यांसि युद्धभयता ते ।।७८।।
त्यजिली सीता माता कांतारीं, गर्भिणी तदा होती ।।
हीं वीरमहारत्नें प्रसवलि विपिनांत निश्चयें हो ती ।। ७९ ।।
मग ते पुसति तयांतें, कोण तुम्ही, तूमचा कवण तात ।।
कां कांतारीं वसतां, सांगा, तुह्मांसि कोण ह्मणतात ।।८०।।
ते ह्मणती, मूढांनो, आलां कीं कास हें विचाराया ।।
पडले वीर असंख्यचि, संग्रामीं आधिं करा विचारा या ।।८१।।

दिसतां भीरु तुह्मीही, असतां जरि वीर हें न तरि पुसतां ॥
पाहुनि निजजनहानी सक्रोधें अधिं रणार्थ कटि कसतां ॥
लहुनें एका विशिखें पाडियलें तें समीरतनयातें ॥
कवि ह्मणती, तें न खरें, झाला परि वायुपुत्र नत यातें ॥
भरतासि दोन विशिखें करि मूर्छित कुश रणांत त्या समया॥
पाहुनि सैनिक ह्मणती, देखियला नान्य वीर हो सम या ॥
घनसम शरवृष्टीनें करिती अत्यंत घोर समरासी ॥
पाडिति अश्वगजांच्या, वीरांच्या तेवि अद्रिसम राशी ॥८५॥
रणवृत्त राघवातें कथिती घायाळ सर्व अवशिष्ट ॥
पडला तेणें राघव मूर्छित, त्या सांवरी मुनि वसिष्ठ ॥ ८६ ॥
ह्मणती वसिष्ठ मुनि तें, अनयें त्यजिली तुवां महीतनया ॥
तत्पापफल दिसे हें, तिजसम साध्वी दुजी महींत न या ॥
मग राम शेषसेना आला घेऊनि संगरामाजीं ॥
परि आठवे मनिं तया, झाली अनयें असंग रामा जी॥८८॥
पाहुनि मूर्छित बांधव तैसे मंत्री महान कपि वीर ॥
अश्वगजरथिपदाती करि बहु निज चित्तिं दुःख रघुवीर ॥
दिसती किशोर लघु, परि केले त्यांहीं प्रताप अगणितसे ॥
व्हावा लज्जित वासव, तेजें भरि जग लहान तरणि, तसें ॥
त्यांसि पुसे दाशरथी, कोण मुलांनों तुह्मी, कवण तात ॥
कोण गुरु, कुठे वसतां, सांगा तुमचा समस्त वृत्तांत ॥ ९१ ॥
हांसुनि बालक ह्मणती, येसी कीं बंधु-सूड उगवाया ॥
तें त्यागुनि आह्मांसी पुससी तूं हें किमर्थ मग वाया ॥९२॥
तूं वृद्ध वडिल, ह्मणुनी न करावा नीतिपंथिं अपमान ॥
जाणुनि कथितों, परिसें, गुरु वाल्मिकि, यद्यशास उपमा न ॥
जगतात तात, तैसी माता तच्छक्ति आदिमाया ते ॥
वास्तव्य मेदिनीतलिं, ह्मणताती वंशि अर्यमा यातें ॥ ९४ ॥

आलासि यदर्थीं तूं, धैर्य धरुनि कार्य तें करी आधीं ॥
निज कार्यासि कराया पळभरि ही नावधी करी आधी ॥९५॥
भिउनी रण नचि करवे, तरि जाई आपुल्या पुरा परता ॥
सोडूं न शस्त्र त्यावरि, जो परता जाय सोडुनी परता ॥९६॥
उरले न बंधुजन ते, आतां दायादताहि ती सरली ॥
एकाकी राज्य सुखें जा कर, भीती न कोणातिहि उरली ॥९७॥
राघव म्हणे, मुलांनों, पुसणाऱ्या बोल बोलणें सरलीं ॥
तुमच्या उद्दामपणापुढती मद्बुद्धि चालणें सरली ॥ ९८ ॥
करसंज्ञें राम पुसे बिभीषणा तेवि वायुतनयातें ॥
हे कोण, कथा मजसी, प्रौढापरि बोलतात सुनयातें ॥९९॥
ते हळुच ह्मणति, रामा, भासति हे तूमचेचि आत्मजसे ॥
त्यजिली सीता गर्भिणि, तत्कुक्षीं जन्मले गभास्ति जसे ॥३००॥
त्यजुनी प्रिया अरण्यीं झाले वत्सर किती, करी गणती ॥
स्थित या विचारिं तरुतलिं राघव, तों तरु पळांत उडवीती॥ १॥
तें पाहुनि राम ह्मणे, हे बालक निश्चयें न होति वश ॥
यास्तव संग्रामातें आतां करणें, न योग्य अवकाश ॥ २ ॥
संग्रामनीति, ऐसी येतां युद्धार्थ मित्र, सुत, आप्त ॥
त्यांसीं युद्ध करावें निकरें, व्हावें न मोहपथिं लिप्त ॥ ३ ॥
या न्यायें रघुपति तो घेउनि करिं चापबाण कदनातें ॥
झाला सज्ज, तथापी पाही निरखूनि तोकवदनातें ॥ ४ ॥
लहुकुश रणपंडित ते हांसुनि मग मोहनास्त्र सोडीती ॥
तेणें जगजनकातें क्षणमात्रें मूर्च्छनाब्धिं धाडीती ॥ ५ ॥
पाहूनि तें बिभीषण धावे, तैसा प्रतापि हनुमान ॥
त्याच पथीं त्या उभयां धाडिति करितां न कांहिं अनुमान ॥६॥
न वीर उरला, पाहुनि तें ह्मणाति संपलें च रण ॥
ों जाणुनि निजतात वंदिले चरण ॥ ७ ॥

रामालंकार तदा काढुनि किरिटादि वीर कुश ल्याला ॥
तैसे सौमित्राचे तद्बांधव घेइ सर्व अपुल्याला ॥ ८ ॥
मग लहु ह्मणे कुशाला, कपि हे नेऊनि दावुं मायेतें ॥
उडती विचित्र परिनें, मज ते पाहूनि फार हसुं येतें ॥९॥
नलनीलसुगल-अंगदवायुतनयवृद्धभल्लपुच्छांतें ॥
धरुनी ओढित नेती, जैसेची कंटकद्रुगुच्छांतें॥ १०॥
येतां निजाश्रमासी राघवसौमित्रसे तदा गमती ॥
जनकसुतामानासिं ते, परि अंबापादपंकजा नमती ॥ ११ ॥
कथिति उदंत रणींचा, आणियले धरुनि भल्ल वानर ते ॥
अजिरिं पहा,परिसुनि तें भूमिसुता सौख्यि तेधवा न रते॥१२॥
पाहुनि मला सलज्जचि होतिल, जाणूनि ती म्हणे तनया ॥
हे त्रासदायक बहू, ठेवावे कीं कधीं गृहांत न यां ॥ १३ ॥
मग लहुनें सर्वांचे धरुनी पुच्छाग्र फेंकिले नाभिं ते ॥
राघव मूर्च्छित पाहुनि होते जे मानसीं महान भिते ॥१४॥
सीता म्हणे, मुलांनों, केलें हें आजि फार विपरीत ॥
आतां काय करावें, ऐशा चिंतोसि चित्तिं ती करित ॥१५॥
तों बलिसद्मांतुनि ये वाल्मीकिमुनी निजाश्रमीं परती ॥
सुतवृत्त निवेदन त्या दुःखान्वित भूमिनंदना करि ती ॥१६॥
तव सुत असेचि विक्रमि आहेती, जानकी, मनीं मान ॥
स्वयशें होतिल रविसे, पावति अत्यंत हे जनीं मान ॥१७॥
चिंता मनीं न करणें, जाउनि समरांगणीं तयां सकलां ॥
उठवीतों क्षणमात्रें, आहे कीं ती विदीत यांस कला ॥१८॥
कथुनी ऐसें सत्वर आला मुनि तो रणांगणावरते ॥
स्वकरें कमंडलूजल उठवी त्यां सिंचुनी तयांवर तें ॥१९॥
मग राघव मुनिचरणां वंदी, तैसी समस्त सेनाही ॥
दे आशीर्वाद, म्हणे, हे तव सुत शौर्यव्यस्तसे नाहीं ॥२०॥

मग लहु म्हणे कुशातें, हा फणि-अवतार, यास भुलवावें ॥
अनि मंजुळ नादें, हें तुज सर्वज्ञास म्यां न कळवावें ॥६९॥
सोडी नादास्त्र तदा, नादें संपूर्ण कोंदलें ख, रसा ॥
लागे तें सौमित्रा, तेणें विसरेचि सौख्यदुःखरसा ॥ ७० ॥
पडला लक्ष्मण मूर्छित, पाहुनि करि सैन्य खेद अतिशय तें ॥
साकेतीं रामातें कथिती येऊनि युद्ध-आशय ते ॥ ७१ ॥
घायाळ कथित वार्ता, परिसुनि रघुनाथ शोकनिधिंत शिरे ॥
हे वत्सा सौमित्रा, झाली तव गति अजी अशी कशि रे ॥७२॥
शक्रजितादिक योद्धे जिंकिसि, परि अपयशा कधिं न शिवसी॥
हे वीरवरा धीरा, वरिसी कां समरिं कीर्ति अपाशिवसी ॥
मेध अतां कैचा हा, म्हणुनी तो यज्ञकंकणा सोडी ॥
दुर्दैवें यज्ञाची झाली कीं आजि अशंक नासोडी ॥ ७४ ॥
येउनि हनुमंतादिक वीर महा ते असंख्य समवेती ॥
तैसीच दीर्घ पृतना हयगजरथयुत, कुणा न गणवे ती ॥७५॥
येती अतितरसत्वरगतिनें सकलहि महान संग्रामीं ॥
नानाशस्त्रास्त्रान्वित, वीर असा एकही नुरे ग्रामीं ॥ ७६ ॥
भरत समीरसुत पुढें होउनि अवलोकिती किशोरांना ॥
ते अज्ञानाल्पवयी, झुजणें यांसीं न योग्य शूरांना ॥ ७७ ॥
ह्मणती, रघुपतिसमची दिसताती निश्चयें उभयता ते ॥
हे श्रीसीतानंदन, वरिल कसी यांसि युद्धभयता ते ॥७८॥
त्यजिली सीता माता कांतारीं, गार्भिणी तदा होती ॥
हीं वीरमहारत्नें प्रसवलि विपिनांत निश्चयें हो ती ॥ ७९ ॥
मग ते पुसति तयांतें, कोण तुम्ही, तूमचा कवण तात ॥
कां कांतारीं वसतां, सांगा, तुह्मांसि कोण ह्मणतात ॥८०॥
ते ह्मणती, मूढांनों, आलां कीं कासु हें विचाराया ॥
पडले वीर असंख्यचि, संग्रामीं आधिं करा विचारा या ॥८१॥

दिसतां भीरु तुह्मीही, असतां जरि वीर हें न तरि पुसतां ॥
पाहुनि निजजनहानी सक्रोधें अधिं रणार्थ कटि कसतां ॥
लहुनें एका विशिखें पाडियलें तैं समीरतनयातें ॥
कवि म्हणती, तें न खरें, झाला परि वायुपुत्र नत यातें ॥
भरतासि दोन विशिखें करि मूर्छित कुश रणांत त्या समया॥
पाहुनि सैनिक ह्मणती, देखियला नान्य वीर हो सम या ॥
घनसम शरवृष्टीनें करिती अत्यंत घोर समरासी ॥
पाडिति अश्वगजांच्या, वीरांच्या तेवि अद्रिसम राशी ॥८५॥
रणवृत्त राघवातें कथिती घायाळ सर्व अवशिष्ट ॥
पडला तेणें राघव मूर्छित, त्या सांवरी मुनि वसिष्ठ ॥ ८६ ॥
ह्मणती वसिष्ठ मुनि तैं, अनयें त्यजिली तुवां महीतनया ॥
तत्पापफल दिसे हें, तिजसम साध्वी दुजी महींत न या ॥
मग राम शेषसेना आला घेऊनि संगरामाजी ॥
परि आठवे मनिं तया, झाली अनयें असंग रामा जी॥८८॥
पाहुनि मूर्छित बांधव तैसे मंत्री महान कपि वीर ॥
अश्वगजरथिपदाती करि बहु निज चित्तिं दुःख रघुवीर ॥
दिसती किशोर लघु, परि केले त्यांहीं प्रताप अगणितसे ॥
व्हावा लज्जित वासव, तेजें भरि जग लहान तरणि, तसें ॥
त्यांसि पुसे दाशरथी, कोण मुलांनों तुह्मी, कवण तात ॥
कोण गुरु, कुठे वसतां, सांगा तुमचा समस्त वृत्तांत ॥ ९१ ॥
हांसुनि बालक ह्मणती, येसी कीं बंधु-सूड उगवाया ॥
तें त्यागुनि आह्मांसी पुससी तूं हें किमर्थ मग वाया ॥९२॥
तूं वृद्ध वडिल, ह्मणुनी न करावा नीतिपंथिं अपमान ॥
जाणुनि कथितों, परिसें, गुरु वाल्मिकि, यद्यशास उपमा न ॥
जगतात तात, तैसी माता तच्छक्ति आदिमाया ते ॥
वास्तव्य मेदिनीतलिं, ह्मणताती वंशि अर्यमा यातें ॥ ९४ ॥

आलासि यदर्थीं तूं, धैर्य धरुनि कार्य तें करी आधीं ॥
निज कार्यासि कराया पळभरि ही नावधी करी आधी ॥९५॥
भिउनी रण नचि करवे, तरि जाई आपुल्या पुरा परता ॥
सोडूं न शस्त्र त्यावरि, जो परता जाय सोडुनी परता ॥९६॥
उरले न बंधुजन ते, आतां दायादताहि ती सरली ॥
एकाकी राज्य सुखें जा कर, भीती न कोणातिहि उरली ॥९७॥
राघव म्हणे, मुलांनों, पुसणाऱ्या बोल बोलणें सरलीं ॥
तुमच्या उद्दामपणापुढती मद्बुद्धि चालणें सरली ॥ ९८ ॥
करसंज्ञें राम पुसे विभीषणा तेवि वायुतनयातें ॥
हे कोण, कथा मजसी, प्रौढापरि बोलतात सुनयातें ॥९९॥
ते हळुच ह्मणति, रामा, भासति हे तूमचेचि आत्मजसे ॥
त्यजिली सीता गर्भिणि, तत्कुक्षीं जन्मले गभास्ति जसे ॥३००॥
त्यजुनी प्रिया अरण्यीं झाले वत्सर किती, करी गणती ॥
स्थित या विचारिं तरुतलिं राघव, तों तरु पळांत उडवीती॥ १॥
तें पाहुनि राम ह्मणे, हे बालक निश्चयें न होति वश ॥
यास्तव संग्रामातें आतां करणें, न योग्य अवकाश ॥ २ ॥
संग्रामनीति ऐसी येतां युद्धार्थ मित्र, सुत, आप्त ॥
त्यांसीं युद्ध करावें निकरें, व्हावें न मोहपथिं लिप्त ॥ ३ ॥
या न्यायें रघुपति तो घेउनि करिं चापबाण कदनातें ॥
झाला सज्ज, तथापी पाही निरखूनि तोकवदनातें ॥ ४ ॥
लहुकुश रणपंडित ते हांसुनि मग मोहनास्त्र सोडीती ॥
तेणें जगजनकातें क्षणमात्रें मूर्च्छनाब्धिं धाडीती ॥ ५ ॥
पाहूनि तें विभीषण धावे, तैसा प्रतापि हनुमान ॥
त्याच पथीं त्या उभयां धाडिति करितां न कांहिं अनुमान ॥ ६ ॥
एकहि न वीर उरला, पाहुनि तें ह्मणति संपलें च रण ॥
येउनि रामानिकटीं जाणुनि निजतात वंदिले चरण ॥ ७ ॥

रामालंकार तदा काढुनि किरिटादि वीर कुश ल्याला ॥
तैसे सौमित्राचे तद्बांधव घेइ सर्व अपुल्याला ॥ ८ ॥
मग लहु ह्मणे कुशाला, कपि हे नेऊनि दावुं मायेतें ॥
उडती विचित्र परिनें, मज ते पाहूनि फार हसुं येतें ॥९॥
नलनीलसुगल-अंगदवायुतनयवृद्धभल्लपुच्छांतें ॥
धरुनी ओढित नेती, जैसेची कंटकद्रुगुच्छांतें॥ १० ॥
येतां निजाश्रमासी राघवसौमित्रसे तदा गमती ॥
जनकसुतामानासिं ते, परि अंबापादपंकजा नमती ॥ ११ ॥
कथिति उदंत रणींचा, आणियले धरुनि भल्ल वानर ते ॥
अजिरिं पहा, पारिसुनि तें भूमिसुता सौख्यि तेधवा न रते॥ १२॥
पाहुनि मला सलज्जचि होतिल, जाणूनि ती म्हणे तनया ॥
हे त्रासदायक बहू, ठेवावे कीं कधीं गृहांत न यां ॥ १३ ॥
मग लहुनें सर्वांचे धरुनी पुच्छाग्र फेंकिले नभिं ते ॥
राघव मूर्च्छित पाहुनि होते जे मानसीं महान भिते ॥१४॥
सीता म्हणे, मुलांनों, केलें हें आजि फार विपरीत ॥
आतां काय करावें, ऐशा चिंतेसि चित्तिं ती करित ॥१५॥
तों बालिसद्मांतुनि ये वाल्मीकिमुनी निजाश्रमीं परती ॥
सुतवृत्त निवेदन त्या दुःखान्वित भूमिनंदना करि ती ॥१६॥
तव सुत असेचि विक्रमि आहेती, जानकी, मनीं मान ॥
स्वयशें होतिल रविसे, पावति अत्यंत हे जनीं मान ॥१७॥
चिंता मनीं न करणें, जाउनि समरांगणीं तयां सकलां ॥
उठवीतों क्षणमात्रें, आहे कीं ती विदीत यांस कला ॥१८॥
कथुनी ऐसें सत्वर आला मुनि तो रणांगणावरते ॥
स्वकरें कमंडलूजल उठवी त्यां सिंचुनी तयांवर तें ॥१९॥
मग राघव मुनिचरणां वंदी, तैसी समस्त सेनाही ॥
दे आशीर्वाद, म्हणे, हे तव सुत शौर्यव्यस्तसे नाहीं ॥२०॥

राम ह्मणे, म्यां केलें नाहीं निर्वाण त्यांसि कदनाला ॥
करुनी संग्राम अतां विध्वंसिन, शंभु जेवि मदनाला ॥२१॥
वाल्मीकि ह्मणे, रामा, अससी सर्वज्ञ, सांगण्या तुजशीं ॥
शक्य कवण, मी कथितों प्रसुस कथिति लेंकरें परंतु जशीं॥२२॥
शासन विहित असे कां निज जिव्हा चाविता स्वरदनांनीं ॥
नेणुनि करांगुलीचा लगतां आघात नेत्रिं नयनांनीं ॥२३॥
शांतवुनी रामातें सीताही मग आणवूनि सहतनया ॥
हे तव नंदन महिषी भिन्नासी मानि मानसांत न यां ॥२४॥
आकाशवाणि तसिची होतां स्वीकारि राम त्या सकलां ॥
झाला मोद समस्तां तो वर्णायासि ना कवी शकला ॥२५॥
मग सहकलत्र राघव घेउनि साकेतिं अश्वयज्ञ करी ॥
सुतयुक्त राज्य मोदें, वंदी तत्पादिं कृष्ण अज्ञ करीं ॥३२६॥

प्रकरण ५७ वें.

हरितालिकाव्रतकथा.

पद.

(चालः—ऐके गे अनुसूये मज वरिलें श्रीरघुरायें.)

हरितालिकाव्रतमहिमा परिसा हो तुम्ही रामा ॥ ध्रु० ॥
वंदुनी श्रीगणपती बोलिले व्यास निज उक्ती ॥
ती कथा यथामति गाइन मी वाणी प्राकृतीं ॥
गिरिजेतें शंकरप्राप्ती जाहली कवण्या रीती ॥ ॥ चाल ॥
देउनी चित्त परिसावें ॥ अंतरीं शुद्ध तुह्मि व्हावें ॥
व्रताचरण करणें भावें ॥ करिल तें पूर्ण मनकामा ॥ १ ॥

एकदां गिरी कैलासीं अंबिका पुसे भर्गासी ॥
जाहलां पती तुह्मि मजसीं, केलि म्यां काय कृति ऐसी ॥
लाधलें अर्ध अंगासी, जोडिलें अखिल भाग्यासी ॥ ॥चाल॥
तें वृत्त निवेदा मजला ॥ श्रवणीं मम हेतू जडला ॥
पाहिजे तो पूरित केला ॥ जरि तुमची प्रिय मी रामा ॥२॥

परिसूनी शंकर वदती व्हावया तुज मम प्राप्ती ॥
आचरिलें तूं ज्या सुव्रतीं तें गुह्य असे गे बहुती ॥ ॥चाल॥
उडुगणीं जेवि वर तरणी ॥ विप्र तो थोर चहुं वर्णी ॥
तीर्थी वर गंगा ऱ्हादिनी ॥ थोरवी पुराणीं निगमा ॥ ३ ॥

भाद्रपद शुक्ल तिज तीथ नक्षत्रीं वारणयुक्त ॥
आचरितां तयिं तें सुव्रत नाशुनिया कलुषें अमित ॥
सौभाग्या देइ तें सतत सुतकन्या बहुविध वित्त ॥ ॥चाल॥
ऐशा या पूत व्रतासी ॥ शुद्ध मनें अचरण करिसी ॥
अर्धांगी तेणें होसी लाधलिस शिवा सन्नामा ॥ ४ ॥

अंबिका ह्मणे वृषनाथा, केलें म्यां उत्तम व्रता ॥
ती समूल शुभतम वार्ता सांगावी मजला आतां ॥
वंदितें मी चरणीं माथा ठेवुनी जोडुनी हाता ॥ ॥ चाल ॥
शिव ह्मणे, ऐक रुद्राणी ॥ असतां तूं जनका सदनीं ॥
तप केलें नाना परिनीं ॥ वर्णितां न ये तें आह्मां ॥ ५ ॥

धूम्रपान द्वादश वर्षे केलें त्या विपरित शीर्षें ॥
चार अधिक षष्ठी वर्षे जलमग्ना माघे मासे ॥
वैशाखीं अग्निस्पर्शें जीर्णदलें भक्षण हर्षें ॥ ॥ चाल ॥
केलें त्वां तप दारूण ॥ तातें कष्ट ते देखून ॥
जाहला मनीं बहु खिन्न ॥ अर्पावी कवणा ऊमा ॥ ६ ॥

हेमाद्रि विचारी स्वमनीं प्रगटले तैं नारदमुनी ॥
गहिंवरें आसन देउनी पूजिला यथाविधि करुनी ॥

विनवी हस्त जोडूनी कां आगमन दासासदनीं ॥ ॥चाल॥
परिसुनी मुनी बोलिला ॥ विष्णुनें प्रेषिलें मजला ॥
पाळि जो सकल सृष्टीला ॥ नसे ठाव ज्याचा निगमा ॥७॥

ही कन्या योग्य स्थानीं अर्पावी कन्यादानीं ॥
वासुदेवसम वर कोणी सुरवरीं नसे, हें मानी ॥
श्रेष्ठ जरी डमरूपाणी तो दिगंबरचि स्मशानीं ॥ ॥चाल॥
मागतसे हरि तव कन्या ॥ ही योग्य नसे कीं अन्या ॥
अर्पुनी करी ती धन्या ॥ बोलुनी जाय मुनि धामा ॥ ८ ॥

परिसुनिया नारदवाणी हेमाद्रि तोषला मनीं ॥
अर्पिन ही कन्या दानीं विष्णुतें बोलिला वचनीं ॥
योग्य तो असे कीं लग्नीं नान्याच्या आर्पिन सदनीं ॥ ॥चाल॥
ते बोल तुवां परिसीले ॥ अंतरीं दुःख तुज झालें ॥
चिंतनें मानस भरलें ॥ जाशी मग सखिच्या धामा ॥ ९ ॥

पाहुनि देवी सखि बोले, साजणि कां येणें केलें ॥
सांगे तुज कवणें पिडिलें, नेत्रीं कां अश्रू आले ॥
तनुघर्मे पट तें भिजलें, चिंतार्णवि मन कां बुडलें ॥ ॥चाल॥
भयग्रस्त देवी ती सखिला ॥ घालुनि कंठीं दृढ मिठिला ॥
आणुनि वारी नयनाला ॥ मानि न ह्मणे तात कृतनेमा ॥१०॥

वैकुंठपती श्रीहारिला देतसे तात गे मजला ॥
म्यां निश्चय दृढतर केला वरिन श्रीशंकराला ॥
भंगितां तातवचनाला पावे तो बहु कोपाला ॥ ॥ चाल ॥
यास्तव मी तनु ही त्यजितें ॥ शिवपदीं चित्त हें धरितें ॥
पातलें अंत भेटीतें, जावो जिव तरि शिवधामा ॥ ११ ॥

बोलिली सखी तदा वचन चिंतायुत करि ना मन ॥
भाग्यवान् अति तूं जाण श्रीहरिसम निर्जरीं अन्य ॥
श्रेष्ठ असे देव तो कवण अवलोकि विचारा करुन॥ ॥चाल॥

वार्णु किति तयाची थोरी ॥ वैकुंठीं वास्तव्य करी ॥
जय विजय उभे यद्वारीं ॥ दासी तत्पदिंची पद्मा ॥ १२ ॥

पाळितो सकल सृष्टीला विध्वंसी खल दुष्टांला ॥
धरुनी बहु अवतारांला संरक्षी निजभक्ताला ॥
हरि संकट नाशि भयाला वंदीती सुर मुनि ज्याला ॥ चाल ॥
आहे तो तुज योग्य पती ॥ शंभुची स्मशानीं वसती ॥
चर्चिली विग्रहीं विभुती ॥ ध्यायिं मनीं हरिच्या नामा ॥ १३ ॥

करिं कंठीं नागभूषण गजचर्म जयाचे वरुन ॥
आसन तें व्याघ्राजीन, राहतो सदा जो नग्न ॥
घेउनी भूतपिशाचगण नाचतो डमरु वाजवून ॥ चाल ॥
अमंगळ असा तो शंकर ॥ धरि मस्तकिं गंगानीर ॥
त्यापरी जटेचा भार ॥ योग्य न तो पति तुज ऊमा ॥ १४ ॥

परिसुनी सखीची वाणी बोलली तदा रुद्राणी ॥
त्वां केली विष्णुवाखाणी, परि त्यातें वैभव कोणी ॥
दिधलें, हें चित्त देऊनी ऐके गे मत्प्रियकरणी ॥ चाल ॥
एकशत अष्ट कमलांनीं ॥ पूजि हरा हरि एकान्हीं ॥
तैं एक ऊन जलज पाहुनि॥काय करि ऐक तें भामा ॥ १५ ॥

करिं काढुनि आत्माक्षाब्जा सारिली यथाविधि पूजा ॥
साष्टांगें शिवपदकंजा नमि मृड ह्मणती अधोक्षजा ॥
देखुनि भावयुतपूजा संतोषित आत्मा माझा ॥ ॥ चाल ॥
मग शिवें निजकृपानयनीं ॥ देखिलें विष्णुलागूनी ॥
महती त्या तैंपासूनी ॥ निश्चयें वरिन मी भीमा ॥ १६ ॥

दनुदैत्यें सागरमथनें काढिलीं चतुर्दश रत्नें ॥
जळती जन तैं गरलानें प्राशुनि तें विष भर्गानें ॥
रक्षिलें सकल जग ज्यानें कोण त्या सान कृति ह्मणे ॥ चाल ॥

मृत्युचा समय तैं आला ॥ विष्णुही शक्तिहिन झाला ॥
रक्षी शिव सकल जगाला॥वानुं किति महेश्वरमहिमा ॥१७॥

निश्चय दृढ अवलोकून बोले सखि तिजला वचन ॥
चिंतायुत करि ना मन, न जाणे वन हिमवान ॥
ऐशा स्थलिं करुं या गमन, होतिल तव हेतू पूर्ण ॥ ॥चाल ॥
संकेता ऐशा करुनी ॥ जाति त्या भयानक विपिनीं ॥
कंटक रुतती तच्चरणीं ॥ स्मरती मनिं हरपदपद्मा ॥ १८ ॥

रत्नसानु सदनीं पाही तों तनया गेहीं नाहीं ॥
दुःख तें न सोसवे देहीं मूर्च्छना येइ लवलाही ॥
पृथ्वीतलिं पडुनी बाही किंचितही शुद्धी नाहीं ॥ ॥चाल ॥
हरिली मम कन्या कोणी ॥ दानवसुरगंधर्वांनीं ॥
भक्षिली व्याघ्रवृकअहिंनीं ॥ झाली कां मजसी वामा ॥१९॥

गिरिगण गिरि सांवरिती इकडे काय करिति युवती ॥
घोरतर विपिनीं फिरती दुःखित बहु अंतरिं होती ॥
विमल सरीता पाहाती विस्तीर्ण गुहा तटिं होती ॥ ॥चाल॥
वास्तव्य स्थान तें केलें ॥ भोगान्नादिक तुह्मि त्याजिलें ॥
वालुकालिंग निरमियलें ॥ पशुपतिचें सहिता उमा ॥ २० ॥

भाद्र शुक्ल तृतिया शुभ दिनीं गजनक्षत्रें युत अन्हीं ॥
पूजिलें यथाविधि विधिंनीं गंधाक्षतनानासुमनीं ॥
नैवेद्य षड्रसअन्नीं तांबूल दक्षणा अर्पूनी ॥ ॥ चाल ॥
जागरण यामिनिंत केलें ॥ त्या पुण्यें शिवपद ढळलें ॥
तत्काल शिव संनिध आले ॥ प्रसन्न तुज ना करि श्रमा ॥२१॥

माग वर मन वांच्छित शिरिं ठेविति वरद हस्त ॥
उघडुनी चक्षु पाहात तों साक्षात् शिव भगवंत ॥
साष्टांगें त्या प्रणिपात करिसी तूं जोडुनि हस्त ॥ चाल ॥

आहांत प्रसन्न मजवरती ।। तरि करा मला निज युवती ।।
ही वांच्छा वसते चित्तीं ।। शरण मी असें तुज भीमा ।। २२ ।।

तथास्तु ऐसें वदुनी आलों मी अपुल्या स्थानीं ।।
उदयासि येतां तरणी विसर्जिसी लिंगा जिवनीं ।।
पारणा सखिसह करुनी आनंदित वससी विपिनीं ।। चाल ।।
हिमवान तुझ्या शुद्ध्यर्थ ।। वनोवनीं तो गे भ्रमत ।।
पातला जेथ तुह्मि वसत ।। निद्रिस्था देखिलें तुह्मां ।। २३ ।।

उठवूनी जागृत केलें आलिंगन प्रेमें दिधलें ।।
आनंदें मानस भरलें प्रेमाश्रू नयनीं आले ।।
गहिंवरित कंठ मग बोले कां वनिं तुह्मि येणें केलें ।। चाल ।।
परिसुनी पित्याची वाणी ।। बोलते सलज्जित मनीं ।।
अर्पिसी मज कन्यादानीं ।। हरिला हें न रुचे आह्मां ।।२४।।

भीतिनें चिंतायुत मनीं जरि मजशि शिवालागूनी ।।
अर्पीसी कन्यादानीं तरि येइन तुझिया सदनीं ।।
ना तरि मी राहिन विपिनीं हा मम दृढ निश्चय मानी ।।चाल।।
ना तरी याच कांतारीं ।। राहिन मी दृढ निर्धारीं ।।
होइन शंभूची नवरी ।। तोंवरि या त्यजिन मी धामा ।।२५।।

तैसेंचि करिन मी ह्मणुन बोलिला गिरी हिमवान ।।
पाहुनी लग्न शुभ दीन केलें मजला तुज अर्पण ।।
आणिलि मग तुजलागून कैलासपर्वतीं जाण ।। चाल ।।
त्या शुचि व्रताच्या योगें ।। पावलिस सकल सौभाग्यें ।।
अद्यापि न कोणा सांगें ।। व्रतराज व्रत उत्तमा ।। २६ ।।

हरितालिकाचि व्रत यातें ह्मणती कां परिसावें तें ।।
आलीनें हरुनी तूतें नेली अति घोर वनातें ।।
पूजिलें भक्तियुत तेथें वालुकाकृतलिंगातें ।। चाल ।।

जोडी जी सुकृतानंता ॥ कथिली तुज ही पूत कथा ॥
भावयुक्त ही आचरितां ॥ सौभाग्या पावति रामा ॥ २७ ॥

पुनरपि देवी पदिं नमुनी विनवितसे कर जोडुनी ॥
व्रतअभिधानातें कथुनी केलें मज तोषित मनीं ॥
त्यापरी व्रतविधी वदुनी ॥ केली ही शुभ कृति कोणी ॥ चाल ॥
काय फल काय तें पुण्य ॥ होतसे व्रतापासून ॥
विस्तारें करणें कथन ॥ पुरवावें या मम कामा ॥ २८ ॥

ईशान ह्मणे गिरिजेतें नारी ज्या सौभाग्यातें ॥
वांच्छीती निर्मल चित्तें करणें या त्यांहिं व्रतातें ॥
नानाविध कृतयत्नानें मिळवावें व्रतवस्तूंतें ॥ ॥ चाल ॥
तोरणें दिव्यमंडीत ॥ कदलीस्तंभालीयुक्त ॥
मंडप करणें गे विहित ॥ साधुनी चारिही सीमा ॥ २९ ॥

रंगावलि नाना परिच्या चंदनादिक सुगंधाच्या ॥
नैवेद्य षड्रसान्नाचा गीत गजर शुभ वाद्यांचा ॥
पाचारुन गण विप्रांचा करणें घोष श्रुतिमंत्रांचा ॥ ॥चाल ॥
वालुकालिंग स्थापून ॥ विधियुक्त पूजना करुन ॥
करणें रात्रौ जागरण ॥ घेउनी मुखीं शिवनामा ॥ ३० ॥

दुसरे दिनिं प्रातःकालीं स्नानादिक कर्मे अपुलीं ॥
सारुनी शिवाशिवमौली अर्चनसाहित्यें सकलीं ॥
स्थापुनी अग्निआवालीं घृतयुक्त तिलतंदूलीं ॥ ॥ चाल ॥
होमासि रुद्रमंत्रानें ॥ अष्टोत्तरशत आहुतिनें ॥
वाष्टाविंशति अवदानें ॥ देउनी पूर्ण करि होमा ॥ ३१ ॥

आचार्या मग पूजून सालंकृत धेनुदान
विप्रातें अर्पण करुन दंपत्यां षोडश जाण ॥
घालावें षड्रसअन्न दक्षिणा द्रव्य देऊन ॥ ॥ चाल ॥

सौभाग्यप्रद वस्त्रांनीं ॥ वायनें षोडश देऊनी ॥
सुवासिनी ओट्या भरुनी ॥ भूयसी बहु विप्रोत्तमा ॥ ३२ ॥
करणें व्रतदिनीं उपोषण हें उत्तम अंबे जाण ॥
करितां आहारा भक्षण दारिद्र्यें बहु पीडून
सप्तजन्म वैधव्यपण सुतशोकदुःख दारूण ॥ ॥ चाल ॥
घृतपानें होय सर्पिणी ॥ मृतवत्सा खर्जूरांनीं ॥
शाकागुडखाद्यग्रहणीं ॥ जाति त्यां दुर्गतिधामा ॥ ३३ ॥
सहबांधवभृत्यादिजन सह करणें मग भोजन ॥
उद्देशुनि गिरिजारमण करणें मग व्रत परिपूर्ण ॥
अखंड सौभाग्या मिळुन इहपरत्रीं सुख संपूर्ण ॥ ॥ चाल ॥
व्रतकर्त्या भोगिति नारी ॥ कथिती शिव ही व्रतथोरी ॥
गाय ती नमुनि हरगौरी ॥ तात शिव जन्मदा ऊमा ॥ ३४ ॥

हरितालिका आरती.

जयदेवी जयदेवी जय हारितालिके॥आरती ओवाळूं लावण्यलतिके ॥ ध्रु० ॥ रत्नसानुशिखरीं जन्म तूं घेसी ॥ शंकरप्राप्तीलागीं दारुण तप करिसी॥ तातभयें दुर्घट विपिनासी जासी ॥ करिसी हरितालीका उत्तमव्रतासी ॥ १ ॥ व्रतपुण्यें होसी शंकरअर्धांगी ॥ अखंडसौभाग्यातें अव्याहत भोगी ॥ महिमा तव गातां दशशत-मुख भोगी ॥ शिणला अंत कसा मग मानव कविलागीं॥ २ ॥ जगवंद्या शिवशक्ती तूं आदिमाया ॥ सकलहि ऐश्वर्यें तीं वसती तव ठायां॥विधि हरि हर सुर मुनि नर वंदिति तव पाया॥रक्षी रक्षी अंबे या नत शिवतनया ॥ ३ ॥

प्रकरण ५८ वें.

स्फुट आर्या.

प्रख्यातार्यावृत्तीं बारामतिचा मयूरपंत कवी ॥
मी अज्ञ तदार्येसी मत्कृत आर्येसि केवि हो तुकवी ॥ १ ॥
गगनीं हंसासंगें उड्डाणें करिल पक्षि चटक कसा ॥
लागेल कांस्य वर्णे पीत जरी कां तथापि कनक-कसा॥२॥
वा सिंहगर्जनेसम येइ कसी गर्जना वराहातें ॥
अथवा काचमण्याला वज्रासम कांति काय राहाते ॥ ३ ॥
सागरथोरी कैसी येइल ती ओहळास दरडीच्या ॥
केशरसुगंधता ती रंगें सम परि फुला न करडीच्या ॥ ४ ॥
राजसभेमाझारी मिळतो सहजींच पंडिता मान ॥
तैसा न अजापाला, जरि तेणें हस्ति खंडितां मान ॥ ५ ॥
भानूच्या तेजासम करिल कसा कीट काजवा तेजा ॥
सांवरिल काय तरुतें तत्स्थित खग, उचालिलेंचि वातें ज्या॥६॥
भूगोल शिरीं धरिला अहिनें ह्मणुनी च दानवें धरितां ॥
होइल तद्गति जैसी, पंताची साम्यता बळें करितां ॥ ७ ॥
पावे सुस्वरिं जैसा वासंतिकपक्षि कोकिळा माना ॥
कारि रव आकृतिसाम्यें हलवुनि परि केवि कावळा माना ॥८॥
तैसा मी पंतांच्या आर्यामानास पात्र ना खचित ॥
हे दोष,तथापि शिरीं साहुनि न चि काव्यवासना खचित ॥९॥
नाहीं अवगत मजला प्राकृत भाषाहि पूर्ण ती सरला ॥
मग संस्कृत कोठुनिती,तरि का ह्मणतील सुज्ञ अनुसरलां॥१०॥
हें मान्य आदरें मज, माच्चितें घेतला परी हाट ॥
कैसें तरि काव्य करीं, रिक्त करें होय का फलद हाट॥११॥

या सुविचारा त्यजुनी ठेवुनि हरिवरिच भार अनुसरलों ॥
शिरलों अनुचित काजीं बुधदोषभयें न मागुता सरलों ॥१२॥
मत्काव्यीं दोष बहू आढळतिल परि न देखणें तिकडे ॥
दृष्टि असो भावार्थीं, कुरुप शिशु न घेइ माय काय कडे॥ १३ ॥
चतुरा सन्मानुनिया घ्यावें निकटीं अनादि ही रीत ॥
परि काय बुडों द्यावा जड अविवेकी कुनादि विहिरींत ॥१४॥
का नांगिकार करती जननीजनक स्व अज्ञ संततिचा ॥
दे अंगिकार करुनी मंजुलरव कागितें वसंत तिचा ॥ १५ ॥
सुज्ञ जसा निज सेवक असला जरि आर्ष सोडि न तयातें ॥
मी आर्ष, अज्ञहि खरा, परि माना आत्मचित्तिं नत यातें ॥१६॥
सज्जनपद्धति ऐसी, सत्पथ मंदा जडाहि दाखविती ॥
माखविती ज्ञानजलें, आत्मदयापीयुषाहि चाखविती ॥ १७॥
प्राकृत मत्कृत कविता स्वीकारा ही करूनि अनुकंपा ॥
वेडीवाकुडि जाणुनि पावे दावावयासि तनु कंपा ॥ १८ ॥
ही प्रौढसुरसशब्दें आलंकारादिकें न साजवली ॥
परि धैर्यवेत्र हस्तीं धरुनी मी पातलों तुम्हांजवळी ॥१९॥
होतां भवदनुकंपा मत्कवितारूप या लतेवरती ॥
पावेल वृद्धितें ती, न दयेतें कां दयाल ते वरती ॥ २० ॥
पावे श्रेष्ठत्वातें भूपें स्वीकारिल्या जडा गणिका ॥
तेवि मलिन मत्कविता सुज्ञें मग मानिल्या भया गणि कां ॥२१॥
सत्संगाच्या संगें अज्ञहि अज्ञानसागरीं तरतो ॥
युष्मत्प्रसादिं मन्मन दोष भयाच्या न वागरींत रतो ॥ २२॥
ऐसें जाणुनि मानसिं धैर्यें क्रम चालवीन पुनरपि तो ॥
त्यजुनी सुधारसातें कांजी नीरसाचि काय सुनर पितो ॥२३॥
कवितारसमाधुरितें जाणे तो रसिक जेवि मधु मधुप ॥
तत्तत्त्व जाणुनि सुखी होय जसा श्वशुर पाहुनी वधुप ॥२४॥

अरसिक नरा सुकविता वाटे कीं ही वृथाचि बडबड ती ॥
मग ते वाचाळपणें काढुनि विपरीत तर्क बडबडती ॥२५॥
सन्मार्गवर्तनाचा आहे सत्काव्य एक हा अरसा ॥
तो भंगितां कुतर्कें पावति मग ते असौख्यदा अरसा ॥२६॥
कविता कृति जरि नसती, मग मिळते काय पूर्व इतिहास ॥
अत एव मान कविला द्यावा, न भुला कुतर्कमोहास ॥२७॥
गुण गुणवानापुढतीं येतां तद्योग्यता कळूं येते ॥
तो गुण हीनासंगें लवणीं अस्वादु जेवि पय होतें ॥ २८ ॥
देवा, करूनि सुदया मत्कृत अप्रौढ काव्य तूं परिस ॥
लाधेल महति तेणें, लोहासी लागतां जसा परिस ॥ २९ ॥
न प्रार्थितां मुलाचें करिते सहजींच काज आई तें ॥
तैसें बहु प्रकारें करिल विनविल्याहि काय दाई तें ॥ ३० ॥
हरिचे गुणानुवादीं होतें सुख जेवि साधुसंतांना ॥
तैसें प्रपंचिकांतें पाहुनि जगमान्य साधु संताना ॥ ३१ ॥
अरसिक तया ह्मणावें, ज्यातें गोडी नसे सुकवितेची ॥
काव्यार्थतत्त्व जाणुनि पावति अत्यंत मोद सुकवि तेची॥३२॥
अरसिक जनास कविता दाखविणें जसि नपुंसका रमणी॥
वा जेवि अजापाला ‘ मोल करा हो ’ ह्मणून हीरमणी॥ ३३ ॥
कवितारसमाधुर्या सेवि जसा रासिक भृंग आमोदा ॥
जाणूनि तन्मधुरता प्रसवे पसरूनि दीर्घ आ मोदा ॥ ३४ ॥
कविता असो कसी तरि आणी माधुर्य ते तिला वक्ता ॥
यांत न अधिकचि कांहीं जैसा प्रभु थोरवीस निज भक्ता॥३५॥
आशा समूल आधीं निज चित्तांतुनि विवेकिं काढावी ॥
व्हावें मग वैरागी,जैसा रुग्णासि सौख्य काढा वी ॥ ३६ ॥
नाहीं तरी मग सुखें व्हावें अपुल्या निमग्न संसारीं ॥
वैराग्य वृथा दावुनि न बुडावें विश्वहास्यकासारीं ॥ ३७ ॥

ब्रह्मज्ञान अनुभवावांचुनि वांया जगांत बडबडणें ॥
वीरांचे संग्रामीं भीरूचें होय जेवि लडबडणें ॥ ३८ ॥
कविता तीच जियेच्या मोदें येती भरूनि उर गानीं ॥
जैसें सुमधुर सुरवें डोलावें फणि करूनि उरगांनीं ॥ ३९ ॥
बुद्धिपरी विस्तीर्ण स्थल न दुजें या समस्त जगतांत ॥
विज्ञा सांठवण तयीं, होय तसी नान्य वस्तु समुहांत ॥४०॥
संतपण हाटिं न मिळे वेंचुनिया हो उदंड धनराशी ॥
गगनीं वनीं रसातळिं, आहे तें पाहि आपणापाशीं ॥४१॥
मोक्ष नको, मुक्ति नको, ज्ञान नको, वित्तही नको, देवा ॥
दे जन्म असे शतशः, यत्ठायीं मज तुझी घडे सेवा ॥४२॥
दे जिव्हा असि कीं, तिज तव नामामृताचि गोड लागावें ॥
देवा, दिननिशि तीनें सोत्कंठें तव सुकीर्तिला गावें ॥ ४३ ॥
देसि तरि दे असे पद, ज्यांहीं तव कीर्तनांत नाचावें ॥
पूजावें हस्तांनीं, चक्षूंनीं त्वत्कथेसि वाचावें ॥ ४४ ॥
त्वन्मूर्ति सांठवावी हृदयें, तैसेंच आननें नामा ॥
घ्यावें, कर्णें लीला परिसावी, न तरि काय तनु कामा ॥४५॥
बहुतांचा ऋणि हरि हा, म्हणुनि ह्मणूं या दिवाळखोर न का॥
उठतांचि उभे द्वारीं दे दे जन ह्मणति मारुनी हाका ॥४६॥
त्या मागत्या समस्तां पाहुनि मग देव अंतरीं दडला ॥
निज माया आड करी, तेणें संसारिं जीव हा बुडला ॥४७॥
ऋण हें युगायुगांचें आहे जाणूनि मौनता धरिली ॥
तें सत्य करायास्तव श्रुतिशास्त्रांहीं स्वसाक्षि ही भरिली ॥४८॥
कविता तीच, करांतुनि ठेवावी वाचतां न वाटावें ॥
साधिलि जी काव्यपथें, अर्थाल्हादें स्वचित्त दाटावें ॥४९॥
न निमंत्रितांहि यावें श्रवणा सुज्ञेंहि धावुनी जवळी ॥
मकरंदसेवनार्थीं धांवे जशि कंजि आलिची अवली ॥५०॥

वाचन खळतांचि जिचें व्हावें बहु दुःख मानसा श्रोत्या ॥
होतां आरंभ पुन्हा पाहुनि आनंद याचका दात्या ॥५१॥
अतिहितकर लीनपणा, व्यवहारीं मैत्र तेवि नान्य खरा ॥
यास्तव अंगिं वसावा, वेश्येला पाहिजे जसा नखरा ॥५२॥
करणें बोध तयाला, वागे परिसूनि जो तदनुसारीं ॥
जसि लावणें न फलदा कंजलता होय शुष्ककासारीं ॥५३॥
न चि बोध पढत मूर्खा करणें, त्या तो न पात्र होईल ॥
घे निद्रामीष बळें, हांकें का जागृतीस घेईल ॥ ५४ ॥
सिद्ध वदान्य जहाला यद्यपि ईप्सीत वस्तु द्यायास ॥
तरि मागणें विचारें, समूल कां योग्य इक्षु खायास ॥५५॥
मृग, आश्विनी, पुनर्वसु, पुष्य, धनिष्ठा, तशाच अनुराधा ॥
श्रवण, मृग, हस्त, रेवति, नक्षत्रें हीं प्रयाणिं तुह्मि साधा ॥
त्रयपूर्वा आश्लेषा, जेष्ठा, जन्मोडु, कृत्तिका, स्वाती ॥
भरणी, मघा, विशाखा, चित्रा, गमनास वर्ज्य हीं असती ॥
विहिताविहित न समयीं सुचवावें मग कशास सुचवावें ॥
गतकालिं सुचविणें तें कालाविण जेवि बीज रुचवावें ॥५८॥
बोलावे बोल असे, परिसुनि सुज्ञें समोद डोलावें ॥
वाचाळ बोलणें तें, जैसें कधिंही न फोल मोलावें ॥ ५९ ॥
सत्य कविवर ह्मणावा स्मृतिवेदपुराणसार दाखविता ॥
तत्कविता, इतरांची लावुनि हरताळ सारवा कविता ॥६०॥
प्राकृतिंच अभंगानें वदला जो जनहिता तुकावाणी ॥
त्या वाणि ह्मणुनि ह्मणती, अज्ञ जसे जान्हवीजला पाणी ॥
गंगातीर्थग्रहणें लाधे जन मुक्तितें वराभंगा ॥
सत्श्रेष्ठ तुकोबाच्या तैसे बोधामृताकराभंगा ॥ ६२ ॥
कविता तीच सुनिनदें जडली जी जेवि हेमकार गुणीं ॥
मणिजडणी कोंदाणें करि, वा गुंफी चतुर पुष्पहार गुणीं ॥६३॥

काव्यरसज्ञ जनासी दावावें काव्य तें बळें करुन ॥
तत्तत्त्वरसें तोषित होय, तसा पाहुनी स्वलेकरुं न ॥ ६४ ॥
बोले तैसा कधिं तरि जो जन आलस्यमान करि काय ॥
चापल्यता न जैसी पावे हरिणासमान करिकाय ॥ ६५ ॥
कविता कधिंही सुज्ञें योग्य नसे दावणें अरसिकांना ॥
बुध हो, वदा, फलद कां होइल ती लावणें अरासि काना ॥६६॥

प्रकरण ५९ वें.

मंगलाष्टकें.

शार्दूलविक्रीडित.

श्रीमन्मंगलमूर्तिपादकमला, तैसें जगच्चालका ॥
ब्रह्मा विष्णु महेश वासव नमूं अष्टादिशा–पालकां ॥
आदित्यादि नवग्रहां, सुरमुनिव्यासादियोगीकुल ॥
गंधर्वाहिकुलेंद्र या वधुवरां देवो सदा मंगल ॥ १ ॥

आदी मत्स्य, दुजाचि कच्छ, तिसरा दंष्ट्रिस्वरूपा धरी ॥
चौथा श्रीनरसिंह, वामन बटू औतारि झाला हरी ॥
षष्ठीं भार्गवराम, भास्करकुलीं श्रीराम नाशी खल ॥
श्रीकृष्णाष्टम, बौध तो, दश कली देवो सदा मंगल ॥ २ ॥

पद्मा हेमवती पितामहसती वागीश्वरीनर्मदा ॥
श्रीनारायणपादपंकजभवा भागीरथी मोक्षदा ॥
कावेरी यमुना सरस्वति तशी गोदावरी निर्मल ॥
क्षिप्रा वेत्रवती नदी वधुवरां देवो सदा मंगल ॥ ३ ॥

व्योम, क्ष्मा, बलिसद्म, पावक, तथा तेजानिलापांपती ॥
अश्विन्यादि सतेज यामिनिमधीं तारा नभीं शोभती ॥
मंदारादि सुरद्रु, किन्नर, तसे योगी अरण्यांतिल ॥
दैवत्यें, पशुपक्षि, नागगणही देवो सदा मंगल ॥ ४ ॥

ज्ञाते ब्राह्मण, सार्वभौम नृपती, साध्वी सुवंशांगना ॥
सामादि श्रुतिशास्त्रमंत्रवचनें, जीं शुद्धि देती मना ॥
तैसे सज्जनसाधुवृंद, न जयां लागे कुबुद्धीमल ॥
सर्वेही करुनी कृपा सतत या देवो सदा मंगल ॥ ५ ॥

प्रकरण ६० वें.

पदसंग्रह.

पद १ लें.

चालः—काय मला भूल पडलि.

गौरितनयचरण आधिं वंदुं आदरें ॥ विविधविघ्नसमुह हरति ज्याचिया वरें ॥ ध्रु० ॥ ब्रह्मा विष्णु महेश यांहिं स्तविला गायनीं॥ वृंदारकवृंद वंदि बद्धपाणिंनीं ॥ शरण रिघुनि ध्याति चितिं विप्रगण मुनी ॥ अमंगलासि नाशुनि दे मंगला त्वरें ॥ १ ॥ द्विरदवदन दीर्घकर्ण वरदपाणि तो ॥ एकदंत दयावंत रुचिर शोभतो ॥ इंदु भालिं शीर्षि मौलि अमित झळकतो ॥ रुणझुणती मंजुळरवें चरणिं नूपुरें ॥२॥ सिंदुरादि दैत्य दमुनि तोषवी सुरां॥ भक्तजनपालनासि करित बहु त्वरा ॥ हरुनि मायाजालभीति मुक्ति दे वरा ॥ गावी तव कीर्ति केवि मूढ या नरें ॥ ३ ॥ संसारतापसाप डंक हा करी ॥ त्या विषा शमनिं शक्य कोण गा हरी ॥ रक्षि रक्षि वरदपाणि ठेवुनी शिरीं ॥ साष्टांगें शिवतनय वंदितो करें ॥ ४ ॥

पद २ रें.

जगदीशा भवनाशा इंदिरापते ॥ बद्धपाणि दीनवाणि स्तवित हा तुतें ॥ ध्रु० ॥ हरुनि मायाजाल पाल बालकामती ॥ काम-

क्रोधदंभलोभ नित्य पीडिती ॥ विषयसौख्यभोगकाम इंद्रियां अती ॥चाल॥ देवा, सेवा, हेवा, तूं पुरवी, गति बरवी, मज करवी, आपुल्या हतें ॥ १ ॥ मिळुनि जन्म उत्तमकुळिं व्यर्थ जाहला ॥ नाहिं स्वर्गलाभ तेवि प्रपंच साधिला ॥ करुनि दुष्टकर्म पदरिं दोष बांधिला ॥चाल॥ तारी, हारी, सारी, भवचिंता, श्रीकांता, मज आतां, देइ भेटितें ॥ २ ॥ रात्रंदिनिं श्रमित होय उदरपोषणा ॥ स्मरण तुझें नाहीं परि होत या मना ॥ करुनि दया त्वरित मुरडि दुष्टवासना ॥ चाल ॥ पाहे, साहे, ना हें, दुःख मला, शिवशिशुला, देइ मुक्तितें ॥ ३ ॥

पद ३ रें.

हरिपदपद्मीं लुब्ध, मना, तूं मकरंदीं हो भृंग जसा ॥ प्राशुनि नामामृत तें च्छेदीं दुर्धर वैवस्वतपाशा ॥ध्रु०॥ भूसलिलादिक भूतें मिळुनी भौतिक जड वपु हा सजला ॥ काममदादिक वैरीवृंदें अलभ्य नरतनु नाडियला ॥१॥ करुनी नाना उपाय केलें रक्षण अनुदिनिं निजहस्तीं ॥ ऐशा देहा सांडुनि लागे जाणें निश्चित तुज अंतीं ॥२॥ त्यागुनि ममता नाशिवंतीं अढळ सुखातें तूं सेवी ॥ दीन कृष्ण हा सर्वहि पाहुनि जोडुनि पाणी तुज विनवी ॥३॥

पद ४ थें.

हरिगुणमहिमा काय वदावा, श्रुतिशास्त्रांही न पडे ठावा ॥ध्रु०॥ चरणरजानें अघनग तरती, नामस्मरणें विघ्नें पळती ॥ चिन्मय सच्चित् निर्विकारी, श्रीहरि भवभय वारी ॥१॥ स्थितिलयउद्भव लीलें करितो, व्यापुनि सर्वहि तत्त्वें वसतो ॥ त्रिगुणातित अविनाशी, निधिवासी पाळी भक्तांसी ॥ २ ॥ उमातनय हा वंदित चरणीं, रक्षी चक्रपाणि ॥ भुललों धनसुतदाराकामीं, ने निज धामीं शरण तुला मी ॥ ३ ॥

पद ५ वें.

श्रीजगदंबे करविरवासिनि अंबाबाई जगमाते ॥ भक्तजनाचें पालन करिसी हरुनी संकट निजहातें ॥ ध्रु० ॥ अरुणरुचीसम लोहित कांती चरणसरोजीं बहु शोभे ॥ नखरसमुह तो विधुदीप्तीतें लाजवि अपुल्या धवलप्रभें ॥ पायीं तोडर रुणझुणताती देती मंजुल मधुध्वनितें ॥ १ ॥ परिरंभासम जानुद्वय तें नितंब जेवी करिकपोल ॥ सिंहकटिवरी उदर विराजे वसती बहु जैं विधिगोल ॥ दीर्घ त्हदयावरी विराजति कांचनकलशासम स्तन तें ॥२॥ चतुर्बाहु आजानु कर ते शोभति नानाविध भूषणीं ॥ मातुलिंगफलगदाखेटकीप्राशनपात्रायुत पाणी ॥ कंबुकठीं नानामणिचे आपाद लोळती बहु हार ते ॥ ३ ॥ प्रवालवेलीसम अधर द्वय नासिक जेवी तिल सुमन ॥ विकसितकमलासम बहु फुल्लित विशाल आश्रुति यन्नयन ॥ भालीं कुंकुमतिलक विराजे शीर्षीं कुटिलाकृति कच ते ॥ ४ ॥ कनककिरिटाशिरि झळके बहुपरि ऐशी त्रिगुणातितमूर्ती ॥ स्थितिलयउद्भव लीलें करि जी विध्वंसी खलदनुपंक्ती ॥ दीन कृष्ण हा हस्त जोडुनी वंदी परिपाळी त्यातें ॥ ५ ॥ श्रीजगदंबे ॥

प्रकरण ६१ वें.

आरत्यासंग्रह.

१ आरती श्रीगणपतीची.

जयदेव जयदेव जयजय गणराजा ॥ आरती ओवाळूं नमुनी पदकंजा ॥ ध्रु० ॥ भावें नमितां चरणीं मंगल तूं देसी ॥ शुंडादंडें नाशिसि सकलहि विघ्नांसी ॥ कार्यारंभीं नमिती सुरमुनि आधीं तुजसी ॥ करिती त्रिजगीं जन तव अग्रपूजेसी ॥ १ ॥ गौरीशंकर

अंकीं तुजलागी घेती ॥ पाहुनि तव मूर्तीतें आनंदित होती ॥ नंदी भृंगी शृंगी सादर तुज स्तविती ॥ अगाध महिमा गातां शिणल्या श्रुतिस्मृती ॥ २ ॥ स्थूलोदर श्रुतिपाणी सुंदर गजवदन ॥ सिंदुरचर्चितविग्रह आखू यद्वाहन ॥ पाशांकुश करिं मस्तकिं दुर्वांकुर सुमन ॥ शोभे मुकुटीं अहि, नमि शिवसुत तच्चरण ॥ ३ ॥

२ आरती श्रीअंबाबाईची.

जय जगवंद्ये अंबे आदिमाये ॥ मर्दुनि दानव वससी करवीर ठाये ॥ ध्रु० ॥ विधिहरिहर सुरमुनिनर तुजला वंदीती ॥ करिसी सकल जगावनहानी–उत्पत्ती ॥ अनन्य भावें तुजला शरण जे येती ॥ त्यांचे संसारोद्भव दुःखाचल हरती ॥ १ ॥ त्रिगुणातित अविनाशी तूं आदिमाया ॥ करसी नाना लीला भक्तां ताराया ॥ शिणला तव महिमा तो दशशतमुख गाया ॥ नत होउनिया मग करि तव शिरिं फणि च्छाया ॥ २ ॥ रक्षिसि शरणागत जन संकटभय हरुनी ॥ जन्ममरणभ्रमणापासुनि सोडवुनी ॥ अंतीं धाडिशी अंबे अपवर्गस्थानीं ॥ तारी शिवसुत आहे नत हा तव चरणीं ॥ ३ ॥

३ आरती हनुमंताची.

आरती हनुमंता ॥ अंजनीच्या सुता ॥ राघवभक्त होसी ॥ राक्षसकुल विध्वंसी ॥ ध्रु० ॥ चैत्र पौर्णिमेसी, अंजनीच्या उदरासी ॥ अवतीर्ण जाहलासी, धरुनी बालरूपासी ॥ १ ॥ उडुनी जलनिधि सीताशुद्धि त्वां केली ॥ जाळिलि लंकापूरी, सेतु बांधिला सागरीं ॥ २ ॥ सौमित्र शक्तिघातें, पडियला रणातें ॥ आणुनि द्रोणाचल, उठविसि तत्काल ॥ ३ ॥ रावणकुंभकर्ण, सहदल मर्दून ॥ आणिलि सीतामाता, तोषविलें रघुनाथा ॥ ४ ॥ बिभीषण लंकापती, करुनिया रामहातीं ॥ केला तो चिरंजीवी,

थोरि तुझी किति गावी ॥ ५ ॥ सेनेसह रघुपती, आणुनिया साकेतीं ॥ स्थापिला राज्यासनीं, वंदी कृष्ण तच्चरणीं ॥ ६ ॥

४ आरती सत्यनारायणाची.

जयदेव जयदेव जय सत्यदेवा ॥ आरती ओवाळूं करुं चरणसेवा ॥ कलियुगीं व्रत तुझें करती जे जन ॥ त्यांचीं सकलहि दुरितें होती निरसन ॥ सकलहि सौभाग्यातें अखंड लाधून ॥ पावे इह परलोकीं अतितर सुख जाण ॥ १ ॥ प्रदोषकालीं तूझें पूजन जे करिती ॥ त्यांचीं सकल विघ्नें भवताप हरती ॥ व्रतमहिमा वृत्तांता श्रवण जे करिती ॥ भक्षिति प्रसादातें स्वर्गीं ते जाती ॥ २॥ सत्यनारायणव्रत भावें जो करी ॥ सत्यदेव त्याचा बहु साह्यकारी ॥ व्रतसामर्थ्यें तरती भवनिधि नरनारी ॥ कृष्ण ह्मणे देवा भविं तूं मज तारी ॥ ३ ॥

५ आरती पांडुरंगाची.

आरती पांडुरंगा ॥ करि संसृतिभयभंगा ॥ चरणीं होतां लीन ॥ चुकवी जन्ममरण ॥ ध्रु० ॥ अनंत सृष्टि गोल ॥ तव उदरीं ते सकल ॥ घालुनि मायाजाल ॥ अवलोकिसि तत्खेल ॥ १ ॥ गुंतविसी मायामोहीं ॥ धनसुतदारा यांहीं ॥ भुलले तव पाया ॥ केली नरतनु वाया ॥ २ ॥ अनेक साधू संत ॥ तव भजनीं आसक्त ॥ देसी त्यां निज तक्त ॥ अशा कथा अनंत ॥ ३ ॥ श्रीक्षेत्रपंढरपूरीं ॥ राहे उभा विटेवरी ॥ ठेवुनि कटिं कर ॥ होउनिया मनिं स्थिर ॥ ४ ॥ राही आणि रखुमाई ॥ लीन सदा तव पायीं ॥ आरती कृष्ण गाई ॥ वंदुनीया त्या पायीं ॥५॥

समाप्त.

शुद्धिपत्र.

पृष्ट.	पद्यसंख्या.	अशुद्ध.	शुद्ध.
११	४९	भूषणार्थ	भूषणार्ह
२२	१	धृता	धरा
२३	९	च	न
२५	२५	द्या	हे
३२	७१	भाउकाचे	भाविकाचे
३५	८८	शमत	शमन
३६	९३	मुखोच्छिष्ट	रदोच्छिष्ट
३९	१५	गये	गई
६३	२५	श्रेष्ठा मा	श्रेष्ठात्मा
६३	२८	मित्रचि	विष्णुचि
६४	१	राया	गाया
७५	१०	स्तोत्य	स्तौत्य
७७	२२	श्रह्ना	श्रद्धा
८६	१	उदयातालिं	उदयाचलिं
१४३	१४	सचित्त	साचित्त
१५९	१७	जेव्हां	तेव्हां
१६५	३३	कैसा इहा है धेड	इह है कैसा धेड
१६६	४३	चिंता	चित्ता
१७९	३२	आरूढ	आरूढे
१९८	१५	मनी	मुनी
२११	११	कवणे	कवण
२२३	६१	बोल	बोले
२३७	३	महासाध्वि	महानसाध्वीं

२४५	६५	द्रुत	द्रुण
२९३	३४	रडत बघुनिया	तानुलें मुखें
२९३	१	जन्मकथा	जन्माला
३१५	५	श्री	वर
३२३	४१	चतुराननास्य,	चतुरानना, स्व
३२५	१४	गेरूतें	मेरूतें
३२७	२९	बावरिले	बावरिलें
३६४	४३	पारिजाद्रुत नवदलपरी	पारिजातद्रु नवदलपरी
३६४	४४	भ्राते	भ्राते
३७१	९३	स्ववीती	स्तवीती
३८०	९५	जन्मादारध्य	जन्मादारभ्य
३८७	८५	उपघटिका	उपवटिका
३९३	५६	मेघमालिला	मेघमालिका
३९९	७	गहिवरें	गिरिवरें
४००	११	श्रीशंकराला	श्रीशंकरभोला